

# सृष्टीचे सृजन - चिरंतन लीला

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवी

# सृष्टीचे सृजन
## चिरंतन लीला

परम पूज्य माताजी श्रीनिर्मला देवी

अनुवाद
श्री.रमण कुलकर्णी

# प्रास्ताविक

आपल्याला नेहमीच आश्चर्य वाटते की श्रीआदिशक्तींनी हे जग कसे बनवले असेल, त्यांनी कशी योजना केली असेल व कसे त्याला संघटित केले असेल.

त्यांना प्रेमाच्या शक्तीने प्रेरित केले. त्यांचे प्रेम उभारी घेऊन बाहेर आले आणि त्यांनी सर्व सृष्टीची रचना करण्याची योजना बनवून तिच्या निर्मितीस आरंभ केला. पण त्यांनी मानवाची प्रतिमा त्यांचा पुत्र श्रीगणेश यांच्यात फार पूर्वीच म्हणजे पृथ्वी व त्यांच्यावरचे रहिवासी यांच्याही निर्मितीच्या आधी, धारण केली होती. तसेच अवतरित होण्याच्या आधीच त्यांनी सहजयोग निश्चित केला होता. ''माझ्या जन्मापासूनच मला त्याची माहिती होती. मला स्वत:विषयीही माहीत होते....''

सहजयोगाच्या आगमनापूर्वी, १९७० साली त्यांची परमेश्वरी योजना त्यांच्या डायरीत त्यांनी लिहिली होती. त्या डायरीची मौल्यवान पाने पुस्तक रूपात **'सृष्टीचे सृजन-चिरंतन लीला' (क्रिएशन-द इटर्नल प्ले)** या शीर्षकाखाली संकलित केली गेली. ''अर्थात् मी त्याबद्दल सर्व काही लिहिले आहे आणि माझे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर तुम्ही पाहू शकाल..... की जिवंत क्रियेचा आरंभ कशाप्रकारे होतो. मी बहुतेक कार्य पूर्ण केले आहे, पण अजून काही चक्रांवर लिहायचे आहे.'' (श्रीआदिशक्ती पूजा, २१ जून १९९८)

कदाचित त्यांना यापूर्वी ते ज्ञान प्रकट करायचे नसावे, कारण त्यांच्या कार्यात अडथळे आले असते. बौद्धिक शोधाचे आत्म्याच्या शोधाला ग्रहण लागले असते.

मुलांना आपल्या जवळ घेण्याची त्यांना ओढ होती पण मुलांच्या संवेदना इतक्या क्षीण झाल्या होत्या, की मुले त्यांचे प्रेम समजू शकत

नव्हती. त्यांनाही सक्तीने मुलांना आपल्या जवळ घ्यायचे नव्हते, कारण त्यांना मुलांच्या स्वेच्छेचा आदर होता. पण मुलांकडे दुर्लक्षही करायचे नव्हते. मुलांना आपल्या पवित्र हृदयात घेऊन तिथे त्यांचे संगोपन केले. एकट्यांनी सहजयोग्यांचे भविष्य घडविण्याचा भार उचलला. फक्त त्याच, श्रीआदिशक्तीच हे कार्य घडवू शकल्या. त्याच केवळ माणसांच्या सर्व स्वभाव वैशिष्ट्यांना, स्वभावाच्या कंगोऱ्यांना, पैलूंना, सिद्धांत (आयडियालॉजी) व प्रभावांना सामावून घेऊ शकल्या. त्या केवळ माणसाची शारीरिक, बौद्धिक, मानसिक अंगेच नव्हेत तर संपूर्ण माणूस पाहू शकत होत्या. त्यामुळे त्यांच्या हे लक्षात आले, की माणसांमधली करुणाच फक्त माणसांची संवेदनशीलता सशक्त करू शकेल.

म्हणून ती करुणा धारण करण्यास व कार्यान्वित होण्यास माणसांना कलियुगाच्या कुरुक्षेत्रातून जावे लागले. त्या माणसांनी जेव्हा लोक पूर्णपणे बुडतांना व नष्ट होतांना पाहिले तेव्हा लोकांना मुक्त करण्यास त्या माणसांची करुणा कार्यान्वित झाली. उत्क्रांती या स्तरावर प्रगत होण्याच्या प्रतीक्षेत श्रीमाताजी होत्या. अचेतनाने चेतन मनात प्रवेश करून श्रीआदिशक्तींच्या सृष्टीच्या निर्मितीला अर्थ दिला. कार्यान्वित झालेली शक्ती त्यांनी घडविलेल्या सूक्ष्म यंत्रातून (इन्स्ट्रुमेंट) उभारी घेऊन वर आली आणि त्या शक्तीने सृष्टीला सजविले.

श्रीआदिशक्तींच्या पुस्तकातला प्रत्येक शब्द सूज्ञतेच्या ज्ञानाचा मोती आहे. आपल्या पवित्र हृदयात ठेवून याचा सांभाळ करायला हवा. जग हा खजिना सांभाळू शकणार नाही. बुद्धीच्या मत्सरी दृष्टीपासून व निष्फळ बौद्धिक विश्लेषण व अंदाज यांच्यापासून या खजिन्याचे संरक्षण करायला हवे. शिवाय हे प्रकटीकरण असल्याने हा चर्चेचा विषय नाही, तर ध्यान करण्याचा विषय आहे. याच्यातला प्रत्येक शब्द बीजमंत्र आहे. आपण श्रीआदिशक्तींना आपल्या हृदयात स्थापन केल्यावर या बीजाचे संगोपन होईल. मग ते अंकुरित होऊन त्यांचा संदेश प्रकाशित करेल, हे त्यांचे वचन आहे.

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | **सृष्टीचे सृजन-चिरंतन लीला** | ९ |
| | सृजनाची प्रथम अवस्था | १० |
| | परमात्मा - पुरुष | ११ |
| | सृजनाची दुसरी अवस्था | १५ |
| | सृजनाची तिसरी अवस्था | १६ |
| | प्रणवाचा नाद | २० |
| | परब्रह्माची परमेश्वर रूपातील तीन अंगे | २३ |
| | सदाशिव | २३ |
| | हिरण्यगर्भ (प्रजापती) | २५ |
| | विराट | २६ |
| | आदिशक्तींच्या शक्ती | २७ |
| | आदिशक्तींच्या अन्य शक्त्या | २९ |
| | महाकाली (शिवानी) शक्ती | ३० |
| | महासरस्वती (हिरण्यगर्भिणी) शक्ती | ३१ |
| | महालक्ष्मी शक्ती | ३१ |
| | परमेश्वरी (ईश्वरी) शक्ती | ३२ |
| | प्रणव शक्ती | ३२ |
| | सृजनाच्या चार अवस्था | ३३ |
| | तीन गुणांचे सृजन | ३६ |
| | विराटाची निर्मिती | ३८ |
| | ऊर्ध्वस्थ शक्ती (आदि कुंडलिनी) | ३९ |
| | श्री गणेशांची निर्मिती | ४१ |

| | | |
|---|---|---|
| | एकेश्वर वाद | ४४ |
| २. | **ईश्वरी अवतार - परमेश्वराचे राजदूत** | **४७** |
| | विष्णु अवतार | ४८ |
| ३. | **उत्क्रांती** | **६६** |
| | पदार्थमात्राची निर्मिती | ६६ |
| | मानवी-शारीरिक अस्तित्व (जाणीव) | ७२ |
| ४. | **मानवाचा शोध** | **७६** |
| ५. | **सुप्त चेतना आणि सामूहिक सुप्त चेतना** | **८८** |
| | वाईट लोक | ९१ |
| | साधे लोक | ९१ |
| | श्रेष्ठ लोक | ९१ |
| | अवतार | ९२ |
| ६. | **तंत्रवाद** | **१२२** |
| | तंत्रवादाचे मूळ | १३७ |
| ७. | **हठयोग आणि राजयोग** | **१५४** |
| | हठयोग | १५५ |
| | राजयोग | १५७ |
| ८. | **सहजयोग** | **१६०** |
| ९. | **मानवातील कुंडलिनीची निर्मिती** | **१७०** |
| | मानवी गर्भात कुंडलिनीचा प्रवेश | १७१ |
| | स्वयंचलित नाडी संस्था | १८१ |

| | | |
|---|---|---|
| | अहंकार व प्रति अहंकाराचा विकास | १८३ |
| | चेतनबाह्य मनाचे कार्य | १८६ |
| **१०.** | **धर्माचा मध्यमार्ग** | **१८८** |
| | दैवतांचे धर्म आणि त्यांची चक्रे | १९१ |
| **११.** | **चक्र आणि केंद्र** | **१९८** |
| **१२.** | **मूलाधार चक्र** | **२०४** |
| | अवतार | २०४ |
| | साक्षात्कारी जीव | २०५ |
| | सर्वसाधारण मानव | २०६ |
| | दिशाभूल झालेले साधक | २०६ |
| | मूलाधार चक्राचे कार्य | २१० |
| | पहिली पाकळी | २१० |
| | दुसरी पाकळी | २११ |
| | तिसरी पाकळी | २१२ |
| | चौथी पाकळी | २१२ |
| | मूलाधार चक्राचे कार्य | २२३ |
| | स्वस्तिक आणि क्रॉस | २६१ |
| **१३.** | **स्वाधिष्ठान चक्र** | **२६३** |
| **१४.** | **श्री आदिशक्तीच्या शक्ती आणि तीन गुण** | **२७१** |
| | भौतिक शक्ती | २७२ |
| | महासरस्वती शक्ती | २७२ |
| | अस्तित्व शक्ती | २८० |

| | |
|---|---|
| महाकाली शक्ती | २८१ |
| धर्मशक्ती | २८४ |
| श्री महालक्ष्मी शक्ती | २८५ |
| पंचमहाभूतांची निर्मिती | २८७ |
| पृथ्वी तत्त्व | २८७ |
| जल तत्त्व | २८८ |
| प्रकाश/अग्नी तत्त्व | २९० |
| वायु तत्त्व | २९३ |
| आकाश तत्त्व | २९४ |
| **'सृजन' या विषयावर श्रीमाताजींचे प्रवचन....** | **२९७** |
| **श्रीमाताजींनी काढलेल्या अतिरिक्त आकृत्या** | **३१९** |
| आकृती १६ ते १९ | ३२०-३२३ |

## प्रकरण १

# सृष्टीचे सृजन-चिरंतन लीला नाटक

सृष्टीची निर्मिती ही परमेश्वराची परब्रह्म स्वरूपातील चिरंतन चालणारी लीला आहे. परब्रह्म म्हणजे जे परम, परिपूर्ण आणि सर्व धारण करणारे आहेत. परब्रह्माच्या दोन वैश्विक अवस्था आहेत, जागृत व निद्रिस्त. परब्रह्म जागृत अवस्थेत असते तेव्हा त्यांचा सृष्टीच्या रूपात आविष्कार होतो. निद्रिस्त अवस्थेत सर्व कार्य परम शून्यात विलीन होते व सृष्टीचे अस्तित्व लोप पावते. ही कोणतीही हालचाल नसलेली शक्ती- विरहित अवस्था असते. जे काही जड व जीवित निर्माण झालेले असते, ते या अवस्थेत निर्गुण, निराकार शक्तीमध्ये विरघळते. ती निर्गुण, निराकार (ॲबस्ट्रॅक्ट) शक्ती असते परब्रह्म. ही एक निखळ अस्तित्वाची स्थिती असते. जसे एक वस्तू आहे, पण त्याच्यावर प्रकाश पडून ती दिसू लागण्यास प्रकाशच नसावा. सृष्टीच्या निर्मितीचे लीला नाट्य विशेषप्रकारे परब्रह्माच्या आनंद व विरंगुळ्यासाठी होत असते. परब्रह्माने ते थांबवल्यावर सर्व मानव, दानव, अतिमानव व अमानव भूतमात्रांचा परब्रह्मात विलय होतो. अशाप्रकारे परब्रह्माच्या निर्गुण, निराकार अस्तित्वापासून त्यांचे सृष्टीच्या रूपात पूर्ण प्रकट होण्याचे चक्र फिरत असते.


सृष्टीच्या निर्मितीचा आरंभ केव्हा झाला यासंबंधी दीर्घकाळापासून विवाद चालू आहे. पण जर हे लक्षात घेतले की परब्रह्म म्हणजे चिरंतन असणे, निरंतर असणे, तर हा विवाद सहज संपू शकतो. व्यक्ती जेव्हा जागृत अवस्थेत असते तेव्हा ती कार्यरत असते. त्याचे व्यक्तित्व त्याच्या कार्यामधून दिसून येते आणि त्याची बुद्धिमत्ता अभिव्यक्त होते, पण निद्रिस्त असतानांना कार्यरत नसल्याने त्याचे व्यक्तित्व त्याच्या अंतरंगात ओढले जाते.

निर्मितीच्या प्रक्रियेची तुलना बीज अंकुरित होऊन त्याचा वृक्ष बनणे व

परिपक्व झाल्यावर पुन्हा बीज होणे याच्या प्रक्रियेशी होऊ शकते. परब्रह्माचे कार्य सुरू होण्यापूर्वी ते आदिबीज (ब्रह्मबीज) रूपात असतात. सृष्टीची निर्मिती ही या बीजाचे प्रकटीकरण आहे. संपूर्ण पैलू असलेल्या परिपूर्ण स्फटिकाप्रमाणे ते असते.

## सृजनाची प्रथम अवस्था

ब्रह्म बीज (आदिबीज) दोन भागांमध्ये विभागले जाते : एक बीज आणि दुसरे त्याची अंकुरित होण्याची शक्ती. सृष्टीनिर्मितीच्या नाट्यात बीज प्रेक्षक असते आणि त्याची अंकुरित होण्याची शक्ती भव्य दृश्याची निर्मिती करते. स्फटिकाचे जर आपण केंद्रबिंदु (Nucleus) आणि पैलू (Facets)




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १**

असे दोन भाग केले, तर त्याच्यावरून ब्रह्मबीजाच्या द्विभागण्याची संकल्पना लक्षात येईल. परंतु, भौतिक जगात अशी वस्तु तयार करणे शक्य नाही. अशाप्रकारे परमेश्वर आणि त्यांची शक्ती (महाशक्ती) अशी दोन व्यक्तित्व तयार होतात. ते परमात्मा (पुरूष) आणि सृष्टीच्या सृजनाची मातृशक्ती (प्रकृती अथवा होली घोस्ट) म्हणून राहतात. ते आपले परमेश्वरी माता-पिता-आदिपिता (Primordial Father) व आदिमाता (Primordial Mother) असतात. परब्रह्म हे ब्रह्मबीजच्या स्वरूपात लक्षावधी वर्षे (कल्प) सुप्तावस्थेत असतात. परब्रह्म त्यांच्या वैश्विक निद्रेतून जागे झाल्यावर त्यांचे एकदुसऱ्यापासून वेगळे होणे घटित होते. आकृती १ मध्ये 'S' अक्षर परमेश्वरी बीज दर्शविते.

परब्रह्माच्या जागृतीबरोबर त्यांची शक्ती क्रियाशील होऊन बीजामध्ये परमेश्वरी प्रेमाची लाट जागृत करते. क्रियाशीलतेचे हे स्फुरण आदिस्पंद, नादास (आदि ब्रह्मनाद) निर्माण करते, जणू काही स्फटिकाच्या केंद्रबिंदुच्या सभोवताली परमेश्वरी शक्तीने वर्तुळाकार लाटा प्रवाहित कराव्या व त्यात स्फटिक विरघळावा. या लाटा केंद्रबिंदुच्या सभोवताली साठत राहून आदिवलयाची निर्मिती करतात. शेवटी आदि परमेश्वरी शक्ती आदिबीजाच्या बाहेर येऊन प्रवाहित होऊन आदिवलयात जाते. अशा प्रकारे पहिल्या अवस्थेत अंकुरित होणारे बीज दोन घटकांमध्ये प्रस्फुटित होते.

एक घटक असतो, सर्वशक्तीमान व सर्वज्ञानी केंद्र, साक्षी अथवा प्रेक्षक (पुरुष) व दुसरा घटक असतो आदिवलयाच्या स्वरूपातील परमेश्वरी शक्ती (महाशक्ती) जी दृश्य सृष्टीला प्रकट करते.

## परमात्मा - पुरुष

आकृती १ मधील केंद्रबिंदु परब्रह्माला परमात्मा (पुरुष) या स्वरूपात दर्शवतो, ज्यांना परमेश्वर, अल्लाह, जिहोवा (Jehovah), अथवा प्रेक्षक म्हणून ओळखले जाते. ते स्वत:च्या शक्तीपासून (प्रकृती वा महाशक्ती) पूर्ण

वेगळे झाले असून त्यांच्या शक्तीने त्यांच्यासाठी निर्माण केलेल्या लीला नाटकाचा आनंद घेतात. तो आनंद घेण्यासाठीच ते वेगळे असतात.

ते केवळ एकटेच प्रेक्षक असल्याने त्यांच्याच आधारावर लीला नाट्य अवलंबून असते. वास्तविक, दृश्यमान होत जाणारे लीला नाटक त्याना अभिव्यक्त करण्यासाठी व त्यांना प्रसन्न करण्यासाठीच असते. त्यांच्या विरंगुळ्यासाठी असल्याने ज्या क्षणी त्यांना आनंद मिळणे थांबेल त्याच क्षणी ते लीला नाटक बंद करतील. बटन बंद करून विजेचा दिवा मालविला जातो त्याप्रमाणे स्वतःची अभिव्यक्ती केव्हाही थांबविण्याची शक्ती त्यांच्यामध्ये आहे. परमेश्वराचा सहभाग केवळ प्रेक्षक किंवा साक्षी असणे एवढा असला तरी सर्व बळ व भारदस्तपणा त्यांच्याकडूनच येतात. त्यांनी निर्माण केलेल्या सर्व जीवांना ते संरक्षणाचा आनंद देतात. त्यांच्यामुळेच प्रत्येक गोष्ट अस्तित्वात असते, म्हणून ते स्वतःच निखळ अस्तित्व (स्थिती), केवळ असणे आहेत. लीला नाटकास केवळ त्यांचाच आधार असल्याने ते स्वतःच धर्म होतात. शिवाय ते संपूर्ण जाणीवेचा प्रकाश आहेत. त्यांच्या सूज्ञतेस आव्हान देणे अशक्य असल्याने (त्यांच्याहून अधिक सूज्ञ कोणीही नसल्याने) सर्व गोष्टीत तेच निर्णय घेतात. सूज्ञता त्यांच्याकडूनच मिळते. माणूस हा त्यांच्या जाणीवेची एक अभिव्यक्ती आहे. (माणसाची जाणीव त्यांच्या जाणीवेचा एक अंश आहे आणि माणूस त्यांचीच जाणीव अभिव्यक्त करतो) धर्माचरणातील स्वाभाविक सूज्ञता, त्यांच्या देहातूनच प्रसारित होते. त्यांच्या व्यक्तिमत्वातून विश्वाचे कल्याण वाहत असते व विश्वात भरून राहते. तसेच ते संपूर्ण सृष्टी आनंदाने व्यापून टाकतात. ते प्रत्येक गोष्टीचे निर्माते आहेत व प्रत्येक गोष्टीचे त्यांच्या आनंदासाठी सृजन केले जाते. ते संपूर्ण भोक्ता आहेत. ते अति महानांमधले अति महान आहेत, सर्व वैभवांचे वैभव, सर्व तेजांचे तेज आहेत. सर्वव्यापी व सर्वशक्तीमान असल्याने ते प्रत्येक गोष्टीतील वैभव व तेज आहेत आणि त्यांच्या सर्वव्यापी शक्तीमुळे ते असीमितात सीमित आहेत (असीमित असून सीमित आहेत)

सीमितामध्ये असीमित आहेत (सीमित असूनही असीमित आहेत). शिवाय ते सूक्ष्मातील अतिसूक्ष्म आहेत व केव्हाही मानवी स्वरूपात अवतरित होत नाहीत. फक्त त्यांची शक्तीच अवतरित होते. त्यांच्या शक्तीच्या अवतारांमधून किंवा शक्तीच्या मुलांच्या अवतारांमधून त्यांचा प्रत्यय येतो. पुरुष अवतारांमध्ये ते प्रतिबिंबित होतात. ते सर्व अवतारांच्या वर (पलीकडे) असून सर्व अवतार त्यांच्यातूनच प्रकटतात.

स्वत: प्रतिबिंबित होण्यासाठी त्यांच्या शक्तीच्या माध्यमातून ते सृष्टीची निर्मिती करतात. सृष्टी त्यांना प्रतिबिंबित करणारा रिफ्लेक्टर अथवा आरसा आहे. माणूस हा त्यांनी घडविलेला सर्वात उत्तम रिफ्लेक्टर आहे. त्याची निर्मिती व नंतर उत्क्रांती मोठ्या कारुण्याने त्यांनी आपल्या शक्तीच्या (प्रकृती) माध्यमातून घडविली आहे.

विविध प्रतिबिंबकांचा उपयोग करून त्यांनी मानवाला कसे उत्क्रांत केले हे या रूपकावरून लक्षात येईल. समजा परमेश्वर जणू काही अशी वस्तू आहे जिच्यामध्ये प्रकाश सुप्त आहे. ते एका अंधाऱ्या खोलीत बसलेले आहेत व खोलीच्या बाहेरसुद्धा सगळीकडे अंधार आहे. अशा परिस्थितीत ते प्रकाशात येऊ शकत नाहीत, म्हणून ते स्वत:मधील प्रकाश पाजळतात. हा प्रकाश म्हणजे त्यांची शक्ती (प्रकृती) जी त्यांच्यापासून वेगळी आहे. परंतु आरसा नसल्याने त्यांचा प्रकाश प्रतिबिंबित होऊ शकत नाही. म्हणून त्यांची शक्ती काचेच्या खिडक्यांप्रमाणे प्रतिबिंबक तयार करते व त्यांच्यासमोर एकामागे एक याप्रमाणे स्थापित करते. ते व त्यांचे प्रतिबिंबक (रिफ्लेक्टर) यांच्यामधील अंतर अगदी मूळ वस्तुसारखेच तिचे प्रतिबिंब दिसेपर्यंत कमी करते. यातील वस्तु म्हणजे परमेश्वर व प्रतिबिंबक म्हणजे माणसे आहेत.

जर परमेश्वर दृश्यमान लीला नाटकांमुळे आनंदित झाले नाहीत किंवा नाटक सुरू ठेवणे त्यांना अमान्य असेल, तर ते कोणत्याही वेळी प्रकाश विझवतील व सर्व नाटक मध्येच बंद पाडतील. हे घडते तेव्हा परमेश्वर पुन्हा

निबिड अंधाराने झाकले जातात व सृष्टीतील काहीसुद्धा शिल्लक रहात नाही. परब्रह्म स्वत: निर्गुण निराकार अशा स्वरूपात अस्तित्वात असतात. याच्यावरून काही प्राचीन तत्त्वज्ञ, सृष्टीचा पोकळीतून, अस्तित्वाच्या अभावातून उद्‌भव झाला असे जे म्हणाले, त्याचे कारण आपल्याला समजेल की सृष्टीच्या संदर्भात परब्रह्म असे भासू लागेल की ते काहीच नाही.

निरभ्र आकाशात आपण सूर्याच्या किरणांकडे पाहिले, तर ते पसरले गेल्यामुळे दिसून येत नाहीत व त्यांना शोधणे अशक्य होते. अशावेळी जर एखादे जेट विमान आपल्या नजरेच्या टप्प्यात आडवे गेले (दृष्टीक्षेपास क्रॉस करून गेले) तर आपल्याला जेट विमानाच्या शेपटीला लागून प्रतिबिंबामधून असलेली धुराची रेषा दिसेल व त्याच्याच बाजूला चमकणारी प्रकाश शलाका दिसेल. याच्यावरून असे दिसते, की आकाशात धूर असतो तेव्हा सूर्य प्रकाश पडून दृग्गोचर झालेल्या धुरामुळे सूर्यकिरणांचे अस्तित्व लक्षात येते. त्याच्याप्रमाणे सृष्टीचा उपयोग करून परमेश्वर स्वत:स परावर्तित करतात किंवा स्वत:चा आविष्कार करतात. सृष्टी जी परमेश्वराचे प्रतिबिंब आहे तिच्या शिवाय परमेश्वराला अर्थ नाही किंवा ओळख नाही. परमेश्वराला प्रतिबिंबित करण्यासाठी, परमेश्वरी शक्तीने मानवी मन हेच एक उपकरण  तयार केले आहे, की जे त्यांना प्रतिबिंबित करू शकेल. मानव या त्यांच्या निर्मितीमधून, मानवाच्या जाणीवेतून, त्यांची (परमेश्वराची) जाणीव प्रतिबिंबित होते व अभिव्यक्त होते व तशाप्रकारे परमेश्वरांना स्वत:चीही जाणीव होते.

सृष्टीचा आविष्कार करणारे परमेश्वर नव्हेत तर त्यांची शक्ती आहे हे विसरता येणार नाही. परमेश्वरी शक्ती, परमेश्वरांना सर्वव्यापी अस्तित्व, सर्व निर्माण करणारी शक्ती व सर्वशक्तिमान आधार या स्वरूपात अभिव्यक्त करते व आपल्या स्वामीशी, परमेश्वराशी माणसाचा परिचय करून देण्यास जबाबदार असते. निखळ परिपूर्णत्व व सर्व भूतमात्रांचा स्रोत असे

परमेश्वराचे स्वरूप आहे. कोणतेही शब्द वा रूपके त्यांचे पूर्णत्व स्पष्टपणे वर्णन करू शकत नाहीत. अपूर्णाची पूर्णाशी तुलना होऊ शकत नाही. वृक्षाचे फूल, त्याची फांदी अथवा साल यांच्याबद्दल सांगून वृक्षाच्या भारदस्तपणाचे वर्णन करता येत नाही. दृश्यमान आविष्काराचे वर्णन करून मूळ जे आविष्कृत झाले आहे त्याचे संपूर्ण स्पष्टीकरण करता येत नाही. अभिव्यक्त करण्याची मर्यादित मानवी क्षमता त्यांच्या फक्त काही अंगांचेच वर्णन करू शकते.

## सृजानाची दुसरी अवस्था

दुसऱ्या टप्प्यात, आदिवलयातील सर्वशक्ती आदिबिंदूमध्ये (Primordial Point) केंद्रित होऊन आदिवलयाची स्थिती आदिबिंदूमध्ये परिवर्तित होते. (आकृती १). या टप्प्यात आदि परमेश्वरी शक्ती अहंकाराच्या स्वरूपात, त्यांचे अस्तित्व धारण करतात. हे आकृतीमध्ये दुसरा बिंदू म्हणून दर्शविले आहे. आता त्या दुसरे वलय, जे आदिशक्तीच्या परमेश्वरी शक्तीचे रूप आहे, निर्माण करतात. आदिवलय सर्वात पहिले वर्तुळ, आदिबिंदु सर्वात पहिला बिंदू आणि बिंदू म्हणजे आदिशक्ती आणि वलय म्हणजे आदिशक्तीची परमेश्वरी शक्ती. आदिवलय, म्हणजे महाशक्ती, आता बिंदू आणि वलय यांच्यात विभाजित होतात.

परमपिता (सदाशिव) आणि परम माता (आदिशक्ति) अशा परमेश्वरी युगलांच्या जाणिवा अस्तित्वात येतात. त्या सदाशिवांच्या पत्नी, प्रियतमा व अर्धांगिनी परमेश्वरी प्रेमाची शक्ती असल्याने, बिंदू व त्याच्या सभोवताली शक्तीचे वलय, असे त्यांचे रूप आहे. परमेश्वरी दांपत्त्य परिपूर्ण एकात्मतेत असते. त्यांच्या शक्तीचे (आदिशक्ती, आदिमाता, होली घोस्ट) स्वामी असल्याने व त्यांच्याशी एकात्म असल्याने, सदाशिव त्यांच्या शक्तीचा कोणत्याही प्रकारचा उपमर्द सहन करू शकत नाहीत. त्यांच्या प्रिय पत्नीबरोबरची त्यांची एकात्मता संपूर्ण असून परस्परांच्या प्रेमाने निबद्ध

आहे. ते उभयता संपूर्ण तादात्म्यतेत व एकाच सूक्ष्म सहमतीमध्ये असतात. दोघांनाही एकमेकांबद्दल सारखेच प्रेम असून त्यांच्यात समान पातळीवरील परिपूर्ण सुसंवाद व सद्भाव आहेत. प्रेम केवळ एकाच दिशेने प्रवाहित नसून धन व ऋण टोके जोडल्यावर वाहणाऱ्या विजेच्या प्रवाहाप्रमाणे त्यात सातत्य आहे.

प्रेक्षक व अकार्यान्वित शक्ती म्हणून आपल्या अधिकाराचा उपयोग करून सदाशिव आदिशक्तींना सृष्टीच्या सृजनाचे लीला नाट्य करण्यास मनवतात. त्या परिवर्तन करणाऱ्या अथवा कार्यान्वित शक्ती (कायनेटिक एनर्जी) आहेत. अत्यंत महान असणाऱ्यातले अतिमहान व महत्तम दयाळू असले तरी ते एक मत्सरी देव आहेत, जे राक्षस पुन्हा जन्म घेतात अथवा सैतानी प्रवृत्तीची माणसे जे राक्षसी ताकदींचे प्रदर्शन करून आदिशक्तीच्या सृष्टीच्या निर्मितीचे नुकसान करण्याचा प्रयत्न करतात, त्या सर्वांना सदाशिव, आदिशक्तीच्या मुलांकरवी (स्त्री अथवा पुरुष अवतारांकरवी) नष्ट करतात. सृष्टीमध्ये दुष्ट वृत्ती कशा तयार होतात याचा परामर्श पुढे घेतला जाईल. सदाशिवांचे त्यांच्या शक्तीबरोबर परम परिपूर्ण तादात्म्य असते. त्यामुळे सहाजिकच कोणी त्यांच्या प्रिय पत्नीच्या खेळाला विरोध करण्याचा अथवा तो बिघडविण्याचा प्रयत्न केल्यास ते सदाशिवांच्या क्रोधाचे लक्ष्य होतात. जसे सूज्ञ पिता, आपल्या मुलांनी आईच्या आज्ञेचे पालन केले नाही, तर त्यांना शिक्षा करतो. त्यांच्या क्रोधाचा इतका प्रचंड विस्फोट होण्याची शक्यता असते की त्यांच्या शिवतांडवामुळे सर्वांचा विनाश होऊ शकतो.

## सृजनाची तिसरी अवस्था

परम पिता परमेश्वराचे संपूर्ण अधिकार आता परम माता परमेश्वरीमध्ये उतरतात. मग त्यांच्या स्वामींप्रति संपूर्ण पूज्यभाव व्यक्त करतात. त्यामुळे सृष्टीरचनेच्या तिसऱ्या टप्प्यात, केंद्रबिंदूच्या सभोवताली लंबगोलाकार प्रदक्षिणा (पिंड प्रदक्षिणा) घालतात. या हालचालींमधून परम मातेचा परम पित्याबद्दलचा आज्ञाधारकपणा व पूज्यभाव दिसून येतो व

स्वत:ची वेगळी जाणीव अत्यंत प्रेमाने समर्पित केल्याचे त्या व्यक्त करतात. जणू काही आदिमाता स्वत:च, आपल्या स्वामीच्या व गुरुच्या गळ्यातील माळ (अथवा हार) होतात. दोन्ही परमेश्वरी जाणिवांमधले नातेसंबंध असे असतात, की प्रेमळ आदिपिता आपल्या सर्वशक्त्या आपल्या अतिप्रिय पत्नीला, आदिमातेला प्रदान करतात व त्यांच्या बाजूने आदिमाता आपल्या स्वामीला स्वत:ची संपूर्ण शरणागती व्यक्त करतात. त्यांच्या परस्परांबद्दलच्या भक्तीभावातून परमेश्वरी आनंद उद्‌भवतो व तो पिंड प्रदक्षिणेतून व्यक्त होतो. पिंड प्रदक्षिणेतून आईच्या परमेश्वरी प्रेमाची शक्ती प्रकट होते व आईचे आपल्या निर्मिती विषयीचे प्रेम दर्शविले जाते. विशेष म्हणजे ज्योत व मानवी तेजोवलय लंब गोलाकार असतात त्याचप्रमाणे अंड्याचा आकारही लंबगोल असाच असतो.

अंड्याप्रमाणे असलेल्या सृष्टीच्या लंबगोलाकार रचनेस ‘पिंड’ म्हणतात. साध्या अंड्यात दोन घटक असतात; एक बलक, जो त्याचा केंद्र असतो व दूसरा पांढरा भाग त्याची ऊर्जा असते. प्रोटोप्लाझम (प्लाविक) सर्वबाजूस कॅल्शियम डिपॉझिट करून अंड्याचे कवच तयार करते. अगदी तशाच पद्धतीने लंबगोल आकाराच्या लहरींतून आदिशक्ती सृष्टीचे कवच तयार करतात.

आदिमातेनी केलेली लंबगोलाकार हालचाल, आदिप्रेरणांची (Primordial Forces) पहिली हालचाल असून आदिशक्तीचे प्रतिक आहे. हीच आदिमायेच्या प्रेमाच्या जीवित शक्तीची पहिली अभिव्यक्ती आहे आणि त्यामुळे लंबगोल आकारातील आदिम हालचालीस आदिगती असे म्हणतात. त्यामुळे निर्माण झालेले सर्व मूलत: लंबगोल आकारातच फिरते. काही वेळेस लंब गोल वेगळे आकार घेतो. त्याचा नंतर परामर्श घेतला जाईल. एका बिंदूस दुसऱ्या बिंदूच्या भोवताली फिरून पुन्हा पहिल्या जागी कमीत कमी अंतरात येण्यास लंबगोलाकार मार्गातच फिरावे लागते. आपल्या (मानवी) अंतरंगातून अमूर्तपणे प्रकट होण्यास परमेश्वरी शक्ती

याच मार्गात हालचाल करते. आपण जेव्हा कोणावर प्रेम करतो तेव्हा प्रेमाच्या लहरी त्या व्यक्तीच्या भोवताली लंबगोल आकारात फिरून आपल्याकडे परत येतात आणि बरोबर प्रेमाचा आनंद आणतात. आपण दुसऱ्याचा द्वेष करतो तेव्हासुद्धा तशाच प्रकारे द्वेषाच्या लहरी त्या माणसाच्या भोवताली फिरून द्वेषाचा त्रास होऊन परत येतात.

आकृती १ मध्ये दिसल्याप्रमाणे आदिपिंडाची अवस्था, केंद्र (न्युक्लिअस) व त्याच्या सभोवताली लंबगोल अशी असते. जीवशास्त्रात पिंड ही अशी स्थिती आहे, की ज्यामध्ये पुरुषाच्या शुक्राणूंनी स्त्री बीजामध्ये प्रवेश करून जीवाची उत्पत्ती झालेली असते व अशा अंकुरीत स्त्री बीजात जीवाला धारण करण्याची क्षमता आलेली असते. आपल्या परमेश्वरी पिता व परमेश्वरी माता यांच्या पुरुष व स्त्री जाणीवांमधून आदिपिंड तयार होतो आणि ही अंकुरित अवस्था (लिंग) सृष्टीच्या निर्माणाची आदिम पेशीचे रूप असते. हिंदू लोक जे आदिमाता व आदिपिता यांचे द्योतक आहेत अशा शिवलिंगाची पूजा करतात त्याचे महत्त्व आता आपल्या लक्षात येईल.

या आदिलिंगात पुरुष बीज आदिपित्याचे (सदाशिव) अंश असून ते स्त्री बीजाने वेढलेले असते. यातील स्त्री बीज आदिमातेची आदिशक्तीची अभिव्यक्ती असते. आदिपिंड सर्वसाधारण अंड्यासारखे असून त्याच्या आतील वजन सगळ्या बाजूस सारखे पसरलेले नसते. आदिपिंडातील बलक (आदिपिता) वजनाने जास्त असतो व पांढऱ्या भागाच्या (आदिमाता) तुलनेत त्याचा विशिष्ट आकार असतो. आदिगतीमुळे आदिपिंडाच्या अंकुरित अवस्थेला वेगळी गोलाई व निश्‍चित बंदिस्तपणा प्राप्त होतो.

आता विचारणा होईल, की हे सर्व घडून येण्यास, संयोग केव्हा झाला? हा अतिशय पवित्र विषय आहे. मुलांनी त्यांच्या मानवी माता-पित्यांच्या लैंगिक मिलनाची चर्चा करायची नसते. त्याचप्रमाणे परमेश्वरी युगलाने सृष्टीची गर्भधारणा कशी केली याच्यावर तर्क-वितर्क करायचा

नसतो. हे गुपित उघड करण्यासाठी नाही. परमेश्वरी जोडप्याचा विशुद्ध सन्मान टिकविण्यासाठी देवाच्या गाभाऱ्याप्रमाणे ही गोष्ट पवित्र राहिलीच पाहिजे. मुलांनी त्यांच्या माता-पित्यांचा एकांत कधीच भंग करू नये. लज्जेचे सत्व आनंदाचे अमृत निर्माण करते व आदिमाता-पित्याच्या प्रेमाची एकांतवासातील पवित्र अभिव्यक्ती अद्‌भुत सौंदर्य आणते. त्याप्रकारे पति-पत्नीच्या संबंधातील माधुरी कोणाबरोबरही विभागली जात नाही आणि त्यामुळे त्या संबंधांना एक विशेषत्व प्राप्त होते. पति-पत्नींना परस्परांबद्दल असणारी उपजत आसक्ती सहजरीत्या त्यांच्या लैंगिक प्रेमाच्या अभिव्यक्तीवर पडदा टाकते.

प्रेमाच्या उघड व निर्लज्जपणे केलेल्या वर्तनाला मान्यता मिळत नाही. याबद्दलची सूज्ञता काळाबरोबर माणसाने प्राप्त केली व उपभोगली, परंतु प्राण्यांनी नाही. मानव जनावरांपेक्षा उच्चतर आहे. माणसातील जाणीव व संकोच इतर प्राण्यांमध्ये उत्क्रांतीच्या प्रक्रियेत विकसित झाले नाहीत.

विशुद्ध व पवित्र वर्तनाच्या गंभीर महत्त्वाबद्दल अज्ञानी लोकांना काही लोकांनी चुकीच्या मार्गावर नेण्याचे हेतुपुर:स्सर व कुटिल प्रयत्न केले आहेत. परस्परांवर विश्वास असलेले आदर्श पती-पत्नी नेहमीच प्रेमाच्या परिपूर्ण अभिव्यक्तीचा आनंद घेतात. रोमिओ-ज्यूलियट व इतर यांच्यातील प्रेमाच्या परिपूर्ण अभिव्यक्तीसंबंधी जेव्हा आपण वाचतो तेव्हा त्याच्या लैंगिक बाजूकडे आपण लक्ष देत नाही कारण तसे केल्यास त्यांच्यातील झाकलेले सौंदर्य मलिन होते. माणूस जसा जसा धर्मापासून विचलित होतो तशी तशी प्रेम व्यक्त करण्याच्या आनंदाबद्दलची त्याची संवेदनशीलता कमी होत जाते. प्राण्यांच्यामधली जाणीव धारण केल्याने माणसाच्या स्वभावातील सौंदर्य व सभ्यपणा निघून जातो.

लंबगोलाच्या (आदिपिंडाच्या) अवस्थेनंतर आदिशक्ती आदिबिंदू म्हणून, आळसाने व प्रेमाच्या मूडमध्ये सदाशिवांच्या जवळ जातात. त्यांना

सृष्टी निर्माण करण्याची इच्छा नसते. त्यांच्या स्वामींच्या व्यक्तिमत्वात विलीन होण्यासाठी स्वामींची विनवणी करतात. परंतु त्यांचे मन वळवून प्रेमाने स्वामी त्यांना स्वत:पासून दूर करण्यास एक हलकासा धक्का देतात व आपली इच्छा व्यक्त करतात, की आदिशक्तींनी आंतरगामी पहिली सरळ रेषेतील हालचाल (लास्य) करावी. याच्यामुळे आदिपिंड (आदिवलय) उघडले जाते. (आकृती १ मध्ये दाखविले आहे.) सदाशिव, त्यांना हलकासा धक्का देऊन स्वत:सही वलयाच्या बाहेर ढकलतात. त्यांना असे ढकलले जाते की अल्पविराम (आदिविलंब) झाल्यावर वलय उघडले जाते. अशा प्रकारे अंतिमत: संपूर्ण ओम्ची रचना होते.

आदिमाता आणि आदिपिता यांच्यात परस्परांबद्दल परिपूर्ण प्रेमाची उच्च भावना असते. माणसांच्या भाषेत त्याला आदर्श अथवा परमपूर्ण प्रेम म्हणतात. ते आदर्श पति-पत्नीचे प्रतीक आहेत. परमेश्वर प्रेमाचे अंतिम उगमस्थान असल्याने आदिपिता व आदिमाता यांच्यातूनच मानवी प्रेम उगम पावते. परमेश्वर महानतम मानव आहेत. आई, वडिल, बहिण, भाऊ असे मानवी नातेसंबंध आदिशक्तींमधून व्यक्त केले जातात. लास्याच्या संपूर्ण प्रसंगाचे वर्णन काव्यमय नाटकातील प्रेमाचा अंक, असे करता येईल.

आदिपिता मोठ्या प्रेमाने आदिमातेला जवळ घेतात. त्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहित करणारा शक्तिदायक धक्का देतात. त्याच्यामुळे त्यांचे अंग स्वत:च्या अभिव्यक्तीने भरले जाते. त्यांच्या अहंभावाने त्यांची लज्जा व अव्यक्त प्रेम (लास्य) भंग पावतात व त्या आपले देदिप्यमान व्यक्तिमत्त्व धारण करतात. अशाप्रकारे आपले स्वामी व प्रेम यांच्यापासून वेगळे होऊन एकट्यानेच सृष्टीची निर्मिती करण्यास त्यांना प्रवृत्त केले जाते.

## प्रणवाचा नाद

प्रणवाच्या नादास 'अनाहत' म्हणतात. हा निर्माण होतो त्यावेळेस जेव्हा आदिपेशी उबवलेल्या अंड्याप्रमाणे उघडली जाते. लंबगोलातून

केंद्रबिंदू (न्युक्लिअस) बाहेर पडत असतांना हा निर्माण होतो :-

* आदिशक्तीच्या पहिल्या प्रथम सरळ रेषेत जाण्याने पहिला आदिनाद ‘अ’ होतो.
* श्री सदाशिवांच्या धक्क्याने दूसरा आदिनाद ‘ऊ’ होतो.
* आदिअंड्यात श्वासोच्छ्वासास सुरुवात झाल्यानंतरच्या विलंबामुळे तिसरा आदिनाद ‘म्’ होतो.

म्हणून प्रणव आदिशक्तीची सर्वव्यापी शक्ती आहे व त्या शक्तीकडूनच अनाहत नाद निर्माण केला जातो. प्रणवाचे नादात्मक प्रकटीकरण असे अनाहताचे वर्णन केल्यास ते अधिक चांगले समजेल.

‘अ’, ‘ऊ’, आणि ‘म्’ ही तीन अक्षरे आदिशक्तीच्या तीन शक्ती दर्शवितात :

* ‘अ’ महाकालीची अस्तित्व व विनाश करणारी शक्ती दर्शविते.
* ‘ऊ’ महासरस्वतीची सृजनशील शक्ती दर्शविते.
* ‘म’ महालक्ष्मीची धर्मधारणा अथवा विकासाची उत्क्रांतीची शक्ती दर्शविते.

ही तीन आदिअक्षरे, पुढे आदिशब्द (बीजमंत्र) ‘ऐं’, ‘ऱ्हीं’ ‘क्लीं’ तयार करतात. देवनागरी लिपितील नादात्मक शब्द (स्वर व्यंजने) या तिन्हीमध्ये समाविष्ट असतात. चक्रांवरील प्रकरणात याचा सविस्तर परामर्श घेतला जाईल.

आदिअंडे उबवण्याच्या पुष्कळ आधी आदिपिंड गर्भाच्या अवस्थेत जाते. त्याचा श्वासोच्छ्वास सुरू होऊन तो अनाहत नाद निर्माण करतो. तो नाद केंद्रबिंदुला वेढणाऱ्या गर्भात भरला जातो. आदिशक्तीचा श्वासोच्छ्वास प्रणव किंवा परमेश्वरी शक्ती असेल, तर त्याच्या नादास

अनाहत नाद म्हणतात. कोणत्याही घर्षणाशिवाय अथवा आपटण्याशिवाय हा नाद असतो व हृदयात स्पंद अथवा स्फुरण या रूपात ऐकू येतो. हा नाद सात घटक नादांचा संमिश्रण नाद (नादब्रह्म) असून एकत्र ॐ असा सुंदर नाद तयार होतो. घटकात विभाजित केल्यावर 'अ, ऊ, म' असे नाद ऐकू येतात.

प्रणव **ॐ** अक्षराने लिहितात. पुढे कुंडलिनीच्या (प्रणवाच्या शेष शक्तीच्या) मार्गातील सात सूक्ष्म केंद्रातून त्याचे उत्थान होते व शब्द बनतो.

आदिपिंड मानवी पिंडासारखाच मोठा होतो. जसा आदिपिंड आदिपुरुषामध्ये विकसित होतो. तद्वत् मानवी पिंड संपूर्ण माणसात विकसित होतो. त्यामुळे परमेश्वराने माणसाला स्वत:ची प्रतिमा या स्वरूपात निर्माण केले असे जे म्हणतात, ते परम सत्य आहे. आदिपिंड, उत्क्रांतीमधून त्याच्या परिपक्व अवस्थेत विकसित होतो व महान आदिपुरुष विराट हे त्याचे महत्तम व पूर्ण स्वरूप धारण करतो.

महान आदिपुरुष त्याच्या जाणीवेच्या क्षेत्राप्रमाणे तीन अंगे धारण करतो. एका माणसाच्या जाणिवेची तीन क्षेत्रे असू शकतात. घरात, कार्यालयात व समाजात जिथे माणूस तोच असला तरी तो मुलगा असतो, तोच पति असतो व तोच पिताही असतो. परमेश्वरांचे अगदी तसेच असते. त्यांचे क्षेत्र त्यांच्या शक्तीने आदिशक्तीने रचलेले लीला नाटक असते.

परब्रह्मास सर्वश्रेष्ठ सर्वारूढ देव अथवा परमात्मा या स्वरूपात परमेश्वर म्हणतात व सर्वशक्तिमान देवाच्या परब्रह्माच्या शक्तीस परमेश्वरी असे म्हणतात. परमेश्वराचे वास्तव्य, आदिपुरुषाच्या विराटाच्या मस्तकावर असते. ते परम परिपूर्ण उद्भव स्थान असून त्यांच्यामधून त्यांची तीन अंगे प्रकट होतात. ते जीवन वृक्षाच्या मुळांप्रमाणे असून त्यांची तीन अंगे त्या वृक्षाच्या शाखा आहेत. ते सर्वसाक्षी आदिपुरुष (परमेश्वर) महान आदिपुरुषाच्या विराटाच्या हृदयात ईश्वर (आत्म्यातील देव) म्हणून

प्रतिबिंबित आहेत. त्यांच्या शक्तीस ईश्वरी म्हणतात. ती महान सर्वसाक्षीची वेगळी झालेली शक्ती अूसन तिचे सर्व सजीव व निर्जीव भूतमात्रात वास्तव्य असते. मानवाच्या हृदयात ती आत्मा म्हणून प्रतिबिंबित असते.

पूर्वी पहिल्याप्रमाणे आदिशक्ती सृष्टीचे सृजन करण्यापूर्वी तीन निर्गुण, निराकार रूपात जाते. ही तीन रूपे, वलय, बिंदू व अर्धबिंदू असून उत्पत्तीच्या अवस्थेत म्हणजे वैश्विक सृजनाच्या प्रारंभी ती अस्तित्वात असतात.

## परब्रह्माची परमेश्वर रूपातील तीन अंगे :

आदिशक्ती परमेश्वराची तीन रूपे महान आदिपुरुषात अभिव्यक्त करतात. ती आहेत 'सदाशिव' (ईश्वर), 'हिरण्यगर्भ' (प्रजापति), आणि 'विराट'.

## सदाशिव

परमेश्वराच्या अपरिवर्तनीय जाणीवेला सदाशिव असे म्हणतात. त्यांची शक्ती महाकाली म्हणून अवतार घेते. अस्तित्व महाकालीच्या शक्तीवर अवलंबून असून ही महाकाली शक्ती देवाच्या सृष्टी निर्माण करण्याच्या इच्छेची अभिव्यक्ती आहे. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्या राक्षसांचा आणि दुष्टांचा त्या संहार करतात. परमेश्वराचे अस्तित्व, ईश्वर म्हणून, विराटाच्या हृदयात जाणवते, पण अस्तित्वाची त्यांची इच्छा सदाशिवांमधून व्यक्त होते. म्हणून सदाशिवांना अस्तित्वाचे दैवत असे म्हणतात. अस्तित्वाच्या विरुद्ध विनाश असल्याने सदाशिवांनी विनाशक हे नाव घेतले आहे.

भगवान शिव, त्यांच्या शिवानी अथवा पार्वती या शक्तीसह माणसाच्या हृदय चक्राच्या डाव्या बाजूस राहतात. जे काही मृत आहे आणि जे काही माणसाच्या मनाला विभारित करते, ते सर्व त्या साठवतात. ज्याप्रकारे कारखान्यातील ज्वलनाच्या प्रक्रियेतून वाफा तयार होतात, तसे

अस्तित्वाच्या प्रक्रियेत विराटाच्या कार्यातून आदि सामूहिक सुप्त चेतित मन (महत् मनस) निर्माण होते. विराटाच्या अस्तित्वाच्या कार्यातून निर्माण झालेल्या वाफा या आदि सामूहिक सुप्त चेतित मनात साठतात. यालाच सामूहिक प्रतिअहंकार असेही म्हणतात. या सामूहिक प्रतिअहंकारात मृत आत्म्यांचे अनेक स्तर सदाशिव तयार करतात. सगळ्यात खालच्या स्तरात सैतानी व अत्यंत क्रूर आत्म्यांना ठेवले जाते. ते पुष्कळ वेळा जिवंत माणसांच्या चेतित मनात घुसतात. आदिसुप्त चेतित मनातल्या आत्म्यांच्या आक्रमणापासून तसेच शरीरातून बाहेर फेकले गेलेल्या क्रूर आत्म्यांच्या आक्रमणापासून माणसांचे रक्षण करण्याचे काम सदाशिवांचे आहे. माणसामध्ये या शक्तीला जी नाडी धारण करते तिला इडा नाडी (सायकी) असे नाव आहे. वर्तमानातील प्रत्येक अनुभवाला ती भूतकाळाच्या अनुभवात बदलते. ते अनुभव व्यक्तीच्या सुप्त चेतित मनात एकत्र होतात. ही नाडी, स्थूल स्वरूपात माणसाच्या डाव्या सिंपथेटिक नर्व्हस सिस्टीमचा आविष्कार करते.

श्री शिव हे अस्तित्वाचे प्रतिनिधी असून त्यांची शक्ती जडामध्ये विद्युत्-चुंबकीय लहरी व जीवितांमध्ये प्राण या स्वरूपात दिसून येते. या दोन्ही शक्ती मूळ प्रणवाची अथवा परमेश्वरी शक्तीचीच रूपे आहेत. बासरीत सोडलेल्या हवेच्या एकाच प्रवाहातून संगीताचे सात स्वर उमटतात, त्याप्रमाणे प्रणव एक समग्र शक्ती आहे. जसे एका बासरीतून दोन वेगळे स्वर उमटतात अगदी तसेच एका मूळ प्रणवातून विद्युत चुंबकीय लहरी व प्राण या दोन घटक शक्ती काढल्या जातात.

परमेश्वराला त्यांच्या शक्तीच्या लीला नाटकाचा आनंद घेता आला नाही, तर कोणत्याही वेळी ते महान आदि-पुरुषाच्या हृदयातून बाहेर पडतात व सृष्टीच्या सृजनाचे नाटक संपुष्टात येते. त्यासाठी ते विराटाच्या हृदयातील त्यांचे प्रतिबिंब काढून घेतात. याला समांतर म्हणजे माणसाच्या हृदयाचे काम थांबल्यावर शरीरातील सर्व कामे थांबतात व परिणामी व्यक्तीचा

शारीरिक मृत्यू होतो.

श्रीसदाशिव हे परेश्वराचे तमोगुण (इच्छा वृत्ती) दाखवतात, कारण त्यांना अस्तित्वात येण्याची इच्छा होती आणि आपल्या व्यक्तिमत्वाचा शरीरात आविष्कार केला. महाकाली त्यांची इच्छाशक्ती असून त्या आदिपुरुषाच्या हृदय चक्राच्या डाव्या बाजूतून कार्य करतात. त्या सृष्टीची भावनिक बाजू सांभाळतात. परमेश्वरी इच्छा आदिपुरुषाच्या हृदयाला वेढून कार्यान्वित असते परंतु हृदयात राहणारा आत्म्याचा देव ईश्वर, सृष्टीच्या भावनिक बाजूच्या नाटकामुळे बांधील होत नाही. सृष्टीच्या निर्मितीची भावनिक बाजू इच्छा व्यक्त करते, ती केवळ भावना असते, पण सृष्टीचे सृजन नाही. सृष्टीचे प्रत्यक्ष सृजन परमेश्वराच्या सृजनात्मक अंगातून महासरस्वती शक्तीतून होत असते. मानवाच्या हृदयाचे स्फुरण, याच अस्तित्वाच्या शक्तीची अभिव्यक्ती असते. ती जिवंतपणा (प्राण) म्हणून लक्षात येते व भावनिक देहाचे (भावनिक जाणिवेचे) नियंत्रण करते. अस्तित्वाच्या शक्तीशी हृदयात राहणाऱ्या ईश्वराची कोणत्याही प्रकारे संलग्नता नसते अथवा त्या शक्तीमुळे तो प्रभावित होत नाहीत अथवा आनंदी होत नाहीत. ते पूर्णपणे निरासक्त असून सदाशिवांनी लीला नाट्य थांबवताच परमेश्वरात विलीन होतात.

**हिरण्यगर्भ (प्रजापती)**

हिरण्यगर्भ सर्वशक्तिमान परमेश्वराचे सर्जनशील अंग आहे. ते आदिपुरुषाच्या उदरात (व्हॉइड) कार्य करतात. आदिपुरुषाचे उदर भवसागर (भ्रमसागर) नावानेही ओळखले जाते. (भवसागराची निर्मिती कशी झाली याचे वर्णन अन्यत्र केले गेले आहे.) हिरण्यगर्भाची शक्ती महासरस्वतीच्या रूपात अवतरित होते आणि संपूर्ण जड भौतिक सृष्टी महासरस्वतीच्या शक्ती व कार्य यांचे फलित आहे. त्यांनी, आपले सूर्य, चंद्र, पृथ्वी यांच्यासह इतर सर्व आकाशगंगा तारे, ग्रह यांची निर्मिती केली. त्या आदिपुरुषाच्या विचार

शक्ती म्हणूनसुद्धा कार्यरत असतात. या कार्यात आदि-अहंकार तयार होतो. ही शक्ती आदिपिंगला नाडीत धारण केली जाते व ती आदि चेतनापूर्व मनाला (आदिचित्ताला) अभिव्यक्त करते. परमेश्वराच्या बुद्धीला संदेश पोहोचविण्याचे पोस्टमनसारखे काम करते. या शक्तीकडून आदिपुरुषाच्या शरीरात पंचमहाभूतांची निर्मिती होते व त्याच्यामधून अंतिमतः पृथ्वीवर मानवी शरीरांची निर्मिती होते.

हिरण्यगर्भ आदिपुरुषाच्या सर्जनशील मूड (रजोगुण) याचे प्रतिनिधी आहेत. माणसामध्ये निर्माण शक्ती म्हणून ही शक्ती अभिव्यक्त होते व ती सूक्ष्म रूपात मज्जारज्जूमधील पिंगला नाडीत असते. स्थूल रूपात उजव्या सिंपथेटिक नर्व्हस सिस्टीमचा आविष्कार करते व ज्याच्या मधून माणूस भविष्याचा विचार करतो त्या अहंकाराची निर्मिती करते. माणसाचे विचार करणे व योजना आखणे या शक्तीची परिणती असते. परमेश्वराचे हिरण्यगर्भ अंग माणसात, निर्माणकर्ता ब्रह्मदेवातून व्यक्त होते. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत ब्रह्मदेवाचे कोणतेही काम नाही, पण उत्क्रांतीसाठी आवश्यक असलेले मानवी शरीर आणि विचार करणारा अहंकार ब्रह्मदेवच देतात.

## विराट

आदिपिंड, आदिपुरुषाच्या शरीराच्या रूपाने परिपक्वता धारण करतो, त्यात माणसाच्या शरीराप्रमाणेच सर्व भाग व घटक पूर्ण व्यक्त होतात, तेव्हा त्यास विराट असे म्हणतात. सर्व प्राणिमात्रांची जड शरीरे, मानवी देह, देव व देवता आणि वैश्विक कुंडलिनी हे त्याचे घटक आहेत.

परमेश्वराच्या विराट अंगाच्या शक्तीला विराटांगना म्हणतात. आदिपुरुषाचा आदि मेंदू (आदि सहस्रार) आणि आदिहृदय (आदि अनाहत चक्र) यांच्या माध्यमातून विराटांगना शक्तीचा आविष्कार होतो. विराटांगना महालक्ष्मी म्हणून अवतरित होतात व सुषुम्ना नाडीच्या मध्यमार्गातून काम करतात.

विराटाच्या नाभी केंद्रात (आदि-नाभी-चक्र) विष्णूंची निर्मिती होते. नाभीला भवसागराने वेढलेले असते. त्यातून मध्यमार्गात कार्यरत असताना, उत्क्रांतीच्या अतिमहत्त्वाच्या काळात, विष्णु अवतार घेतात. महान आदिपुरुष (विराट) विष्णु म्हणून माणसात अवतार घेतात.

विराटांगना शक्ती मज्जारज्जूमध्ये सूक्ष्म मध्यमार्गातून (सुषुम्ना नाडीतून) अभिव्यक्त होते तर स्थूल रूपाने पॅरासिम्पथॅटिक नर्व्हस सिस्टीममधून होते.

हा उत्क्रांतीचा मार्ग असून विराटांच्या दहा अवतारांनी माणसाच्या उत्क्रांतीसाठी सहाय्य केले आहे.

१. मत्स्य ............................मत्स्य अवतार

२. कासव ...........................कूर्म अवतार

३. वराह .............................वराह अवतार

४. नरसिंह ...........................नरसिंह अवतार

५. बटु पुरुष ........................वामन अवतार

६. बलवान पुरुष ....................परशुराम अवतार

७. प्रजाहितदक्ष राजा ................राम अवतार

८. साक्षी-लीलाधर .................विराट कृष्णावतार

९. विराटपुत्र श्रीयेशू ख्रिस्त ..........बुद्ध (महाविष्णु) अवतार

१०. श्वेत अश्वारूढ .................कल्की अवतार
(सामूहिक अस्तित्व शरीर)

### आदिशक्तींच्या शक्ती

परमेश्वराच्या तीन अंगांची त्यांच्या शक्तीने, आदिशक्तीने अभिव्यक्ती केली. त्या महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी म्हणून अवतरित

होतात आणि तीन रूपात (त्रिगुणात्मिका) परिवर्तित होतात. परंतु आदिमातेला अथवा ख्रिश्चन परंपरेत होली घोस्टना स्वतः अवतरित होण्याची शक्ती दिली गेलेली आहे, त्या स्वतः मानवी रूप (अवतार शक्ती) घेऊ शकतात. उत्क्रांतीच्या प्रक्रियेस मार्गदर्शन करण्यास त्या स्वतः त्यांच्या अवतार शक्तीमधून अवतार घेतात अथवा पुरुष किंवा स्त्री अवतार निर्माण करून त्यांच्या माध्यमातून कार्य करतात.


आपण परमेश्वरांची एखाद्या वस्तूशी तुलना केली तर त्यांची शक्ती आदिशक्ती यांचे प्रकाशाचे सापेक्ष अस्तित्व असते. परमेश्वर सृजन करणे थांबवतात तेव्हा आदिशक्ती त्यांच्यात विलीन होतात. सृष्टी एखाद्या आरशाप्रामणे किंवा प्रतिबिंबकाप्रमाणे आहे. परमेश्वरांनी प्रकाश काढून घेतला तर प्रतिबिंब अस्तित्वात राहू शकत नाही. आदिशक्तींची परमेश्वराशी संपर्काची किंवा त्यांची करमणूक करण्याची शक्तीपण निघून जाते.

आदिपुरुषाच्या मस्तकावर परब्रह्म परमेश्वर म्हणून राहतात, तर आदिपुरुषाच्या शरीरात, आदिशक्ती विविध रूपे उत्क्रांत करतात. विराटाच्या हृदयात ईश्वर म्हणून प्रतिबिंबित होऊन साक्षीभावाने त्याच्या शरीराच्या क्षेत्राकडे ते लक्ष ठेवतात. आदिपुरुषाची सर्व सूत्रे सर्वात्मक रूपाच्या परमेश्वराकडे असतात. म्हणून विराट, विष्णू स्वरूपात पृथ्वीवर अवतार घेतात. तेव्हा ते परमात्म्याचे (पुरूष) प्रक्षेपण असते. त्याचप्रमाणे ब्रह्मदेव (प्रजापति) व सदाशिव यांची सूत्रेसुद्धा परमेश्वराच्या हातात असतात.

सर्वशक्तिमान परमेश्वर हे परम परिपूर्ण सौंदर्य, परम परिपूर्ण ज्ञान व परम परिपूर्ण प्रेम यांची मूर्ती असतात. ते क्षेत्रज्ञ असून त्यांच्या शक्तीमधून (आदिमाता) त्यांचे क्षेत्र विकसित होत असते. आदिशक्ती यांच्या शक्तीमुळे परमेश्वराची तीन रूपे प्रतिबिंबित होतात. त्यांची जाणीव लहान-मोठी किंवा प्रसारित-आकुंचित होत नाही. कमी-जास्त होणाऱ्या त्यांच्या क्षेत्राकडे त्यांची दृष्टी असते. त्यांची शक्ती, आदिशक्ती कमी-जास्त होत नाही तर स्पेस

(अवकाश) असेल त्याप्रमाणे त्या प्रसारित होतात.

## आदिशक्तीच्या अन्य शक्त्या


The powers of the Primordial
mother Adishakti are two to begin with.
1) Ishwari power 2) Pranava)
1) Ishwari power is the witnessing power of
with this power she incarnates as human being.
God Almighty. This power exists in the
abstract form in the spirit (Atma) of
human being. This is the expression of Her Being.
2) Pranava :— This power is the all pervading
Power of Adishakti which acts through her
Ishwari power. We can understand it with an
Queen
analogy. There is a ~~King~~ who is all powerful and
Thus she has a power of her own being. The
same queen has a power to ~~bestow her~~
rule others to create her empire and to
improve the ruled ones. She may also bestow
her power of ruling, under her to her chosen
people. In the same way Adishakti has her power
as her light,
to be herself Her being. Then Her power, that is
manifested outside ~~as~~ is known as Pranava
or awareness. By this power she creates her Creati
improves it and makes some of her chosen
subjects ~~as~~ also ~~the~~ aware of that awareness.
This is the reason why she is seperated as a
Being (Ishwari) and as Her power (Pranava).

*प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित*

सर्वप्रथम आदिशक्तीच्या दोन शक्त्या आहेत : परमेश्वरी शक्ती व प्रणव

शक्ती. निर्गुण निराकार अवस्थेत परमेश्वराबरोबर राहणारी परमेश्वरी शक्ती परब्रह्माची साक्षीभावाची शक्ती आहे. ही तिच्या देहाची शक्ती असून हिच्यामुळे परमेश्वरी शक्ती मानव रूपात अवतार घेते. या शक्तीस, आत्मसाक्षात्कार किंवा आत्मधारणा असे म्हणता येईल.

प्रणव शक्ती आदिशक्तीची सर्वव्यापी शक्ती अथवा प्रकाश शक्ती आहे, जी त्यांच्या परमेश्वरी शक्तीतून प्रसारित होते. एका रूपकातून हे चांगले लक्षात येईल. सर्व सत्ताधीश राण्यांमध्ये आपल्या अस्तित्वाची शक्ती आहे. अशा राणीमध्ये दुसऱ्यांवर राज्य करण्याची, साम्राज्य निर्माण करण्याची व प्रजाजनांच्या जीवनात सुधारणा करण्याची शक्ती आहे. राज्य करण्याची तिची सत्ता ती निवडक लोकांना प्रदान करेल. त्याचप्रमाणे आदिशक्तींना स्वत:ची अंगभूत शक्ती आहे, स्वत: असण्याची शक्ती किंवा ती शक्ती (त्यांचा प्रकाश) बाहेर प्रक्षेपित होते तेव्हा तिला प्रणव किंवा जाणीव म्हणतात. या शक्तीमुळे त्या स्वत: निर्माण केलेल्याला आकार देतात आणि त्यात सुधारणाही करतात. त्या माणूस निर्माण करतात जो त्यांच्या कृपेने आत्मसाक्षात्कारास प्राप्त होतो. अशाप्रकारे त्या काही निवडक प्रजाजनांना स्वत:च्या जाणिवेची प्रकाशाची जाणीव देतात.

जेव्हा प्रणव सुप्त अवस्थेत असतो, तेव्हा त्यास कुंडलिनी अशी संज्ञा आहे. पण आत्म्याशी (ईश्वरी) मिलन झाल्यावर तो प्रकाशित होतो. प्रणव आदिशक्तीच्या संपूर्ण नियंत्रणात कार्य करतो. त्यांचे तीन मूड्स असून ते प्रणवाला तीन स्वरूपात परिवर्तित करतात. त्यांच्या शक्ती आहेत :

**महाकाली (शिवानी) शक्ती**

त्यांच्या पहिल्या शक्तीने, महाकाली (शिवानी) शक्ती त्या जड भौतिकाच्या प्रत्येक कणात असतात आणि सर्व जीवित शरीरांच्या प्रत्येक कणात विद्युत चुंबकीय लहरींच्या रूपात असतात. ही शक्ती प्रणवाचे एक स्वरूप आहे, प्रणव ही आदिशक्तींची एक शक्ती आहे व ती एकात्म करणारी

शक्ती आहे. जडामध्ये ही शक्ती प्रत्येक अणूच्या केंद्रामध्ये (न्युक्लिअस) असते व ती विद्युत चुंबकीय शक्ती निर्माण करणाऱ्या लहरी प्रसारित करते. निम्नस्तरीय वनस्पतींसारख्या स्वरूपांत ती जीवनशक्तीच्या (Life Force) रूपात असते. उच्च दर्जाच्या प्राण्यांत आणि मानवांत ती हृदयातील जिवंतपणाचे स्पंदन असते. भौतिक सृष्टीच्या प्रत्येक कणात ही शक्ती दिव्याच्या वातीप्रमाणे जळते. हा आदिशक्तींच्या इच्छेचा (तमोगुण) परिणाम असतो. महाकाली शक्ती, अस्तित्वाची शक्ती असून, अस्तित्वास नाकारणे म्हणजे मृत्यू असल्याने ती संहाराचीसुद्धा अभिव्यक्ती करते. ही शक्ती विराटाच्या डाव्या बाजूकडील वैश्विक नाडीत जिला आदि इडा नाडी म्हणतात, कार्यरत असते. ती सृष्टीमध्ये मृत झालेले सर्व यात साठविते.

## महासरस्वती (हिरण्यगर्भिणी) शक्ती

आदिशक्ती त्यांच्या दुसऱ्या सृजनात्मक भौतिक शक्तीने, महासरस्वती (हिरण्यगर्भिणी) शक्तीने प्रणवाचे भौतिक शक्तीत परिवर्तन करतात. कारणात्मक तत्व (Causal Essences) निर्माण होऊन त्यातून अंतिमत: पंचमहाभूते निर्माण होतात. त्यांचा उपयोग करून जडाची एकत्रित स्वरूपे, आकाशगंगा, सूर्यमाला, ग्रह, चंद्र, सूर्य, पृथ्वी इत्यादींचे सृजन होते. ही शक्ती आदिपुरुषाच्या उदरात असून आदि स्वाधिष्ठानातून कार्य करते. ही शक्ती आदिशक्तींच्या सृजनशीलतेचा, कार्यप्रवणतेचा (रजोगुणाचा) परिणाम आहे.

## महालक्ष्मी शक्ती

Her third power is of Mahalaxmi. This is the power that renders sustenance (Dharma) to Her Creation.
She acts on the Primordial central path ~~of Su~~ (Adi Sushumna
By this power she ~~creates~~ generates the evolutionary process. To guide this ~~human~~ process she incarnates on this channel (Adi Sushuma) on different chakra with her fourth power (Ishwari)

प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित

महालक्ष्मी शक्ती ही आदिशक्तीची तिसरी शक्ती असून जे निर्माण झाले आहे त्यामध्ये ती धर्मधारणा करते. ती मध्य नाडीत (आदि सुषुम्ना) म्हणून कार्यरत असते. या शक्तीने ती उत्क्रांतीची प्रक्रिया निर्माण करते व सृष्टीत निर्माण झालेल्या विविध स्वरूपांना धर्मामध्ये बदल करून, विविध गुणधर्म देते. या प्रक्रियेस मार्गदर्शन करण्यास या नाडीवरील विविध चक्रांवर आपल्या चौथ्या परमेश्वरी शक्तीतून अवतार घेते.

**परमेश्वरी (ईश्वरी) शक्ती**

आदिशक्ती जेव्हा मानवी स्वरूपात अवतार घेते तेव्हा त्यांची परमेश्वरी शक्ती ईश्वरी म्हणून प्रतिबिंबित होते. एकट्याच अवतार घेतात तेव्हा त्या जगदंबा (जगाची आई) किंवा आदिशक्ती (सृष्टीची आई) म्हणून येतात. परब्रह्माची तीन अंगे मानवी स्वरूपात अवतरित होतात तेव्हा आदिशक्तीसुद्धा त्यांची शक्ती (सुप्त) म्हणून अवतरित होतात. पृथ्वीवर पित्याच्या सहभागाविना पुत्राची निर्मिती करतात. अर्थात् श्रीगणेशांची निर्मिती करतात. बऱ्याच कालावधीनंतर ते श्री येशू ख्रिस्त म्हणून मानवी स्वरूपात येतात. या सर्वांच्या बरोबर त्या सुप्तावस्थेतील आई म्हणून कार्य करतात.

**प्रणव शक्ती**

आदिशक्तींची पाचवी शक्ती प्रणव (पूर्ण चेतना) आहे, त्यांच्या ईश्वरी शक्तीचे तेजोवलय (ऑरा) किंवा प्रेमाचा श्वासोच्छ्वास आहे. ही प्रेमाची दिव्य शक्ती (प्रणव) आहे. ही सर्वव्यापी, सर्वात्मक, सर्वज्ञ व सर्व संघटित करणारी शक्ती आहे. आत्मसाक्षात्कारानंतर चैतन्य लहरी किंवा होली घोस्ट यांची शीतल हवा या स्वरूपात तिचा अनुभव येतो. ही माणसाच्या हृदयातील आत्म्याची शक्ती असून ती प्रत्येक माणसात, जड पदार्थात व प्राणीमात्रात उपस्थित असते, पण प्रकाशाविना ऑरा असल्यास ती जागृत अवस्थेत नसते. उत्क्रांती जशी सर्वोच्च अवस्थेत पोहोचते तशी मानवास स्वत:ची जाणीव होते. तेव्हा सहजयोगातून (सहज मोक्ष) शेष शक्ती कुंडलिनी जागृत झाल्यावर ती तिन्ही

शक्तींना एकात्म करते आणि तिन्ही शक्ती व आत्मा यांचे मिलन होते. हे घटित झाल्यावर नवीन आत्मसाक्षात्कारी व्यक्तीच्या शरीरातून चैतन्य लहरी वाहू लागतात. आदिशक्ती अवतरित झाल्यावर त्यांच्या शरीरातून मोठ्या शक्तीने चैतन्य लहरी बाहेर प्रवाहित होतात. सर्व साक्षात्कारी जीवांच्या शरीरात त्या प्रतिबिंबित होतात. आत्मसाक्षात्कारामधून ते परमेश्वरी मातेच्या शरीराचा अविभक्त भाग होतात आणि त्यांच्या शरीराचे विस्तार म्हणून कार्य करताना आदिशक्तीच्या ईश्वरी प्रेमाची शक्ती प्रसारित करतात.

या तीनही शक्ती जेव्हा एक होतात तेव्हा आत्म्याला प्रकाशित करून त्या प्रणवाची निर्मिती करतात. हे कसे घडते ते समजण्यास घरगुती गॅसच्या बर्नरची तुलना पुरेशी आहे. बर्नरला वातीची लहानशी ज्योत असते. जी सतत जळत असते. याची ईश्वरी शक्तीशी तुलना होईल. तसेच तीन शक्ती ज्या एकात्म होऊन प्रणवाची सुप्त शक्ती बनवतात त्यांची तुलना गॅसशी होईल. सुप्त गॅस (प्रणव) ज्योतीच्या बरोबर जातो. जळणाऱ्या ज्योतीला (ईश्वरी शक्तीला) मिळतो, तेव्हा ज्योत मोठी झाल्याने प्रकाश प्रचंड मोठा होतो. या रूपकाच्या सहाय्याने आपल्याला स्पष्ट करता येईल, की ईश्वरी शक्ती म्हणजे जळणारी शक्ती (ज्योत) व गॅस म्हणजे एकात्म सुप्त प्रणव (कुंडलिनी शक्ती) ती प्रज्ज्वलित झाल्यावर प्रकाश म्हणजे जाणीव किंवा प्रकाशित प्रणव.

## सृजनाच्या चार अवस्था (सृष्टी निर्मितीचे चार टप्पे)

सृष्टीची निर्मिती अस्तित्वाच्या चार टप्प्यांमधून घटित झाली. आदिशक्तीचे कोणतेही अंग या टप्प्यांमध्ये किंवा अवस्थांमध्ये अवतरित झाले, तरी त्या सर्व एकाच अर्थात् आदिमातेच्या अति विशिष्ट व्यक्तिमत्त्वातून उद्‌भवतात. या अवस्था कालगणनेप्रमाणे खालीलप्रमाणे आहेत :

**उत्पत्तीची अवस्था (Genesis) -**

ही ॐ (प्रणव) स्वतंत्र होऊन आदिकुंडलिनीच्या निर्मितीपूर्वीची निर्गुण निराकार अवस्था आहे. उत्पत्ती अवस्थेत सर्वशक्तिमान देव आणि आदिशक्ती परमेश्वर व परमेश्वरी स्वरूपात असतात.

**वैकुंठ अवस्था -**

आदिपिंडाची विराटाच्या शरीरात पूर्ण वाढ होऊन आदि पुरुषाच्या मज्जारज्जूवर आणि मेंदूत देवतांची उपस्थिती प्रस्थापित झाल्यानंतरची ही अवस्था आहे. वैकुंठ अवस्थेत सर्वशक्तिमान परमेश्वर आणि आदिशक्ती तीन अंगे धारण करतात :

- सदाशिव आणि महाकाली
- विराट आणि विराटांगना (महालक्ष्मी)
- हिरण्यगर्भ (प्रजापती) आणि महासरस्वती

**क्षीरसागर अवस्था -**

या अवस्थेत आदिपुरुष त्यांच्यामधील सर्व घटकांसह अंतिम, परिपूर्ण झालेले असतात. या तिसऱ्या क्षीरसागर अवस्थेत परब्रह्म (सर्वशक्तिमान परमेश्वर) आणि आदिशक्ती वैकुंठ स्थितीतील अंगांच्या अनुसार खालील रूपे धारण करतात :

- सदाशिव (शिवरूप)
- महाकाली (काली रूप)
- विराट (विष्णु रूप)
- विराटांगना (लक्ष्मी रूप)
- हिरण्यगर्भ (ब्रह्मदेव रूप)
- महासरस्वती (सरस्वती रूप)

**संसार (भवसागर) अवस्था -**

ही सृष्टी निर्मितीची चौथी आणि मानवाने पृथ्वीवर जगाची निर्मिती करण्याची आधुनिक काळापर्यंतची अवस्था आहे. आदिशक्तीनी या चारही

युगांत, संसार (भवसागर) अवस्थेत अवतार घेतले आहेत. ती युगे आहेत : सत्ययुग, त्रेतायुग, द्वापर युग आणि कलियुग.

**सत्य युग**

सत्ययुगात आदिशक्तींनी विष्णुच्या बरोबर त्यांची शक्ती म्हणून लक्ष्मीच्या रूपात त्यांच्या शरीरात अवतार धारण केला. संसार युगात महालक्ष्मींचे हे मानव रूप आहे. शिवाय त्यांनी एकट्यांनी एक हजार वेळा विश्वमाता दुर्गा या मानवी युगातील महाकालीच्या स्वरूपात अवतार घेतले. त्यांच्यापैकी एकशे आठ प्रमुख अवतार होते. दुर्गा (काली), लक्ष्मी, सरस्वती हे सर्व परमेश्वरी आविष्कार (अलौकिक) असले तरी पूर्णतया स्वभावाने व दिसण्यात मानवी होते.

**त्रेतायुग**

त्रेतायुगात, श्रीरामांच्या काळात, तीन वेगवेगळ्या मानवी स्वरूपात आदिशक्तींनी अवतार घेतले. त्यामध्ये त्याची तीन अंगे (aspects) त्यांनी प्रकट केली :

१) राजा जनक यांची कन्या सीता (जानकी) (महालक्ष्मी) हे त्यांचे पहिले परिपूर्ण मानवी (लौकिक) स्वरूप होते.

२) सती अनसूया (महासरस्वती) एका महान ऋषी अत्री यांची पत्नी.

३) मंदोदरी (महाकाली) रावणाची पत्नी.

**द्वापर युग**

द्वापार युगात, श्रीकृष्णांच्या काळात, आदिशक्तींनी तीन वेगवेगळ्या मानवी व्यक्तिमत्त्वांच्या स्वरूपात, त्यांची तीन अंगे प्रकट करीत अवतार घेतले.

१) राधा (महालक्ष्मी) श्रीकृष्णांचे पहिले व चिरंतन प्रेम.

२) रुक्मिणी (महासरस्वती) श्रीकृष्णांची राणी या रूपात.

३) विष्णुमाया (महाकाली) श्रीकृष्णांची बहिण. त्या फार थोडे दिवस जिवंत होत्या. पुढे पांडवांची पत्नी द्रौपदी म्हणून त्यांनी जन्म घेतला.

## कलि युग

कलियुग अंतिम निर्णयाचा काळ आहे. या वेळी लोकांना फार काळजी घ्यायला हवी कारण तुम्ही सत्याची कास धरली आहे किंवा नाही त्याचा निर्णय होणार आहे. तुम्ही अजूनही असत्याच्या बरोबर असाल, तर तसा निर्णय होईल. तुम्ही स्वत:च आपला निर्णय घेणार आहात. दुसरे कोणी तुमच्यावर निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. (L.A.2000)

## तीन गुणांचे सृजन

देवनागरी लिपीत पवित्र शब्द ॐ साडे तीन वलयांत लिहितात. जसे आकृती १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे या तीन वलयांची तीन लंब गोलाकार वर्तुळांनी रचना केली जाते.

पहिली लंबगोलाकार हालचाल 'आ' द्वारे आदिशक्ती निर्मितीची इच्छा करतात, दुसऱ्या 'ऊ' हालचाली द्वारे त्या सृजनासाठी कार्यान्वित होतात, तर तिसरी हालचाल 'म' द्वारे त्या सृष्टी निर्मितीच्या अपत्याबद्दलचे प्रेम प्रकट करतात. अशाप्रकारे तीन गुण-तमोगुण (इच्छा), रजोगुण (क्रिया) आणि सत्त्वगुण (प्रकटीकरण) अस्तित्वात येतात. या तीन लंबगोलाकार हालचाली पंख्याप्रमाणे स्वत:भोवती फिरतात व तीनशे साठ अंशात वाकतात. यावेळी विविध तरंग (Wave Length) निर्माण होतात. ज्यामुळे जीवनात वैविध्य निर्माण होते. अशाप्रकारे शेवटी इतक्या वेगवेगळ्या स्वभावाचे लोक तयार होतात. हे तीन गुण सर्वशक्तिमान परमेश्वराच्या तीन शक्तींची अभिव्यक्ती आहेत आणि हे महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी रूपात प्रकट होतात. या तीन शक्ती असल्या तरी आदिशक्ती त्यांना एकात्म करतात व त्यांच्यात समन्वय राखतात.

The Ishwari power which is the fourth power of Adishakti which is the witnessing power of God.

This power is the judging power of the play of Adishakti hence it is Paramount.

In a drama the spectator of the drama has judge the quality of drama and he is the has the supreme ~~person~~ power but the one who creates ~~plays~~ the drama who must have that power of judgement to judge the ~~one~~ quality of the play. Otherwise how can he create the play which will be of the ~~same~~ quality that would be acceptable to the spectator? ~~The~~

So Adishakti ~~the~~ has got three powers to create and her own personality to judge and to decide as to the propriety of Her creation.

*प.पू. श्रीमाताजींचे हस्तलिखित*

आदिशक्तींची चौथी शक्ती 'ईश्वरी शक्ती' असून ती परब्रह्माची साक्षीभावाची शक्ती आहे. आदिशक्तीच्या लीलेचे आकलन करणारी ही शक्ती आहे आणि म्हणून ती सर्वश्रेष्ठ आहे. नाटकाच्या गुणवत्तेसंबंधी प्रेक्षकच निर्णय करतात. परंतु नाटकाच्या निर्मात्यालासुद्धा नाट्याच्या गुणवत्तेची परीक्षा करून निर्णय करू शकणारी शक्ती असायला हवी. अन्यथा प्रेक्षकांना मान्य होईल अशा गुणवत्तेच्या नाटकाची रचना करणे निर्मात्याला शक्य होणार नाही. तद्वत आदिशक्तीने सृष्टीचे वस्त्र विणतांना त्याचे मूल्यमापन करण्याची व नाटकाच्या प्रकारामध्ये बदल करण्याची शक्ती स्वत:ला दिली आहे. तसेच आपल्या ईश्वरी शक्तीच्या माध्यमातून त्या परब्रह्माशी समन्वय ठेवतात.

तीन शक्तींच्या बरोबर (उपयोगाने) आदिशक्ती सृष्टीची निर्मिती करतात. त्याचप्रमाणे त्यांच्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाने त्या सृजनाच्या योग्यायोग्यतेचे परीक्षण व निर्णय करतात. त्यांची ईश्वरी शक्ती, लीला नाट्याला दोन्ही पैकी

एका पद्धतीने शिखरापर्यंत नेतात.

१) प्रणव प्रज्ज्वलित करून त्या हे करू शकतात.

२) ते बटण दाबून लीला नाटक थांबवू शकतात.

पहिल्या अवस्थेत आदिशक्ती स्वत: लीला नाटकात भाग घेऊन माणसांच्या जाणिवेला प्रकाशित करू शकतात तसेच दुसऱ्या अवस्थेत त्या लीला नाटकच नष्ट करतील. त्यासाठी ही ईश्वरी शक्ती, सर्वोच्च आहे. जणू काही आदिमाता त्यांच्या मुलांच्या वाईट वर्तणुकीने त्रासून व कंटाळून विनाशकारी मानसिक स्थितीत जाऊन लीला नाटक बंद करतील.

**विराटाची निर्मिती**

या टप्प्यात 'आदि-पिंड' विराटामध्ये विकसित होतो. आदिशक्ती कशा पद्धतीने आपली शक्ती लंबगोल आकारातून संस्कृतमधील ॐ या आकारात व नंतर साडे तीन वलयात बदलू शकतात हे आपण पाहिले आहे. ज्या रेषांत आदि प्रणव हालचाल करतो त्या सुद्धा साडेतीन वलयांच्या आकारात असतात.

आदिमाता, प्रथम लंबगोलाला हृदयाच्या आकारात, आदिपुरुषाचे आदिहृदय निर्मिण्यासाठी परिवर्तित करतात. त्यांचे स्वामी परमेश्वर या हृदयाला आशीर्वाद देतात आणि प्रणवाचा आवाज होऊन हृदयाचे स्पंदन होऊ लागते. या नादाच्या लहरी साडेतीन वलयात फिरतात. या लहरींमुळे आदिकुंडलिनी निर्माण होते. आदिशक्ती निर्माण करत असलेल्या सृष्टीच्या आधाराच्या पायाची रचना साडेतीन वलयात असते. प्रणवाच्या नादाला हृदयाभोवती साडेतीन वेळा फिरण्यास आणि साडेतीन वलयाच्या टोकापर्यंत जाण्यास जो वेळ लागला त्याने आदिसमयाची निर्मिती झाली. या फिरण्यामुळे जो परीघ तयार झाला त्यामुळे आदि अवकाश (Primordial Space) निश्चित झाला. जेव्हा आदिमातेला सृष्टीची निर्मिती करायची असते. तेव्हा आदिवलय (आदिकुंडलिनी) घड्याळ्याचा काटा फिरतो त्या

दिशेने हलते व सृष्टी नष्ट करण्याच्या वेळी त्याच्या विरूद्ध बाजूस फिरते.

परमेश्वराची ईश्वरी शक्ती (साक्षीभावाची शक्ती) जी विराटाच्या हृदयात राहते ती या साडेतीन वलयातून कार्यान्वित होते, ते खालील तीन पद्धतीने :

१) ते लीला नाटक पाहतात.

२) ते लीला नाटकाचा आनंद घेतात.

३) ते लीला नाटक नष्ट करतात.

आदिवलय आणि त्याच्या साडेतीन वलयांचे महत्त्व व्यवस्थित समजून घ्यावे. याचे कारण असे, की आदिवलय आणि उभ्या जाणाऱ्या शक्तींचा (Vertical Forces) अनंत संयोग तसेच क्रम परिवर्तनाच्या (Combinations & Permutations) मार्गदर्शनाने सृष्टीचा पूर्ण व्यवहार, विशेष करून मानवाचा, होतो. तर्क लावून कोणी तरी असे विचारले, की परमेश्वराने साडेतीन वलयाचे सर्वत्र घटक (Denomination) म्हणून निवडले आहेत. तर त्याचे शुद्ध गणितात उत्तर आहे, एक वलय वर्तुळाचा मध्यबिंदु ते परीघ काढायचे असल्यास :

$$\text{पाय}(\pi) = \frac{\text{परीघ}}{\text{व्यास}} = \frac{२२}{७} \quad \text{अथवा} \quad \text{पाय}(\pi) = \frac{\text{अर्ध परीघ}}{\text{त्रिज्या}} = \frac{११}{३\ १/२}$$

जसे आकृती १ मध्ये दाखवले गेले आहे, साडेतीन कुंडलांचे होणे आवश्यक होते. या तत्त्वाचा मनगटी घड्याळे व इतर उपकरणांच्या यंत्रणेत उपयोग केला जातो.

### ऊर्ध्वस्थ शक्ती (आदि कुंडलिनी)

सृष्टी निर्मितीच्या दुसऱ्या भागात, निर्मितीमध्ये समन्वय साधण्यास, तसेच वैविध्य व गती देण्यास आदिमाता, प्राथमिक यंत्रणा आदिवलय (आदि कुंडलिनी) निर्माण करतात. त्या अशा पद्धतीने काम करतात, की

जसे एखाद्या माणसाला व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असते. तेव्हा तो प्रथम स्वत:प्रमाणेच व्यवसाय चालविण्याची कल्पना असणाऱ्या मॅनेजर्स व इतर कर्मचारी यांची कार्यालयीन रचना स्थापन करतो. व्यवसाय सुरू करण्यास मॅनेजमेंटमधल्या विविध जागा व इतर कार्यालयीन कामे निश्चित करणे आवश्यक असते. पुढे व्यवस्थापक व अधिकारी यांना नोकरीवर घेऊन त्यांच्या जागांवर व कार्यालयात नियुक्त करावे लागते. अगदी तशाच पद्धतीने आदिशक्ती विराटाची रचना स्थापन करतात. विविध स्थाने (Positions) निर्माण करून त्यांच्यावर अधिकारी (दैवते) नियुक्त करतात व त्यांना त्यांच्या कार्यालयात (चक्रांवर) ठेवतात.

आदिहृदयाच्या (Primordial Heart) निर्मितीनंतर त्या साडेतीन वलयात फिरतात. वलयाच्या अगदी शेवटी लंबगोलाचे त्रिकोणात परिवर्तन करून त्या स्वत:चे घर (आदिमूलाधार) निर्माण करतात. मग वलयाला घराच्या शिखराशी (apex) जोडतात. या घराच्या बाहेर व खालच्या बाजूस पहिले सूक्ष्म केंद्र मज्जारज्जूच्या बाहेर स्थापित केले असून ते पेल्व्हिक प्लेक्सेसमध्ये बसवलेले आहे व ते पेल्व्हिक प्लेक्सेसचे नियंत्रण करते. या पहिल्या व सर्वात खालच्या सूक्ष्म केंद्रावर आदिमाता कल्पना रम्य वाटावे अशा दैवतांची निर्मिती करतात. ते म्हणजे हत्तीचे मस्तक असलेले श्रीगणेश. हे सर्वात प्रथम निर्माण केलेले दैवत आहेत. श्रीगणेश चिरंतन बालकत्त्वाचे प्रतीक असून आदि अवकाशात पावित्र्य आणि अबोधिता, निरागसता भरण्यासाठी प्रदान केलेले पहिले दैवत आहेत. पावित्र्य व निरागसता ईश्वरत्वाचे सत्त्व आहे. निरागसतेचे तत्त्व आद्य आणि सर्वप्रथम असून ते श्रीगणेशांचे तत्त्व आहे आणि ते साडेतीन वलयांच्या कुंडलिनी कडून प्रसारित होते.

श्रीगणेश मूलाधार चक्राचे प्रमुख दैवत आहेत. संस्कृतमध्ये मूलाधार चक्राचा अर्थ आहे 'जीवन वृक्षाच्या मुळांचा आधार'. साडेतीन वलये त्यांना (मूलाधार चक्राला) मूळाप्रमाणे घट्ट बसवितात. रूपकाच्या दृष्टीने, पुत्र

(श्रीगणेश) आणि त्यांची आई यांचे पवित्र नातेसंबंध सृष्टीच्या जीवनाचे मूळ अथवा सत्व आहेत. ते प्रत्येक वस्तूत पसरते. जसा वृक्षाचा जीवन रस मुळांपासून सुरू होऊन वरच्यावर जीवन शक्ती देत पसरत जातो. आई आणि मुलाच्या या पवित्र नात्याचेच जेव्हा नुकसान केले जाते तेव्हा सृष्टीची सर्व बांधणीच कोसळते.

**श्री गणेशांची निर्मिती**

हिन्दु पुराणात श्री गणेशाच्या निर्मितीची रोचक हकीगत आहे. आदिमाता, एक दिवस गौरी देवतेच्या स्वरूपात स्नान करीत होत्या. त्यांना भीती वाटली, की कोणी तरी अनधिकारी माणूस स्नानगृहात प्रवेश करून त्यांच्या शुद्ध संकोचाचा व पावित्र्याचा भंग करेल. म्हणून त्यांनी स्वतःच्या शरीरावरच्या मळाने एक लहान मूल तयार केले. त्यावेळी त्या कुमारी (कन्या) असल्याने तो मळ (त्यांच्या अंगावरचा) चैतन्य लहरींनी परिपूर्ण होता. त्या आपल्या स्वामींना, विवाहानंतर प्रथमच भेटणार होत्या व त्या भेटीसाठी तयार होण्यासाठी स्नान करीत होत्या. त्यांचे स्वामी (श्रीसदाशिव) त्यांना भेटण्यासाठी आले तेव्हा त्या स्नानगृहातच होत्या. आपल्या पत्नीच्या स्नानगृहाच्या मागच्या दरवाजाच्या जवळ बसलेल्या लहान मुलाला पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले. मुलाने जेव्हा सदाशिवांना सांगितले, की तो गौरीचा मुलगा आहे, तेव्हा सदाशिव फारच संतापले. गौरी कुमारी आहेत हे सदाशिवांना माहिती होते. त्यामुळे हा मुलगा आपल्या पत्नीचे पवित्र नाव मलिन करीत आहे असे वाटून सदाशिवांनी तलवार बाहेर काढून संतापाने मुलाचा जागेवरच शिरच्छेद केला.

गौरींना जेव्हा समजले, की त्यांच्या पतीकडून मुलाचा वध झालेला आहे तेव्हा त्यांनी मुलाला कसे तयार केले ते सदाशिवांना स्पष्ट केले व मुलाला पुन्हा जिवंत करण्याची विनंती केली. पती जंगलात गेले व हत्तीच्या शावकाचे मस्तक काढून ते मुलाच्या शरीराला लावले. त्याबरोबर श्रीगणेश

जिवंत झाले व या दिवसापर्यंत हत्तीच्या शावकाचे मस्तक असलेले चिरंतन शिशु दैवत म्हणूनच आहेत. हत्तीचे मस्तक फार महत्वपूर्ण असून याची मूलाधार चक्रावरील प्रकरणात सविस्तर चर्चा केलेली आहे. श्रीगणेशांना निर्माण करून गौरींनी त्यांना, स्वत:च्या घराच्या खालच्या बाजूस असलेल्या मूलाधार चक्राचा राजा बनवले. श्रीगणेश आदि मूलाधार चक्रावर सर्व सूत्रे सांभाळत गौरींच्या पावित्र्याचे व सन्मानाचे रक्षण करतात.

आदिचक्रांची निर्मिती एकाच वेळी करण्यात आलेली नाही. एका चक्राच्या निर्मितीनंतर लक्षावधी वर्षे गेल्यानंतर दुसरे चक्र बनवले गेले. तसेच प्रत्येक दैवताची स्थापना केल्यावर वैश्विक अल्पविराम (Cosmic Pause) आहे.

आदिमूलाधार चक्रावर श्री गणेशांची नियुक्ती झाल्यावर आदिमाता त्यांच्या समवेत उभ्या रेषेत वर चढून आदि वलयाच्या सर्वोच्च टोकाशी पोहोचल्या. या स्थानावर त्यांनी लंबगोलाचे त्रिकोणाकृती मेंदूत परिवर्तन करून विराटाचा आदिमेंदू निर्माण केला. पहिल्या उत्थापनाने त्यांनी आदि इडा नाडी निर्माण केली, जी अभिव्यक्त झाल्यावर परमेश्वराच्या इच्छेचे अंग (Desiring Aspects) दर्शविते. ही त्यांची महाकाली शक्ती आहे. विराटाच्या आदिमेंदूतून आदिशक्ती आदि पिंगला नाडी निर्माण करीत खाली उतरतात. अभिव्यक्तीनंतर ही नाडी परमेश्वराचे सृजनात्मक अंग दर्शविते. आता, दुसऱ्यांदा मध्यमार्गातून वर जाताना त्या आदि सुषुम्ना नाडी तयार करतात.

या तीनही नाड्या वेगवेगळ्या सात ठिकाणी साडेतीन वलयांना छेदतात आणि सात आदिचक्रे निर्माण करतात. या चक्रांचे सविस्तर वर्णन त्या प्रत्येकावरील प्रकरणात केले आहे. परंतु ही आदिचक्रे व मानवातील त्यांच्याप्रमाणेच असलेल्या चक्रांमधील संबंध व मानवाच्या शरीरातील त्यांच्याशी जुळणारी स्थाने खाली दिलेली आहेत :

| | **सूक्ष्म स्वरूपात आदिशरीरात** | **स्थूलरूपात मनुष्याच्या मज्जारज्जूत** | **मनुष्याच्या शरीरातील स्थाने** |
|---|---|---|---|
| १ | आदि मूलाधार चक्र | मूलाधार चक्र | पेल्व्हिक प्लेक्सेस |
| २ | आदि स्वाधिष्ठान चक्र | स्वाधिष्ठान चक्र | एऑर्टिक प्लेक्सेस |
| ३ | आदि नाभी चक्र | नाभी चक्र | सोलर प्लेक्सेस |
| ४ | आदि अनाहत चक्र | अनहत चक्र | कार्डियाक प्लेक्सेस |
| ५ | आदि विशुद्धी चक्र | विशुद्धी चक्र | सर्व्हायकल प्लेक्सेस |
| ६ | आदि आज्ञा चक्र | आज्ञा चक्र | ऑप्टिक नस क्रॉस करण्याचे केंद्र, पिट्युटरी व पिनीअल ग्रंथींचे नियंत्रण करणारे केंद्र |
| ७ | आदि सहस्रार चक्र | सहस्रार चक्र | एक हजार नाड्या असलेला मेंदूचा वरचा भाग आणि लिंबिक एरिया |

आदिपुरुषाच्या शरीरातील मेंदूमध्ये आदिशक्तींच्या तीन शक्तींची प्रतिबिंबे, प्रत्येकी दोन जाणिवात प्रकट होतात. सोयीसाठी त्यांना या तीन शक्तींची मुले म्हणता येईल, पण वास्तवात ती आहेत अस्तित्वाच्या विविध अवस्थांमधील तीन शक्तींची प्रतिबिंबे. ती खाली दिल्याप्रमाणे :-

| महासरस्वती | महालक्ष्मी | महाकाली |
|---|---|---|
| सरस्वती<br>शिव | लक्ष्मी<br>ब्रह्मदेव | काली<br>विष्णु |

शिवांचे कालीशी लग्न झाले कारण काली शिवांची शक्ती आहेत. विष्णूंचे लक्ष्मीशी लग्न झाले कारण लक्ष्मी विष्णूंची शक्ती आहे. तसेच सरस्वती ब्रह्मदेवांची शक्ती असल्याने त्या दोघांचे लग्न झाले. अशा पद्धतीने परब्रह्माची तीन अंगे त्यांच्या आपआपल्या शक्तींशी परमेश्वरी विवाह बंधनांनी जोडली गेली.


## एकेश्वर वाद (Pantheism)

ईश्वर एक आहे की अनेक आहे या विषयी विवादात्मक प्रतिपादन नेहमी केले जाते. साध्या बासरीच्या रूपकाने हे जुने मिथक कायमचे शांत करता येईल. बासरीला सातच छिद्रे असतात. पण सात स्वरांना विविध प्रकारे जोडण्याने संगीताचे राग किंवा धून तयार होतात. तसेच बासरीमुळे हवेचे संगीतात परिवर्तन होते. सृष्टीचे राग (संगीत) निर्माण करण्यास परमेश्वरसुद्धा विविध सुरांचा (आदिचक्रे) उपयोग करतात. विविध दैवते, एकाच परमेश्वराची एक किंवा अधिक अंगे प्रदर्शित (accentuate) करण्यासाठी बासरीवर ठेवलेली बोटे आहेत. ज्या बासरीला केवळ हवा फुंकण्याची जागा आहे व छिद्र नाहीत त्याच्यातून कोणतेही संगीत निर्माण करणारे सात स्वर काढण्यासाठी बासरीवर सात छिद्र नसल्यास कोणतेही संगीत किंवा राग तयार होत नाही. बासरीत येणारा हवेचा प्रवाह फक्त एकच असतो. सात वेगवेगळ्या छिद्रांमधून तो बाहेर जाऊ दिला तरी तो हवेचा एकच प्रवाह राहतो. सृष्टीच्या सृजनात हवा म्हणजे प्रणव. त्याचा प्रत्येक सूक्ष्म केंद्रात वेगळा आविष्कार होतो.

अनेक देवतांची निर्मिती केली गेली. पण जे पूजनीय देव आहेत ती दैवते असून ते त्यांच्या धर्माशी त्यांचे पूर्णपणे तादात्म्य आहे. दैवते, स्त्री किंवा पुरुष (देवता) असून ज्या आदिकेंद्राचे (आदिचक्रांचे) ते अधिष्ठानस्वरूप दैवत आहेत व त्या आदिचक्राचे ते नियंत्रण करतात त्या चक्रांचा स्वभाव, त्यांचे कार्य व त्यांचा धर्म यांच्या अनुसार त्या देवी-


देवतांची निर्मिती करण्यात आली.

जसे आकृती २ मध्ये दाखवले आहे, तीन नवविवाहित देवी-देवतांच्या जोडप्यांची आदिमाता स्वत:च्या लंबगोलावर स्थापना करतात.




**आकृती २**

ब्रह्मदेव शिवांच्या स्थानावर येऊन त्या दोघांत अंतरसंबंध स्थापित झाले तर दुसरे दोघे लंबगोलाच्या समांतर रेषांवर आकृती २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आपले ठसे सोडतात. अशाप्रकारे देवी-देवतांसाठी सहा पीठांची निर्मिती होते. (आकृती ३)




**आकृती ३**

लंबगोल आता त्याच्या पायाशी उघडतो. (आकृति २) विष्णु समांतर रेषेवर आपला ठसा सोडतात. ते स्थान त्यांच्या भविष्यातील, श्रीकृष्ण म्हणून उत्क्रांतीच्या सर्वोच्च अवस्थेतील मानवी स्वरूप दर्शविते. त्याचप्रमाणे गणेशही एका स्थानावर आपला ठसा सोडतात ते स्थान वेगळे

निश्चित केले जाते. ते असते श्रीगणेशाच्या सर्वोच्च उत्क्रांत मानवी स्वरूप येशू ख्रिस्तांसाठी. म्हणून विष्णूंचे ईश्वरी स्वरूप आणि त्यांचे श्रीकृष्ण म्हणून पुढे (भविष्यात) फुलून येणारे मानवी स्वरूप यांच्यात अंतर निर्माण केले जाते. श्रीकृष्ण विराटांचे संपूर्ण स्वरूप प्रकट करतात. अगदी तसेच श्रीगणेशांचे ईश्वरी स्वरूप व त्यांचे पूर्ण उत्क्रांत येशू ख्रिस्त म्हणून मानवी स्वरूप यांच्यातही अंतर आहे. येशू ख्रिस्त महाविष्णू असून विराटाचे पुत्र आहेत. ते लंबगोलाच्या दोन बाजूंवर एकमेकांच्या समोर आहेत.

अशा पद्धतीने आदिशक्ती, आदिमेंदूमध्ये देवतांना स्थापन करतात. ही प्रक्रिया एकाचवेळी घटित होत नाही. तर विराटाचा आदिमेंदू जसा जसा मोठा होत जातो तसतशी अनेक युगानुयुगे, ही प्रक्रियाही वाढत जाते. अस्तित्वाच्या वैकुंठ अवस्थेत वरील स्थाने त्या दैवतांच्या अवतारांकडून अभिषिक्त केली जातात. याचा अर्थ असा, की श्रीकृष्ण आणि येशू ख्रिस्त यांची त्यांच्या मानवी स्वरूपातील अवतारांपूर्वी लक्षावधी वर्षे आधी धारणा केली गेली.

दैवतांच्या स्थापना सर्वाधिक महत्त्वाच्या आहेत. कारण आदिशक्ती ज्या पद्धतीने दैवतांची आदि पुरुषाच्या मेंदूमध्ये स्थापना करतात त्यावरून मानवी मेंदूमधील त्यांची स्थाने (पीठे) निश्चित होतात. सहजयोग त्या वरून कार्यान्वित होतो.

## प्रकरण २

# ईश्वरी अवतार - परमेश्वराचे राजदूत

या जगाचे सृजन भवसागरात घटित झाले. भवसागर विराटाच्या, आदिपुरुषाच्या, आदिनाभी चक्राच्या भोवताली असतो. त्या स्थानावर उत्क्रांतीला धारणा व संरक्षण देणारे आदिविष्णु राहतात. याशिवाय विराटाच्या शरीरातच आदिब्रह्मदेवांनी त्यांच्या सृजनाच्या कार्याचा आरंभ केला. जे निर्माण झाले त्याच्यात बदल करायलाच हवा होता. तसेच जन्म झालेल्या प्रत्येकाचे मरण येणारच व जे मृत झाले ते आदिपुरुषाच्या चंद्रनाडीत (आदिइडा नाडीत) परलोक नामक स्थानी साठविले जाते. वैश्विक सुप्त चेतित मन म्हणून प्रतीत होणारा परलोक मृतांना सामावून घेण्यासाठी निर्माण केला गेला. ही आदिपुरुषाची सामूहिक सुप्त चेतना मानवातील सुप्त चेतित मन म्हणून प्रतीत होते. त्याचप्रमाणे सूर्य नाडीवर (आदि पिंगला) सामूहिक चेतना बाह्य मन (collective supra-conscious) अशा मृतांसाठी तयार केले गेले, जे अहंकारी महत्त्वाकांक्षेतून आनंद शोधत होते.

प्राणी मेल्यावर त्यांचे आत्मे परलोकात गेले. ते पृथ्वीवर पुन्हा जन्मले जिथे ते अनुभवातून शिकले. विविध अवतारांनी त्यांना त्यांच्या उत्क्रांतीमध्ये मार्गदर्शन केले. उत्क्रांती मानवाच्या पातळीवर आली. त्यावेळी आदम आणि ईव्ह यांच्या काळात, माणसांना स्वातंत्र्य दिले गेले की त्यांनी जीवन उत्क्रांतीची प्रक्रिया आणि जीवन विरोधी विनाशकारी प्रक्रिया, यांपैकी एकाची निवड करावी. उन्नत आणि साक्षात्कारी जीवांमध्ये प्रगल्भ होण्यासाठी उत्क्रांतीची निवड हा एकच मार्ग माणसासाठी होता. परंतु विनाशकपद्धती विकसित करून काही माणसांनी जीवन-विरोधी प्रक्रिया निवडली. ते लोक सामूहिक सुप्त चेतना व सामूहिक चेतना बाह्य मन

यांच्यातून या पृथ्वीवर आले व त्यांनी जीवन-विरोधी आणि ईश्वर-विरोधी कारवायांचे नेतृत्व केले आणि विद्वेषी व दुष्ट ताकदींची पैदास केली. सामूहिक सुप्त चेतना व सामूहिक चेतना बाह्यत: यांच्यातून आत्मे पृथ्वीवर आले तेव्हा ते स्वतंत्र (कॅन्सरच्या पेशींप्रमाणे) झाले आणि त्यांना नरकात फेकण्यात आले. या सैतानी ताकदी पुन्हा नरकातून वर येऊन भवसागरात आल्या. नरकाचे दरवाजे मूलाधार चक्राच्या समोर असून श्री गणेशांची सोंड त्या बाजूस क्रोधाच्या लाटा प्रक्षेपित करते. क्रोधाचा चीत्कार करीत श्री गणेश या दुरात्म्यांना पुन्हा नरकात फेकून देतात. नरकाचा जो स्तर त्यांच्यासाठी नेमलेला आहेत त्या स्तरावर श्रीगणेश या दुरात्म्यांना भिरकवतात. त्या ठिकाणी ते युगानुयुगे असतात. शिक्षा भोगून पुन्हा ते पृथ्वीवर जन्म घेतात व तिथे आपले विनाशकारी उद्योग चालू करतात.

आदिशक्तींच्या भीतीदायक दुर्गा या अवताराने अनेकांचा संहार केला. काहींना नरकात क्षुद्र जनावरे म्हणून राहण्याचा शाप मिळाला. नरकाचे सात स्तर आहेत. त्याचे अनेक प्राचीन ग्रंथात वर्णन केले आहे. अशा अनेक दुष्टांचा शारीरिक संहार अनेकदा केला गेला, पण त्यांच्यापैकी काही, प्रत्येक अवतार येण्यापूर्वी जन्म घेतात. म्हणून कलियुगात पुन्हा ते आपल्या स्थानी आले आहेत. पण या वेळी धर्माच्या आवरणात खोटे गुरु किंवा खोटे योगी म्हणून आले आहेत. आता त्या लोकांना एक-एक करून त्यांच्याच दुष्कृत्यातून महामाया स्वरूपात अवतरित झालेल्या आदिशक्ती उघडकीस आणत आहेत.

## विष्णु अवतार

आदिविष्णु स्वत: उत्क्रांतीचा मार्ग उत्क्रांत करतात व त्याचे संरक्षण करतात. आध्यात्मिक (आत्मिक) जाणीवांच्या (awareness) प्रगतीमध्ये त्यांचे अवतार मैलाच्या दगडाप्रमाणे (महत्त्वाचे टप्पे) आहेत. मानवाच्या संवेदनांचे (perception) एक एक नवीन आयाम ते विकसित करतात. अज्ञानाच्या अंध:कारात ते प्रकाश दाखवतात. प्रत्येक अवतार एक नवीन

असीम संवेदना, एक नवीन सुवास, एक नवीन रंग, सृष्टीच्या सौंदर्यात भरतो.

जीवनाचा पहिला उगम पाण्यात झाला. (पहिला जीव पाण्यात निर्माण झाला) विविध कारणात्मक तत्त्वे (Causal essences) तन्मात्रा वेगवेगळ्या प्रकारे एकत्र करून तो तयार केला गेला. एकपेशीय जीव म्हणून सुरुवात होऊन पुढे तो अनेक पेशीय मासे या स्वरूपात उत्क्रांत झाला. मोठ्या प्रकारच्या माशांवर राहणारे एकपेशीय परावलंबी जीव पुढे जाऊन मोठे मासे म्हणून जन्मले. पण त्यांची जाणीव मात्र खालच्या प्रकारचीच राहिली. ते सैतानी ताकदींचा उगम झाले. ते जसे अधिक मोठे होत गेले तसे त्यांच्याहून मोठ्या आणि बलवान माशांचे भक्ष्य झाले. जे मासे पाण्यातून जमिनीवर उत्क्रांत होण्याच्या संक्रमणातून होते, त्यांचा हे मोठे मासे संहार करायचे.

या दुष्ट जीवांचा संहार करण्यासाठी आदिविष्णुंनी मत्स्य (मासा) अवतार धारण केला. ज्या माशांना जमिनीवर यायचे होते त्यांचे मत्स्य रूपातील आदिविष्णूंनी नेतृत्व केले. हा त्यांचा मत्स्यावतार नामक पहिला अवतार झाला. प्रत्येक टप्प्यावर आवश्यक ते रूप घेऊन ते इतर माशांना भवसागराच्या पाण्याबाहेर सरपटणारे प्राणी होण्यासाठी घेऊन आले. किनाऱ्यावर येऊन ते प्रत्येक प्रकारच्या प्राण्याला वाचविणार होते. त्यांच्या शेपटीस एक पेटी बांधली गेली. त्यांच्या कठीण पाठीचा समुद्र मंथनासाठी उपयोग केला गेला. समुद्र मंथनातून मानवतेसाठी चौदा रत्ने बाहेर आली.

किनाऱ्यावर आल्यावर त्यांच्या खालच्या जमिनीच्या स्पर्शाने ते रांगू लागले व सरपटणारे प्राणी उत्पन्न झाले. या वेळी आदिविष्णूंनी सरपटणारा प्राणी कासव म्हणून येऊन दुसरा अवतार घेतला आणि उत्क्रांतीमध्ये अडथळा आणणाऱ्या राक्षसांचा संहार केला. या अवताराने पुढे महाप्रलयाच्या वेळी नोहाच्या (मनूच्या) नावेला पुराच्या पाण्याच्या बाहेर येण्यास मदत केली. कासवाचे अर्धगोलाकार संरक्षक कवच पृथ्वीचा गोलाकार दर्शविते आणि सरपटणाऱ्या प्राण्यांना संरक्षक कवच विकसित

करणे शिकवते. पाण्याच्या बाहेर आल्यावर त्यांना दुसऱ्या कोणत्याही संरक्षणाची गरज नव्हती. जाणिवेच्या त्या पातळीवर जिवंत राहण्यासाठी कासव हा सर्वात योग्य प्राणी होता.

प्रथम शारीरिक विकास घडविला जातो. मृत्यूची स्वाभाविक भीती प्राण्यांमध्ये संरक्षणाचा शोध-पहिला शोध-घेण्याची प्रवृत्ती निर्माण करते. जीवनात टिकून राहताना प्राण्यांमध्ये सामूहिकरित्या संघटित होण्याची सुरुवात झाली. सस्तन प्राण्यांच्या टप्प्यावर तिसरा म्हणजे वराह अवतार झाला. त्या प्राण्यांमध्ये स्वसंरक्षणासाठी प्रयत्न करण्याची अंगभूत प्रवृत्ती सुधारित वागण्यात परिणत झाली. या टप्प्यावर चतुष्पाद प्राण्यांच्या कळपांनी (एकत्रितपणे) स्वसंरक्षणाचे उपाय केले. याशिवाय, सरपटणारे प्राणी चतु:ष्पाद प्राण्यात उत्क्रांत झाल्याचे वराह रूपात दिसून येते.

श्रीविष्णूंनी आपला चौथा अवतार म्हणजे नरसिंह अवतार घेतला, ज्यात वरचा अर्धा भाग मनुष्याचा आणि अर्धा सिंहाचा होता. उत्क्रांतीच्या टप्प्यावर माणसाला, निसर्ग व प्राणी यांच्यावरील प्रभुत्वाची जाणीव झाली. हा अवतार प्राण्याच्या मानव अवस्थेत उत्क्रांत होत असतानाच्या मधली अवस्था दर्शवितो. हिरण्यकश्यपू नामक मोठ्या राक्षसाचा वध करण्याचे काम नरसिंहाचे होते.

मानव रूपात अस्तित्वात येण्यापूर्वी तो (मानव) माकडाच्या अवस्थेत होता. माकडेसुद्धा त्यांच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत संघर्ष करीत होती. त्यांच्या मदतीसाठी विराटाच्या आदिचित्ताने स्वत: हनुमान म्हणून अवतार घेतला. हनुमान श्री विष्णुंचे भक्त होते. हनुमानांनी माकडांचे नेतृत्व केले. (डार्विनच्या सिद्धांतानुसार माकडांना माणसाच्या उत्क्रांतीमधील न सापडणारा दुवा असे वर्णन केले आहे.) अशाप्रकारे मानवात उत्क्रांत होण्यास माकडांना मदत करण्यात आली.

आपल्या पाचव्या अवतरात श्रीविष्णू प्रथमच मानव रूपात अवतीर्ण

झाले. बुटक्या माणसाचे (वामन अवतार) रूप घेऊन ते पृथ्वीवर आले व परमेश्वराचा शोध घेणाऱ्या लोकांचे नेतृत्व केले. वामन या कल्पनेने बोधित झाले होते, की ते त्रिलोक अर्थात पृथ्वी, आकाश व पाताळ (सुप्त चेतना) पादाक्रांत करू शकतात. याचा दुसरा अर्थ असा होतो, की या अवताराने ही कल्पना माणसाच्या मनात आणली, की माणूस सर्व तिन्ही लोकांवर प्रभुत्व मिळवू शकतो. हे लक्षात घ्यायला हवे, की उत्क्रांतीचा अनुक्रम अर्थात् आदिविष्णूंचे अवतार, तो मार्ग दर्शवितात, की जो उच्च, गहन व विस्तृत आध्यात्मिक जाणीवेप्रत नेतो व तोच सृष्टीच्या विकासाचे मूल्यमापन करणारा खरा निदर्शक आहे. असा अनुभव आहे, की प्रथम एका माणसाची उत्क्रांती होते व नंतर सामूहिक पातळीवर असंख्य लोक ते आत्मसात करतात.

श्रीविष्णूंचा सहावा अवतार बलवान पुरुष, श्रीपरशुरामांचा होता. त्यांनी तपोबलाने (स्वनियंत्रणाने) मिळवता येणाऱ्या शक्ती दर्शविल्या. पूर्ण उत्क्रांतीच्या अवस्थेत माणसांमध्ये अहंभाव विकसित झाला आणि स्वतःच्या अंतर्यामी जे अदृश्य आहे त्याचा शोध घेण्याची गरज भासली. त्यांनी परमेश्वराबद्दल विचार करणे सुरू केले. आणि आध्यात्मिक जीवनाच्या शक्तीची जाणीव होऊन त्यांनी आंतरिक जीवनाचा नवीन शोध घेण्याचा आरंभ केला. तो वैयक्तिक शोध असल्याने साधक पूर्णपणे समाजापासून वेगळे राहायचे. अनेक जणांनी जगाचा त्याग केला आणि अंतिम सत्याच्या शोधार्थ जंगलात एकांतवासात गेले. त्यांचा शोध दिवस-रात्र, वर्षानुवर्षे, जन्म-जन्मांतरात चालूच राहिला. परशुरामांनी हठयोग व राजयोगाची स्थापना केली. त्यांची साधना एकट्यानेच गुरूच्या मार्गदर्शनाखाली केली जायची.

माणसाची आध्यात्मिक जागृती वाढत वाढत जाऊन बलवान झाली. तेव्हा नकारात्मक शक्तींनी ज्यांनी साधकांच्या यज्ञ-यागात व तपस्येत अडथळे आणायला पुन्हा जन्म घेतला होता, त्यांनी साधकांवर हल्ले केले.

त्या काळात श्रीविष्णूंच्या सातव्या श्रीराम अवतारात बऱ्याच आधी जगदंबा, देवी दुर्गा म्हणून आदिमातेने अवतार घेतला. त्यांनी आदिहृदयातून (आदि अनाहत चक्र) ज्याला विराटाचे पवित्र हृदय म्हणतात, तेथून अवतार घेतला. साधकांना सैतानी ताकदींच्या दुष्टपणापासून वाचविण्यासाठी देवी दुर्गा यांचे प्रमुख १०८ अवतार झाले.

महेश (शिव), विष्णु आणि ब्रह्मदेव यांनी त्रिगुणात्मक त्रिमूर्ती बनून गुरुदेव, आदिगुरु दत्तात्रेय म्हणून अवतार घेतला. सामान्य जनांना परमेश्वराविषयी गोपनीय ज्ञान देण्यास, परमेश्वरास उघड करण्यास आणि त्यांना स्वत:चे स्वातंत्र्यात (वेगळेपणात) भवसागर तरून जाण्यास मदत करण्यासाठी ते पृथ्वीवर आले होते. सामान्य जन अज्ञानाच्या बंधनात असल्याने त्यांच्या स्वप्रयत्नाने उत्क्रांतीमध्ये प्रगती होऊ शकत नव्हती. म्हणून त्यांच्या वेगवेगळ्या जन्मात आदिगुरूंच्या अवतारांकरवी त्यांना मार्गदर्शन दिले गेले. तीन मस्तके असलेले मूल या स्वरूपात आदिशक्तींनी त्यांना निर्माण केले. त्या अत्री ऋषींच्या पत्नी अनसूया म्हणून त्रेतायुगात पृथ्वीवर अवतीर्ण झाल्या होत्या. आदिगुरू सर्वात प्राचीन धर्मांपैकी असलेल्या जैन धर्माचे संस्थापक आदिनाथ म्हणून अवतरित झाले. मग जानकीचे, ज्यांना सीता असेही म्हणतात, त्यांचे वडील राजा जनक म्हणून आदिगुरूंनी जन्म घेतला. श्रीरामांच्या पत्नी सीता आदिशक्तीच्या अवतार होत्या.

आदिगुरु मच्छिंद्रनाथ म्हणून जन्मले आणि पुन्हा झरतुष्ट्र म्हणून आले. पारसी लोक प्राचीन काळापासून त्यांची पूजा करत आले आहेत. त्यांच्या आधी ते प्रथम अब्राहम आणि नंतर मोझेस म्हणून आले. ते ज्यू धर्माचे संस्थापक होते. चीनमध्ये कन्फ्युशियस व लाओत्से म्हणून व ग्रीस देशात सॉक्रेटिस म्हणून जन्मले. ईश्वराचे प्रेषित (पैगंबर) आणि इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद साहेब म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण अवतार घेतला. त्यांची कन्या फातिमा, म्हणजे पूर्वजन्मीच्या सीता, आदिशक्तीच्या अवतार होत्या.

त्या मुस्लिम धर्मातील शिया पंथाच्या संस्थापक होत्या. भारतीय बोलीभाषेत सीता यांना सीया असेही म्हणतात. आदिगुरु पुन्हा गुरुनानक म्हणून जन्मले. त्यांनी शीख धर्म स्थापिला. नानकी (जानकी) या त्यांच्या भगिनी होत्या. अगदी अलीकडे, भारतातील महाराष्ट्र राज्यात शिर्डी येते श्री साईबाबा म्हणून अवतीर्ण झाले. तिथेच सन १९१८ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. दत्तात्रेयांचे एकंदरीत दहा अवतार झाले.

ही गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की प्राण्यांच्या अवस्थेपर्यंत आणि ते संपूर्णपणे परमेश्वराच्या आज्ञेत असल्याने, त्यांना जीवनाचे प्रश्न सोडविण्याची गरज नव्हती, पण मानवी अवस्थेत, जसे आदम आणि इव्ह यांच्या गोष्टीवरून आपल्याला समजते, माणसांना त्यांचे विषयक प्रश्न सोडविण्याचे स्वातंत्र्य व निर्णयक्षमता दिली गेली. या स्वातंत्र्याशिवाय परमेश्वरी शक्तीची रहस्ये शिकण्यास माणूस समर्थ झाला नसता.

त्रेतायुगात आदिविष्णूंनी स्वतःचा सातवा, श्रीराम अवतार घेतला. मनुष्याच्या रूपात त्यांनी भवसागर पार करून जाणीवेचे नवीन क्षेत्र (आयाम) उघडले. श्रीराम स्वरूपात आलेले श्रीविष्णू, हजारो वर्षानंतर ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो याने मांडलेल्या तत्त्वज्ञ राजा या संकल्पनेचे खरेखुरे उदाहरण (मॉडेल) होते. माणसाच्या राजकीय व सामाजिक जाणिवा प्रकाशित (बोधित) करणे हा त्यांचा हेतू होता. मानवासाठी त्यांनी योग्य राजकारणाचे व समाजकारणाचे नियम प्रस्थापित केले. राजाचे वैयक्तिक आचरण, राज्यकारभार आणि राजकीय संस्था यांच्या द्वारे ईश्वराची अभिव्यक्ती त्यांनी दर्शविली. मानवी राजा म्हणून त्यांचे जीवन आदर्शभूत होते. ते मर्यादा पुरूषोत्तम होते. असंख्य लोकांनी हे पाहिले आणि त्यांच्यात, मानवात सर्वप्रथम या सर्वांची जाणीव निर्माण झाली. श्रीराम सर्व राजांसाठी आदर्श होते. आणि त्यांचे राज्य (रामराज्य) सर्वांसाठी आदर्श राज्य होते.

आदि सुषुम्ना नाडीत (मध्यमार्ग) भवसागर पार करून श्रीराम आदि

अनाहत चक्रातील (Primordial Heart Chakra) स्थानात पोहोचले. त्यांची पत्नी सीता आदिशक्तींची अवतार होती. आपण आदिविष्णूंचे अवतार आहोत याचे श्रीरामांना कसे विस्मरण झाले, हे वाल्मिकी रामायणात सांगितले आहे. याचे कारण असे होते, की परमेश्वरी इच्छेनुसार काही काळ आपण अवतार आहोत हे विसरून, श्रीरामांनी अगदी माणसासारखे वागावे, की ज्यामुळे सामान्यजनांना त्यांच्या समवेत मोकळेपणा वाटेल. श्रीरामांनी लोकांना मानवी नेतृत्व दिले. नंतर सीताजी भूमीमध्ये अंतर्धान पावल्यानंतर श्रीरामांना त्यांच्या ईश्वरत्वाचे स्मरण झाले.

श्रीरामांच्या अवतार काळात आदिशक्ती तीन मानव रूपात होत्या : महालक्ष्मी-सीता, पत्नी रूपात, महासरस्वती-आदिगुरु दत्तात्रेयांना जन्म देणाऱ्या सति अनसुया रूपात, महाकाली-राक्षस रावणाची पत्नी मंदोदरीच्या रूपात.

आदिविष्णूंचा आठवा अवतार द्वापर युगात श्रीकृष्ण रूपात झाला. आणि आदिशक्तीने पुन्हा तीने रूपे धारण केली. महाकाली फार थोडा काळ विष्णुमाया, श्रीकृष्णांची लहान बहीण या शिशुरूपात, जिवंत राहिली. श्रीकृष्णांना सांभाळणारी आई, यशोदेची मुलगी म्हणून ती जन्मली आणि तिला कंस नामक राक्षसाने ठार मारले. नंतर ती पांडवांची पत्नी द्रौपदी म्हणून जन्मली. यशोदा स्वत: महासरस्वतीच्या अवतार होत्या. महालक्ष्मी म्हणून त्यांनी दोन रूपे घेतली, राधा व रुक्मिणी. 'रा' म्हणजे शक्ती व 'धा' म्हणजे धारण करणे. म्हणून राधा याचा अर्थ शक्ती धारण करणारी. रुक्मिणी रूपात त्या द्वारकाधीश श्रीकृष्णांच्या पत्नी झाल्या.

श्रीकृष्ण परम पिता परमेश्वराची सर्वात महान अभिव्यक्ती होते. अवतार घेऊन त्यांनी मानवाच्या जाणिवेत एक नवीन क्षितिज उघडले, ज्याच्यामुळे माणसाला परमेश्वराच्या प्रेमशक्तीचे लीला नाटक साक्षीभावाने पाहता आले. त्यांच्या अवताराने मानवी कल्पनेला परब्रह्माच्या

साक्षीस्वरूपाच्या शक्तीची जाणीव झाली. त्यांच्यामधून महान आदिपुरुषाची (विराटाची) वास्तविक (प्रत्यक्ष) अभिव्यक्ती झाली. त्यांच्या अवताराने कवी आणि तत्वज्ञ यांना जिथे आध्यात्मिक जाणिवा असतात, अशा आंतरिक संकेताच्या क्षेत्रात प्रवेश करता आला. त्यांनी राजा आणि चतुर व्यक्ती म्हणून लोकांना सत्याचे वास्तविक स्वरूप स्पष्ट करण्यास परमेश्वरी चातुर्याच्या पद्धतींचा उपयोग केला. जनसामान्यांची आध्यात्मिक उन्नती घडविण्यात परमेश्वरी चातुर्याचे सौंदर्य असते. अज्ञानी व मूर्ख लोकांना हुशारीने वागवून किंवा भ्रांती निर्माण करून धर्म व सदाचरणाच्या मार्गावर नेणे हा परमेश्वरी चातुर्याचा मुख्य भाग असतो. थोडक्यात, या ना त्या पद्धतींनी अशा लोकांना परमेश्वरी प्रेमसागराच्या किनाऱ्यावर आणावे लागते. श्रीकृष्णांचे जीवन बहुसंख्य लोकांत व्यतीत झाले आणि त्यामुळे त्यांच्या अवताराने बहुसंख्य लोकांना सामावणारी आध्यात्मिक कार्यप्रणाली (Movement) उदयाला आली. त्यांनी अर्जुनाला विराट स्वरूपाचे दर्शन दिले आणि मानवी चक्षूंना सर्वप्रथम स्वयं आदिपुरुषाचे दर्शन झाले.

पूर्वी असे म्हटले जायचे की प्रिय वाटेल असे सत्य बोलावे (सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात्) तरीसुद्धा पुष्कळदा सत्य सांगण्याने दुसऱ्याच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. पुढे अनेक बुद्धिमान लोकांनी हे परस्पर विरोधी विधान नाकारले. श्रीकृष्णांनी सांगितले की आत्म्याचे हित साधणे हे ध्येय जर सत्य सांगणे व प्रिय सांगणे यांच्यामध्ये घातले तर ऐकणाऱ्याच्या न कळत सत्य सांगितले जाईल. त्यांना सांगायचे होते, की आत्म्याच्या उन्नती करता सत्य सांगितले तर ते शेवटी आत्म्याला प्रसन्न करते.

त्यांच्या आरंभीच्या काळात राधा आणि कृष्ण ('रा' म्हणजे शक्ती + 'स' म्हणजे बरोबर) रास खेळायचे. रास या खेळात परमेश्वरी शक्तीशी तादात्म्य प्रकट होते. तो सहजयोगाचा चैतन्य लहरींचे परमेश्वरी सर्कीट बनवण्याचा खेळ होता. श्रीकृष्णांचे सर्व सवंगडी निरागस आणि साधे गोप-

गोपी होते. त्यांना हे समजलेच नाही की रास लीला करून श्रीकृष्ण सहजयोग (अंतरात्म्याचे सहज वृद्धीकरण) कार्यान्वित करीत होते. 'रिंगा रिंगा रोजेस' या मुलांच्या साध्या खेळाप्रमाणे रास लीला होती.

राधा आदिशक्ती असल्याने जेव्हा त्या यमुनेचे पाणी घड्यात भरायच्या व तो डोक्यावर घेऊन जायच्या तेव्हा आपोआप प्रणवाने पाणी चैतन्य लहरीमय व्हायचे. श्रीकृष्ण तो घडा फोडायचे तेव्हा त्यातील पाणी राधा-कृष्ण राहत असलेल्या वृंदावनाच्या जमिनीवर सांडून माती चैतन्य लहरीमय होत असे. तसेच राधाजींनी यमुनेच्या पाण्यात पाय ठेवल्याने नदीचे पाणी चैतन्य लहरीमय होत असे. तेव्हा गोपी, त्यांचे नवरे व वृंदावनातील साधे सरळ लोक मातीच्या घड्यात यमुनेचे पाणी नेत असतांना, श्रीकृष्ण ते घडे फोडायचे. याचे कारण असे, की घड्यातील पाणी त्यांच्या डोक्यावरून मज्जारज्जूवर (पाठीच्या कण्यातील) पडायचे. त्यामुळे त्यांची कुंडलिनी जागृत होऊन तिचे उत्थान व्हायचे आणि त्यांना सहजयोगाच्या विनासायास जागृतीतून आत्मसाक्षात्कार मिळायचा. ही खेळता-खेळता जागृती (बाप्तिस्मा) देण्याची पद्धत होती, पण श्रीकृष्णांच्या या क्लृप्त्या व योजना पूर्णपणे व लगेच सहजयोगाचे प्रकटीकरण करू शकत नव्हत्या. ते केवळ सहजयोगाचे त्यांच्या नावाप्रमाणेच बीजारोपण करीत होते. श्रीकृष्णांच्या नावाचा अर्थ बीजारोपण (कृषी) करणारा असा आहे. गोप-गोपींना कुंडलिनीची जागृती मिळत असे व ती मोठी प्राप्ती होती. कुंडलिनी जागृतीच्या अवस्थेमुळे मानवाचा सीमित स्वभाव प्रकाशित (बोधित) होऊन त्यांची चेतना विशाल होत असे. परंतु ते असीमाचे भेदन करू शकत नव्हते. ते श्रीकृष्णांच्या काळानंतर घटित होण्यासाठी सोडले होते. म्हणून सहजयोगाचा स्वीकार करण्याच्या स्थितीत येण्यासाठी त्यांच्या कुंडलिनीवर अनेक वर्षांच्या प्रयत्नांची किंवा अनेक जन्मांच्या अनुभवाची गरज होती.

दत्तात्रेयांचा अवतार भवसागरात झाला, तर श्रीकृष्णांचा अवतार फार

वरच्या स्थानावर, श्रीरामांनी अवतार घेतलेल्या आदि अनाहत चक्राच्याही वर होता, विराटाच्या शरीरात श्रीकृष्णांचे स्थान आदि विशुद्धी चक्रावर होते. त्याची जागा मज्जारज्जूच्या आत मानेच्या पायथ्याशी आहे. श्रीकृष्ण विराटाचा पूर्ण अवतार होते. त्या स्वरूपाचे आपल्या शिष्याला, अर्जुनाला त्यांनी दर्शन दिले. त्यांनी अर्जुनाला केलेला उपदेश भगवद्गीतेत आहे. साक्षी अवस्थेची मूर्ती असलेल्या श्रीकृष्णांनी श्री रामांप्रमाणे असंख्य राक्षस-राक्षसींचा संहार केला. या बाधा जेव्हा जेव्हा मानवी उत्क्रांतीच्या आड येतात तेव्हा तेव्हा त्यांना नष्ट करावे लागते. आदिशक्तीचे बहुतेक सर्व अवतार राक्षसांच्या संहारासाठी होते.

राधाजींचा अवतार मानवाच्या कल्पनांमध्ये कसा कसा बदल होत गेला ते दर्शवितो. सीताजींच्या काळातील जीवनाच्या तुलनेत, राधाजींच्या जीवनात समाजाच्या पुराणमतवादी दुराग्रही विचारसरणीत, सामाजिक प्रगतीची थोडी उंची निश्चितच दिसून येते. राधाजींचा, श्रीकृष्णांशी लौकिक दृष्ट्या विवाह झाला नव्हता. राधा-कृष्णांचा परमेश्वरी (अलौकिक) विवाह झाला होता. ब्रह्मदेवांनी त्यांचे लग्न आध्यात्मिक व सामाजिकरीत्या अनेक लोकांसमक्ष लावले होते. त्यांच्या आधी श्रीराम-सीता यांचा औपचारिक विवाह समारंभात विवाह होऊन त्याला सामाजिक मान्यता होती. परंतु समाजाने त्यांची (सीताजींची) निंदा केली. सीताजी श्रीरामांच्या कायदेशीर पत्नी होत्या तरी त्यांना समाजाची मान्यता नाकारण्यात आली, याचे उलट श्रीकृष्णांचे प्रेम आणि स्तुती यांच्यामुळे त्यांचा विवाह झाला नव्हता तरी राधाजींचा गौरव झाला.

राजकन्या सीता यांचा विवाह राजा राम यांच्याशी फार पारंपारिक पद्धतीने झाला. श्रीराम वनवासात गेले असताना, सैतान राक्षस रावण संन्याशाच्या वेशात सीताजींच्या समोर आला आणि त्यांचे अपहरण करून त्याची राजधानी लंका येथे घेऊन गेला. त्यांना रावणाने त्याच्या राज्यात जे

बेट होते, अगदी मध्यभागी निर्मनुष्य ठिकाणी ठेवले होते. श्रीरामांनी पत्नीची (सीताजींची) सुटका करण्यास रावणाशी युद्ध केले. श्रीरामांनी शत्रुचा पराभव करून सीताजींना आपली राजधानी अयोध्या येथे आणले. सीताजी पवित्रतम, अतिशय पूजनीय होत्या तरीसुद्धा राजधानी अयोध्येच्या रहिवाशांनी त्यांना संशयाने वागवले. ते सीताजींना राणी म्हणून मानत नव्हते व रावणाने त्यांचे बळजबरीने अपहरण केले याबद्दल त्यांनाच दोष देत होते. संशयी लोकांनी त्यांच्या शुद्धतेबद्दल शंका काढली आणि त्यांना नाकारून सामूहिक पाप केले. त्या गरोदर होत्या तरीसुद्धा श्रीरामांना त्यांचा त्याग करण्यास भाग पाडले. त्या सध्याच्या बिहार राज्यातील जंगलात वाल्मिकी ऋषींच्या आश्रमात राहिल्या. तिथे त्यांनी लव आणि कुश या दोन जुळ्या मुलांना जन्म दिला. ती मुले माणसेच होती, परंतु त्यांना पूर्वजन्मीचा महान आध्यात्मिक वारसा होता. सीताजींनी त्यांना ईश्वरी जीवनक्रमाची शिकवण दिली. पुढे ते बिहार राज्यातच गौतम (भगवान बुद्ध) आणि महावीर, महान जैन धर्माचे एक नेते, या रूपात जन्मले. हे सर्व ख्रिस्त जन्माच्या पाचशे वर्षे आधी घडले. ते पूर्वीच्या जन्मातून उच्च आंतरिक स्थितीला पोहोचले होते. त्यांनी अहिंसेची शिकवण दिली. ती पुढे वाढविण्यात येऊन शाकाहारी जेवणाच्या अतिरेकी पुरस्काराचे त्याला स्वरूप आले. त्यांनी स्वतः शाकाहारीपणाच्या व ब्रह्मचर्याच्या अतिरेकी ब्राह्मणी पुरस्कारापासून लांब राहून अधिक चांगले संतुलित राहण्यास, ब्राह्मणाऐवजी क्षत्रिय जातीत जन्म घेतला. तरी सुद्धा त्यांच्या शिष्यांनी त्यांची शिकवण शाकाहार व ब्रह्मचर्य यांच्या टोकाच्या अतिरेकी आचरणापर्यंत खेचली. त्यांनी आंतरिक संन्यस्त वृत्ती आणि अहिंसा यांची संघटित संन्यास व शाकाहारी जीवन प्रणाली यांच्याशी गफलत केली. त्यांच्यानंतर आलेल्या श्रीकृष्णांवर बुद्ध व महावीर यांच्या अनुयायांनी फार टीका केली.

पुढे अरब देशात मोहम्मद साहेबांची मुलगी फातिमा, यांची दोन मुले, हसन-हुसेन म्हणून ते जन्मले. करबला येथे झालेल्या भीषण युद्धात या

दोघांची हत्या झाली. त्यांचे मृत्यु धर्माच्या नावाखाली झालेले महान बलिदान म्हणून महत्त्वाचे मानले जातात. अतिरेकी स्वभावाचे लोक धर्मवेडे होऊन आंधळेपणाने रक्तमांसाची शरीरे धारण केलेल्या अवतारांना, जे धर्माचे सत्त्व असतात, कसे ठार मारतात ते हसन-हुसेन यांच्या मृत्यूवरून दिसून येते. (त्यांच्या मृत्युमुळे) त्या देशातल्या (अरबस्तान) बहुसंख्य धार्मिक लोकांना धक्का बसून ते जागृत झाले व बहुसंख्यांच्या पातळीवर, लोकांत पश्चात्तापाची लाट आली. अशा पद्धतीने लोकांना पटविण्यात आले की साक्षात्कारी जीवाला युद्धाची आसक्ती असणे शक्य नाही. हिंसा किंवा अहिंसा हे मनाचे गुण आहेत, पण जाणीव या दोन्ही टोकांपलिकडे आहे. धर्माच्या रक्षणासाठी युद्ध करावे लागते, पण साक्षीभावात आल्यावर कोणतेही श्रेय किंवा दूषण न घेता किंवा आक्रमणाने विचलित न होता, युद्धाचे नाटक पाहिले जाते.

सीताजींचा पुनरवतार असणाऱ्या फातिमा यांच्या मृत्यूनंतर मुस्लिमांमध्ये पांथिक युद्धाला तोंड फुटले. एका बाजूला शिया पंथीय होते. त्या पंथाची फातिमा बींनी स्थापना केली होती. भारतीय लोक भाषांत सीता या शब्दाचा उच्चार ‘सिया’ असा करतात. त्यांना शिया पंथीय म्हणतात. शिया स्त्रिया गोऱ्या, निरागस आणि सुंदर असतात असा समज आहे. त्यांच्या चेहऱ्यांवरचा मातृभाव हे दर्शवितो. त्याचप्रमाणे अशाच प्रकारे सीताजींच्या जन्मग्रामीच्या जनकपुरीच्या महिलासुद्धा महालक्ष्मीच्या आशीर्वादित आहेत.

सीता अवतारानंतर महालक्ष्मी चीनमध्ये कुआन-यिन (Kuan Yin) म्हणून जन्मल्या व त्याच देशात राहिल्या, कुमारी दयामाता या स्वरूपात. आदिशक्तींनी पहिला अवतार नेपाळमध्ये घेतला. अद्यापही त्या (नेपाळचे) राष्ट्रीय दैवत आहेत. नेपाळी बायका गौरवर्णीय असून त्यांची त्वचा मऊ असते व त्या फार शांत स्वभावाच्या आणि सुंदर असतात. त्यांच्या गालांची हाडे उंच असल्याने त्या सतत फार तरुण दिसतात. आदिशक्तीच्या

चेहऱ्यावरील भाव अगदी या लोकांसारखेच (त्यांच्यातच जन्मल्याप्रमाणे) असतात. थोडक्यात व योग्य सांगायचे म्हणजे त्या नेपाळी दिसतात.

आदिशक्तींचा चौथा अवतार येशू ख्रिस्तांच्या माता कुमारी मेरी या स्वरूपात ज्यू धर्मीयांच्या मध्य पूर्वेकडील देशात झाला. त्या जीवनात राधाजींप्रमाणे विवाहबद्ध झाल्या नाहीत व त्यांचे जीवन राधाजीं प्रमाणे नव्हते. राधाजींनी त्यांच्या एकमेव पुत्राला, महाविष्णूंना, वैकुंठ अवस्थेत विराटांच्या शरीरात निर्माण केले, पण पृथ्वीवर उघडपणे आणले नाही. मेरी यांनी आदिविष्णूंचा नववा अवतार येशू ख्रिस्तांना कुमारी अवस्थेत गर्भधारण केले.

या अवतरणाची महानता शब्दात पूर्णपणे वर्णन करता येत नाही. पण देवी भागवतात येशू ख्रिस्तांबद्दल एक परिच्छेद आहे. त्यात सांगितले आहे, कशाप्रकारे स्वर्गात महाविष्णु विराटांचा एकच पुत्र म्हणून राधाजींनी त्यांना जन्म दिला. ते दुसरे कोणी नसून चिरंतन बालकत्वाचे प्रतीक श्रीगणेश होते. त्यांचे शरीर श्रीगणेशांचे बंधु कार्तिकेय, जे ब्रह्म होते, त्यांच्या शरीरापासून बनवले होते. श्रीकृष्ण अर्थात् विराट, येशू ख्रिस्तांचे वडील होते आणि त्यांच्या १/१६ व्या अंशापासून ख्रिस्तांची गर्भधारणा झाली होती. महाविष्णु म्हणून ते सर्व जगाचे आश्रय आहेत. पित्याला आपला मुलगा आपल्यापेक्षा मोठा असावा असे नेहमीच वाटते. म्हणून श्रीकृष्णांनी महाविष्णूंना आशीर्वाद देऊन स्वत:पेक्षा एक दशलक्ष पट मोठे केले आणि स्वत:पेक्षाही अधिक उच्च स्थानावर त्यांची स्थापना करण्याचे वचन दिले. त्यांच्या देहात ब्रह्मा, विष्णु आणि महेश अमर्यादित असतील आणि विनाशाचा शेवटचा दिवस येईल तेव्हा त्यांच्या कपाळातून एकादश रुद्र तयार होतील.

'मेरी' स्वरूपातील राधाजींच्या अवतरणाला आपले स्वामी श्रीकृष्ण यांचे नाव आपल्या मुलाला द्यायचे होते. कृष्ण शब्द 'कृषी'+'ण' असा तयार होतो. 'कृषी' म्हणजे शेती, 'ण' म्हणजे ती करणारा. म्हणून ख्रिस्त हे नाव श्रीकृष्णांमधील कृषीपासून आले. जीजस हे नाव 'जसोदा' म्हणजेच

यशोदा, ज्यांनी श्रीकृष्णांना वाढवले, या शब्दापासून आले. याशिवाय यशोदाजींनी वृंदावन आणि गोकुळात त्यांची भक्ती व पूजा केल्याने राधाजींना आपल्या मुलाला यशोदाजींचे नाव द्यायचे होते. यशोदा शब्दाचा संक्षिप्त शब्द म्हणजे जेसू किंवा येसू. म्हणून राधा/मेरी यांनी आपल्या मुलाचे येशू ख्रिस्त हे नाव ठेवले.

येशू ख्रिस्तांच्या जीवनात आध्यात्मिक (आत्म्याच्या) निरागसतेचे सत्त्व देवपुत्र म्हणून पृथ्वीवर आले. परम पित्याचा (विराटांचा) अतिप्रिय व एकमेव पुत्र यांनी मानवासाठी केलेले बलिदान माणसांनी पाहिले. त्याच्यामुळे परमेश्वराला मानव वंशाबद्दल वाटणाऱ्या प्रेमाची माणसामध्ये खोलवर संवेदना उमटली. येशू ख्रिस्तांचे क्रुसावर जाणे अशा वेळी घटित झाले, जेव्हा माणसाला परम पिता परमेश्वराबद्दलचे ज्ञान होते, पण आत्मभाव (spiritual self) प्रकट होण्यासाठी मानवी भावाला (human self) कसे क्रुसावर चढवायचे याचे ज्ञान नव्हते. ख्रिस्तांच्या क्रुसावरील बलिदानाचा आणि पुनरुत्थानाचा खरा अर्थ असा होता, की आत्मा ज्याला कोणताही त्रास नाही व जो नष्ट होत नाही. त्याचे अमरत्व माणसाला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता यावे. श्रीकृष्णांनी आपल्या जीवनात ज्याचा उपदेश केला व जे व्यासांनी भगवद्गीतेत लिहिले आहे, ते आत्म्याचे अमरत्व सर्वप्रथम माणसाच्या जाणीवेत नोंदले गेले (त्याचा ठसा उमटला).

श्रीकृष्णांचे नाव घेण्यापूर्वी प्रथम 'राधा' नाव घ्यावे लागते. म्हणून साधक विराटांचा मंत्र 'राधा-कृष्ण' असा म्हणतात. त्याचप्रमाणे 'सीता-राम' हा मंत्र म्हणताना श्रीरामांच्या नावाआधी सीताजींचे नाव घेतले जाते. येशू ख्रिस्तांच्या काळात कुमारी मेरी (कन्या) शांत आणि सुप्त (शक्ती) होत्या. नंतर शिष्यांनी त्यांना ख्रिस्तांच्या पाठीशी असलेली मातृशक्ती म्हणून ओळखले. मेरी यांच्या मृत्यूनंतर, सुरुवातीच्या ख्रिश्चन लोकांनी त्यांची बरीच वर्षे पूजा केली. आधुनिक काळात सैतानी व्यक्तित्वाची माणसे

आदिमातेचे कौमार्य आणि विशेषत: कौमार्यातील जन्म यांच्या वास्तवाला आव्हान देतात. मेरी यांनी कौमार्याची शक्ती स्पष्टपणे दर्शवली आहे. ती शक्ती आईला इतक्या सर्वोच्च व शक्तिशाली स्थानावर उन्नत करते, की केवळ इच्छा करून त्या गर्भधारण करू शकतात. त्या उत्क्रांतीच्या उच्च पायरीवर गेल्या होत्या की फक्त त्यांच्या ईश्वरी इच्छेने कोणत्याही शारीरिक संबंधाशिवाय त्यांनी गर्भधारणा केली. हिंदू पुराणात असेच अनेक प्रसंग आहेत. कुंतीने मंत्राद्वारे इच्छेने पांडव आणि कर्ण यांना अयोनिज जन्म दिला होता.


राधाजींनी त्यांचा एकमेव मुलगा, महाविष्णु यांना वैकुंठ अवस्थेत (उत्क्रांतीच्या) निर्माण केला होता. परंतु अविवाहित असल्याने त्यांना गर्भधारणा करता येत नव्हती. पण मेरी म्हणून त्यांनी विवाह बाह्यस्थितीत संपूर्ण कौमार्यात मुलाची (महाविष्णु) गर्भधारणा केली. ही निष्पाप व शरीर संबंधाशिवाय गर्भधारणा कौमार्याच्या शक्तीची अभिव्यक्ती होती. मेरी यांच्या जीवनात चारित्र्य शुद्धतेच्या संबंधी सामाजिक जाणिवेत (Social Consciousness) सर्वात मोठी प्रगती झाली. समाज आणखी एका उत्क्रांतीमधून गेला. त्या कुमारी होत्या, परंतु ख्रिस्तांच्या जन्मामुळे त्यांचे (जनमानसातले) स्थान इतके उंचावले की देवमाता म्हणून त्या जन सामान्यांना, त्यावेळी मान्य होत्याच पण आजसुद्धा आहेत.

शरीरसंबंधाविना गर्भधारणेचा साधेपणा सहजयोगाच्या सखोल ज्ञानाने वाचकांच्या लक्षात येईल. स्वत:च्या पवित्र हृदयात (Sacred Heart) मुलाला (ख्रिस्तांना) धारण करून मेरी यांनी त्या आदिमाता असल्याचे सिद्ध केले. पवित्र हृदय हे ते स्थान आहे, जिथे श्रीजगदंबा यांचे अस्तित्व असते. ज्या पद्धतीने त्यांनी विश्वाची धारणा केली त्याच पद्धतीने त्यांनी येशू ख्रिस्तांना धारण केले आणि आदि सुषुम्ना नाडीतून नेऊन आदि स्वाधिष्ठान चक्रात बालक म्हणून मानवी जन्म देण्यासाठी आणले. आदि स्वाधिष्ठान चक्र आदि गर्भाशयाचे (कुंभ) नियंत्रण करते. त्या सृजनशीलतेच्या

परमेश्वरी स्वर्गात शरीर संबंधाशिवाय धारण झालेल्या गर्भाने अंड्याचे (Zygote Egg) रूप घेतले. त्या अवस्थेत ते अनेक कल्पे, मेरी स्वरूपात आदिशक्तीने जन्म घेईपर्यंत होते. त्यांनी (मेरी यांनी) येशू ख्रिस्त म्हणून त्याला प्रकट केले. आदिशक्तींना ते अवघड नव्हते. दुर्दैवाने त्यांनी पृथ्वी सोडल्यावर त्यांच्या शक्तींची महानता ओळखली गेली.

सहजयोगाच्या माध्यमातून साधकाला अगदी तशाच पद्धतीने पुनर्जन्म प्राप्त होतो. आदिशक्तींना सर्व साधकांना दुसरा जन्म द्यायचा असतो. साधकाच्या सूक्ष्म शरीराला त्या आपल्या हृदयात धारण करतात. त्यांचे चित्त साधकाच्या सूक्ष्म शरीरातील कुंडलिनीचे उत्थान करते. आदिशक्तींच्या हृदयात आलेल्या (उत्थापनेनंतर) साधकाच्या जीवात्म्याला आदिशक्ती आशीर्वाद देतात आणि आपल्या चित्ताने जीवाला आपल्या मेंदूतील लिंबिक एरीया (सहस्रार) मध्ये आणतात. त्याठिकाणी, जीवाला टाळूमधल्या छिद्रातून ब्रह्मरंध्रातून जन्म मिळेपर्यंत आपल्या मेंदूच्या सर्व चक्रांमधून फिरवतात. अशाप्रकारे प्रत्येक जीवाला सहजयोगी म्हणून पुनर्जन्म मिळतो.

created on the Primordial brain (Sahasrara)
The last incarnation is that of Kalki. This is a
collective being who will be created in the
Kaliyuga through Sahaja Yoga by the incarnation
of Adishakti as Mahamaya (The great illusion)
The day this incarnation was born the awakening
started. People who were affluent started running
away from materialism. They gave up all world
ideas of luxury comfort and styles. They took to
simpler life and started moving in the east
in search of Reality.


This incarnation will create the incarnation
Of Kalki. Those who will get self realization will
be the white robed horsemen who would enter the
realm of God and the rest would be destroyed.
Thus a new world of living collective awareness will be born. The golden age of Satyuga

*प.पू. श्रीमाताजींचे हस्तलिखित*

आदि मस्तिष्कवर (सहस्रार) निर्माण केला गेलेला शेवटचा अवतार आहे कल्कीचा. या सामूहिक शरीराला, कलियुगात, आदिशक्तींचा महामाया स्वरूपातील अवतार सहजयोगाने निर्माण करेल. ज्या दिवशी या अवताराने जन्म घेतला त्याच दिवशी जागृतीला सुरुवात झाली. श्रीमंत लोक भौतिकतेपासून दूर जाऊ लागले. ऐषोआराम आणि स्टाईल या सर्व जुन्या कल्पनांचा त्यांनी त्याग केला आणि अगदी साध्या जीवनक्रमाचे आचरण करीत पृथ्वीवर येऊन सत्याचा शोध सुरू केला.

हाच अवतार कल्कीच्या अवताराला निर्माण करणारा आहे. ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळेल ते शुभ्र कपडे परिधान केलेले घोडेस्वार (घोडे म्हणजे मन) असतील व तेच परमेश्वरी राज्यात प्रवेश करतील. इतर सर्व नष्ट होतील.

अशा प्रकारे जिवंत सामूहिक जाणिवेचे नवीन जग जन्मास येईल जे सत्ययुगाचे सुवर्णयुग असेल. या युगात परमेश्वरी राज्य पृथ्वीवर प्रस्थापित व्हायचे आहे. आदिशक्तींच्या करुणामय कार्याने या जगात, हे सामूहिक शरीर (कल्कीचे) पूर्वीपासूनच तयार होऊ लागले आहे. परमेश्वरी चेतनेत सामूहिकतेत विलीन होत असलेल्या साक्षात्कारी जीवांकडून हे सामूहिक शरीर घटित होत आहे. कल्कीच्या शक्तीला महामाया म्हणतात. त्या परम परिपूर्ण मानवी आहेत, पण त्या महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली यांच्या तीन एकात्म शक्ती अभिव्यक्त करतात.

अगणित लोकांना आत्मसाक्षात्कार देऊन त्या आपल्या शक्ती दर्शवतील आणि त्यामुळे साधक सामूहिक चेतनेत प्रवेश करतील. या घटनेला आध्यात्मिक विकासाच्या इतिहासातील सर्वात महत्त्वपूर्ण घटना म्हणता येईल, कारण यामध्ये समस्त सृष्टी, परमेश्वरी प्रेमाच्या मार्गदर्शनात आपल्या उगमाकडे (सोर्स) जे परमेश्वरी प्रेम आहे, तिथे परतण्यास सुरुवात करेल. ज्यादिवशी आदिशक्तीच्या अवताराने मानवरूप धारण केले, त्यादिवशी कल्कीच्या जागृतीचा आरंभ झाला. जीवांच्या स्वरूपात फार मोठ्या प्रमाणावर लोक सत्याच्या शोधार्थ पृथ्वीवर आले. जे श्रीमंत होते ते भौतिकतेचा त्याग करू लागले. पुष्कळांनी ऐषोआरामाच्या जुन्या कल्पना सोडल्या आणि साधी जीवनशैली अंगकारली. या युगात आत्मसाक्षात्कार मिळालेले लोक शुभ्र वस्त्रधारी घोडेस्वार असतील (त्यांची मने म्हणजे घोडे) ते अनेक धर्मग्रंथात  वचन दिल्याप्रमाणे परमेश्वरी राज्यात प्रवेश करतील. इतरांचा संहार होईल. अशा प्रकारे जिवंत सामूहिक चेतनेचे नवीन जग जन्माला येईल.

श्रीविष्णु विकासाच्या प्रक्रियेचे नेते म्हणून वेगवेगळ्या टप्प्यांवर हे अवतार घेतात. त्यांची शक्ती महालक्ष्मी त्यांच्या बरोबरच अवतरित होऊन, विविध उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये आपले अवतार उत्क्रांत करतात. मानवाच्या टप्प्यापर्यंत, उत्क्रांत होणाऱ्यांना त्याची जाणीव होत नव्हती. कल्कीच्या शेवटच्या आणि अंतिम टप्प्यावरच फक्त, जेव्हा आदिशक्ती अवतार घेतात, तेव्हा माणसे सामूहिक चेतनेच्या उच्च जाणिवेत जातील. हे त्यांच्या जीवन काळातच होऊन त्यांना त्यांच्या 'नवीन जन्माची' पूर्ण जाणीव असेल.

## प्रकरण ३

# उत्क्रांती

उत्क्रांती हे परमेश्वरी कार्य असून ती प्रथम वैकुंठ स्थितीच्या टप्प्यावर प्रकट झाली आणि नंतर पृथ्वीवर दिसून आली. महाकाली आणि महासरस्वती शक्ती आपल्या शक्तीच्या लाटा विराटांच्या मेंदूवर सोडतात. त्या लाटा वर खाली अशा रचनेत (Pattern) हालतात आणि सात स्थानांवर एक दुसऱ्यांना छेदतात. ही सात स्थाने, सात आदिचक्रे आहेत. आदि नाभी चक्रावर आणखी एक महालक्ष्मी शक्तीची लाट तयार होते. महालक्ष्मी शक्ती सर्व जड वस्तूंना आणि जीवितांना धर्म देतात. गुणधर्म आणि गुणांक (Valencies) यांनासुद्धा त्यांची शक्ती धारण करते. श्री आदिविष्णु आदि नाभी चक्रावर राहतात आणि आपली धारणा शक्ती प्रक्षेपित करतात. त्या शक्तीमुळे उजव्या बाजूस सूर्य (आदिपिंगला नाडी) आणि डाव्या बाजूस चंद्र (आदि इडा नाडी) आणि शेवटी पृथ्वी यांची धारणा होते (त्यांना शक्ती मिळते). आदि ब्रह्मदेव, सूर्य, चंद्र आणि पृथ्वी यांना निर्माण करतात, पण त्यांचे गुणधर्म त्यांना आदिविष्णु स्वतः प्रदान करतात.


धर्म त्यांना त्यांचे कार्यक्षेत्र देतो. त्यांच्यामधून जाणीव कार्यान्वित होते आणि वेगवेगळ्या रचनेच्या जड आणि जिवंत गोष्टींना निर्माण करते. या रचना ठराविक काळात बदलून पुन्हा तयार होणाऱ्या (Periodic) असतात. जडात त्यांची सात आवर्तनातून पुनरावृत्ती होते तर जिवितांत नऊ आवर्तनातून होते. जड पदार्थांचे श्रीगणेशांच्या चार बाजूंपर्यंत किंवा त्यांच्या चार हातांपर्यंत प्रकटीकरण होते.

### पदार्थमात्राची (मॅटर) निर्मिती

आदिविष्णूंच्या धारणाशक्तीमुळे जडाची अनेक मूळपदार्थात (एलिमेंट्स)

विभागणी होते. त्यांची निर्मिती आदि विष्णु, ठराविक काळ बदलून पुन्हा तयार होणाऱ्या रचनांमध्ये (Periodic Pattern) करतात. (आकृती ४) जीवनाच्या निर्माण प्रक्रियेसाठी श्रीगणेश कार्बनला स्थिर करतात. त्यांचे चार हात कार्बनप्रमाणे स्थिर मूळपदार्थांचे चार गुणांक (Valencies) आहेत. कार्बन जैविक मूळपदार्थांचा आधार आहे आणि ज्याच्यात संतुलन संपृक्त (पूर्ण भरलेले) आहे असा मूळपदार्थ आहे. इतर मूलपदार्थ जी अजैविक उत्क्रांतीच्या शेवटी येतात, त्यांच्यात गुणांक १, २, ३ अधिक किंवा कमी आहेत.

आता महालक्ष्मी शक्तीच्या आधीन कार्बनचा, सूर्य आणि चंद्र यांच्या




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती ४**

किरणांशी संयोग होऊन ऑक्सिजन आणि हायड्रोजन प्रवाहित होतात. सूर्याची शक्ती आणि चंद्राची शक्ती एक होऊन पाणी तयार होते आणि त्यात जीवन स्फुरण पावते. हे आदि नाभी चक्रावर होते. आदिशक्तींनी जलतत्त्वावर श्वास सोडल्यावर पहिले स्फुरण होते.

It is now an accepted fact by many biologist that evolution of man from the matter stage can not be by chance. ~~If~~ ~~It~~ They applied the law of chance to find out how much time it would take for man to be created out of matter, ~~and~~ the minimum ~~tl~~ time that they calculated would not even create an amoeba an unicellular animal during this short time. So they feel that there is a juggler who has done this miracle

*प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित*

अनेक जीवशास्त्रज्ञांनी ही वस्तुस्थिती आता मान्य केली आहे, की जडापासून आलेली मानवाची उत्क्रांती योगायोगाने झाली नाही. जडापासून मानवाची उत्क्रांती होण्यास किती काळ लागला असेल ते शोधण्यास शास्त्रज्ञांनी लॉ ऑफ चान्स (सहज घटनेचा नियम) चा उपयोग केला. त्यांनी हिशेब केला, की निर्मितीच्या थोड्या काळात एकपेशीय अमीबासुद्धा तयार झाला नसता. त्यांनाही असे वाटते, की एखाद्या जादुगाराने हा चमत्कार केला असावा.

ज्यावेळी आमची पिढी लहान वयाची होती त्यावेळी आपल्या जीवनकाळात माणूस चंद्रावर उतरेल हे कल्पनेच्या पलिकडे होते. आता आपल्याला दिसत आहे, की हे अशक्य पाऊल माणसाने टाकले आहे आणि त्यासाठी विस्फोटकाच्या ऊर्जेच्या विज्ञानावर प्रभुत्व मिळवून त्याचा उपयोग

केला आहे. त्याचप्रमाणे जी पद्धत अवकाशात भ्रमण करण्यासाठी वापरली त्याच पद्धतीने माणसाची उत्क्रांती जलद घडविली गेली

अवकाश यान चार ते पाच डब्बे (कंटेनर्स) एकमेकांना जोडून तयार केले जाते. प्रत्येकात विस्फोटक भरले असून उड्डाणाच्या विविध टप्प्यांवर त्यांचा स्फोट होण्याच्या वेळा निश्चित केल्या जातात. अवकाशयान अगदी सर्वसाधारण वेगात सुरू होते (उडू लागते). त्याला 'X' म्हणूयात आणि एका उंचीवर गेल्यावर पहिल्या कंटेनरचा स्फोट होतो. त्या स्फोटाबरोबर यान फारच जास्त वेगात फेकले जाते. त्याला आपण $X^n$ म्हणूयात. अशाप्रकारे वेग वाढत वाढत राहतो. चौथ्या, कंटेनरचा स्फोट होईपर्यंत वेग $X^{4n}$ इतका होतो. मग अवकाश यान अवकाशात झेप घेते. इतके लांबचे अंतर जाण्यास यानाने घेतलेला वेळ सुपर सॉनिक विमानाने घेतलेल्या वेगापेक्षा फारच कमी आहे. बरोबर तशाच प्रकारे उत्क्रांतीचा वेग वाढविण्यास स्फोटकांची कार्यप्रणाली जबाबदार आहे.

प्रारंभी, जीवनाचा स्फोट झाल्यावर पहिला कंटेनर होता शारीरिक जाणीवेचा (शरीर भावाचा). त्याचा स्फोट झाला आणि त्याने वनस्पती जगात आणि एकपेशीय व बहुपेशीय प्राण्यात शारीरिक जाणीव किंवा देहभाव (Physical Self) अभिव्यक्त केला. नंतर बौद्धिक जाणीव निर्माण करण्यास दुसऱ्या कंटेनरचा स्फोट झाला. त्याद्वारे पुढारलेल्या (अधिक विकसित) प्राण्यांना बुद्धीची देणगी देण्यात आली. ज्या प्राण्यांची शरीरे प्रचंड मोठी झाली त्यांना अधिक बुद्धिमत्तेच्या लहान प्राण्यांनी मागे टाकले. तिसऱ्या स्फोटाबरोबर भावनिक जाणीव (Emotional Self) प्रस्थापित झाली. या गटामध्ये (वर्गात) कुत्री, माकडे, गायी, घोडे, डॉल्फिन्स असे प्राणी होते. मानवी जाणीव प्रस्थापित झाली तेव्हा चौथा व अंतिम स्फोट झाला. मानवामध्ये शारीरिक जाणीव, बौद्धिक जाणीव, भावनिक जाणीव आणि मानवी जाणीव हे असतात. मानवाने वर्तमान अवस्थेत येण्यासाठी जे

अनुभव घेतलेले असतात त्या सर्वांची त्याच्या देहात (अंतर्यामी) नोंद झालेली असते. जे अद्याप मानवी चेतनेत उतरले नाही त्या अचेतनाकडून (Unconscious) उत्क्रांती संचालित केली जाते.

सर्व प्राणी, जे पवित्र आहेत, ते सुषुम्ना नाडीच्या मध्यमार्गावर आहेत. शारीरिक (जाणीवेच्या) स्फोटाने बलवान शरीराचे प्राणी निर्माण केले. शारीरिक बलवानतेच्या अतिरेकी टोकाला महाकाय प्राणी होते. ते उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून गाळले गेले. जे मागे राहिले त्यांच्यापैकी खालील प्राण्यांची ईश्वरीय वाहने म्हणून निवड झाली -

* हत्ती पृथ्वीवर शिल्लक राहिला कारण तो इतरांपेक्षा उत्क्रांतीच्या मध्यमार्गाच्या अधिक जवळ होता. हा भारदस्त प्राणी असून लक्ष्मीचे वाहन म्हणून पवित्र आहे.
* माशांमध्येही काही मासे आकाराने फार मोठे वाढले आणि उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर गेले. तर लहान व अधिक बुद्धिमान मासे टिकले. त्यांच्यापैकी डॉल्फिन, मानवी स्वभावाचा आणि पवित्र असा डॉल्फिन मध्यमार्गाच्या सर्वात जास्त जवळ होता.
* बलवान शरीरयष्टीच्या प्राण्यांमध्ये वाघ आणि सिंहांना उत्क्रांतीच्या प्रक्रियेत ठेवले गेले. ते बुद्धिमान आणि भारदस्त (Majestic) आहेत म्हणून पवित्र आहेत आणि आदिशक्तीचे ते वाहन आहेत.
* लहान व बुद्धिमान प्राण्यांमध्ये मध्यमार्गाच्या जवळ राहण्यासाठी उंदराची निवड झाली. ते श्री गणेशांचे वाहन आहे.
* पक्ष्यांमध्ये गरुड सर्वात अधिक विकसित आणि त्याच्या प्रजातीमध्ये सर्वोच्च प्रकटीकरण म्हणून मान्यता पावला. तो श्रीविष्णूंचे वाहन आहे.
* सरपटणाऱ्या प्राण्यात साप सर्वाधिक उत्क्रांत होता. कारण शेष हा

भवसागरात श्रीविष्णूंचे आसन होता.

* प्राण्यांमध्ये कोल्हे टोकाचे बुद्धिमान व धूर्त होते. ते कोल्हासूरासारखे राक्षस झाले. अशा प्रकारचे राक्षस कलियुगात फार मोठ्या संख्येने आहेत. त्यांनी स्वत:ला गुरु म्हणवत जन्म घेतला आहे आणि त्यांच्या फसवेपणाने ते पापाला पुण्यकर्माप्रमाणे भासवतात.
* घोडे आणि कुत्रे यांच्यासारख्या भावना असणाऱ्या प्राण्यांपैकी पुष्कळजण माणसांच्या संपर्कात आले. त्या प्राण्यांना शारीरिक जाणीव आणि भावनिक जाणीव यांच्या समग्रतेने निर्माण केले गेले.
* भारतामध्ये गायीची पूजा केली जाते कारण आदिशक्तीने सुरभी नामक गायीच्या रूपात एक महत्त्वाचा जन्म घेतला. याशिवाय प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी गाय एक आई असते. ती मुलांना दूध देते म्हणून भारतीयाला त्याच्या आईसमान असलेल्या गायीला खाणे फार कठीण जाते. गाय ही भावनिक जाणीवेची सर्वोच्च स्थिती आहे.
* इडा नाडीवरील एकमेव प्राणी आहे नंदी.
* म्हैस हा अतिरेकी भावनांचा प्राणी आहे. मृत्यूचे देव यम वाहन रूपात रेड्याचा उपयोग करतात. रेडा अत्यंत क्रूर प्राणी असल्याने तो उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर, महिषासुरासारखे बनण्यासाठी फेकला गेला.
* माकडे समग्र प्राणी म्हणून उत्क्रांत झाली. माकडाने आपले डोके वर उचलले आणि ते उभे राहिले (दोन पायांवर). त्याच्यामुळे प्राण्यांच्या उत्क्रांतीमध्ये एक नवीन क्षेत्र निर्माण झाले. अनुपस्थित दुवा (प्राणी आणि मानव यांच्यातील), अर्धा वानर आणि अर्धा

माणूस पृथ्वीवर अस्तित्वात होता. उत्क्रांत होऊन ते हनुमान आणि भैरवांप्रमाणे देवदूत झाले.

देव सर्व पंचमहाभूतांचे रक्षण करतात. अनेक महान संत देव बनले होते. त्यांचे व्यक्तित्व असे असते, की ते उत्क्रांतीच्या संसार पातळीत (मानवी अस्तित्वात) प्रवेश करीत नाहीत. ते भवसागर स्तरावरच राहतात. त्यांच्या पैकी फक्त नारदच सृष्टीच्या प्रत्येक स्तरावर फिरतात. देव माणसाचा जन्म घेत नाहीत, पण ते चेतनाबाह्य मनात राहतात. त्याची पुढे उत्क्रांती होत नाही.

आत्तापर्यंत जो विकास झाला तो उत्क्रांत झालेल्याना त्याची माहिती असल्याशिवाय झाला. माकडाच्या अवस्थेनंतर मानवाची निर्मिती झाली. अनेक जन्म घेऊन आणि अनेक शोध घेण्याकरिता फिरून मानव जीवनाचे ज्ञान मिळवितो. माणूस प्राण्यांपेक्षा फार वेगळा आहे, पण तो राक्षसी वा पाशवी होऊ शकतो. जे त्यांच्या उत्क्रांतीवर अवलंबून असते.

**मानव - शारीरिक अस्तित्व (जाणीव)**

- मनुष्यात स्वामित्वाची भावना आहे.
- मनुष्याला सौंदर्याची जाणीव आहे.
- मनुष्याला जड भौतिक पदार्थांचे आपल्या उपयोगी वस्तूत परिवर्तन करून वापरण्याची बुद्धि आहे. पुढे तो जड भौतिकाचा गुलाम होतो.
- माणसात विवाह बुद्धी आहे. उत्क्रांतीनंतर तो बहु-पति अथवा बहु-पत्नी प्रकारचा असणार नाही. या प्रवृत्ती फक्त राक्षसी व्यक्तित्वांमध्येच असतात.

Man lives with Myths like name, nationality or race
~~Man uses matter~~ !
Man takes medicines drugs and sedatives.
Man does not know how to swim or fly from his birth.
~~Man can hear at a particular frequency~~ but Man cannot
feel ~~or~~ smell or see the dead spirits as some animals can.
Man cannot recognize an incarnation but some animals
can. Man has to build homes to protect himself, ~~As his material~~
~~wants are increase he becomes physically~~ finer
Man cooks his food and has a sense of cleanliness ~~and~~
~~of good and bad smell~~.
Man thinks of the future and past. He plans and organises.
Man has very poor instincts and intentions compared to
animals. ~~Man is~~ Man has a family and sense of chastity. He has
~~brothers sisters mothers and~~ great ideas about relations
like sister, mother, teacher,
Man believes in God for he feels him as spirits and
rationally he understands the existence of the unconscious.
The greatest thing is man is rational and could
be wise.

*प. पू. श्रीमाताजींचे हस्तलिखित*

* मनुष्य नाव, राष्ट्रीयत्व आणि वंश आदि मिथकांना धरून राहतो.
* मनुष्य औषधे, नशा आणणारे पदार्थ आणि शामकांचा (sedatives) उपयोग करतो.
* मनुष्याला जन्मत: पोहणे अथवा हवेत उडणे यांचे ज्ञान नसते.
* काही प्राण्यांप्रमाणे मनुष्याला मृतात्म्यांना पाहणे, जाणवणे किंवा त्यांचा  वास घेणे शक्य नसते.
* मनुष्याला स्वत:च्या संरक्षणासाठी घर बांधावे लागते.

* मनुष्य आपले अन्न शिजवतो तसेच त्याला स्वच्छतेची जाणीव असते.
* मनुष्य भूत आणि भविष्यकाळाविषयी विचार करतो. तो योजना आखतो आणि त्याचे आयोजन करतो.
* मनुष्याची निसर्गाच्या संकेताप्रमाणे राहण्याची क्षमता आणि हेतू प्राण्यांच्या तुलनेत कमकुवत असतात. अंतर्मनातून आलेले पूर्वसंकेत त्याला मार्गदर्शन करतात.
* माणसाला कुटुंब असते आणि शुद्ध चारित्र्यांची बुद्धी असते. त्याला आई, बहिण, भाऊ, गुरु अशी पवित्र नाती असतात.
* माणसाची परमेश्वरावर श्रद्धा असते कारण तो परमेश्वर आत्मा म्हणून असल्याचे त्याला जाणवते आणि तर्कबुद्धीने अचेतनाचे (जे मानवी चेतनेत उतरले नाही) अस्तित्व समजते.
* माणसाचा सर्वात मोठा गुण हा आहे, की तो तर्काने समजू शकतो आणि त्याच्यामध्ये सूप्त अवस्थेत सूज्ञता असते.
* मनुष्य हा एकमेव प्राणी आहे ज्याला पूजनीयता समजण्याची बुद्धी आहे.
* मनुष्यामध्ये भक्ती (श्रद्धा) आहे.
* माणसाला अचेतनाकडून येणारे संदेश तो बुद्धीने समजतो तर प्राणी नैसर्गिक प्रवृत्ती म्हणून अचेतनाचे मार्गदर्शन घेतात.
* माणूस त्याला मिळालेले सर्व अनुभव ज्ञान म्हणून नोंदवतो (बुद्धीत).
* माणूस भावनिक जीव असल्याने त्याला कौटुंबिक भावना असतात कारण तो एक नाजुक आणि गुंतागुंतीचे उपकरण आहे.
* केवळ मनुष्यप्राणीच अमूर्त कल्पना (abstract ideas) निर्माण

आणि विकसित करू शकतो आणि त्यांच्याशी भावनिकरित्या आसक्त असतो.

मानवी मेंदूचा आकार शिखराच्या बाजूस निमुळता होत जाणाऱ्या शंकुसारखा असल्याने, तो सहजयोगात वर्णिल्याप्रमाणे अहंकार आणि प्रतिअहंकार निर्माण करतो. आत्मा फक्त माणसांतच अभिव्यक्त होतो. प्राण्यात कुंडलिनी शक्ती सुप्तावस्थेत असते. फक्त माणसाच्या अवस्थेत तिला जागृत करता येते. फक्त माणसामध्येच सर्व देवता पूर्ण वेगळ्या असतात आणि प्रणव वेगवेगळ्या २१,००० शक्त्यांमध्ये विभागलेला असतो.

## प्रकरण ४

# मानवाचा शोध

माणूस तीन क्षेत्रांमध्ये, आयामात (dimension) शोध घेत आला आहे; शारीरिक देह, मानसिक देह आणि भावनिक देह. माणसाचा सर्वात प्रथम आणि मुख्य प्रश्न होता त्याच्या शारीरिक अस्तित्वाचा. क्रूर नैसर्गिक शक्तींनी त्याला पूर्वीपासून ते आजपर्यंत स्वत:चे अस्तित्व कसे टिकवायचे याबद्दल चिंताग्रस्त ठेवलेले आहे. काही काळानंतर स्वत:च्या जीवनाचे रक्षण करण्याचे माणसाचे सर्व प्रयत्नच त्याच्या अस्तित्वाचे महाभयंकर शत्रू झाले आहेत. उदा.मानवाने अणूबाँब आणि हायड्रोजन बाँब तयार केले आणि आता ते विनाशक राक्षस ठरले आहेत. मानववंशाला विनाशाच्या भीतीपासून मुक्त ठेवण्यास त्याने राजे, प्रांत, सरकार अशाप्रकारच्या मानवी संस्था निर्माण केल्या. परंतु त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरलेले आहेत. अमानवी ताकदींची माणसाला वाटणारी भीती समजू शकते. पण आज त्याला बरोबरीच्या माणसांकडूनच संहार होण्याची भीती भेडसावत आहे. मानवी जीवनाची सुरक्षा प्रस्थापित करण्याच्या सर्व प्रयत्नांनी विस्फोटकासारखी मोठी असुरक्षा निर्माण केली आहे.

शारीरिक सुखाच्या गरजांनी माणसाला दुसऱ्या टोकावर ढकलले आहे. त्या ठिकाणी तो हे शिकला की कितीही शारीरिक सुख मिळाले तरी त्यातून आनंद निष्पन्न होत नाही. याउलट मानवी जीवन असह्य तणाव आणि नैराश्य यांनी भरले जाते. तथाकथित श्रीमंत देशात सर्वाधिक संख्येत निराश, आजारी आणि अधीर लोक आहेत. याचा अर्थ असा नाही, की कमी श्रीमंतांना हे धोके नाहीत. ज्यांच्या समोर शरीर सुखाचे मोह अद्याप आले नाहीत किंवा जे कोणत्यातरी नियंत्रणाच्या भीतीखाली दबलेले आहेत त्यांनाही या प्रश्नाला तोंड द्यावे लागणार आहे. ती नियंत्रणे निघाल्यावर

सर्वांना हे प्रश्न भेडसावणार आहेत.

अर्थशास्त्राचे प्रमेय एका तत्त्वावर आधारित आहे. ते म्हणजे 'सर्वसाधारणपणे माणसाच्या गरजांचे समाधान होऊ शकत नाही.' एखादी व्यक्ती तिच्या समाधानासाठी व ते टिकविण्यासाठी घर घेण्यासाठी तळमळत असते. ती स्वत:चे घर पुष्कळ अपेक्षा ठेवून बांधते. घराचा ताबा घेतल्यावर त्याला आढळते, की सुरक्षितपणा प्रस्थापित झाला नाही. तसेच डोक्यावर छप्पर मिळविण्याच्या प्रयत्नातून त्याला काहीच आनंद किंवा शांती मिळत नाही. मग त्याला मोटार, ऐषोआरामाच्या वस्तू घ्यायची इच्छा होते किंवा त्याला हॉलिडेला जावेसे वाटते किंवा बोटीने अथवा विमानाने जावेसे वाटते. पण नशीबाने जे मिळाले आहे त्यात समाधानी असलेला अथवा सतत सुखी असलेला एकही माणूस आपल्याला सापडत नाही. नवीन नवीन आणि मोठमोठ्या वस्तू बाळगण्याची इच्छा सतत असते.

याशिवाय अजून एका क्षेत्रात माणूस त्याच्या शारीरिक देहाच्या माध्यमातून शोध घेत असतो. ते म्हणजे सृष्टीच्या जडात्मक, शारीरिक जाणीवेतून अभिव्यक्त होणारे सौंदर्य, माणूस स्वत:च्या अंतरंगात अनुभवलेल्या कलात्मक सौंदर्याच्या (aesthetics) आनंदाची अभिव्यक्ती आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून करीत असतो. पण अशा प्रकारच्या अभिव्यक्ती निर्माणकर्त्याला, त्याच्यात कलात्मक सौंदर्य घालणाऱ्याला, समाधानी करीत नाहीत. तरीसुद्धा आपल्याला असे म्हणता येईल असा माणूस जड वस्तू मिळवून त्यांचा संचय करण्यापेक्षा जडातून कलाकृतीच्या निर्मितीतून आपल्या स्वभावाची अभिव्यक्ती करतो. ते करताना मिळणारा आनंद घेत तो सूक्ष्म होतो (त्याच्यात सूक्ष्म स्तरावरील आनंद घेण्याची क्षमता येते). एका बाजूस माणसाच्या सुखोपभोगासाठी आणि ऐषोआरामासाठी जडाच्या स्वरूपात बदल केला तरी त्याच्यापासून आत्मिक आनंद आणि शांती यांनी परिपूर्ण जीवन मिळत नाही. तर दुसऱ्या बाजूस

माणूस शेवटी जड वस्तूंच्या बंधनात अडकून त्यांच्या उपभोगाची सवय वाढवित जातो.

आता त्याच्यासाठी पुढची पायरी म्हणजे सर्व सवयी सोडून त्याला तपस्वी होण्याची इच्छा होते. तो जगाला जाहीर करतो, की तो सर्व जड-भौतिक कमाईचा आणि संचयाचा त्याग करीत आहे आणि तो माणूस गुलाम बनविणाऱ्या भौतिकाच्या मोहापासून दूर जंगलात, आपले स्वातंत्र्य शोधण्यासाठी जातो. पण अशाप्रकारचे पलायन त्याला स्वतःच्या मुक्तीकडे नेऊ शकत नाही. कारण ज्या भौतिकतेच्या बंधनांपासून त्याला दूर जायचे असते ती सर्व तो स्वतःच्या अंतर्यामी घेऊन जात असतो.

ही कल्पना, की माणूस जड-भौतिक आपल्या ताब्यात ठेवू शकतो, एक मिथ्या आहे. घर, मोटार, बोट, विमान अशा त्याच्या जड गोष्टींची नोंदणी करणाऱ्या संघटनेमध्ये नोंदणी करेल. परंतु ती कार्यालये मृत्यूच्या वेळी त्या गोष्टींचे हक्क त्याला प्रदान करू शकत नाहीत. तसेच त्याच्या तथाकथित ताब्यातील गोष्टी, ज्या त्याच्या मालकीच्या आहेत असा त्याचा विश्वास आहे, त्या मृत्यूच्यावेळी स्वतः बरोबर नेऊ शकत नाही. आपल्या सगळ्यांना हे वास्तव माहिती आहे आणि मान्य आहे, तरीसुद्धा 'त्या गोष्टी आपल्या ताब्यात आहेत' या मिथकाशी आपले तादात्म्य होते आणि 'त्या आपल्या ताब्यात नाहीत' या सत्याशी होत नाही. तसेच आपल्या जवळच्या भौतिक गोष्टींचा त्याग करताना 'त्या गोष्टी आपल्या ताब्यात आहेत' हे मिथक वास्तव आहे असे आपण मानतो. म्हणून, मालकी हक्क सोडल्याचा आपला दावा (claim) निरर्थक असतो. या मूर्खपणाच्या समजुतीला बँका, विमा कंपन्या, स्टॉक एक्स्चेंज अशा संस्था विश्वासार्हता देतात. त्या संस्था स्वतःच मानवनिर्मित मिथ्या आहेत आणि त्यांची निर्मिती 'आपण ताब्यात ठेवीत नाही आणि ठेवू शकत नाही' हे सत्य झुगारून केलेली असते. त्याग करण्याच्या खोट्या कल्पना घेऊन जे लोक राहतात ते स्वतःला

आपल्यासारख्या इतरेजनांपेक्षा श्रेष्ठ समजतात, परंतु असे लोक विचित्र असतात. मनोरुग्णालयात राहणारे मनोरुग्ण, जेव्हा स्वत:ला आपण जगातले एकमेव शहाणे आहोत असे समजतात, तेव्हा असेच वागतात.

निसर्गातील सूज्ञपणा पहा. वृक्ष आपल्या जवळ काय ठेवतो? पृथ्वी आपल्याजवळ काय ठेवते? ते मिथके घेऊन राहत नाहीत कारण ते सत्याशी एकरूप आहेत. याच्या उलट माणसे माया घेऊन राहतात (मायेत गुरफटलेली असतात). हे मायावी मृगजळ याच्यासाठी बनवलेले असते की ते भरकटत जातील आणि स्वत:ला आणि शरीराला असे विकसित करतील, की त्यांनी परमचे ज्ञान (absolute knowledge) प्राप्त करून प्रसारित करावे.

माणसाचा शोध बौद्धिक स्तरावर असून तो भौतिक गरजांपासून निघून सत्तेच्या क्षेत्राकडे जातो. राजकीय संस्था माणसाच्या सत्तेच्या शोधाचा परिणाम स्वरूप निर्माण केल्या गेल्या आहेत. त्यांची सुरूवात झाली, माणसांना धमकावणाऱ्या बाहेरच्या शक्तींवर मात करण्यासाठी पण त्या संस्थांच्या निर्मात्यांना याचे आश्चर्य वाटते, की त्या संस्थाच प्रत्येक ठिकाणी माणसाचे स्वातंत्र्य धोक्यात आणतात. प्रथम माणूस सत्तेसमोर झुकतो आणि आज्ञा पालन करतो. पण स्वत: सत्तेची वस्त्रे धारण केल्यावर बाकीच्यांनी त्याच्यासमोर झुकावे आणि त्याची आज्ञा पाळावी अशी त्यांची इच्छा असते. सत्तेच्या तृष्णेत माणूस आपल्या बरोबरच्या माणसांवर आपली हुकूमत चालवू पाहतो. त्याला वाटते, की इतरांवर हुकूमत चालवून ज्याच्या शोधात तो आहे तो आनंद त्याला मिळेल. सत्तेच्या शोधातून ज्या संस्था उत्पन्न झाल्या आहेत त्यांना हे समजत नाही, ते अहंकारी राक्षस झाले असून मानवी व्यवस्थापनाच्या अडचणींवर अतिरेकी उपाय सांगत आहेत.

नि:संशय या संस्थांमुळे असे वातावरण तयार झाले आहे, की जे भौतिक आणि बौद्धिक सत्ता माणसाची काय अवस्था करू शकतात, ते

शिकण्याची मुभा देते. राजकीय सिद्धांतांनी अतिरेकी प्रकारचे वाद (isms) निर्माण केले असून ते माणसाच्या शोधाला आदर्श उत्तर देऊ शकत नाहीत. उदा.विज्ञानाच्या क्षेत्रात जे विविध प्रकारचे संशोधन झाले आहे त्यातून आणि शास्त्रीय शोधातून जड भौतिकाचा उपयोग (Exploitation) करून माणसाला, रोजच्या जीवनातील अडचणींचे निराकरण जिथे होऊ शकेल असा समाज प्रस्थापित करता आला आहे. परंतु अशा शास्त्रीय शोधांमुळे माणसाला जी सत्ता मिळाली आहे आणि जिचा उपभोग तो घेत आहे, त्या सत्तेने, शोधत असलेला आनंद, आत्मिक आनंद आणि शांती यांचा लाभ माणसाला करून दिला नाही.

ज्या लोकांना वरवरच्या यशाची भुरळ पडल्याने स्वत:चा आणि त्यांच्या सिद्धांताचा (ideologies) गर्व आहे, अशा लोकांसाठी काय करावे? त्यांना हे कसे पटवून द्यायचे, की जीवनभर जे ध्येय मिळवायचा त्यांचा प्रयत्न होता तो यशस्वी झाला नाही. या जेटच्या युगात आपण चंद्रावर माणूस उतरवला असेल, पण सभोवताली इतके दु:ख का आहे याच्या मुळाशी आपल्याला जाता आले नाही. तेव्हा आता बदल म्हणून आपण माणसांचे निरीक्षण (Scrutinise) करू या आणि स्वत:ला आपण आहोत तसे सामोरे जाऊन, हे लक्षात घेऊ की निवडलेला मार्ग सोडून दुसऱ्या मार्गावर आपण लक्ष दिले आणि चूक केली आहे. आपण जीवनात ध्येय खरोखर कसे हरवले? विज्ञानाच्या अभ्यासात माणसाने केलेल्या संशोधनातून त्याला जड पदार्थांचे वास्तविक ज्ञान मिळाले आहे. त्याचप्रमाणे भौतिक पातळीवर अस्तित्वात असलेल्या शक्तींचेही ज्ञान समजले आहे. मानव संबंधित ज्ञान शाखांमधून उदा. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, माणसाला हे समजण्यास मदत झाली आहे, की विविध वातावरणात माणसे कशी वागतात, कसा प्रतिसाद देतात आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता का आहे? पण ज्यांनी वैज्ञानिक प्रगती केली आहे, ते

परमेश्वराचे (सर्वश्रेष्ठ सत्तेचे) अस्तित्व विसरले आहेत. त्यांनी अचेतनाच्या उगमाचे वर्णन केले, परंतु त्याच्याकडून येणाऱ्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले.

आता माणसाने परमेश्वराशी संवाद साधण्याची वेळ आलेली आहे आणि हेसुद्धा समजण्याची वेळ आलेली आहे, की परमेश्वराची शक्ती अचेतनाच्या आशीर्वादातून आतापर्यंत जे काही थोडे ज्ञान त्याला मिळाले आहे, ते ज्ञानाच्या सागराचे केवळ क्षणिक दर्शन घेण्याची परवानगी दिल्याने मिळाले होते.

मानसशास्त्रातसुद्धा (Psychology) पुष्कळ शोध लागले आहेत. मिळालेल्या सर्व ज्ञानाने माणसाला हे पटले आहे की फक्त आपण वस्तुस्थिती (फॅक्टस्) जशा अस्तित्वात आहेत तशा सांगू शकतो, पण त्यांच्या अस्तित्वाची किंवा उद्‌भवाची कारणे सांगू शकत नाही. उदाहरणादाखल असे म्हणता येईल, की पृथ्वीवर गुरुत्वाकर्षणाची शक्ती कार्यरत आहे, पण ती का आहे याची कारणे सांगू शकत नाही.

हे स्पष्ट आहे, की माणसाला संघटित होण्याची इच्छा आहे, पण इतरांचा नाश करण्याची इच्छासुद्धा आहे. युद्धाला तोंड फुटले की ती इच्छा जागृत होते. मानसशास्त्रातून आपण हा शोध लावू शकलो, की माणसात पूर्व चेतित मन (preconscious mind) आहे, ज्याच्यामुळे तो आपली इच्छा प्रभावीपणे सांगतो. त्याच्याशिवाय माणसामध्ये सुप्त चेतित मनसुद्धा (sub-conscious mind) तेवढेच आपोआप वाढते आणि तातडीच्या क्षणी (आवश्यकतेनुसार) जागृत होते. वेगवेगळ्या परिस्थितीत माणसाच्या प्रतिक्रिया कशा असतील ते आपण सांगू शकत नाही. शिवाय प्राप्त झालेल्या ज्ञानाचे कोणते भाग त्याच्या अंतरंगाचा शोध घेण्यास उपयोगाचे नाहीत ते माणसाला ओळखता येत नाही.

मानवाच्या भावनिक शोधाने त्याला आपले स्वतःचे कुटुंब निर्माण करून त्या कुटुंबाचे सदस्य असल्याचे अभिव्यक्त करण्यास प्रवृत्त केले. परंतु

एकाच बाजूला टोकापर्यंत जाणारे माणसाचे प्रेम म्हणजे प्रेमाचा मृत्यू आहे. प्रेम वृक्षातील जीवनरसाप्रमाणे आहे. तो (वृक्षातून) वर जाऊन फुले, पाने, खोड आणि मुळे या सगळ्यांना जीवन आणि शक्ती देतो. तो केवळ एकाच विशिष्ट पानात किंवा फुलातच स्थिर होऊन राहत नाही. जीवनरस तसा एकाच विशिष्ट ठिकाणीच राहिला तर वृक्षाचे मरण अटळ असते आणि वृक्षाबरोबर ज्या फुलाकडे सर्व लक्ष दिले असते (जिथे सर्व जीवनरस राहिलेला असतो) ते फूल पण मरते.

आधुनिक काळात कुटुंब संस्थाच शक्तीहीन झालेली आहे. सर्वांना एकत्र ठेवणाऱ्या शक्तीचा माणसावरचा आणि त्याच्या समाजावरचा प्रभाव संपून गेला आहे आणि त्याच्या संपून जाण्याने काही मिळाले तर नाहीच, पण विस्कळीतपणा आला आहे. मानव अतिरेकी परिस्थितीतच राहतो. एक तर त्यांची अतिशय आत्मकेंद्रित कुटुंबे असतात किंवा कुटुंबेच नसतात. एकाच बाजूस टोकापर्यंतचा शोध 'सी-सॉ' प्रमाणे असतो.

मानवाने हे लक्षात घ्यायला हवे, की त्याच्या कोवळ्या मुलांच्या वाढीसाठी कुटुंब आवश्यक आहेच, पण तेच कुटुंब मोठ्या समाजाचा आणि एकाच विशाल जागतिक कुटुंबाचा घटक आहे. आपल्या पिल्लांना सुरक्षित घरटे देण्याऐवजी माणसांनी मुलांच्या वाढीसाठी स्वैर आणि अनिर्बंध नातेसंबंध तयार केले. माणसाने तयार केलेल्या मुक्त समाज-व्यवस्थेतून हे उद्भवले आहे. त्याचा परिणाम दिसत आहे. तो असा, की मुलांना जन्मापासून असुरक्षितपणात रहावे लागते कारण ते आईचे प्रेम, वडिलांचे संरक्षण यांच्यापासून वंचित असतात. जे प्रौढ लोक कौटुंबिक जीवन सोडून आईच्या किंवा वडिलांच्या जबाबदारीपासून पलायन करतात तेसुद्धा अतिशय शुष्क व अहंकारी होतात. ते गट बनवतात आणि त्यांच्यात फार मोठ्या प्रमाणावर नैराश्य वाढते.

प्रत्येक अवतारानंतर जीवनाच्या वृक्षावर खरे धर्म फुलांप्रमाणे प्रकट

झाले. धर्माची फुले निर्माण करण्यासाठी अवतार विविध काळात आले. माणसांच्या गटांनी ही जीवन-वृक्षावरची फुले तोडली आणि लवकरच, ती सुकली आणि कोमेजली, जसे खरी फुले झाडावरून तोडून कोटावर लावली जातात, तसे त्यांचे होते. त्या गटांनी असे दावे केले, की अवतारांच्या संदेशाचे खरा अन्वयार्थ तेच लावू शकतात. असे सर्व धर्म आता अशा स्थितीत आहेत, की त्यांच्या संस्थापकांच्या संदेशाचे जीर्ण विवेचन ते शिकवतात, त्यांचे अनेक गटांत आणि पंथात विभाजन झाले आहे आणि ते पंथ देवाच्या नावाने परस्परांमध्ये लढाया करीत आहे. तथाकथित धार्मिक लोक पूर्वी कसे वागले आणि आतासुद्धा कसे एक दुसऱ्यांचा नाश करीत आहेत ते वाचल्यावर भीती वाटते. या धर्माचे अनुयायी स्वतःला 'निवडलेले', 'वाचवलेले' आणि 'सर्वोच्च' असेही म्हणवतात. ते स्वतःच्याच मूर्खाच्या नंदनवनात राहतात. स्वतःचे मतच बरोबर आहे असा त्यांचा आग्रह असतो आणि ते स्वतःलाच श्रेष्ठ म्हणून कौतुक करतात. अधार्मिक पद्धतींनी त्यांना आपल्या धर्माचा प्रसार करायचा असतो किंवा आपल्या पंथाला प्रस्थापित करायचे असते. आपल्याला नम्रपणे हे स्वीकारायला हवे, की माणसे त्यांच्या बौद्धिक शोधात शांती आणि स्वातंत्र्य यांच्याजवळसुद्धा आली नाहीत. तसेच धर्मांनी वचन दिलेल्या आनंदमय अस्तित्वाचा त्यांना अनुभव आला नाही. आता असंख्यांचा आत्मसाक्षात्कार होण्याची वेळ आली आहे, पण अनेकांना तो घ्यायचा नाही.

जेव्हा एखादा वृक्ष त्याला मिळणाऱ्या पुरवठ्याच्या प्रमाणात अधिक वाढू पाहतो, तेव्हा त्याला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी स्वतःचा वेगळा पुरवठेदार शोधावा लागतो अन्यथा तो नष्ट होईल. मानवी संस्कृती अभिव्यक्ती आणि अनुभव यातून बाहेरील बाजूकडे एवढी फोफावली आहे, की ती (वाढ) प्रमाणाबाहेर झाली आहे. आपल्या स्वभावाची बहिर्गामी

अभिव्यक्ती करण्याकडेच लक्ष केंद्रित केल्यानंतर तिला आता आपल्या अस्तित्वाच्या आंतरिक वा आंतरगामी स्वभावाकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. आपल्या मुळांचा अभ्यास करायला हवा. संस्कृतीला आपले अस्तित्व टिकवायचे असल्यास आपल्या अस्तित्वाच्या उगमाचा शोध घेतला पाहिजे. आता या अस्तित्वाच्या दृष्टीने नाजूक टप्प्यावर सहजयोगाचा शोध म्हणजे परमेश्वराच्या सर्वव्यापी प्रेमाचा आशीर्वाद आहे. हे परमेश्वराने उघड केलेले तंत्र (किंवा पद्धत) असून ते संपूर्ण मानवजातीला मोक्ष मिळवून देईल. कारण सृष्टीचा परम निर्माता आपल्या निर्मितीचा, त्यानेच निर्मिलेल्या कोणत्याही प्राण्याकडून नाश होऊ देणार नाही.

सहजयोग विनासायास मुक्तीचे तंत्र (Spontaneous Salvation) आहे. ते निसर्गदत्त असून स्वत: परमेश्वरच ते पाहत आहे. माणसाची निर्मिती करून त्याला मोक्ष देण्यासाठी निसर्ग ज्या गुंतागुंतीच्या पद्धतींचा उपयोग करतो, त्यांचा अभ्यास करण्यापूर्वी आपल्याला आपल्या मर्यादा मान्य करायला हव्यात. एकदा आपण हे मान्य करू शकलो, की मानवी मर्यादा आपल्याला या अगतिक अस्तित्वात घेऊन आल्या आहेत, तर आपण या कल्पनेला सहज शरण जाऊ, की माणसाला स्वत:च्या मुक्तीसाठी फारच थोडे काम करणे जमले आहे. असे म्हणता येईल, की काहीच करणे शक्य झाले नाही. आपण याच्यासाठी काही करू शकत नाही. हे कदाचित माणसाच्या लक्षात आले नाही. त्याने स्वत:ला तयार केले नाही. तसेच तो स्वत:चा डिझायनर ही नाही (अर्थात् मानवी शरीराचे विविध भाग व यंत्रणा कशा असाव्यात, कशा तयार कराव्यात हे मानवाने निश्चित केले नाही.) म्हणून ज्याने हे सर्व काम केले आहे, त्यानेच भविष्य घटित करायला हवे. तर्काने हे लक्षात येईल, की मानवी प्रयत्न जीवनाची रचना करणाऱ्या शक्तींना मार्गदर्शन करू शकत नाहीत. माणसाला एका बीजाला अंकुरित करणे जमत नाही. ते केवळ स्वत:च वाढू शकते. बीज अंकुरित करण्यासाठी माणसाने

कोणत्याही माकडचेष्टा केल्या तरी त्याला जीवनातला हा चमत्कार घडविणे शक्य नाही. पण आत्मसाक्षात्काराबद्दल आणि विनासायास मुक्तीबद्दल जर कोणी सांगितले तर लगेच माणसाच्या अहंकाराला आव्हान दिल्यासारखे वाटते. विरोधाची लाट, अचानक त्याच्या अंतर्यामी उभी राहते आणि त्याला अशी वक्तव्ये मान्य करणे जमत नाही. माणसाला या सत्यासमोर झुकायलाच हवे की जो लक्षावधी बीजे अंकुरित करतो आणि लक्षावधी माणसे निर्माण करतो, त्यालाच माणसाच्या उत्क्रांतीच्या जिवंत क्रियेचा चमत्कार करायला हवा. अर्थात् ही जाणीव इतक्या उशीरा होऊ नये, की त्यावेळी आपण इतके पूर्ण नष्ट झालो असू त्यातून पुन्हा उभे राहणे अशक्य होईल.

आपण एका गंभीर मानवी संकटाला तोंड देत आहोत, जे आपल्या अंतर्यामी आहे आणि असत्याशी माणसाचे जे तादात्म्य झाले आहे त्याच्या दबावाखाली प्रत्येक क्षणी भयानक परिणाम करणारे फटके आपल्याला बसत आहेत. कोणत्याही प्रयत्नांशिवाय हे (मुक्ती) घटित होणार आहे, हे मान्य करताच आपण परमेश्वरी कृपा कार्यान्वित होण्यास योग्य अशी सर्वसाधारण माणसे बनू. अजून एक महत्त्वाचा मुद्दा मनात साठवायला हवा की माणसाची उत्क्रांती अतिशय सोपी-श्वासोच्छ्वासाइतकी सोपी असायला हवी. त्यांनी बहुतेक सर्व गोष्टींसाठी अनावश्यकरीत्या कृत्रिम गुंतागुंत करून ठेवली आहे. त्यांना श्वासोच्छ्वासाची कला किंवा हृदयाचे ठोके पाडणारे तंत्र शिकावे लागले असते, तर इतका काळ ते जिवंत राहिले नसते. त्यांनी समजायला हवे, की जीवनातल्या सर्वात महत्त्वाच्या गोष्टी सर्वात जास्त सोप्या आहेत.

त्याचप्रमाणे आपली सहज साध्य होणारी मुक्ती आपल्यासाठी तितकीच सोपी हवी. तुम्ही वैद्यकीय क्षेत्रात स्पेशालिस्ट नसाल तर श्वासोच्छ्वासाची कला समजण्याची पद्धत फारच गुंतागुंतीची व अवघड आहे. या साध्या कार्याविषयी तुम्ही डॉक्टरांना विचाराल, तर त्यांना सुद्धा

एका पुस्तकात याच्या सर्व तांत्रिक बाजू स्पष्ट करता येणार नाहीत. तसेच तुम्हाला दिवा लावायचा असेल, तर तुम्ही बटन दाबता आणि दिवा लागतो. पण या साध्या कृतीच्या मागचे इंजिनियरींग फारच गुंतागुंतीचे असून ते पूर्ण स्पष्ट करणे आणि समजणे फक्त इंजिनियरलाच जमते. श्वासोच्छ्वास चालणे किंवा दिव्याचे बटण दाबणे यासारख्या गुंतागुंतीच्या इंजिनियरींगच्या कार्याचे ज्ञान आपण गृहीत धरतो. तर मग माणसात मुक्ती कशी घटित होते याच्याबद्दल आपण डोक्याला का त्रास द्यायचा?

प्रथम बोधाचा किंवा प्रकाशित होण्याचा आपण अनुभव घेऊ. मग त्याच्या प्रकाशात आपल्याला प्रकाशाचे कार्य करणाऱ्या गुंतागुंतीचे इंजिनियरींग समजेल. विजेबद्दलचे स्पष्टीकरण साध्या माणसापेक्षा इंजिनियरला लवकर समजेल. परमेश्वरी शक्ती विजेच्या प्रवाहासारखी, साक्षात्कारी जीवाच्या (परमेश्वराचा इंजिनियर) हातात विनासायास आणि सारख्या प्रमाणात सातत्याने वाहत असते. म्हणून फक्त त्याच शक्तीचा उपयोग होऊ शकतो आणि तिच्या सहाय्याने प्रयोग करू शकतो.


मानवाचा शोध, जो बौद्धिक स्तरावरच असतो, इतक्या अतिरेकी टोकापर्यंत करण्यात आला आहे की तिथून परत येणे शक्य नाही. त्यामुळे त्या शोधातून जे मिळाले ते निराशाजनक आहे आणि विघटित अवस्थेत आहे. प्रयत्न करून बाहेरच्या बाजूपर्यंत जाणे शक्य आहे, पण मूळ केंद्रबिंदूपर्यंत जाणे आवश्यक आहे. आतापर्यंतचा मानवी (बौद्धिक) शोध जे शोधायचे आहे त्याच्या बाहेरच्या भागामधेच सीमित आहे. पण जे शोधायचे आहे, ते निसर्गात आहे, सूक्ष्मात आहे. म्हणून त्याचा स्थूलातील (स्थूलातच) सत्त्वाचा, सूक्ष्माचा शोध घ्यायला पाहिजे. शोध घेण्याचा हा सर्व प्रयत्न, जे शोधायचे त्याचा खरा स्वभाव, खरे सत्त्व ते मूळात कसे असते, ते न समजताच करण्यात आला आहे. परंतु आता सत्त्वाशी तादात्म्य मिळवायला हवे. पण केवळ बोलण्याने ते मिळणार नाही. सत्त्वाशी तादात्म्य

एक स्थिती असून ती मानवी जाणिवेत प्रकाशित व्हायला हवी.

ही स्थिती, माणूस जेव्हा त्याच्यातून परमेश्वरी शक्ती चैतन्य लहरींच्या रूपाने वाहू लागल्याचे समजतो, तेव्हा त्याच्या शरीराचा अविभाज्य भाग होते. तो (माणूस) बासरीप्रमाणे पोकळ होतो आणि ती बासरी परमेश्वर त्याचे संगीत वाजवण्यासाठी निवडतो. कोणी जर स्वत:ला कोणत्या तरी देशाचा अध्यक्ष म्हणू लागेल तर त्यामुळे तो अध्यक्ष होत नाही. कोणी स्वत:च अशा स्थानावर स्वत:ची नेमणूक करेल आणि तसे जाहीर करेल तर फक्त बावळट लोकच त्या दाव्यावर विश्वास ठेवतील. सत्याशी तादात्म्यता एक घटना असून ती घडते त्यावेळी बाहेर शोध घेण्याचा हव्यास माणसाच्या व्यक्तित्वातून गळून पडतो. माणसाला (याची अनुभूती येऊन) उलगडते, की तो अचेतनाच्या, म्हणजेच परमेश्वरी प्रेमाच्या सागरातील एक बिंदू आहे. त्याची सुरक्षा आपोआप प्रस्थापित होते आणि ती जबाबदारी सृष्टीचा निर्माता स्वत:कडे घेतो. त्याचा अहंकार परम अहंकाराच्या इच्छेत अदृश्य होतो आणि तो परब्रह्माच्या लीलांचा शांतीमय साक्षी होतो.

प्रकरण ५

# सुप्त चेतना आणि सामूहिक सुप्त चेतना


A The path of A. Ida channel originates from the right side of the brain and passes through Agnya Chakra towards the left hand side ~~of the~~ in the A. Spinal chord of VIRATA (the Macrocosm) In the human being, (the Microcosm), the cell of that great Primordial being this channel is reflected (as Ida nadi) in the same manner. The Adi Ida channel of VIRATA sustains the collective subconscious which is ~~reflected~~ ~~and~~ connected by reflection to the subconscious of human beings.

*प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित*

आदि इडा नाडीची विराटाच्या (आदिपुरुष किंवा the macrocosm ) मेंदूच्या उजव्या बाजूतून सुरूवात होते आणि आदि आज्ञा चक्रातून जाऊन ती मज्जारज्जूच्या डाव्या बाजूस जाते. माणसामध्ये (the microcosm किंवा आदिपुरुषाच्या शरीरातील एक पेशी) ही नाडी इडा नाडी म्हणून प्रतिबिंबित झाली आहे.


आदि इडा नाडी सामूहिक सुप्त चेतनेची धारणा करते. सामूहिक सुप्त चेतना, प्रतिबिंबित होऊन माणसाच्या सुप्त चेतित मनाशी संलग्न होते. आदि इडा नाडी विराटाची भावनिक बाजू दर्शविते. ही नाडी महत शरीराच्या (Great being) डाव्या हृदयाची जिथे भगवान शिवांचा प्रमुख दैवत म्हणून निवास आहे त्याची काळजी घेते. आदिशक्तीच्या महाकाली अंगाने सर्वप्रथम आदि इडा नाडी निर्माण केली. ती अस्तित्वाची निर्देशक आहे.

एका रूपकाच्या सहाय्याने हे समजेल. माणसामध्ये स्वत:ला अभिव्यक्त करण्याची इच्छा जागृत होते. ही इच्छा फक्त अस्तित्वातच आहे.

ती प्रत्यक्षात, भौतिकात उतरली नसल्याने जाणवत नाही. त्याचप्रमाणे आदिशक्तींची सृजनाची इच्छा अभिव्यक्त करण्यासाठी आदि इडा नाडी निर्माण केली गेली. ती इच्छा भौतिक स्वरूपात प्रत्यक्षात आणण्यासाठी आदि पिंगला नाडी निर्माण केली गेली. इच्छा ही भावना असते, भौतिकात तिचे प्रकटीकरण नसते. कोणत्याही कवीमध्ये इडा नाडीमुळे भावना जागृत होतात. पण महासरस्वती शक्तीच्या सहाय्याने तो कविता तयार करतो. महासरस्वती उजव्या बाजूस पिंगला नाडीमध्ये असते. सामूहिक सुप्त चेतना इच्छा आणि भावना निर्माण करते आणि ती विराटाच्या शरीरातील आदि श्रीगणेशांशी बळकटपणे जोडलेली असते. त्यामुळे सुप्त चेतनेत जागृत झालेल्या भावना अबोधितेशी (निरागसतेशी) आतपर्यंत संलग्न असतात. आदि इडानाडीचे अजून एक कार्य म्हणजे, सृष्टीमध्ये जे मृत होते ते गोळा करणे, उत्क्रांतीच्या प्रक्रियेत जे बाहेर फेकले जाते ते सर्व आदि इडानाडी, सामूहिक सुप्त चेतनेत साठविते, आदि इडानाडी मध्ये एकामध्ये दुसरा.... आणि एकाच्या आत दुसरा उघडणारा, अशा सात नाड्या असतात. आकृती ५ पहावी.

माणसाच्या मृत्युनंतर त्याच्या शरीरातील फक्त पृथ्वी तत्त्व जाते. बाकी सर्व शरीर आत्म्याच्या भोवतीच असते आणि वातावरणात जीव या रूपात कमीत कमी तेरा दिवस असते. नंतर ते विराटाच्या सुप्त चेतनेत (परलोकात) जाते. मग ते परलोकाच्या विविध स्तरांत राहते. चांगले लोक चांगले जीव बनतात. पण मृत्यूच्या वेळी कुंडलिनी बाहेर येते. दैवते अंतर्धान पावतात. कुंडलिनीच्या सर्व शक्तीसुद्धा जीवशरीराच्या बाहेर जातात. कुंडलिनी जीवाच्या जवळच राहते आणि जीवाच्या कृत्यांकडे लक्ष ठेवते, पण त्यांना नियंत्रित करण्याची शक्ती तिला नसते. यामुळे वाईट लोकांचे जीव सर्व पापे करतात.

सुप्त चेतनेच्या अवस्थेत उत्क्रांत होणे शक्य नसते. पण पाप करण्याने




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती ५**

अधोगतीला जाऊ शकतो. अगदी खालच्या प्रकारचे जीव जे वातावरणात फिरत असतात किंवा माणसात प्रवेश करतात त्यांना कुंडलिनीने त्यागलेले असते आणि ती आक्रसून प्रणवात विलीन होते असे भयंकर जीव मृतात्मे उत्क्रांतीच्या प्रक्रियेपासून वेगळे स्वतंत्र होतात. ते सैतानी असून पृथ्वीवर दुष्टपणाचे राक्षसी खेळ घडवतात. त्यांना श्रीगणेश प्रथम सामूहिक चेतनेत आणि पुढे नरकात फेकून देतात. पण जे पूर्ण नष्ट होत नाहीत ते पुन्हा पुन्हा जन्म घेतात. सृष्टीच्या सृजनाचे हे आवर्तन संपल्यावर आदिविष्णूंचा दहावा व शेवटचा अवतार कलकी (येशू ख्रिस्त) यांच्या कपाळातून अकरा विनाशक शक्ती (एकादश रुद्र) बाहेर येतील तेव्हा त्या दुरात्म्यांचा अंतिम संहार होईल.

चांगले जीव परलोकात राहतात. ते स्वत:चा आकार लहान करत जातात व शुक्राणू (sperm) बनण्याइतके लहान होतात. ज्यांच्याशी ते संयुक्त होतात ते स्त्री बीज पृथ्वी तत्त्वातून घडते.

ढोबळपणाने मनुष्याचे चार प्रकारात वर्गीकरण करता येईल. परंतु अशा वर्गीकरणाचे निश्चित नियम असू शकत नाहीत. कारण ज्या पद्धतींची कृत्ये करणे जीव ठरवतात त्यांच्या अनुसार ते उत्थानास अथवा अधोगतीस प्राप्त होतात. तथापि वर्गीकरण खाली दिल्याप्रमाणे आहे :

### वाईट लोक

राक्षस, अत्यंत वाईट, भ्रष्ट, अती अहंकारी तसेच अत्यंत दबलेले लोक.

### साधे लोक

सर्वसाधारण लोक, फार चांगले लोक, साधक, निरागस लोक, जागृत लोक, धार्मिक लोक.

### श्रेष्ठ लोक

साक्षत्कारी जीव, संपूर्ण आत्मसाक्षात्कारी जीव, परमेश्वराचा साक्षात्कार झालेले जीव (God Realised Souls)

## अवतार

अचेतनाला पहिल्या प्रकारातील लोकांत रस नाही. मरणानंतर प्राणी मानवी स्त्रीबीजांमध्ये प्रवेश करतात. त्यामुळे प्राण्यांच्या व्यक्तित्वाची काही मानवी स्वरूपे जन्मास येतात. मानवी वातावरण प्राण्यांसाठी अधिक अनुकूल असल्यास, ते (प्राणी) माणसे म्हणून जन्म घेतात. यावरून समजेल, की सध्याच्या कलियुगाच्या आधुनिक काळात अति लोकसंख्या वाढीचा प्रश्न का उद्‌भवला आहे.

दुसऱ्या वर्गाबद्दल अचेतनास फार काळजी वाटते. या क्षेत्रातील त्यांचे काम फार नाजूक आहे. शुक्राणू आणि स्त्रीबीज यांना अचेतन अशा पद्धतींनी एकत्र करते, की एकाच व्यक्तित्वाचे दोन भाग पुन्हा एक होतात. समाजात चांगली विवाह पद्धती असल्यास, सामूहिक चेतनेच्या मान्यतेने आपल्याच आई-वडिलांची निवड करणे फार सोपे होते. विवाहाची पद्धत अचेतनाच्या कामाच्या पद्धतीवर आधारित असावी. असे विवाह दुसऱ्या प्रकारातले लोक जन्म घेऊ शकतील असे वातावरण उपलब्ध करून देतात. बहुतेक लोक त्यांच्या पूर्वीच्याच शरीरात आणि जीवात जन्म घेतात.

तिसऱ्या वर्गातल्या जीवांना अचेतन फार महत्त्व देते. त्यांच्या आई-वडिलांची काळजीपूर्वक निवड केली जाते. त्यांना पूर्वीच्या जीवनातीलच शरीरे व जीव असतात. परंतु त्यांच्या जन्माच्या व मृत्यूच्या वेळा ते निवडतात. एखाद्या अवताराचा जन्म होतो, बहुतेक त्याचवेळी तिसऱ्या वर्गातले लोक जन्म घेतात.

शेवटी अवतार ते स्वतःच आपले आई-वडिल, जन्मवेळ आणि जन्मस्थान निवडतात. जन्मतःच त्यांच्या शरीराच्या प्रमाणाचा एक विशिष्ट सूक्ष्म विग्रह असतो. ते स्वतःच आपले जीवन आणि मृत्यू ठरवतात. ते परमेश्वराच्या अंगाचे प्रकटरूप असतात आणि विराटाची चक्रे त्या प्रकट रूपात धारण करतात.

अशाप्रकारे जीवाला पुन्हा पुन्हा जन्म मिळतो. आईच्या गर्भात महासरस्वती शक्तीने घडविलेला आणि ज्याच्यात जीव आहे (पृथ्वी सोडून बाकी पंचमहाभूतांचा बनलेला) असा शुक्राणू आणि आत्मा महाकाली शक्तीने घडविलेल्या आणि पृथ्वी तत्त्वाच्या स्त्रीबीजात प्रवेश करतात आणि गर्भ तयार होतो. जेव्हा गर्भ स्वत:ला गर्भाशयाच्या भिंतींना अडकवतो तेव्हा कुंडलिनी टाळूमधून (ब्रह्मरंध्रातून) प्रवेश करते. आता भ्रूण वाढू लागतो. वास्तवात कुंडलिनीचा प्रवेशच भ्रूणाला गर्भाशयाच्या भिंतींना अडकवतो. सर्वसाधारण भाषेत आपण जीवाला आत्मा म्हणतो. आत्मा, वास्तविक सुप्त असून आत्मसाक्षात्कार झाल्यावर त्याचा प्रकाश प्रकट करतो.

जेव्हा आत्मसाक्षात्कारी जीव मृत्यू पावतात तेव्हा कुंडलिनी जीवातच राहते कारण आत्मा कुंडलिनीशी एक झालेला असतो. या वर्गातल्या जीवांमध्येसुद्धा तीन-चार प्रकारचे जीव असून ते त्यांनी काय मिळविले आणि प्रगती केली याप्रमाणे जन्म घेतात.

साक्षात्कारी जीव कुंडलिनीला पिळदार (ट्विस्टेड) किंवा वलये घातलेल्या रूपात बघू शकतात. ते चांगले आणि वाईट जीव पण गोल आकारातील शरीरे या रूपात पाहू शकतात. वाईट जीवांचे रंग त्यांचे गुण दर्शवितात. साक्षात्कारी जीव वाईट जीवांची शरीरे पाहू शकत नाहीत. परंतु भूतबाधा झालेले लोक पाहू शकतात कारण ते स्वत:च सुप्त चेतनेच्या स्तरावर असतात.

परमेश्वरी अवताराचा जन्म होतो तेव्हा ते परमेश्वराचा साक्षात्कार झालेल्यांना समजते. कारण वातावरणात त्याची चिन्हे दिसतात. अचेतनाने असे महत्त्वाचे जन्म झाल्याचे कळविण्याच्या अनेक पद्धतींपैकी ही एक आहे.

अतृप्त आत्मे पृथ्वीच्या वातावरणात उतरून फिरत असतात आणि त्यांना हवा तसा जिवंत माणूस मिळाल्यावर त्याच्या शरीरात प्रवेश करतात.

अनेक प्रकारची शरीरे त्यांना आश्रय देतात. वासना, दारू, अमली पदार्थ यांचे गुलाम, त्याचप्रमाणे दबलेले लोक ज्यांना अहंकारी स्वभावाच्या माणसाच्या भावनांचा आनंद घ्यायला आवडते, असे लोक त्यांची आश्रयस्थाने असतात. एक किंवा अधिक अहंकारी अतृप्त आत्मे जुलमी सत्ताधीशाच्या शरीरात घुसून त्याला झपाटतात. मग तो त्याच्या राहिलेल्या जीवनात युद्धे लढत बसण्याची शक्यता असते.

मृत कलाकार, डॉक्टर, संगीतकार, कवि किंवा राजकारणी इत्यादींपैकी जे त्यांच्या जीवनकाळातील प्रज्ञा व अनुभव पुन्हा जगण्याच्या प्रयत्नात असतात, ते एखाद्या जिवंत व्यक्तित्वाला झपाटून त्याच्या माध्यमातून सर्व उपभोगतात. त्यांना मानवी अस्तित्व उपभोगायचे असते, पण माणसाचे जीवन जन्म घेऊन प्रत्यक्ष जगण्याचे ओझे नको असते, असे आत्मे सूक्ष्म असल्याने इच्छेला येईल तसे, मानवी शरीरात घुसून बाहेर पडू शकतात. एका जीवंत माणसाच्या शरीरात अनेक आत्मे घुसू शकतील इतके ते सूक्ष्म असतात.

विराटाच्या सामूहिक सुप्त चेतनेत (परलोक) मृतात्म्यांना साठविले जाते. त्यांच्या इच्छा आणि कृती यांच्या अनुसार सामूहिक सुप्त चेतनेच्या विविध स्तरांवर त्यांना ठेवले जाते. या परलोकात, नुकतीच मृत झालेली माणसे त्यांच्या वैयक्तिक साधना मार्गांप्रमाणे स्वत:च्या उत्थानाबद्दलचे निर्णय घेऊ शकतात. त्यांचा पुढचा जन्म, त्यांच्यासाठी श्रीमहादेव ठरवितात.

ज्या लोकांनी जिवंतपणी वागण्याचा अतिरेक केला आहे ते लंबकाप्रमाणे दुसऱ्या टोकाच्या जीवनात फेकले जातात. उदा.एखाद्याला बरीच मुले असतील आणि तो मुलाचा वाईट अनुभव घेत वारला, तर त्याला पुढच्या जन्मात अजिबात मुले होणार नाहीत किंवा एका जन्मात सक्तीचे ब्रह्मचर्य पाळणारा पुढच्या जन्मात अतिशय स्वैराचारी माणूस म्हणून

जन्माला येतो. यथावकाश असे लोक मध्यमार्गाच्या जवळ येतात, परंतु सातत्याने अतिरेकी वागणारे उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर फेकले जातात. पुढे ते नरकात राहतात.

मृतात्म्यांचा अनेक प्रकारे मानवी शरीरात प्रवेश होऊ शकतो :

* जेव्हा एखादी व्यक्ती बौद्धिक किंवा भावनिक तणावात असते तेव्हा अहंकार किंवा प्रति अहंकार याला तडा गेल्यास ती फट घुसू पाहणाऱ्या मृतात्म्यांच्या प्रवेशासाठी रस्ता बनते.
* खोट्या गुरुच्या प्रभावाने, त्यांच्या चुकीच्या मार्गदर्शनाखाली, व्यक्तीने सूक्ष्म केंद्रावर विशेषत: आज्ञा किंवा नाभी चक्रांवर चित्त एकाग्र करण्यामुळे, ही दोन सूक्ष्म केंद्रे सर्वात अधिक बाधित होऊ शकतात. त्यामुळे भ्रूमध्यावर चित्त एकाग्र करण्यामुळे आणि नाभीचा भाग सर्व अनधिकृत पद्धतींनी उत्तेजित करण्याने ही दोन सूक्ष्म केंद्रे भूतबाधेच्या धोक्यास उघडी पडतात. ह्याच कारणासाठी भारतीय स्त्रिया आपले आज्ञाचक्र झाकण्यासाठी कपाळावर शेंदूराचा लाल तिलक लावतात.
* जेव्हा खोटा गुरु, शिष्यावर नियंत्रण मिळविण्यास त्याच्यात मृतात्मा घुसवतो तेव्हा ती भूतबाधा सर्वात वाईट असते. त्याशिवाय काही तांत्रिक व मांत्रिक असे आहेत, की ते स्वत:च्या नियंत्रणातले मृतात्मे दुसऱ्या माणसातही घुसवू शकतात.

साधारणपणे कमकुवत माणसाला आपल्या प्रभावाखाली घेणाऱ्या व्यक्तींमुळे तो माणूस भूतबाधित होऊ शकतो. मानसशास्त्रज्ञ आणि मानसोपचार करणारे, यांना या गोष्टीची जाणीव नसते, की ते सहज आणि मुक्तपणे मिळालेली मृतात्म्यांची शक्ती उपयोगात आणत आहेत. ते लोक मृतात्म्यांनी दुसऱ्या पद्धतीने माणसात प्रवेश करण्याचे उदाहरण आहेत.

संमोहन करणाऱ्यांनासुद्धा बहुतेक हे समजत नाही, की ते सामूहिक सुप्त चेतनेशी जोडले गेले असून अनेक मृत जीवांच्या किंवा मृतात्म्यांच्या संपर्कात आहेत. संमोहित अवस्थेत व्यक्ती एक किंवा अधिक मृतात्म्यांच्या ताब्यात जाऊ शकतो आणि ते मृतात्मे संमोहित होणाऱ्या व्यक्तीचे चित्त चेतनेच्या स्थितीमधून सुप्त चेतनेच्या अवस्थेकडे निदेशित करू शकतात किंवा खेचू शकतात. संमोहन करून घेणाऱ्या माणसाचे चित्त प्रथम सध्याच्या जीवनाच्या भूतकाळात जाते आणि ते माणूस लहानपणाचा पुन्हा अनुभव घेते. त्यामुळे संमोहित अवस्थेतील रुग्ण प्रथम आईच्या गर्भाशयातील सुरक्षा आणि उबदारपणा अनुभवतो. जसे जसे सुप्त चेतित मन, चेतित मनाचे कार्य करू लागते तसतसे संपूर्ण चेतित मन कोणत्या तरी मृतात्म्याच्या प्रभावाखाली संपूर्णपणे सुप्त चेतनेत जाते. संमोहित करणारा, मग आपल्या ताब्यातील व्यक्तीला झोपेच्या अवस्थेत नेतो किंवा त्याला भूतकाळात जाण्याची किंवा लहानपणचे अनुभव घेण्याची आज्ञा करू शकतो. हळूहळू, सुप्त चेतनेत काम करणारा मृतात्मा इतका प्रबल होतो, की चेतित व्यक्तित्व असहाय्य होते आणि कह्यात जाते. चेतित मनाचे संपूर्ण चित्त सुप्त चेतनेच्या अवस्थेत जाते. आता संमोहित करणारा, मृतात्म्याला, दिलेल्या आज्ञांचे पालन करण्याची सूचना करू शकतो. केवल सूचना केल्यामुळे प्रभावित व्यक्ती दोन स्टुलांमध्ये, लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे अधांतरी राहू शकते. प्रभावित माणसाच्या (लाकडाच्या फळीसारखे झालेल्या) शरीराला आधार देणारा मृतात्मा बाकीचे लोक पाहू शकत नाहीत. चेतित मन झोपले असल्याने शरीरात काटा घुसवला तरी प्रभावित माणसाला समजणार नाही. प्रभावित माणसाचे संपूर्ण व्यक्तित्व मृतात्म्याशी एक होते आणि संमोहित करणारा प्रभावित माणसाकरवी स्वतःच्या इच्छा अमलात आणू शकतो.

संमोहित करणारा लोकांना संमोहित करून लहान बालकाप्रमाणे परावलंबी करू शकतो किंवा आपल्या आज्ञेत ठेवू शकतो. प्रभावित

माणसाच्या भूतकाळात त्याला असलेल्या चिंता, विशिष्ट मानसिक अवस्था, भयगंड आणि व्यसनाधीनता यांच्यात परत घेऊन जाणे शक्य असते. मृतात्मे अतिशय सूक्ष्म असतात. त्यांची तीन शरीरे असतात जी ते मानव रूपात जिवंत असताना होती. फरक एवढाच की सध्याच्या अवस्थेत जीवित माणसांना ते दिसत नाहीत किंवा जाणवत नाहीत.

भूतबाधेने सुप्त चेतनेशी जोडलेले लोक उदा.भविष्यातील घटना समजू शकणारे लोक (clairvoyants), गूढविद्या असणारे लोक (Psychics), किंवा माध्यम (Mediums) होणारी माणसे मृतात्म्यांना स्पष्ट पाहू शकतात. बहुतेक प्रकारात संमोहित करणाऱ्यांना अचानक गेलेल्या लोकांचे मृतात्मे किंवा नुकतीच आत्महत्या केलेल्या लोकांचे मृतात्मे, मदत करतात.

इंद्रियाच्या बाहेरून येणाऱ्या संवेदना (Extra sensory perception-ESP) वास्तविक शरीराबाहेरील व्यक्तित्वाची शक्ती असते. ते अतिशय धोकादायक असते. कारण ESP असणाऱ्या व्यक्तीला न समजता मृतात्मे ESP देतात. संमोहकाच्या अनुपस्थितीतसुद्धा हे होऊ शकते. युद्धात असलेल्या सैनिकाला अचानक धक्का बसेल. अशा परिस्थितीत त्याच्यामध्ये मृत डॉक्टरचा आत्मा घुसेल. मृत डॉक्टरला त्याच्या कौशल्याचे प्रदर्शन करायचे असते किंवा अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करायचे असते. म्हणून मृत डॉक्टरचा आत्मा झेलू शकेल असा बळकट शरीराचा माणूस तो निवडेल. युद्धात अशा अनेक सैनिकांची उदाहरणे होती, जे कोणतीही वैद्यकीय परीक्षा पास केली नसतानाही लोकांची ऑपरेशन्स करू शकत होते किंवा त्याना औषधे देऊन रोगमुक्त करू शकत होते.

जन्मत:च ज्यांना ESP आहे असे मृतात्म्यांना घेऊनच जन्माला येतात. पण बहुतेक जण तणावग्रस्त होऊन नैराश्याच्या अवस्थेत असताना भूतबाधित होतात. अशा लोकांनासुद्धा सभोवताली असलेल्या मृतात्म्यांची उपस्थिती समजू शकते. कारण ते सुद्धा सुप्त चेतनेच्या प्रदेशात असतात.

त्यांच्यापैकी काही जण कानात कुजबुजणाऱ्या भूतांनी (कर्णपिशाच्च) बाधित असतात. अशा भूतबाधेतून संबंधित व्यक्ती भविष्यात घडणाऱ्या घटना किंवा भूतकाळात घडलेया घटना सांगू शकतात. संपूर्ण अनोळखी लोकांची नावे आणि पत्ते ते सांगू शकतात. तसेच त्यांच्याशी संबंधितांची यादी, कोणत्या राजकीय आणि सामाजिक संघटनांशी ते जोडलेले आहेत वगैरे ते सांगू शकतात. त्यांच्या प्रभावाखालच्या व्यक्तीचे आजार बरे करण्याचे उपायही सांगू शकतात. अशा ESP च्या उपयोगाने व्यवसाय करणाऱ्या लोकांचा विश्वास असतो, की ते मनातले विचार सांगण्याच्या कामात असतात आणि त्यांच्या पैकी अनेक स्वयं घोषित गूढविद्या तज्ज्ञ असतात. पण त्यांना हे समजत नाही की ते भूतबाधेने ग्रस्त आहेत.

एकदा पुण्यात एका प्रसिद्ध मांत्रिकाशी (जो भूतांना बोलवण्यास मंत्र म्हणतो) माझी भेट झाली. त्याने मला आत्मसाक्षात्काराचा आशीर्वाद देण्याची विनंती केली. त्याने कबूल केले की दुसऱ्या लोकांच्या इडा नाड्या उत्तेजित करण्याचा त्याचा व्यवसाय आहे आणि त्याच्यातून त्याला पुष्कळ पैसे मिळाले. पोलीससुद्धा गुन्ह्याच्या तपासासाठी त्या मांत्रिकाची मदत घ्यायचे. समाजातले लोकसुद्धा कुटुंबाचे हरवलेले धन आणि त्यांच्या पूर्वजांनी लपविलेला धनसाठा शोधण्यासाठी, त्या मांत्रिकाला नेमायचे. मी त्याला पुन्हा पुन्हा सांगितले की त्याला आत्मसाक्षात्कार हवा असल्यास त्याच्या सर्व शक्त्या सोडाव्या लागतील. त्याने मला आश्वासन दिले, की त्या कशा सोडाव्यात याची त्याला चिंता आहे. मी त्याची कुंडलिनी चढवली आणि आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर त्याला आश्चर्य वाटले, की त्याच्या ESP च्या सर्व शक्त्या खरोखर गेलेल्या होत्या. त्याने मंत्र म्हणून पाहिले, पण काही उपयोग झाला नाही. आत्मसाक्षात्कारापूर्वी त्याला मदत करणारे सर्व मृतात्मे त्याला कायमचे सोडून गेले होते. त्याला मदत करणारे मृतात्मे त्याचा छळही करायचे. अशा प्रकारच्या भुतांचा उपयोग करणाऱ्यांना

फार भयंकर मरण येते.

अध्यात्माने व्याधी-निवारण करणारा एकही माणूस मी आजपर्यंत पाहिला नाही, जो मृतात्म्यांचा उपयोग करीत नाही. सर्व केसेसमध्ये मृतात्म्यांचा उपयोग करणाऱ्यांना त्यांच्या उपस्थितीची कल्पना बराच काळ नसते. आलीच तर फार उशीरा येते. मृतात्मे त्यांच्या आश्रयदात्यांना समजत नाही इतके लपून राहतात.

नजरेने प्रेमालाप (Flirting) करण्याचा आनंद घेणारे लोक दुसऱ्या प्रकारच्या मृतात्म्यांचे आश्रयदाते असतात, जे मागच्या जन्मी नपुंसक असतात किंवा लैंगिक सुखाच्या बाबतीत असमाधानी असतात. असे मृतात्मे नेहमी लैंगिक सुखाची हाव असणाऱ्या लोकांच्या माध्यमातून प्रकट होतात. सर्वात वाईट मृतात्मे आज्ञा चक्रातून काम करतात. त्यांच्या आश्रयदात्यांच्या डोळ्यांच्या उपयोगाने दुसऱ्या व्यक्तीकडे सतत पाहून त्याच्यामध्ये घुसतात. आधुनिक समाजात फ्लर्टिंग वाईट समजले जात नाही. परंतु या सवयीपेक्षा अधिक नुकसान करणारे दुसरे काही नाही. त्यांच्यात रमणाऱ्या माणसाचा इतर सर्व प्रकारच्या आनंदातील रस निघून जातो. फ्लर्टिंग करून फसवी मजा घेण्याची अत्याधुनिक पद्धत काही अतिभ्रष्ट मृतात्म्यांनी पृथ्वीवर सुरू केली. त्यामुळे माणसाची सुसंस्कृतपणे सुखाचा उपभोग घेण्याची बुद्धी भ्रष्ट करतात. हे फक्त फ्लर्टिंग करणाऱ्या व्यक्तीसाठीच नुकसानकारक नाही तर, असमाधानी मृतात्म्यांचा प्रवाह मानवी समाजात घुसण्यासाठी पाईपचे काम करते. फ्लर्टिंग करणारी व्यक्ती त्याच्या संमोहित करणाऱ्या अनिमिष नजरेला नियंत्रित करण्याची क्षमता विकसित करते आणि त्याच्या माध्यमातून सामूहिक सुप्त चेतनेतून भयानक वेगाने वर्षाव झाल्याप्रमाणे मृतात्मे बाहेर पडतात. ती व्यक्ती स्त्रीला किंवा पुरुषाला आकृष्ट करण्याच्या नावाखाली एका व्यक्तीकडून दुसरीकडे दृष्टी वळवतात आणि त्यांच्यात मृतात्म्यांचे वाटप करतात. आकृष्ट झालेले सर्व,

तोच खेळ पुढे चालू ठेवतात आणि अजाणतेपणे त्या मृतात्म्यांचे गुलाम होतात.

एका तरुण स्त्रीने माझ्यासमोर मान्य केले की तिला ही सवय एक पन्नास वर्षाच्या वृद्ध माणसाकडून लागली आणि आता तिचे सर्व जीवन या सवयीच्या वर्चस्वाखाली आहे. अनेक तरुण लोक मला विचारतात, की ही गलिच्छ आणि निरर्थक, जी विषाणुप्रमाणे (Virus) पसरत आहे, अशी सवय कशी सोडायची. त्यांना समजले आहे, की या गुलामगिरीमुळे त्यांची बरीच मोठी शक्ती वाया जाते आणि ते प्रामाणिक लैंगिकतेच्या आनंदाला वंचित होतात. जिथे जिथे हा रोग पसरतो तिथे समाजात कृत्रिमपणा वाढतो. फार लवकर नपुंसकता येणे हे या आचरणाचे फलित असते आणि त्याच्यातून एका विष-वलयाची सुरुवात होते. स्त्रियांना त्यांच्या शरीराचे प्रदर्शन करायचे असते आणि फ्लर्ट करण्याची इच्छा वाढते. नपुंसकत्व आल्याने लैंगिक समाधानासाठी फ्लर्टिंगवर जास्त भर दिला जातो.

माझ्या माहितीतील एका श्रीमंत महिलेची पुरुषाप्रमाणे दिसण्याची इच्छा होती (yearning) आणि एका स्त्रीशी लग्न करायचे होते. तिला एका पुरुषाच्या मृतात्म्याची बाधा होती. त्या भुताला काढल्यावर ती पुन्हा नॉर्मल झाली. काही मृतात्मे थोडा वेळ प्रवेश करतात आणि त्यांच्या आश्रयदात्याला लहरी स्वभावाचे बनवतात.

असे म्हणतात की संमोहनामुळे शस्त्रक्रियेच्या वेदना सह्य होतात. याचे कारण असे की, संमोहनाच्या परिणामामुळे काही आराम मिळेल कारण चेतित मनाचे कार्य दुसऱ्या व्यक्तित्वाने आपल्याकडे घेतलेले असते. परंतु हा फायदा फार थोडा काळ टिकतो. बाहेरून अनाहूतपणे घुसलेल्या एक किंवा अधिक मृतात्म्यांना आश्रय दिल्यामुळे सिंपथेटिक नर्व्हस सिस्टीमचे (इडा-पिंगला) कार्य वाढून रुग्णाला त्याच्या लक्षणांचा त्रास दीर्घ काळ सहन करावा लागतो. त्याच्यामुळे सिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम मधली शक्ती व

शक्ती पुरवठा करणारे बाहेर पडतात आणि अशा व्यक्तीला आत्मसाक्षात्कार मिळणे अशक्य होते.

संमोहन शक्तीच्या उपयोगाने बुद्धीला निद्रिस्त करून असंख्यांना संमोहित करता येते आणि त्यामधून एका वेळी हजारो लोकांना नियंत्रणात आणता येते. काही बुद्धिमान दुष्ट भाषणातूनसुद्धा हे करू शकतात. कौशल्याने लोकांचा उपयोग करून घेत काही थोड्या लोकांना संमोहित करून हजारोंना संमोहित अवस्थेत नेता येते. सुरूवातीचे थोडे संमोहित झालेले लोक मृतात्म्यांना आत घेऊन बाहेर सोडणारे प्राथमिक वाहक बनून काम करतात. मोठ्या जनसमुदायाला संमोहित करण्याची कला अवगत असणाऱ्या एकाच व्यक्तीचे जनसमुदायाला आपल्या ताब्यात घेऊ शकणारे प्रभावी व्यक्तित्व त्यांच्यावर वर्चस्व गाजवते. अतिरेकी राजकीय निष्ठा, विशिष्ट धर्माचरणाचा अतिरेक, समूहाचे अविचारीपणाचे क्रूर वागणे, हे त्याचे परिणाम आहेत.

सुखलोलुपतेवर (पंच'म'कार) विश्वास ठेवणारी एक विचारप्रणाली आहे. त्यांचा विश्वास आहे की पाच प्रकारच्या सुखांच्या उपभोगातून त्यांना आत्मसाक्षात्कार मिळू शकेल आणि त्यांचे सर्व आजार आणि कोणताही आजार बरा होईल. असे सर्व विश्वास त्याचप्रमाणे असे प्रयोग ज्याच्यात माणसाला सुप्त चेतनेत साठलेल्या संस्कारांचे विरेचन करायचे असते, हे सर्व पूर्णपणे दिशाभूल करणारे असतात. असे लोक कायमचे सुप्त चेतनेतील जीवाच्या गुलामगिरीत असतात. अशा स्वयंघोषित 'स्वच्छ लोकां' पैकी कोणालाही आत्मसाक्षात्कार देणे जवळ जवळ अशक्य असते. इतर लोक असेही सुचवतात की तुम्ही तुमची कमजोरी (तीव्र इच्छा) दाबून ठेवण्याचा प्रयत्न केल्यास त्या तुमच्यावर नियंत्रण मिळवतील. त्यांच्या मताप्रमाणे तुमच्या तीव्र इच्छा विरघळवण्याचा (निष्प्रभ करण्याचा) उत्तम उपाय म्हणजे त्या इच्छा पूर्ण करण्यास सुखाचा उपभोग घेणे. परंतु तुमचे कपडे

मळले असतील तर त्यांना स्वच्छ करण्यास तुम्ही त्यांना घाणीतच फिरवता का? हा सर्व अधोगतीला नेणारा, विनाशाकडे नेणारा मार्ग आहे, हे माणसांनी समजण्याची आता वेळ आली आहे. मानवाला टिकून राहायचे असेल, तर सुप्त चेतनेचे वर्चस्व टाळले पाहिजे, त्याची किळस केली पाहिजे आणि निंदा केली पाहिजे.

येशू ख्रिस्त भुतांच्या विरोधातील आद्य शिक्षक होते. त्यांनी बाधित आणि आजारी लोकांमधून भुतांना काढून फेकले आणि डुकरांमध्ये घातले. ती पुढे समुद्रात नाहीशी झाली. पण बहुतेक ख्रिश्चन देश सुप्त चेतित मनाच्या शक्तींचा फायदा घेण्यात व्यस्त कसे आहेत त्याचे आश्चर्य वाटते. जुन्या लोकांनी त्यांच्या 'मृत गुरू'साठी भूतविद्येची चर्च आणि मंदिरे उभारण्याची काळजी घेतली. अनेकांचा विश्वास असतो, की त्यांच्यात भुतांचा संचार होतो तेव्हा त्यांना होली घोस्टचे आशीर्वाद मिळतात. पण हे समजायला हवे, की होली घोस्टचा आशीर्वाद आत उतरतो तेव्हा शांती, आनंद आणि स्वत:चे जीवन बदलण्याची शक्ती मिळते, सत्य स्पष्ट होते कारण साधकाला, सामूहिक चेतनेतून दुसऱ्या माणसाचे सूक्ष्म शरीर जाणवते. निर्विचारितेत साक्षीभावाची अवस्था विकसित होते.

माझ्या माहितीतील एका अति श्रीमंत भारतीय माणसाने मला सांगितले, की तो खोट्या गुरूंपैकी एकाला भेटायला गेला होता. त्या गुरूने त्याला कोठून तरी काढून एक हिऱ्याची अंगठी दिली. तो श्रीमंत माणूस यामुळे फार प्रभावित झाला आणि त्याने गुरूच्या खजिन्यात बऱ्याच मोठ्या देणगीची भर टाकली. माझ्या परिचयाच्या त्या श्रीमंत माणसाला मी विचारले, की त्याला आतापर्यंत किती हिऱ्याच्या अंगठ्या मिळाल्या आहेत? तो म्हणाला, त्याने मोजणे थांबवले आहे. मी त्याला विचारले की तो जवाहिऱ्याच्या दुकानातून स्वत:ला आवडणाऱ्या हव्या तेवढ्या अंगठ्या विकत घेऊ शकत होता, तर मग अशा माणसाकडे (खोट्या गुरूकडे) अंगठीसाठी का

गेला? त्याने उत्तर दिले की त्याला वाटले, की त्याचे गुरू फार मोठे देवाचे माणूस आहेत. मला त्या श्रीमंत माणसाला सांगावे लागले, की देवाला बाजारात विकत घेता येत नाही, पण गुरु इतका उदार असेल तर मग ते भारतातल्या गरीब लोकांसाठी अंगठ्या का नाही निर्माण करीत आणि देशाचा आर्थिक प्रश्न का सोडवत नाहीत? आता या वेळी, श्रीमंत माणसाची पत्नी रडू लागली. तिने कबूल केले, की बराच काळ तिला मला भेटून त्या तथाकथित धार्मिक गुरूच्या कचाट्यातून सुटण्यासाठी मदत करण्याची विनंती करायची होती. त्या श्रीमंत माणसाचा खरा प्रश्न होता, की त्याच्या घरातले हिरे चोरीला जात होते आणि त्याच्या पत्नीने कबूल केले की तिच्या अंतर्यामी 'कोणी तरी आहे...'[†]

[†] श्रीमाताजींनी सांगितलेली घटनेची संपूर्ण हकीगत, नवी दिल्ली में २३ फेब्रुवारी १९७७ :
हे गृहस्थ हिऱ्याची अंगठी घेऊन माझ्याकडे आले. 'मला ही हिऱ्याची अंगठी मिळाली आहे.' मी म्हणाले, 'फार छान, आता तुम्हाला माझ्याकडून काय पाहिजे? माझ्याजवळ हिरे नाहीत.' ते म्हणाले, 'नाही श्रीमाताजी, मी परम मागतोय.' मी विचारले, 'तुम्ही ही अंगठी का घेतली. तुम्ही बाजारात अंगठी विकत घेऊ शकता, तुमच्या जवळ किती आहेत?' ते म्हणाले, 'माझ्याकडे पुष्कळ आहेत.' मी विचारले, 'तुम्ही देवाला बाजारात खरेदी करू शकता का?' तो माणूस तस्कर आहे, सगळे आहे. गुरूजींची काही हरकत नाही आणि हा गृहस्थ गुरूजींचा फार मोठा भक्त आहे. जो पर्यंत दोन-तीन विदेशी दारूच्या बाटल्या पाठवतोय, तोपर्यंत गुरूजींना सगळे चालते. नंतर तो माताजींकडे येतो. म्हणून माताजी विचारतात, 'साहेब, आता माझ्याकडे कशाला? मी याबद्दल काय करायचे?' ते म्हणाले, 'माताजी, माझी एक समस्या आहे.' मी विचारले, 'काय समस्या आहे?' ते म्हणाले, 'माझे पुष्कळ हिरे हरवत आहेत.' मी विचारले, 'तुमच्या पत्नीबद्दल काय आहे?' ते म्हणाले, 'अहो, ती तर त्यांना संपूर्ण समर्पित आहे. ती तिकडे जाऊन महिनोन्महिने राहते. तिला पतीची, मुलांचा कशाचीही फिकिर नाही. तिने गुरूजींना स्वत:ला संपूर्ण समर्पित केले आहे.' मग पत्नीला माझ्यासमोर आणले. ती पूर्ण भूतबाधित होती. मी म्हणाले, 'अरे देवा, या बाईला मी काय प्रश्न विचारणार?' मग मी तिचे भूत काढले, पुष्कळ गोष्टी केल्या आणि ते भूत काढले. ती लेडी डॉक्टर आहे. मी विचारले, 'तू लेडी डॉक्टर आहेस आणि तुला काय मिळवायचंय?' ती म्हणाली, 'मला माहीत नाही. कोणी तरी माझ्या आतून मला सांगते की हे सगळे दगड आहेत. गुरूजींना देऊन टाक, तुझ्यासाठी हे सगळे दगड आहेत.' मी म्हणाले, 'वेड्या बाई तुम्ही विवाहित स्त्री आहात आणि तुमच्यासाठी हिरे दगड आहेत, तर तुमचे गुरूजी जे संन्यासी आहेत असे सगळ्यांना सांगतात त्यांच्यासाठी हे धूळ असायला हवेत. हे दगड तुम्ही त्याला का देता? आणि तुमच्या पतीला तुम्ही हे सांगितले नाही.' ते पोलिसांना कळविणार होते आणि गुरूजी अडचणीत आले असते. परंतु हे सगळे असूनसुद्धा, आणि नवऱ्याला दोन हार्ट ॲटॅक येऊन सुद्धा! ते माझ्याकडे पुन्हा पतीला बरे करण्यासाठी आणि हिरे हरवतात म्हणून आले. पण पत्नीला त्या गुरूजीला सोडता आले नाही. इतके ते भूतबाधित आहेत, फार अवघड आहे, आणि हजारो लोक अशा माणसाच्या मागे धावतात कारण संमोहित करणे फार सोपे असते.

जेव्हा मी त्या महिलेला विचारले की, 'हे हिरे मी का घ्यावेत? कोणत्याही आध्यात्मिक व्यक्तीसाठी हे दगडाप्रमाणे मूल्यहीन आहेत.' तेव्हा माझ्या प्रश्नाने तिला मोठा धक्का बसला. डॉक्टर असल्याने तिला या योजनेमागचा खेळ दिसला. सहजयोगाची काही काळ साधना केल्यावर त्या भुताच्या बंधनातून तिची पूर्ण मोकळीक झाली. त्या स्त्रीने मला सांगितले, की या गुरूच्या अनेक स्त्री शिष्यांचे पती लहान वयातच हृदयविकाराने वारले होते आणि तिच्या पतीला पूर्वीच एक हार्टअॅटॅक आला होता. विधवा शिष्यांनी त्यांची सर्व प्रॉपर्टी गुरूला देऊन त्या गुरूबरोबर आश्रमात राहत होत्या. त्या स्त्रिया त्याला स्नान घालून कपडे घालून त्यांची सेवा करत होत्या. तिने असेही सांगितले, की त्या गुरूला चांगल्या व्हिस्कीची आवड होती. हे अनुकरण करण्यासारखे उदाहरण खचितच नाही.

आणखी एक गुरू ज्यांचा मृत्यू झाला आहे, त्याने एक चळवळ स्थापन केली. ती बरीच वाढली. त्याने अनेक परित्यक्ता स्त्रियांना एकत्र करून आपल्या आश्रमात जनानखान्यात ठेवले. त्याचे शिष्य लग्न करत नव्हते, पण त्याच्या समाजात मुक्त शरीर संबंधांना प्रोत्साहन मिळायचे. अजून एक भोंदू. तपस्येच्या नावाने प्रत्येक पाप केले जात आहे. सध्याच्या काळात आपण ज्ञानी व बुद्धिमान लोक असल्याने खऱ्या गुरूंना खोट्या गुरूंपासून वेगळे करणे आपल्याला अवघड नसावे. हे राक्षस अतिसूक्ष्म असून अनेक जड वस्तूंवर उदा.अंगठी, नेकलेस, तावीज इ.आपल्या व्हायब्रेशन्सचा ठसा उमटवू शकतात. अनेक जण त्यांच्या शिष्यांना राख खायला देतात किंवा त्यांच्या फोटोतून राख निर्माण करवतात. माझ्या माहितीप्रमाणे एकही जण पवित्र भस्म देत नाही, तर ते स्मशानातून आणलेली राख वाटतात. जे शिष्य ती राख खातात त्यांच्या शरीरात भुते प्रवेश करतात आणि पोटात राहतात आणि त्या शिष्यांना भूतबाधा होते. शेवटी कॅन्सर अथवा गंभीर मानसिक आजार उद्भवतात.

असे अनेक लोक ज्यांचा मानसिक विकास झाला नाही, पण त्यांच्यात कोणताही हिशेब न करता गणितातील समीकरणे सोडवण्याची अपवादात्मक बौद्धिक क्षमता (prodigies) असते, असे लोकसुद्धा भूतबाधित असतात. अनेक अति बुद्धिमान लोक (geniuses) मृत्यूच्या वेळी असंतुष्ट असतात. अशा मृतात्म्यांना त्यांच्या ज्ञानाचे किंवा कलांचे प्रदर्शन करायचे असते म्हणून त्यांच्याच कुटुंबातल्या एखाद्या लहान मुलात ते घुसतात. अशी मुले सुरुवातीला अगदी नॉर्मल दिसतील. पण ती मोठी होऊ लागतात तशी ती मागे राहत असल्याचे (retarded) दिसून येते. पण अशा मुलांना त्यांच्या देणगीचे समाजात प्रदर्शन करू दिले नाही तर त्यांना वाचवता येईल. त्यांच्यामधल्या मृतात्म्याला प्रदर्शन करू दिले नाही तर त्याला मुलात रुची राहणार नाही.

अशाच असामान्य मुलांचे आई-वडिल माझ्याकडे आले होते. त्यांच्या मुलांना आत्मसाक्षात्कार मिळावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. मला दिसले की त्यांना भुतांनी वेढले असल्याने त्यांची कुंडलिनी चढवणे अवघड होते. असाच एक मोठा बुद्धिमान माणूस मला भेटला तेव्हा तो माझ्यावर सुंदर कविता लिहू लागला. अशाच प्रकारे तो भूतबाधित होता. मी त्या कवीच्या भुताला त्या माणसाला सोडावे म्हणून समजावण्याचा प्रयत्न केला. पण ते तयार होत नव्हते. त्याचे म्हणणे होते, की पुनर्जन्म घेऊन, मोठा होऊन माझ्या मागच्या जन्माबद्दल कविता करून सांगेपर्यंत बराच काळ जाईल. त्याला भीती वाटत होती, पुनर्जन्म घेतल्यावर कदाचित माझ्या मागच्या जन्माबद्दलचे ज्ञान विसरले जाईल. जे त्याला सूक्ष्म आत्म्याच्या अवस्थेत माहिती आहे. ते पुढच्या जन्मात निघून जाईल. पण सहजयोग कार्यान्वित झाल्यावर कवीचा मृतात्मा त्याला सोडून गेला आणि त्या मृतात्म्याच्या आश्रयदात्याला आश्चर्य वाटले, की त्याची सुंदर कविता रचण्याची क्षमतापण त्या मृतात्म्याबरोबर गेली.

भारतीय अध्यात्माच्या प्राचीन ग्रंथात सुप्त चेतनेच्या शक्तींबद्दल स्पष्ट सांगितले आहे. त्याला परलोक विद्या सिद्धी असे म्हटले आहे. भारतातल्या अनेक महान जीवांनी सत्याच्या शोधकांना सूचना दिली होती, की या सिद्धींच्या मागे लागू नका. पण दुर्दैवाने, सुप्त चेतनेने आपल्या वर्चस्वाखाली घेतल्याने त्या जंगलात, सत्याचे शोधक पथभ्रष्ट झाले.

मोठे ऋषी जे दूरच्या जंगलात किंवा निर्गम पर्वतांच्या गुहेत राहत होते, त्यांनी मला सांगितले की सुप्त चेतनेच्या शक्तींनी त्यांना नेहमी मोहात टाकले होते. त्यांच्यापैकी एक ध्यानस्थ असताना त्याच्यावर शंभर आणि एक हजार नोटा येऊन पडल्या होत्या. पण जेव्हा नोटा सोन्याच्या नाण्यात बदलून बाजूला त्याचा ढीग झाला तेव्हा त्याला समजले की असुरी शक्ती त्याला मोहात पाडत होत्या. जेव्हा येशू ख्रिस्तसुद्धा वाळवंटात उपवास करीत होते, तेव्हा सैतानाने त्यांनादेखील जगाचे राज्य देऊ करून मोहात टाकले होते.

सर्व परमेश्वरी अवतारांनी काळी विद्या व दुष्ट शक्ती यांच्यापासूनच्या धोक्याबद्दल स्पष्टपणे पुन्हा पुन्हा सांगितले आहे. शिख धर्माचे संस्थापक आणि आदिगुरुचे अवतार गुरु नानक यांनी मृतात्म्यांच्या धोक्याबद्दल स्पष्टपणे सांगितले आहे. बुद्धिमान व सुशिक्षित लोकसुद्धा याबाबतीत योग्य निवड करण्यास आपली बुद्धी का वापरत नाहीत हे समजणे कठीण आहे. लुच्चे आणि भ्रष्ट खोटे गुरु त्यांची सर्व कमाई निरागस पाश्चात्य साधकांचे पैसे लुबाडून मिळवितात आणि त्यांच्या उत्पन्नावर ऐषोआरामाच्या जीवनशैलीमध्ये राहतात. ते गुरु अनैतिक आचरणाचे असतात, पण पाश्चात्य लोकांना त्याची एवढी भुरळ पडते, की त्या गुरूंच्या विनंतीवरून ते स्वैराचार करायलाही तयार होतात. त्यांच्या गुरु व गुरुवींना प्रसन्न करायला पृथ्वीवरचे कोणतेही पाप ते करतील. एका एकोणीस वर्षीय मुलाला मी स्वत: ओळखते. त्याच्या गुरूने त्याला साठ वर्षाच्या एका स्त्रीशी संग करायला सांगितले आणि त्याने तो केलाही. तो माझ्याकडे आला तेव्हा

अतिशय अशक्त आणि आजारी अवस्थेत होता. अजून एक मला माहिती असलेली केस, एका अमेरिकन तरूणाशी संबंधित आहे. तो मला भेटण्यास भारतात गेला होता. तिथे माझा पत्ता त्याला मिळाला नाही. तेव्हा शेवटी लंडनला माझ्यापर्यंत त्याला पोहोचता आले. बुद्धिमान तरुण माणूस, तो एका प्रतिष्ठित अमेरिकन विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत होता. या गुरूंपैकी एकजण ध्यान शिकविण्याचा क्लास चालवत होता. या अमेरिकन तरुणाने त्या क्लासमध्ये प्रवेश घेतला आणि तिथे ट्रान्समध्ये (अतींद्रिय अवस्था) जायला शिकला. हे सर्व त्या तरुणाने मला सांगितले.

अत्यंत धार्मिक वातावरणात वाढला असल्यामुळे त्याला वाटले की ध्यानाच्या या पद्धतीने त्याच्या मनाला शांत वाटले आणि आराम मिळाल्यासारखे वाटले. त्याला मी सांगितले की आराम वाटण्याचे कारण असे, की ट्रान्सच्या स्थितीत जबाबदारी मृतात्म्याकडे जाते. ट्रान्सच्या स्थितीतल्या माणसाला डॉक्टरांनी तपासले, तर त्यांना समजेल की त्या माणसाचे सिंपथेटिक नसांचे कार्य हळू चालत आहे कारण त्याचा अहंभाव दुसऱ्या व्यक्तित्वाने (मृतात्मा) आपल्याकडे घेतला आहे. हे दुसरे काही नसून संपूर्ण गुलामगिरी आहे. तो तरूण माणूस ट्रान्समधून बाहेर आल्यावर त्याला त्याच्या आई-वडिलांचे जवळच्या नातेवाईकांचे किंवा जे कोणी त्याच्यासमोर येईल, त्यांचा खून करण्याची तीव्र इच्छा झाली. याच्यामुळे तो साहजिकच फार अस्वस्थ झाला आणि त्याला आश्चर्य वाटले, की तो कोणत्या प्रकारच्या ध्यानात गेला होता. त्याने दुसरीकडे मन वळवून ते विचार काढून टाकण्याचा प्रयत्न केला, पण त्याला आढळले, की पहिल्या विचारांच्या जागी आता आत्महत्या करण्याचे विचार येत होते. त्याला वाटले, की असे भयंकर विचार मनात येणारा तो फार वाईट माणूस आहे आणि यामुळे आलेले नैराश्य इतके प्रचंड होते, की त्याने चार वेळा आत्महत्येचे प्रयत्न केले. प्रत्येक वेळी त्याच्या आई-वडिलांनी त्याला

वाचवले. त्याच्याशी बोलत असताना मला समजले, की त्या गुरूने त्याला ट्रान्समध्ये जाण्यासाठी एका शब्दाचा मंत्र सांगितला होता तो शब्द होता 'शृंग'. त्याचा वरवरचा अर्थ होता पर्वताचे शिखर. हा शब्द, शिवाय एका प्राचीन गुरूचे नाव होते.

प्रथम मला याचा अंदाज येईना की अशा गुरुला (शृंग), जो आत्मसाक्षात्कारी जीव होता, भूतविद्येत, सुप्त चेतनेच्या शक्तींमध्ये का रुची असावी. मी त्या तरुणाला माझ्यासाठी ट्रान्समध्ये जायला सांगितले आणि लगेच मला दिसले की त्याला कपाळावर मध्यभागी पिळदार शिंग असलेल्या घोड्याप्रमाणे (युनिकॉर्न) भयंकर दिसणाऱ्या भुताने झपाटले होते. ते अतिशय सैतानी भूत होते. मग मला आठवले, की संस्कृतमध्ये 'शृंग' या शब्दाचा अजुन एक अर्थ आहे 'शिंग'. त्या भुताला मुलापासून वेगळे करणे अवघड होते. मी त्या भुताला रागवले आणि विचारले ते कोण होते. त्याने मला सांगितले की ते त्या खोट्या गुरूच्या प्रमुख गुलामांपैकी एक होते व तो ध्यान शिकवणारा खरोखर एक सैतानाचा अवतार होता. त्याने असेही सांगितले, की त्याचा मालक, ज्याच्या मागच्या जन्मात आदिशक्तीने स्वत: त्याला ठार मारले होते, असा राक्षस होता. त्या भुताने असेही सांगितले, की सुंदर अमेरिका देशात, या मुलाला आणि त्याच्याप्रमाणे पुष्कळांना अशा पद्धतीने झपाटलेले होते. जे संत पुढच्या उत्थानासाठी जन्म घेतात त्यांना नष्ट करण्याच्या हेतूने, त्या भुतांची नेमणूक केली होती. ते भूत असेही म्हणाले, की सर्व सैतानी भुतांना माणसाच्या मनात (Psyche) घुसणे जमत नाही. सर्व राक्षसांना ही परिवर्तनाची शक्ती प्राप्त झाली नाही, म्हणून जास्त माणसांच्या आत्म्यांना नियंत्रणात आणायची गरज होती.त्या गुरूच्या नियंत्रणातली बहुतेक सर्व भुते सैतानी होती. त्या गुरूचा उद्देश हा होता, की जिवंत असतानाच माणसांना नियंत्रणात ठेवायचे म्हणजे मरणानंतर ते पण गुलाम भुते होतील. त्याने पुढे

सांगितले, की सुप्तचेतनेवरील हे आक्रमण, सरकारी पाठिंब्यावर अधिक परिणामकाररित्या घडविता येईल. त्याने असेही भाकित केले की पाश्चात्य जगात सर्वत्र, गुन्हेगारीच्या रोगाची लागण होईल. वेगवेगळ्या सैतानी शक्तीच्या माणसांनी पूर्वीच जन्म घेतला असून ते या मार्गावर आणायला इतरांवर मोहिनी घालत आहेत.

पुढे, मला लागलेला शोध, सावकाश मी त्या तरूणाला सांगितल्यावर त्याला फार मोठा धक्का बसला. हा गुरू प्रत्येकाला एक मंत्र देत होता आणि तो मंत्र गुप्त ठेवावा लागे. लोकांना सांगितले जायचे, की उघड केल्यास मंत्र निष्प्रभ होईल. त्या तरुणाला आढळले की मंत्र म्हणून चार नावे सांगितली जायची, 'ऐम्', 'न्हिम्', 'क्लिम्' आणि 'शृंग'. त्याला दिलेल्या मंत्राचा अर्थ ऐकून त्याला फसवणूक झाल्याचे जाणवले. त्याने सांगितले, की हजारो अमेरीकन तरुण माणसे या खोट्या गुरूचे अनुयायी असून त्याच्या ध्यानाच्या पद्धतीची दीक्षा देण्यासाठी हा शेकडो डॉलर्स घेतो आणि अधिक हजारो डॉलर्स ॲडव्हान्स्ड कोर्ससाठी (पुढच्या शिक्षणासाठी) घेतो. पश्चिमेकडे प्रत्येक घरात या गुरूचे नाव माहीत आहे आणि तरूण लोकांच्या अहंकाराचे चोचले पुरवून त्यांना आकृष्ट करण्याची त्याची पद्धत आहे. साधी निरागस माणसे त्याच्या भाषणांनी, ज्याच्यात वैज्ञानिक शब्द आणि संशोधनात वापरलेल्या भाषेचा उपयोग असतो, त्यांनी भाळली जातात आणि शेवटी मोठी किंमत देऊन भुते विकत घेतात. दुर्देवाने सत्याची शोधक माणसे, या काळ्या विद्येत पारंगत माणसांच्या सापळ्यात अडकतात. ही दुष्ट प्रतिभेची माणसे, ज्यांना स्वत: उत्थान नको असते अशांकडे लक्ष देत नाहीत.

म्हणून आधुनिक काळात अशा सुप्त चेतनेच्या वर्चस्वाच्या फसव्या पद्धतींनी पात्र लोकांचे तसेच सत्याच्या साधकांचे नुकसान होते. म्हणून खोट्या वस्तूंच्या विक्रेत्यांपासून सावध रहा. ते आपण ईश्वराशी जोडले असल्याचा दावा करतात, पण प्रत्यक्षात दुष्टपणाचा व्यापार करतात. फक्त

आत्मसाक्षात्काराच्या अनुभवातून चैतन्य लहरींच्या जाणीवेतून आणि सामूहिक चेतनेच्या प्रदेशात, दुसऱ्यांशी एकरूप होण्याची शक्ती मिळू शकते. अंधपणाने केलेल्या शोधाच्या मागे तुमची बुद्धी आणि शक्ती व्यर्थ दवडू नका. अशा असत्याच्या अनुभवातून तुम्ही तुमचे व्यक्तित्व घालवता आणि शेवटी इतर व्यक्तित्वांच्या वर्चस्वाखाली येता. हे फक्त याच जन्मापुरते नसते, तर पुढच्या येणाऱ्या जन्मातही असते.

ही व्यक्तित्वे तुम्ही नरकात फेकले जाईपर्यंत तुम्हाला सोडत नाहीत. जैन धर्मग्रंथात नरकाचे स्पष्ट वर्णन केलेले आहे. तिथे अनेक स्तर असतात आणि माणूस कोणत्या स्तरावर जाणार ते, त्या माणसाच्या सुप्त चेतित मनात साठवलेल्या सैतानी भुतांवर (satanic entity) अवलंबून असते. आत्महत्येचा विचार करणाऱ्यांनी हे समजले पाहिजे, की जीवनापासून पलायन केल्याने त्याच्यातून बाहेर पडता येत नाही. मृत्यू असे काही नसते. सैतानांनी झपाटलेल्या अवस्थेत आत्महत्या करणे याचा अर्थ असा की तुमचा सैतानी कामासाठी उपयोग केला जाऊन पुढच्या जन्मात तुम्ही पापी व्यक्ती म्हणून जन्माला याल.

सहजयोग कार्यान्वित झाल्यावर भूतबाधित आणि मानसिक, बौद्धिक आजार असलेले लोक बरे झाले आहेत. यांच्यापैकी एक महिला मला भेटायला दिल्लीमध्ये आली होती. तिच्यावर मी उपचार केल्यावर पाच मिनिटात तिला सर्व काही दिसू लागले. तिच्या पोलीस अधिकारी भावाला आश्चर्य वाटले, की इतका काळ अंधपणा असताना स्पष्ट दिसू लागण्यास मी कशी मदत केली. तिच्या आज्ञा चक्रावर एक भूत बसले होते. आज्ञा चक्र हे सूक्ष्म केंद्र ऑप्टिक आणि चियास्मा या दोन नसा जिथे क्रॉस करतात तिथे या चक्राचे स्थान आहे. हे चक्र ऑप्टीक नसेचे आणि शेवटी डोळ्यांच्या कार्याचे नियंत्रण करते. त्या स्थानावरून भूत गेल्याबरोबर त्या बाईला दिसू लागले.

अनेक लोक जे साक्षात्कारी जीव नाहीत, ते भुते पळविण्याची शक्ती असल्याचा दावा करतात. माझ्या अनुभवाप्रमाणे हे लोक एक भूत काढून त्याच्या जागी दुसरे बसवतात. कदाचित ते आपोआप होत असावे. असे लोक सुप्त चेतनेच्या स्तरावर जोडलेले असतात. तिथे ते एका भुताला सोडण्यास मनवतात किंवा हाकलतात आणि रुग्णात दुसरे भूत घालतात. अशा पद्धतीने ते रुग्णाला नियंत्रित करतात. त्याला वाटते तो बरा झाला आहे. ते लोक स्वत:ला तांत्रिक आणि मांत्रिक म्हणवतात. खरे तंत्र कुंडलिनीचे असून हे स्वयंघोषित गुरु तिच्यावर काम करतात तेव्हा ती गोठते. रूग्णाच्या शरीरातील परमेश्वरी दैवते मंद होऊन निद्रिस्त होतात आणि बिचारी व्यक्ती सैतानी भुतांच्या हातात सापडते. मांत्रिकांनी म्हटलेल्या मंत्रांनीसुद्धा दैवते झोपतात. त्यांचे संरक्षण नसल्याने मांत्रिकाला दुष्ट आत्मे व्यक्तीमध्ये घालणे शक्य होते. सर्व मांत्रिक आणि तांत्रिक खोट्या कारणाने पैसे घेतात, आपल्या क्लायंटचे न भरून येणारे नुकसान करतात आणि अशी वाईट कृत्ये करून जमवलेल्या पैशांवर मोठी पापे करीत जगतात.

एकदा मला भेटायला एक महिला आली होती. तिच्या पतीला एक महिला गुरूने घातलेल्या भुताच्या प्रभावाचा भयंकर त्रास होता. त्या महिलेने मला सांगितले की नवरा इतका दारूच्या व्यसनाधीन होता की ते सुटण्याची आशा नव्हती, म्हणून त्या गुरूला भेटायला ती गेली होती. त्या स्त्री गुरूने तिच्या पतीमधले, त्याला दारूचे व्यसन लावणाऱ्या भुताला काढून त्याच वेळी दुसरे भूत त्या माणसात घातले. दुसऱ्या भुताला दारूचे आकर्षण नव्हते, पण जुगार खेळण्याचे होते. त्या महिलेने पुन्हा स्त्री गुरूकडे जाऊन तिला मोठी रक्कम दिली. यावेळी स्त्री गुरूने जुगार खेळणारे भूत काढून त्याच्या जागी अजून तिसरेच भूत ठेवले ज्याला क्रौर्य आणि हिंसाचारातून आनंद मिळायचा. एक दिवस त्या भुताने त्या बाईच्या नवऱ्याला सुरा घेऊन त्या बाईवर आणि स्वत:च्या आईवर हल्ला करायला लावले. यामुळे या

बाईने घाबरून त्या स्त्री गुरूला तिच्या सेवेचे पैसे देणे बंद केले. लवकरच तिन्ही भुते त्या माणसात परतली आणि तो फार आजारी झाला. मी तिच्या नवऱ्यामधल्या त्रासदायक भुतांना हाकलले आणि त्याला व्याधिमुक्त केले. अर्थात् माझ्या पद्धतीप्रमाणे मी एक पैसाही घेतला नाही. यासाठी एक पैसाही तिला खर्च करावा लागला नाही, तर नवऱ्याला आजारी करण्यासाठी तिने हजारो रुपये दिले, याचे त्या स्त्रीला फार आश्चर्य वाटले. ती महिला गुरु फार श्रीमंत असून दुसऱ्या लोकांच्या पैशावर जीवनातले ऐषोआराम उपभोगीत होती. ती फार व्याभिचारी असून अनेकांशी शरीरसंबंध ठेवीत होती. पुढे तिच्या दुष्कृत्यांबद्दल पोलिसांनी तिला अटक केली आणि तुरुंगात टाकले.

मानवी बुद्धीच्या उपयोगाने आपण हे समजायला हवे की खरा धार्मिक माणूस अनैतिक जीवन जगू शकत नाही. निरागसता जीवनाचे सत्त्व आहे आणि पावित्र्य अभिव्यक्ती आहे. लुच्चेपणा, स्वत:चा फायदा पाहणे, क्रौर्य, विषयासक्ती, हव्यास हे जीवनातल्या निम्नस्तरीय नैसर्गिक प्रवृत्ती असून त्या ईश्वरीय माणसाला स्पर्श करू शकत नाहीत. शुद्ध हृदयात अशा दुर्गुणांना स्थान नसते. खरी ईश्वरीय माणसे खोट्या गुरूंपासून फार वेगळी असतात. त्यांचे सहज, प्रेमळ व सदाचारी अस्तित्व असते. जो कोणी धर्माच्या नावाने पैसे मिळवित असेल आणि सुखोपभोगी असेल त्याला निम्नस्तरीय दुष्ट व्यक्ती म्हणून ओळखले जावे.

मुंबईतील एका श्रीमंत माणसाचा त्याच्या गुरूला भेटून परतताना मोटार अपघातात मृत्यू झाला. तो गुरु अजून एक भ्रष्टाचारी होता. तो श्रीमंत माणसाचे सर्व पैसे चोरण्याची व्यवस्था करायचा. मोटार चालक त्या गुरूचा अनुयायी असून त्याने धूर्तपणाने आणि काळजीपूर्वक आपल्या मालकाचा मृत्यू घडवायची व्यवस्था केली. श्रीमंत माणसाची पत्नी त्या गुरूची मोठी भक्त होती आणि तिला पतीच्या निधनाचा मोठा धक्का बसला. त्या गुरूची मोठी भक्त असल्याने गुरूचा दुष्टपणाचा खेळ तिला समजला नाही. इतक्या

हुशारीने तो खून करविला गेला होता, की पोलीसांनाही संशय आला नाही. त्या श्रीमंत माणसाच्या विधवेला नंतर समजले, की त्याची सर्व संपत्ति गहाण असून पैशाचा तपास लागत नव्हता. या कारणामुळे ख्रिस्तांनी हातात आसूड घेऊन सावकारी करणाऱ्यांना मंदिराच्या बाहेर हाकलून दिले. देव आणि पैसे कमावण्याचे उद्योग एका ठिकाणी असू शकत नाहीत. या वास्तवामुळे सर्व धर्मांना सामाजिक, आर्थिक क्लबांच्या पातळीवर आणून ठेवले असून सर्व पंथांचे (cults and sects) नेते सैतानी, पापी आणि फसवेगिरी करणारी माणसे आहेत, याची नोंद घेतली पाहिजे. त्यांना हवे ते मिळविण्यासाठी ते लोक तस्करी, व्यभिचार आणि खून खराबा याचा अवलंब करतात.

मनावर अतिशय संस्कार झाल्याने इडा नाडी उत्तेजित होते आणि त्यामुळे प्रति अहंकार फुगतो. त्याच प्रकारे पिंगला नाडी जास्त उत्तेजित झाल्यास अहंकार फुगतो. अति संस्कारित अहंकाराला किंवा प्रति अहंकाराला तडा जाऊन त्याचे तुकडे पडतात. त्यामुळे तयार झालेली पोकळी सामूहिक सुप्तचेतना किंवा सामूहिक चेतना बाह्यत: यांच्यातून प्रकट होण्यास उत्सुक असणाऱ्या मृतात्म्यांना आकर्षित करते.

त्यांचा प्रवेश ज्याला 'तिसरा डोळा' असे म्हणतात, त्या आज्ञा चक्रातून होतो. या चक्रावर भारतीय स्त्रिया कुंकू लावून किंवा बिंदी लावून ते झाकतात. (संरक्षण करतात). अनेक इंग्लिश लोक या चिन्हाला (कुंकवाला) हसतात. काही लोक कुंकू लावणाऱ्या (बिंदी लावणाऱ्या) भारतीय स्त्रियांची मूर्खपणाने थट्टा करतात. हे कुंकू चिन्ह मृतात्म्यांना प्रवेश करण्यापासून लांब ठेवते आणि हे आदिमातेचे चिन्ह आहे. हे चिन्ह आहे कुमारी मेरी माता यांचे, ज्यांनी मानवतेला वाचविण्यास आपल्या रक्ताचे एकुलत्या एक मुलाचे बलिदान दिले. मेरी यांनी त्यांचे पुत्र येशू ख्रिस्त यांच्या शरीरात वाहणाऱ्या अति मौल्यवान रक्ताचा टिळा धारण केला होता. येशू ख्रिस्त स्वत: आज्ञेच्या सूक्ष्म केंद्राचे रक्षक असून मृतात्म्यांच्या प्रवेशापासून

आज्ञाचक्राचे रक्षण करतात.

मृतात्मे नाभी चक्रातूनसुद्धा प्रवेश करू शकतात. आज्ञा चक्राचा अपवाद सोडल्यास बाकी सर्व सूक्ष्म केंद्रे झाकलेली असतात. अन्नाच्या माध्यमातून मृतात्मे इडा नाडीत प्रवेश करू शकतात आणि प्रति अहंकारात राहून त्या व्यक्तीच्या मनाचे नियंत्रण करू शकतात. स्वयंपाक बनविणाऱ्या माणसाच्या सैतानी विचारांमुळे अन्न दूषित होऊ शकते आणि काही दुष्ट लोक त्या अन्नाच्या उपयोगाने शत्रूला भुरळ पाडू शकतात.

माझ्या माहितीतल्या एका प्रतिष्ठित माणसाने मला एका ब्लॅकमेल करणाऱ्या व्यक्तीबद्दल सांगितले. त्या व्यक्तीने प्रतिष्ठित माणसाला इतका त्रास दिला, की त्याने एका मांत्रिकाला त्याच्यावर आपले मायाजाल टाकण्यास सांगितले. ब्लॅकमेल करणाऱ्याला आचके लागून तो वारला पण प्रतिष्ठित माणसाने आपली प्रतिष्ठा गमावली व तो इतका मानसिक रुग्ण झाला, की त्याचे शरीर सतत थरथरत असे. ब्लॅकमेल करणारी व्यक्ती थडग्यात गेल्यावरसुद्धा त्या बाजूने त्या प्रतिष्ठित माणसाला त्रास देत होती.

माझे अजून एक शिष्य इसफाहन (Isfahan) इराण येथील डॉक्टर आहेत. त्यांनी मला सांगितले, की त्यांनी त्यांच्या कुटुंबियांनी निवडलेल्या महिलेशी लग्न करण्यास कसा नकार दिला. त्या मुलीच्या आईने त्यांच्यावर काही तरी जादू करून त्यांना भूतबाधेने ग्रासित करवले. त्यांना पॅरॅलिसिस होऊन त्यांचा सर्जनचा व्यवसाय बंद झाला. ते माझ्याकडे आले तेव्हा त्याचे थरथरणे थांबू शकत नव्हते. परंतु कुंडलिनी जागृतीतून आणि सहजयोग साधना करून ते पूर्ण बरे झाले आहेत.

अहंकार किंवा प्रतिअहंकाराच्या भूतबाधा तात्पुरत्या किंवा कायमच्या असू शकतात. काही वेळा ती भुते झपाटलेल्या माणसात थोडा वेळ राहतात. ते आक्रमण करणाऱ्या मृतात्म्यांना आपली जागा देतात अथवा आणखी

काही मृतात्म्यांना सुप्त चेतनेच्या स्तरातून बोलावतात. उदा.एका डॉक्टरचा मृतात्मा जो एखाद्या व्यक्तीला झपाटून लोकांना रोगमुक्त करतो, तो इतर डॉक्टर किंवा नर्सेसच्या मृतात्म्यांना मदतीसाठी काम करायला बोलावू शकतो. काही वेळेस ते एका विशिष्ट वेळी नियमितपणे त्याच दिवशी येतात आणि सोडण्यापूर्वी थोडा वेळ थांबतात.

एखादा मृतात्मा जेव्हा कठीण वस्तूला चिकटतो तेव्हा, तो संमोहनातून पारदर्शकतेच्या मागे स्वतःला लपवू शकतो. अशा प्रकारे जी वस्तू पारदर्शक नाही ती पारदर्शक दिसू शकते.

मृतात्मे विविध रंगाचे असतात. गडद काळा रंग ते धुरकट काळा रंग. अहंकारी आत्म्यांचा डाग असलेला सोनेरी रंग असतो. याच्या उलट साक्षात्कारी जीव स्वच्छ स्फटिकाप्रमाणे दिसतात आणि काही वेळेस ताऱ्यांप्रमाणे चमकतात. जिवंत असतांना त्यांचे शरीर होते तसेच त्यांचे चेहरे आणि शरीरे दिसतात. परलोकात राहत असताना त्यांची मृतात्म्यांची शरीरे लहान होत जातात. माणसाच्या भ्रूणाचा जन्म घेते वेळी स्वतःला दोन वेगळ्या अस्तित्वात (किंवा रूपात) स्त्री आणि पुरुष घटकांच्या रूपात विभागतात. पुढे त्यांच्या आई-वडिलांच्या शरीरात, अन्नातून, वातावरणातील धुळीतून किंवा एखाद्या अवयवातून प्रवेश करतात. स्वतःचे आई-वडिल निवडल्यावर वडिलांच्या शरीरात शुक्राणू म्हणून आणि आईच्या शरीरात स्त्री-बीज म्हणून मोठे होतात. म्हणून असे म्हणतात, की विवाह स्वर्गात जुळवले जातात.

जेव्हा कोणाला एखाद्या विशिष्ट व्यक्तीशीच लग्न करण्याची फार इच्छा असते तेव्हा असे समजावे की परमेश्वरानेच त्या जोडप्याला पती आणि पत्नी म्हणून निवडले आहे. हा निर्णय अंतिम असून त्याच्यात कोणी बदल करू नये. अशा विवाहाला आई-वडिल आणि इतर लोकांनी सहमती दिल्यावर सामूहिक मान्यतेने हे कार्य घटित होते. ते मुख्यतः या संबंधातून

भविष्यात मुले जन्माला यावीत यासाठी असते. भारतात जन्मपत्रिका पाहून मुला-मुलींचे विवाह जुळविले जातात आणि ज्योतिषी साक्षात्कारी जीव असल्यास त्याने दिलेला सल्ला सर्वोत्तम असतो. जे लोक प्रेमाला सर्वाधिक मान आणि महत्त्व देतात आणि त्यांच्या विवाहाला समाजाची मान्यता असून अनेकांच्या उपस्थितीत ते संपन्न होतात. अशा विवाहांची अचेतनावर जबाबदारी असते. अशा विवाहात वेगळेच उत्साहाचे व समारंभाचे वातावरण आणि आनंद असतात आणि या विवाहाच्या आनंददायक आठवणी दीर्घकाळ राहतात.

ज्यांना लग्न करायचे असते अशांनीच मुले होऊ द्यावीत. आसक्ती, क्षणिक कामेच्छा किंवा सौंदर्य, समृद्धी, सामाजिक किंवा व्यावसायिक स्थान इत्यादी कृत्रिम विचार जीवनसाथी निवडण्याची न टिकणारी कारणे असतात. त्यांच्या आधारावर ठरवलेली लग्ने शेवटी मोडतात आणि त्यांच्यातून शेवटी त्रासदायक मुले जन्मतात. पश्चिमेकडील वैवाहिक जोडप्यांच्या वागण्यातील स्वैराचार आणि विश्वासार्हतेचा अभाव, यांच्या प्रादुर्भावामुळे त्यांच्यात प्रवेश करणाऱ्या जीवांचे मूळचे स्त्री आणि पुरूष असे अर्धे अर्धे भाग मिसळले जाऊन पूर्वी ठरविल्याप्रमाणे एकत्र येऊ शकत नाहीत. अशा संयोगातून जन्मलेली संताने दुभंगलेल्या व्यक्तित्वाची व क्षुब्ध मनस्थितीची असतात. ते स्वत:शी तडजोड करू शकत नाहीत आणि त्यांचे काही वेळेस दोन वेगळ्या पद्धतीचे जीवन असते.

भारतात कुंडलिनी आणि ईश्वरी आत्मा नसलेल्या मृतात्म्यांचा उपयोग केला जातो. ते भ्रूणात एकाच वेळी प्रवेश करतात. त्या वेळी आपल्याला गर्भाच्या नाडीचे ठोके जाणवतात. साक्षात्कारी लोकांना ते वातावरणात दिसू शकतात, मानवी रूपात नाही, तर जीवाच्या वेष्टणातील कुंडलिनी आत्मा या रूपात. काही वेळेस कुंडलिनीच्या लडी किंवा वलये दिसू शकतात. काळे किंवा पांढरे ठिपके असेही दिसतात. या जीवाच्या आत आत्मा असतो

आणि कुंडलिनीचे शरीर लहान वलयांच्या घडणीच्या रूपात असते. ही चक्रे असतात. काही लोक त्यांना विविध प्रकारच्या प्रकाशाच्या रूपात पाहू शकतात. एकच फक्त कुंडलिनीशी एकरूप झालेला असतो तो म्हणजे आत्मा. तो हृदयाचा प्रकाश असतो.

जीव (souls) म्हणजे काय हे स्पष्ट व्हायला हवे. जीव सूक्ष्म शरीर असते, ते व्यक्तीच्या शरीराचे सूक्ष्म रूप असून त्याच्यात जलतत्त्व आणि पृथ्वी तत्त्व नसतात. जीवात पाच कोष असतात. याच्यापैकी दोघांचे शारीरिक स्तरावर मृत्यूच्या वेळी तुकडे होतात. ते गुणसूत्र (Chromosomes) बनतात. बाकीचे शरीर वेगळे होऊन सामूहिक सुप्त चेतनेत जाते. हे जीव-शरीर बदलत्या रंगात असू शकते, काळा, काळपट-जांभळा, हिरवा, फिका निळा, सोनेरी, स्फटिक ते शुभ्र रंगापर्यंत. ही शरीरे व्यक्तीच्या आजूबाजूला वातावरणात, त्याच्या अतृप्त इच्छांप्रमाणे पसरलेली असतात. ज्या मृतात्म्यांनी सर्व भौतिक इच्छा सहजच त्यागलेल्या असतात ते कोणत्या प्रयत्नांशिवाय मोठ्या उंचीवर, वातावरणाच्या प्रदेशाच्या पलीकडे मानवी दृष्टीच्या पलिकडे जातात. तरीपण काही वेळेस ते पृथ्वीवर उतरू शकतात, आणि आकृतीसारखे दिसू शकतात किंवा काही गोष्टी उघड करण्यास संपर्क करू शकतात.

जे सत्याचे शोधक मार्ग चुकतात, त्यांच्यावर चिरंजीव (देवदूत) लक्ष ठेवून मुलांप्रमाणे त्यांचे रक्षण करतात. या गुरूंना अवधूत म्हणतात आणि रक्षण करणारे देवदूत म्हणूनही ओळखले जातात. ते मुलांप्रमाणे आपले रक्षण करतात. ते खास करून साक्षात्कारी जीवांचे अपघात आणि दुष्ट लोकांपासून संरक्षण करतात.


डावी सिंपथेटिक नाडी संस्था इडा नाडीची स्थूल शारीरिक स्तरावरील अभिव्यक्ती आहे. जेव्हा मनावर संस्कार होतात (सवयी लागतात) तेव्हा ते इडा नाडीच्या माध्यमातून सुप्त चेतनेत जातात (सुप्त चेतना ते संस्कार

घेतो). त्यामुळे उत्तेजित होऊन ते स्पंदित होऊ लागते. प्रत्यक्षात इडा नाडीच्या माध्यमातून कार्य करणारी परमेश्वरी शक्ती, विद्युत चुंबकीय लहरी निर्माण करून संस्कारांचे परिणाम निष्प्रभ करते. जेव्हा संस्कार जास्त गडद असतात तेव्हा विद्युत चुंबकीय लहरी त्यांना पूर्णपणे निष्प्रभ करू शकत नाहीत.

भूतकाळात राहणाऱ्या लोकांत त्याचप्रमाणे अतिवाचन करणाऱ्या लोकांत लवकर गडद संस्कार होण्याचा संभव असतो. दुसऱ्याची सेवा करणारे लोक अतिशय संस्कारित असतात त्यांच्याप्रमाणेच आत्मसाक्षात्कार न घेता परमेश्वराची पूजा करणारे ही मूर्ख लोकही अति संस्कारित असतात. आत्मसाक्षात्कार न घेता सतत नामजप करून आपली बुद्धी किंवा अहंभाव अर्पण करणारे तसेच स्वत:ला जबरदस्तीने नियंत्रित करणारे तेवढेच गडद संस्कारित होतात. आपल्या लहानपणापासून आपल्याला न समजता संस्कारित होणे चालू असते आणि सर्व संस्कार सुप्त चेतनेत साठवले जातात.

आपण आयुष्यभर आपले गतकाळातले अनुभव सुप्त चेतनेत साठवित जातो. इडा आणि पिंगला दोन्ही नाड्या सूक्ष्म केंद्रात (चक्रांत) परस्परांना जोडलेल्या असतात. (आकृती ६) चक्रांवरील परमेश्वरी दैवतांना, इडा-पिंगला नाड्यांच्या माध्यमातून व प्रति अहंकार आणि अहंकार यांच्यापासून संस्कार मिळत असतात. प्रतिसाद देतांना दैवते चैतन्य लहरींचा किंवा सृजन शक्तीचा पुरवठा करतात. या चैतन्य लहरी प्रणवाचे प्रवर्तक (इंपल्स) या स्वरूपात सोडल्या जातात. ही प्रवर्तक (इंपल्स) गँग्लिऑनच्या (लहान नसांच्या तंतूच्या गाठी ज्या मेरुदंडाच्या बाहेरच्या बाजूस असतात) असलेल्या तंतूमधून प्रत्येक गँग्लीऑनमध्ये जातात व पुढे गँग्लिऑनच्या नंतर, अवयवांमध्ये असलेल्या नसांच्या तंतूमध्ये जातात. अशाप्रकारे अधिक विद्युत-चुंबकीय शक्ती, ज्या

ठिकाणी शक्ती पुरवठ्याची आवश्यकता असते तिकडे प्रवाहित होतात. अहंकार उजव्या नाडी सिंपथेटिक नाडी संस्थेला तर प्रति अहंकार डाव्या नाडी संस्थेला उत्तेजित करतात. तातडीच्या वेळी थकलेल्या पिंगला व इडा नाड्यांमधील संपलेली शक्ती भरण्यासाठी दैवते अधिक प्रणव सोडतात. आकृती क्र.६ मध्ये दाखविल्याप्रमाणे या नाड्या कार्य करतात.




**आकृती ६**

इडा आणि पिंगला नाड्या चक्रांना वेढून त्यात विराजमान दैवतांकडून कार्य करण्याबद्दल आज्ञा घेतात आणि ग्रंथीतंतु (ganglion fibers) मध्ये विद्युत चुंबकीय प्रेरणा, ॲड्रेनलिन तयार करण्यास निर्माण करतात. या दोन नाड्या इतक्या परस्परांवर अवलंबून आहेत आणि इतक्या एकमेकांना प्रभावित करतात की असे दिसते, की एकत्र काम करून त्या शरीराला आणि मनाला उत्तेजना देतात. अतिशय कार्य केल्याने परमेश्वरी शक्ती संपून शक्तीहीन अवस्था येते.

सुखासीनता, आळशीपणा, अमली पदार्थांचे सेवन, संस्कार यांच्यामुळे डाव्या बाजूवर काम होऊन जाणीवेमध्ये कमकुवतपणा (depression) खळगा येतो. तसेच ज्यांना इडा नाडी उत्तेजित करण्याच्या काळ्या विद्येचे ज्ञान आहे, असे दुष्ट लोक, मुद्दाम डाव्या बाजूवर काम करून नकारात्मक शक्ती घालतात व जाणीवेत कमकुवतपणा आणतात. पिंगला नाडीतील परमेश्वरी शक्ती मृतात्म्याला घालून कृत्रिमरीत्या उत्तेजित केल्यामुळे त्या नाडीतली परमेश्वरी शक्ती फार लवकर खर्च होते.

आकृती क्र.६ मधून आपल्याला दिसू शकेल की दोन्ही इडा आणि पिंगला नाड्या सूक्ष्म केंद्राभोवताली जातात.

सूक्ष्म केंद्रापैकी मूलाधार चक्र पेल्व्हिक प्लेक्सेसचे आणि म्हणून लैंगिक कार्याचे नियंत्रण करते. म्हणून या दोन्ही नाड्या सेक्सशी बळकट जोडलेल्या आहेत. अभिजात हठयोगाची साधना करणारे, अथवा दुसरी साधना करणारे, ज्याच्यात अनैसर्गिकपणे ब्रह्मचर्य पालनाची सक्ती केली जाते, असे लोक त्याग करण्यासाठी कृत्रिमपणे सेक्सपासून पलायन करण्याचा प्रयत्न करतात. हा कर्मठपणा त्यांना थंड आणि प्रेमाच्या बाबतीत संवेदनाहीन बनवतो.

ह्याच्या उलट अतिशय विषयासक्त लोक त्यांची इडा नाडी उत्तेजित करतात. प्रत्यक्षात, सेक्सपासून पलायन करणे किंवा सेक्सच्या मागे लागणे, दोन्ही एकच आहे. कारण या दोन्ही वागण्यांमुळे सेक्सला जास्त महत्त्व दिले जाते. सेक्स शक्ती अजिबात नाही तर ती परमेश्वरी शक्तीची प्रणवाची अभिव्यक्ती आहे आणि ती क्षणार्धात इडा किंवा पिंगला नाडीतून आणि स्वत: कुंडलिनीतून बाहेर येते. ज्यांना दुसऱ्या कार्यात रुचि असते त्यांची सेक्समधली रुचि आपोआप संपते. वरच्या बाजूच्या चक्रांवर ही कार्ये होत असल्याने आपल्याला असे म्हणता येईल, की त्यातून सेक्सच्या एनर्जीचा उच्च प्रतीच्या कार्यासाठी उपयोग होतो. अशा उच्च प्रकारची कार्ये केल्याने सूक्ष्म अहंकार आणि शुष्क स्वभाव तयार होतो. अति विषयोपभोग किंवा उच्च कार्यासाठी सेक्सच्या एनर्जीचा उपयोग करणे, हे दोन्ही कसे थांबवायचे हा मूळ प्रश्न आहे.

सहजयोग हेच त्याचे उत्तर आहे. सहजयोग चित्ताला मध्यभागी, वर्तमानातल्या क्षणात ठेवतो. या स्थानावरून माणूस साक्षी भावाने सेक्सच्या कृत्याकडे पाहतो. त्याच्यात अडकत नाही आणि त्याच्याबद्दल निरासक्तही होत नाही. त्याच बरोबर जेव्हा अतिविषयासक्त होऊन चित्त इडा

नाडीवर जाते तेव्हा व्यक्ती उरोज किंवा डोळे यामार्फत लैंगिक सुख उपभोगू लागतो. आपण पाहिले आहे, की सध्याच्या दिवसात डोळ्यांनी फ्लर्टिंग करणे ही सर्वसामान्य क्रिया झाली आहे. सेक्सबद्दल वाचन करूनसुद्धा मनाने त्याचे सुख घेता येते. या सर्व विकृती असून त्याच्या मुळे शरीरसुखाचे प्रमाण कमी होत जाऊन शेवटी नपुंसकता येते.

## प्रकरण ६

# तंत्रवाद

जर तंत्र याचा अर्थ यंत्रणा चालवण्याची पद्धत आणि यंत्र याचा अर्थ यंत्रणा असा असेल, तर तंत्रवाद याचा खरा अर्थ कुंडलिनी योग असाच घ्यायला हवा. कुंडलिनी ही मानवी चित्त परमेश्वराशी एकरूप करण्याची यंत्रणा असून तिची जागृती आणि उत्थान विनासायास (सहज) घटित होते.

कुंडलिनी ही शेष चेतना असल्याने बीजाच्या अंकुराशी जुळणारे तिचे स्वरूप आहे आणि तिचे स्थान पवित्र अस्थी (माकड हाड) आहे. या बीजाचे अंकुरित होणे, जेव्हा ते कोंब फुटण्यास तयार असते, तेव्हाच शक्य होते. फक्त सद्गुरूच किंवा सहजयोगीच कुंडलिनीची तिच्या सुप्त स्थितीमधून जागृती करू शकतो - साक्षात्कारी किंवा बोधित (प्रकाशित) जीव योगी असतो. आणि ज्या योग्याला कुंडलिनी जागृत करण्याच्या कलेचे ज्ञान आहे तो सहजयोगी. जसा एक माळी बीजे अंकुरित व्हावी आणि वाढावी यासाठी झाडांना पाणी घालतो तसा सद्गुरू किंवा एक सहजयोगी त्याच्या ईश्वरीय व्यक्तिमत्त्वातून वाहणारे चैतन्य लहरींचे पाणी साधकावर ओततो.

प्रत्येक माणसात त्याची वैयक्तिक कुंडलिनी असते. ती त्या व्यक्तीची स्वत:चीच आई असते आणि ती व्यक्ती त्या कुंडलिनीचे एकमेव मूल असते. कुंडलिनी सर्वव्यापी परमेश्वरी प्रेमाचा भाग असल्याने सद्गुरु किंवा साक्षात्कारी जीव, ज्याला परमेश्वराने अधिकार दिला आहे तोच फक्त कुंडलिनीला हलवू शकतो. कुंडलिनीला हलविण्यासाठी धार्मिक (सदाचारी) आणि ईश्वरी व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता असते, कारण कुंडलिनी स्वाभाविकपणे त्या माणसाच्या आत्मिक अंगाची गुणवत्ता जाणते व समजते. फक्त अशाच व्यक्तिमत्त्वाला प्रत्येक माणसाच्या कुंडलिनीचे सविस्तर ज्ञान असते. कुंडलिनीच्या मार्गात कोठे अडथळा आहे हे तो लगेच

समजू शकतो आणि आपल्या बोटांनी कुंडलिनीला चढवून आत्मसाक्षात्कार देऊ शकतो. अशी व्यक्ती सद्‌गुणांची मूर्ती असली पाहिजे, हे स्पष्टपणे लक्षात घ्यायला हवे. तथाकथित तांत्रिक याच्या अगदी विरूद्ध असतात.

सद्‌गुरु किंवा सहजयोगी कुंडलिनी जागृत करतो तेव्हा कोणतेही दृश्य परिणाम नसतात. साधकाची कोणतीही शारीरिक हालचाल होत नाही किंवा त्याला कोणत्याही त्रासाचा अनुभव येत नाही. साधकाच्या मज्जारज्जूमध्ये कुंडलिनी चढते तेव्हा ते स्पष्ट दिसू शकते. एखाद्या सूक्ष्म केंद्रावर (चक्रावर) थांबून राहते तेव्हा कुंडलिनीचे तिच्या स्थानातील, माकड हाडातील स्पंदन स्पष्ट दिसू शकते. सर्व चक्रांमधून तिचे पूर्ण उत्थान झाल्यावर, टाळूमधील ब्रह्मरंध्र छेदून ती सर्वव्यापी परमेश्वरी प्रेम शक्तीशी मिलन प्रस्थापित करते. ज्याच्याजवळ दुसरा जन्म घटित करवण्याची क्षमता आहे तो खरा तांत्रिक कारण तो स्वत:च्या पवित्र, निष्कलंक परमेश्वरी प्रेमाच्या तंत्राने कुंडलिनीला, यंत्राला कार्यान्वित करतो.

आरंभीच हे स्पष्ट व्हायला हवे, की तंत्रवाद हा शब्द, कुंडलिनी जागृतीच्या विरोधी काम दर्शविण्याच्या अवस्थेत आला आहे. या शब्दाचा अर्थ असा झाला आहे, की कुंडलिनीला जागृत करण्यास चुकीची पद्धत अवलंबिणे आणि आता तंत्रवाद नुकसानकारक प्रणाली झाला असून मोठ्या संख्येने लोक त्याचा अंगीकार करत आहेत आणि त्याच्यामुळे कुंडलिनी जागृती घटित होण्याची शक्यता नष्ट होत आहे. याचा परिणाम असा होतो, की अनेक माणसांची आत्मिक उन्नती प्रारंभीच खंडित होते.

सात चक्रांपैकी मूलाधार चक्र सर्वात खाली आहे. या ठिकाणी निरागसतेचे (अबोधिततेचे) प्रतीक श्रीगणेश, मुख्य दैवत आहेत. शेवटचे चक्र असल्याने त्याचे स्थान कुंडलिनीच्या पुष्कळ खाली आणि तिच्या पुढच्या बाजूस प्रोस्टेट ग्रंथीमध्ये आहे. हे महत्त्वाचे केंद्र मज्जारज्जूच्या बाहेरच्या बाजूस असून पेल्व्हिक प्लेक्सेसच्या चार सब प्लेक्सेसचे नियंत्रण

करते, जे पुरुषांमध्ये सेक्सचे नियंत्रण करते. या चक्रातून श्रीगणेश आपल्या आईच्या प्रोटोकॉल्सचे (मान सन्मान) रक्षण करतात. याची नोंद घ्यायला हवी की कुंडलिनीचे स्थान त्रिकोणाकृती अस्थि, ज्याला मूलाधार असे नाव आहे, पुष्कळ वरच्या बाजूस असून सेक्सच्या जागेतून कुंडलिनीच्या बाजूस प्रवेश नाही. म्हणून कुंडलिनी जागृती आणि सेक्स यांचा परस्परांमध्ये काही संबंध नाही.

जेव्हा कोणी सेक्सचा उपयोग करून कुंडलिनीला जागृत करायचा प्रयत्न करण्याचे पापकर्म करतो तेव्हा श्रीगणेश रागावतात आणि त्यांचा क्रोध शरीरात उष्णतेच्या रूपाने ओततात. प्रत्यक्षात त्यांचा क्रोध डावी किंवा उजवी सिंपथेटिक किंवा दोन्ही बाजूंना एकदम उत्तेजित करतो. या दोन्ही यंत्रणा मज्जारज्जूच्या बाहेरच्या बाजूस असतात आणि त्यांना अभिव्यक्त करणाऱ्या इडा-पिंगला नाड्या मज्जारज्जूच्या आतल्या बाजूस असतात. संपूर्ण सिंपथेटिक नसांची यंत्रणा डाव्या आणि उजव्या बाजूस, शेवटचे केंद्र मूलाधार चक्राशी संलग्न असल्याने श्रीगणेश रागावतात तेव्हा ती संपूर्ण यंत्रणा उत्तेजित होऊन अधिक कार्य करू लागते. पॅरासिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम मध्यवर्ती सूक्ष्म मार्गाची (सुषुम्ना नाडीची) स्थूल अभिव्यक्ती आहे. ती साधक स्व प्रयत्नांनी कार्यान्वित करू शकत नाही. जेव्हा तो असा प्रयत्न करतो तेव्हा लगेचच त्याचे चित्त पॅरासिंपथॅटिक कडे न जाता सिंपथॅटिक नाडी यंत्रणेवर जाते. पॅरासिंपथॅटिकवर कधीही जात नाही.

श्री गणेशांच्या क्रोधाचे परिणाम, चुकीच्या पद्धतीने उत्तेजित केले गेलेल्यावर असे होतात, की त्यांना मोहावस्थेत घातले जाते, ते उड्या मारू लागतात किंवा ओरडू लागतात. त्यांना थांबवता येत नाही. काहींना उष्णतेचा अनुभव येतो, तर काहींच्या अंगावर फोड येतात. बाकीच्यांना इतका त्रास होतो, की त्यांना गांधीलमाशांचे थवे चावत आहेत असे वाटते किंवा त्यांना इतके दुखते, की जणू काही आगीत त्यांचे शरीर नष्ट होत आहे.

ही लक्षणे झपाट्याने वाढणाऱ्या कॅन्सरच्या रुग्णांच्या त्रासाप्रमाणे आहेत. कारण कॅन्सरचा विकारसुद्धा सिंपथॅटिक नाडी संस्थेच्या अधिक कार्यामुळे होतो. जेव्हा कुंडलिनीचे पूर्ण ज्ञान नसलेले लोक किंवा अनधिकृत लोक कुंडलिनी जागृतीचा प्रयत्न करतात तेव्हा वरील लक्षणे दिसतात. ही लक्षणे म्हणजे श्रीगणेशांच्या क्रोधाची अभिव्यक्ती असून कुंडलिनी जागृतीची नाहीत. साधकाची आई म्हणून अनेक जन्म ती या विनासायास मुक्तीच्या क्षणाची प्रतीक्षा करत असते. वास्तविक कुंडलिनी तिच्या एकुलत्या एक मुलाला कधीही छळणार नाही आणि साधकाला खरा सद्‌गुरु किंवा योगी भेटेपर्यंत जागृतही होणार नाही. ज्यांना परमेश्वराची निवडलेली उपकरणे म्हणून अधिकार मिळाला आहे अशी माणसेच त्यांच्यावर असलेल्या परमेश्वरी कृपेने (शक्तिपात) साधकाला खरा आशीर्वाद देतात. मग कुंडलिनी सहजरीत्या मज्जारज्जूतील सूक्ष्म मध्यमार्गातून (सुषुम्ना नाडीतून) उत्थापित होऊन आत्मसाक्षात्कार देते.

माझ्या सहजयोगाच्या कार्यात, भारत आणि पश्चिमेकडील हजारो लोकांनी कुंडलिनीचे उत्थान अनुभवले आहे आणि कोणत्याही प्रयत्नांशिवाय आत्मसाक्षात्कार मिळवला आहे. आतापर्यंत एकसुद्धा अपघाताची किंवा उपरोक्त लक्षणे उद्‌भवल्याची केस झाली नाही. याचे उलट कुंडलिनीचे उत्थान होताना कॅन्सर, मधुमेह, एड्‌स, ल्युकेमिया या सारख्या आजाराचे रुग्ण व्याधिमुक्त झाले आहेत.

आत्मसाक्षात्कारानंतर लोकांना जाणीवेच्या निर्विचार अवस्थेचा (निर्विचार समाधी) अनुभव येतो. त्यामध्ये त्यांना शीतल आल्हाददायक परमेश्वरी प्रेमाच्या लहरींचा (चैतन्य लहरींचा) अनुभव येतो. योगी चैतन्य लहरींच्या सूचनांचा अर्थ लावणे शिकतात आणि त्यांचे स्वत:च्या कुंडलिनीवर प्रभुत्व येते. पुढे कुंडलिनी जागृती करून आत्मसाक्षात्कार देण्याची क्षमता विकसित करतात. अनेक सहजयोग्यांनी स्वत:

कॅन्सरसारख्या दुर्धर व्याधींनी जर्जर झालेल्या हजारो लोकांना रोगमुक्त केले आहे. व्याधींपासून मुक्तता आत्मसाक्षात्काराबरोबर बाय प्रॉडक्ट या स्वरूपात घटित होते. तो उद्देश्य नाही. जे साक्षात्कारी नाहीत अशा लोकांनी केलेल्या आत्मिक व्याधीमुक्तीशी (spiritual healing) याची गफलत करू नये.

कुंडलिनी जागृतीतून आत्मसाक्षात्कार देत असल्याचा अनेक लोक दावा करतात. त्याच्यापैकी अनेकांशी माझी भेट झाली आहे. त्यांच्या पद्धतीला ते शक्तिपात, ध्यान म्हणतात. सहजयोग असेही म्हणतात, पण कुंडलिनीची जागृती होत नाही. उलट त्यांच्या प्रभावाखालच्या माणसाचे शरीर तापते, तो उड्या मारतो व ओरडू लागतो. अशा फसवणाऱ्या लोकांपैकी काही दावा करतात की ते तिसरा डोळा उघडतात. मूलाधार चक्रावर काम करून सेक्सचे स्थान उत्तेजित करतात किंवा ऑप्टिक थॅलॅमस यांच्या मध्यावरील आज्ञा चक्रावर काम करतात. या सूक्ष्म केंद्राची खिडकी कपाळाच्या केंद्रबिंदूवर असते. तथाकथित तांत्रिक या चक्राद्वारे अहंकार किंवा प्रति अहंकारात भूत घुसवू शकतात.

जेव्हा ते असे काम करतात तेव्हा साधकाला थोडा काळ, स्फुल्लिंग किंवा प्रकाश बिंदू दिसतो. अशाप्रकारे साधकाचे चित्त सरळ (short circuited) सामूहिक सुप्त चेतनेत ओढले जाते आणि त्याला दारू प्यायलेल्या किंवा अमली पदार्थ घेतलेल्या माणसाला जाणवते तसे शांत वाटते. आपण स्वत: बरोबर सुखी आहोत असा तो विचार करीत असेल पण ते सुख तो दुसऱ्याला देवू शकत नाही. त्याची मानवी जाणीव प्राण्याच्या जाणिवेच्या पातळीपर्यंत खाली जाते आणि जशी त्याची जबाबदारी चेतनेतून सुप्त चेतित मनात जाते तसे तो वास्तवापासून पलायन करतो. त्या क्षणी त्याचे विचार करणे थांबते पण त्याला स्वत:मध्ये बदल किंवा परिवर्तन करणे जमत नाही. यांच्यापैकी एकही व्यक्ती स्वत:च्या खऱ्या स्वरूपाचे सत्य, जे

त्यांच्यामध्ये सुप्त आहे, ते जाणू शकत नाही.

जागृत झाल्यावर हे खरे स्वरूप (आत्मा) स्वत:स अभिव्यक्त करते आणि आत्मसाक्षात्काराच्या थंड चैतन्य लहरी जाणवतात. चैतन्य लहरी वाहू लागतात. विशेषत: बोटातून वाहू लागतात. ही परमेश्वरी प्रेमाची शक्ती विचार करते, योजना आखते, संघटन करते आणि प्रेम करते. या सर्वव्यापी शक्तीत आल्यावर जाणिवेच्या निर्विचारितेच्या क्षेत्रात प्रवेश होतो. या चैतन्य लहरींचा अर्थ लावून पुनर्जन्म होतो आणि उत्क्रांती घटित होते.

साधकाने प्रत्यक्षात आत्मा (self actualization) होणे याची अनुभूती घ्यायला हवी आणि आत्मसाक्षात्काराचा त्याने वैयक्तिकरित्या अनुभव घ्यायला हवा.

सहजयोगी शांत, निरोगी आणि सूज्ञ व्यक्ती होतो. याचा अर्थ असा, की त्याला स्वत:च्या आणि इतरांच्या कुंडलिनीच्या समस्या समजतात. त्याच्या हाताच्या बोटांवरील थंडपणा किंवा उष्णता या संवेदनांच्या रूपाने त्याला समस्येची जाणीव होते. अशाप्रकारे त्याच्या हातांच्या बोटांवर त्याला अर्धवट ज्ञान असलेले गुरु आणि दुष्ट तांत्रिक यांच्यामुळे, उद्भवलेले आजार, भावनिक समस्या आणि आत्मिक अडथळे आणि बाधा ओळखता येतात. माझ्या सहजयोग शिकविण्यामुळे अडथळे कसे काढायचे आणि परमेश्वराकडून येणाऱ्या सूचनांचा (संकेतांचा) कसा अर्थ लावायचा याचे सहजयोग्यांना ज्ञान मिळते. सहजयोगी जसजसा त्याच्या आंतरिक शांतीशी एकरूप होतो तसे त्याच्या जाणीवेत आत्मतत्त्व आणि सर्वशक्तिमान परमेश्वर याचे ज्ञान प्रकाशित होते. हळूहळू त्याला परमेश्वराची उपस्थिती, परमेश्वरी प्रेमाच्या सर्वव्यापी शक्तीच्या अमूर्त रूपात जाणवते. त्याला चैतन्य लहरींचा प्रवाह जाणवतो आणि साक्षीभावाने त्यांचे कार्य पाहतो. सहजयोगात सहजयोगी साक्षी स्वरूपात असतो आणि उलगडत जाणाऱ्या नाटकाच्या प्रेक्षकांप्रमाणे जगाकडे पाहतो.

लबाड तांत्रिकांनी चुकीच्या पद्धतींनी कुंडलिनी आणि सूक्ष्म केंद्रे हाताळल्यामुळे किंवा साधकाने स्वतःच मूर्खपणाच्या आणि अज्ञानी पद्धतींचा वापर केल्याने आत्मसाक्षातकारात फार मोठा अडथळा तयार होतो. एखाद्याच्या कुंडलिनीचे नुकसान करून त्याचे उत्थान धोक्यात आणणे हे परमेश्वराच्या नजरेत महापाप आहे. साधक अशा अनधिकृत माणसासमोर नतमस्तक झाला असल्यास व नंतर तो सहजयोगात आल्यास आत्मसाक्षात्कारासाठी त्याची अत्यंत अवघड केस असते. याचे कारण असे, की परमेश्वर हे एक पाप सोडून इतर सर्व पापांना सहज क्षमा करतो. मानव ही परमेश्वराची सर्वोच्च निर्मिती आहे आणि मानव म्हणून आपण अशा लोकांसमोर, केव्हाही नतमस्तक होऊ नये, जे लोक परमेश्वरापासून दूर असतात व त्यांच्या योजनेला विरोध करतात. अजाणतेपणी जरी आपण हे केले असले तरी परमेश्वर या पापाला लवकर क्षमा करीत नाही, असे लोक माझ्यासमोर येतात तेव्हा त्यांना आपले कंप पावणे नियंत्रित करता येत नाही. शिवाय ते फोड येईल इतकी उष्णता बाहेर सोडतात. कोणत्याही साक्षात्कारी जीवाला त्याची अनुभूती मिळेल. विशेष म्हणजे मनोरुग्णालयातील रुग्णसुद्धा माझ्या समक्ष अगदी तसेच वागतात, पण कमी उष्णता सोडतात.

तांत्रिक आणि मांत्रिक लोक अगणित साधकांच्या नुकसानीस जबाबदार आहेत. त्यांनी हे सगळे त्यांच्या कृत्यांची पूर्ण जाणीव ठेवून केले आहे. तंत्रवाद एक प्राचीन पद्धती असून गतजन्मी तांत्रिक असलेल्या राक्षसांनी पुनर्जन्म घेऊन ती पद्धत पुनर्जीवित केली. रावण, महिषासुर, मधु, कैटभ, कोलासुर असे दैत्य या कलियुगात पुन्हा जन्माला आले आहेत. ताडिका, हिडिंबा, पुतना आणि शूर्पणखा या राक्षसींनीसुद्धा या वेळी जन्म घेतला आहे. अशा अस्तित्वांना जीव नसतो. सद्सद्विवेक नसतो व भावनाही नसतात. त्यांच्यापैकी काहींचे अत्यंत हीन पातळीचे जीवन असते. खाजगी जीवनात आपल्या अनुयायांना लैंगिक उत्तेजना देण्याच्या अनेक

पद्धतींचा अवलंब करतात. त्यांच्याबद्दल सविस्तर लिहिणे सभ्यतेच्या दृष्टीने अयोग्य आहे. पैसा, सेक्स व मद्य यांच्याबद्दल त्यांची वासना संपत नाही आणि बिनदिक्कतपणे दुसऱ्यांच्या कुंडलिनी नष्ट करतात.

तांत्रिक लोक त्यांच्या अनुयायांच्या मनावर नियंत्रण मिळविण्यात कसे प्रभावी होतात ते आपण आता पाहू. त्याच्यासाठी प्रथम आपल्याला मानवी देहातील ज्ञात व अज्ञात क्षेत्रे स्पष्ट समजावून घ्यायला हवीत.

आकृती ७ मध्ये मानवी व्यक्तित्वाचे त्याच्या भोवतालच्या वातावरणाच्या संबंधात चित्रण आहे. मानवी व्यक्तित्वाच्या डाव्या बाजूस इडा नाडीच्या पलिकडे सामूहिक सुप्त चेतना आहे. मृत झालेले सर्व त्याच्या साठवले जाते. ही सूक्ष्म नाडी, स्थूल स्वरूपात डावी सिंपथॅटिक नाडी संस्थेच्या रूपाने अभिव्यक्त होते. मनात साठलेले सर्व संस्कार प्रति अहंकाराच्या माध्यमातून या नाडीत साठवले जातात. अति संस्कारित झालेले लोक मृत्यूनंतर या भागात राहतात. मानवी व्यक्तित्वाच्या उजव्या बाजूस पिंगला नाडीच्या पलीकडे सामूहिक चेतना बाह्यता (collective supra conscious) असून त्याच्यात जे भविष्य आहे, ते सर्व साठवले जाते. जे लोक भविष्याविषयी जास्त काळजी करतात, अतिमहत्त्वाकांक्षी आहेत, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे आत्मे सामूहिक चेतना बाह्यतेत साठवले जातात. या दोन्हीपैकी प्रत्येक क्षेत्रात सात स्तर असून त्यांत विविध प्रकारच्या लोकांच्या मृतात्म्यांचे वास्तव्य असते.


डाव्या बाजूकडे सर्वात खालच्या स्तरावर अत्यंत भ्रष्ट व नीच सैतानी लोकांचे (पिशाच्चे) मृतात्म्यांच्या रूपात वास्तव्य असते तर उजव्या बाजूकडे सर्वात खालच्या स्तरावर अतृप्त राक्षसी आत्मे (राक्षस) असतात. साक्षात्कारी जीवाचे स्थान Super conscious परम चेतना भागात असून तो भाग आदि पुरुषाच्या मस्तकाच्या वरच्या बाजूस असतो. (आकृती पाहावी) सर्वसामान्य लोक वरच्या स्तरावर सुषुम्नेच्या मध्यमार्गाच्या जवळ असतात

तर मानवी व्यक्तित्त्वाच्या खालच्या बाजूचा भाग असणाऱ्या विविध स्तर असलेल्या नरकाची बाजू उघडी असते. व्यक्ती जेव्हा आपले संपूर्ण पावित्र्य नष्ट करते तेव्हा तिला श्रीगणेश नरकात फेकतात.

साधक पहिल्यावेळी जेव्हा ध्यान-धारणेसाठी सेक्सच्या-केंद्राचा उपयोग करतो तेव्हा तो करीत असलेली गंभीर चूक दर्शविण्यास श्रीगणेश त्याच्या मूलाधार चक्रावर दिसतात. ते साधकाच्या सिंपथॅटिक नाडी संस्थेच्या बाजूस उष्णतेच्या लाटा फेकतात. त्या साधकाला अनेक प्रकारे उत्तेजित करतात. ध्यानात प्रत्यक्ष श्रीगणेशांचे प्रतीक त्याला दिसते आणि हे सुचवते की साधक म्हणून लहान मुलासारखे सेक्सच्या बाबतीत निरागस असले पाहिजे. साधकाने या इशाऱ्याकडे लक्ष दिले नाही, तर श्री गणेश त्याच्या वर्तणुकीवर क्रोध दर्शवतात. काही वेळेस त्याच्या आज्ञा चक्रावर प्रकाश बिंदू दिसेल किंवा डोळा दिसेल. प्रकाश शॉर्ट सर्किट दाखवतो तर डोळा या चक्राचे प्रमुख दैवत येशू ख्रिस्तांचा असतो. आरंभी ते साधकाच्या उत्थानासाठी मार्गदर्शन करतात. पण साधक उत्थानासाठी सेक्सच्या उत्तेजनाचा उपयोग करीत राहिल्यास ते त्याच्या अंतरंगातून अंतर्धान पावतात.


मानव व्यक्तित्वाच्या वरच्या बाजूचा भाग अचेतन मनाचा असून तो परमेश्वराच्या प्रेमशक्तीने भरलेला असतो. त्याच परमेश्वरी प्रेमशक्तीचा शेष भाग म्हणजे कुंडलिनी आहे. सद्गुरूच्या किंवा सहजयोग्याच्या दिक्षेने साधकाचे चित्त कुंडलिनीतून टाळूवर नेले जाते. या ठिकाणी मानवी चित्त, सर्वव्यापी शक्तीशी, जी शुद्ध जाणीव आहे (सत् चित् आनंद) एक होते. हा खरा योग आहे.

पातंजली शास्त्रात वर्णिल्याप्रमाणे सद्गुरु त्यांच्या शिष्यांना समाजातील दूषितांपासून दूर जंगलात ठेवायचे. स्वत:ला उत्थानासाठी तयार करण्यास शिष्य सहा प्रकारच्या आचरणास कठीण पद्धतींचे अवलंबन




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

## आकृती ७




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती ७**

करायचे (हठयोगावरील प्रकरण पहावे) या मार्गात केवळ ब्रह्मचाऱ्यांना घेतले जायचे. कुटुंबात राहणाऱ्यांना विशेष करून, दूर ठेवले जायचे. अशा प्रकारे वैयक्तिक पातळीवरच्या योगाच्या पद्धतीत चैतन्य लहरींचा अनुभव मिळायला अनेक जन्म जावे लागायचे आणि त्याहून अधिक जन्म सामूहिक चेतना प्राप्त करायला लागायचे. परंतु सहजयोगात हे दोन्ही फारच कमी वेळात प्राप्त होतात. याचे कारण उलट पद्धत अमलात आणली जाते. प्रथम कळस बांधला जातो आणि नंतर साधकाच्या स्वत:स स्वच्छ करण्याच्या प्रयत्नांनी पाया घातला जातो. मी नेहमी प्रश्न करते, की तुम्ही साक्षात्कारी नसाल तर तुम्हाला अहंकार, प्रति अहंकार कसे स्वच्छ करता येणार? ज्याला साक्षात्कार मिळाला नाही असा जीव उत्थान प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो डाव्या किंवा उजव्या नाडीसंस्थांमध्ये वर जातो. त्यांचा शेवट प्रति अहंकार आणि अहंकारात होतो. सीमित मनाने असीमितापर्यंत पोहोचण्यासाठी प्रथम आत्मसाक्षात्काराने प्रकाशित व्हायला पाहिजे आणि मग चैतन्य लहरींनी स्वत:ची घडण करावी.

मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे तंत्रवाद याचा रूढ अर्थ खऱ्या अर्थाच्या अगदी उलट आहे. कुंडलिनीचे उत्थापन करणे या खऱ्या अर्थाऐवजी कुंडलिनीची मोडतोड करणे हा अर्थ रूढ झाला आहे. या पूर्वी असा विरोधाभास जीवनाच्या कोणत्याच अंगात इतक्या सहजतेने मान्य झाला नाही. मान्यता मिळालेल्या आधुनिक अर्थाप्रमाणे तंत्रवाद राक्षसी आणि सैतानी उपदेश व साधना आहे. याचा ईश्वरत्व, धर्म किंवा परमेश्वर यांच्याशी सुतराम संबंध नाही. जे काही उत्क्रांतीशी निगडीत आहे, तंत्रवाद त्या सर्वांच्या विरोधी आहे आणि शिवाय माणसाच्या उत्क्रांतीचे उत्थान थांबवण्याकरिता त्याचा उपयोग केला जातो. स्वत:स तांत्रिक असल्याचे प्रमाणपत्र घेणारे धार्मिक जीवन जगत नाहीत आणि त्यांच्या शिष्यांनाही सद्‌गुण शिकवत नाहीत. याचे उलट त्यांच्या शिष्यांच्या संपत्ती जोडण्यात

आणि त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थानात त्यांना रस असतो. सूक्ष्म आणि लबाड पद्धतींनी धर्मविषयक इच्छांचा कोंडमारा करण्यावर तंत्रवादाची सर्व इमारत आधारलेली आहे.

अत्यंत लबाड आणि नीच पातळीवर आणणाऱ्या पद्धतींपैकी एका पद्धतीचा तांत्रिक लोक उपयोग करतात ती म्हणजे कुंडलिनीचा अपमान करून तिला नष्ट करणे. त्यांनी असा शोध लावला, की दैवतांच्या समोर घाणेरडे, अपवित्र आणि पापी कृत्य करण्याने दैवते नाराज होऊन अंतर्धान पावतात. अशी कृत्ये मंदिरात किंवा माणसाच्या मज्जारज्जूतील सूक्ष्म केंद्रावर वास्तव्य करणाऱ्या दैवतांसमोर केल्यास त्या दैवतांमधून पाहणाऱ्या परमेश्वराचे चित्त शेवटी निघून जाते. सुरुवातीला याबाबतीत अज्ञानी साधकांवर दैवत रागावते आणि अनेक पद्धतींनी त्याचा राग व्यक्त करते. त्या व्यक्तीला नेहमी उष्णतेच्या लाटा जाणवतात आणि अनेक दिवस किंवा अनेक वर्षे वाहतच राहतात. परमेश्वराच्या नावाने किंवा त्याच्या पवित्र मंदिरात त्याच्या उपस्थितीत सेक्सची कृत्ये केल्याने अशा पापी जीवांना जीवांना श्रीगणेश उष्णतेने भाजण्याचा अनुभव देतात किंवा त्यांच्या अंगावर भाजल्याप्रमाणे फोड येतात. काही जण प्रतिक्रिया स्वरूपात बेडकाप्रमाणे वर-खाली उड्या मारतात तर काही जण ट्रान्समध्ये (मूढ अवस्थेत) जातात. ते झपाटल्यासारखे दिसतात आणि अनियंत्रितपणे जप करतात किंवा नाचतात.

अशा प्रसंगात सर्व घडविणारी कुंडलिनी क्रियाशील नसते. अशा माणसात ती गोठते आणि श्रीगणेशाच्या समवेत अंतर्धान पावते. हे सर्व एखाद्या मलिन आणि झाकाळलेल्या आरशात प्रतिबिंब दिसेनासे होते त्याप्रमाणे घडते. काही साधक सुरुवातीला फार घाबरतात. हे सर्व संकेत मिळाल्यावरही मानवी स्वभावानुसार आपला मार्ग बदलण्याऐवजी, साधक या 'तज्ज्ञ गुरूंचा' उपदेश मान्य करतात. ते साधकांना हे सर्व आव्हान आहे

असा विश्वास देऊन फसवतात आणि चुकीच्या मार्गावर नेतात. मूर्ख बनवले गेल्याने ते चुकीच्या मार्गावरच असतात. या सगळ्यांचा एकंदरीत परिणाम असा होतो की त्यांना अधिक प्रयत्न करण्यास प्रोत्साहन दिले जाते आणि परमेश्वराचा अधिक अपमान होतो. आज्ञा चक्रावरील येशू ख्रिस्त किंवा मूलाधार चक्रावरून नरकाचे द्वार सांभाळणारे श्रीगणेश त्यांच्या अंतरंगातून निघून जातात. अशा रीतीने नरकाचे दरवाजे उघडले जातात आणि साधकांचे चित्त त्यांना खाली ओढत विनाशाकडे नेते. त्यांच्या इडा व पिंगला नाड्यातून मृतात्मे त्यांच्या चेतित मनात (conscious minds) प्रवेश करू लागतात व त्याच वेळी त्यांच्या चेतित मनावर ताबा मिळवितात. आता ती व्यक्ती पूर्णपणे झपाटली जाऊन विचित्र वागू लागते.

काही तांत्रिक, जनसमुदायासमोर विवस्त्र होण्यासाठी पैसे देऊन लोक आणतात. समूहातील बाकीचे लोक त्याच्यातील नग्न माणसाला पाहून मेंढ्यांप्रमाणे त्या माणसाचे अनुकरण करतात. सभ्यतेच्या जाणिवा हरवतात व सारासार विचार करण्याची कुवत मंदावते. मृतात्म्यांनी त्यांच्या बुद्धीवर ताबा मिळविल्याने साधक प्रश्न विचारू शकत नाही. गुरूने संमोहित केल्यामुळे साधक त्याच्या आज्ञांचे आंधळ्याप्रमाणे पालन करतो. मानसशास्त्रज्ञ त्यांच्या अनेक प्रयोगात संमोहनाचा उपयोग करतात, पण ते कसे काम करते हे सांगू शकत नाहीत. यापूर्वीच मी सांगितल्याप्रमाणे संमोहन, प्रत्यक्षात भुताने थोडा वेळ झपाटल्याची स्थिती असते. जसे बडबड करणारी भूते (ESP) अतींद्रिय ज्ञान असणाऱ्या माणसाला मदत करतात आणि माध्यमांकरवी भविष्यातील घटनांची माहिती देतात. भारतात त्यांना कर्णपिशाच्च, कानात कुजबुजणारे म्हणतात.

मानवाच्या सत्याच्या शोधास आरंभ झाला तेव्हा काही साधकांनी स्वाभाविक चूक केली असावी. त्यांनी मनाच्या गूढ अवस्थांवर चित्त ठेवून त्यात प्रवेश केला असावा. त्यांनी सूक्ष्म शरीरात प्रवेश करून स्वत:च्या

मूलाधार चक्रात पाहिले असता त्यांना श्री गणेशांची वळलेली सोंड दिसली असावी. म्हणून मूलाधार चक्र कुंडलिनीचे स्थान आहे हा गैरसमज झाला असावा आणि श्री गणेशांच्या वळलेल्या सोंडेला कुंडलिनी समजण्याची चूक केली असावी. अशाप्रकारे कुंडलिनीचा सेक्सशी चुकीचा संबंध जोडला गेला असावा. ही चूक म्हणून फार भयंकर होती. जेव्हा अंध लोक शोध घेतात तेव्हा ते चुकीचा निष्कर्ष काढू शकतात, जसे सहा आंधळे व हत्ती या गोष्टीत आपण पाहिले आहे.

मानवाला उत्क्रांतीसाठी अशा पद्धतीने तयार केले (Programmed) आहे की त्यात सेक्सचा कोणताही सहभाग नाही. काही साधकांनी त्यांच्या चुका व कमकुवतपणा यांचे समर्थन करण्यासाठी त्यांच्या धर्माला खालच्या मानवी पातळीवर आणले आणि संशयास्पद तांत्रिक पद्धतींचा स्वत:साठी व दुसऱ्यांसाठी उपयोग केला. या चुकीचा काही दुष्ट लोकांना उपयोग झाला असावा. निरागस साधकांची प्रगती पाहून त्यांचा मत्सर त्या दुष्टांना वाटल्याने त्यांनी साधकांना चूक करण्यास प्रोत्साहन दिले असावे आणि त्यामुळे या सुंदर पृथ्वीतलावर त्रास देण्यात आनंद मानणाऱ्या राक्षसांच्या तांत्रिक आचरणाचा नरक मोकाट सुटला असावा. स्पष्टीकरण काहीही असो, अनेक लेखकांनी आत्म्याच्या शोधाच्या विरोधात असलेला तंत्रवाद अध्यात्मात येण्याचे असे कारण दिले आहे, की त्यांचे आचरण व पुरस्कार करणाऱ्यांना ते कशात आहेत हे प्रथम समजलेच नाही. पुढे सैतानी झाल्यावर त्यांनी मृत्यूचे आणि पापाचे रहस्य शिकून आत्मसात केले आणि आता ते त्यांच्या व्यवसायाची साधने झाले आहेत.

प्राण्यांप्रमाणे माणूससुद्धा जन्मत:च सेक्सच्या मागे असणारा आहे, पण त्यांच्यापेक्षा पुष्कळ जास्त उत्क्रांत असल्याने उच्च अवस्थेतील जीव आहे. असे असल्याने माणसामाणसातील लैंगिक संबंधात मानवाकडून अपेक्षित सभ्यपणा व पावित्र्याची संवेदनशीलता असायला हवी. माणसाने

मागे फिरून पुन्हा प्राण्यांच्या पातळीवर उतरू नये आणि निश्चितच आपल्या आध्यात्मिक स्वभावाचा विकास करण्यासाठी लैंगिक स्वभावाचा उपयोग करू नये. प्राचीन ऋषीमुनींनी आपल्या ध्यानातून विवाह संस्था आणि आई, भाऊ, बहिण, वडील अशा पवित्र नात्यांचा शोध लावला. अशा उदात्त भावना केवळ मानवी पातळीवरच असू शकतात आणि त्या मानवी समाजाला सुंदरता देतात. परमेश्वरी अवतारांनी कायम शुद्ध चारित्र्य आणि वैवाहिक निष्ठा यांच्या महत्त्वावर भर दिला आहे. यांना प्राण्यांच्या जाणिवेत अस्तित्व नाही. या गुणांवरून हे सिद्ध होते, की त्यांच्याप्रमाणे असलेल्या प्राण्यांपेक्षा मानव फारच अधिक उत्क्रांत आहे.

## तंत्रवादाचे मूळ

तंत्रवादाची मूळे धर्माइतकीच प्राचीन आहेत. परंतु इ.स. ९००-१४०० या काळात ते पूर्ण शक्तिशाली जाले. महान हिंदू धर्मसुधारक आदि शंकराचार्यांच्या आगमनानंतर किंवा त्याही पूर्वी सम्राट अशोकाच्या काळात संन्यस्त वृत्तीच्या अतिरेकास प्रतिक्रिया या स्वरूपात भारतात धर्मविरोधी शक्ती बलवान झाल्या. जैन धर्म, त्यांच्या अनुयायांपैकी काही थोड्या लोकांनी उच्च स्थिती मिळविल्यामुळे, आध्यात्मिक उच्च स्थितीवर पोहोचला होता आणि अनेक सरकारी मंत्र्यांनी जैन धर्मात प्रवेश केला. त्यांनी कृत्रिम व बाह्यात्कारी संन्यस्त वृत्ती निर्माण केली. त्यांची अत्यंत अनैसर्गिक जीवन पद्धत असह्य झाल्याने राजांनी तंत्रवादाला आधार दिला. त्यानंतर राजदरबारातील अनेक पदस्थांनी तंत्रवादाच्या जलद प्रसारासाठी आवश्यक ती वातावरण निर्मिती करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. एकंदरीतच, सहाव्या शतकापर्यंत राजाश्रय मिळालेल्या तीन अधिकृत हिंदू, जैन व बौद्ध धर्माच्या मठाधिपतींनी घालून दिलेल्या विचित्र (absurd) जीवन पद्धतींनी सर्वसामान्य लोकांचे जीवन नीरस व कंटाळवाणे केले होते. याचे उलट तिन्ही धर्मांचा सदाचाराच्या मध्यमार्गावर विश्वास होता.

राजांना वैषयिक सुखाची लालसा होती तर त्यांच्या सल्लागारांना सत्तेची होती. या सर्वांची चेतना बाह्य स्थितीमधले जे मृतात्मे राजकारणात विचार करण्यास, योजना आखण्यास व नवीन कल्पना सुचण्यास मदत करू शकत होते, त्यांची मदत घेण्याची तयारी होती. या कारणामुळे त्या सल्लागारांनी सेक्सो-योगी तांत्रिकांना ज्यांचे चेतना बाह्य क्षेत्रातील मृतात्म्यांवर नियंत्रण होते, त्यांना गुरू म्हणून मान्यता दिली. या गुरूंनी शिष्यांना दीक्षा देण्यास सेक्सचा वापर केला नाही, फक्त एक मंत्र दिला किंवा कानात मृतातम्याचे नाव सांगितले. दुसऱ्या पद्धतीत कपाळावर चिन्ह काढले जायचे किंवा योग्य ते नाव उच्चारले जायचे. गुरूंनी कोणतीही पद्धत उपयोगात आणली, तरी ते शिष्यांना, बाधित करणाऱ्या भुतांच्या संपर्कात आणायचे. ती भुते सुरुवातीला त्यांची गुलामगिरी करायची. दीक्षा घेतलेली व्यक्ती कार्यक्षम, शांत आणि सशक्त व्हायची. तो नवीन माणूस व्हायचा, पण लवकरच अत्यंत वाईट व्यक्तित्व प्रकट करायचा. दारू प्यायला तर मद्यपी बनायचा. त्याला स्वत:शी वा इतरांशी हिंसक होण्यात सुख मिळायचे. त्याचा चोरी करणे, तस्करी करणे इकडे कल असल्यास तो त्यांच्यात अत्यंत यशस्वी व्हायचा. अचानक तो सेक्सवेडा किंवा डॉन-जुवॉन (प्रेमवीर) बनायचा. त्या माणसाला पकडणारे भूत त्या माणसाच्या आवडींकरवी सेक्स, पैसा व सत्ता यांचा स्वत: उपभोग घेण्यास, अधिक अधिक सूक्ष्म पद्धतींचा उपयोग करायचे. वाईट गोष्ट अशी व्हायची की, साधारणपणे दहा वर्षांनी, दीक्षा घेतलेला माणूस थरथर कापायचा. त्याचे आरोग्य नष्ट व्हायचे व जीवन कष्टमय व्हायचे.

विवाह समारंभात धार्मिक विधी व्हायचे, पण सर्वसामान्य कुटुंबात सेक्स लाईफ वर धार्मिक रूढींचे वर्चस्व असे. पुढच्या काळात जैन धर्माने, विशेषत: बुद्ध धर्माने, धार्मिक जीवनाचे आचरणात भोग-त्यागाचा उपदेश केला आणि त्याच्यामुळे मठनिवासी भिक्षू व संन्यासी, साध्या लोकांना कमी

लेखू लागले. संन्यासी लोक जंगलात राहणे सोडून समाजात येऊन जगण्यासाठी भिक्षा मागू लागले व समाजावर अवलंबून राहिले. गृहस्थाश्रमी लोकांनी कष्टाने मिळविलेल्याचा संन्यासी व भिक्षू उपभोग घेऊ लागले व आपल्याला कोणतेही पाप लागणार नसल्याचा दावा करू लागले. त्यांच्यापैकी काही राजाचे मंत्री किंवा सांसद झाले. कोणत्याही प्रकारे त्यांची संन्यस्त वृत्ती नसायची, तर ते संन्यासाच्या कपड्यातील भोंदू असायचे व प्रजेइतकेच राजांवरही आपला हुकूम चालवायचे. त्याचप्रमाणे हिंदू धर्मीयांतसुद्धा ब्रह्मचर्य हाच एकमेव परमेश्वर प्राप्तीचा सिद्ध झालेला मार्ग आहे अशी मान्यता होती, या सर्वांवर प्रतिक्रिया स्वरूप सामान्य माणसांच्या दबलेल्या इच्छापूर्तीसाठी तंत्रवादाला आपोआप मान्यता मिळाली. पण तंत्रवादाच्या आचरणात काहीही असले तरी ब्रह्मचर्य नव्हते. सर्वसामान्य लोकांत अशी मान्यता मिळाल्याने सर्व मंदिरात, गर्भधारणा करवणारे पंथ (Fertility cults) स्थापन झाले आणि ते कधी पुसला जाणार नाही असा कलंक झाला. तंत्रवादाने अनेक राज्यांवर ताबा मिळविला. तसेच अनेक बुद्धीजीवी, कलाकार जे नवीन कल्पना सहजच स्वीकारायचे, त्यांनी तंत्रवादाला संस्कृतीचा भाग म्हणून स्वीकारले. कलाकारांनी तांत्रिक कलेवर पुस्तके लिहिली, तसेच सेक्सच्या विविध आसनांचे वर्णन असलेल्या शिल्पशास्त्रावर विशेषकरून पुस्तके लिहिली गेली. सेक्सच्या शास्त्राच्या विविध आचरण पद्धतींची संपूर्ण माहिती त्या पुस्तकांत असे.

साध्या-भोळ्या आणि मूलत: धार्मिक शिल्पकारांवर स्पष्टीकरण आणि युक्तीवादाने सेक्सच्या संबंधित शिल्पकलेतील मूर्ती बनविण्यास भुरळ पाडली गेली. तांत्रिकांचा युक्तिवाद असा असायचा की प्रत्येक कलाकृतीवर दृष्ट लागू नये म्हणून एक कलंक असावा. दुष्ट नजरेला दुसऱ्या बाजूस वळविणे ही त्या काळी सर्वत्र प्रचलित असलेली अंधश्रध्देतील रूढी होती. या युक्तिवादाने धार्मिक प्रवृत्तीच्या जैन शिल्पकारांना, जे जैन मंदिरांवर

सेक्सवर आधारित पापमय सजावट करण्यास तयार नव्हते, त्यांना अश्लीलतेचा उपयोग करण्यास तयार करण्यात आले. अश्लीलता ही धार्मिक मंदिरांना दृष्ट लागू नये यासाठी कलंक म्हणून सुचविली जात असे. अजून एक युक्तिवाद असा असे, की, कला जर अभिव्यक्तीमध्ये परिपूर्ण असेल तर लोकांना कलाकृती व त्याच्या निर्मात्यांबद्दल मत्सर वाटेल. तसा मत्सर कलाकृतीवर दुष्ट जादूचे गारूड टाकतो म्हणून दुर्दैवापासून कलाकृतींना सांभाळण्यासाठी त्यांची परिपूर्णता कमी करावी.

तांत्रिक उपदेश करायचे, की दुरात्मे अश्लील फ्रेस्को (भिंतीतील कोरीव काम) जवळ येणार नाहीत आणि मंदिरे पवित्र करण्याची ती खरी पद्धत आहे. नेपाळमध्ये त्यांनी कलाकारांना सांगितले, की विजांची देवता कुमारी असून, पाऊस, वारा आणि वीज यांच्यापासून मंदिरांना सुरक्षित ठेवण्यास भिंतीवर सेक्सवरची चित्रे रंगवणे आवश्यक आहे. यापुढे, बुद्धिमान लोकांचा युक्तिवाद असे, की पूजेला येतांना माणसांनी त्यांच्या वासना मंदिराच्या बाहेर ठेवायला हव्यात आणि म्हणून माणसात जे काही वाईट आहे, ते मंदिराच्या बाहेरील भिंतीवर कोरले जावे. त्याच्याही पुढे, जे बाहेर होते त्याने हळू हळू मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केला आणि अनेक दैवतांची सेक्ससंबंधीच्या रूपात पूजा केली जायची.

कोणार्क, खजुराहो आणि नेपाळ येथील शिल्पकारांनी अशा स्वरूपाच्या कलाकृतींत स्पष्ट अभिव्यक्ती केली आहे. खजुराहोत सांगितले जायचे की राणी हेमावतीने अनैतिक संबंध ठेवून पाप केल्याने तिला वाटणारा पश्चात्ताप दर्शविण्यासाठी तिला स्वत:चे पाप जाहीर करण्याची सक्ती करण्यात आली आणि आपल्याला वाटणाऱ्या पश्चात्तापाची परमेश्वरासमोर अभिव्यक्ती करण्यास मंदिराचे (भांड देवळे) बांधकाम करावे असे सांगितले. तंत्रवादाने आणलेल्या सैतानी शक्तीच्या गलिच्छ आणि विनाशक पद्धतींची चर्चा करणे शालीनतेमुळे मला शक्य नाही. माणसे

धर्मापेक्षा पापाचरण करण्यास कसे तयार होतात याचे आश्चर्य वाटते. ज्याप्रकारे तंत्रवादाची आग पसरली आणि त्याने माणसाच्या अंतरंगात धर्माची जागा घेतली त्याचे श्रेय माणसाच्या स्वभावातील कमकुवतपणाला जाऊ शकते.

तांत्रिक लोक केवळ एकाच, वासनेच्या विचारांनी पछाडलेले होते व ते फार प्रसिद्ध झाले. त्यांनी वासनेची भूक असणाऱ्या राजांना - ते मानवाच्या नीचपणाचा नमुना होते - आपल्या सत्तेखाली घेतले. तांत्रिकांना स्वतःच्या क्षमतांची पूर्ण जाणीव असल्याने त्यांनी जीवनाच्या सर्व अंगातील मानवी स्वभावातील कमकुवतपणाचा फायदा घ्यायचा प्रयत्न केला. मानवांची जाणीव सेक्सपुरती सीमित राहण्यापर्यंत मर्यादित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता आणि त्याच्यासाठी प्रत्येक मानवी कार्यास सेक्सशी जोडण्याचा प्रयत्न केला :

- ईश्वरत्वाचा अपमान अशा सीमेपर्यंत पोहोचला की एकाठिकाणी देवी दुर्गा यांची मूर्ती त्या लोकांनी वेश्या ज्या मातीवर चालायच्या त्या मातीपासून बनवली.
- त्या लोकांनी आपल्या दुष्कृत्यांचे समर्थन करण्यासाठी प्राचीन ग्रंथात बदल करून त्यात अश्लील व सेक्ससंबंधी श्लोक घातले. पवित्र ग्रंथांवर, विषयासक्त राजांना नियंत्रणात ठेवणाऱ्या बुद्धिजीवी तांत्रिकांनी इतके मोठे अतिक्रमण केले, की काही वेळेस त्यांच्यातील सत्याचा उलगडा करणे अशक्य होते.
- त्यांनी अश्वमेध यज्ञाचे वर्णन असे केले, की तो गर्भधारणा करणाऱ्या पंथाचा समारंभ आहे.
- त्यांनी अश्वमेध यज्ञाचे वर्णन करणाऱ्या वेदांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला, की तो सेक्ससंबंधीचा समारंभ असून सेक्सच्या कृत्यातून राजा आपल्या शत्रूचा पराभव करतो.

* श्रीशिव आणि त्यांची शक्ती श्रीपार्वती यांच्यातील नात्याचा संबंध सेक्सशी लावला. अर्थात्च ते चूक होते कारण देवी-देवता कामभावनांच्या पलीकडे असतात.
* त्यांनी श्रीकृष्ण, श्रीराधा आणि गोपींबद्दल वासना चाळविणाऱ्या असत्य गोष्टी तयार केल्या.
* त्यांनी 'कामसूत्र' आणि 'कामकला यंत्र' यांसारखी नवीन पुस्तके लिहिली आणि राजांनी ती ग्रंथालयात संग्रहीत केली. इतर पुस्तकांत, सेक्सच्या माध्यमातून परमेश्वराकडे कसे जायचे याचे वर्णन केले. अशी वासनामय वाङ्मय निर्मिती करण्यासाठी त्यांना जमिनी व मालमत्ता दिली गेली. त्यांच्यापैकी काहींनी जगातील प्रत्येक गोष्टीचा सेक्सशी संबंध जोडणारे लेखन केले.

लाकडातून व दगडातून सेक्सची आसने दर्शविणाऱ्या उत्तम मूर्ती घडविण्यासाठी कलाकारांच्या स्पर्धा घेतल्या जायच्या. भारताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सर्व राज्यात जिथे तंत्रवादाचे अनुयायित्व होते, त्या सर्वांचे लबाड तांत्रिकांच्या बौद्धिक करामतींनी मतपरिवर्तन करण्यात आले. त्या अनुयायांची, तंत्रवादाच्या तथाकथित पवित्र आणि गुप्त धर्माशी अंधश्रद्धेवर आधारित निष्ठा होती. वाङ्मयाशिवाय त्यांनी विषयासक्त समाज तयार केला, ज्याच्यातले लोक अनेक सण साजरे करायचे. ते अश्लील भाषेचा उपयोग करायचे व वासना चाळवणारी गाणी म्हणायचे. जवळच्या नातेवाईकांशीसुद्धा ते असभ्य भाषेत विनोद करायचे. जे काही शुद्ध आणि पवित्र होते त्या सर्वांना निंद्य करण्यासाठी तांत्रिकांनी बहिण-भाऊ यांच्यातील नातेसंबंधसुद्धा सोडले नव्हते. खेड्यात राहणाऱ्या लोकांनासुद्धा असभ्यपणे वागण्यास प्रोत्साहन दिले. अशाप्रकारे तांत्रिक लोकांनी मानवी समाजाला सेक्स पॉइंटच्या नीच पातळीवर आणायचे ध्येय साध्य केले. त्यांनी असा समाज तयार केला की जिते 'मद्य, स्त्री आणि

गाणी' हीच मूल्ये होती.

त्यांनी, एकेकाळी धार्मिक असलेल्या सर्वसामान्य लोकांच्या जीवन पद्धतींचे नियंत्रण केले. जीवनाबद्दल विषयासक्त व स्वैराचारी वृत्ती ठेवल्याने असा समाज तयार झाला, की त्यांच्यात वेश्यांना, कुटुंबाला समर्पित पत्नीपेक्षा (गृहलक्ष्मी पेक्षा), अधिक सामाजिक महत्त्व आणि पूजनीय स्थान मिळाले.

त्या काळातल्या नीच प्रवृत्तीच्या बुद्धिजीवी लोकांच्या संमतीने तांत्रिकांनी हे सिद्ध केले, की आत्म्याशी मिलन किंवा योग साध्य करण्याचे सेक्स हेच ध्येय होते. त्यांनी या कल्पनेचा प्रसार केला, की पुरुषाची परमेश्वराच्या प्रतिमेप्रमाणे निर्मिती झाली, तर स्त्रीची शक्तीच्या प्रतिमेप्रमाणे झाली. अंतिम एकात्मतेला योग्य वातावरण निर्मितीसाठी जोडप्यांनी संयोगाच्या शक्य तेवढ्या पद्धतींचा उपयोग करून पाहावा. हे राक्षसी कृत्य होते आणि असंख्य लोकांना ते भावले.

सत्य हे आहे, की मानवात शिव हे आत्मा आहेत, अर्थात् परमेश्वराचे स्वरूप आहेत तर त्यांची शक्ती कुंडलिनी आहे. प्रत्येक व्यक्तित्वात या दोघांची स्थापना केली आहे. म्हणून मानवी चित्ताचे किंवा जाणीवेचे आत्म्याशी (कुंडलिनीचे आत्म्याशी) मिलन पूर्णत्वाला नेण्यासाठी दुसऱ्या कोणाचीही आवश्यकता नसते. याशिवाय पूर्वी सांगितल्याप्रमाणे कुंडलिनी गौरी माता आहेत. त्या कुमारी असून त्यांचा श्रीशिवांशी विवाह झाला होता. एका कथेप्रमाणे त्या स्नानगृहात स्नान करीत होत्या. त्यापूर्वी स्वतःच्या शरीरावरील मळापासून श्रीगणेशांना तयार करून त्यांना दरवाजाशी स्वतःच्या लज्जेचे रक्षण करण्यासाठी ठेवले. श्री गणेश मागील दरवाजातून कोणासही प्रवेश करू देत नाहीत. या रूपकात्मक कल्पनेत ही कथा कुंडलिनी (श्रीगौरी) आणि मूलाधार चक्र (श्रीगणेश) यांच्यातील नाते स्पष्ट करते आणि हे वास्तवही स्पष्ट करते, की सेक्सच्या माध्यमातून (मागचे

दार) कुंडलिनीकडे जाणे शक्य नाही.

यापेक्षा अधिक लबाडीने सक्षम लोकांनी प्राचीन काळापासून असलेल्या सांस्कृतिक मर्यादा उलटवून टाकल्या. त्यांनी लज्जेच्या, शुद्ध-चारित्र्याच्या सर्व कल्पनांचा भंग करीत दावा केला, की गोपींची वस्त्रे काढून घेऊन त्यांना नग्न करणाऱ्या श्रीकृष्णांचे ते अवतार होते. प्रत्यक्षात पाच वर्षाच्या निरागसत वयात, श्रीकृष्ण गोपींना त्रास देत होते. लहान मूल असल्याने त्यांना सेक्सची जाणीव नव्हती. पुढच्या काळात दुर्योधनाने द्रौपदीचा लज्जाभंग करण्याचा प्रयत्न केला तेव्हा द्वारकेचे राजा असलेले श्रीकृष्ण, सर्वात प्रथम बहिणीच्या सन्मानाचे रक्षण करण्यास हस्तिनापूराकडे धावले.

तांत्रिकांचे दोन प्रकार होते. त्यांच्या वर्तणुकीचे समर्थन करणाऱ्या दोन सिद्धांतातून (थिअरी) त्यांचा विकास झाला :

१. पहिल्या प्रकाराला 'वाममार्गी' म्हणायचे. त्यांनी सर्व प्रकारच्या सुखलोलुपतेचा उपदेश केला. त्यांनी 'पंच मकार असलेल्या सुखलोलुप योगाचा' आरंभ केला आणि मद्यपान, सेक्स व मोठ्या प्राण्यांचा मांसाहार करण्याचा उपदेश केला.

२. दुसऱ्या प्रकारात 'हठयोगी' होते. त्यांचा बाह्यात्कारी इन्द्रिय निग्रहावर विश्वास होता आणि सेक्सो-योग (Sexo-yogic) प्रणालीचा विकास केला. त्यांनी योगासनांचा सेक्स करण्यासाठी उपयोग केला. त्यांचा असा सश्रद्ध विश्वास होता, की सेक्स करताना नियंत्रण ठेवल्यास कुंडलिनी जागृत होऊ शकते. पुढच्या काळात, स्वतःच सेक्सच्या उपभोगासाठी त्यांनी असे शिकवले की गुरूने सेक्सकरून आपल्या अनुयायांना दीक्षा द्यायची. त्यांच्या वागणुकीच्या समर्थनार्थ त्यांनी असेही शिकवले, की गुरूने वीर्याचा प्रवाह नियंत्रित केल्यास तो स्वतः सेक्सचे सुख उपभोगत

नाही. त्या निर्लज्ज लोकांनी समलिंगी संभोग तसेच व अशा गलिच्छ अनैसर्गिक कृत्यांना प्रोत्साहन दिले. ही महान सत्ये विशद करणारी पुस्तके लिहून त्यांनी या जीवन पद्धतींचा पुरस्कार केला.

पहिल्या, वाममार्गी प्रकारातील लोक जेव्हा अतिशय विषयोपभोग करायचे तेव्हा त्यांचे चित्त इडा नाडीवर तसेच इतर अनेक समांतर असणाऱ्या नाड्यांवर जायचे. मंथनातून ते मानवी शरीराच्या डाव्या टोकापर्यंत फेकले जायचे व नरकात पडायचे. सेक्सो-योगासनाच्या प्रणालीचे आचरण करणारे लोक पिंगला नाडीच्या पलीकडे मानवी शरीराच्या उजव्या टोकाला जाईपर्यंत फेकले जायचे आणि शेवटी श्री गणेशांकडून नरकात उत्सर्जित व्हायचे.

याशिवाय वाममार्गी लोक मंत्र-जप करायचे आणि कुंडलिनीच्या यंत्रणेच्या प्रतिकांचा उपयोग करायचे. अशी यंत्रे कागदावर चित्रे काढून किंवा दगडात कोरून त्यांची पूजा करायचे. पूजा करणे हा त्यातला अनधिकार भाग होता. एखाद्या विशिष्ट दैवताच्या मंदिरात संतापजनक व गलिच्छ कृत्ये अनेक वर्षे केल्याने त्या दैवताचे चित्त, त्या लोकांची दैनंदिन कृत्ये आणि मंदिरातून कमी कमी व्हायचे. यामुळे परमेश्वरी चित्त, जीवितात्मा, मंदिरे व तीर्थक्षेत्रे यांच्यातून निघून जायचे. अशा रिकाम्या मंदिरात राहण्यास तांत्रिक लोक सामूहिक सुप्त चेतना किंवा सामूहिक चेतना बाह्य प्रदेशातून मृतात्म्यांना बोलायचे. अशा दुष्ट भुतांच्या मदतीने तांत्रिकांनी प्रचंड नुकसान केले. सुरुवातीला ते भूतांना नियंत्रणात ठेवायचे, पण नंतर त्यांच्या अनैसर्गिक सवयींमुळे त्यांना गंभीर आणि क्लेशदायी रोग झाले. तांत्रिक आजारी झाल्यावर भूते त्यांचा ताबा घ्यायची आणि त्यांचा एकाकी, भयंकर आणि वेदनामय मृत्यू व्हायचा. काही जणांचा वेगळ्या प्रकारचा आणि गूढ मृत्यू व्हायचा तर बाकीच्यांना दगडांनी ठेचून मारले जायचे.

तंत्रवादाचा वेगाने प्रसार होण्याचे कारण हे होते की सेक्सो-योगी

लोकांनी तंत्रवादाला, हुशारीने, खोट्या-अति नैसर्गिक स्वरूपात झाकले होते. त्यांच्यातील जास्त हुशार लोकांनी, त्यांची लबाडी दर्शविणारे असे सिद्धान्त तयार केले, की ते शिकवायचे, की आत्मसाक्षात्काराकडे नेणारा सेक्स हा एकमेव मार्ग आहे. तंत्राने अस्पष्ट करून त्यांचे गोंधळात टाकणारे मिश्रण तयार केले. त्यांनी अवलंबलेल्या दुसऱ्या पद्धतीत, दैवतांच्या शक्तींना उत्तेजित करणाऱ्या अथवा कुंडलिनीला जागृत करणाऱ्या मंत्राचा, त्यांच्या राक्षसी हेतूंसाठी उपयोग केला जायचा. भ्रष्ट व दुराचारी लोक जप करायचे आणि सर्वप्रकारच्या घाणेरड्या व अश्लील पद्धतींनी पूजा करायचे. हे परमेश्वरी नियमाच्या अत्यंत विरुद्ध होते. त्या मंत्राचा दैवतांवर वेगळ्या प्रकारे परिणाम होऊन दैवते पूजेची स्थाने सोडून जायचे.

तांत्रिक प्रत्येक मृतात्म्यावर किंवा त्यांच्या गटावर नियंत्रण ठेवायचे आणि त्यांना दर्शविणारे नाव द्यायचे. उदा.एक मंत्र होता, 'ॐ ऐं ऱ्हीं क्लीम् चामुण्डाय विच्चे नम:' ज्याचा व्यवस्थितपणे अदिशक्तीला जगदंबा किंवा चामुंडा स्वरूपात जागृत करण्यास उपयोग केला जातो. या सुंदर व शक्तिशाली मंत्राचा उपयोग फक्त साक्षात्कारी जीवांनी उच्च स्थितीतील सद्गुरूच्या मार्गदर्शनाखाली करायचा असतो. पण हाच मंत्र तांत्रिकांनी अशा पद्धतीने वापरला, की त्याचे प्रत्येक अक्षर, मृतात्म्यांना बोलावून त्यांना तांत्रिकांच्या उपयोगासाठी तयार करणारे अवजार होते. हे असेच तत्त्व होते, की तुमच्या नोकराला एखाद्या दैवताचे नाव द्यायचे. उदा.राम. याचा उपयोग भारतात सर्वत्र केला जातो. नोकराला बोलावण्यास तुम्ही रामाचे नाव घेता आणि तो कायम तुमच्या आज्ञेत राहतो. पण परमेश्वर असा प्रत्येक माणसाला उपलब्ध होत नाही. परमेश्वराला बोलावण्यास साक्षात्कार मिळायला हवा व अधिकार हवा. अशा अधिकाराशिवाय बोलावणारे मृतात्म्यांना गुलाम म्हणून बोलावून त्याची सेवा मिळवतील. ज्या मृतात्म्याचे पृथ्वीवरील जीवनात राम हे नाव होते, तो हे नाव घेऊन

बोलावण्यास प्रतिसाद देईल. देवाला अशा गुलामांकडून मिळालेल्या सेवा सन्मानाची गरज नसते.

इडा आणि पिंगला नाड्यांच्या पलिकडे मृतांचा प्रदेश असून मानवी कार्यासाठी तिकडे प्रवेश निषिद्ध आहे. एखादा परमेश्वराविरुद्धच्या गुन्हेगारीच्या जंजाळात ओढला गेला की नवीनच दीक्षा मिळालेल्या साधकास तांत्रिकाच्या कचाट्यातून सुटका करून घेणे जवळ जवळ अशक्य होते. इथे उल्लेख केलेल्या तंत्रवादाच्या काळात व नंतर, तंत्रवादाच्या अनुयायी राजांनी अनेक मंदिरे उभारली. आश्चर्य म्हणजे, की वाममार्गी राजांचे गुरु होते, तर राजांचे सल्लागार सेक्सो-योगी तांत्रिकांचे अनुयायी असायचे. या भ्रष्ट तांत्रिक गुरूंच्या मार्गदर्शनाखाली मंदिरे उभारली जायची आणि त्यांचे विषय, सेक्स भुकेल्या राजांना भावायचे.

परिपूर्ण कलाकृतीची लोकांच्या पसंतीस उतरण्यासाठी प्रसिद्धी करण्यास भडक गोष्टींची आवश्यकता नसते. पूर्वेकडे, विशेषतः लोकांना नग्नतेचे आकर्षण कधीही नव्हते. माणसाच्या कलेने परमेश्वरी कलेची निर्मिती करण्यावर त्यांचा विश्वास होता. परंतु काही दुष्ट बुद्धीच्या लोकांनी शिल्पकलेवरील पुस्तकात नग्नता व असभ्यपणा यांचे कलाकृती म्हणून वर्णन केले आणि त्यामुळे कलेची एक पद्धत म्हणून अनेक शतके प्रचलित आहे. अगदी पंधराव्या शतकापर्यंत या कलंकांचे अवशेष भारतीय अध्यात्माच्या प्रदेशात नजरेस पडायचे. एकांत आणि पावित्र्य यांच्याशिवाय सेक्समधील आनंददायी आकर्षण नष्ट होते. लोकांच्या समक्ष झाल्यास माणसातील परमेश्वरी अस्तित्वाला ते किळसवाणे वाटते. हा केवळ मतमतांतराचा विषय नाही तर हे परम वास्तव आहे. जे लोक अद्याप त्यांच्या प्राणी जीवनातील संवेदनांच्या पलिकडे उत्क्रांत झाले नाहीत त्यांना कदाचित सेक्सचे प्रदर्शन आवडेल पण साक्षात्कारी जीवाला अशी गलिच्छ प्रदर्शने शिसारीने भरून टाकतील. चैतन्य लहरींच्या कार्यातून याचा पडताळा पाहता

येईल. अशा उत्तान मूर्तींकडे लक्ष दिल्यास बोटांची आग होते व ते ईश्वरी केंद्रे (चक्रे) बिघडल्याचे दर्शवते. काही म्युरल्समुळे प्रत्यक्षात कुंडलिनी गोठली जाते. एका पॅनेलवर विशेषत: देवी गौरी आणि त्यांचा पुत्र श्रीगणेश यांच्यामधील सेक्सचे दृष्य दाखवले आहे. गलिच्छपणा पाहून सहजयोग्यांचा एक लहान गट आजारी पडला (शारीरिक आजार), हे खरे आहे, की तुलनेने कमी संख्येत असल्याने सहजयोग्यांची प्रतिक्रिया ही सर्वांची आहे असे म्हणता येणार नाही. परंतु सहजयोगी परम परिपूर्णतेशी संबंधित आहेत. गोंधळलेल्या जगाला, जिथे चांगले आणि वाईट यांच्यात फरक केला जात नाही, सहजयोग्यांच्या प्रतिक्रियेमुळे मार्गदर्शन मिळेल.

तंत्रवादाच्या प्रभावाखालची राज्ये, त्यांच्या स्थापनेनंतरच्या दोनशे तीनशे वर्षांत कोसळली. काही मंदिरे मोडकळीस आली, तर काही पृथ्वीच्या पोटात गेली. जणु काही, पृथ्वीला त्यांच्यातील निर्लज्जपणा झाकायचा होता. उत्खननाच्या वेळी इंग्रजी लेखकांनी मंदिरांच्या शिल्पकलेऐवजी सेक्स दर्शविणाऱ्या उत्तान शिल्पे व चित्रे यांच्यात जास्त रुचि घेतली. ती मंदिरे घडविण्याचे पाप कर्म ज्यांना करावे लागले त्या शिल्पकारांचा आंतरिक संघर्ष, अस्वस्थता आणि दु:खे यांच्याकडे दुर्दैवाने पाश्चात्त्य लेखकांचे लक्ष गेले नाही. राजे आणि त्यांचे सल्लागार, यांच्या कल्पना, त्या कलाकारांना प्रचंड दबाव टाकून मान्य करण्यास भाग पाडले गेले. भारतीय सौंदर्य-दृष्टी व संस्कृती यांच्यातील आनंद खराब करण्याचे सर्व प्रयत्न होऊनसुद्धा कलाकारांनी जे काही ओंगळ होते ते झाकण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले.

कोणार्क येथील मंदिराचा अपवाद वगळता, कलाकारांनी सेक्स दर्शविणाऱ्या मूर्तींचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला. देव-देवतांच्या उघड व सशक्त मूर्ती सर्वात पुढे लक्षवेधी ठिकाणी आणल्या गेल्या तर सेक्स दर्शविणाऱ्या मूर्ती अगदी कोपऱ्यात नजरेस पडणार नाहीत अशा ठिकाणी ठेवल्या गेल्या. तांत्रिकांनी प्रयत्न करूनसुद्धा मूर्तीकारांनी स्वेच्छेने आई व

मूल, गौरी व गणेश यांच्या मूर्ती बहुतेक सर्व मंदिरात बसवल्या. आजसुद्धा या मंदिरांजवळच्या खेड्यातील लोकांना सेक्स दर्शविणाऱ्या मूर्तींची माहिती नाही, त्या मंदिरांना 'कुमारिका मंदिर' म्हणतात. कुमारिका म्हणजे 'व्हर्जिन' हे नाव असे सुचवते की व्हर्जिन्सनी (कुमारिकांनी) अशा ठिकाणी भेट देऊ नये. कोणार्क येथील सूर्य देवाचे मंदिर ज्या राजाने उभारले, तो राजा तांत्रिक असून त्या मंदिराचा मुख्य शिल्पकार मोठा तांत्रिक होता. त्याने आपले पत्नी व मुलगा यांना सोडून दिले होते. त्याने निर्माण केलेल्या मंदिरावर असभ्यपणाचा नंगा नाच उघड दाखवला गेला आहे.

अशाप्रकारे तांत्रिकांच्या प्रभावाखाली माणसाने त्यांच्या आदिमाता-पिता, परमेश्वर त्यांचा पिता व आदिशक्ती माता यांना आदरांजली वाहिली आहे. त्यांनी प्रत्यक्षात लज्जा व चारित्र्य शुद्धीच्या सद्‌गुणाच्या विरोधात पाप केले आहे. लज्जा ही आदिशक्तीची आदिमातेची शक्ती असून प्रत्येक ठिकाणी जिथे तांत्रिकांचे राज्य होते, तिथे स्त्रियांचा अपमान केला गेला आणि त्यांना पुरुषांच्या क्रूर उपभोगासाठीच हक्काचे खेळणे या स्वरूपाची वागणूक दिली गेली. सेक्स दर्शविणाऱ्या प्रतिमांचे, अस्तित्व, सुंदर मंदिरांचे पावित्र्य कमी करतात, पण याचा अर्थ असा घेतला जाऊ नये, की त्या प्रतिमांचे अस्तित्व जनसामान्यांना मान्य होते. ते फार थोड्या लोकांचे मत होते आणि त्याला त्या काळात महत्त्व होते. त्या लोकांनी संमोहनावस्थेत राज्य केले. त्यांना हे पटविण्यात आले होते, की त्यांच्यात रममाण झाल्याने त्यांनी सेक्सविषयक स्वातंत्र्य मिळवले होते. ह्या काळच्या अनेक संतांनी अशा ब्लॅकमेल व कामक्रीडांच्या चित्रणांचा निषेध केला होता. ज्या राजांनी परमेश्वराला लाज आणायचा मोठा प्रयत्न केला त्यांच्या विरोधात उठाव झाल्याचा ऐतिहासिक पुरावा आहे. नंतरच्या काळात, कबीर आणि नानकांसारख्या धैर्यवान कवींनी तांत्रिकांना फटकारले आहे.

प्राचीन, आध्यात्मिक महापुरुष व एका महत्त्वाच्या पुराणाचे लेखक श्री

मार्कण्डेय यांनी लिहिल्याप्रमाणे, या राक्षसी ताकदींच्या शरीरांचा अनेकदा संहार करण्यात येऊन त्यांना नरकात, अवर्णनीय शिक्षा भोगण्यास पाठविण्यात आले. सर्व शिक्षा भोगल्यावरही त्यांचा परमेश्वराचा शोध घेणाऱ्या माणसांचा नैतिक अध:पात करण्याच्या सूक्ष्म व धूर्त पद्धतीचा शोध केव्हाही थांबत नाही. कारागृहातून सुटलेल्या कैद्यांप्रमाणे ते पृथ्वीवर पुन्हा पुन्हा येतात आणि माणसात धार्मिकतेची जाणीव घडविणाऱ्या नीतिमत्तेवर दुष्टपणाचे आघात करतात. धर्म ही माणसाची धारणा आहे. निर्माण केलेल्या प्रत्येक वस्तूला धर्म आहे आणि त्याला धारण केल्याने तिचे अस्तित्व आहे. उदा.सोन्याचा धर्म आहे, की ते कधी डागाळत नाही. माणसाला दहा धर्म आहेत सामान्यपणे त्यांना दहा आज्ञा असे म्हणतात. त्या मानवी जीवन टिकवतात. पावित्र्य हा सर्वात महत्त्वाचा धर्म आहे. कुंडलिनी जागृत करण्यातून मला समजले की सर्व विकृत सेक्स, माणसातील पावित्र्याच्या, ज्याला धर्म म्हणतात. पूर्ण विरुद्ध असून ते मानवी उत्क्रांतीच्या प्रगतीच्या विरोधात जाते. माणसाला जर स्वत:चे उत्थान आणि उत्क्रांती साधायची असेल, समाज आणि धर्म यांच्या वर उठायचे असेल (गुणातीत, धर्मातीत) तर त्याला स्वत:चे शुद्ध चारित्र्य आणि पावित्र्य यांचा सन्मान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

तांत्रिक लोक सैतानाच्या टोळीचे सदस्य असून ते हुकूमशहा, मानसशास्त्रज्ञ आणि महान शास्त्रज्ञ म्हणून जन्म घेऊ शकतात. त्यांच्या भाषणातून हजारो लोकांना सुखाची आमिषे दर्शवून आपल्याकडे वळवतात आणि नीती व आध्यात्मिक धर्माचे अधिष्ठान असणाऱ्या देशांच्या विरुद्ध युद्ध पुकारण्यास इतर देशांना प्रवृत्त करतात. या आधुनिक काळात अशा अनेक व्यक्तित्वांनी पश्चिमेकडे व भारतात पुनर्जन्म घेतला आहे. ते भोळ्या-भाबड्या लोकांना आमिषे दाखवतात व संमोहित करतात आणि स्वत:च्या कथित आध्यात्मिक शक्तीचा, पैसा साठवण्यास व लैंगिक समाधान

मिळविण्यास दुरुपयोग करतात. दुसऱ्यांचा छळ करून सुख मिळविणाऱ्यांप्रमाणे ते आपल्यासाठी कोणताही त्रास सहन करण्यास आपल्या अनुयायांना तयार करतात व त्यांना गुलाम बनवतात. आधुनिकतेच्या नावाने ते 'प्राचीन धर्मांना' नवीन स्वरूप देण्याच्या बहाण्याने विपर्यस्त रूप देऊन मरणप्राय अवस्थेत आणत आहेत. स्वैरतेच्या नावाने ते निर्लज्जपणाचा उपदेश करीत आहेत आणि विशेष करून पश्चिमेकडील समाजांवर त्यांनी आपले गारूड टाकले आहे. त्यांच्या जवळ विशेष सृजनशील प्रतिभा, सूक्ष्म बुद्धिमत्ता आणि विषयाचे मुळापासूनचे ज्ञान आहे आणि त्यांचे प्राचीन संपूर्ण भोगवादी किंवा ढोंगी भोगत्यागी तत्वज्ञान आहे. या सर्वांच्या उपयोगाने त्यांनी अनेक भक्तीभावाने आचरणात असलेल्या साधनामार्गांना नष्ट करण्यात यश मिळवले आहे. सध्याच्या दिवसात, जुन्या व मान्यता असलेल्या कल्पनांना आव्हान देणारे लेखन लोकांना वाचायला आवडते. धर्माच्या जुन्या आज्ञा आधुनिक माणसाला मान्य नाहीत कारण त्यांचे परिपूर्ण मोजमाप नाही आणि त्यांची सत्यता व गरज तांत्रिकांसाठी अतिशय उपयुक्त आहे की ज्याच्यात ते माणसाच्या सुखलोलुपतेला पाठिंवा व प्रोत्साहन देऊन या संबंधीच्या माणसाच्या मानसिक कमकुवतपणावर संसर्गजन्य आक्रमण करू शकतात.

बाह्यात्कारी संन्यासी असल्याचा देखावा करून ते लैंगिक स्वातंत्र्याच्या हास्यास्पद सिद्धांताचा उपदेश करतात. या स्वयंघोषित धर्माच्या दूतांनी धर्माच्या विषयावर अनेक पुस्तके लिहिली आहेत पण ते स्वत:च धर्माचा नाश करण्याचे इच्छुक आहेत. आधुनिक माणसाची बुद्धिमत्ता आणि शिक्षण यांची वृद्धी झाल्याने पुस्तकांच्या माध्यमातून तो सत्याचा शोध घेत असतो. म्हणून या प्रतिभावान दुष्ट लोकांनी अप्रत्यक्षपणे व प्रत्यक्षपणे पुस्तके व दीक्षा यांच्या माध्यमातून सहजपणे माणसांची मने जिंकली आहेत. पुस्तकांचे लेखक तेच प्राचीन तांत्रिक आहेत आणि ते

लोकांना अडकवण्याचे अधिक चांगले ज्ञान व नवीन पद्धती घेऊन पुन्हा आले आहेत. आधुनिक माहिती प्रसारित करण्याच्या पद्धतींचा फायदा घेऊन ते आपला माल विकतात आणि नवीन शिष्य जमवतात. त्यांनी आजपर्यंत मिळवलेले मोठे यश, आधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे कारण त्यामुळे स्वतःच्या पद्धतीचा व शिकवणुकीचा त्यांना सर्व जगात प्रसार करता आला. देवदूतांसाठी तयार केलेल्या नियमांमुळे या पुनर्जन्म घेतलेल्या दुष्टात्म्यांचे काम सोपे झाले. तांत्रिकांनी सध्याच्या पिढीला दीक्षा देण्याची जुनी युक्ती वापरून अथवा भाषणातून जाळ्यात अडकवून, कोणत्याही प्रयत्नाशिवाय विकले आहे. त्यांच्यापैकी काहींनी शिष्यांना, लैंगिकरित्या उत्तेजित करण्याची प्राचीन काळातली कला पुन्हा कार्यान्वित केली आणि स्वतःच्या नियंत्रणातल्या, मृतात्म्यांना दुरात्म्यांना शिष्यांत घातले.


आज असंख्य भुते वातावरणात तरंगत असतात. माणसाच्या दुष्टपणाकडे झालेल्या घसरणीमुळे ती आकर्षित जाली आहेत आणि आता संपूर्ण जग त्या मुतांच्या दुष्ट स्पंदनांनी भारित जाले आहे. तसेच संपूर्ण जग भुतांनी व भयानक सैतानी व्यक्तित्वांनी संपृक्त झाले आहे. जगातील सर्व आजारपणे व हिंसाचार, धार्मिक नेते व महान शास्त्रज्ञ असल्याचे भासवणाऱ्या तांत्रिकांच्या दरवाजात जाऊन पडतात. खऱ्या शास्त्रज्ञांना ज्यांना मृतात्म्यांच्या लपवलेल्या शक्तीची काहीही माहिती नसते, अशांना मृतात्म्यांच्या उपयोगाने केलेल्या प्रयोगांचे परिणाम दाखवून सहजच फसवले जात असे. त्यांना प्रयोगाचे कारण कधीच सांगितले जात नव्हते.

आता अशी वेळ आली आहे, की लोकांनी स्वतः बद्दलच्या सत्यास आणि मानवी जाणिवेच्या मर्यादांच्या बाहेरच्या प्रदेशाबद्दल जागे व्हायला हवे. पुनर्जन्म घेतलेल्या राक्षसांनी जो मानसिक गोंधळ तयार केला आहे, त्याचा शेवट ईश्वरी जागृतीशिवाय होणार नाही. आपण पाहिल्याप्रमाणे प्राचीन काळी तांत्रिकांनी गर्भधारणा पंथांच्या माध्यमातून त्यांची शक्ती

कार्यान्वित केली, तर आधुनिक काळात विविध लेबल्सच्या उपयोगाने त्यांनी तंत्रवादाला झाकले आहे. त्यांच्यापैकी पुष्कळ तांत्रिकांनी कुप्रसिद्ध भारतीय खोट्या गुरूंशिवाय तिबेटी व नेपाळी लामा म्हणूनही पुनर्जन्म घेतला आहे. जुन्या वाममार्गी लोकांप्रमाणे तेसुद्धा डिझाइन्स (तंत्र) काढून त्याची पूजा त्यांच्या विधींमध्ये करतात. गुप्तपणे शिष्यांना शिकवण्याची जुनी पद्धत ही पुन्हा अवलंबली जाते ज्यामध्ये त्यांचे सेक्सचे इंद्रिय उत्तेजित केले जाते. या सर्व पद्धती ईश्वर विरोधी असून जे लोक अशाप्रकारच्या तांत्रिक दीक्षा घेण्याच्या कार्यास एक्सपोज होतात (जे अशा कार्यात सहभागी होतात) त्यांची कुंडलिनी चढवणे अतिशय अवघड असते. त्यांची कुंडलिनी चढणार नाही आणि चढलीच तर लगेच पवित्र अस्थिमध्ये मागे कोसळेल. अशा प्रकारे नुकसान झालेलया साधकांना आत्मसाक्षात्कार मिळणे दुरापास्त असते. त्यांना स्वप्नातसुद्धा नरकाची झलक पहायला मिळाली तर ते त्यांचे सुदैव असेल कारण त्यामुळे हे समजण्यास मदत होईल की त्यांना कशाला सामोरे जायचे आहे. त्या तांत्रिकांना, या युगाच्या शेवटी होणाऱ्या अंतिम व संपूर्ण विनाशापासून स्वत:ला वाचवायचे असेल तर सध्या आचरणात आणत असलेल्या भयंकर पद्धतींचा त्यांनी संपूर्ण त्याग करायलाच हवा. त्यांना आत्मसाक्षात्कार घ्यायची परवानगी मिळणार नाहीच परंतु ते कायमचा नरकवास टाळू शकतील.

## प्रकरण ७

# हठयोग आणि राजयोग


The search of Reality by some
in individual human beings
was undertaken in the very early
times (in India). Their struggle to reach God
was happened by the evil people who
polluted their Homa (Fire worship) and
in their Sadhana (Penance)
Their effort was to achieve mental
and physical power to be able to
fight the ~~solar~~ satanic element, therefore
they took to the worship of fire ~~one~~ etc of
the five Elements created by ~~Bra~~ ~~Sur~~ Maha
Saraswati channel in the Virata.
~~They~~ ~~but~~ the attention was given
to the conquering of ~~all~~ the elements
~~and~~ ~~at~~ Moreover in a Ashram
physical exersises (Asanas) were
taught along with ~~Dhanurvidy~~.
Archery (Dhanurvidya) as that was
the only effective weapon in those days

*प.पू. श्रीमाताजींचे हस्तलिखित*

भारतात आरंभीच्या काळापासून काही माणसांनी सत्याचा शोध घेण्यास आणि त्यांचा स्वत:चा स्वभाव समजून घेण्यास आरंभ केला. परमेश्वरापर्यंत जाण्याचा त्यांचा प्रयत्न थांबवण्यास दुष्ट लोकांनी त्यांचे होमहवन दूषित केले आणि त्यांच्या साधनेत व्यत्यय आणला. परंतु त्यांच्या प्रयत्नांमुळे त्या सैतानी तत्त्वांशी लढण्यास लागणारी शारीरिक व मानसिक शक्ती त्यांना साध्य झाली. त्यांनी अग्नी व इतर चार तत्त्वांची पूजा करणे सुरू

केले. या तत्त्वांना महासरस्वती नाडीने विराटाच्या शरीरात निर्माण केले होते. त्यांनी या तत्त्वांना जिंकण्यावर आपले चित्त ठेवले. शिवाय आश्रमात शारीरिक व्यायाम (आसने) व त्यांच्या बरोबर धनुर्विद्या शिकवली जायची कारण त्या काळी धनुष्य हेच एकमेव प्रभावी आयुध असायचे

चांगल्या व दुष्ट शक्तींमधील युद्ध मानवी स्मृतींच्या आधीपासून सुरू आहे. चांगल्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना जिवंत राहण्यासाठी कायमच स्वतःचे रक्षण करावे लागायचे. दुष्ट राक्षसांच्या कचाट्यातून सुटण्यास सत्याच्या शोधकांना (साधकांना) दिसेनासे होण्यासाठी जंगलात नेहमी जावे लागायचे.

अशा संतांचे रक्षण करण्यास दुर्गा स्वरूपात आदिशक्तीने एक हजार अवतार घेतले. या पूर्ण अवतारां शिवाय भारतातील शुद्ध चारित्र्याच्या महिलांमधून आपल्या शक्तीचे अंश प्रकट केले (अंशावतार). आदि विष्णूंच्या परशुराम स्वरूपातील अवताराने (बलवान पुरूष) शारीरिक व मानसिक शक्ती मिळविण्याच्या तंत्राची जाणीव निर्माण केली. अशाप्रकारच्या शोधातून साधकांनी ध्यानाच्या अनेक नवीन पद्धतींचा शोध लावला.

## हठयोग

महासरस्वतीचे सात मार्ग (नाड्या) असून ते संगीताच्या वाद्याच्या सात तारांप्रमाणे स्थित आहेत. पहिली नाडी मध्यमार्गातल्या सुषुम्ना नाडीच्या शेजारी असून तिला गायत्री म्हणतात. या नाडीवरील प्रगती तीन लोकांसमोर नतमस्तक होऊन सुरू व्हायची : भू (पृथ्वी) व तिच्या भोवतालच्या वातावरणासहित सर्व, भुवः (स्वर्ग) अर्थात् स्वर्गसुख आणि जे काही स्वर्गीय आहे, ब्रह्म म्हणजे निर्मिती करणारी अमूर्त शक्ती.

अनेक संतांनी वैयक्तिकरीत्या या धोकादायक मार्गावर जन्मोजन्मी प्रवास केला. हा प्रवास सर्व व्यवसाय सोडून, ब्रह्मचर्याचे पालन करीत, साक्षात्कारी गुरूचे शिष्यत्व घेऊन करायचा असतो. अशा साधकांच्या

जीवनाची शक्ती त्यांच्या गुरूने एकत्र करून साधनेकडे वळवलेली असते. त्यांना सहा प्रकारच्या कठीण साधना कराव्या लागतात.

१) यम ..................लैंगिक इच्छा आणि हव्यास दाबून टाकणे

२) नियम ...............शुद्ध जीवनाचे नियम

३) प्रत्याहार .............गुरूची पूजा तसेच मर्यादा

४) प्राणायाम ............श्वसनाचे व्यायाम

५) आसन ...............व्यायामासाठी शारीरिक आसनं

६) मनन.................ध्यान-धारणा

हा मार्ग गृहस्थाश्रमींसाठी, ज्यांना कुटुंबाचा सांभाळ करायचा असतो व जबाबदाऱ्या असतात, अशांसाठी नसायचा. आधुनिक युगात अनेक, विशेषत: पश्चिमेकडील, गृहस्थाश्रमी लोक बळकट शरीरासाठी व जीवनात शारीरिक सुधारणा करण्यास हठयोगाची साधना करतात. तंदुरुस्त व सुंदर दिसणे हे योगाचे दुसरे नाव झाले आहे. अशा प्रकारची एकांगी साधना साधकांत असंतुलन निर्माण करण्यामुळे धोकादायक असते.

अशी व्यक्ति शरीराने तंदुरुस्त आणि मनाने, बुद्धीने सतर्क होईल, पण भावनेच्या दृष्टीने रिकामी होईल. त्यांचे व्यक्तित्व कोरडे व वाळलेले असते. याशिवाय दुसऱ्या टोकावर चित्त गेल्याने व्यक्ती अतिशय अहंकारी व क्रूर होते.

पूर्वीच्या काळी अनेक क्रूर व हठयोगी लोकांची उदाहरणे होती. त्यांच्यापैकी एक विश्वामित्र होते. त्यांनी अनेक सत्यमार्गी व संतासारख्या गृहस्थाश्रमीयांना त्रास दिला. राजा हरिश्चंद्राचा क्रूर छळ केला. परशुरामाच्या मुलानंतर अति संतापी संन्याशांचा संथ प्रवाहच सुरू झाला. ज्यांच्याकडे अशा ईश्वरी प्रेमाचा लवलेशही नाही अशांना मुक्ती कशी मिळणार याची कल्पना करणेही अवघड आहे.

ते कडक ब्रह्मचर्याचे पालन करायचे आणि त्यांचा सेक्सशी काहीच

संबंध नव्हता. त्यांचा कौटुंबिक नाते संबंधावर व कौटुंबिक कार्यांचे बाबीत लक्ष घालण्यावर विश्वास नव्हता. त्यांचे गुरु साक्षात्कारी जीव असते तर गुरुंनी त्यांना आवश्यक असलेले पित्याचे प्रेम दिले असते व त्यांच्या उत्थानात संतुलन आणले असते. दत्तात्रेयांचे अवतार मच्छिंद्रनाथांनी नाथ पंथ सुरू केला. काही दशकानंतरसुद्धा या पंथाचे असे गुरु होते, की जे अवधूत होते आणि ज्यांच्याबद्दल भीती वाटायची. पण जेव्हा तांत्रिकांनी स्वत:ला या पंथावर लादले आणि अनेक ठिकाणी पंथाला ताब्यात घेतले तेव्हा या पंथाचा ऱ्हास सुरू झाला. या खोट्या गुरुंवर कबीरांनी प्रत्येक कवितेत टीका केली आहे.

## राजयोग

राजयोगाचा उद्‌भव हठयोगातून झाला आहे. या योगप्रणालीचे गुरु राजाप्रमाणे राहायचे. ते राजघराण्यातील व्यक्तिमत्त्वांप्रमाणे कपडे घालायचे व लोकांवर राज्य करायचे. दत्तावतार राजा जनक असेच एक राजयोगी होते. आंतरिक जीवनात योगी असले तरी ते बाहेरील जीवनात राजाप्रमाणे राहायचे. परंतु ते पूर्ण अनासक्त होते. ते आसने प्राणायाम करत नव्हते, पण विविध पद्धतींनी परमेश्वराची आराधना करीत होते. मोहम्मद पैगंबर त्याच आदिगुरूंचे अवतार होते. त्यांनी चार लग्ने केली, पण आंतरिक जीवनात पूर्ण अनासक्त होते. श्रीरामांचा अवतारसुद्धा याच नाडीवर झाला आणि त्यांनी परमेश्वरी राजेपणाचा मार्ग प्रकाशित केला.

या नाडीवर पुन्हा पुन्हा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला. अनेक तथाकथित राजयोग्यांचा उत्थानाचा प्रयत्न फसल्याने त्यांनी विकृत लैंगिक साधना पद्धतींचा आश्रय घेतला. त्यांनी सर्व प्रकारच्या पद्धतींच्या उपयोगाने लैंगिक उत्तेजना मिळवायचा प्रयत्न केला, तसेच जीवनात शुद्ध आचरणाशिवाय चक्रे कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी सद्‌गुणांकडे दुर्लक्ष केले आणि शरीराचा सर्वप्रकारच्या हालचालींचा

(मुद्रांचा) शोध लावला. साक्षात्कार मिळण्यापूर्वी यांत्रिकपणे विविध प्रकारे बोटे जुळवून केलेल्या मुद्रा निरर्थक असतात. किंबहुना आत्मसाक्षात्कारापूर्वी हाताच्या व पायाच्या हालचालींना किंवा शरीर वाकवण्यास कोणताही अर्थ नसतो. परमेश्वरी शक्ती फक्त साक्षात्कारी जीवातूनच बाहेर पडते. मग केवळ बोटाच्या हालचालीने व्यक्ती ईश्वरी शक्ती निर्देशित करू शकतो. खोट्या राजयोग्यांनी सर्वप्रकारच्या मुद्रा केल्या आणि अधीरतेने अनेक सेक्स उत्तेजित करणाऱ्या मुद्रा केल्या.

अनेक अर्धवट ज्ञान असलेले राजयोगी होते. ते खरोखरचे दुष्ट, दुराचारी व ढोंगी होते. त्यांनी सेक्सो-योगाची आसने शिकवली व कुंडलिनी पंथ तयार केला, ज्याच्यात कुंडलिनीचे वर्णन स्त्रियांचा सेक्सचा अवयव किंवा योनी असे केले जायचे. या विकृतांच्या भ्रष्टपणाला मर्यादा नव्हत्या. शालीनतेमुळे मला यापेक्षा जास्त सविस्तपणे लिहिता येत नाही, पण या भोंदू लोकांची जास्त सविस्तर माहिती तंत्रवादावरील प्रकरणात दिली आहे.

गायत्री मार्गावरून अग्रेसर होणे ही संथ क्रिया होती. शिष्यांना जाणिवेच्या उच्च अवस्थेत उन्नत होण्यास गुरु सावकाश मदत करायचे. सहजरीत्या संथपणे कुंडलिनी जागृत होत असे. गुरु माणसे होती. अवतार नव्हते. त्यामुळे टाळूमधील ब्रह्मरन्ध्र छेदण्यास आवश्यक तितक्या शक्तीने कुंडलिनी वर चढवणे गुरूंना जमत नसे. त्यांची अशी शक्ती असे, की कुंडलिनी अतिशय संथ गतीनेच चढू शकायची.

त्यामुळे अशा साधकांच्या कुंडलिनीच्या उत्थापनास हजारो वर्षे लागायची. ते पुन्हा पुन्हा जन्म घ्यायचे. आपल्या गुरूंना शोधायचे आणि सहा कठीण साधना करून गुरूंच्या मदतीने चक्रे स्वच्छ करायचे व कुंडलिनीचे उत्थापन साधायचा प्रयत्न करायचे. ते अतिशय धोकादायक काम होते व कोणताही इच्छित परिणाम साध्य करण्यास पूर्ण समर्पण करावे लागायचे. शिष्यांना शारीरिक व मानसिक पातळीवर सशक्त करण्यास गुरु

गायत्री मंत्राचा उपयोग करायचे. संतुलन ठेवण्यासाठी भावनिक अंगाचे अधिष्ठानरूप दैवत श्रीशिव यांची गुरु उपासना करायचे. साधकांमध्ये संतुलन स्थापित करण्यास आदिगुरूंनी महासरस्वती नाडीची निर्मिती केली, पण आपल्या स्वत:च्या जीवनात संतुलन आणण्यासाठी हठयोगी महाकालीची पूजा करायचे. होमाच्या माध्यमातून अग्निपूजा करून ते गुरु श्रीब्रह्मदेवांना, परमेश्वराच्या सृजनशील अंगाला, आवाहन करायचे. अशा पूजांमधून साधकांना श्री ब्रह्मदेवांचे आशीर्वाद मिळून पुढे आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर पंचमहाभूतांवर सत्ता मिळायची. जे चांगले गुरु मिळण्याइतके नशीबवान नव्हते, ते उत्थानात खालच्या अवस्थेत गेले.

बाकीच्या साधकांपैकी अनेकांनी सूर्याची उपासना केली. सूर्यासमोर नतमस्तक होऊन त्यांनी सोनेरी तांबूस वर्णाची झळाळणारी कांती व तेजस्वी डोळे विकसित केले. ते शीघ्रकोपी स्वभावाचे बनले आणि त्यांनी दुसऱ्यांना शाप देण्याची शक्ती विकसित केली. शाप देण्याच्या शक्तीला बोलावून ते भस्मसात करू शकायचे. काही ब्रह्मचारी व समर्पित स्त्रिया आपल्या पतींना परमेश्वर समजून त्यांची पूजा करायच्या. स्वत:स पवित्र करून त्यांनी आपले उत्थान घडवले व शाप देण्याची शक्ती मिळवली.

त्यांच्यापैकी कोणालाही दुसऱ्यांना मुक्ती मिळवून देण्यात रस नव्हता. त्यांना आपल्या शक्तीचे प्रदर्शन करायचे होते. जे विशेष निराश झाले होते त्यांनी हिंसाचाराचा अवलंब केला. ते देवी कालीला मानवी शिरांचे बलिदान देऊ लागले. मृत्यू झाल्यावर त्यांचे जीव विराटाच्या उजव्या बाजूकडील चेतना बाह्यतेत गेले.

भारत पवित्र भूमी (योगभूमी) आहे आणि धर्माला कितीही आव्हाने आली तरी ती पूर्वी इतकीच निष्प्रभ होतील. जर मागची पापे भारताच्या आध्यात्मिक लाभांपेक्षा (पुण्यापेक्षा) जास्त झाली तर त्याच्या भयानक परिणामास भारत जबाबदार राहील.

## प्रकरण ८

# सहजयोग

'सहजयोग' याचा अर्थ चांगल्या प्रकारे समजण्यास आपल्याला या शब्दाला दोन घटकात विभागावे लागेल. 'सह' म्हणजे बरोबर व 'ज' म्हणजे जन्माला आलेला. 'योग' याचा अर्थ 'मिलन' किंवा 'तंत्र'. म्हणून 'सहजयोग' याचा अर्थ असा की उत्क्रांत होण्याचे तंत्र जे आपल्या प्रत्येकात जन्मतःच आहे. ज्याप्रमाणे आपण कोणत्याही प्रयत्नाशिवाय जन्म घेतो, आपल्याला हात असतात, पाय असतात, मानवी जाणीव असते त्याप्रमाणे परमेश्वराशी विनासायास मिलन होण्यास आपला जन्म असतो व ते आपल्या कोणत्याही प्रयत्नाशिवाय तितक्याच सहजपणे आपल्याकडे येते.

अनेकांना या सत्याचा स्वीकार करणे अवघड असते की त्यांनी कोणताही प्रयत्न केला नाही, तरी ते आत्मसाक्षात्कार प्राप्त करू शकतात. परंतु सहजयोग ही उत्क्रांतीची क्रिया असल्याने मानवी प्रयत्नाने तो साध्य करता येत नाही. ते जीवित कार्य आहे. आपण जमिनीत बीजारोपण करतो तेव्हा ते बीज स्वतःच अंकुरित होते. एका लहानशा कोंबापासून त्याचा खोड, फांद्या, मुळे व पाने असलेला मोठा वृक्ष तयार होतो. या सहज घटित होणाऱ्या वृद्धीमध्ये मानवी प्रयत्नांनी काय फरक पडतो?

आत्मसाक्षात्कार याचा अर्थ जर स्वतः बरोबर (स्व-आत्मा) एकरूप होणे हा आहे, तर कितीही मानवी प्रयत्न केले, तरी ते साध्य होणार नाही. जर धुळीचा एक लहानसा कण अस्तित्वात आहे, तर तो आहे. आत्ता आपण जसे आहोत तसे बनण्यासाठी हिमालयाने असे किती प्रयत्न केले? हे वास्तव गृहीत धरून प्राणी जसे आहेत तसे राहण्यासाठी कोणताही प्रयत्न करीत नाहीत. उत्क्रांतीची क्रिया हे निसर्गमातेचे कार्य आहे आणि मानवी प्रयत्नांच्या मदतीशिवाय अथवा मानवी बुद्धीच्या मदतीशिवाय निसर्ग हे

कार्य करतो. हे साधे सत्य मान्य करणे माणसाला शक्य होत नाही कारण त्याचा अहंकार हे मान्य करू देत नाही.

पृथ्वी सूर्याभोवती वेगाने फिरते, पण ती आपल्याला मोठ्या प्रेमाने व समजुतीने धरून ठेवते व सांभाळते. आपल्याला जीवन देण्यास सूर्य प्रकाशतो व रात्री आपण झोपावे म्हणून जगाच्या दुसऱ्या बाजूस जातो. चंद्र त्याचे कार्य करत आहे आणि ताऱ्यांना त्यांची स्थाने आहेत. असा सुंदर सजवलेला रंगमंच माणसासाठी, त्याने स्वत: काही केल्याशिवाय, निर्माण केला गेला आहे. सृष्टीतील प्रत्येक तत्त्व जसे एकसंघ होऊन कार्य करते त्यावरून ते परमेश्वरी प्रेमाचे वैश्विक अस्तित्व दर्शवते. सृष्टीच्या या एकात्मतेत, संपूर्ण सद्भावनेतून सुसंघटितपणे अनेक विश्वे फिरत असतात. सर्व सृष्टी संगीतातल्या रागाप्रमाणे आहे आणि या उत्क्रांतीत व त्यातील मानवाच्या भूमिकेचा परमेश्वर सर्वनियंता असूनही साक्षी आहे. माणूस त्याच्या स्वातंत्र्यात व प्रतिष्ठेत उत्क्रांत झाला आहे, ते केवळ त्याचा आनंद कसा घ्यायचा ते शिकून त्यात पारंगत होण्यासाठी. सृष्टीचा रचयिता या संगीत निर्मितीचा संयोजक आहे. त्याने स्वत: निर्मिलेल्या प्राणिमात्रांना हे स्वातंत्र्य दिले आहे, की त्यांनी आपली भूमिका निवडावी व आपल्या वाद्याचे सूर त्या संयोजकाच्या परम परिपूर्ण वाद्याशी जुळवावेत.

प्रारंभी, जेव्हा सृष्टी अस्तित्वात आली तेव्हा परब्रह्म व त्यांची शक्ती (आदिशक्ती) वेगळे झाले. परमेश्वरापासून वेगळ्या झालेल्या त्यांच्या शक्तीने त्यांच्याकडे परत जाण्यासाठी विश्वामागून विश्वांची रचना केली. आदिशक्तीने, माणसाच्या विश्वात सूर्यमाला निर्माण केली व उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांमधून जीवनाची धारणा व पोषण करण्यास पृथ्वी निर्माण केली, शेवटी माणूस तयार केला. या टप्प्यावर, पहिल्या प्रथम, परम परमात्मा परमेश्वराला स्वत:मध्ये प्रतिबिंबित करीत आत्म्याने मानवी जाणिवेत प्रवेश केला. या दोन जाणिवांचे, एक मानवी व सीमित तर दुसरी

परमेश्वरी व असीमित, मिलन मानवी चेतनेतच शक्य आहे.

परमेश्वर त्यांच्या सृजनशील व विनाशक शक्तींनी सृष्टीची रचना व विनाश करतात. हे म्हणजे, कलाकाराच्या हातातील पेन्सील व रबराप्रमाणे आहे अथवा आपण परमेश्वरांची त्यांचा मोटार चालक म्हणून, जो ॲक्सिलरेटर किंवा ब्रेक दाबतो, कल्पना करू शकतो. या शक्तींच्या उपयोगाने परमेश्वर माणूस निर्माण करतात व काळाबरोबर माणूस स्वत:च शिकणारा ड्रायव्हर होतो. हे जेव्हा होते तेव्हा परमेश्वर स्वत: प्रवाशांच्या जागेवर बसतो व माणूस पर्यवेक्षकाच्या नजरेखाली गाडी चालवतो. आरंभी शिकावू चालक म्हणून तो अनेक चुका करतो, पण एक दिवस तो स्वत: गाडी चालवण्यात परंगत होतो. हे घडते तेव्हा परमेश्वर शिक्षक म्हणून निवृत्त होतो आणि माणसाला स्वत:च्या चालकाच्या जागेवर बसू देतो. या मोक्याच्या स्थानावरून नवीन अर्हताप्राप्त चालक, आत्मसाक्षात्कारी माणूस, ब्रेक व ॲक्सिलरेटरचा उपयोग साक्षीभावाने पाहतो. ब्रेक व ॲक्सिलरेटर खरे म्हणजे त्याच्याच शरीराचे भाग असतात.

'सहज' याचा अजून एक अर्थ आहे 'सोपा, सरळ व स्वयंघटित होणारा.' आपल्यामधील सहजयोगाच्या यंत्रणेचे कार्यान्वित होणे अगदी गुंतागुंतीचे असले तरी सहजयोगाचे कार्य अगदी सोपे आहे. तुम्हाला टेलीव्हिजन पहायचा असल्यास ते अगदी सोपे आहे, केवळ बटण दाबणे, पण बटण दाबल्यावर टिव्हीचे सुरू होणे यामागचे तंत्रज्ञान व तंत्र समजावणे अतिशय अवघड व गुंतागुंतीचे आहे. ते कसे काम करते ते समजण्यास व समजावण्यास इंजिनियरींग शिकलेला माणूस लागतो. साध्या शब्दात ते समजावणे फार अवघड असते. टिव्हीचा आनंद घ्यायचा सोपा मार्ग म्हणजे तो सुरू करायचा, पहायचा व मग त्याचे इंजिनियरींग समजून घ्यायचे.

हेच तत्त्व आत्मसाक्षात्काराच्या मागे असलेल्या गुंतागुंतीच्या इंजिनियरींगचे आहे. मी तुम्हाला आत्मसाक्षात्कार देण्यासाठी आले आहे.

त्याच्या फायद्यांचा आनंद घेण्यास तो कसा कार्यान्वित होतो हे समजण्याची गरज आहे का? आपल्या मुलांबद्दल काळजी वाटणारी आई म्हणून मी तुम्हाला सांगेन, की मी तुमच्यासाठी स्वयंपाक बनवला आहे. तर मी कसा स्वयंपाक केला याचा विचार करण्याऐवजी मी बनवलेले जेवण जेवून त्याचा आनंद का घेत नाही? तुम्हाला खरोखरची भूक लागली असल्यास जेवण्यास सुरूवात करा. तुम्हाला भूक नसेल व नुसत्याच चौकशा करायच्या असतील, तर मी काय करणार? मी तुमच्यावर जेवणाची जबरदस्ती करू शकत नाही किंवा मी तयार केलेल्या जेवणावर व्याख्यान देऊन तुम्हाला भूक लागू शकत नाही. प्रथम जेवायचे की तुम्हाला भूक लागेपर्यंत चर्चा करायची ते मी तुमच्या सूज्ञतेवर सोडते.

सर्वशक्तिमान परमेश्वर व त्यांची शक्ती यांचे वेगळे होणे व पुन्हा एक होणे हे खाली दिलेल्या घटनाक्रमानुसार घडले :

* परब्रह्माचे परम परिपूर्ण (absolute) अशरीरी अस्तित्व जे केव्हाही प्रकट झाले नाही. (अपरंपार)
* परब्रह्माच्या सर्वशक्तिमान परमेश्वरी अंगाचे माणसात आत्मा म्हणून प्रतिबिंबित होणे. (परंपार)
* परमेश्वराच्या आदिशक्ती अंगाचे अभिव्यक्त होणे. (अपार)
* आदिशक्तींनी त्यांचे विविध अवतार धारण करणे. (परम)

आदिशक्ती त्यांच्या असीम परमेश्वरी शक्तीतून (प्रणव) खालील तीन सीमित व्यक्तिमत्त्वे, तीन कार्ये करण्यासाठी निर्माण करतात :

१. महाकाली स्वरूपात त्या सृष्टीला अस्तित्वात आणतात व तिचा विनाश करतात.
२. महासरस्वती स्वरूपात त्या विश्वाची निर्मिती करतात व शेवटी पृथ्वीची निर्मिती करतात.

३. महालक्ष्मी स्वरूपात त्या दोन्ही शक्ती एकात्म करतात व स्वत:चे प्रेम प्रकट करण्यास, उत्क्रांत करतात.

त्यांच्या तीन शक्तींच्या विविध प्रकारच्या एकत्रीकरणातून व समन्वयातून त्या सर्व काही संघटित करतात व शेवटी त्यांची सर्वोत्कृष्ट निर्मिती म्हणून माणसाला उत्क्रांत करतात. या तीन शक्ती परस्परांबरोबर कार्यान्वित होऊन माणसाची शारीरिक, बौद्धिक, भावनिक (मानसिक) आणि आत्मिक अंगे निर्माण करतात. पहिली तीन अंगे सीमित घटनांसाठी तर शेवटचे असीमित घटनांसाठी असतात. विकासाच्या या शक्त्या सर्वप्रथम मनुष्याला निवडीचे स्वातंत्र्य प्रदान करतात.

मानवात परमेश्वर सूक्ष्म शरीर म्हणून अभिव्यक्त होतो. तर त्यांचा असीमित स्वभाव आत्मा म्हणून प्रतिबिंबित होतो. परमेश्वराचे, आत्मा या स्वरूपाचे, त्यांच्या शक्ती (कुंडलिनी) बरोबर, माणसांमध्ये मिलन होते. मिलन, कुंडलिनीच्या शेष शक्ती, जिचा सीमित स्वभाव आहे, तिच्या माध्यमातून घडते. या परमेश्वरी शक्तीची मानवातील अभिव्यक्ती मानवी चित्त निर्माण करते व कुंडलिनी जागृतीतून ती अधिक शुद्ध होते. आत्मसाक्षात्काराच्या क्षणी हे चित्त सामूहिक चेतनेच्या असीम क्षेत्रात प्रवेश करते.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रथम एका माशाला जमिनीचा उंबरठा ओलांडून यावे लागते. नंतर बाकीचे मासे त्याच्यामागे येतात. सामूहिक आत्मसाक्षात्कारात हेच तत्त्व कार्य करते. उत्क्रांतीमध्ये माणूस मोठी उडी घेतो तेव्हा, उत्क्रांतीच्या प्रक्रियेचे नेतृत्व करण्यास व मार्गदर्शन करण्यास परमेश्वरी अवतार जन्म घेतो. अवतार परमेश्वराच्या विविध अंगांचे प्रतिनिधित्व करतात. वेगवेगळ्या काळात (युगात) जन्म घेऊन ते मानवतेस जीवनाच्या विविध टप्प्यांवर मार्गदर्शन करतात. हे सर्व टप्पे 'सहज' किंवा 'स्वयंघटित' होते. शेवटचा व सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणून सामूहिक

आत्मसाक्षात्कार आणि सहजयोग ही आधुनिक काळाची (कलियुगाची) देणगी आहे. हे मानव व परमेश्वर यांच्यातील संपर्काची सर्वोच्च अवस्था आहेत.

'अचेतन' सर्वशक्तिमान परमेश्वराची जाणीव असून ती दिव्याच्या प्रकाशाप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे दिव्याने दिवा पेटवतात तसे एका साक्षात्कारी जीवाने दुसऱ्याला प्रकाशित करता येते. प्रारंभी एक जीव सहजयोगातून आत्मसाक्षात्कार घेतो व दुसऱ्याला तो कसा द्यायचा ते शिकतो. कुंडलिनी शास्त्राचे हे पवित्र ज्ञान फक्त सहजयोगातूनच पूर्णपणे शिकता येते.

सहजयोगाचे काही अगदी साधे नियम असून त्यांची तुलना टेलिफोन वापरण्याच्या नियमांशी करता येईल :

* तुमचा संपर्क जोडला गेला नसेल तर तो जोडून घ्यावा.
* तुमचा संपर्क जोडला गेला नसेल तर तो जोडला असल्याप्रमाणे वागू नका.
* तुमचा संपर्क जोडला नसल्यास आणि तुम्ही जोडल्या नसलेल्या फोनचे सतत नंबर फिरवल्यास तुमचा फोन बिघडू शकतो.
* तुमचा संपर्क जोडला गेला नसल्यास किंवा अति महत्त्वाच्या व्यक्तीशी (परमेश्वर) तुमची आगावू भेट ठरली नसल्यास, सतत त्याला फोन करण्याने तुम्ही त्याला नाराज कराल. सहजयोगात खरे साधक कोण व खोटे कोण ते ओळखण्याची वेगळी पद्धत आहे.

परमेश्वराबद्दल पुस्तके वाचून लोक पुस्तकांतील शब्दांशी तादात्म्य ठेवतात. ते हे समजत नाहीत, की ते शब्द मृत शब्द आहेत. एखाद्याला असे वाटत असेल, की त्याला धार्मिक ग्रंथांचे फार चांगले ज्ञान आहे, तर ते याचे चिन्ह आहे की ती व्यक्ती अनेक जन्म आत्मसाक्षात्कारास प्राप्त होणार नाही.

याचे उलट ज्यांना बौद्धिक शोधाअंती असे वाटते, की परमेश्वराबद्दलची पुस्तके वाचण्यात किंवा त्याचा अभ्यास करण्यात कोणताही आनंद नाही असे लोक सामूहिक चेतनेच्या अपरिचित प्रदेशात सहजपणे उडी मारतील.

भावनिक स्तरावर परमेश्वराचा शोध घेणारे लोक जे अश्रू वाहिल्याचे किंवा पश्चात्ताप झाल्याचे दर्शवतात आणि विरहाची दु:खी गाणी गातात त्यांच्यासमोर परमेश्वर उभा ठाकला तरी त्याला ते ओळखत नाहीत. तुलसी रामायणकर्ते महान संत तुलसीदास यांना तीन वेळा श्रीरामांनी दर्शन दिले, पण ते ओळखू शकते नाहीत.

ज्या महान अचेतनाच्या मंचावर आपल्याला बसायचे आहे, त्याचे वर्णन करणे म्हणजे तिथे बसणे नाही. या उलट मंच तयार करणारे सहजरीत्या मंचावर जाऊ शकत नाहीत. ते मंच उभारण्यात इतके व्यस्त असतात, की ज्याचे वर्णन करून ते उभारण्याचा प्रयत्न करतात तिथे उडी घेण्यास त्यांचे चित्त मोकळे नसते.

तथाकथित महत्त्वाच्या कार्यात व्यस्त असणारे लोकसुद्धा त्यांच्यातल्या असीमित शरीरात जाऊ शकत नाहीत. हे तेव्हाच फक्त घडून येईल, जेव्हा मानवी मन त्याचा अग्रक्रम बरोबर ठरवेल. जे काही खरोखर महत्त्वाचे आहे ते परमेश्वर करतात, तर माणसाने त्यांचे काम करण्याचा हट्ट का धरावा? आपण जेव्हा रेल्वेने अथवा विमानाने प्रवास करतो तेव्हा आपले सामान डोक्यावर ठेवतो का? अर्थात् नाही. स्वत:ला वैयक्तिकरित्या जबाबदार समजणारे असला मूर्खपणा फारच ताणतात. असे लोक दावा करतात की परमेश्वर त्यांच्यामधून कार्य करतो आणि त्यांना परमेश्वराच्या आज्ञोप्रमाणे काम करावे लागते. पण ते खरोखर परमेश्वराशी जोडलेले आहेत का? ते वास्तवात परमेश्वराचे मन आणि त्यांच्या इच्छा जाणतात का? ते अचेतनाशी परिचित आहेत का? अचेतनाने चिन्हांच्या माध्यमातून पाठवलेली माहिती डिकोड करून (चिन्हांचा अर्थ लावून) समजू शकतात का?

अनेक लोक परमेश्वर प्राप्तीसाठी प्रचंड प्रयत्न करतात. ते नाम जप करतात, पण का? ते करण्याची परवानगी त्यांना आहे का? अशा लोकांचा हा त्रास असतो, की ते सर्वशक्तिमान परमेश्वराला गृहीत धरतात व त्यांचे आशीर्वाद मिळणे हा जन्मसिद्ध अधिकार समजतात. परमेश्वर त्यांच्या आज्ञा ऐकून त्यांचे पालन करण्यासाठीच आहे का? ज्या प्रकारे, हे परमेश्वरावर अधिकार दाखवणारे साधक त्यांनी आपल्याकडे लक्ष द्यावे अशी अपेक्षा करतात, त्याचे मोठे आश्चर्य वाटते, जणू काही परमेश्वर त्यांचे देणे लागतात! त्यांना एक प्रकारच्या अहंगडाने ग्रासलेले असते. त्यांच्या जीवनकालात परमेश्वरी अवतारांना ओळखण्याची इच्छा नसल्याने ते अवतारांना क्रुसावर चढवतात किंवा त्यांना ठार मारतात. अवतारांच्या मृत्यूनंतर हेच लोक त्यांची मंदिरे व चर्चेस बांधण्यास व स्तुती गाण्यास पुढे असतात. मानवी स्वरूपातील त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांना ओळखण्यात त्या लोकांचा अहंकार आडकाठी आणतो. कदाचित न्यूनगंडाने ग्रासल्याने परमेश्वरी अवताराला ते नाकारतात. ते लोक हे मान्य करू शकत नाहीत, की ते स्वत: इतक्या खालच्या प्रतीचे आहेत आणि ते अवताराच्या जवळसुद्धा येत नाहीत.

लोकांच्या श्रद्धा, त्यांना मिळालेल्या कृत्रिम कल्पनांच्या अनुसार असतात. उदाहरणार्थ श्रीमंत माणूस गरीब परिस्थितीत जन्मलेल्या अवताराला मानणार नाही. बुद्धिजीवी माणूस अवताराला मानेल, ही शक्यता फारच कमी असते. परमेश्वराला किंवा त्याच्या अवताराला मानण्यात मानवी बुद्धी हा सर्वात मोठा अडथळा आहे. कारण त्यांच्या वस्तुस्थितीच्या संपूर्ण शोधात ते बुद्धीवर अवलंबून असतात. बुद्धीला धरून मोठ्या प्रमाणावर विविध प्रयोग केल्याने बुद्धीचे उपरकण त्यागण्याची त्यांची तयारी नसते. याशिवाय आत्मसाक्षात्कार,परमेश्वर आणि अवतार याच्याविषयी साधकांच्या निश्चित कल्पना असतात. माणसाने

परमेश्वरासाठी तयार केलेल्या साच्यात बसणे त्याला कसे शक्य असणार? ते जे आहेत ते आहेत आणि परमेश्वराविषयी माणसाच्या इतक्या वेगवेगळ्या व अस्पष्ट कल्पना आहेत, की त्यांच्याशी जुळेल असे तयार होणे शक्य नाही.

जे लोक देवाची दुकाने उघडून 'देव विक्रीस आहे' अशा जाहिराती करतात, ते सर्वात जास्त पापी आहेत. त्यांच्याकडे आकर्षित होणारेसुद्धा एकप्रकारे त्यांचे साथीदार होतात. दोन्ही प्रकारचे लोक अज्ञानाचे बळी आहेत. जे लोक प्रयत्न करून अथवा अज्ञानाने, सामूहिक सुप्त चेतना किंवा सामूहिक चेतना बाह्यता त्यांच्या प्रदेशाशी जाणिवेतून संलग्न होतात, त्यांची कुंडलिनी चढवणे अत्यंत अवघड असते. त्यांना याची जाणीव नसते की ते उपभोगीत असलेल्या बाह्यात्कारी शक्ती कोणत्या तरी भुताच्या मालकीच्या आहेत. हे मृतात्मे खऱ्या रूपावर प्रभुत्व चालवतात आणि वास्तवाला अज्ञानात लपवतात. अतींद्रिय व्यक्तित्वांचा उपयोग करून स्वत:ला शक्तिमान समजणाऱ्या लोकांना वास्तव काय आहे ते पटवणे अवघड असते. सामूहिक सुप्त चेतनेतल्या किंवा सामूहिक चेतना बाह्यतेतल्या जोडीदाराने त्यांच्यावर हल्ला केल्याशिवाय त्यांना हे समजत नाही. असल्या लोकांच्या अनुयायांवरही याचा परिणाम होणे अटळ असते. कठीण परिस्थिती लक्षात आल्यवर असे अगणित लोक मदत घेण्यासाठी सहजयोगाकडे वळले आहेत. शेवटी, जेव्हा प्रकाश पडतो तेव्हा आपण कसे फसवले व लुबाडले गेलो आहोत हे त्यांच्या लक्षात येते. अशाप्रकारे बळी पडलेल्या लोकांना सहजयोग्यांनी विशेष लक्ष देऊन मदत करण्याची गरज असते. मी सांगितल्याप्रमाणे अशांना आत्मसाक्षात्कार देणे कठीण असते व तो मिळवायला पुष्कळ काळ जावा लागतो. त्यांनी पूर्ण सहकार्य केल्यास सहजयोग त्यांची मुक्तता घडवतो. पण ते पूर्ण हृदयाने शरण गेले नाहीत, तर अचेतनाची त्यांच्यातली रुची जाते.

सर्व प्रकारचे दारू व इतर व्यसने असलेले लोक पण अवघड उमेदवार (आत्मासाक्षात्कारासाठी) असतात. त्यांच्या सवयीचे गुलाम झाल्याने सुप्त चेतनेच्या स्तरावर अडकलेले असतात आणि त्या चिखलातून सरपटत बाहेर येऊ शकत नाहीत. सहजयोग त्यांना एक शक्ती देतो ती म्हणजे कशात न अडकण्याची. सहजयोगी झाल्यावर अनेक लोकांनी स्वत:च्या अवस्थेकडे लक्ष देवून गुलामगिरीच्या शृंखला टाकून दिल्या.

ज्या स्त्री-पुरुषांना स्वत:च्या शुद्ध चारित्र्याचा आदर नसतो त्यांचा सहजयोगही मान ठेवत नाही. त्याचप्रमाणे जे शरीराला कष्ट देऊन त्रास सहन करतात त्यांचा आणि जे शरीराचे अखंड कौतुक करीत सुंदर शरीर विकसित करण्यात यशस्वी होतात, त्यांचाही सहजयोग मान ठेवत नाही. त्यांच्या जीवनाची गुणवत्ता बदलत नाही आणि ती फार उथळ माणसे असतात. मानवी शरीर परमेश्वराचे मंदिर असून त्याच्यावर प्रेम कसे करावे व त्याला कसे सजवावे, हे सहजयोग शिकवतो.

सहजयोग अचेतनाकडून (परम चैतन्य) घटित केला जातो आणि काही मूर्ख लोक असे आहेत, की त्यांना वाटते आपण परमेश्वराला फसवू शकतो. पण त्याची परतफेड म्हणून ते सहजयोगाकडून फसवले जातात आणि त्यांची हुशारी निष्प्रभ झाली असल्याचे पाहून त्यांना आश्चर्याचा धक्का बसतो. सहजयोगाच्या नाटकात काही वेळेस फार खोडकरपणा असू शकतो. अनेक चमत्कारी घटना घडतात, तर मोठ्या प्रमाणावर पोट धरून हसायला लावणारा विनोदही असतो.

## प्रकरण ९

# मानवातील कुंडलिनीची निर्मिती

कुंडलिनी स्वरमंडल (हार्प) आहे ज्याच्यावर परमेश्वर त्यांच्या प्रेमाचे राग, संगीत वाजवत असतात. कुंडलिनी शिडी आहे, जिच्यावरून साधक उंबरठा ओलांडून अथांग अचेतनामध्ये पाऊल टाकतो. कुंडलिनी तो जंपिंग बोर्ड आहे, ज्याच्यावरून उंच भरारी घेऊन सीमित पासून स्वातंत्र्य, शांती आणि आनंद यांच्या असीमित सागरात जाता येते. कुंडलिनी ते साधन आहे ज्याच्या उपयोगाने फार पूर्वी वचन दिलेल्या परमेश्वरी साम्राज्यापर्यंत जाता येते.

प्राचीन काळातील ऋषी-मुनींनी ध्यान केले आणि जाणिवेच्या उच्च अवस्था मिळवल्या. त्यांनी कुंडलिनीबद्दल पुष्कळ लिहिले आहे. जनसामान्यांपासून दूर जंगलातील घरात राहून ध्यानात स्वत:मधील कुंडलिनीचे कार्य पाहिले. भारतातल्या प्राचीन ग्रंथांशिवाय, तोरा, बायबल, कुराण अशा ग्रंथात 'द फायर ट्री' (अग्नि वृक्ष) असे कुंडलिनीचे वर्णन केले आहे. त्या ग्रंथात अनेक ठिकाणी गुप्त भाषेत कुंडलिनीबद्दल उल्लेख आहेत. फार थोड्या लोकांना ते समजले. बायबलमध्ये, येशू ख्रिस्तांना सुळावर चढवल्यानंतर कुमारी मेरी माता यांच्या बरोबर शिष्यांच्या बैठकीचे वर्णन आहे, 'ज्या बंद खोलीत ते जमले होते ती' मोठ्या प्रमाणावर वाऱ्याने भरली होती आणि प्रत्येकाच्या मस्तकावर वेगवेगळ्या, अग्नीच्या जिभा दिसल्या आणि ते होली घोस्टने भरले गेले.' हे कुंडलिनीच्या दर्शनाचे वर्णन आहे. अनेक चिनी तत्त्वज्ञांनी त्यांच्या लिखाणात कुंडलिनीचे वर्णन केले आहे. ग्रीक देशाच्या पौराणिक ग्रंथात त्याच देव-देवतांची यादी आहे ज्यांच्याबद्दल मी सृष्टीच्या निर्मितीवरील प्रकरणात लिहिले आहे. झेन, बुद्ध धर्मात स्पष्ट शिकवण आहे, की कुंडलिनी शास्त्र, बौद्धांच्या ध्यानाचा आधार आहे.

कुंडलिनी हे नाव भारतीय ऋषींनी दिले आहे. परमेश्वराने बनविलेल्या

कशालाही त्यांनी स्वत: नाव दिले नाही. कुंडलिनी हे 'कुंडल' म्हणजे 'वलय' या संस्कृत शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द आहे. गोपनीय भाषेत लिहिले असले तरी प्राचीन ग्रंथातील कुंडलिनीचे वर्णन सहजयोग्यांना सहज आकलनीय आहे. स्थूल भाषेतील वाक्यांच्या अर्थाच्या मागची सूक्ष्म अध्याहृत माहिती सहजयोगी पाहू शकतात व समजूही शकतात. प्रत्येक धर्मात, सत्याची ज्योत कुंडलिनीच्या वातीवर तेवते हे जर या धर्माच्या व पंथाच्या अनुयायांनी लक्षात घेतले तर त्यांना आत्मबोध होऊ शकतो. प्रत्येक मानवातली, कुंडलिनी ही वैश्विक जाणीव (Identity) आहे.

कुंडलिनीबद्दलचे ज्ञान बहुतेक संस्कृत ग्रंथातच वर्णिले आहे, पण मी शास्त्रीय परिभाषेच्या उपयोगाने आधुनिक गरजांना अनुसरून तिचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञान फक्त एकाच भाषेत असू शकते किंवा व्यक्त करता येते, या कल्पनेने कोणीही क्षणभरसुद्धा विक्षिप्त (obsessed) होऊ नये. त्याचप्रमाणे ज्या एका भाषेत सत्य अभिव्यक्त केले असेल तर त्यामुळे त्या भाषेपेक्षा बाकीच्या कमी महत्त्वाच्या होत नाहीत. पुढे, वैद्यकीय परिभाषेत, जी मी चाळीस वर्षापूर्वी मेडिकल कॉलेजमध्ये शिकले होते, कुंडलिनीच्या सूक्ष्म शक्तीची वृद्धी व प्रकटीकरण स्पष्ट करेन. त्यानंतरच्या वर्षात, शास्त्रीय नावे बदलली असल्याने मी वापरलेल्या नावात व सध्याच्या नावात फरक जाणवला तरी त्या शब्दाबद्दल काही विचार करू नये, तर त्याच्या माध्यमातून सांगितलेल्या ज्ञानाकडे लक्ष द्यावे.


## मानवी गर्भात कुंडलिनीचा प्रवेश

माणूस आईच्या उदरात गर्भ म्हणून असतो तेव्हा त्याच्यात दोन ईश्वरीय घटना घडतात:

१. आत्मा गर्भाच्या हृदयात प्रवेश करतो व हृदयाचे स्पंदन चालू होते. या स्पंदनाच्या लाटा साडेतीन वलयात हालतात. आकृती पहा.

२. त्याचवेळी परमेश्वरी शक्ती (प्रणव) मेंदूमधून गर्भात प्रवेश करते.

कवटीमध्ये बंदिस्त असलेला मानवी मेंदू कोनाच्या आकाराचा असून सर्वात वरच्या बाजूस टाळूच्या भागात त्याचे वरचे टोक असते व लोलकाप्रमाणे त्याला पाया व तीन बाजू असतात. मेंदूचे हे तीन स्तर तीन वेगवेगळ्या गोष्टींचे (material) बनले असून त्या प्रत्येकाची वेगळी घनता (density) असते. त्यामुळे लोलकाप्रमाणे परावर्तनाचा (refraction) गुणधर्म असल्याप्रमाणे मेंदू कार्य करतो. लोलकाच्या आकारासारख्या मेंदूला पिरॅमिडप्रमाणे तीन बाजू असल्याने त्यात प्रवेश केल्यावर परमेश्वरी शक्ती तीन प्रवाहात, भागात (Channels) विभागते. या तीन भागांपैकी दोन भाग मेंदूच्या दोन बाजूंमधून प्रवेश करतात व एक त्याच्या वरच्या टोकातून (Apex) प्रवेश करतो. ते हृदयाच्या स्पंदनातून (ईश्वरी शक्ती) तयार झालेल्या प्राथमिक वलयावरून जातात व एक दुसऱ्यांशी संपर्क स्थापित करून सात चक्रे तयार करतात. (पहा आकृती १०)




**आकृती १०**

नंतर ही सात सूक्ष्म केंद्रे (चक्रे) स्थूल शारीरिक केंद्राच्या रूपात मज्जारज्जूच्या बाहेर प्रकट होतात. ती खाली दिल्याप्रमाणे असतात :

१. सहस्रार चक्र - मेंदूमध्ये

२. आज्ञा चक्र - ऑप्टिक नर्व्ह जिथे छेदते ती जागा

३. विशुद्धी चक्र - सर्व्हायकल प्लेक्सेसला प्रकट करते

४. अनहत/हृदय चक्र - हृदय केंद्राला (कार्डियाक प्लेक्सेस) प्रकट करते.

५. नाभी/मणिपुर चक्र - सूर्य केंद्राला (सोलर प्लेक्सेस) प्रकट करते.

६. स्वाधिष्ठान चक्र - महाधमनी केंद्राला (अेऑर्टिक प्लेक्सेस) प्रकट करते.

७. मूलाधार चक्र - पेल्व्हिक प्लेक्सेसला प्रकट करते.


ही शरीरातील मुख्य केंद्र असून, ती स्थूल प्रकृतीची आहेत. प्रत्येक प्लेक्सेसला सब-प्लेक्सेस असतात. त्यांचे सविस्तर वर्णन प्रत्येक चक्रावरील प्रकरणात केले आहे.

कुंडलिनीने टाळूमधून ब्रह्मरंध्रातून प्रवेश केल्यावर ती मेंदूमधून सरळ खाली मज्जारज्जूमध्ये उतरते.

मेंदूच्या दोन बाजूतून परमेश्वरी शक्ती, आकृती १० मध्ये A1 आणि A2 असे दर्शविल्याप्रमाणे वाहते. दोन ठिकाणी त्यांचे परावर्तन होते आणि समांतर चतुर्भुज शक्तीच्या (पॅरललोग्राम ऑफ फोर्सेस) सिद्धांताप्रमाणे उतरत्या बाजूंवर पडलेले किरण दोन भागात विभागले जातात. एक जोडी शरीराच्या बाहेर जाते, तिला मी B1 व B2 असे म्हटले आहे. दुसरी जोडी मज्जारज्जूत प्रवेश करते. तिला मी C1 व C2 असे म्हटले आहे. ही दुसरी जोडी मज्जारज्जूमध्ये डावी व उजवीकडे, इडा व पिंगला नाड्या तयार करते. याच सूक्ष्म नाड्या पुढे डावी व उजवी सिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम प्रकट करतात.

परमेश्वरी शक्ती मेंदूच्या मागील बाजूस प्रवेश करून मज्जारज्जूत 'A' प्रवाहाच्या रूपात खाली जाते. त्याचप्रमाणे 'B' प्रवाह म्हणून परमेश्वरी शक्ती

गर्भाच्या मागच्या भागातून मज्जारज्जूत प्रवेश करते. हे दोन ईश्वरी प्रवाह मध्यवर्ती मज्जासंस्था बनवण्यास एक होतात. 'A' प्रवाह मनुष्याला ऐच्छिक कार्य करू देतो, तर 'B' प्रवाहाने ते अनैच्छिक कार्य करतात.


From the apex of the brain, the Divine power (Pranava) enters and settles down as three powers. The lowest one is Mahakali power. The seccond one is the Mahasarswati power and the top most one is the Mahalaxmi power. These three powers create the three pairs of deities and their powers. Then all the other deities are created.

First Mahakali creates Shri Ganesha

I Shiva – Parvati (Durga

II Brahma – Saraswati

III VISHNU – laxmi

*प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित*


मेंदूच्या वरच्या भागातून (टोकामधून) परमेश्वरी शक्ती (प्रणव) प्रवेश करून तीन शक्ती म्हणून माणसात राहते. सगळ्यात खालची महाकाली शक्ती असते, दुसरी महासरस्वती शक्ती असते, तर सर्वात वर महालक्ष्मी शक्ती असते. या तीन शक्तींनी, दैवते व त्यांच्या तीन शक्त्या यांच्या तीन जोड्या तयार केल्या. त्या आहेत :

- शिव + पार्वती (दुर्गा)
- ब्रह्मा + सरस्वती
- विष्णु + लक्ष्मी

ही दैवते, श्रीकृष्ण व त्यांची शक्ती राधा यांना आणि येशू ख्रिस्त यांना प्रकट करतात, ख्रिस्तांची शक्ती त्यांची माता मेरी साक्षात् महालक्ष्मी आहेत. ही दोन दैवते श्रीविष्णू व श्रीगणेश यांचे उत्क्रांत मानवी अवतार आहेत. या कृतीनंतर तीन भागात विभाजित असलेल्या प्रणव मज्जारज्जूत प्रवेश करतो. त्याचा शेवटचा धागा (महाकाली किंवा गौरी शक्ती) कुंडलिनी रूपात त्रिकोणाकृती पवित्र अस्थिमध्ये दिसेनासा होतो.

कुंडलिनीच्या वलयापासून श्रीगणेशांची मूलाधार चक्रात स्थापना केली

जाते. ते चक्र कुंडलिनीच्या घराच्या, मूलाधाराच्या बाहेर असते. श्रीगणेश या चक्रावर राहून कुंडलिनीच्या, त्यांच्या आईच्या पावित्र्याचे रक्षण करतात. प्रत्येक मनुष्याची स्वतःची वैयक्तिक कुंडलिनी असून ती त्या माणसाची आई व तो तिचा एकच मुलगा असतो. ती गौरी माता असून ती सुप्तावस्थेत राहते व तिच्या एकमेव मुलाला दुसरा जन्म (द्विज) किंवा आत्मसाक्षात्कार देण्यास योग्य क्षणाची वाट पाहते. बाकी दैवते आपल्या चक्रांवर विराजमान असतात.


They are 1. Sahastrara - [illegible] in the brain.
2. Agnya chakra - at the crossing point of the optic nerve
3. Vishuddhi chakra → manifests the cervical plexus,
4 Anahat or Ridhaya chakra → manifests the cardiac plexus,
5 Nabhi or Manipur chakra → manifests the solar plexus
6. Swadhisthan chakra → manifests the Aortic plexus
7. Mooladhara chakra → manifests the pelvic plexus

*प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित*

| | | |
|---|---|---|
| १. सहस्रार चक्र | - | साक्षात् श्रीआदिशक्ती |
| २. आज्ञा चक्र | - | येशू ख्रिस्त + त्यांची आई मेरी |
| ३. विशुद्धी चक्र | - | श्री कृष्ण + श्री राधा |
| ४. अनहत चक्र | - | श्री राम + श्री सीता (उजवी बाजू), |
| | | श्री शिव + श्री पार्वती (डावी बाजू), |
| | | श्री जगदम्बा (दुर्गा) (मध्यभागी) |
| ५. नाभी चक्र | - | श्री विष्णु + श्री लक्ष्मी |
| ६. स्वाधिष्ठान चक्र | - | श्री ब्रह्मदेव + श्री सरस्वती |
| ७. मूलाधार चक्र | - | श्री गणेश + श्री गौरी |

हृदयात असलेल्या कुंडलिनीच्या प्राथमिक वलयापासून या शक्ती, एक नवीन परिवर्तनशील यंत्रणा तयार करतात. त्याला हृदयाकाश म्हणतात. हे पवित्र हृदय (सॅक्रेड हार्ट) या नावाने प्रसिद्ध असलेल्या कार्डियाक केंद्राचा

प्रकाश असतो व तो हृदयाच्या भोवतालच्या सात ऑरा (प्रकाश वलये) या रूपात प्रकाशित असतो. परमेश्वरी आत्मा (स्पिरीट), त्याची स्थिती किंवा मूड कसा आहे व आत्मा आदिमाता (आदिशक्ती) यांच्या लीला नाटकाने प्रसन्न आहे की नाही, याच्या सूचना त्याला मिळतात. ही एकमेकात गुंतलेली यंत्रणा (सिस्टीम) असून त्याचे सविस्तर स्पष्टीकरण पुढे केले जाईल.

कुंडलिनी मूलाधारात गेल्यामुळे एक पोकळी, भवसागर (व्हॉईड) तयार होतो. तीन धाग्यांपैकी मधला धागा (महासरस्वती शक्ती) बाहेर येऊन या भवसागरामध्ये जातो. सर्वात वरचा धागा (महालक्ष्मी शक्ती) सुषुम्ना नाडीच्या वरच्या भागात राहून पॅरासिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम म्हणून प्रकट होतो. तर या मध्य प्रवाहाचा खालचा भाग भवसागराचा भाग म्हणून राहतो.

प्रणव खाली उतरत असताना, श्रीशिवांव्यतिरिक्त सर्व दैवते आपल्या आपल्या चक्रांवर राहण्यास येतात. श्रीशिव आत्म्याशी तद्रूप होतात व जे जीव आत्मसाक्षात्कारी नाहीत त्यांच्या बरोबर गर्भाच्या हृदयात जातात. त्यांची शक्ती श्री पार्वती श्रीआदिशक्तीच्या महाकाली शक्तीशी तद्रूप होते. मानव आणि विराट यांच्यात आध्यात्मिक नकाशातील (स्पिरीच्युअल ब्ल्यूप्रिंट) हा फरक आहे. अशाप्रकारे श्रीशिव व शक्ती (पार्वती) यांच्यात वेगळेपण घडून येते. त्यांची भेट होते तेव्हा योग घटित झाला असे म्हणतात.


आत्म्याचे गर्भाकडून हृदयात स्वागत होत असताना हृदय प्रदेशातला पहिला स्पंद ऐकता येतो. जे जीव साक्षात्कारी नाहीत त्यांच्या हृदयात श्रीशिव स्थायिक होतात आणि त्यांची शक्ती पार्वती देवी दुर्गा स्वरूपात आपल्या स्वामींशिवाय स्वतंत्रपणे प्रत्येक माणसाचे शरीर निर्माण करण्यास प्रकट होतात. त्या हृदय चक्राच्या मधल्या खोलीमध्ये (chambers) जातात. त्याला पवित्र हृदय (सॅक्रेड हार्ट) म्हणतात. श्रीविष्णु त्यांची शक्ती व पत्नी श्रीलक्ष्मी यांच्या समवेत नाभी चक्रात स्थायिक होतात. त्यांच्या नाभीतून कमळाप्रमाणे एक चक्र बाहेर येते व ते नाभी चक्राच्या सर्व बाजूस लोंबलेले

असते. हे स्वाधिष्ठान चक्र असून श्रीब्रह्मदेव आणि त्यांची शक्ती सरस्वती या चक्राची प्रमुख दैवते म्हणून विराजमान होतात.

हे लोंबकळणारे चक्र नाभी चक्राच्या भोवताली वर्तुळाकार फिरून भवसागर किंवा व्हॉईड हा भाग निर्माण करते. श्रीविष्णु त्यांच्या दहा अवतारातून भवसागर ओलांडतात त्यांचे दहा अवतार विराटाच्या (आदि पुरुषाच्या) उत्क्रांतीच्या दहा अवस्थांचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचा सातवा अवतार श्रीराम व त्यांची शक्ती श्रीसीता हृदय चक्राच्या उजव्या बाजूकडे राहतात. श्रीराम यांनी परिपूर्ण मानवी पुरुषाचे (मर्यादा पुरुषोत्तम) व्यक्तिमत्त्व दर्शविण्यासाठी अवतार घेतला. श्रीविष्णूंनी पुन्हा एकदा श्रीकृष्ण म्हणून अवतार घेतला. ते आणि त्यांची शक्ती श्रीराधा विशुद्धी चक्रावर राहतात. श्रीकृष्ण हे आदिपुरुषाच्या (विराटाच्या) मानवी स्वरुपाची अंतिम अभिव्यक्ती होती. त्यांनी आपल्याला हा उपदेश केला की सर्व सृष्टी ही परमेश्वरी शक्तीची लीला आहे, अशी आपली धारणा असावी.

विशुद्धी चक्राच्या वरच्या बाजूस, जिथे ऑप्टिक नर्व्ह एकमेकांना छेदतात, तिथे आज्ञा चक्र आणि तिथे श्री येशु ख्रिस्त प्रत्येक मानवात राहतात. ते ईश्वर पुत्र (Son of God) तत्त्वाचे संपूर्ण प्रकटीकरण आहेत. त्यांचे शरीर श्रीगणेशांचे एकमेव बंधू व ईश्वरी व्यक्तिमत्त्व, श्रीकार्तिकेय यांच्यापासून तयार केले. ते मानव म्हणून आले होते, परंतु त्यांचे पुनरुत्थान, त्यांच्या मानवी शरीराच्या परमेश्वरी सत्वामुळे (substance) शक्य झाले. त्यांना वैकुण्ठ स्थितीमध्ये श्रीकृष्ण व श्रीराधा यांचे एकमेव पुत्र, महाविष्णु म्हणून तयार केले गेले. श्रीविष्णु यांचा नववा अवतार म्हणून त्यांना बुद्ध किंवा सौम्य अवतार असे म्हटले गेले.

मेंदूच्या लिंबिक भागातील सहस्रार चक्रावर श्रीआदिशक्तीचे महामाया स्वरूपात शासन आहे. त्या श्रीविष्णूंचा दहावा आणि अंतिम अवतार श्रीकल्की, जो अद्याप यायचा आहे, त्यांच्या शक्ती आहेत.




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*


**आकृती ११**

पॅरासिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम ही महालक्ष्मी शक्तीची स्थूल अभिव्यक्ती आहे. ती प्रथम मेंदूमध्ये प्रगट होते व पुढे जाऊन व्हेगस नस बनते. या नसेच्या पुढे, प्रत्येक माणसात, मध्यमार्गात (सुषुम्ना नाडी) कुंडलिनीने त्रिकोणाकृती अस्थीमध्ये प्रवेश केल्यावर, भवसागर (व्हॉइड) तयार होतो.

या भवसागरात, ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्यापासून तयार झालेल्या अदिगुरुंची स्थापना केलेली आहे. या आदिगुरूंना दत्तात्रय असेही म्हणतात. त्यांनी प्रेषित आणि गुरु या रूपात अनेक मानवी जन्म घेतले आहेत. त्यांच्या पैकी राजा जनक, आदिनाथ, मच्छिन्द्रनाथ, झरतुष्ट्र, गुरूनानक आणि शिर्डीचे साईनाथ आहेत. ही दैवते माणसांना स्वत:मधील भवसागर ओलांडून जाण्यास सहाय्य करतात.

चक्रांची पंचमहाभूतांपासून (पृथ्वी, जल, वायु, अग्नि आणि आकाश) निर्मिती केली आहे. पाच प्रकारच्या भौतिक शक्तींकडून त्यांचे परिवर्तन झाले आहे. कुंडलिनीचे प्राथमिक वलय, ईश्वरी शक्ती व महाकाली, महासरस्वती व महालक्ष्मी या तीन शक्ती, घंटेच्या आकाराची बल्बस फुलासारखी दिसणारी रचना तयार करतात. (पहा आकृती १२)

डावी आणि उजवी सिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम ही इडा व पिंगला नाड्यांचे, मज्जारज्जूच्या बाहेर प्रकटीकरण आहे. या यंत्रणा मज्जारज्जूच्या दोन्ही बाजूस, पाठीच्या कण्याच्या बाहेर दोन्ही बाजूस असून बल्बस गँग्लिऑनची साखळी बनवतात. मज्जारज्जूच्या तळाशी असलेल्या कॉकिक्सपर्यंत जातात (दोन्ही बाजूस). त्रिकोणाकार अस्थीच्या टोकाला, थोड्या खालच्या बाजूस त्या एकमेकांना मिळतात व मूलाधार चक्राला वेढा घालतात. हे सर्वात खालचे चक्र असून फक्त हेच चक्र मज्जारज्जूच्या किंवा क्रॅनियल बोनच्या बाहेर स्थापलेले आहे. सर्व चक्रांचे त्यांच्या प्रमुख दैवतांकडून नियंत्रण होते आणि स्थूल रूपात ती गँग्लियन म्हणून अभिव्यक्त होतात. शरीराचे सर्व अवयव व यंत्रणा गँग्लियन द्वारे नियंत्रित केली जातात असे दिसते.




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १२**

सुरूवातीलाच हे कबूल करायला हवे, की वैद्यकशास्त्रातील शास्त्रज्ञांनी तयार केलेली शब्दांची रचना परमेश्वराचे स्वरूप स्पष्ट करण्यास अपूर्ण आहे. या पुस्तकात सांगितलेले ज्ञान माझे वैयक्तिक ज्ञान व मते यांना

अनुसरून आहे व त्याच पद्धतीने ते पाहिले जावे. जेव्हा मी सिंपथेटिक आणि पॅरासिंपथेटिक नाडी यंत्रणा, स्वयंचलित नाडी संस्थेच्या शाखा हे शब्द वापरते तेव्हा मला वैद्यक शास्त्राला अभिप्रेत आहे, तसेच म्हणायचे नसते. मी एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणते, की परमेश्वरी शक्तीच्या अनुषंगाने या दोन नाडी संस्था शरीरात जे कार्य करतात त्या कार्याप्रमाणे त्यांचे वर्गीकरण केले जावे.

## स्वयंचलित नाडी संस्था (The Autonomous Nervous System)

स्वयंचलित नाडी संस्थेचे कार्य त्या यंत्रणेच्या ईश्वरी स्वरूपावरून समजून घ्यावे. परमेश्वरी प्रेमाची सूक्ष्म शक्ती अभिव्यक्त करण्यास आणि शेवटी आत्मसाक्षत्कार प्रदान करण्यास या स्वयंचलित नाडी संस्था आहेत. जेव्हा आदिमातेला त्यांची शक्ती (प्राण) मानवात भरायची असते तेव्हा मानवाच्या उपयोगासाठी ती शक्ती आदिमाता पॅरासिंपथेटिकच्या कार्याच्या माध्यमातून सोडतात. माणसे ही प्राणशक्ती काही प्रयत्न करण्यास किंवा काही आपत्कालीन परिस्थितीत शक्तीची गरज असल्यास वापरतात तेव्हा ते सिंपथेटिकचे कार्य असते. उदा.थोडे अंतर पळत जाऊन हृदयाच्या ठोक्यांची गती वाढवता येते. त्यावेळी आपत्कालीन अवस्थेत गरज पडल्याने प्राणशक्ती वापरली जाते. परंतु हृदयाचे ठोके कमी करता येणार नाहीत. कारण ते फक्त पॅरासिंपथेटिकच्या कार्यातूनच होऊ शकते. फक्त आदिशक्तीच मेंदूमध्ये वास्तव्य करून हृदयाच्या ठोक्यांची गती कमी करू शकतात.

आपण हे स्पष्टपणे समजून घ्यायला हवे की ॲड्रेनलीन किंवा ॲसेटीकोलीन ही रसायने (Acetylcholine) वेगळ्याप्रकारे का काम करतात. ही रसायने परिस्थिती असेल त्याप्रमाणे एखाद्या अवयवाला मोकळे सोडतात किंवा आवळतात. जर सिंपथेटिक नाडी संस्थेच्या कार्यातून (Coronary Blood Vessels) हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या मोठ्या होतात, तर त्याच कार्यामुळे सिंपथेटिक नाडी संस्थेने सोडलेल्या ॲड्रेनलीनमुळे रक्तवाहिन्यांचा (Arteries) आकार लहान हातो. जेव्हा

पॅरासिंपथेटिकच्या कार्याने ब्रॉन्कायल स्नायू (श्वास नलिकांचे आकुंचन व प्रसरण करणारे स्नायू) आकुंचन पावतात त्याच वेळी सर्व स्नायूंचे प्रसरण होते. ही दोन कामे व पद्धती परस्पर विरोधी दिसतात. पण या दोन नाडी संस्थांची वेगळी कार्ये समजण्यास त्यांच्या मागचा हेतू लक्षात घ्यायला हवा. सिंपथेटिक नाडी संस्था एक प्रकारची नसांमधून येऊन अवयवांना कार्यरत करणाऱ्या शक्तीची प्रेरणा (Nerve Impuls) पाठवतात, तर पॅरासिंपथेटिक दुसऱ्या प्रकारच्या प्रेरणा नर्व्ह इम्पल्स पाठवतात. हे इंपल्स आकुंचन किंवा प्रसरण करतील, काम वाढवतील किंवा कमी करतील, पण त्यांचा हेतू काम करणे किंवा ते वळवणे हाच आहे. ते अवयवात (आणि यंत्रणेत) शक्ती घालतात किंवा त्यांच्या ते आधीच असलेल्या शक्तीचा उपयोग करतात. जाणीवपूर्वक काम करून केलेला मानवी प्रयत्न त्याचप्रमाणे कोणतेही अतिरिक्त काम हे करताना सिंपथेटिक नाडी संस्थांचे कार्य प्रचलित होते.

पॅरासिंपथेटिक नर्व्हस सिस्टीम स्वत:च कार्यरत असते असे वाटते, पण अवयव किंवा यंत्रणा मोठी करायची, की आकुंचित करायची याचा, प्रत्येक अवयव किंवा यंत्रणा यांची काळजी घेणारी दैवते, त्यांच्या आवश्यकतेनुसार निर्णय घेतात.

वैद्यकीय शास्त्र, इतर शास्त्रांप्रमाणे वस्तुनिष्ठ (जडाशी संबधित) असते आणि म्हणून ते अपूर्ण ज्ञान असून या यंत्रणांच्या बाबतीत अस्पष्ट आहे. मज्जारज्जूच्या दोन्ही बाजूकडे असलेल्या या ईश्वरी शक्तींच्या शक्त्या (Energy) दाखवणे फार अवघड असते कारण त्या सूक्ष्म असतात आणि त्या साध्या डोळ्यांना दिसत नाहीत. आत्म्याचे डोळे (दृष्टी) विकसित झाल्यावर त्यांच्या संवेदना जाणवतात.

हे सर्व समजण्यास फार अवघड वाटेल. पण सहजयोगासंबंधीच्या आमच्या प्रयोगात अनेक लोकांनी कुंडलिनीचे स्पंदन त्रिकोणाकृती, पवित्र

अस्थीमध्ये स्पष्ट पाहिले आहे. शिवाय कुंडलिनी चढत असताना साध्या डोळ्यांनी दिसू शकते. तिच्या स्पंदनाचा आवाज अगदी लहान असला तरी, स्टेथॉस्कोपने त्याची नोंद घेता येते. साधकाला स्वत:ला कुंडलिनीचे ठोके डोक्याच्या वरच्या भागात जाणवतात. शरीरावरचे असे अनेक पुरावे लोकांनी, साक्षात्कारी नसलेल्यांनीसुद्धा स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले आहेत. ज्यांच्या कुंडलिनीचे उत्थान झाले आहे, अशांच्या डोळ्यांच्या बाहुल्या लहान मुलांप्रमाणे मोठ्या होतात. हे पॅरासिंपथेटिक चे कार्य दर्शवते. डोळ्यांच्या बाबतीत बाहुल्याचे विस्तारणे, ही सिंपथेटिक की पॅरासिंपथेटिकचे कार्य आहे हा वैद्यकशास्त्रात विवाद्य विषय आहे.

लहान वयात जेव्हा अहंकार व प्रति अहंकार पूर्ण वाढलेले नसतात व टाळू नरम असते तेव्हा पॅरासिंपथेटिकच्या कार्यामुळे बाहुल्या विस्तारतात. मूल मोठे झाल्यावर अहंकार प्रतिअहंकार पूर्ण वाढतात तेव्हा अंधार असेल त्या प्रमाणात बाहुल्या मोठ्या हातात. हे सिंपथेटिकचे कार्य होते. बाहुल्या लहान होणे ही सुद्धा सिंपथेटीकचे कार्य असते कारण त्यावेळी ऑप्टीक नर्व्हस परमेश्वरी शक्तीच्या (प्रणवाचा) उपयोग करतात. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल, की मानवी स्वभावाला अनुसरून, माणसे ज्या सामान्य व अतिरिक्त कामात असतात आणि जाणीवपूर्वक किंवा सुप्त चेतनेतून कार्य करू शकतात, ते सर्व सिंपथेटिक नाडी संस्था पार पाडतात. जेव्हा शक्तीचा पुरवठा आपोआप होतो तेव्हा ते ईश्वरी स्वरूपाचे कार्य असते व त्यावेळी पॅरासिंपथेटिक नाडी संस्था कार्यरत केली जाते.

## अहंकार व प्रतिअहंकाराचा विकास

जसे आकृती १० मध्ये दर्शवल्याप्रमाणे मेंदूचा त्रिकोणाकृती आकार असतो. परमेश्वरी शक्तीची किरणे (A1 आणि A2) मेंदूच्या दोन्ही उतरत्या बाजूंवर पडून त्यांच्यात दोन भौतिकशास्त्रीय घटनांप्रमाणे बदल होतात. :

पहिल्या बदलात, मेंदूच्या उतरत्या बाजूंवर किरण सरळ पडून मेंदूत

गेल्याने त्यांचे विघटन होते. त्यांचा एक घटक मेंदूत प्रवेश करतो (C1 आणि C2) आणि दुसरा मेंदूच्या बाहेर पडतो (B1 आणि B2). तशीच दुसरी घटना पुन्हा घडते, जेव्हा या दोन किरण रेषा मेंदूतील आज्ञा चक्राच्या स्थानात एकमेकांना छेदतात. मेंदूच्या विविध स्तरांची वेगळी-वेगळी घनता असल्याने किरणांचे परावर्तन होऊन छेदले जाते.

मेंदूच्या बाहेर जाणारे घटक (B1 आणि B2) मानवी चित्त बाह्यातील प्रेरणांवर प्रतिक्रिया व्यक्त करते तेव्हा, चित्ताला शरीराच्या बाहेर नेतात. या प्रतिक्रियांमुळे अहंकार व प्रति अहंकार तयार होतात. मुलाच्या जन्मानंतर त्यांची आई प्राण्यांप्रमाणेच आंतरिक प्रेरणेतून बाळाची शुश्रूषा करते. बाळ आईचे दूध पीत असताना आनंदाने समरस होते. आई जेव्हा मुलाला एका स्तनाकडून दुसऱ्या स्तनाकडे हालवते, तेव्हा मुल दुखावले जाते. ही प्रतिक्रिया मुलाच्या मेंदूमध्ये विरुद्ध दिशेला वरच्या बाजूवर बसते. अशाप्रकारे फुग्याप्रमाणे अहंकार हळूहळू फुगला जातो. मुलाने अशाप्रकारे विरोध व्यक्त केल्यावर, या अहंकाराच्या प्रदर्शनासाठी आई त्याला रागावते. यामुळे मुलाच्या मनात संस्कार (conditioning) तयार होतो. अशा संस्कारातून प्रति अहंकार निर्माण होऊन फुग्यासारखी रचना मेंदूच्या उजव्या बाजूकडे वाढू लागते. मेंदूच्या डावीकडे अहंकार व उजवीकडे प्रतिअहंकार, नरम अस्थि (टाळू) पूर्णपणे आच्छादली जाईपर्यंत, मोठे होत राहतात. पाचव्या किंवा सहाव्या वर्षी टाळू कॅल्शियमने पूर्ण भरली जाते.

आज्ञा चक्र अहंकार व प्रतिअहंकार यांचे नियंत्रण करते. आज्ञा चक्राचे स्थान ऑप्टिक नसा जिथे छेदतात ते आहे. त्याच स्थानावर तीन शक्त्या एकत्र येतात. अहंकार व प्रतिअहंकाराचे फुगे विशुद्धी चक्रपासून वाढू लागतात. अहंकार पूर्ण वाढल्यावर, डोक्याच्या डाव्या बाजूकडे कानाच्या लाईनमध्ये पसरायला लागून मेंदूच्या पुढच्या बाजूकडे येतो. विचार करणे आणि योजना बनविण्याने हे घडते. मानवी मेंदूच्या पुढच्या बाजूचा आकार

व साईज माकडाच्या मेंदूपेक्षा पुष्कळ वेगळा असतो. अहंकार अगदी प्राथमिक अवस्थेपर्यंतच वाढल्याने माकडाचा मेंदू उतरता व लहान असतो. माणसाच्या चेतना पूर्व (Preconscious) मनातील विचार करणे, योजना आखणे ही कामे होत असताना, निरुपयोगी पदार्थांच्या वाफा निर्माण (Fumes of waste Product) होऊन त्या अहंकाराच्या रूपात साठतात.

मनाला संस्कारित करणारे सर्व, प्रतिअहंकार साठवतो आणि तो उजव्या कानाच्या मागच्या बाजूस तयार होऊन मागच्या बाजूकडे डोक्यावर वाढत राहतो आणि मेंदूची संपूर्ण मागची बाजू आच्छादतो. माणसाचे सर्व चांगले वाईट अनुभव सुप्त चेतित मनात साठतात आणि भावनांशी संबंधित कामातून तयार होणाऱ्या निरुपयोगी पदार्थांची वाफ प्रतिअहंकार तयार करते. अशाप्रकारे चेतना पूर्व मन (Preconscious) आणि सुप्त चेतित मन (Sub-conscious) अनुक्रमे सूर्य नाडी (पिंगला) व चंद्र नाडी (इडा) यांच्यातल्या परमेश्वरी शक्तीचा उपयोग करतात.

इडा व पिंगला नाड्यातून प्रवाहित असणारी परमेश्वरी शक्ती संपूर्ण सिंपथेटिक नाडी संस्थेचे कार्य चालवते. उजव्या नाडीची सुरुवात मेंदूच्या डाव्या बाजूकडून होते तर डाव्या नाडीची सुरूवात मेंदूच्या उजव्या बाजूकडून होते. त्या एकमेकांना छेदतात तिथे आज्ञा चक्राचे स्थान आहे. आज्ञा चक्र स्थूलामध्ये पिट्युटरी व पिनीयल ग्रंथींच्या कार्याचे नियंत्रण करते. पिट्युटरी ग्रंथी अहंकाराचे नियंत्रण करते तर पिनीयल ग्रंथी प्रतिअहंकाराचे नियंत्रण करते.

प्रतिअहंकाराचे नियंत्रण करणाऱ्या पिनीयल ग्रंथींचा प्राण्यांमध्ये अति-विकास झालेला असतो. मानवात अहंकार व प्रति अहंकार यांच्यात संतुलन असल्याने ते दोन्ही टाळूच्या जवळील मेंदूच्या सर्वोच्च भागाच्या केंद्रापर्यंत येतात.

सर्व मेंदू झाकला गेल्याने व टाळूच्या अस्थिमध्ये कॅल्शियम भरले

गेल्याने माणूस सर्वव्यापी परमेश्वरी शक्ती पासून वेगळा होतो. अशाप्रकारे माणसाची 'मी' पणाची किंवा स्वत:ची जाणीव विकसित होते. कुटुंबात राहणाऱ्या माणसाचे भक्तीमुळे सौम्य जीवन होऊन त्याचे अहंकार व प्रति अहंकार यांच्यात संतुलन झाल्यावर सहजयोगातून त्याची कुंडलिनी जागृत होते व ती मेंदूच्या केंद्राचे छेदन करते. ती सर्वव्यापी ईश्वरी शक्तीमध्ये वैश्विक अचेतनात, साधकाचे चित्त नेते.

माणसाच्या रोजच्या कार्याच्या स्वरूपानुसार नाडी संस्थेच्या डाव्या किंवा उजव्या बाजूवर माणसाचे चित्त हालत असते आणि त्या कार्याला लागणारी शक्ती इडा किंवा पिंगला नाड्यातून येते. (आकृती ५ पहा), चक्रांच्या केंद्रस्थानी विराजमान असलेल्या देवता कार्याची योग्य पद्धत निश्चित करतात. इडा व पिंगला नाड्यांच्या दोन बाजूंवर त्यांच्यातील शक्तीचे लंबगोल आकार तयार होता. एक घड्याळाच्या काट्याच्या गतीच्या दिशेला असतो, तर दुसरा घड्याळाच्या काट्याच्या गतीच्या विरूद्ध दिशेला असतो. आवश्यक त्या शक्तींचे दैवते परिवर्तन करतात. दैवतांचा मेंदूमधील सूक्ष्म केंद्राशी (पीठांशी) संपर्क असतो. त्याचप्रमाणे हृदयस्थ आत्म्याच्या भोवताली असलेल्या तेजोवलयाशी (ऑराजशी) दैवतांचा संपर्क असतो.

## चेतनाबाह्य मनाचे कार्य

कुंडलिनीबद्दलचे उघड झालेले ज्ञान हठयोगाची साधना करणाऱ्या ऋषींकडून आलेले आहे. 'हठ' या शब्दात 'ह' म्हणजे 'सूर्य' व 'ठ' म्हणजे 'चंद्र', याच्यावरून असे स्पष्ट दिसते की, हठयोगात सिंपथेटिक नाडी संस्थेचा उपयोग होत असे. हठयोगाचा संबंध फक्त जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नांशी व त्याच्यातून होणाऱ्या कार्याशीच नव्हता तर सुप्तचेतनेतील प्रयत्नांशीसुद्धा होता. पतंजली ऋषींनी 'साधना विज्ञानात' असे स्पष्ट लिहिले आहे, की ज्यांना ही प्रकाशित होण्याची साधना करायची आहे त्यांनी जंगलात राहणाऱ्या लोकांच्या संपर्कात राहू नये, जाणीवपूर्वक केलेल्या

प्रयत्नांनी इंद्रिय निग्रह करणे शक्य आहे. पण त्याचबरोबर सुप्तचेतनेकडेही (सुप्त चेतित मनाच्या प्रयत्नांकडे) चित्त ठेवणे गरजेचे असते. त्याच्यामुळे, संस्कारांमुळे (मनाला झालेल्या सवयींमुळे) आपोआप उद्भवणाऱ्या इच्छा, भावना (reflexes) यांचे दमन करणे किंवा प्रयत्न करून इच्छांवर नियंत्रण मिळविणे शक्य होते. उदाहरणार्थ आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवून आपण असत्य भाषण थांबवू शकतो, मुळातून सुप्त चेतित मनावर लक्ष ठेवल्याने असत्य बोलण्याचा विचारच मुळातून काढता येतो.

चेतनापूर्व मनावर (Preconscious Mind) नियंत्रण ठेवण्याची इंद्रिय दमन ही पद्धत आहे, तर सुप्त चेतित मनाच्या शुद्धीसाठी (cure) प्रेम हे औषध आहे. दुर्दैवाने आधुनिक काळातील योग्यांनी 'हठयोगाचा' खरा अर्थ विसरलेला (हरवलेला आहे.) त्यांच्या उपदेशात किंवा साधनेत प्रेमाला स्थान नाही. कराटे, ॲक्युपंक्चर यासारख्या शारीरिक शक्ती प्राप्त करून घेणे, हे त्यांचे हठयोगी होण्याचे कारण असते. प्राचीन काळीसुद्धा जे योगी आरंभी सौम्य स्वभावाचे होते, ते काही काळ हठयोग केल्यावर अति संतापी झाले. त्यांचे सुप्राकॉन्शस (चेतनाबाह्य) व्यक्तित्व झाले, कारण उजवी नाडी चेतनाबाह्य प्रदेशाशी त्यांना संलग्न करते आणि ते चित्ताने अतिनैसर्गिक आणि भौतिक शक्तींना काबीज करून त्यांच्यावर प्रभुत्व मिळवितात. असा योगी सिंपथेटिकला जखडून किंवा त्यांचे कार्य थांबवून गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीवर मात करून हवेत उडू शकतो. तो हृदयाचे स्पंदन काही काळ थांबवू शकतो. अनेक महिने पाण्याखाली राहू शकतो, पण त्याच्यात प्रेम नसते. त्याचे दुसऱ्यावर प्रभुत्व मिळविणारे अहंकारी व्यक्तीत्व होते आणि त्याला क्रोधित करणाऱ्यास तो सूर्याप्रमाणे जाळून भस्मसात करू शकतो. प्राचीन काळातील अशा 'आध्यात्मिक योग्यांच्या' शक्तीची माहिती आहे. अशा क्रूर स्वभावाच्या योग्यांविषयी अनेक प्रसंग इतिहासात आहेत. इडानाडीतून किंवा शक्तीवर एकाग्रता (Power concentration) करून किंवा शेवटी सेक्स लाईफ नियंत्रित करून ते आज्ञा चक्रावर चित्ताची एकाग्रता करू शकतात.

## प्रकरण १०
# धर्माचा मध्यमार्ग

महालक्ष्मीचा मध्यमार्ग (सुषुम्ना नाडी) धर्माचा मार्ग अभिव्यक्त करतो. (अर्थ-महालक्ष्मी शक्ती असलेल्या सुषुम्ना नाडीमुळे माणसात धर्माची धारणा होते व धर्माचरणाची प्रवृत्ती होते). मध्यमार्ग पॅरासिंपथेटिक नाडी संस्थेच्या रूपात अस्तित्वात असतो. या मार्गामुळे खाली दिलेली सूक्ष्म कार्ये केली जातात :

- ❊ सृष्टीतल्या सर्व जड व सजीव तत्त्वांना धर्म प्रदान करणे.
- ❊ नवीन तत्त्वांच्या निर्मितीसाठी जड तत्त्वांच्या धर्मात बदल करणे.
- ❊ चुंबकीय विद्युत स्पंदनांचे सूर्याच्या ऊर्जेशी एकत्रीकरण करून नवीन जीवनाची (प्राणाची) निर्मिती करणे.
- ❊ अवताराच्या मार्गदर्शनाच्या माध्यमातून जिवंत वस्तूंच्या आणि प्राण्यांच्या संवेदनशीलतेचा विस्फोट करणे (अर्थ-त्यांना परिस्थितीत, स्वत:मध्ये आणि स्वत:च्या जीवनशैलीत बदल घडवून उत्क्रांत होण्यास प्रवृत्त करणे). हे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे.
- ❊ माणसांना आणि इतर प्राण्यांना विविध दैवतांकरवी मदत करून उत्क्रांतीचा मार्ग तयार करणे.
- ❊ मानवाच्या जाणिवेत सुधारणा करून त्याला आत्मसाक्षात्कार देणे व शेवटी ईश्वरीय जीवनाच्या प्रदेशात नेणे आणि हे सर्व करण्यासाठी विराटाच्या सहस्रारात (आद्य मेंदूत) योग्य अवतार उत्क्रांत करणे. अशा प्रकारे ईश्वराची कार्यपद्धती हा एक सजीव वैश्विक अनुभव आहे याची जाणीव व आकलन मानवजातीला होते.

* विविध चक्रांवर स्थापित असलेल्या दैवतांच्या मदतीने पॅरासिंपथेटिक नाडी संस्था माणसात कार्यान्वित करणे.

वरील सर्व कार्ये, आदिशक्ती, विविध चक्रातील त्यांच्या महालक्ष्मी रूपात पार पाडतात. सहस्रारात तीन स्वरूपे - महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी एक होतात - महालक्ष्मीमध्ये एकरूप होतात. मुळच्या खालच्या बाजूस उतरणारा मध्यमार्गाचा अर्धा भाग, महाकाली अंग (आदिशक्तीचे) असून तो त्रिकोणाकृती आस्थिमध्ये आदिकुंडलिनी म्हणून अंतर्धान पावतो. मागच्या सृष्टीच्या सृजनाची सर्व नोंद रेकॉर्डर टेपप्रमाणे असलेल्या आदिकुंडलिनीमध्ये असते. ती साडेतीन वलये घालून तिच्या घरात, आदिमूलाधारात राहते. तिला श्रीगणेशांची माता गौरी म्हणूनही ओळखतात. ती वैश्विक सुप्त चेतीत मनाची शेष शक्ती असून अवताराच्या आगमनासाठी तिचा सांभाळ केला जातो. गौरीच्या पहिल्या अवताराने आदिमूलाधार चक्र निर्माण केले. म्हणून गौरी अवतारावेळी आदिशक्तीचे फक्त एकच चक्र प्रकट झाले होते. इतर सर्व चक्रे सुप्तावस्थेत होती.

नंतर पृथ्वीवर आदिविष्णूंचा अवतार झाला आणि त्यांची शक्ती लक्ष्मी यांच्या मज्जारज्जूतली दोनच चक्रे कार्य करीत होती. ही दोनच चक्रे प्रकट झाली आणि त्यांची इतर सर्व चक्रे कार्यरत झाली नव्हती. दुसरे चक्र होते आदिनाभी चक्र. आदिविष्णूंच्या नाभीतून एक कमळ वर आले. त्याने आदि ब्रह्मदेवाला जन्म दिला. आदि ब्रह्मदेव सृजनाचे दैवत होते. त्यांची पत्नी सरस्वती, लक्ष्मीप्रमाणेच आदिशक्तीचा अवतार होती आणि त्या त्यांचे स्वामी ब्रह्मदेव (प्रजापती) यांच्यासाठी शक्ती निर्माण करणाऱ्या जनरेटरप्रमाणे होत्या.

आदि-स्वाधिष्ठान तिसरे चक्र होते. आदि ब्रह्मदेवांनी पंचमहाभूतांपासून भौतिक जग निर्माण केले. सरस्वतीच्या मज्जारज्जूत तीन चक्रे कार्य करीत होती. मध्यमार्गावर स्थापना केलेल्या चौथ्या चक्राला

आदि अनाहत चक्र किंवा हृदय चक्र म्हणतात. ते कार्डियाक प्लेक्सेसचे नियंत्रण करते. याठिकाणी जीवनशक्ती (प्राण) प्रथमच ऐकू आली म्हणून या चक्राला आदि अनाहत (कोणत्याही आपटण्याशिवाय येणारा आवाज) चक्र असे नाव पडले. इतर चक्रांत ऐकू येईल इतका आवाज निर्माण झाला नाही.

हृदय चक्राचे तीन भाग आहेत :

१. या चक्राच्या डाव्या बाजूस श्रीपार्वती, त्यांचे पती श्रीशिव यांच्या समवेत राहतात. ते डाव्या बाजूच्या इडा नाडीचे नियंत्रण करतात.

२. या चक्राच्या उजव्या बाजूस श्रीआदिविष्णूंचे अवतार श्री राम आणि त्यांची पत्नी, आदिशक्तीच्या अवतार श्रीसीता, यांचे स्थान आहे.

३. चक्राच्या मध्यभागात श्रीपार्वती एकट्याच श्रीदुर्गा किंवा श्रीजगदंबा (जगन्माता) या स्वरूपात प्रवेश करतात. श्रीआदिविष्णू, श्रीराम म्हणून अवतरित झाल्यावर श्रीदुर्गा यांनी मधला भाग मोकळा केला आणि त्या डाव्या भागात श्रीशिव यांच्याकडे गेल्या. त्याचवेळी श्रीसीता यांच्या बरोबर श्रीराम मधल्या भागात राहू लागले.

आदि अनाहत चक्राच्या वर सोळा पाकळ्यांचे आदिविशुद्धी चक्र आहे. ते सर्व्हायकल प्लेक्ससचे नियंत्रण करते. श्रीआदिविष्णूंनी विराटांना श्रीकृष्ण म्हणून अवतरित केले. श्रीराधा त्यांची शक्ती आहेत.

त्याच मार्गावर अजून वरच्या बाजूस, विराटाच्या मेंदूत, जिथे ऑप्टिक नर्व्हज एकमेकांना छेदतात तिथे जे केंद्र आहे त्याला आदिआज्ञा चक्र म्हणतात. ते आदि पिट्युटरी व पिनीयल यांचे नियंत्रण करतात. ते अनुक्रमे विराटांच्या (आदिपुरुषाच्या) अहंकार व प्रति अहंकाराचे नियंत्रण करते. या दोन संस्था आदि इडा व आदि-पिंगला नाडी यांच्या टोकाशी तयार होतात.

विराटांनी प्रकट होण्यास आरंभ केल्यावर त्या विकसित होतात. एखाद्या कारखानाच्या चिमणीवाटे धूर बाहेर पडावा आणि त्या धुराने फुगे फुगावेत असे तयार होतात.

शेवटचे आणि सर्वात महत्त्वाचे केंद्र विराटाच्या मेंदूच्या वरच्या भागात, ज्याच्यात आदि लिंबिक एरिया आहे, त्याठिकाणी असते. त्या चक्राला अदि सहस्रार चक्र म्हणतात. इतर सर्व केंद्राशी मध्यमार्गाच्या (आदि सुषुम्ना नाडी) बाजूने असणाऱ्या सात ग्रूव्ह (ग्रूव्ह म्हणजे खाच) यांच्यातून सहस्रार चक्र जोडलेले असते. मेंदूत दैवतांची पीठे असतात त्या पीठांतून आदिशक्ती चक्रांचे नियंत्रण करतात. श्रीआदिविष्णूंचे दहावे व शेवटचे अवतार कल्की यांची शक्ती या स्वरूपात आदिशक्ती फार विशेष (यूनीक) अवतार कलियुगात घेऊन विराटाचे शेवटचे केंद्र उघडणार आहेत. त्या, एक महान मायास्वरूपी (महामाया) व्यक्तिमत्त्व या स्वरूपात अवतार घेतील आणि तीनही अंगे (त्रिगुणात्मिका) एकात्म करतील आणि त्यामुळे त्या कल्कीचे सामूहिक व्यक्तिमत्त्व निर्माण करतील. त्यांचे आगमन हे आतापर्यंत गोपनीय म्हणून सुरक्षित ठेवण्यात आले आहे, पण जेव्हा त्या येतील तेव्हा असंख्यांचा सामूहिक आत्मसाक्षात्कार घटित होईल.

## दैवतांचे धर्म आणि त्यांची चक्रे

### पहिले केंद्र - मूलाधार चक्र

या केंद्रावर श्रीगणेशांचे राज्य असून चिरंतन बालकत्व हा श्रीगणेशांचा धर्म आहे.

### दुसरे केंद्र - स्वाधिष्ठान चक्र

या केंद्रावर श्रीब्रह्मदेवांचे राज्य असून, विचार करणे, कृती करणे व निर्मिती करणे हा त्यांचा धर्म आहे.

**तिसरे केंद्र - नाभी चक्र**

या चक्रावर श्रीविष्णूंचे राज्य आहे. धर्मधारणा हा त्यांचा धर्म आहे, अर्थात् उत्क्रांती घटित करणारी शक्ती आणि ती टिकवणे व तिची धारणा करणे. विराट स्वरूप ही आदिविष्णूंची धारणा आहे. (अर्थ - आदिविष्णू विराट आहेत.)

**चौथे केंद्र - अनाहत चक्र**

या चक्रावर आदिशक्तीचे दुर्गा किंवा जगदंबा स्वरूपात राज्य आहे. वैश्विक मातृप्रेम हा त्यांचा धर्म आहे. या चक्राच्या डाव्या भागावर श्रीशिव आणि पार्वती यांचे राज्य आहे. अस्तित्व, निरागसता, साधेपणा व सातत्य (steadfastness) हा त्यांचा धर्म आहे. या चक्राच्या उजव्या भागावर श्रीराम आणि त्यांनी पत्नी श्रीसीता यांचे राज्य आहे. राजभाव (majesty) आणि परिपूर्ण राजकीय नेतृत्व हा त्यांचा धर्म आहे. हे जोडपे पती-पत्नी यांच्यामधील निरंतर प्रेमाचे द्योतक आहे.

**पाचवे केंद्र - विशुद्धी चक्र**

या चक्रावर श्रीकृष्णांचे राज्य असून शुद्ध हेतूसाठी (हितासाठी) राजनीति व कूटनीतीचे (डिप्लोमसी) अवलंबन करणे हा त्यांचा धर्म आहे. ज्याला कृत्रिम सुसंस्कृतपणाचा स्पर्श झाला नाही अशा संवेदनशीलतेच्या साधेपणातून या चक्राची धारणा होते. श्रीकृष्ण त्या व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती करतात, ज्याची, सर्व सृष्टी ही एक लीला आहे अशी साक्षीभावाची दृष्टी असते. या चक्राच्या धारणेचा सर्वात महत्त्वाचा भाग हा आहे, की ते विराटाच्या पूर्ण अवताराला प्रकट करते (अर्थ - श्रीकृष्ण हे विराटाचे पूर्ण अवतार आहेत.)

**सहावे केंद्र - आज्ञा चक्र**

या चक्रावर श्रीयेशू ख्रिस्तांचे राज्य आहे. क्षमाशीलता व समाधान हा त्यांचा धर्म आहे. ते श्रीगणेशांचे अवतार आहेत. येशू ख्रिस्तांचे पुनरुत्थान, भगवद्गीतेत सांगितलेले आत्म्याचे चिरंतन अस्तित्व दर्शवते.

## सातवे चक्र - सहस्रार केंद्र

या चक्रावर श्रीआदिशक्तीचे राज्य आहे. आत्मसाक्षात्काराची निरानंदमय अवस्था व सामूहिक चेतना या चक्राचा धर्म आहे.

आदिमेंदूच्या केंद्रात महालक्ष्मी मार्गाचा (सुषुम्ना नाडी) आरंभ होतो आणि ती सर्व चक्रांचे संगोपन करते. विराटाच्या भवसागरामध्ये, भवसागराच्या टप्प्यावर पृथ्वीवर अवतारांचे आगमन होऊ लागले, ते सर्वात प्रथम वैकुंठ अवस्थेच्या टप्प्यावर आदि-पुरुषाच्या मेंदूतून खाली येऊन अवतीर्ण झाले. सृष्टीच्या निर्मितीच्या उत्पत्ती अवस्थेच्या टप्प्यावर श्रीआदिशक्ती वलयाचे रूप घेतात, मग बिंदू व पुढे अर्धबिंदू होऊन विराटाच्या त्रिकोणाकृती (त्रिकुटी) मेंदूत प्रवेश करतात. त्या मेंदूच्या केंद्रस्थानी आज्ञा चक्रात आदिशक्ती - महालक्ष्मी, महासरस्वती आणि महाकाली या तीन शक्तींच्या स्वरूपात विभाजित होतात. म्हणून वैकुंठ अवस्थेच्या टप्प्यावर खाली येतांना त्या प्रथम महालक्ष्मी म्हणून, नंतर महाकाली म्हणून व शेवटी महासरस्वती म्हणून खाली येतात.

मी इतर ठिकाणी दर्शविल्याप्रमाणे या तीन मातृशक्ती सहा चक्रांकरिता दैवते निर्माण करतात. पुढे ते आपापल्या चक्रांवर विराजमान होतात. उत्पत्ती स्थितीच्या टप्प्यावर श्रीगणेशांची निर्मिती पहिले दैवत म्हणून झाली. देव पुत्र श्रीगणेश पुढे श्रीयेशू ख्रिस्त या मानवी स्वरूपात अवतरित झाले. म्हणून ते आद्य व सर्वश्रेष्ठ दैवत आहेत. इतर सर्व दैवते वैकुंठ अवस्थेच्या टप्प्यावर निर्माण केली गेली. क्षीरसागर अवस्थेच्या टप्प्यांवर त्यांचा उत्कर्ष झाला परंतु भवसागर अवस्थेच्या टप्प्यांवर ते पृथ्वीवर अवतीर्ण झाले.

साधे, सरळ, धार्मिक आणि सदाचरणी जीवन असणारे लोक मध्यमार्गाच्या जवळ असतात. परमेश्वरावर श्रद्धा असणारे, परमेश्वराच्या संरक्षणावर श्रद्धा ठेवून जीवनातील सर्व जबाबदाऱ्या व कार्ये गांभीर्याने पार पाडणारे लोक, जे वासना आणि सेक्सविषयक विकृतींपासून लांब असतात,

असे लोक मध्यमार्गाच्या प्रदेशात असतात. सर्वसाधारण कौटुंबिक जीवनात असणारे लोक, ज्यांना आई-वडील व मुले यांच्याबद्दल खोल सद्भावना असतात, जे त्यांच्या पत्नींना लक्ष्मीचा (कुटुंबाची देवता) मान देतात, असे लोक उत्क्रांतीच्या मध्यमार्गासाठी विशेषप्रकारे आशीर्वादीत असतात. साधे, सहृदयी लोक, जे शहरवासीयांच्या लबाडी आणि अहंकारी पद्धती शिकले नाहीत अशांना सर्वात प्रथम उत्क्रांतीचा लाभ होतो. जे स्वत:ला परमेश्वरी कार्यास जबाबदार समजतात व प्रामाणिकपणे परमेश्वरी प्रेम व आदर यांच्यात आपले जीवन जगत असतात, फक्त अशांनाच प्रणवाच्या उत्क्रांतीच्या शक्तींचे विशेष आशीर्वाद असतात. आनंदी, सौम्य व शांत सहनशील लोक, जे इतरांना त्रास होऊ देत नाहीत किंवा इतरांवर अधिकार चालवण्याचा प्रयत्न करीत नाहीत असे लोक परमेश्वराच्या दरबारातले आवडते लोक असतात. ज्यांची परमेश्वरी प्रेमावर श्रद्धा आहे आणि आई, बहिण, मुलगी यांच्याशी पवित्र नातेसंबंध ठेवण्यावर विश्वास आहे त्यांच्याबद्दल प्रणवाला अतिशय आदर असतो आणि ते आत्मसाक्षात्कार देण्यास निवडले जातात.

याचे उलट ज्यांना असे वाटते, की जीवनातले त्यांचे यश परमेश्वरापेक्षा स्वत:मुळे मिळाले आहे आणि जे सतत काम करतात, विचार करतात, योजना बनवतात (अतिकर्मी) ते एक प्रकारे अतिरेकी आहेत. त्यांचे श्रीब्रह्मदेवांच्या सूर्य नाडीवर काम चालते. त्यांची महत्त्वाकांक्षा झाकण्यासाठी ते कर्मनिष्ठ असतील तर ते या मार्गाच्या (सूर्यनाडीच्या) टोकाच्या बाजूकडे जाऊ लागतात.

जे परमेश्वराचे शोधक (साधक) त्यांच्या धार्मिकतेचा देखावा करीत नाहीत किंवा बाह्यात्कारी संन्यासाचे थोतांड करीत नाहीत, देवाच्या व धर्माच्या नावाखाली इतर दैवतांवर किंवा अवतारांवर टीका करीत नाहीत त्यांना परमेश्वरी प्रेमाचे आशीर्वाद मिळतात. जे इंद्रिय निग्रहाच्या

अतिरेकाचे प्रदर्शन करीत नाहीत, पण दुर्गुणांबद्दल स्वाभाविक तिटकारा दर्शवितात आणि ज्यांच्या प्रतिक्रिया आपोआप व्यक्त होतात, ते सहजयोगासाठी अत्यंत योग्य असतात. ते मध्यमार्गाला धरून राहतात. जे आत्मसाक्षात्कार न घेता धर्मनिष्ठ असल्याचे दाखवतात अथवा धर्माचा उपदेश करीत स्वत:ला उच्च स्थान मिळवतात, पण जे वास्तवात खोटे असते, ते उजव्या बाजूच्या सूर्यनाडीमध्ये जाऊन सर्व कार्य करतात. (आकृती ७ पहा) असे लोक अहंकारी व्यक्तिमत्त्वाचे म्हणून सूर्यनाडीच्या अगदी टोकाला फेकले जातात. ते शेवटी धार्मिक वेष घातलेले धार्मिक राक्षस म्हणून पृथ्वीवर येतात.

जे, साधारण (नॉर्मल) एका पत्नीबरोबर लैंगीक जीवन व्यतीत करतात आणि विवाहाला धार्मिक विधीने (यज्ञ) स्थायी स्वरूप दिलेला असे मानतात, त्यांचे मध्यमार्गावर चित्त असते. परंतु जे प्रयोग करण्याच्या किंवा दुसऱ्या एखाद्या बहाण्याने लैंगिक विकृतीने विषयासक्त होतात ते डाव्या बाजूस चंद्र नाडीवर सुप्त चेतनेत आणि सामूहिक सुप्त चेतनेत जाऊन पडतात. जे लोक अति खाणे, मद्यपान, ड्रग्जचे व्यसन यांच्या आधीन असतात ते सुद्धा चंद्र नाडीवर असतात आणि डाव्या बाजूस टोकाच्या भागात राहतात.

याउलट, अधिक उपवास करणारे, डाएटिंग किंवा योगासनांचे व्यायाम करून शारीरिक स्थितीकडे फार लक्ष देतात, ते सुद्धा सूर्यनाडीवर जातात. थोडक्यात, जीवनात सर्वप्रकारचे अतिरेकी वागणे माणसांना डाव्या बाजूच्या चंद्रनाडीवर अथवा उजव्या बाजूस सूर्यनाडीवर नेते. असे लोक आत्मसाक्षात्कारासाठी फार अवघड उमेदवार असतात.

हे सत्य आहे, की आत्मसाक्षात्कारापूर्वी मानवी विचार आणि कृती यांचे क्षेत्र तणावपूर्ण असते. हा तणाव सूर्य नाडी व चंद्र नाडी यांच्यातील परस्परातील विरोधामुळे निर्माण होतो. परंतु परस्परातील विरोधाच्या क्षेत्रात

राहूनसुद्धा संतुलित लोक त्या दोघांमध्ये असा समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात की तो त्यांना मध्यमार्गाच्या अधिक जवळ नेईल. हा भगवान बुद्धांनी वर्णिलेला आठ अंगाचा (किंवा आठ पायऱ्यांचा) मार्ग आहे.

विराटाच्या इतर सर्व शारीरिक, बौद्धिक व भावनिक, भूतकाळातील किंवा भविष्यकाळातील कार्याच्या उत्सर्जनासाठी आदि अहंकार व आदि प्रति अहंकार निर्माण केले गेले. आदि मूलाधार चक्राच्या खालच्या व समोरच्या बाजूस आणि विराटाच्या शरीराच्या बाहेरच्या बाजूस एक प्रदेश आला आहे, त्याला नरक म्हणतात. त्याचे सात स्तर आहेत. जे लोक परमेश्वराबद्दल प्रेम आणि त्यांच्या प्राप्तीची तळमळ असल्याशिवाय इंद्रिय निग्रह आणि तपस्या यांचा अतिरेक करतात आणि सूर्यनाडीतून चेतनाबाह्य प्रदेशाच्या टोकाला जातात, ते काही काळानंतर नरकात जातात. काही लोक अहंकारी मृतात्म्यांकडून पकडले जाऊन त्यामधून चेतनाबाह्य मनाच्या बौद्धिक शक्तींचे धर्माच्या नावाखाली प्रदर्शन करतात. त्यामुळे ते इतर माणसांना आपल्या दबावाखाली आणू शकतात किंवा कमकुवत व साध्या भोळ्या लोकांवर आपला प्रभाव टाकून मूर्ख बनवतात. हे सर्व लोकसुद्धा, सूर्यनाडीतून उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर फेकले जाऊन नरकात पडतात.

सूर्य नाडी घड्याळाचा काटा फिरतो त्या दिशेने फिरते तर चंद्र नाडी घड्याळाच्या काट्याच्या विरूद्ध दिशेने फिरते. जे लोक मृतात्मे, मृत गुरु किंवा मालक आणि इतर सुप्तचेतनेतील मृत व्यक्तित्वे यांची पूजा करतात ते सुद्धा उत्क्रांती प्रक्रियेच्या बाहेर पडून शेवटी नरकात जातात. जे लोक उद्धार करण्याच्या अवस्थेपलिकडे आहेत त्यांना कडक शिक्षा करून सुधारण्यासाठी नरक निर्माण केला आहे. जे लोक त्यांच्या जुलमी महत्त्वाकांक्षेच्या अतिरेकाने किंवा वासनेमध्ये लिप्त झाल्याने उत्क्रांतीची प्रक्रिया सोडतात ते अनेक युगे (कल्प) नरकात स्थायिक होऊन राहतात. नरकातून पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतात तेव्हा त्यांना राक्षस आणि सैतान म्हटले

जाते. ते अतिशय भ्रष्ट, दुराचारी, हावरट, अहंकारी व जुलुमी असतात. अशा व्यक्तींच्या मार्गावरून जाणारे लोकसुद्धा अशा भ्रष्ट लोकांच्या अतिदुष्टपणाने (malignantly) कॅन्सरप्रमाणे घडलेल्या व्यक्तित्वामुळे दूषित होऊ त्यांचे अध:पतन होऊन ते नरकात जातात. परमेश्वर तसे कोणालाच नरकात टाकत नाहीत. नरकात राहणाऱ्या लोकांनी स्वत:च स्वत:ला नेमलेले असते, परमेश्वराच्या चरणाशी शरण जाण्यास ते नकार देतात. परमेश्वर त्यांना क्षमेला पात्र होण्याची एक संधी देतात, पण पृथ्वीवर पुनर्जन्म घेतल्यावर ते पुन्हा सैतानी कारवाया सुरू करतात.

सूक्ष्म रूपात मानवी मनामध्ये प्रवेश करून ते नरकातून सोडण्याची (मुक्ती) मागणी करतात. उत्क्रांत झालेला जीव अशा भुतांना शरीराच्या बाहेर काढतो तेव्हा अनेक जण मुक्तीचे वचन देतात. अवताराने त्यांचा वध केल्यावरच त्यांना मुक्ती मिळते. अवताराच्या हाताने वध होणे म्हणजे अंतिम शिक्षाच असते, जणु काही त्यांच्यातला दुष्टपणा अशाप्रकारे परमेश्वरी अवताराच्या कारुण्याने निष्प्रभ होतो. हे परमेश्वराचे असीम प्रेम असते. परमेश्वर त्यांचा वध करून त्यांच्या गलिच्छ आत्म्यांचा नरकातून उद्धार करतात.

प्रकरण ११

# चक्र आणि केंद्र (प्लेक्सेस)

## मूलाधार चक्र

हे चक्र पेल्व्हिक प्लेक्सेसशी जुळणारे आहे. त्याच्या चार पाकळ्या पेल्व्हिक प्लेक्ससच्या चार सब-प्लेक्सेसशी संबंधित आहेत.

| पाकळ्या | उप-केंद्र (सब-प्लेक्सेस) | नियंत्रणातील अवयव |
|---|---|---|
| १ | स्नायविक केंद्र (Inferior Hemorrhoidal) | मलाशय (Rectum) |
| २ | मूत्राशय सम्बन्धी (Vesical) | मूत्राशय तथा शुक्राणु संचय आणि खालील बाजूस प्रवाहित करणारी शुक्रीय नाडी (Urinary bladder and vascular seminalis and vas deferens) |
| ३ | पुरस्थ ग्रन्थीसंबंधी (Prostatic) | पुरुषांत पुरस्थ व स्त्रियांत योनीचा काही भाग (Prostate gland in men; part of vagina in women) |
| ४ | गर्भाशय सम्बन्धी (Uterine) | महिलांमध्ये गर्भाशय, गर्भाशयाचा ग्रीवा भाग तसेच डिंबवाही नळी व पुरुषांमध्ये शुक्राणु संचय व खालील बाजूस प्रवाहित करनेवाली शुक्रीय नाडी (Uterus, cervix and Fallopian tubes in women; vasculae seminal is and vas deferens in men) |

## स्वाधिष्ठान चक्र

हे सहा पाकळ्यांचे केंद्र ऑर्टिक प्लेक्सेसशी जुळते. याच्या सहा सब-प्लेक्सेस खालीलप्रमाणे :

| पाकळ्या | उप-केंद्र (सब-प्लेक्सेस) | नियंत्रणातील अवयव |
|---|---|---|
| १ | शुक्र (वीर्य) संबंधी (Spermatic) | शुक्राणु बनविण्यासाठी(Vesculae seminalis for creating sperm) |
| २ | डावी वेदना (Left Colic) | खाली येणारे मोठे आतडे (Descending colon) |
| ३ | मोठ्या आतड्याचे 'C' किंवा 'S'आकाराचा भाग(Sigmoid) | मलत्याग करणारा पोटाचा खालचा भाग, मूत्रपिंड व मूत्राशय (Lower part of abdomen for excretion, kidneys and urinary bladder) |
| ४ | स्नायविक केंद्र (Superior Hemorrhoidal) | मलाशय (Rectum) |
| ५ | खालील बाजूच्या आन्त्र योजनेसंबंधी (Inferior Mesenteric) | महाधमनी (Aorta) |
| ६ | बेंबीच्या खालच्या भागा-संबंधी (Hypogastric) | यकृताचा वरचा भाग, प्लीहा ट्रांसव्हर्स कोलोन संबंधी (Upper part of liver & spleen and transverse colon) |

## मणिपूर किंवा नाभी चक्र

या केंद्राच्या दहा पाकळ्या असून ते सोलर प्लेक्सेस आणि त्याच्या दहा सब-प्लेक्सेसशी जुळते. ते खाली दिल्याप्रमाणे आहे :

| पाकळ्या | उप-केंद्र (सब-प्लेक्सेस) | नियंत्रणातील अवयव |
|---|---|---|
| १ | उदराला वक्षापासून वेगळे करणारी पेशी | श्वसनावर नियंत्रण करणारी मध्यपट आणि अधिवृक्क ग्रंथी |

| | | |
|---|---|---|
| | (Phrenic) | (Diaphragm & suprarenal gland which controls breathing) |
| २ | रुधिरसंबंधी (Haematic) | यकृत व पोटाचा खालचा भाग (Lower part of liver & stomach) |
| ३ | प्लीहा (Splenic) | प्लीहेचा खालचा भाग (Lower part of spleen) |
| ४ | आमाशयाचा वरचा भाग (superior gastric) | पित्ताशय (Gall Bladder) |
| ५ | मूत्रपिंडाचा वरचा भाग (Suprarenal) | मूत्रपिंडाचा वरचा भाग (Upper part of kidneys) |
| ६ | मूत्रग्रंथी (Renal) | मूत्रपिंड (Kidneys) |
| ७ | वीर्य (Spermatic) | शुक्राणूंची निर्मिती (Creates sperm) |
| ८ | सुपिरियर मेसेन्टेटिक | छोटी आतडी (Small Intestine) |
| ९ | पाचनरस कोशिका (Pancreatic) | पाचक ग्रन्थि (Pancreas) |
| १० | आंत्रशूळ (Colic) | लहान व मोठ्या आतड्याचा भाग (Small intestine and part of large intestine) |

**अनाहत किंवा हृदय**

या केंद्राच्या बारा पाकळ्या असून त्या कार्डियाक प्लेक्सेस आणि त्याच्या बारा सब-प्लेक्सेस ते जुळते :

| पाकळ्या | उप-केंद्र (सब-प्लेक्सेस) | नियंत्रणातील अवयव |
|---|---|---|
| १ | खोल उजवे हृदय (Right deep Cardiac) | कानाचा उजवा बाहेरचा भाग (Right aurical) |
| २ | खोल डावे हृदय (Left deep Cardiac) | कानाचा उजवा बाहेरचा भाग (Left aurical) |
| ३ | पूर्ववर्ती फुफ्फुस (Anterior pulmonary) | फ्ल्यूरा (Pleura) |

| | | |
|---|---|---|
| ४ | फुफ्फुसाचा मागील भाग (Posterior pulmonary) | फुफ्फुसे (Lungs) |
| ५ | हृदयाचा बाहेरचा भाग | हृदावरण (Pericardium) |
| ६ | हृदयग्रंथिकाचे बाहेरचे नाडी जाळ (Cardiac Ganglion-wrisberg) | उजवे हृदय (Right Cardiac) |
| ७ | हृदय धमन्या (उजव्या) (Right Coronary) | चक्रीय हृदय धमन्या (Coronary arteries) |
| ८ | व्हेन्ट्रीक्युलर (Ventricular) | हृदयप्रकोष्ठ (Ventricles of the heart) |
| ९ | हृदय धमन्या डाव्या (Left Coronary) | डाव्या बाजूची चक्रीय धमनी (Left coronary artery) |
| १० | हृदययातील लय (Endo cardiac) | हृदयातील आतील स्तर (Inner layer of heart) |
| ११ | रिमैक ग्रंथिका (Remak's Ganglion) | हृदयात आत्म्याचे स्थान, आत्मा श्रीशिवस्वरूप (Site of Spirit - Aatma as Lord Shiva-in the heart) |
| १२ | बिड्डर ग्रंथिका (Bidder's Ganglion) | याचे हृदयात स्थान असून चक्रांशी संलग्न आहे, सुरक्षितपणा वाटणे अभिव्यक्त करते. (Connected to the Chakra's centre placed in the heart. Expresses sense of security) |

## विशुद्धी चक्र

या केंद्राला सोळा पाकळ्या असून हे चक्र सोळा सब-प्लेक्सेस असलेल्या सर्व्हायकल सब प्लेक्सेसशी जुळते :

| पाकळ्या | उप-केंद्र (सब-प्लेक्सेस) | नियंत्रणातील अवयव |
|---|---|---|
| १ | सुपिरियर सर्व्हायकल | मेंदूशी जोडलेले |
| २ | ग्रीवा धमनी (Carotid) | आतील ग्रीवा धमनी : प्रतिअहंकार, बाहेरील ग्रीवा धमनी : अहंकार (Internal Carotid : superego, External Carotid : ego) |
| ३ | कॅव्हर्नस (Cavernous) | डोळे, नाक, जीभ, मुख, दात, नाक आणि कान |
| ४ | आंतरिक आणि बाहेरील | वेगस नाडी आणि जीभ |
| ५ | अन्ननलिका संबंधी (Pharyngeal) | सात अवयव - घसा (१), नाक (२), कान (२), श्वासनळी (१), गुलेट (१) |
| ६ | कंठ (Laryngeal) | श्वासमार्ग (लॅरिंक्स) |
| ७ | वरील हृदय (Superficial Cardiac) | श्वासमार्गामागील हृदय व ग्रीवा धमनीच्या दिशेने जाणारी श्वासधमनी (Behind carotid artery going to heart and trachea) |
| ८ | बाहेरील ग्रीवा धमनी (External Carotid) | मुख, कान व मेंदूतील धमन्यांना पुरवठा करणारी कॅरॉटीड आर्टरी |
| ९ | वरील व खालील मध्य (Superior & Inferior Middle) | सर्व्हायकल प्लेक्सेसच्या वरील व खालील भागास पुरवठा करते. (Supplies upper and lower part of the Cervical plexus) |
| १० | बाहेरील मध्य ग्रीवा (External Middle Cervical) | साक्षीस्वरूपाचे स्थान (Site of the Sakshi (Witness Power)) |

| | | |
|---|---|---|
| ११ | गलग्रंथी (Thyroid) | पित्ताशयाला नियंत्रित करणारी (Thyroid which controls gall bladder) |
| १२ | मध्य हृदय (Middle Cardiac) | हृदयाकडे |
| १३ | ग्रीवाचा वरील खालचा भाग | घशाच्या केंद्राकडे |
| १४ | इन्फिरिअर किंवा सबक्लॅव्हिअन (Inferior or Subclavian) | हाताला पोषण करणाऱ्या धमन्या याचे कार्य ठीक नसल्यास चैतन्य लहरींची जाणीव होत नाही (Towards the arteries supplying bands. Causes insensitivity to vibratory awareness if not working properly) |
| १५ | हृदयाचा खालचा भाग | हृदय आणि फुफ्फुसे |
| १६ | बाह्य रज्जूवाला (External or vertebral) | मेंदूकडे जाणारी रज्जू धमनी (Vertebral artery going towards the brain) |

**आज्ञा चक्र**

या चक्राच्या दोन पाकळ्या असून ते ऑप्टिक थॅलॅमसच्या केंद्राशी जुळते :

| पाकळ्या | उप-केंद्र (सब-प्लेक्सेस) | नियंत्रणातील अवयव |
|---|---|---|
| १ | तृतीय नेत्रग्रंथी (Pineal) | प्रतिअहंकाराचे नियंत्रण (Controls superego) |
| २ | पीयूषिका - कफ (Pituitary) | अहमतंत्र नियंत्रक (Controls egolamus) |

**सहस्रार चक्र**

एक हजार पाकळ्यांचे चक्र - आपल्यातील परमेश्वरी राज्य.

## प्रकरण १२

# मूलाधार चक्र

कुंडलिनीच्या निर्मितीच्या आरंभी, विराटामध्ये, हे पहिले केंद्र निर्माण केले गेले. आदिशक्तींचे एकमेव पुत्र श्रीगणेश, चिरंतन बालकत्वाचे प्रतीक, यांची या चक्राचे अधिष्ठानस्वरूप प्रमुख दैवत (Presiding Deity) म्हणून स्थापना केली गेली. मूलाधार हा शब्द दोन संस्कृत शब्दांपासून मूल+आधार, आला आहे. याचा अर्थ आहे, सृष्टीच्या मुळाचा आधार.

मानवाला, परमेश्वराच्या आदिपुरुषाच्या (विराटाच्या) प्रतिमेत बनविल्याने, जन्म झाल्यावर हे पहिले प्रत्येक मानवात अभिव्यक्त होते. माणसाच्या शरीराच्या सगळ्यात खालच्या भागात आणि बैठकीच्या केंद्राच्या सुमारे एक इंच वर हे केंद्र बसवले आहे. हे अतिआवश्यक आणि महत्त्वाचे केंद्र सूक्ष्म स्वरूपात असते. याच्या स्थूल अभिव्यक्तीस वैद्यकीय परिभाषेत पेल्व्हिक प्लेक्सस म्हणतात. त्या प्लेक्सेसने याला वेढलेले असते.

परमेश्वराने सात दिवसात सृष्टीची निर्मिती केली असे म्हणतात. सोमवार हा आदिशक्तींचा व श्रीशिवांचा दिवस आहे. मंगळवारी साक्षात्कारी जीवांनी (सहजयोग्यांनी) मूलाधार चक्रात श्रीगणेशांची पूजा करावी. चेतन मनाचे (Preconscious Mind) नियंत्रण करणाऱ्या श्री हनुमानाचेसुद्धा मंगळवारी पूजन करावे.

श्री गणेशांना पृथ्वी तत्त्वापासून तयार केले गेले. त्यांचे प्रकटीकरण प्रत्येक जीवात, वेगळे असते आणि ते त्या जीवाच्या उत्क्रांतीच्या अवस्थेवर अवलंबून असते :

### अवतार (Incarnations)

परमेश्वरी अवतारात हे चक्र मातीच्या रंगाचे आणि चमकणारे असते.

काही वेळेस श्रीगणेश जिवंत लहान मुलासारखे नृत्य करताना दिसतात, तर काही वेळेस राजस, सूज्ञ तत्त्वज्ञानी दिसतात. आदिशक्तींच्या अवतारात ते सतत तत्पर, सतर्क आणि आज्ञाधारक मूल असतात. त्यांचे शरीर, चेहरा, हात, पाय यांच्यातून त्यांचे गोड, नाजूक, सुंदर व लाघवी व्यक्तिमत्त्व दिसते. अशा समर्पित, निरागस आणि परम शक्तीशाली बाळाच्या थोड्या दर्शनानेसुद्धा श्रीआदिशक्तींचे हृदय त्यांच्या बाळाविषयीच्या प्रेमाच्या मधुर भावनांनी वात्सल्याने भरले जाते. श्रीआदिशक्तीच्या उपस्थितीत, त्यांच्या एखाद्या भक्ताने श्रीगणेशाचे नाव घेतले तर त्यांना अतिशय गौरवान्वित वाटते आणि अशा भक्तावर त्या वरदानाचा वर्षाव करतात.

## साक्षात्कारी जीव

साक्षात्कारी जीवात मूलाधार चक्र निऑन प्रकाशासारख्या धुक्याप्रमाणे किंवा नारंगी रंगात चमकते. स्वस्तिकाच्या वाती सुंदर व तेजस्वी प्रकाशाने प्रकाशमान व्हाव्यात, असे हे चक्र दिसते. त्या तेवत असलेल्या वाती चार गुलाबी-नारंगी रंगाच्या, शांत पण जिवंत ज्योतींच्या जिभांप्रमाणे दिसतात. हे संपूर्ण दृश्य चार पाकळ्यांच्या कमळाचे असते, ज्याच्यात पाकळ्यांच्या ऐवजी चार ज्योती असतात, त्या कमळाचे केंद्र असते. त्याचा रंग गडद निळा किंवा धूसर राखाडी, श्रीगणेशांच्या मूडप्रमाणे असतो. साक्षात्कारी जीव या गडद रंगाच्या सागरात पाहू शकतात. त्यांना गडद निळा रंग फिका होत जात फिक्या निळ्या रंगात विरघळताना दिसू शकतो आणि ढग आणि विजांप्रमाणे फ्लॅशेस दिसू लागतात. हे दृश्य साधकाच्या भोवताली आनंदाचे सुंदर ढग पसरवते. विजांच्या मागोमाग श्रीगणेशांची सोंड येते आणि काही वेळानंतर लहान मुलाप्रमाणे गजमुखी दैवत दिसते. बहुतेक साक्षात्कारी जीवांना ते स्थिर दिसतात, पण नंतर अनेक हालचाली दर्शवितात. प्रत्येक हालचाल आनंद आणि शांततेची नवीन लाट निर्माण करते. पुढच्या अवस्थेच्या पायरीवर अशा जिवांसाठी श्री गणेश

जीवित व्यक्तिमत्त्व होतात.

## सर्वसाधारण मानव


सामान्य माणसात (असहज) हे चक्र प्रवाळाच्या रंगाचे आणि चार धागे किंवा वाती स्वस्तिकाच्या आकारात जोडल्याप्रमाणे दिसते.

## दिशाभूल झालेले साधक

दिशाभूल झालेल्या साधकात हे सूक्ष्म केंद्र लाल रंगाचे दिसते. ज्या साधकांची सिंपथेटिक नाडी संस्थेच्या गैरउपयोगाने, दिशाभूल झालेली असते आणि त्यांना भविष्य समजते, त्यांचे मूलाधार चक्र गडद लाल रंगाचे दिसते. काही वेळेस हे चक्र चाकाप्रमाणे स्वत:भोवती फिरताना गडद लाल आणि काळसर निळ्या रंगाच्या वर्तुळाकार छटा या रूपात दिसते. श्रीगणेश भविष्य समजणाऱ्या (clairvoyant) साधकांवरचा क्रोध व्यक्त करतात, तेव्हा हे घडते. विना-साक्षात्कारी लोक सिंपथेटिक नाडी संस्थेतून कार्य करीत असताना मृतात्म्यांच्या मदतीने भविष्य समजण्याची कला प्राप्त करतात आणि तो श्रीगणेशांना अनधिकार व्यत्यय असतो.

आकृती १३ मधील स्वस्तिक, जाणिवेची चार क्षेत्रे (dimension) आणि पाचव्या क्षेत्रात त्याचे एक होणे दर्शवते (प्रतिनिधित्व करते) पाचवे क्षेत्र विरुद्ध टोकांना जोडणाऱ्या तिरक्या रेषेत (डायगोनली) हालत मूलाधार चक्राच्या घड्याळाच्या काट्याच्या दिशेच्या व घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेच्या हालचालींच्यावर जाते. पहिली रेषा 'ए' शरीरात प्रवेश करणारी व पुन्हा बाहेर जाणारी महाकाली शक्ती दर्शवते. 'बी' रेषा, शरीरात प्रवेश करून तिथेच राहणारी महासरस्वती शक्ती दर्शवते.

घड्याळाच्या काट्याच्या दिशेने केलेल्या हालचालींतून श्रीगणेश सृजनशीलतेची क्षमता (faculty) आणि सौंदर्यशीलतेचे सत्व जागृत करतात. ही जागृती कलाकारांना त्यांच्या कलाकृतीच्या निर्मितीमधून



*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १३**

सृजनशीलता आणि सौंदर्यशीलता यांना प्रकट करताना आनंद देते. घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेची हालचाल सर्व विद्रूप आणि मृत गोष्टींचा संहार करण्यासाठी असते. साधकाची गरज काय आहे ते श्री गणेश डाव्या बाजूस हालतात की उजव्या बाजूस याच्यावरून दर्शवली जाते.

व्यक्तीचे वागणे विषयाधीनतेचे असल्यास श्रीगणेश त्या व्यक्तीच्या डाव्या बाजूस झुकतात आणि इंद्रिये व इच्छांचे दमन करण्याचे वागणे असल्यास उजव्या बाजूस झुकतात. श्रीगणेश एका मर्यादेपर्यंत झुकतील. पण एका बाजूकडे अतिशय कार्य होत असेल तर ते त्यांचे संतुलन ठेवण्याचे कार्य सोडून स्वत:च्या घरात जातात आणि अशा भ्रष्ट व्यक्तित्वामधून शेवटी अंतर्धान पावतात. त्यांनी हे केल्यावर त्यांच्या चेतीत मनाच्या प्रदेशावर सुप्त चेतीत आणि चेतनाबाह्य प्रदेशातून मृतात्म्यांचे आक्रमण होते.

श्रीगणेशांची स्थिर अवस्था, सौम्यपणा अभिव्यक्त करणारा सत्त्वगुणाच्या मूडचा प्रभाव दर्शवतो. हे घटित होते जेव्हा व्यक्तीचे योग्य धर्माचरण असते आणि सहजयोगातून त्याची कुंडलिनी जागृत झालेली असते. श्रीगणेशाच्या स्थिर अवस्थेमधील सुधारणा सहजयोगातल्या उत्थानातले सातत्य दर्शवते.

पदार्थमात्रात श्री गणेश विद्युत चुंबकीय लहरी सोडतात. स्वस्तिकाच्या चार बाजू जडातल्या चार संयोजकाचे गुणांकांचे (व्हॅलन्सीज) काम करतात. तीन व्हॅलन्सीज (टेट्राव्हॅलंट) असलेला मूळपदार्थ (एलिमेंट) तटस्थ (न्यूट्रल) (अल्कली किंवा आम्ल नाही) असतो. सृष्टीतले हे सर्वात उत्क्रांत झालेले एलिमेंट असते. विशेषत: तीन संयोजक गुणांक (व्हॅलन्सीज) असलेला कार्बन जैव-रसायन शास्त्राचा आधार असतो. संयुगात (compound) कार्बन असतो, तेव्हाच फक्त जीवन शक्य होते. अधिक वा कमी व्हॅलन्सीजचे मूल पदार्थ (एलिमेंट्स), श्रीगणेशाच्या पोषण करण्याच्या शक्तीतून (sustaining power) उत्क्रांत झाले असतात. रसायन शास्त्रातील नियतकालिक (Periodic) नियमांचा अभ्यास केल्यावर हे चांगले समजू शकेल.

प्राचीन काळातल्या काही साधकांनी मूलाधार चक्र पाहण्याच्या (visualise) प्रयत्नात श्रीगणेशांची सोंड पाहिली आणि ते गोंधळात पडले.

सोंड चमकदार वलयाप्रमाणे दिसल्याने ते गैरसमजाने त्याला कुंडलिनी समजले. ही मूलभूत चूक पुढे गंभीर स्वरूपाची घोडचूक झाली. याबद्दल आपण पुढे पाहू.

श्रीगणेश लैंगिकतेचे नियंत्रण करणाऱ्या पेल्व्हिक प्लेक्सेसमध्ये बसवलेले असतात. ज्या साधकांनी कुंडलिनीची श्रीगणेशांबरोबर गफलत केली, त्यांनी कुंडलिनीची सेक्सबरोबरही गफलत केली. ही गंभीर चूक कारण झाली एका अतिनुकसानकारक सिद्धांताच्या (थेअरी) उदयास. तो सिद्धांत असा, की कुंडलिनीला सेक्समधून जागृत करता येते. कुंडलिनीला सॅक्रमच्या त्रिकोणी अस्थीमध्ये स्थापित केले असून ते स्थान मूलाधार चक्राच्या बऱ्याच वरच्या बाजूस असते. यावरून हे सिद्ध होते, की प्रत्येक माणूस सेक्सविषयी संयत व शांत भावना (sublimated) असलेले व्यक्तित्व घेऊनच जन्मलेला असतो. त्यामुळे सेक्सला शांत करण्याची गरज नसते, पण केवळ हे करण्यासाठी अनेक लेखकांनी सिद्धांत निर्माण केले आहेत. श्रीगणेशांचे त्यांच्या आईबरोबरचे शुद्ध व पवित्र संबंध सर्वांचा आधार असून सर्व सृष्टीत व्याप्त आहेत. म्हणून सेक्समधून किंवा सेक्सला शांत करून योग मिळवता येतो या हास्यास्पद संकल्पनेच्या आधारावर मिळविलेले उत्थान निश्चितच कोसळणार. वास्तवात या पवित्रतम नातेसंबंधाविषयीचे हे मरणप्राय करणारे पाप आहे. जाणूनबुजून अशी मूर्खपणाची साधना करणारे नवीन लोक प्रचंड नुकसान करून घेण्याचा धोका पत्करतात. अशी माणसे मृत्यूनंतर परमेश्वरी साम्राज्यात जाण्याऐवजी नरकात जातील, तेव्हा त्यांना कळेल. श्रीगणेश आणि त्यांचे उत्क्रांत मानवी रूप येशू ख्रिस्त या विशिष्ट पापाला केव्हाही क्षमा करणार नाहीत. या कारणामुळे कुंडलिनीच्या पावित्र्याला हात घालून अनेक साधकांना फार मोठा त्रास सहन करावा लागला आहे.

## मूलाधार चक्राचे कार्य

श्रीगणेश परमेश्वरी शक्तीचे (प्रणव) पावित्र्याच्या सागरात परिवर्तन करतात आणि त्याच्या लहरी (waves) मूलाधार चक्राच्या पाकळ्यांवर पसरतात. परमेश्वरी-साक्षात्कार (God-Realisation) होण्याच्या अवस्थेतील अधिक उच्च स्थितीत असलेल्या व्यक्तीच्या मूलाधार चक्राच्या आकाराची, पॅटर्नची, अत्यंत उत्क्रांत रचना असते आणि ते मूलाधार चक्र उच्च अवस्थेत उत्क्रांत झालेले आणि जीवित अवयवाच्या शरीराप्रमाणे काम करते. या चक्राच्या जीवित पाकळ्यांवर बाणाप्रमाणे असलेल्या रेषा असून त्या लहान आकाराच्या लहरी किंवा लाटांप्रमाणे दिसतात. (पाहा आकृती १३) साधकाचे पावित्र्य जसे वाढेल तशा त्या रेषा मोठ्या होतात. साधकाने अनेक जन्मात जे पावित्र्याचे आचरण केले असेल त्याच्या सन्मानाच्या भावनेशी ही तादात्म्यता आहे, हे बाणासारखे आकार पॅटर्नस् त्यांच्या घड्यांमध्ये, साक्षात्कारी जीवाच्या मस्तकातून खाली वाहणाऱ्या 'कृपे'च्या (ग्रेस) स्वरूपातल्या प्रणवाला साठवतात. असा माणूस कलाकार नसेल, पण कलाकृतीच्या परम सौंदर्याच्या मूल्यांमुळे (absolute aesthetic values) त्याचा आनंद घेण्याच्या संवेदना तो विकसित करतो. या रेषा, चारही दिशातील प्रणवाचा साठा करण्यासाठी जाळे तयार करतात. प्रत्येक व्यक्तीच्या अवस्थेचे विश्लेषण श्रीगणेश स्वतः करतात. श्रीगणेश आपल्या सर्व कार्याचे परीक्षक आहेत.

### पहिली पाकळी

पहिली पाकळी खालच्या दिशेकडे वळलेली असून तिच्यावर तीन बाण (बाणासारख्या रेषा) असतात :

* पहिला बाण, साधक ज्याच्या आनंदात असतो तो सुसंवाद दर्शवितो.
* दुसरा बाण संतुलनाची जाणीव दर्शवतो.

* तिसरा बाण साधकाची अबोधिता व सदाचरण यांची संवेदनशीलता दर्शवतो.

साधकाचे श्रीगणेशांना पूर्ण समर्पण, निरागसता व शुद्धाचरण आणि पावित्र्य यांच्यामुळे तीन बाण पूर्णपणे विकसित होतात. श्रीगणेशांच्या कृपेने साधकात स्थैर्य येते आणि श्रीगणेश जागृत होऊन योग्य त्या साधनेने स्वत:ला घडवीत साधक आपले उत्थान प्राप्त करून घेतो. साधनेचा हा प्रकार परमेश्वरी साक्षात्कार मिळालेल्या गुरूच्या मार्गदर्शनाखाली आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर करायचा असतो. यामुळे (पाकळीवरचे) सर्व पॅटर्नस्, आकार जोडले जातात. हे साध्य झाल्याने, साधकाला, निर्मितीच्या आनंदाशी तादात्म्यता वाटते.

**दुसरी पाकळी**

दुसरी पाकळी व्यक्तीच्या उजव्या बाजूस वळलेली असून तिच्यावरही लाटांचे तीन आकार असतात :

* पहिल्या लाटेमुळे वाईट प्रकारच्या आनंदाच्या इच्छेवर प्रभुत्व मिळते.
* दुसऱ्या लाटेमुळे स्वत:मधल्या मोहांवर मात करता येते. हे असे सूचित करते की साधक त्याच्यावर ताबा घेऊ पाहणाऱ्या किंवा जवळपासच्या माणसाभोवताली तरंगणाऱ्या मृतात्म्यांना हाकलून देऊ शकतो.
* तिसरी लाट विकसित झाल्यावर साधकाला ती शक्ती दिली जाते जिच्यामुळे तो दुसऱ्या लोकांवर ताबा मिळवू पाहणाऱ्या, शरीरातून बाहेर फेकलेल्या आत्म्यांवर सहजच विजय मिळवू शकतो. साक्षात्कारी जीवाच्या फक्त दर्शनाने भूतबाधा झालेली व्यक्ती आपोआप हलते.

तिन्ही रेषा (लाटा) जोडल्या जाऊन एकात्म होतात आणि त्यांचे प्रकटीकरण होते तेव्हा स्वत:च्या ईश्वरत्वाचा आणि राजेपणाचा (Majesty) गौरव वाटतो. त्याचे परिणाम स्वत:च्या ईश्वरत्वाच्या, आत्मविश्वासपूर्ण व नम्र व्यक्तिमत्वात स्पष्ट दिसतात.

**तिसरी पाकळी**

तिसरी पाकळी व्यक्तीच्या डाव्या बाजूस वळलेली असते. तिच्यावरसुद्धा लाटांचे तीन आकार, पॅटर्नस, एकावेळी किंवा एकामागे एक उमटतात :

* पहिल्या लाटेमुळे परमेश्वरासमोर श्रद्धा व नम्रता विकसित होतात.
* दुसऱ्या लाटेमुळे सूज्ञता विकसित होते.
* तिसऱ्या लाटेमुळे ज्ञानाशी एकरूपत्व येते.

या तिन्ही लाटा एकात्म होऊन अभिव्यक्त किंवा प्रकट होतात, संपूर्ण जाणीव आणि साक्षीभाव यांची अनुभूती येते. जणू काही साधकाच्या अंतरंगाचा दरवाजा उघडला जाऊन सर्व धर्मग्रंथांचे सत्व आणि महान (परमेश्वरी) व्यक्तीच्या जीवनामागचे सत्य, साधकाच्या लक्षात येते. ज्या गोष्टीचे ज्ञान त्याला हवे असेल त्या गोष्टीवर त्याने आपले चित्त वळवायचे. सर्व खऱ्या धर्माचा उगम असलेल्या ईश्वरी प्रवाहात तो मोठ्या आनंदाने पोहतो. थोडक्यात, त्याला मिळणारे पूर्व संकेत (Intuition) तर्कसंगत असतात.

**चौथी पाकळी**

चौथी आणि शेवटची पाकळी वरच्या दिशेने वळलेली असते. तिच्यावरसुद्धा लाटेसारखे तीन आकार असतात :

* पहिली लाट साधकाला निर्भयता देते कारण तिच्या घडीत (फोल्ड) सुरक्षेचे सत्य साठवलेले असते.

* दुसरी लाट साधकाला सामूहिक चेतनेची जाणीव देते.
* तिसरी लाट धर्माची शक्ती प्रदान करते.

हे सर्व गुण पूर्ण विकसित झाल्यावर व्यक्तीला त्याच्या अंतर्यामीच्या धर्माशी पूर्ण तादात्म्य मिळते. एकत्र जोडल्यावर ही तत्त्वे कार्यक्षम व्यक्तिमत्त्वे देतात आणि त्याच्यामुळे अस्तित्वाच्या अमृताचा अनुभव येतो. असे व्यक्तिमत्व निर्भय असून कोणतेही पाप करीत नाही, परंतु परमेश्वराचे उपकरण (Instrument) म्हणून काम करते. त्याची प्रत्येक हालचाल आणि कृती, अज्ञानी लोकांना कितीही चुकीची वाटली, तरी ती प्रेमाच्या वैश्विक संगीतात भर घालते. तो ईश्वरीय वाद्यवृंदातला एक वादक असतो. तो वाद्यवृंद अशा सहजयोग्यांचा बनवलेला असतो जे प्रेक्षकांना अदृश्य असलेल्या महान चालकाच्या (great conductor) सूचनेप्रमाणे वाजवण्यास प्रशिक्षित आणि सक्षम आहेत. या कारणामुळे अनेक संतांना, ते ज्या आंधळ्या समाजात जन्मले होते, त्यांचा छळ आणि हेटाळणी यांचा त्रास झाला. आता सहजयोगाच्या आगमनामुळे, उत्क्रांतीच्या प्रगतीचे नुकसान करणारे अंधत्व मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते.

हे सूक्ष्म केंद्र बाकी सर्व सूक्ष्म केंद्राचे मूळ आहे. त्याला मज्जारज्जूचे बाहेर स्थापन केले आहे. कारण त्याला श्रीगणेशांच्या चैतन्य लहरी, परमेश्वरी प्रेमाच्या पावित्र्याच्या शक्तीच्या (प्रणवाच्या) माध्यमातून भवसागरात सोडता याव्यात. मज्जारज्जूच्या बाहेर स्थापित केल्यामुळे या उघडे असलेल्या चक्राला, बाहेरच्या घटनेबद्दलची मोठी संवेदनशीलता मिळाली आहे. शिवाय ते इतर चक्रांच्या प्रतिक्रियांशीही संवेदनशील आहे आणि त्या चक्रांनी पकडलेल्या अनुभवांची नोंद ठेवते. हे चक्र भवसागरातील ही सर्व माहिती जुळवते. याच्या कार्यांपैकी अजून एक कार्य म्हणजे भवसागराच्या भोवताली घडणाऱ्या भौतिक जगातल्या घटनांची नोंद ठेवणे. नोंदलेल्या घटना व अडचणी यांची माहिती कुंडलिनी मातेला दिली

जाते. ती सर्व कर्मे या स्वरूपात रेकॉर्डिंग टॅब्लेटप्रमाणे साठवली जातात. ते चित्रगुप्ताचे कार्य असून या कर्माच्या गणिताप्रमाणे माणसाच्या मृत्यूनंतर त्याचा दुसरा जन्म ठरवला जातो. दैवतांच्या सल्ल्याने श्रीगणेश त्या व्यक्तीला अचेतनाच्या माहिती देण्याच्या विविध यंत्रणांच्या माध्यमातून माहिती देतात. त्यांच्यापैकी एक 'इड' आहे. चुकणाऱ्याला सुधारणारे म्हणून श्रीगणेश त्या व्यक्तीला स्वप्नात चिन्हे दाखवून मार्गदर्शन करतात. मानसशास्त्रात श्रीगणेशांना इड म्हणता येईल. श्रीगणेश ज्याचे नियंत्रण करतात त्या सुप्तचेतित मनासाठी, इड म्हणजे इडा नाडीही असू शकते. श्रीगणेशांचे स्थान मूलाधार चक्र इडा नाडीच्या पायथ्याशी बसलेले आहे. मज्जारज्जूच्या बाहेर श्री गणेशांचे स्थान असल्याने ते कायम जागृत आणि सतर्क (जागृत अवस्था) दैवत आहेत. त्यांच्या विश्वव्यापी स्थान माहात्म्यामुळे त्यांचा अपमान करण्याचा धोका कोणी पत्करू नये.

साक्षात्कारी जीवांनी श्रीगणेशाच्या निरागसतेला शरण जात सावकाश उन्नत व्हावे. जे लोक लहान मुलांप्रमाणे साधे, सरळ आणि शुद्धाचरणी आहेत, ज्यांच्यावर कोणत्याही धर्ममार्तंडाच्या विचारांचा प्रभाव नाही, अशा लोकांना उच्च स्थितीत उत्क्रांत झालेल्यांच्या किंवा परमेश्वराचा साक्षात्कार झालेल्याच्या अवतारांच्या केवळ सान्निध्यात आल्यावर लगेचच आणि आपोआप आत्मसाक्षात्कार (सहजयोग) मिळतो. त्यांना मध्यवर्ती मज्जासंस्थेत आनंदाच्या संवेदना जाणवतात आणि त्या जाणिवेचा प्रकाश जसा वाढेल तसे हळू हळू, त्यांना आत्मिक आनंदाच्या विशेष संवेदनांचा अनुभव मिळतो. सततच्या साधनेतून या संवेदनातील फरक लक्षात येतो व त्या संवेदना ओळखता येतात. संस्कृत भाषेत चार प्रकारच्या आनंदाच्या अनुभवांना चार नावे आहेत. चार पाकळ्यांवरील चार प्रकारच्या लाटांसारख्या असलेल्या जाणीवा जशा विकसित होतील त्याप्रमाणे या चार आनंदाचा अनुभव येतो. त्या आनंदाची नावे :

१. परमानंद     २. सहजानंद     ३. वीरानंद     ४. योगानंद

मूलाधार चक्राच्या चार पाकळ्या हे चार  आनंद निर्माण करतात. शिवाय त्या चार प्रकारच्या शक्ती निर्माण करतात. त्यांची नावे गुप्त, प्रकाश, कराल आणि विकराल.

कुंडलिनीमधून जातांना प्रणव नाद निर्माण करतो. मूलाधार चक्राच्या चार पाकळ्यांत प्रवेश केल्यावर तो चार प्रकारचे नाद निर्माण करतो. ते नाद अक्षरांच्या रूपात ऐकू येतात. ते आहेत, वं, शं, षं, सं. संस्कृत अक्षरे नादांतून तयार झाली. कुंडलिनी वेगवेगळ्या चक्रातून आणि त्यांच्या पाकळ्यातून जात असतांना जे नाद तयार झाले त्या नादांच्या अक्षरांची संस्कृत भाषा आहे. अजूनही भारतीय भाषांत संस्कृतला देवनागरी किंवा दैवतांची भाषा असे म्हटले जाते.

काही साक्षात्कारी जीव हे चक्र काढून शरीराच्या बाहेर आणून स्वच्छ करून पुन्हा योग्य स्थानी बसवू शकतात. सहजयोग्यांना या पद्धतीचा उपयोग करण्याची आवश्यकता नाही. त्यांच्यासाठी या चक्राच्या स्वच्छतेचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे हृदय पवित्र ठेवणे व जीवनात शुद्धाचरण, शुद्ध विचार व सत्कर्मे करीत राहणे. निरागसतेमधून चित्ताला शुद्ध व अनासक्त करता येते. श्रीगणेश, जीवित दैवत असून सतत कार्यरत असतात. मानवी शब्दांत त्यांचा गौरव करणे शक्य नाही. त्यांच्या वैभवाचे वर्णन करू शकणारे मानवी शब्द नाहीत. त्यांनी निसर्गात आत्मिक अग्नी निर्माण केला असून तो प्रत्येक चक्राच्या प्रत्येक पाकळीला प्रज्ज्वलित करतो. परम परमेश्वर स्वतः त्यांचे गुरु आहेत. इतर सर्व दैवते - त्यांची आई आदिशक्तीसुद्धा - आदिगुरू दत्तात्रेयांचे शिष्य आहेत.

श्रीगणेश माणसांपेक्षा फार वर आहेत. ब्रह्मा, विष्णु आणि शिवसुद्धा त्यांच्या परमोच्च (absolute) सद्गुणांच्या जवळ येऊ शकत नाहीत. श्रीगणेश, त्यांच्या येशू ख्रिस्त स्वरूपातील मानवी अवतारात संपूर्ण मानव

वंशाची काळजी घेतात. कारण ते विश्वाचे आधार आहेत. येशू ख्रिस्तांनी पावित्र्य आणि निरागसता यांचे मानवी रूप घेतले होते आणि ते जगाचे आश्रय आहेत. आज्ञा चक्र हे त्यांचे स्थान स्वर्गाच्या राज्याचे (विराटाचे सहस्रार चक्र) प्रवेशद्वार आहे.

तीन भाग (तीन अक्षरे) असलेल्या ॐ या पवित्र अक्षरातील 'अ' या अक्षरातून मूलाधार चक्र बनले आहे. प्रत्येक अक्षर मंत्र आहे. 'अ' हे अक्षर आदिशक्तीच्या महाकाली शक्तीचे आहे आणि मूलाधार चक्र, महाकाली यांनी श्रीगणेशांची माता गौरी या स्वरूपात निर्माण केले. पुढे त्यांनी आपल्या मुलाला महालक्ष्मी यांच्याकडे दिले आणि महालक्ष्मींनी, मेरी माता या स्वरूपात त्यांना येशू ख्रिस्त म्हणून जन्म दिला.

दुराग्रहीपणातून इंद्रिय निग्रहाचा प्रयत्न किंवा अति सुखलोलुपता, सिंपथेटिक नाडी संस्थेला उत्तेजित करते. त्यांचे काम प्रमाणाबाहेर वाढून व्यक्तीचे चित्त पिंगला किंवा इडा (व्यक्तीसापेक्ष) नाडीवर जाते. प्रथम, रंगीबिरंगी कॅलिडोस्कोपच्या वर्तुळासारखे, गडद लाल रंगाचे मूलाधार चक्र माणसाला दृश्यमान होते. गडद लाल रंग, श्रीगणेशाच्या प्रदेशात अनधिकृतपणे पाहण्याचा परिणाम असतो. हा प्रयत्न तसाच चालू ठेवल्यास, चक्राच्या केंद्रस्थानाच्या आतमध्ये, संतापलेले व प्रज्ज्वलित श्रीगणेश दिसतात. दिशाभूल झालेल्या साधकाला धक्का बसू शकतो किंवा शरीरात प्रचंड उष्णता जाणवते आणि स्पष्ट करता येणार नाही अशी अस्वस्थता जाणवते. भूतकाळातले भयंकर अनुभव, ज्याला फ्लॅश बॅक म्हणतात, पुन्हा अनुभवास येऊ शकतात. काही जण वन्य पशूंप्रमाणे ओरडत उड्या मारतात. काही नपुंसक आणि प्रदर्शन मांडणारे पुष्कळदा कपडे काढतात.

अशा सर्व चुकीच्या मार्गदर्शनाखाली अवलंबिलेल्या कुंडलिनी जागृतीच्या पद्धती निश्चितच नुकसानकारक असतात. कारण त्या खऱ्या

कुंडलिनी जागृतीची शक्यता कायमची नष्ट करतात. अचेतनाच्या प्रदेशात उन्नत होण्याऐवजी साधक मृत भूतकाळाच्या प्रदेशात प्रवेश करतो. याचे कारण असे, की श्रीगणेश जे त्या प्रदेशाच्या दरवाज्याचे नियंत्रण करतात, ते रागावून निघून जातात. त्या माणसाचे सुप्त चेतित मन आणि मानवी जाणीव खालच्या पातळीवर येत प्राण्यांच्या जाणिवेच्या पातळीवर येतात. प्राण्यांची बरोबरी करून माणूस अतिमानव अवस्था (सुपर ह्युमन स्टेज) स्तरावर जाऊ शकत नाही.

तेव्हा आदिमातेचा अपमान करणाऱ्या साधकाला श्रीगणेश मोठी शिक्षा करतात. श्रीगणेशांना कोणीही अपाय करू शकत नाही, कारण त्यांच्या आईच्या प्रेमाच्या तेजोवलयाखाली (aura) असल्याने त्यांच्यावर कोणीही आक्रमण करू शकत नाही. श्री येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाने श्रीगणेशांचे अविनाशित्व सिद्ध झाले आहे. जे साधक त्यांच्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न करतात ते सिंपथेटिक नाडी संस्थेच्या माध्यमातूनच कार्य करू शकतात आणि त्यांचे चित्त उजव्या किंवा डाव्या नाडीतून जाते. मध्यवर्ती पॅरासिंपथेटिक नाडी संस्थेपर्यंत जाणे त्यांना शक्य होत नाही. शेवटी अशा मूर्खपणाच्या मागे लागून, दिशाभूल झालेले साधक बाजूला पडतात आणि मृतात्म्यांकडून सूचना घेणारे (clairvoyant) होतात. त्यांचे चित्त श्रीगणेशांच्या चक्राच्या बाहेरच्या बाजूवर जाऊन कोणत्याही नियंत्रणाविना सर्वात बाहेरच्या सीमेवर फिरत राहते. काही वेळेस त्यांना हे चक्र जसे दिसले तसे त्याचे वर्णन ते करतात. असे दिसते, की श्रीगणेशांचा क्रोध लाल निळ्या रंगाच्या अग्नीच्या रूपाने बुडबुड्याप्रमाणे येऊन चक्राच्या पृष्ठभागावर फिरत आहे. या अज्ञानी लोकांना याचा काहीही अर्थ समजत नाही. वास्तवात हे चक्र पूर्ण उमललेल्या बल्बस्प्रमाणे मॉर्निंग ग्लोरी या फुलाच्या आकाराचे असते. दिशाभूल झालेला साधक दुराग्रहीपणाने प्रयत्न करतच राहील तर श्री गणेश लाल व गरम रूपात दिसतात आणि साधकाला अनधिकारपणे त्यांच्या प्रदेशात येणे थांबवण्याचा इशारा देतात. या अवस्थेत

साधकाने प्रयत्न थांबवले नाहीत तर श्री गणेशांचा क्रोध प्रचंड उष्णता आणि भाजण्याच्या रूपाने व्यक्त होतो. काही वेळेस शरीरावर फोडांची मालिका उमटते, तिची नाभीपासून सुरुवात होऊन लंबगोलाकार रेषेत मानेच्या भोवताली वेढा घालते. हे पूर्वसूचनेशिवाय होऊ शकते. तो साधक भाजलेल्या मांजराप्रमाणे उड्या मारतो किंवा त्याला भाजल्याप्रमाणे वेदना होतात. ही सर्व लक्षणे दिशाभूल झालेल्या साधकाने श्रीगणेशांचा आणि त्यांच्या आईचा अपमान केल्यामुळे दिसतात. काही मूर्ख लोक त्यांचा कुंडलिनी जागृतीशी संबंध जोडतात, पण कुंडलिनी जागृतीने तसे होत नाही. जे लोक त्यांचे पाप (अधर्म) बुद्धीने मान्य करीत नाहीत त्यांच्यात अशा प्रकारचा शारीरिक विरोध दिसून येतो. जे लोक त्यांच्या पूर्व कर्मांमुळे किंवा कमकुवतपणामुळे पाप मान्य करतात त्यांना वाटते, की जणू काही त्यांची जबाबदारी संपली. त्यांना आराम वाटतो अणि त्यांच्यातून काम करणारी भूते सुखाचा उपभोग घेतात आणि त्या लोकांना वाटत राहते की आपण शुद्ध आहोत. वास्तवात तो व्यक्ती पूर्णपणे भुतांच्या प्रभावाखाली असतो. तो त्यांचा गुलाम बनतो आणि संवेदनाविहीन व्यक्ती बनतो.

ज्या साधकांना खरोखरच चिरंतन आणि परम मिळवायचे असेल त्यांनी अशा नुकसानकारक आणि खोट्या, अपरिपक्व पद्धती सोडायला हव्यात. त्यांनी हे लक्षात घ्यायला हवे, की ते स्वतःचे जे नुकसान करून घेत आहेत, ते तात्पुरते नसून त्यांच्यामुळे त्यांची कुंडलिनी, अनेक जन्म घाबरून बसेल किंवा गोठेल. याचा अजून एक साईड इफेक्ट असा, की मध्यमार्ग सुषुम्ना, विविध दैवतांच्या क्रोधामुळे घसरडा होतो. दैवते मागे जातील आणि झोपतील आणि रागाने अंतर्धान होऊन साधकाला बहिष्कृत करतील. अशा लोकांची कुंडलिनी जागृत होऊन सर्वोच्च स्थानात उत्थापन झाल्यावर टाळूमधून परत खाली घसरते. अशा बिघडलेल्या लोकांची कुंडलिनी जागृत अवस्थेत ठेवणे सहजयोग्यांसाठी फार कष्टदायक असते. अशा लोकांत

कार्यान्वित होणे सहजयोगाला अशक्यप्राय असते. त्या लोकांनी हे समजायला हवे, की त्यांना शुद्ध व पवित्र आचरणाची काही जाणीव नसेल आणि ते सौम्य आचरणाने जगत नसतील तर ते श्रीगणेशांना फसवू शकत नाहीत. तसेच श्रीगणेश जे प्रत्येक कृतीचा, चांगली आहे किंवा वाईट आहे असा अंतिम निवाडा करणारे आहेत, त्या श्रीगणेशांनी दिलेली शिक्षा ते लोक टाळू शकत नाहीत. सहजयोग व श्रीआदिमाता, श्रीगणेशांच्या प्रतिक्रियेला साक्षी मात्र असतात.

अनेक साधक प्रगल्भ (सोबर) दिसतात. या प्रकारात स्वयंघोषित उच्चभ्रू लोक असतात. वरवर शिष्टाचार (मॅनर्स) प्रमाणे वागण्यात काटेकोरपणा आणि संतुलित व्यक्तित्व दाखवतात. त्यांची स्वैराचारी दृष्टी, मनात खदखदणारी वासना उघडी पाडते. फॅशनेबल आणि अति पुढारलेल्या वर्गात प्रेमाचे खेळ (फ्लर्टिंग) करणे हा रूढ खेळ आहे. आणि तो फार लबाडीने आणि सांभाळून खेळला जातो. तरुण आणि वृद्ध, या भ्रष्ट मानवी आचरणात हरवत आहेत. त्यांच्या अस्थिर नजरा सतत एका व्यक्तीवरून दुसऱ्यावर फिरत असतात. शुद्धाचरणी माणसालासुद्धा अशा भटकणाऱ्या व्यक्तीच्या नजरेत आल्यास या वागण्याचा संसर्ग (इन्फेक्शन) होऊ शकतो.

अशा प्रकारे भ्रष्ट सवयी असलेला समाजच तयार झाला आहे. त्यांच्यात, विरूद्ध लिंगाच्याा माणसाची दृष्टी, मग ती कोणत्याही वयाचा असो, त्याच्या डोळ्यात काम करणाऱ्या मृतात्म्यांमुळे, ज्या व्यक्तीवर त्याची दृष्टी पडेल त्या व्यक्तीत लैंगिक सूचनांच्या लाटा निर्माण करते. तो माणूस पूर्णपणे थकलेला आणि विक्षिप्त (क्रेझी) असतो. बाहेरून सेक्सी दिसला तरी आतून तो नपुंसक असून तो कोणत्याही शारीरिक संवेदना उपभोगू शकत नाही. ही भूतबाधित मनाची कृत्ये असतात आणि त्यांचा ताबा घेणारी भूते सतत सामूहिक सुप्त चेतित मनाच्या संपर्कात असतात जिथून इतर अनेक मृतात्मे तथाकथित उच्चभ्रू लोकांच्या मेळाव्यात येतात. मृतात्म्यांना त्यांनी

पकडलेल्या माणसाच्या माध्यमातून उपभोग घ्यायचा असतो, पण त्यांच्या फार मोठ्या आक्रमणाने असे जीव फार त्रस्त असतात आणि अनैसर्गिकपणे उत्तेजनाच्या व अस्थिरतेच्या अवस्थेत असतात. माणसाचे डोळे अशाप्रकारचे लैंगिक अनुभव घेण्यासाठी नव्हते, पण या विकृतीमुळे जे लोक अशा विरंगुळ्यात अडकतात ते जीवनात लवकर नपुंसक होतात. अशी माणसे काही अवधीतच, कामुक, दुराचारी, शरीराबाहेरचे नपुंसक मृतात्मे यांच्यासाठी प्रवेश करून ताबा घेण्यासाठी चांगली माध्यमे बनतात. वासनापूर्तीची वाट पाहणारे मृतात्मे अशा माध्यमांकडे प्रवेश घेण्यासाठी आकृष्ट होतात. अशी माणसे त्यांच्या सवयींमध्ये जेवढी जास्त गुंतत जातात, तेवढ्या प्रमाणात मृतात्म्यांचे गट त्याच्यात उतरण्यास गर्दी करतात. त्याचे परिणाम दुःखदायी होतात. असे लोक ही भूतबाधा घेऊनच अनेक जन्म घेतात. याच्यावरून आपल्याला समजते, की अनेक महत्त्वाचे लोक, राजे, राजकारणी, प्रशासक आणि शास्त्रज्ञ, जन्मापासून इतके दुराचारी का असतात.

अशा बाधेने ग्रस्त झालेला माणूस, त्याला अशी वाईट सवय आहे हे स्वतःशीच नाकारतो आणि तडजोड करतो. परंतु श्रीगणेश सतत जागृत असल्याने प्रत्येक ढोंगी माणसाला ओळखतात. म्हणून श्रीगणेशांना फसवण्याचा प्रयत्न करणे शहाणपणाचे होणार नाही. अशा अपात्र माणसाला आत्मसाक्षात्कार द्यावा असे श्रीगणेशांना सांगणे अत्यंत कठीण असते. अशा माणसाला अंधत्व येईल किंवा डोळे अधू होतील. अंधत्वाच्या इतर अनेक केसेस आहेत, पण अशा सवयीमुळे, डोळे लाल होतील किंवा लहान वयातच दृष्टी जाते. या सवयीतून विस्मरणाचा आजारही होऊ शकतो. शेवटी अशा लोकांना डोळ्यातून लैंगिक विकृतीशिवाय दुसरा कशाचाच आनंद घेता येत नाही. सिनेमाला, संगीताच्या कार्यक्रमाला, नाटकाला किंवा दुसऱ्या तशा स्वरूपाच्या सादरीकरणाच्या कार्यक्रमाला गेल्यास ते त्यांच्या

व्यसनातच इतके लिप्त असतात, की सादरीकरणाचा (परफॉरमन्स) खरा आनंद घेऊ शकत नाहीत आणि शेवटी त्यांचा वेळ व्यर्थ घालवतात. कलेच्या सौंदर्याबद्दलची त्यांची संवेदनशीलता गेल्यामुळे ते तथाकथित वरच्या सौंदर्याचाच आनंद घेऊ शकतात आणि तो आनंद त्यांचे चित्त पापात आणि घाणीत नेतो. आत्म्याची गहनता आणि चिरंतनाचा आनंद यांच्याबद्दल त्यांना काहीच वाटत नाही. ज्यांचे डोळे मृतात्म्यांच्या नियंत्रणात आहेत त्यांनी दृष्टी खाली (जमिनीकडे) ठेवावी आणि भुतांना कायमचे बाहेर जाऊ द्यावे.

दुसरे काही साधक आपला स्पष्टवक्तेपणा आणि आपण भोंदू नसल्याचे जाहीर करतात. ते जास्त मोठे पापी आहेत. कारण एकदा विवेकाच्या लहान आवाजासाठी माणूस बहिरा झाला, की कोणतीही भीती नसल्याने पापाचे गोडवे गात तो सैतानी विकृतीच्या आनंदातच अडकतो. अशा चुकलेल्या जीवांना एकच मार्ग वाचवू शकतो, की जीवनाच्या या अध्यायाचे पान उलटून नि:संकोचपणे, पूर्ण हृदयाने श्रीगणेशांना शरण जाणे. त्यांनी वैयक्तिक जीवनात सुधारणा करायला हवी आणि सतत त्यांची क्षमा याचना करावी. मोठ्या प्रेमाने आणि दयेने त्यांना असा इशारा द्यायलाच हवा, की आपल्या पापी जीवनाचा गर्व धरून दुराचरणाचा आनंद घेत राहणे त्यांनी पसंत केल्यास, श्रीगणेशांच्या शापाने खाली घसरत जाऊन सरळ नरकात जातील आणि त्यांच्या उद्धाराची आशा नसेल. सर्व संशयी व भटकलेल्या लोकांसाठी हे सत्य सांगायचे आहे.

श्रीगणेशांचे मस्तक लहान हत्तीचे आहे. हत्ती श्रीआदिशक्तीचे वाहन आहे आणि सत्य व राजवैभवाचे द्योतक आहे. शिवाय प्राण्याच्या मस्तकात चिरंतन बालकत्वाचे व्यक्तिमत्व असते याचे कारण असे की प्राण्यात, माणसात असतात तसे, अहंकार व प्रतिअहंकार विकसित होत नाहीत. माणसात, अहंकार व प्रतिअहंकार यांच्यामुळे मेंदू पूर्ण झाकला जाऊन

टाळूचे पूर्ण कॅल्सिफिकेशन (कॅल्शियम साठणे) होते. व्यक्ती त्यामुळे परमेश्वराच्या सर्वव्यापी शक्तीच्या मुख्य प्रवाहापासून वेगळी पडते व तिचा संपर्क तुटून एक वेगळी वैयक्तिक जाणीव तयार होते. याचे उलट श्रीगणेश परमेश्वरी सर्वव्यापी शक्तीशी संलग्न असतात. त्यांचे प्राण्याचे मस्तक असल्याने ते सर्वव्यापी शक्तीबरोबरचा संपर्क कधीच तोडत नाहीत.

विकास प्रक्रियेत प्राणी महाकाय शरीराचे झाले, तेव्हा हत्ती हा एकच मोठ्या आकाराचा प्राणी श्रीविष्णूंच्या कृपेने वाचला (गजेंद्रमोक्ष). याच्या वरून असे सिद्ध होते, की हत्ती हा एकच महाकाय प्राणी सौम्य प्रकृतीचा व धार्मिक होता. तो श्री लक्ष्मीचे वाहन आहे व सर्वात अधिक निरागस व माणसाळलेला प्राणी आहे. माणसाला असतो तसा प्राण्यांमध्ये अहंकार वाढत नसल्याने, माणसांप्रमाणे, प्राणी परमेश्वरी शक्तीपासून विभक्त होत नाहीत.

श्रीगणेशांची सोंड त्यांची स्वतःची कुंडलिनी आहे. त्यांना फक्त एकच चक्र आहे. ते त्यांच्या सोंडेच्या टोकावर, कोणत्याही संरक्षणाशिवाय, पापी व सैतानी प्रदूषणापासून मुक्त असते, कारण ते निष्कलंक असतात. चांगल्या व दुष्ट प्रवृत्ती यांच्यातील युद्धात ते निर्भय योद्धे आहेत. ते एकच दैवत असे आहेत, की त्यांचे चक्र शरीरापासून वेगळे असून बाहेरच्या बाजूस अगदी त्यांच्यासमोर असते. श्रीगणेश आणि सर्वव्यापी परमेश्वरी शक्ती (प्रणव) यांच्यातील नातेसंबंध एका देखण्या रूपकाद्वारे दर्शवता येतील. भारतात घरातल्या शुद्ध व चांगल्या पाण्याच्या वापरानंतर निरुपयोगी व अस्वच्छ झाल्याने बाहेर सोडले जाते. पाईपद्वारा ते घराच्या ड्रेनमध्ये जाते व एका ठिकाणी, सेसपूलमध्ये साठते. त्या ठिकाणी कमळे उमलतात. (पंकज-चिखलात जन्मलेला). अशाच प्रकारे श्रीगणेशांचे निरागस, विशुद्ध करणारे, निष्कलंक व निरासक्त व्यक्तिमत्व मानवी शरीरास प्रदान केलेले आहे. त्यांच्या विशेष, निरागसता, शुद्धता व पावित्र्यता यांच्यामुळे, भोवतालच्या

अशुद्धीपासून वेगळे व त्याच्या पलीकडे असतात. अति सुखलोलुपता आणि लैंगिक विकृती यांच्या आचरणातून आत्मसाक्षात्कार मिळविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अस्वच्छ रूपकाच्या उदाहरणाने असे म्हणता येईल, घाणेरड्या पाण्यातून चालत, सांडपाण्याच्या पाईपमधून घरात शिरणे. त्याच्यावर श्रीगणेश संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करतील.

## मूलाधार चक्राचे कार्य

स्वयंचलित नाडी संस्थेवरच्या कोणत्याही पुस्तकात वाचकाला सब-प्लेक्सेस व त्यांची कार्ये यांचे संपूर्ण वर्णन मिळेल. पेल्व्हिक प्लेक्सेसमध्ये स्थापित, मूलाधार चक्राची चार सब-प्लेक्सेस असतात :

१. स्नायविक केंद्र (इन्फीरिअर हेमॉऱ्हॉइड्ल) - रेक्टमचे नियंत्रण

२. मूत्रकोश (व्हेसीकल) - मूत्राशयाचे नियंत्रण

३. पुरस्थ ग्रंथी (प्रोस्टेट) - प्रोस्टेटचे व त्याद्वारे लैंगिक अवयवाचे (sex organs) नियंत्रण.

४. गर्भकोश (युटेरीन) - स्त्रीयांमध्ये गर्भाशय (uterus) व पुरुषांमध्ये वृषणाचे (testicles) नियंत्रण.

हे चक्र प्रकाशित झाल्याने व्यक्तीस मोहावर विशेषत: लैंगिक जीवनावर प्रभुत्व मिळते. लैंगिकता (सेक्स) ही इतर कोणत्याही सुख देणाऱ्या, संवेदनशील इंद्रियांप्रमाणे आहे. मानवी जीवनाचा हा फार लहान भाग आहे. पण हे चक्र, मज्जारज्जूच्या बाहेरच्या बाजूस स्थूल पेल्व्हिक प्लेक्सेसमध्ये बसवले असल्याने व सेक्सचे कार्य याच्या एका सब-प्लेक्सेस द्वारे नियंत्रित होत असल्याने, त्याच्यात, इतर मानवी कार्याहून जास्त संवेदनशीलता असते. इतर सर्व चक्रांची सूक्ष्म केंद्रे मज्जारज्जूत किंवा मेंदूत असतात. श्रीगणेशांना व्यवस्थित समजून व त्यांच्या पूजनाने सेक्सला सूज्ञतेने व सौम्य आचरणाने संयमित ठेवता येते. या पूर्वीच हे स्पष्टपणे लिहिले आहे, की

मानवी उत्क्रांतीचा सेक्सच्या सुखाशी कोणताही संबंध नाही. उलट साधकाला श्री गणेशांच्या प्रतीकामधून सूचक पद्धतीने सांगितले जाते. ज्यात श्रीगणेश काही वेळेस स्वप्नात चिरंतन बालकाप्रमाणे दिसतात. आणि साधकाला असे सुचवले जाते, की अध्यात्माच्या शिडीवर उत्थान होत असताना आणि परिणामतः आध्यात्मिक पुनर्जन्माचे वेळी साधकाला सेक्सचे बाबतीत असे निरागस असायला पाहिजे, जसे लहान मुलाला आईबद्दल वाटते. सहजयोग ध्यानात जेव्हा तो आदिशक्तीच्या उपस्थितीत असतो त्यावेळी त्याने सेक्सच्या विचारांपासून किंवा स्त्री किंवा पुरुषाच्या विचारापासून स्वतःला पूर्णपणे दूर न्यायला हवे.

जो साधक अज्ञानाने किंवा चुकीच्या मार्गदर्शनाने सेक्सची कृती करत असताना ध्यानात जायचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे कृत्य रूपकातील सुंदर घरात सांडपाण्याच्या पाईपमधून प्रवेश करण्यासारखे असते. सेस पूलमधले (सांडपाण्याच्या डबक्यातले) साठलेले मातीयुक्त पाणी पिऊन शुद्ध पिण्याचे पाणी पिण्याच्या आनंदाची अपेक्षा करू नये. उलट श्रीगणेश जे मूलाधार चक्राच्या कमळात बसून सर्व पाहत असतात, ते अशा साधकांना कडक शिक्षा करतात व त्यांना फार त्रास होतो. त्यांची आई एकांतात बाथरूमध्ये स्नान करताना तिथे जाण्याची कोणी इच्छा करू नये. भारतात विहिरी, तलाव किंवा नदी इत्यादी ठिकाणी महिलांच्या स्नानाच्या जागी श्रीगणेशांच्या मूर्तीची विधिवत पूजा करून स्थापना करण्याची सर्वत्र पद्धत आहे. येणाऱ्या जाणाऱ्यांपैकी कोणी स्नान करणाऱ्या महिलांकडे व्यभिचारी दृष्टीने पाहिल्यास श्रीगणेश त्यांना शिक्षा करतात. स्नान करणाऱ्या स्त्रियांच्या पावित्र्याच्या रक्षणासाठी तिथे श्रीगणेशांना स्थापित केलेले असते. पश्चिमेकडे सगळ्या पोहण्याच्या ठिकाणी महिला पोहण्याच्या पोषाखात दिसतात. स्त्रियासुद्धा स्वतःच्या पावित्र्याचा विचार न करता शरीराचे प्रदर्शन करण्यास उत्सुक असतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हे सर्व निष्पाप आहे.

स्वत:ला फसवणारे प्रतिपादन त्यांना चालत असेल, पण त्या श्रीगणेशांना फसवू शकत नाहीत.

चुकीच्या बाजूने प्रवेश करण्याच्या प्रयत्नात असल्याचे श्रीगणेशांना दिसताच त्यांच्या रागाचा स्फोट होऊन ते सोंड जोरात हलवतात. त्याच्यामुळे सिंपथेटिक नाडी संस्था उत्तेजित होऊन शरीरात प्रचंड उष्णतेच्या लाटा उद्‌भवतात. शरीराची आग आणि इतर स्वयंचालित नाडी संस्थेची लक्षणे, कॅन्सर वगैरे श्रीगणेशांच्या क्रोधामुळे उद्‌भवतात. अनधिकृतपणे कुंडलिनी चढविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना जाणवणाऱ्या संवेदनांचे हे स्पष्टीकरण आहे. अशा लोकांना भयंकर अनुभव आल्यामुळे सामान्य लोकांना कुंडलिनी जागृतीचे नांव काढले तरी भीतीने कापरे भरते. अशी पुस्तके वाचणारे लोक ध्यान करण्याची कल्पना उचितपणे सोडून देतात, यात आश्‍चर्य नाही. वास्तविक कुंडलिनी तुमची परमेश्‍वरी आई असून तुम्ही तिचे सर्वात प्रिय मूल आहात. विश्‍वात सगळ्यात जास्त तुमच्यावर तिचे प्रेम आहे आणि तुम्हाला 'दुसरा जन्म' देऊन परम आनंद देण्यात तिला रस असतो. तुमच्याबरोबर पुन्हा पुन्हा जन्म घेऊन ती तुमच्या सॅक्रमच्या त्रिकोणाकार अस्थीमध्ये राहते. तुमच्या त्रासांची नोंद ठेवत, उच्च अवस्थेत उत्क्रांत झालेला गुरू किंवा सहजयोगी भेटण्याच्या प्रतीक्षेत ती असते. फक्त तशाच लोकांना सहज कुंडलिनी जागृत करण्याचा अधिकार असतो. फक्त अशांनाच तिचा स्वयंस्फूर्त प्रतिसाद असतो. दुसऱ्या कोणास नसतो. ती तुम्हाला केव्हाही त्रास देऊ शकत नाही. पण अनधिकारी व्यक्तीने तिच्या एकांतवासात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्यास ती मागे हटून, लाजेने गोठते. जर कोणी भ्रष्ट व खोट्या गुरूने तिच्यावर सेक्स लादण्याचा प्रयत्न केल्यास स्वत:मध्ये रागावून श्रीगणेशांना त्यांचा क्रोध व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देते.

श्रीगणेश निरागस, अबोध निष्पाप बालक आहेत आणि फक्त त्यांनाच कुंडलिनीच्या सान्निध्यात तिच्या एकांतात राहण्याची परवानगी असते. जे

लोक निष्पाप साधकांना अनैतिक व घाणेरड्या सवयी लावून मूर्ख बनवून त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात त्यांना नरकात ढकलले जाण्याचे आधीच (मृत्यूच्या आधी) निश्चित झाले असते. काही वर्षापूर्वी एक तरुण डॉक्टर मला भेटण्यास आले होते. ते, स्वतःला भगवान किंवा देव म्हणविणाऱ्या खोट्या गुरूंच्या व्याख्यानांना गेले होते. जसे त्यांना ब्रेन वॉश (पटवले) केले होते ते पाहून मला धक्काच बसला. छातीठोकपणे (self-conviction) ते माझ्याशी वाद घालत होते, की लैंगिक क्रियेशिवाय सत्याशी एकाकारतेचा अनुभव मिळू शकत नाही. या भगवानाने त्यांना सांगितले होते लैंगिक क्रियेशिवाय आत्मसाक्षात्कार आणि दुसरा जन्म मिळणे अशक्य असते. डॉक्टर असल्याने त्यांना ज्ञान होते की सेक्सशिवाय जन्म होऊ शकत नाही आणि हीच गोष्ट आध्यात्मिक पुनर्जन्माचे बाबतीत असल्याचे त्यांना पटवून दिले होते. मी जेव्हा त्यांना विचारले, की स्वतःची निर्मिती व जन्म घेण्यास त्यांनी सेक्स केले होते का आणि जे ते आहेत ते होण्यास त्यांनी काय केले होते, तेव्हा त्यांना फार आश्चर्य वाटले. त्यांनी मान्य केले की त्यांच्या आई-वडिलांच्या सेक्स लाईफ बद्दल चर्चा करायला आवडेल का? तर काय उत्तर द्यावे हे त्यांना सुचत नव्हते.

हे साधे सत्य आहे, की दुसरा जन्म आणि सेक्स यांचा काहीही संबंध नाही. पण लोकांच्या विशेषतः जे प्रयोगशीलतेच्या मार्गावर बरेच पुढे गेले आहेत, यांच्या हे पचनी पडत नाही. पण स्वतःच्या मुक्तीसाठी चांगला उपदेश लगेच आचरणात आणायला हवा. आधुनिक काळात लैंगिक स्वातंत्र्याच्या झेंड्याखाली अनेक तरुण लोकांनी विकृत आणि भ्रष्ट लैंगिक जीवनाचा अवलंब केला आहे. पुष्कळांनी हे अज्ञानाने केले आहे, पण इतर लोकांच्या बाबतीत भ्रष्टाचार व मानवी जीवनाची अधोगती हे अनैतिक वागण्याचे कारण आहे. साधकाने अशी उघड दिसणारी चूक केली असेल, तर त्याच्या जखमी व आजारी कुंडलिनीला सहजयोग मदत करेल. अशा

साधकांनी वेळेवरच स्वेच्छेने त्यांच्या सवयी बदलल्यास, त्यांचे चित्त जे व्याभिचार करण्याच्या उत्सुकतेने किंवा सवयीने अतिशय भरलेले असते, ते हलके होऊन ते लोक हळू हळू श्रीगणेशांना स्वत:मध्ये स्थिर करू शकतील. अनेक साधक सेक्सचे गुलाम असून त्यांना स्वत:ला बदलवण्याची खात्री नसते किंवा त्यांची इच्छा नसते. ते शेवटच्या अवस्थेला पोहोचले आहेत, अशी त्यांची खात्री असते, पण ह्यात काहीही सुख नसते. अतिविषयासक्तीमुळे ते सामूहिक सुप्त चेतनेतून आलेल्या, वासनामय व घाणेरड्या भुतांच्या ताब्यात गेल्याने विषयसुखाचा उपभोग घेऊ शकत नाहीत.

अंतिम विश्लेषणात हे लक्षात घ्यायला हवे, की उत्क्रांतीची योजना पुढे नेण्यात सेक्सचा कोणताही सहभाग नसतो. सेक्स ही शक्ती नाही, तर सुखाचे अस्तित्व जाणवण्याचे स्थान आहे. ते सुख निर्विचारितेच्या आत्मिक आनंदाचा अगदी लहान कण आहे. श्रीगणेश किंवा सुषुम्ना नाडी यांनी प्रणवाच्या एका कणाचा दशलक्ष भाग सोडल्यावर ते क्षणिक सुख मिळते. प्रणवाची जाणीव झाल्यावर एका सेकंदाचा अंश इतका वेळच निर्विचारिता येते आणि त्या आनंदाची उत्सुकता जागी होते. जिथे प्रणवाची आवश्यकता असते, अशा प्रत्येक चक्रावर हे घटित होते. मूलाधार चक्राबाबतीत एवढाच फरक आहे, की ते मज्जारज्जूच्या बाहेर असल्याने अगदी थोडा क्षणभर प्रणव सोडल्याचे जाणवते. बाकी चक्रांवर ते जाणवत नाही. श्रीगणेशांना सेक्स समजत नाही. ज्या ज्या वेळी सेक्सची क्रिया चालल्याचे त्यांना समजते, तेव्हा ते निरागसपणे प्रणव सोडतात, त्यांचा क्रोध सुद्धा निरागस असतो. त्यांना फक्त एवढेच ज्ञात आहे, की त्यांच्या आईची त्यांना आज्ञा आहे, की मागील दरवाजाने कोणासही त्यांच्या आईच्या मंदिरात सोडायचे नाही.

संपूर्ण आत्मसाक्षात्काराच्या अवस्थेत मेंदूतील संपूर्ण लिंबिक एरिया (सहस्रार) प्रणवाने भरली जाते. माकडांच्या मेंदूवर प्रयोग करण्यात आले

आहेत. त्याच्यात त्यांची लिंबिक एरिया उत्तेजित करण्यात आली होती. या भागाची अगदी थोडी उत्तेजनाही माकडांना प्रचंड आनंद देते असे आढळले आहे. यामुळे संपूर्ण साक्षात्कारी जीवांना सेक्सच्या शारीरिक किंवा मानसिक क्रियेत का रस नसतो हे समजू शकते. ते संपूर्ण आत्मनंदात सदा सर्वकाळ चिंब भिजलेले असतात. ही एक चिरंतनाची आणि आनंदाची अवस्था असून त्या अवस्थेत जीवनाचे नाटक साक्षीभावाने पहात अस्तित्वाच्या अवस्थेचा परम आनंद माणूस घेत असतो. आत्मसाक्षात्कारानंतर सर्व मानवी कार्ये आनंदमय होतात.

जे दुसऱ्या कार्यात व उच्च स्थिती मिळविण्याच्या कार्यात रुची घेतात त्यांची सेक्समधली आवड हळूहळू कमी झाल्याचा अनुभव येतो. त्यांची मूलभूत नैसर्गिक प्रेरणा अशी शांत होते की त्यांचे चित्त वरच्या केंद्रावर जाते. त्यांना चिंतन, चित्रकला, गायन किंवा तशा इतर कार्यात सुख मिळते. पण हा सिंपथेटिक नाडी संस्थेच्या कार्याचा परिणाम असतो. म्हणून ही कार्ये त्यांना आत्मानंद प्रदान करीत नाहीत, तर फक्त गैरवर्तन व विषयासक्ती यांच्यापासून दूर ठेवतात. या कार्यात जास्त सहभाग घेतल्याने माणसाची अहंकारी प्रवृत्ती होते. त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या बरोबर वागताना तो आक्रमक बोलतो किंवा कृती करतो. तो हट्टी स्वभावाचा आणि आक्रमक होतो. असे लोक भयंकर वाईट बॉस, मित्र, सहकारी, पती किंवा पत्नी होतात.

लैंगिक सुखांपासून पलायन करणाऱ्या लोकातसुद्धा अशीच स्वाभाविकता (phenomenon) दिसून येते. जबरदस्तीने ब्रह्मचर्याचे पालन अनैसर्गिक असते. खोट्या तार्किकतेने जे लोक त्याचे पालन करतात ते मध्यमार्गातील सामान्य जीवनापासून विचलित होतात. सर्व धार्मिक संस्थांच्या इतिहासात असे लोक जुलमी व वाईट प्रकारचे परपीडक (सॅडिस्ट) असतात. ते मंद व दुसऱ्याला आजारी करणारे लोक असतात. कृत्रिमतेने सेक्सपासून दुसरीकडे चित्त नेल्याने त्यांच्या प्रेमाच्या गुणवत्तेत

पोकळपणा किंवा कोरडेपणा निर्माण केला जातो. ते स्वत: कशाचा आनंद घेत नाहीत आणि इतरांना घेऊ देत नाहीत. म्हणून, जे सेक्सचे पावित्र्य मलिन करतात ते स्वत:ला छळतात, तर दुसऱ्या बाजूस सेक्सपासून पळणारे लोक दुसऱ्यांना छळतात. दोन्ही प्रकारात एकंदरीत परिणाम हाच असतो की त्यांना सेक्सचा टिकावू आनंद मिळत नाही आणि हळूहळू दोन्ही लोक नपुंसक व आजारी होतात.

अनेक मानसशास्त्रज्ञ, ज्यांनी लैंगिक स्वातंत्र्य आणि बंधने यांच्यावर लिहिले आहे, त्यांचे जुने सिद्धांत मानवी स्वभावाच्या अपूर्ण ज्ञानावर आधारित आहेत. त्यांना फक्त डाव्या सिंपथेटिक नाडी संस्थेचे ज्याला सायकी म्हणतात, याचेच ज्ञान आहे. जर विषयसुखाच्या लोलुपतेमुळे समाधान मिळत असते तर अशा लोकांच्या मनातून सेक्सची क्रिया आणि त्यांच्यातील रुची कमी होत संपली असती. हे सुखी विवाहित जोडप्यांचे बाबतीत, ज्यांना चांगली मुले झाली आहेत, त्यांच्या बाबतीत होते. मृत्यूपूर्वी ते नपुंसक किंवा असामान्य (abnormal) होत नाहीत. तर ते प्रगल्भ असतात व सेक्सचा फार विचार करीत नाहीत. मानसशास्त्रज्ञांना हे माहिती नाही, की डाव्या किंवा उजव्या सिंपथेटिक नाडी संस्थेवर ताण देणारे लोक शेवटी मधोमध असलेल्या पॅरासिंपथेटिक नाडी संस्थेच्या मधल्या सुषुम्ना नाडीशी असलेले कनेक्शन तोडतात.

मुलांना लैंगिक शिक्षण देण्याची गरज नाही. त्याच्यामुळे सेक्सला नको तेवढे महत्त्व दिले जाते. प्राण्यांना सेक्सचे शिक्षण मिळत नाही, पण ते सर्व कशाबद्दल याचे ज्ञान त्यांना असते. सेक्सची क्षमता (faculty) मुलांना जन्म देण्यासाठी असून केवळ शरीर सुखासाठीच नसते. एवढा गाजावाजा करण्यासारखे त्यात काही नाही. मुले वयात आल्यावर आई-वडिलांनी मुलांना योग्य प्रकारे, खाजगीत आणि सभ्यपणे (decently) लैंगिकतेबद्दल सर्व काही समजवावे. लैंगिकतेबद्दल पाश्चात्य देशात जेवढे बोलले जाते ते

सर्व लहान मुलांची निरागसता नष्ट करण्यास किंवा धोक्यात आणावयास जबाबदार आहे. त्याचा परिणाम समाजात ज्या बेजबाबदार व अज्ञानीपणाने मुलांची निरागसता सांभाळली जाते त्याच्यात दिसून येतो.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत, माणसाला सेक्सच्या क्रियेत जाणिवेतील निर्विचार अवस्थेची एक झलक अनुभवायला मिळते. त्या प्रकारे आनंदाच्या कल्पनेशी त्यांची ओळख होते. काही उत्क्रांत लोक आनंदाची कल्पना इतर मार्गातून (sources) मिळवतात आणि त्यांना सहजयोगी होण्यास सेक्सची अजिबात गरज नसते. शिवाय मुले निरागस असल्याने आत्मसाक्षात्कारासाठी सर्वात योग्य असतात. यावरून असे सिद्ध होते, की आत्मसाक्षात्कार घटित होण्यात सेक्सविषयक ज्ञानाचा कोणताही सहभाग नसतो.

पाच वर्षाची होईपर्यंत मुलांचे अहंकार व प्रतिअहंकार पूर्ण वाढलेले नसतात. त्या काळातच मुलांमध्ये प्रेमाच्या नैसर्गिक भावनेच्या गुणवत्तेत उच्च अवस्थेची जाणीव भरणे (इंजेक्ट) कार्यान्वित करता येईल. या वयापर्यंत टाळू पूर्णपणे कॅल्शियमने भरलेली नसते आणि मूल परमेश्वरी प्रेमाच्या सर्वोच्च सर्वव्यापी शक्तीशी पुष्कळच संलग्न असते. या वयात मूल त्याची आई किंवा बहिण, काकू, आजी वगैरे नातेवाईक महिलांच्या जवळ झोपले तर त्याच्यात पवित्र नात्यांची उच्च जाणीव विकसित होते. त्या नात्यात सेक्सचा विचारही येत नाही आणि त्याचा सेक्सशी कोणताही संबंध नसतो. हे मुलगा किंवा मुलगी दोघांच्याबाबतीत सारखेच असते. परमेश्वरी प्रेमाशी एकरूप झाल्याने चित्त, अनुभवाच्या सर्व विशुद्ध आणि सर्वोच्च अवस्थांना स्पर्श करते आणि त्या मुलात सुखी निरागसतेच्या सुंदर भूतकाळाच्या जाणिवा (स्मृती) साठल्या जातात.

जे लोक स्वत:च्या आई किंवा वडीलांबरोबरच्या लैंगिक संबंधावर अविचारीपणाने बोलतात त्यांना लहान वयातच काही वाईट अनुभव आले

असावेत. अशा माणसांवर त्यांच्या दुराचारी आई-वडिलांचा किंवा निम्न स्तरावरच्या समाजाचा प्रभाव असतो आणि त्या प्रभावामुळे ते लैंगिक विकृतीने मस्त असतात. असे लोक अपवादानेच आढळतील. पण अशा आजारी व्यक्तींना (केसेसना) अनावश्यक महत्त्व दिल्याने ते अपवाद न राहता नियम होतात. दुर्दैवाने अशा सर्व दिशाभूल झालेल्या उद्योगांनी सर्वसामान्य प्रकाशित माणसाला अनैसर्गिक आचरणांना प्रवृत्त केले जाते. अशा व्यक्तींची औद्योगिक दृष्ट्या प्रगत समाजाकडून स्तुती केली जाते. असे प्रगत समाज पूर्णपणे आणि पक्के, उत्क्रांतीच्या मार्गाच्या विरोधात असतात. धर्माचे बाबतीत गोंधळात व अस्वस्थ असलेल्या माणसांची वर्तणूक पशूंपेक्षाही वाईट असते. प्राणीसुद्धा प्रजोत्पादनासाठी आणि काही बंधनात राहून विषयोपभोग करतात. तर माणसांनी योग्यायोग्यतेच्या व धर्माच्या सर्व जाणिवाच हरवल्या आहेत.

एक जुने व पुन्हा पुन्हा ऐकवले जाणारे कारण नेहमी पुढे केले जाते की इच्छापूर्तीवर बंधने घातल्याने प्रतिअहंकार (सुपर इगो) बनण्याची स्थिती तयार होते. यापूर्वी समजावल्याप्रमाणे अतिविषयोपभोगामुळे अहंकार कंडशन्ड होतो, विभारित होतो. दुर्दैवाचा भाग असा, की अहंकाराचे कंडिशनिंग आपोआप समजत नाही. अशा केसेसमध्ये अहंकार फारच वाढतो आणि मानसशास्त्रज्ञ आणि त्यांचे रुग्ण यांना ते जाणवत नाही. अहंकारी व्यक्ती जुल्मीपणाने किंवा क्रूर मनोरुग्णासारखी वागू लागते तेव्हा ते समजते. इगो कंडिशनिंगने होणारे नुकसान सुपर इगो कंडिशनिंगपेक्षा, ज्याला सुप्त चेतनेचे दमन असे सामान्यपणे म्हटले जाते, फारच जास्त असते.

मध्यमार्ग हा सूज्ञतेवर बसलेला फलक्रम (आधार) आहे. माणसाच्या लैंगिक प्रवृत्तीचे अर्धवट ज्ञान एकांगी व धोकादायक असते. शिवाय मानसशास्त्रज्ञांचे रुग्ण, जे सर्वसामान्य लोकांपेक्षा बिघडलेले असतात, अशा लोकांची माहिती नॉर्मल लोकांचे बद्दल निर्णय घेण्यास उपयोगी पडत नाही.

काही लेखक, मानसशास्त्रज्ञ व शास्त्रज्ञ असल्याचा दावा करतील, पण सामान्य लोकांपेक्षा बिघडलेल्या लोकांचे निरीक्षण करून जी गृहीतके त्यांनी सांगितली आहेत, ती धार्मिक ग्रंथातली सत्ये समजू नयेत. त्याच्यामध्ये सुद्धा त्यांच्या स्वत:च्या व्यक्तित्वाचे गंड (उदा.न्यूनगंड, अहंगंड) असतील. कधी कधी आपल्या सिद्धांतावरून ते त्या गंडांचे समर्थन करण्याचा प्रयत्न करतात आणि काही वेळेस उत्साहाच्या भरात सामान्य लोकांपेक्षा बिघडलेल्या लोकांवरच्या निरीक्षणांचे ते साधारणीकरण करतात (त्यांना तत्त्वाचे स्वरूप देतात) जणू काही ते निष्कर्ष विस्तृत व सर्वसमावेशक मानवी समाजाला लागू आहेत.

आधुनिक काळात मानसशास्त्र बरेच प्रगत झाले आहे. मानसशास्त्रज्ञ लैंगिक विकृतींची निंदनीयता समजतात. पण आरंभीच्या मानसशास्त्रज्ञांनी समाजाची सत्याच्या आणि धर्माच्या मार्गापासून इतकी घसरण केली आहे, की समाजाला पुन्हा योग्य मार्गावर आणणे फार अवघड झाले आहे. ही घसरण, ज्या मानसशास्त्रज्ञांमुळे झाली आहे, त्यांच्याही समजण्याच्या फार पलीकडे गेली आहे. मानसशास्त्र आता इतके प्रगत झाले आहे, की ते आता, करुणा, प्रेम, मनोमिलन अशा गोष्टी बोलू लागले आहेत. काही मानसशास्त्रज्ञ निम्नस्तरीय जाणीव (Lower Self) किंवा व्यक्तित्व व उच्चस्तरीय जाणीव किंवा व्यक्तित्व (Higher Self) अशा गोष्टींवरही बोलतात, पण त्यांच्या पूर्वी आलेल्यांनी लोकांना आधीच सेक्सचे गुलाम बनवून ठेवले आहे आणि आता त्यांचे वंशज वेश्या किंवा बलात्कारी असतील. मानसशास्त्रज्ञांच्या, माणसाबद्दलच्या अर्धवट ज्ञानामुळे पश्चिमेकडे कौटुंबिक जीवन आणि समाज उद्ध्वस्त झाला आहे. मानवी व्यक्तित्व फार सुंदर व मौल्यवान आहे, पण मानसशास्त्रज्ञांनी अपरिपक्वतेतून माणसांवर केलेल्या प्रयोगांमुळे (novice experiment) लोकसंख्येचा मोठा भाग सेक्सवेड्या आणि लैंगिक गुन्हेगारांचा असणार आहे.

याव्यतिरिक्त बहुतेक सर्व मानसशास्त्रज्ञ मनोरुग्णांच्या संपर्कात असतात आणि मनोरुग्ण शरीरातून बाहेर फेकलेल्या, दुराचारी व वासनामय, सामूहिक सुप्त चेतनेतून आलेल्या मृतात्म्यांना आपल्यामध्ये ठेवतात. अशा त्यांच्या भूतबाधित रुग्णांकडून मानसशास्त्रज्ञांनासुद्धा मनोविकारांची लागण होऊ शकते. अजून एक कारण म्हणजे मानसशास्त्रज्ञांना स्वत:चे रक्षण करण्याचे ज्ञान नसल्याने ते स्वत: भूतबाधा होऊन आजारी पडतात. त्यांना बाधा टाळण्याची सहजयोगाची पद्धत माहिती नसते. काही वेळेस ते स्वत:च दुष्ट, पण बुद्धिमान (evil geniuses) लोकांप्रमाणे वागू लागतात, की त्यांच्या रुग्णांना आश्चर्य वाटते. प्रत्येक मानसशास्त्रज्ञाला आत्मसाक्षात्कारी जीव होणे आणि सहजयोगाची साधना करून येशू ख्रिस्त आचरत असलेले विनासायास (spontaneous) भूतबाधा निवारण करणे शिकण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे स्वत:ला कसे सुरक्षित ठेवावे व रुग्णांना व्याधीमुक्त कसे करावे, शिकावे. सर्वसामान्य लोकांच्या अनेक पैलू असलेल्या सूक्ष्म व्यक्तित्वांचा अभ्यास करणेही महत्त्वाचे आहे. तसेच त्यांनी परमेश्वराच्या सर्वात सुंदर निर्मितीचा, सहजयोग्यांचा, सामूहिक अचेतनात उन्नत झालेल्यांचा अभ्यास करावा.

भारतातून पश्चिमेकडे आल्याने मला हे समजत नाही, की अशा थंड हवामानात राहणाऱ्या लोकांच्या पोशाखाच्या इतक्या विक्षिप्त सवयी का असाव्यात. पाश्चात्त्य स्त्रिया शक्य तितके जास्त शरीर प्रदर्शन करण्याची कारणं सतत शोधत असतात. अगदी गोठवणाऱ्या हवामानातसुद्धा! पुस्तकात प्रसिद्ध झालेले इतक्या लवकर त्या स्वीकारतात, की जणु काही पुस्तकात निखळ सत्य लिहिले आहे. अनेक लोकांनी लिहिले आहे, की कपडे घालून झोपणे अडचणीचे आहे. म्हणून विवस्त्र होऊन झोपणे ही सर्वसामान्य सवय आहे. आपल्याला काय अडचणीचे आहे व काय सोयीस्कर आहे, ते शोधून काढणे हे आपल्याबद्दलचे आपले कर्तव्य नाही

का? झोपण्यासाठी विवस्त्र होणे हे भारतात कोणी स्वप्नातही पाहणार नाही. झोपतांना विवस्त्र होण्याची अजिबात आवश्यकता नसते. या विक्षिप्त सवयीमुळे मुलांना आई-वडिलांच्या बिछान्यात जाण्याची परवानगी नसते आणि त्यामुळे त्यांच्यात एक वाईट प्रकारचा गंड निर्माण होतो. नाजूक लहान वयात, त्यांना प्रेम देण्याची, जवळ घेण्याची, गळ्यात हात टाकण्याची फार गरज असते. पण पाश्चात्त्य लोक मुलांना फार शिस्त लावतात. ते स्वतः कठोर आई-वडील असतात आणि मुलांनी जन्मापासूनच अचूक, सर्वगुणसंपन्न असण्याची अपेक्षा करतात. अशी मुले मोठी झाल्यावर ड्रग्जच्या आधीन व हिंसक होतात, यात आश्चर्य नाही. आई-वडिलांनी सेक्सला प्रमाणाबाहेर महत्त्व दिल्याने मुलांची निरागसता पूर्ण उध्वस्त होते.

अलीकडेच अमेरिकेत मला एक महिला भेटली होती. माझ्या कार्यक्रमात तिने आपल्या मुलाला आणले होते. फार तर बारा वर्षाचा मुलगा असावा. अगदी लहान वयातच तो ड्रग्ज घेऊ लागला होता आणि आता तो व्यसनी बनत होता. या उद्ध्वस्त झालेल्या मुलाकरता माझे हृदय प्रेमाने भरून आले. मी त्याला जवळ घेतले. त्याची पापी घेतली व मिठीत घेतले. मी माझे प्रेम व्यक्त करीत असताना त्याला फारच आवडत होते. तो म्हणाला, त्याच्या आईने त्याच्यावर असे प्रेम कधीच केले नाही आणि अशाप्रकारे तिने प्रेम व्यक्त केल्याचा एकही प्रसंग त्याला आठवत नव्हता. मला समजले की त्या स्त्रीकडे दोन कुत्री व तीन मांजरे होती. ती त्या महिलेच्या शयनकक्षात झोपायची आणि बिचारा मुलगा तान्हे बाळ असल्यापासून दुसऱ्या खोलीत झोपायचा. मी तिला विचारले, की इतक्या निष्ठुरपणे ती मुलाशी का वागली. तिचे उत्तर होते की एक विशिष्ट मानसशास्त्राचा सिद्धांत ती आचरत होती. त्याची अशी शिकवण होती, की ती नग्न झोपत असल्याने मुलाला जवळ घेऊन झोपल्यास तिच्यात

अपराधीपणाचा गंड वाढेल. तिच्या बुद्धीची व सूज्ञतेची कमतरता पाहून मी थक्क झाले. आईच्या प्रेमाबद्दलची अशी हास्यास्पद समजूत परमेश्वराच्या समजण्याच्या पलीकडची आहे. असे अनेक बळी प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व डॉक्टरांनी प्रसृत केलेल्या हास्यास्पद व गृहीतकांवर आधारित कल्पनांनी घेतले आहेत. या मानसशास्त्रज्ञ व डॉक्टरांनी पुस्तकामागून पुस्तके लिहिली आहेत. पुस्तक प्रसिद्ध करायला काय लागते? बेजबाबदार लेखकांनी त्यांच्या बरोबरच्या लोकांचे किती नुकसान केले आहे याची कल्पना करा!

आजच्या आधुनिक मानव समाजात वेश्या व्यवसाय राक्षसी मर्यादेपर्यंत वाढला आहे. प्रयोगशीलतेच्या नावाखाली माणसांनी व्यभिचार सुरू केला आहे. त्यांना वाटते, की त्यांचे प्रयोग बाहेरच्या शरीरावर असून ते त्यांच्या अंतरंगातील पवित्र स्थानाला स्पर्श करणार नाहीत. प्रयोगशाळेत ॲसिड घेऊन प्रयोग करताना ते तुमच्या बाहेर असतात, तरी काळजी घेताच नां? प्रयोगाच्या नावाखाली तुम्ही ॲसिड आतमध्ये (पोटात) घ्याल का? सहजयोगाच्या प्रयोगात हे सहजच दाखवता येते, की सेक्सचे गुलाम असलेले साधक कुंडलिनी गोठली असल्याची भयंकर लक्षणे दाखवतात. त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला तरीसुद्धा कुंडलिनी पूर्ण जागृत अवस्थेत राहत नाही. जणू काही तिच्या बरोबर गैर वागल्याने ती गोठलेली आहे किंवा मरणप्राय घाबरलेली आहे आणि अपमानित झाली आहे.

टाळूचा भाग कॅल्शियमने भरल्यामुळे सत्याशी संपर्क तुटून माणसाची संलग्नता विश्वाशी तुटलेली आहे आणि तो स्वतंत्र झाला आहे. त्याला स्वतंत्र झाल्याचे आणि नरकात जाण्यास आपण मोकळे आहोत असे वाटते. जिथे स्त्री आणि पुरुष यांच्यात नातेसंबंधाचे पावित्र्य नाही तिथे वैवाहिक जीवन कधीच यशस्वी होऊ शकत नाही. भंगलेली कुटुंबे आणि बेघर झालेले लोक यांच्याबद्दल सध्या बरीच चर्चा होत असते. जणू काही या प्रश्नावर तोडगा म्हणून सर्व पाश्चात्त्य समाजात सरकारने गर्भपाताला कायद्याने

मान्यता दिलेली आहे. ही आधुनिक युगाची अजून एक प्राप्ती आहे, पण ती जवळ जवळ कायदेशीर हत्याच आहे. मी पुढे विशद करणार आहे, की सहजयोग साधनेने लोकसंख्या नियंत्रित ठेवता येईल.

सध्याचा स्वैराचार सुरुवातीच्या पाश्चात्त्य मानसशास्त्रज्ञांमुळे असला, तरी वास्तवात त्याचे कारण हे आहे, की ज्या व्यावसायिकांना लोकांच्या मानसिक कमजोरीचा फायदा घेऊन पैसा मिळवायचा आहे, त्यांनी व्यावसायिक कल्पना तशा पद्धतीने राबवल्या आहेत. औद्योगिक दृष्ट्या प्रगत समाजाची जीवनमूल्ये मानवी जीवन स्वस्त, सवंग आणि आर्थिक शोषणास पूरक बनवतात.

सर्वसामान्य मानवात लैंगिक भावना नैसर्गिक असून जीवनाची प्रत (क्वालिटी) सौम्य व संतुलित असावी. मानव मुळातच प्राणी आहे, हे सत्य आहे, तर हे पण सत्य आहे, की जाणिवेच्या उच्च पातळीवर तो जन्मला आहे आणि त्याला अधिक उच्च पातळीवर उत्क्रांत व्हायचे आहे. उत्क्रांतीच्या नैसर्गिक ओघात मानवात प्रोग्रॅम घातलेला आहे, हे उघड आहे, की माणसाची जी निर्मिती झाली ती त्याच्या जंगली आणि माणसाच्या खालच्या स्तरावरील पूर्वजांच्या तुलनेने शुद्ध व सुसंस्कृत प्राणी म्हणून झाली. जसे आपण आपल्याला आपल्या पूर्वजन्माची आठवण करून देतो आणि ते नैसर्गिक आहे, असे म्हणतो, ते असे असते, की जणू काही त्याचा आपल्याला गर्व असून आपण फुशारक्या मारतो. जे काही नैसर्गिक आहे, ते नेहमीच चांगले असते असे जरूरी नाही. उदा. असा कोणीच युक्तिवाद करणार नाही की एखाद्या माणसाचा संतापी असण्याचा कमकुवतपणा त्यांच्यासाठी नैसर्गिक व चांगला आहे. परंतु व्यक्ती सेक्सच्या बाबतीत कमकुवत मनाची असेल, भेटेल त्या स्त्रीबरोबर फ्लर्टिंग करेल, तर त्याला समाजाची मान्यता आहे. कारण ते नैसर्गिक असल्याने, प्रकाशित मानवी वागण्याच्या सर्व सुसंस्कृत नियमांच्या अनुसार त्याला विरोध केला जाऊ

नये. आपला भूतकाळ नैसर्गिक असेलही, पण भूतकाळात घसरत जाणे मानवाचे ध्येय आहे कां? काही बलात्कारी त्यांच्या गुन्ह्याचे असे सांगून समर्थन करतात, की बलात्कारित व्यक्तीने चिथावणी देऊन त्यांना उत्तेजित केले, काही पुरुष प्रत्येक लाल कापडावर धडक मारणाऱ्या, संतापलेल्या बैलाप्रमाणे असतात. कोणत्याही स्त्रीने इंचभर शरीर दाखवले तरी ते उत्तेजित होतात. पुरूष प्रगल्भ होऊन त्यांच्या शुद्धाचरणाचा केव्हा सन्मान करणार?

माणसाच्या नियतीचा वेगळाच कार्यक्रम असतो. आपले ध्येय साध्य करणे आणि आत्मसाक्षात्काराने आपल्या अस्तित्वाचा आनंद घेणे ही आपली नियती असून त्याच्यासाठी आपण सज्ज व संघटित असतो. बैलापेक्षा अधिक काही नसलेल्यांनी सहजयोगाकडून जास्त अपेक्षा ठेवू नये. सहजयोग हा उत्क्रांतीच्या मार्गावर जाणीवपूर्वक पुढचे पाऊल टाकण्यासाठी आहे, मागे एकटे राहण्यासाठी नाही. सद्गुण आणि श्रीगणेशांप्रती भक्ती आणि शरणागती यांच्याशिवाय आत्मसाक्षात्कार प्रस्थापित होणार नाही. निष्पाप राहण्यास कोणताही प्रयत्न करावा लागत नाही. ते सोडून सगळ्यासाठी प्रयत्न करावा लागतो.

भूतबाधा आणि आपल्या माध्यमातून लैंगिक सुखाचा उपभोग घेणाऱ्या मृतात्म्यांच्याबद्दल आपण बोलतो तेव्हा आपली बौद्धिक क्षमता, आपल्या स्वत:च्या भ्रष्ट वागण्याच्या जबाबदारीपासून आपले पलायन करवते. प्रथमच असा मानसिक कमकुवतपणा नसता तर हे मृतात्मे मनात घुसलेच नसते. जी माणसे सहजयोगातून लैंगिकतेविषयी व्यभिचारी प्रवृत्ती सोडतात त्यांच्यात या मृतात्म्यांना रुची राहत नाही. परिवर्तन झालेले साधक मृतात्म्यांना सुखाचा भ्रष्ट पद्धतीने उपभोग घेण्याची थोडीसुद्धा संधी देत नसल्याने मृतात्मे अशा साधकांच्या मनातून निघून जातात. आपल्यातला दोष समजण्याची आता वेळ आली आहे. ही स्वत:वरची टीका आपण खुल्या मनाने स्वीकारली तर आपण स्वत:चे परिवर्तन करू शकतो. स्त्री-

पुरुषांच्या स्वैराचारी जीवनाने सूज्ञतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. अनेक मार्गांनी त्यांनी मानव धर्म नष्ट करणे जमवले आहे आणि सर्व बुद्धिमत्तेच्या उपयोगाने माणसाची अंगभूत प्रतिष्ठा खालच्या पातळीवर आणावयाची व मलिन करण्याची नवीन शस्त्रे तयार करीत आहेत.

आधुनिक समाजात कॅबरे डान्सरला देवीचे स्थान मिळाले आहे. अशा स्त्रियांना नग्न सौंदर्य म्हणून आपण नग्न होण्याचा गौरव करतो. खरोखर आपण स्त्री प्रतिष्ठा स्वस्त करण्याचे समर्थन करण्यात हुशार आणि चलाख झालो आहोत. आधुनिक समाज विरोधाभासपूर्ण आहे. जाहिरात उद्योगासमोर मुख्य प्रश्न हा आहे, की असभ्य व अश्लीलतेसंबंधी कायद्याचे उल्लंघन न करता स्त्रियांच्या नग्नतेचे चित्रण कसे करायचे. मानवाने बनवलेले कायदे फार तोकडे पडतात. कायदे करणाऱ्यांच्या उद्देशाला स्त्रियांचा वापर करणारे, त्यांच्या धूर्तपणाच्या पद्धतींनी, सहजच बगल देतात. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जोपासना करण्यास कायदे योग्य वातावरण निर्माण करू शकत नाही. कायदा एवढीच अपेक्षा करतो, की आम्हाला मान डोलावून सम्मती देण्याचा सन्मान मिळावा. त्यामुळे आता कायद्याची भीती राहिली नाही. पूर्वेकडच्या सौंदर्यशीलतेच्या (aesthetics) जगात नग्नतेला संपूर्ण सौंदर्य म्हणून केव्हाच ओळखले जात नव्हते. जपानी, चिनी व भारतीय संस्कृतीत कायम असाच विश्वास असायचा, की मानव-निर्मित सौंदर्य आणि परमेश्वर किंवा निसर्ग-निर्मित सौंदर्य यांच्या मिलापातून खरे सौंदर्य निर्माण होते.

जपानी व चिनी लोकांनी कलाकारांचे सौंदर्य दर्शविण्यासाठी अप्रतिम किमोनो (सैल पायघोळ कुर्ता) डिझाईन केले. आश्चर्यकारक मानवी मनाची, ती सृजनशीलता आणि परमेश्वराने घडवलेल्या मानवी शरीराचा गौरव वाढवणाऱ्या मानवी हृदयाची अभिव्यक्ती होती. ते किमोनो कवितेच्या कडव्यांप्रमाणे आहेत. जसा निसर्ग भूमातेला विविध ऋतूंनी सजवतो तसे ते

किमोनो स्त्रीच्या स्त्रीत्वाला झाकतात. जेव्हा आदिमाता भारतीय स्त्री म्हणून अवतार घेते तेव्हा तिला साडीची भेट देतात, ते तिच्या डौलदार व मातृत्वाच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्व देण्यासाठी असते. भारतीयांच्या समजुतीप्रमाणे आदिशक्ती त्यांच्या उरोजातून, जे त्या साडीने झाकतात, पृथ्वीला समृद्धी आणि गोलाईचे गुण प्रदान करतात. त्यांच्या पूजनात, जिथे त्या मूल धारण करतात ते पोट झाकण्यासाठी साडी दिली जाते. भूमिमाता स्वत:ची लज्जा राखण्यास, आपले शरीर निसर्गाने कसे झाकून घेते, याचे वर्णन भारतीय कवी करतात. अशाप्रकारे ती लज्जेने पूर्ण अशी माता या स्वरूपात स्वत:ला पवित्र बनवते.

भारतीय स्त्रियांनी भीषण युद्धात, स्वत:च्या लज्जेला आक्रमणापासून वाचवण्यासाठी जोहार करून मरण पत्करल्याच्या अनेक घटना आहेत. आधुनिक काळात पश्चिमेकडे बलात्काऱ्यांपासून स्त्रियांच्या रक्षणासाठी, खास अधिकाराचे कायदे आहेत. तेव्हा आजसुद्धा - लज्जा, पावित्र्य (चॅस्टिटी) हे शब्द इतकी मृत गोष्ट नाही. यावरून असे सिद्ध होईल, की माणसात ही भावना नेहमीच अंगभूत होती, की लैंगिकतेला पावित्र्याची (sanctity) जोड देण्याची आवश्यकता असते आणि ती मिळाल्याशिवाय मानवाच्या पूर्ण आनंदाच्या संवेदनांना ते मान्य होणार नाही. (मानवाला त्याचा पूर्ण आनंद मिळणार नाही.)

या शतकाच्या शेवटी, पूर्वीच्या मानसशास्त्रज्ञांनी जे सिद्धांत मांडले होते. त्यांना इतक्या लवकर मान्यता मिळाली, की त्यांच्यामुळे मानवी व्यक्तित्व केवळ लैंगिकतेपुरतेच राहण्याइतके खालच्या पातळीवर आले. जणु काही लैंगिकतेचे सुख उपभोगायलाच फक्त माणूस जगात आला आहे. या आरंभीच्या मानसशास्त्रज्ञांनंतर मानसशास्त्र पुष्कळच प्रगत झाले आहे, पण जे काही नुकसान झाले आहे त्याच्यामुळे समाजाची गाडी रुळावरून घसरली. त्यामुळे मानसशास्त्रज्ञांनी केलेल्या प्रगतीची माहिती नसलेले

पुष्कळजण त्यांचा द्वेष करतात आणि त्यांना राक्षस म्हणतात, यात आश्चर्य नाही. मानवाची प्रतिष्ठा इतकी मलिन व निम्नस्तरीय झाली आहे, सुंदर पृथ्वीचे मजा करण्याच्या नरकात रूपांतर झाले आहे. काही कवी आणि नाटककार यांनी सुचवले आहे, की ख्रिस्त आणि त्यांच्या आईचे अनैतिक प्रेम होते. अशा लोकांनी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. लोक इतके धादांत खोटे आरोप करण्याइतक्या खालच्या थराला कसे जातात आणि बुद्धिमान लोकांना ते कसे चालते? मानवी धर्माच्या सौंदर्यावर होणारे हे आघात पूर्णपणे थांबवण्याची वेळ येऊन ठेपली आहे. हे दुसरे काही नसून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली विकृत लोकांनी सद्‌गुणी व धार्मिक लोकांच्या निरागसतेवर केलेले बालिश व मूर्ख आक्रमण आहे.

आधुनिक सामाजात गरीब, धार्मिक व सद्‌गुणी लोकांना मंदबुद्धीचे व कमी समजले जाते आणि त्यांना अशा समाजात स्थान नाही. कॉकटेल पार्टीत नम्रपणे मद्यप्राशनास नकार देणे शिष्टाचाराच्या विरोधी वागण्याचा अतिरेक समजला जातो. त्याच्यासाठी खोटे कारण सांगावे लागते अन्यथा मद्यप्राशन करणारे दुखावले जातात. त्या पार्टीत कोणी फ्लर्ट केले तर त्याने कोणीही दुखावले जाणार नाही. अशा समारंभात पावित्र्य आणि ईश्वरत्व यांच्याबद्दल शब्दही काढायचा नाही याची विशेष काळजी घ्यावी लागते. मद्यप्राशनावर त्यांनी शास्त्र तयार केले आहे. माणसाने ज्या प्रकारे मद्यप्राशनाच्या व्यर्थ सवयीची स्तुती केली आहे, की त्यांच्या शहाणपणावर कोणीही प्रश्न उपस्थित करू शकत नाही. प्रत्येक वेगळ्या प्रकारच्या मद्यासाठी वेगळ्या आकाराचे प्याले त्यांनी डिझाईन केले आहेत. या मद्यपी लोकांच्या समाजाचे काटेकोरपणे शिष्टाचार पाळावे लागतात. अल्कोहोल आपली जाणीव कमी करतात आणि म्हणून मानवी धर्माच्या ते विरोधात आहे, हे समजण्यासाठी फारशी बुद्धिमत्ता लागत नाही. समाजाची फारच दु:खद अवस्था आहे. एक पापी दुसऱ्याला दुराचार आणि नरकाच्या

दलदलीत खेचतो. धार्मिक व्यक्ती जीवनाच्या आरंभी अशा वर्तणुकीच्या विरोधात आवाज उठवतो, पण शेवटी तो शांत होतो, जसे एका शहाण्या माणसाच्या नशीबात वेड्याच्या इस्पितळात राहणे आल्यावर, जे आहे ते स्वीकारणे अधिक सूज्ञपणाचे आहे, असे तो समजतो.

अशा खालच्या स्तरावर आणणाऱ्या पद्धती समाजात लवकर रुजतात. स्वैराचारी वागण्याला पाठिंबा देणाऱ्यांना स्वत:च्या कमकुवतपणाचे समर्थन करायचे असते. त्यांच्या दोषांसकट जगण्याचा त्यांचा हा एकच मार्ग असतो. त्यांच्या विकृत विचारसरणीचे तर्कावर आधारित समर्थन करून त्यांच्याशी जुळणारा (त्यांच्या वागण्याशी जुळणारा) समझोता (Compromise) तयार करतात आणि त्या समझोत्यामुळे त्यांच्याच पद्धतीच्या अध्यात्मातील, त्यांना सलणाऱ्या गोष्टीबरोबर ते शांततेत राहू शकतात (त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकतात.)

भारतातही काही असे विकृत राजे होते ज्यांनी त्यांच्या विकृतीची स्मारके उभी केली. दुर्दैवाने त्यांच्याच मानसिकतेच्या लोकांनी त्या स्मारकाचे कलाकृती म्हणून आणि त्या स्थानांचे ईश्वराची मंदिरे असे वर्णन केले. प्राचीन काळापासून गलिच्छ गोष्टींना चांगली नावे देण्यात माणूस फार बुद्धिमान होता, पण त्या काळात विकृत लोकांची फार कमी संख्या होती. अधूनमधून कोणीतरी तसा असायचा. त्यांच्यापैकी एखादा जर राजा झाला, तर इतिहासातील स्वत:चा मोठेपणा दर्शवणाऱ्या इतर राजांप्रमाणे त्याने स्वत:ची अतृप्त विकृती स्मारकातून अमर करण्याची विशेष काळजी घेतली. अर्थात त्या प्राचीन सुंदर कलाकृती कलाकारांनी घडवल्या. त्यांच्यातील कलात्मक मूर्ती, आकृत्या आणि इमारतींची रचना यांच्यात महान सौंदर्यशीलता आहे. त्यांच्या प्रकट केलेल्या हालचाली, भावना व समरसता सौंदर्यदृष्ट्या फार समृद्ध आहेत. परंतु त्यांच्यातील कलात्मकतेला उठाव देण्यासाठी किंवा त्याचा मूळ विषय विविध स्वरूपातून व्यक्त

करण्यासाठी लैंगिक क्रियेचा किंवा नग्नतेचा वापर करण्याची गरज नव्हती. वास्तवात, लैंगिक क्रिया दर्शविल्याने कलाकृतीमधील शांतपणा व नाजुकपणा यांच्या अभिव्यक्तीला अवरोध होतो. ज्या कलेला अश्लीलतेच्या मार्गाने जावे लागते, त्याच्यात आत्मविश्वासाचा अभाव असतो. अश्लीलता किंवा लैंगिक क्रिया जाहीरपणे दर्शवल्याने, कलाकृतींमधले सौंदर्याचे संतुलन नष्ट होते. जेव्हा एखाद्या कलाकाराला आपली कला अश्लीलतेमधून व्यक्त करण्याची गरज वाटते. तेव्हा ते त्यांच्या अभिव्यक्तीतील सौंदर्यशीलतेच्या कमकुवतपणाचे किंवा कमतरतेचे द्योतक असते. सध्याच्या दिवसात अशा कलेला सर्वोच्च अभिव्यक्तीची आणि सर्वोच्च बाजारी मूल्य असलेली कलाकृती म्हणून मान्यता मिळते.

एखाद्या कलाकृतीच्या छायाचित्रकाराने (Photographer) त्याच्या फोटोत नग्न स्त्री किंवा शृंगारिक उत्तेजना देणारे, शिसारी आणणारे देखावे घातले नाहीत तर कलेचे जाणकार किंवा महान समीक्षक, तो प्रगत, सौंदर्यशीलतेमध्ये कमी असल्याचे जाहीर करतात. या सेक्सभुकेल्या लोकांचा सौंदर्यशीलतेचा मापदंड काय आहे, हे फक्त परमेश्वरच जाणू शकतो. वैश्विक अचेतन, चैतन्य लहरीवरून कलेची परीक्षा करते. भविष्यात सहजयोगाच्या प्रभावाने सौंदर्यशीलतेच्या प्रचलित मूल्यांत फार मोठा बदल होणार आहे. कारण जगभर मान्यता मिळालेल्या कलाकृती फार गरम लहरी सोडतात. अशा लहरी गंभीर अवस्थेतील मनोरुग्णांकडून येतात. सहजयोग्यांच्या बोटांना फोड येऊ शकतात. अचेतनाने हे परस्पर कळवलेले जजमेंट (निर्णय) आहे.

आनंद घेणे याचा आत्मानंदाशी पूर्ण एकरूप होणे हा अर्थ असेल, तर सेक्सच्या क्रियेस अनैतिक साधना म्हणून त्यागले पाहिजे. फक्त एका व्यक्तीबरोबर, ज्याच्याशी खोल भावनात्मक व सामाजिक संलग्नता आहे, अशा व्यक्तीबरोबर एकांतात केल्यास सेक्सच्या क्रियेतील सौंदर्य अभिव्यक्त

होते. अशाप्रकारे प्रेमाच्या सर्व पैलूंचा विभक्ततेत किंवा मिलनात आनंद घेता येतो आणि प्रेमाचे संगीत सर्व काळ वाजत राहते. दुसऱ्याला आपले हृदय दिले असल्यास ते परत घेता येत नाही. पण किती जणांना देण्यासाठी हृदये आहेत?

लैंगिकतेची क्रिया ही मुळातच पवित्र पद्धतीने अर्थात लोकांनी मान्यता दिलेल्या पती वा पत्नीबरोबर करायची असते. वैवाहिक नातेसंबंधांना संबंधितांच्या मोठ्या माणसांचे व समाजाचे आशीर्वाद मिळायला हवेत. सेक्सची जादू ते खाजगी सिक्रेट असण्यातच आहे. विवाहित जोडप्याने या सर्व क्रियेचा आनंद घेण्याबरोबरच अशा आई-वडिलांची स्वर्गीय मुले जन्माला येतात. आंतरबाह्य आधुनिक लोकांच्या प्रगत मनांना या कल्पना कालबाह्य वाटतील, पण नजीकच्या भविष्यकाळात, वास्तवातले सत्य सहजयोगातून दिसू लागल्यावर लोकांच्या लक्षात येईल की हे अचेतनाचे अत्यंत आधुनिक प्रकटीकरण आहे. अचेतन अनेक रहस्य (सीक्रेट्स) आपल्याला प्रेरणांच्या रूपाने प्रकट करीत असते. त्यामुळे आपण विवाह संस्थापित केला आहे. सहजयोग्यांना त्यांच्या चैतन्य लहरीतून पूर्वीपासून हे ज्ञात आहे की अचेतनाचे कायदे मोडणाऱ्यांची काय गत होते आणि परमेश्वरी कायदे भंग करणाऱ्यांची श्रीगणेश कशी काळजी घेतात. असे आचरण करणाऱ्यांना आत्मसाक्षात्कारपूर्वी शारीरिक व मानसिक त्रास होतो आणि ते साक्षात्कारी जीव झाले तर साधना करून बदलण्यासाठी कालावधी दिला जातो. सहजयोगाची योग्य त्या प्रकारे साधना करून, पश्चात्तापाने आणि संतुलनात येऊन ते श्रीगणेशांना जागृत करू शकतात. असे जीव सुधारत असतात तेव्हा श्रीगणेश त्यांना मार्गदर्शन करतात.

विवाहाशिवाय केलेल्या लैंगिक संबंधात अपूर्ण सुख मिळते. लग्न करायचेच कशाला असा प्रश्न विचारला जाईल. माणूस उत्क्रांत झाला असेल आणि त्याला लग्न करायची इच्छा नसेल, तर त्याने नाही केले तरी

चालेल. पण विवाहाशिवाय लैंगिक संबंध ठेवणे धर्माच्या विरोधात जाते. विवाह संस्था सर्वात प्राचीन असून अनेक युगांपूर्वी ऋषींना गहन ध्यानात त्याचा शोध लागला. विवाहित जोडपे म्हणजे एक स्त्री व एक पुरूष यांच्यातील, समाजाने मान्यता दिलेला, जीवनभराचा संबंध. याच्यातून वैवाहिक जीवनाला मिळालेली सामूहिक मंजूरी व समाजाचा पाठिंबा दर्शवला जातो. विवाह विधी व समारंभ म्हणजेच सामाजिक मान्यता. समाजातील लोकांचा सहभाग व आनंदोत्सव यांच्यातून तो जाहीर होतो. विवाहातील आनंदोत्सव वैयक्तिक सेक्स लाईफला उदात्तता व परमेश्वरी कृपा प्रदान करतो.

स्वर्गाच्या राज्यात (सहस्त्रार) प्रवेश करण्यापूर्वी साधकाला पुन्हा लहान मूल (श्रीगणेश) व्हावे लागते. कृत्रिमपणामुळे माणसाला साधे, प्रामाणिक व सरळ जीवन जगणे अवघड आहे. आपण आपल्याला इतके गुंतागुंतीचे केले आहे की फार लहान गोष्टी करणे सगळ्यात अवघड झाले आहे. जगाला विनाशापासून वाचवायचे असेल तर आपल्याला आपल्या डोक्यावर उभे राहण्याची गरज नाही किंवा असामान्य कर्म करण्याची आवश्यकता नाही. केवळ आपल्या मालकीच्या भौतिक गोष्टींच्या बद्दलच कायदे पालन करणे पुरेसे नाही तर मानवधर्माच्या काही नियमांचेही पालन करावयास हवे. सूज्ञता आणि इच्छाशक्ती असलेल्या लोकांना खाली दिलेल्या सूचना अमलात आणणे अवघड नसावे :

* जीवन संतुलित, धार्मिक व सद्गुणी असावे.
* आपले आई-वडिल आणि जिथे जन्म झाला त्या समाजाबद्दल आदर असावा.
* आपली पत्नी वगळता इतर सर्व स्त्रियांशी बहीण-भावाचे उदात्त नातेसंबंध असावे.
* विवाहापूर्वी ब्रह्मचाऱ्याचे जीवन असावे आणि विवाहानंतर

पत्नीशी एकनिष्ठ  असावे.

एक स्त्री, जी पत्नी आहे आणि आई आहे, तिने वेश्येचे जीवन अंगिकारले तर मुलांचे काय होते? जे लोक त्यांच्या मुलांशी तादात्म्यता ठेवू शकत नाहीत, ती भविष्य आहेत असे मानत नाहीत, ते मानवधर्माच्या बाबतीत सर्वसामान्य लोकांपेक्षा खालच्या पातळीवर असतात. प्राणीसुद्धा मुलांना सर्वात जास्त महत्त्व देतात. माणसाच्या मुलांना प्राण्यांपेक्षा फारच जास्त काळजी, प्रेम आणि प्रतिष्ठा आवश्यक असते. सहजयोगात आम्ही असे पाहिले आहे, की आत्मसाक्षात्कार घेऊन फार उच्च स्थितीला जाणाऱ्या लोकांचे लहानपण चांगल्या व प्रेमळ कुटुंबात गेलेले असते. सद्‌गुणी आई-वडिल व इतर नातेवाईकांकडून त्यांना भरपूर प्रेम मिळालेले असते. याशिवाय बहुतके सर्वांच्या स्वतःच्या शुद्ध आचरणाबद्दल सूज्ञ कल्पना असतात. असे लोक ज्यांना सुरक्षित वाटते, त्यांना उत्क्रांत होत स्वतःची उन्नती (आध्यात्मिक) साधणे सहज सोपे असते.

जेव्हा मंदिर किंवा चर्चसारख्या पवित्र स्थानी अथवा ज्याला पवित्र स्थान म्हणून समाजाची मान्यता आहे अशा खाजगी घरात किंवा खाजगी अथवा सार्वजनिक ठिकाणी विवाह संपन्न होतो, तेव्हा त्या विवाहातली स्वप्नवत वाटणारी मोहिनी कार्यान्वित होते. परमेश्वराचे प्रेम, कल्पना व स्वप्ने यांच्या माध्यमातून सतत प्रेरणा देत असते. मोठ्या समूहामध्ये विवाह संपन्न होतात तेव्हा ईश्वरी प्रेमाचे पावित्र्य आणि आशीर्वाद मिळतात. आपले जन्मदाते आई-वडिल आदिमाता-पित्याच्या प्रेमाचे प्रतिनिधित्व करतात. आधुनिक काळात, अर्थात, मुलांची काळजी करणारे आई-वडिल फार थोडे असतात. अचेतनाची परमेश्वरी शक्ती, अशा विवाहाचे सामूहिक अंग तयार करते. समाजाची संमती आणि आई-वडिलांचे आशीर्वाद या प्रसंगाची खुमारी आणि पावित्र्य वाढवतात. आई-वडिलांच्या आशीर्वादाशिवाय विवाहित झालेले जोडपे खरे सुखी होऊ शकत नाही

कारण ते त्या समाजाचे व आई-वडिलांचे अविभाज्य भाग असतात. हे जैव-वैज्ञानिक (biological) वास्तव असून अचेतनाचे आशीर्वाद उपभोगणारा अंतरात्मा याच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. आदर्श विवाह तोच असेल जो प्रत्येकाला फार सुखी करतो.

कोत्या व स्वार्थी मनोवृत्तीच्या लोकांनी विवाहासंबंधी कडक कायदे लादून अनेक अत्याचार केले आहेत. असे नियम दुरूस्त करणे आवश्यक आहे, पण ते संपूर्णपणे रद्द करण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण ऐतिहासिक काळात साक्षात्कारी जीवांनी विवाहाचे विधी तयार केले आणि त्या विधींमुळे अचेतनाचे आशीर्वाद निश्चितच मिळतात.

प्रेम हे जोडप्यांना परस्परांशी बांधणारी शक्ती आहे. याची गफलत, अचानक उफाळून आलेल्या, फक्त काही काळ टिकणाऱ्या आकर्षणाशी केली जाऊ नये. ज्यांना आत्मसाक्षात्कार झाला नाही अशा जीवांना दुसऱ्या माणसाच्या चैतन्य लहरी समजणार नाहीत. त्यामुळे आपल्या जीवनसाथीशी आपले जुळणार आहे की नाही हे फक्त त्या व्यक्तीला वरवर ओळखण्याने समजणार नाही. प्रियाराधन आणि डेटिंग यांच्या प्रयोगांतूनसुद्धा माणसाला, त्याच्या भावी वधूबद्दल काही कल्पना मिळू शकत नाही कारण दोघेही नाटक करीत असतात किंवा आकर्षणाच्या प्रभावातील परिस्थितीत वागत असतात. ज्याला ते प्रेम म्हणतात ते इतके उथळ असते, की केसांचा रंग बदलल्यावरसुद्धा ते उडून जाते. कृत्रिम आणि सिंथेटिक वस्तूंवर प्रेमासाठी अवलंबून राहणे म्हणजे प्रेमाचा मृत्यू घडवणे होय. कारण प्रेम पूर्णपणे स्वयंप्रेरित असते.

आधुनिक काळातील कृत्रिम मूल्यांच्या प्रणालीला धरून केलेल्या तर्कावर (जजमेंट) जोडप्यांच्या भविष्यातील संबंधांचे गहन महत्त्व आधारित असू शकत नाही. अशा अस्थिर आधारावर प्रेमाचे घरटे उभारता येत नाही. ते फक्त अशीच स्वप्ने विणते जी क्वचितच वास्तवात उतरतात. शिवाय

अशा जोडप्याला धार्मिक आई-वडिलांचे व समाजातील मोठ्या लोकांचे आशीर्वाद नसतील तर त्यांच्या मीलनाला अचेतनाच्या आत्मिक आशीर्वादाच्या चैतन्य लहरींचे पाठबळ मिळणार नाही.

विवाह ही वैश्विक एकात्मतेच्या साखळीची एक कडी आहे. या विशेष (युनिक) नात्याचा आनंद पूर्ण एकांतात उपभोगायचा असतो. विवाहाची सर्व गुपिते लक्षात घेतली तर या स्वर्गीय आशीर्वादाच्या सर्व आश्चर्यकारक वरदानांचा पूर्ण उपभोग घेणे सोपे होईल. कलियुगाच्या या परिस्थितीत अनेक महान आत्मे जन्म घेण्याच्या प्रतीक्षेत असताना सहजयोगी पती-पत्नी हे अशा उच्च स्थितीतल्या जीवांना चांगले माता-पिता मिळू शकतील. म्हणून सहजयोग्यांनी सहजयोगिनींशी विवाह करणे केव्हाही योग्य होईल (किंवा विवाह करण्यास सुचवणे योग्य होईल.)

आता असा प्रश्न विचारला जाईल की जिथे लोक आपले वैवाहिक जीवनसाथी निवडतात त्या देशात घटस्फोटांची संख्या आतापर्यंत सर्वाधिक का आहे? याचे कारण असे आहे, की जीवनसाथीची निवड ही भौतिक आणि व्यक्तित्वाच्या शरीरावर दर्शवलेल्या निकषांवर आधारित असते. व्यक्तीच्या आंतरिक स्थितीचा विचार केला जात नाही. अनेक पौर्वात्य देशात, जिथे धार्मिक आई-वडिलांना विचारले जाते तिथे आई-वडिलांचे मुलांवर प्रेम असल्याने त्यांच्या चक्रांवरील देवता निवड प्रक्रियेस मदत करतात. हा पूर्ण विचारांती घेतलेला निर्णय नसून स्वयंस्फूर्त निर्णय असतो. कारण आपल्या आई-वडिलांना आपणच निवडले असते. मृत्यूनंतर धार्मिक आणि संतुलित स्वभावाचे लोक सामूहिक सुप्त चेतनेत (परलोकात) राहतात. त्यांच्या पुढच्या जन्माबद्दल व आई-वडिलांच्या निवडीवरही निर्णय घेतात. सध्याच्या काळात अनेकजण विवाह करीत नाहीत, पण मुलांना जन्म देतात. ते भ्रष्ट जीवांना जन्म देतात. विवाह करून पुन्हा पुन्हा घटस्फोट घेणारे, दोन व्यक्तित्त्वांची माणसे होतात आणि काळाच्या ओघात

उत्क्रांतीच्या बाहेर जातात. असे लोक चांगल्या जीवांना कसे जन्म देऊ शकणार? आजची मुले उद्या माता-पिता होणार आहेत. जर तुमच्या आई-वडिलांनी तुम्हाला तुमच्या जीवनात चांगले मार्गदर्शन केले नसेल, तर तुम्ही त्या मार्गदर्शनात सुधारणा करून त्यांच्यापेक्षा चांगले आई-वडिल होण्याचा प्रयत्न करा. पण आधुनिक पाश्चात्त्य आई-वडिलांना त्यांच्या मुलांमध्ये रस नसतो. ते मुलांना जीवनातल्या सर्व धोक्यांशी स्वतःच संघर्ष करायला सोडून देतात. अर्थात् आई-वडिल स्वतःच्या त्रयस्थपणाच्या प्रवृत्तीवर सबब शोधून काढतात. ते असा सिद्धांत (थिअरी) मांडतात, की ते मुलांना सक्षम व कठीण बनवत आहेत. पण असे दिसते, की अशी मुले स्वतंत्र होऊन भांडकुदळ बनतात. वास्तवात, आई-वडिलांची जबाबदारी टाळण्याच्या प्रवृत्तीचे एक ऐतिहासिक कारण आहे, सध्याचे आई-वडिल दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तरुण होते. युद्धामुळे त्यांच्या सर्व जीवनमूल्यांवरच आघात झाले व त्यांची व्यक्तित्त्वेच भंग पावली. त्यांना आश्रयस्थानी कुटुंबासह घरात राहण्याचा आनंद अनुभवता आलाच नाही आणि त्यामुळे मुलांसंबंधीची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती दुराग्रही व आचरणास अवघड (rigid & austere) झाली.

माझ्या माहितीतील एक तरुण मुलगा अमली पदार्थ (LSD) घ्यायचा. जेव्हा मला हे समजले तेव्हा मी त्याला सांगितले की जोपर्यंत तो ड्रग घेणे थांबवणार नाही, तोपर्यंत मी अन्नग्रहण करणार नाही. माझ्या एक दिवसाच्या उपोषणाने तो तरुण माझ्या प्रेमाला शरण आला. पुढे तो मोठा कार्यप्रवण सहजयोगी झाला. या प्रश्नाचा सर्वात महत्त्वाचा भाग असा, की प्रत्येक मनुष्याला पवित्र विवाह संस्थेने लाभान्वित होण्याचे अधिकार नसतात. अनेक भागीदारांबरोबर (पार्टनर्स) विवाह झाल्यावर किंवा विवाहाशिवाय लैंगिक आनंद घेणारे लोक त्यांचे गैरमार्गाने जाण्याचे काम चालूच ठेवू शकतात. पण सहजयोगाचा त्यांना उपयोग झाला नाही, तर ते तक्रार करू

शकत नाहीत. ‘जागृत’ झालेच तर आत्मसाक्षात्काराच्या मार्गावर फार दूरवर जाऊ शकत नाहीत (फार प्रगती करू शकत नाहीत). त्यांनी स्वत:च्या शुद्धाचरणाबद्दल एकदाच व शेवटचा निर्णय घ्यायला हवा. फक्त तेव्हाच ते उत्क्रांत होऊ शकतील आणि अशा उत्क्रांत झालेल्या लोकांनीच मुले होऊ द्यावीत. गुन्हेगार आणि जनावरांच्या वंशातल्या लोकांनी जन्म घ्यावेत असे वाटत नसल्यास, त्या लोकांनी मुले होऊ देवू नयेत. जे लोक त्यांच्या आई-वडिलांना मान देत नाहीत त्यांना त्यांची मुले मान देत नाहीत. अनेक केसेसमध्ये स्वातंत्र्याच्या नावाखाली आपण आपल्या आई-वडिलांपासून किंवा घरापासून दूर जातो आणि आपल्या ईश्वरी वारसाच्या आनंदमय संरक्षणााचा आनंद गमावतो. या सृष्टीमध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मानवी स्वरूपात उत्क्रांत होत असताना परमेश्वराशी मिलन, योग मिळवणे. त्याच्यासाठी तुम्हाला स्वत:च्याच बंधनाच्या जोखडातून स्वातंत्र्य मिळवायला हवे. दुसऱ्या कशापासून नाही.

जे लोक त्यांच्या आई-वडिलांचा आणि घरातल्या मोठ्यांचा आदर करीत नाहीत, सहजयोगात आल्यावर असे दिसते की त्यांचे मूलाधार चक्र फार कमकुवत असते. तसेच त्यांचे उजवे हृदय केंद्र (अनाहत चक्र), जिथे श्रीराम त्यांची पत्नी सीता यांच्या बरोबर राहतात, ते सुद्धा फार कमकुवत असते. विशेषत: ते आईशी दुष्टपणा करीत असतील तर त्यांची मध्य व उजवे हृदय चक्रे अशक्त असतात. म्हणून आपले आई-वडिल किती महत्त्वाचे आहेत हे आपण समजायला हवे आणि आपल्या व्यक्तित्त्वाच्या अंतरंगात आध्यात्मिक संलग्नता कशी आहे तेही समजायला हवे. आपल्या आई-वडिलांची मुळे आदिमाता-पिता यांच्यात असतात आणि विवाहाची मुळे आदिमाता-पिता यांच्या आद्य व चिरंतन प्रेममय नात्यात असतात. जे विवाहाचा आदर करीत नाहीत किंवा त्यांच्या शुद्धाचरणाच्या गौरवात आनंद घेत नाहीत त्यांना हृदय केंद्र व मूलाधार केंद्र कमजोर असण्याचा त्रास

असतो. अशा निर्लज्ज व सेक्सवेड्या लोकांची कुंडलिनी चढत नाही.

सध्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या हास्यास्पद कल्पनांमुळे सहजरीत्या विवाह तुटतात व घरगुती जीवन उद्ध्वस्त होते. घर हे पवित्र उपवन आहे आणि त्या उपवनात परमेश्वराची सर्वात सुंदर निर्मिती, लहान मुले, लहानाची मोठी होतात. लहान मुले नाजूक फुलांप्रमाणे असतात, जी दुष्टपणाने, सुधारित समाजाच्या विनाशक उष्णतेला उघडी पडलेली असतात. चांगली घरे, कुटुंबे, चांगल्या समाजाची आधार असतात. परमेश्वराच्या निर्मितीला आवश्यक ते आश्रयस्थान मिळाले नाही, तर मोठ्या संख्येने राक्षसी व्यक्तित्वे जन्म घेतील, तर धार्मिक व सदाचारी जीव-जन्म घेण्यास कचरतील. कारण त्यांना स्वत:च्या उत्क्रांतीमध्ये प्रगत होण्यास सुयोग्य वातावरण दिसणार नाही.

सध्याच्या दिवसात आपण चांगल्या प्रतीचे गाय, बैल आदि पाळीव प्राण्यांची पैदास व्हावी याची काळजी घेतो, पण माणसांच्या जन्माबद्दल मात्र एवढी काळजी करीत नाही. मानवी जीवनमूल्ये पैसा मिळविण्यासाठी उपयोगात आणल्यामुळे त्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. माणसे म्हणून जन्मलेले अधिक प्रमाणात मानवी रूपातल्या जनावरांप्रमाणे आहेत, बावळट, मूर्ख किंवा दुष्टपणाने आनंद मिळविणारे आहेत. मुलांच्या संवेदनशील मनाला आई-वडिल, आजी-आजोबा यांच्या प्रेमळ संगोपनाची गरज असते. जिथे आध्यात्मिक व शांततामय वातावरण आहे अशा समाजाची मुलांच्या सुदृढ वाढीसाठी आवश्यकता आहे.

खालच्या स्तरावर गेलेल्या मानवी जाणिवेमुळे पृथ्वीचा अशा पाशवी अवस्थेत विस्तार झाला आहे, की तिथे पशूंच्या जाणीवा असलेले व पशूंच्या धर्माचे आचरण करणारे मृतात्मे मानव रूपात जन्म घेत आहेत. या कलियुगात अधिक प्रमाणात प्राणी माणसांच्या रूपात जन्म घेत आहेत. याचे आणखी एक कारण असे आहे, की जनुकीय प्रदूषण आणि मानसिक प्रदूषण

वाढत जाऊन सर्वाधिक संपृक्त अवस्थेत (maximum saturation) पोहोचत आहेत. इतक्या मोठ्या संख्येतील राक्षसी मृतात्म्यांचे वास्तव्य झाल्याने कलियुगात दुष्ट शक्ती घोंघावत आहेत. संवेदनशील व उदात्त आत्म्यांनी उतरण्यासाठी पृथ्वीवरचे वातावरण अधिक स्वागतशील (congenial) बनवायला हवे. हे होईल तेव्हा आपोआपच जन्म घेणाऱ्यांची संख्या कमी होईल, कारण मर्यादित संख्येत उच्च स्थितीला उत्क्रांत झालेले मानवी जीव पुढच्या उत्क्रांतीसाठी जन्म घेतील व बदललेल्या परिस्थितीत, प्राण्यांप्रमाणे असलेल्या जीवांना जन्म घेण्यास सुयोग्य वातावरण असणार नाही. फार थोड्या जीवांना मानवी पातळीवरचा धर्म असतो. खालच्या प्रतीच्या प्राण्यांसारख्या जीवांना व राक्षसांना मानवरूपात जन्म घेणे शक्य झाल्याने लोकसंख्या वाढत आहे. ते फार मोठ्या संख्येने अस्तित्वात आहेत.

एकदा सुवर्ण युग (सत्ययुग) किंवा ज्याला कुंभयुग असेही म्हणतात, या पृथ्वीवर प्रस्थापित झाले, की हे अनधिकृत मानवी जीव सामूहिक सुप्त चेतनेत (परलोकात) दिसेनासे होतील. अनेक महान जीव जन्म घेण्याच्या प्रतीक्षेत आहेत पण त्यांना अवतरित होण्यासाठी आवश्यक साधने मिळत नाहीत. ती साधने आहेत, योग्यप्रकारे उत्क्रांत झालेले आई-वडिल, मानसिकदृष्ट्या स्वच्छ समाज, आणि त्यांच्या अवतरणासाठी पवित्र वातावरण. साध्या प्रकारचे मानवी जीव, जे त्यांच्याच वंशाच्या कुटुंबात अवतरित होण्याच्या प्रतीक्षेत आहेत, तेसुद्धा जन्म घेण्यास घाबरतात. कारण त्यांचे होणारे आई-वडिल, पैशाच्या मागे व स्वार्थी असतील. जे आई-वडिल त्यांच्या मौजमजेसाठी जसे दारू व ड्रग्जवर होणाऱ्या खर्चाचे पैसे वाचवण्यासाठी आपल्या मुलांची हत्या करतात त्यांच्या पोटी कोण जन्म घेणार?

समृद्ध देशातील उच्च व मध्यमवर्गीय समाज जसे उद्ध्वस्त झाले आहेत, त्यावरून ही प्रथा (ट्रेंड) पुन्हा आरोग्य व शहाणपणा याकडे

वळविण्याच्या विचाराने पुष्कळांना धक्का बसेल. सुदैवाने आशेचा किरण आला आहे. सहजयोगाच्या आगमनाबरोबर माणसात अग्रक्रमांची नवीन जाणीव तयार होईल आणि या नवीन जाणिवेने व प्रवृत्तीने ते स्वतःच्या अस्तित्वाचे पुनर्मूल्यमापन करतील. मागील दोन दशकात अनेक साक्षात्कारी जीवांनी या पृथ्वीवर जन्म घेतला आहे. मी स्वतः शेकडोंना भेटले आहे. या निराशाजनक काळात तेच एकमेव आशास्थान आहेत.

सहजयोगातून विवाह प्रणाली कशी पवित्र होते हे सविस्तर सांगणे या पुस्तकाच्या व्याप्तीच्या बाहेर आहे.

जेव्हा एक साधक सातत्याने, चुकीच्या व विकृत प्रयोगात खोलवर जातो, तेव्हा श्रीगणेश कार्य थांबवून शेवटी सोडून जातात. ते मूलाधार चक्रात निष्क्रिय किंवा निद्रिस्त झाल्याबरोबर नरकातून सैतानी शक्तींचा सामूहिक सुप्तचेतनेत वर्षाव होतो. ते सुप्तचेतनेला व्यापून, माणसाचे मन स्वतःच्या हातात घेतात. अशाप्रकारे त्यांच्या ताब्यात गेलेल्या जीवाला चूक काय व बरोबर काय याची जाणीव राहत नाही. मग सर्व प्रकारची लैंगिक पापकृत्ये मुक्तपणे करूनसुद्धा त्याला आपण शुद्ध व निरागस आहोत असे वाटते. अशा प्रकारची लैंगिक दृष्ट्या अतर्क्य व विकृत वागणूक दिसून येते आणि गुन्हेगार व लैंगिक गुन्हे करणारे लोक समाजात आणले जातात. विकृत सेक्स-वेडे लोक स्वतःच्या हक्कांसाठी भांडतात आणि वास्तवात अशा माणसाच्या रूपात प्राणी असलेल्या मतदारांना, जे मोठ्या संख्येने विक्षिप्त हक्क मिळविण्यास दडपण आणतात, त्यांना खूष करायला सरकार अमानवी कायदे बनवतात.

या कलियुगात काही गुरु कमकुवत जीवानां नियंत्रित करण्यासाठी त्यांचे मूलाधार चक्र उत्तेजित करून त्यांचे मन ताब्यात घेतात. शिष्याच्या मूलाधार चक्रात भूत घुसविण्याचा हा खात्रीशीर उपाय आहे. साधारणपणे श्रीगणेश अशा घुसणाऱ्याशी लढतात. पण साधकात ते आधीच निद्रिस्त

असतील, तर त्याच्या हाताशी संरक्षण नसते.

कुंडलिनी त्रिकोणाकार अस्थिमध्ये जागृत झाल्यावर तिच्या वरच्या बाजूच्या सहा चक्रातून ती जाते, पण तिच्या खालच्या बाजूच्या मूलाधार चक्रातून जात नाही. श्रीगणेशांकडे श्रीआदिशक्तीच्या घरातूनच फक्त जाता येते. आतापर्यंत ब्रह्मा, विष्णू, महेशसुद्धा त्यांच्याशी तादात्म्यता मिळवू शकले नाहीत. श्रीगणेश सर्व देवतांशी थोड्या प्रमाणात एकरूप होतात. पण त्यांच्यापैकी एकजणसुद्धा श्रीगणेशांची निरागसता आणि त्यांच्या आईशी असलेले त्यांचे समर्पण प्राप्त करू शकला नाही. त्यांना पाहता येईल (सालोक्य समाधी), त्यांचे सान्निध्य जाणवेल (सामीप्य समाधी) पण त्यांच्याशी तादात्म्यता अशक्याच्याही पलीकडे आहे.

मध्यमार्ग (सुषुम्ना नाडी) सात दरवाजे असलेल्या घराच्या रस्त्याप्रमाणे आहे. या दरवाज्यांचे सात वेगवेगळी दैवते आतल्या बाजूने रक्षण करतात. ही परमेश्वराने केलेली योजना आहे. कारण बाहेरून आत घुसण्याच्या प्रयत्नांनी, या रस्त्यावर येणे शक्य नाही. त्यांचे प्रवेशद्वार एकच आहे, ते म्हणजे कुंडलिनी जागृत करणे. जागृतीनंतर कुंडलिनी सर्वात आतल्या बाजूने वर चढते. प्रत्येक चक्रातून तिचे उत्थान होताना ती सर्व दैवतांना माहिती देते. एखादे केंद्र कमजोर असल्यास संबंधित दैवत जागृत होत नाही आणि अशाप्रकारे तिचे सर्वोच्च स्थानी उत्थान होणे ते थांबवतात. ते दैवत जागृत झाल्यावरच कुंडलिनीला त्या केंद्रातून जाण्याचा हक्क मिळतो आणि प्रेमाने ते ते दैवत कुंडलिनीला आशीर्वाद देते. या घटनेमुळे साधकाचे चित्त आत ओढले जाते. कुंडलिनी जेव्हा शेवटी मस्तकाच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या ब्रह्मरंध्राचे छेदन करते तेव्हा साधकाचे चित्त अचेतनाच्या सर्वव्यापी शक्तीशी, जी स्वभावतः असीमित आहे, जोडले जाते. साधक, आत्मानंदाची शांती अनुभवतो. प्रत्येक दैवताने त्यांचे चक्र मोकळे केल्यावर, सर्व चक्रांचे भेदन होते. त्यामुळे साधकाला उत्थान होत

असताना कोणत्याही दैवताचे दर्शन होत नाही. या सर्वात मूलाधार चक्र सर्वात मोठे काम करते. कारण मूलाधार चक्राच्या चार पाकळ्यातून पावित्र्य प्रसारित होत असते आणि वरच्या चक्रांमध्ये जे पावित्र्य असते, ते मूलतः मूलाधार चक्राच्या चार पाकळ्यातून ती चक्रे ते घेतात.

सहजयोगातून संपूर्ण आत्मसाक्षात्कारानंतर साधक मस्तकाच्या सर्वोच्च स्थानावर आपले चित्त नेऊ शकतो आणि प्रत्येक चक्राचे रक्षण करणाऱ्या दैवतांशी परिचित होतो. सहजयोगाचे कार्य प्रथम कळस बांधणे व नंतर भक्कम पाया घालणे (आधी कळस मग पाया) या प्रमाणे होते. श्रीगणेशांच्या मार्गाने प्रवेश मिळविणे मोठ्या ऋषींनाही शक्य नसते. हे फक्त त्यांनाच जमू शकते, ज्यांनी फार उच्च स्थितीची जाणीव मिळविली आहे आणि जे पूर्णपणे अबोधितेशी, निरागसतेशी, श्रीगणेशांचे मानवी रूप येशू ख्रिस्त, त्यांच्याप्रमाणे तादात्म्य झाले आहेत.

सहजयोगात असे दिसले आहे, की श्रीगणेश त्यांच्या आईला पूर्ण सन्मान मिळाला आहे, त्यांच्या आईच्या प्रोटोकॉल्सचे (मान सन्मान) पालन होत आहे, याची खात्री करण्यासाठी कार्यान्वित होतात. उदा.येशू ख्रिस्तांनी त्यांना सुळी देणाऱ्यांना क्षमा केली, पण त्यांच्या आईच्या शुद्धतेवर कोणी एक शब्द जरी काढला असता, तरी त्याला येशू ख्रिस्तांनी क्षमा केली नसती. सहजयोगाच्या निरंतर साधनेने साधक शुद्ध होतो आणि सहजयोग सखोलतेत समजल्यावर श्रीगणेश साधकाला स्थैर्य देतात. असे व्यक्तिमत्त्व सेक्सच्या क्रियेचे फक्त साक्षी असतात. ते त्याच्याशी लिप्त होत नाहीत किंवा त्याच्यात अडकत नाहीत.

श्रीगणेशांच्या कृपेने साधकाला त्यांच्या सुंदर व विविध अंगाच्या प्रेमाचा आनंद मिळतो. त्याच्या परिणामस्वरूप त्याचे व्यक्तित्व अनेक भाग असलेल्या विशाल वृक्षाप्रमाणे प्रकट होते. त्याची आई, त्याच्या वृक्षासारख्या व्यक्तित्वाच्या मुळाप्रमाणे त्याला अस्तित्व देते आणि त्याच्या

व्यक्तित्वाचा विकास सशक्त व्हावा यासाठी संपूर्ण आध्यात्मिक सहाय्य आणि मार्गदर्शन देते. त्याची पत्नी वृक्षाच्या खोडाप्रमाणे त्याला आधार देते आणि स्वत:च्या खांद्यावर जबाबदारीचे ओझे घेते आणि वाहते. त्याच्या बहिणींचे प्रेम वृक्षाच्या फांद्यांप्रमाणे असते. आपल्या भावाने जे साध्य केले आहे त्याचा त्यांना अभिमान असतो आणि आपल्या प्रिय भावाच्या रक्षणासाठी त्या नेहमीच प्रार्थना करतात. त्याच्या गोड मुली फुलांप्रमाणे उमलतात. त्यांच्यावर तो आपले पित्याचे प्रेम व्यक्त करू शकतो. हेच प्रेम जेव्हा त्याच्या नातींवर तो व्यक्त करतो तेव्हा त्याची भावनिक अभिव्यक्ती पूर्ण होते. त्याच्या नाती या वृक्षाची फळे असतात आणि नातींबरोबरच्या त्याच्या सुंदर संबंधात तो आपले निरागस प्रेम प्रकट करतो. त्यावेळी त्याच्या, राजाप्रमाणे धन्यता व कृतार्थता या भावना असतात. हेच सर्व, यथाकाल त्याच्या मुलांच्या बाबतीत ही होते.

प्रेमाच्या शुद्ध नात्यातला नाजूक गोडवा दर्शविणाऱ्या अनेक कथा आहेत. इतर ठिकाणी, मी ॲलेक्झांडर द ग्रेट आणि भारतात आल्यावर त्याने केलेली भारतीय पत्नी, यांची गोष्ट सांगितली आहे. त्याला पुरू नावाच्या भारतीय राजाने पकडले असता, ॲलेक्झांडरच्या पत्नीने पुरू राजाला आपला 'राखी बंधू' मानून त्याचे प्राण वाचवले होते. त्याच्यामुळे तिचा पती ॲलेक्झांडर आक्रमणापासून सुरक्षित झाला. या लहान कृतीचा इतका शक्तिशाली परिणाम झाला, की बंदिवासातून सुटका झाल्यावर पुढे कोणताही प्रदेश जिंकल्याशिवाय व विनाश न करता, ॲलेक्झांडर भारत सोडून गेला.

श्रीगणेश स्वत: अहंकार व प्रति अहंकार यांच्या माध्यमातून मेंदूमध्ये माया घटित करतात. जसे, ईश्वरी शक्ती (जीवनाचे पाणी), मातीवर ओतल्यावर स्वत:ला चिखलात लपवते, तसे मायेचा चिखल निर्माण करून आदिशक्तीच्या शिष्यांची श्री गणेश परीक्षा पाहतात. याचे कारण असे की त्यांच्या शोधाची सत्यता तपासून त्यांच्यातल्या भोंदू व दुष्ट मनोवृत्तीच्या

लोकांचे श्रीगणेशांना निर्मूलन करायचे असते.


श्रीगणेशांचे शरीर पृथ्वी तत्त्वामधून बनवले आहे आणि त्यांच्यासारखे दिसणारे पृथ्वीपासून (मातीपासून) बनवले तर ते पाण्यात सहज विरघळते. श्रीगणेशांची मातीची प्रतिमा समुद्रात विसर्जित केली तर ती लवकर विरघळते. त्यांच्या शरीरामुळे पाणी पवित्र होते. पाण्याचे स्वामी श्रीगणेशांचे आजोबा आहेत. शिवाय त्यांचे शरीर ज्याच्या पासून बनवले ती माती समुद्राच्या तळाशी बसल्यामुळे पृथ्वी तत्त्व (त्यांच्या आईची आई, आजी) सुद्धा चैतन्य लहरीमय होते. हे अतिशय सूक्ष्म नाते असून श्री गणेशांची निरागसता त्याचा आनंद घेते.

स्वत:च्या चैतन्य लहरीतून श्रीगणेश पृथ्वी तत्त्वाचे विविध जडात्मक वस्तूंमध्ये परिवर्तन करून सौंदर्याची माया (किंवा आभास) निर्माण करतात. सुगंध पृथ्वी तत्त्वाची तन्मात्रा (कारणात्मक तत्व) आहे आणि अशाप्रकारे श्री गणेश सर्व नैसर्गिक सुगंधात तसेच फुलातील व इतर सुगंधात सर्वव्यापी अचेतनाला व्याप्त करून, प्रकट होतात. अशाप्रकारे पावित्र्याच्या व निरागसतेच्या चैतन्य लहरी त्यांच्याकडून निरंतर पसरविल्या जातात. सुगंध पृथ्वी तत्त्वाची तन्मात्रा असल्याने, सर्वप्रकारचे सुगंध श्रीगणेशांना प्रिय आहेत. साक्षात्कारी जीवाचे नेहमीच सुगंधित शरीर असते. तर परमेश्वरी अवताराचे शरीर अनेक सुगंधाचे ढग बाहेर सोडते आणि माणसांना सूज्ञता व अंतर्मुखता देते. श्रीगणेशांच्या सूज्ञतेतून जे काही लबाड व क्लृप्त्या करणारे आहे ते सर्व, अंतिम विश्लेषणात मूर्खपणाचे व बावळटपणाचे दिसू लागते आणि या घटनेचा अनुभव घेवून माणसाची निरागसता व शुद्धता यांच्यात उन्नती होते.

श्रीगणेशांच्या अनेक कर्तव्यांपैकी एक आहे, त्यांच्या आईचा मानसन्मान (प्रोटोकॉल्स) सांभाळणे. ते स्वत: क्षमाशील दैवत असले तरी स्वत:च्या आईच्या विरोधातील कोणतेही पाप मुळीच सहन करीत नाहीत. मानवी बुद्धीत प्रवेश करून तिथे पूज्यभावाचा सद्‌गुण भरतात. जेव्हा

अहंकारी बुद्धिजीवी लोक त्यांच्या निरागसतेसमोर नतमस्तक होतात, तेव्हा ते त्या माणसांना सूज्ञतेच्या प्रकाशाने प्रकाशित करतात. जे आपल्या सवयींचे गुलाम आहेत आणि जे दबलेले आहेत त्यांनी प्रार्थना केल्यावर, श्री गणेश त्यांच्या प्रति अहंकारात (सुपर इगो) प्रवेश करतात. साधकांवर ताबा मिळवू पाहणाऱ्या राक्षसी व दुष्ट शक्तीचा ते संहार करतात. त्यांच्या आधिपत्याखाली देवदूतांचे व ऋषींचे सैन्य आहे. शिवाय इतर असंख्य देवदूत त्यांच्या नजरेत राहतात. सर्व देव श्री गणेशाचा सन्मान करतात व त्यांची पूजा करतात आणि त्यांची स्वत:ची आई आदिशक्ती, श्रीगणेशांची सर्वोच्च स्वरूपात पूजा करतात.

श्रीगणेश भवसागराच्या डाव्या अर्धवर्तुळाला वेढतात तर त्यांचे बंधू कार्तिकेय उजव्या बाजूच्या अर्धवर्तुळाला वेढतात. हृदय चक्राच्या खाली ते एक होतात. या स्थानापासून उजव्या बाजूच्या पिंगला नाडीवर (उजवी सिंपथेटिक नाडी संस्था) श्री हनुमान बसतात. विराटाच्या पूर्व चेतित मनाचे




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १४**

मार्गदर्शक देवदूत म्हणून श्री हनुमानांची निर्मिती झाली. हे दैवत, श्रीकृष्णांचा अवतार झाल्यावर विशुद्धी चक्राच्या वरच्या बाजूस संत गॅब्रियल यांचे रूप घेते.

डाव्या बाजूच्या इडा नाडीवर, नाभी चक्राच्या वरच्या बाजूस श्रीभैरव दैवतांचा उद्‌भव होतो. श्री भैरव हे विराटाच्या सुप्त चेतित मनाचे मार्गदर्शक देवदूत आहेत. हे डावी सिंपथेटिक नाडी संस्था म्हणून ही प्रकट होते. श्रीकृष्णांचा अवतार झाल्यावर विशुद्धी चक्राच्या वरच्या बाजूस ते संत मायकेल यांचे रूप घेतात. ही सर्व श्रीयेशू ख्रिस्तांची अंगे आहेत. श्रीकार्तिकेय त्यांचे शरीर होतात, श्रीगणेश त्यांचे सत्व होतात, तर संत मायकेल व संत गॅब्रियल ख्रिस्तांच्या चित्ताची हालणारी अंगे होतात.

श्रीआदिशक्तींनी निर्मिलेल्या सर्व दैवतात श्री गणेश महान आहेत. स्वतः आदिमाता असूनही त्यांना श्रीगणेशांचे, आपल्या पुत्राचे कौतुक आणि श्रीगणेशांबद्दल पूज्यभाव आहे. श्रीगणेशांच्या सर्वव्यापक स्वभावाचे शब्दात वर्णन करणे अशक्य आहे. श्रीगणेशांच्या शरीराच्या प्रमाणाने एक विग्रह बनतो. तो चैतन्य लहरींच्या प्रवाहाचे कारण आहे. परमेश्वरी शक्तीच्या प्रमाणाचा ही तोच विग्रह आहे. म्हणून श्रीगणेशच परमेश्वरी प्रेमाचे, प्रणवाचे साक्षात्कार आहेत, साक्षात रूप आहेत आणि आदिशक्तींची संपूर्ण शक्ती आहेत. जेव्हा ते येशू ख्रिस्तांचे व्यक्त स्वरूप घेतात तेव्हा ते संपूर्ण जाणिवेच्या प्रकाशाचे प्रतीक असतात, पण श्रीगणेश या रूपात ते जाणिवेचे बीज असतात.

उच्च साक्षात्कारी अवस्थेतील व्यक्तिमत्त्वाच्या स्पर्शाने चैतन्यमय झालेला दगड किंवा अवतारांच्या चरणस्पर्शाने सन्मानित झालेली माती अथवा दैवताने किंवा महान गुरूने आशीर्वाद दिलेल्या झाडाची साल, सगळ्यांचे श्रीगणेशांच्या प्रमाणाच्या विग्रहात परिवर्तन करता येते किंवा तसा आकार देता येतो आणि प्रणवाच्या विग्रहाच्या जवळ त्यांचा विग्रह आणता येतो. मग त्यांच्यातून चैतन्य लहरी प्रवाहित होतात. पण श्रीगणेशांच्या

रूपातला दगड असल्यास प्रणव पूर्णतया त्या दगडाशी तादात्म्य होतो. भारतात श्रीगणेशांची आठ दैवते (अष्टविनायक) आहेत. ते नैसर्गिकरीत्या बनलेल्या मूर्ती (स्वयंभू) आहेत. विविध ठिकाणी त्यांची स्थाने आहेत. प्राचीन ऋषींनी त्यांना बाहेर काढले. नैसर्गिकरीत्या तयार झालेल्या या मूर्तींनी सोडलेल्या लहरी सामान्य लोक पकडू शकत नाहीत. त्यामुळे बहुतेक सर्व लोकांना त्यांचे काही मोल वाटत नाही. काही अविचारी किंवा भौतिकतेकडे झुकलेले लोक तिथे भौतिक समृद्धीसाठी प्रार्थना करतात आणि काही वेळेस त्या फलद्रूपही होतात. खरे साधक आत्मज्ञानातून सर्वोच्च सूज्ञता आणि निरागसता मागतात. आपण श्री गणेशांइतके अबोधित असू तर आत्मसाक्षात्काराचा आपला जन्मसिद्ध हक्क आपल्याला उत्तम साध्य होईल. तो साध्य करण्याच्या मध्ये येणारा सर्वात मोठा अडथळा असतो, आपल्या ज्या क्षमता व बुद्धिमत्ता आहेत त्याचा असलेला गर्व. काही लोकांत तो इतका असतो की त्यांना विश्वास असतो की देवालाही फसवून त्यातून ते सुटू शकतात.

श्रीगणेशांप्रमाणे असलेल्या भूमातेने केलेल्या त्यांच्या प्रतिमांशिवाय, योग्य प्रमाणाची सुपारीसुद्धा, जर तिचा विग्रह कार्यान्वित झाला, तर स्वयंभूच्या जवळ (स्वयंभू प्रमाणे चैतन्य लहरी सोडणारी) येऊ शकते. याशिवाय प्रभावित करणाऱ्या इतर गोष्टींचा, जसे सुपारीचे झाड लावणाऱ्याची आध्यात्मिक अवस्था, त्याचप्रमाणे त्यावेळी ज्यांनी मूर्ती विकली आहे त्याची मानसिक अवस्था, या सर्वांचा विचार करावा लागेल. नारळसुद्धा अशा वातावरणात चैतन्य लहरी सोडणाऱ्या विग्रहाच्या जवळ येऊ शकतो. मानवी सहभागाचा भागही कमी समजता येणार नाही. नारळ हाताळणारा माणूस जर आध्यात्मिक दृष्ट्या उत्क्रांत नसेल किंवा शुद्ध हृदयाचा (मनाचा) नसेल तर नारळाच्या चैतन्य लहरी कमी होतील किंवा बिघडतील. चैतन्य लहरी ईश्वरीय असल्याने, स्वयंमध्येच बुद्धिमान असतात आणि प्रत्येक गोष्ट जाणतात.

श्रीआदिशक्तीचा पहिला पुत्र म्हणून निर्माण केलेले श्री गणेश सहजयोग्यांचे ज्येष्ठ बंधू आहेत. श्रीआदिशक्तीच्या ज्या मुलांना कलियुगात पुनर्जन्म मिळाला व जे सहजयोगी म्हणून ज्ञात आहेत, त्यांना श्रीगणेशांच्या प्रमाणे निर्माण केले. त्यांनी हे संकल्पमात्रे केले. त्याच पद्धतीने श्रीआदिशक्ती आत्मज्ञान असलेली अनेक शक्तिशाली व्यक्तिमत्त्वे निर्माण करतात. श्रीयेशूख्रिस्त या त्यांच्या उत्क्रांत मानवी स्वरूपात श्रीगणेश सहजयोग विद्यापीठाच्या कुलपतींची भूमिका निभावतात. त्यांची जबाबदारी आहे, प्रत्येक साधकाची प्रवेशासाठी योग्यता पारखून त्यांच्या परमेश्वरी विद्यापीठात नोंदणी करण्यास परवानगी देणे. प्रत्येक साधकाला चार स्तरांमधून स्वाधिष्ठान, नाभी, अनाहत आणि विशुद्धी चक्रांमधून पाठवून कुलपती म्हणून त्याला पदवी देतात. या वेळी साधक जागृत अवस्थेत उन्नत झालेला असतो.

आज्ञा चक्र ओलांडल्यावर साधकाचे चित्त मेंदूतील लिंबिक एरिया (सहस्रार) मध्ये येते. त्यावेळी मस्तकाच्या सर्वात वर असलेल्या टाळूचे भेदन होऊन योग घटित होतो. ते प्रत्येक साधकाला पदव्युत्तर पदवी प्रदान करतात. हाच आत्मसाक्षात्कार होय. अचेतित मनात प्रवेश प्राप्त केल्यावर त्याहून उच्चतर पदव्यादेखील श्रीगणेशांकडून प्रमाणित केल्या जाव्या लागतात. जरी पदवीदान (पोस्ट ग्रॅज्युएशन) समारंभास स्वत: आदिशक्ती मंजुरी देतात, तरीसुद्धा प्रत्येक पदवी धारकास श्रीगणेश आशीर्वाद देतात.

मानवी व्यक्तित्वाच्या सर्वात वरच्या बाजूस श्रीसदाशिवांचे स्थान (पीठ) आहे. श्रीगणेश कायमच परमेश्वरी माता-पित्यांच्या चरणी, ज्या ठिकाणी जाण्याची प्रत्येकास तळमळ असते, शरणागत असल्याने, महान व स्तुत्य बाळ म्हणून श्री सदाशिवांच्या मांडीवर बसतात. श्रीसदाशिवांच्या पीठाच्या वर, श्रीशिवांच्या मस्तकावर श्रीगणेश चंद्रकला, अर्धबिंदू म्हणून तयार करतात. त्यांच्या पेल्यातून सर्व बाजूस प्रणवाचा फवारा होत असतो.

बिंदूच्या स्थितीत ते परम सूक्ष्म होतात. त्यामुळे लांबी रुंदी नसलेल्या बिंदूत प्रवेश करतात. जाणीव एकत्र होऊन झालेली संपूर्ण घनता, असे त्याचे बिंदूमध्ये रूप असते. शेवटी वलय या रूपात श्रीगणेश श्रीआदिशक्तीची शक्ती मर्यादित करणारी वर्तुळाकार रेषा असतात. जी पूर्ण स्थिती असते. श्रीआदिशक्ती, श्रीपरमेश्वराच्या शक्ती आहेत, पण श्रीगणेश त्यांच्या शक्ती आहेत. श्रीगणेश अचेतनेच्या रूपात वास्तव्य करतात आणि आत्मसाक्षात्कारानंतर सृष्टीच्या प्रत्येक कणात जाणिवेच्या (प्रणवाच्या) रूपात असतात.

## स्वस्तिक आणि क्रॉस (The Swastika and The Cross)

स्वस्तिक हे त्यांचे प्रतीक आहे. निर्मितीच्या वेळी घड्याळाच्या काट्याच्या दिशेने स्वत:भोवती फिरते आणि संहार करतांना घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने फिरते. स्वत:भोवती फिरत असतांना त्यांचे कार्य समान आणि विरुद्ध बाजूकडच्या शक्तींच्या बरोबर चालते आणि त्यामुळे स्थैर्य मिळते. स्वस्तिकाच्या चार रेषा श्री गणेशांच्या चार हातांप्रमाणे असून प्रत्येक रेषेच्या शेवटी प्रतीकात्मक शस्त्रे व सहायक वस्तू (ॲक्सेसरीज) आहेत. श्री येशू ख्रिस्तांच्या जीवनात स्वस्तिकचे प्रतिक म्हणून क्रॉस आहे. वास्तविक क्रॉस हा स्वस्तिकचे उत्क्रांत (व्यक्त) रूप आहे. दोन बीम्स ज्या ठिकाणी एकमेकांना छेदतात ते स्थान स्वस्तिकापेक्षा क्रॉसमध्ये उंचावर आहे कारण ख्रिस्त आले होते, त्यावेळी सृष्टीची निर्मिती उत्क्रांतीच्या वरच्या स्थानावर होती आणि माणसे अधिक मोठ्या जाणिवा घेऊन जन्मली होती.

श्रीगणेशांना चार हात आहेत. त्यांची शस्त्रे व उपयुक्त वस्तू (ॲक्सेसरीज) येशू ख्रिस्तांच्या शरीरात ओढली जातात. त्यामुळे त्यांचा प्रतीक क्रॉस उघडा आहे. ही शस्त्रे खालीलप्रमाणे आहेत :

१. उजव्या बाजूच्या वरच्या हातात परशू आहे. हे श्रीगणेशांचे आयुध येशू ख्रिस्तांमध्ये क्षमा होते. माणसांसाठी हे सर्वात मोठे शस्त्र आहे.

सहजयोगात हे क्षमेचे शस्त्र कसे वापरायचे ते पुढे सांगितले जाईल.

२. डाव्या बाजूच्या खालच्या हातात अन्नपूर्णेचे भांडे (बाऊल) आहे. त्याच्यात गोड मोदक असतात. ते ख्रिस्तांच्या शरीराशी एकरूप आहेत. ख्रिस्तांच्या जीवनात त्यांनी हे दाखवले होते, की त्यांचे भुकेवर नियंत्रण होते आणि ते दुसऱ्या लोकांच्या भुकेचे समाधान करू शकत होते. त्यांनी चाळीस दिवस उपवास केला होता आणि त्यांना सैतानसुद्धा मोहात पाडू शकला नाही. सर्मन ऑफ द माऊंट (पर्वतशिखरावरील प्रवचन) च्या वेळी अन्नाच्या तुकड्यांनी आणि मासळ्यांच्या अद्‌भुत चमत्कारांनी त्यांनी हजारों लोकांची भूक शमविली.

३. उजव्या बाजूच्या खालच्या हातात लहान सापाच्या रूपाने विश्वाची कुंडलिनी धारण केली आहे. ख्रिस्ताच्या आगमनाबरोबर अनेकांची कुंडलिनी जागृत झाली होती. ते सर्व या कलियुगात सहजयोगातून आत्मसाक्षात्कार मिळवतील. त्यांच्या प्रेम व समर्पणाने ख्रिस्तांचा त्यांच्या आईवर ही प्रभाव असतो. सेवा करून आणि आईमध्ये वात्सल्य जागृत करून ते त्यांना सुख, समाधान आणि प्रसन्नता देतात. श्रीगणेशांची पूजा कशी करायची ते सहजयोग्यांना माहिती असायला पाहिजे. त्यांच्या पूजनाने श्रीगणेश जागृत राहतील आणि सहजयोगी त्यांच्या निरागसतेच्या आत्मानंदात राहतील.

## प्रकरण १३

# स्वाधिष्ठान चक्र

स्वाधिष्ठान चक्र कुंडलिनीच्या घराच्या मूलाधाराच्या वरच्या बाजूस बसवलेले आहे. माणसात हे सूक्ष्म केंद्र त्याच्या प्रकट स्थूल रूपाचे, अेऑर्टिक प्लेक्सेसचे नियंत्रण करते. नाभी चक्राच्या (सोलर प्लेक्सेस) नंतर हे चक्र तयार केले गेले. हे कमळाप्रमाणे नाभीतून बाहेर आले आणि भवसागराच्या केंद्र स्थानी ते लोंबकळत असते. स्वाधिष्ठान चक्राच्या सहा पाकळ्या असून अेऑर्टिक प्लेक्सेसची त्याला जुळणारी सहा सब-प्लेक्सेस आहेत. त्याच्या सहा पाकळ्यातून हे चक्र सहा नाद निर्माण करते. ते नाद पुढीलप्रमाणे : 'लं, रं, हं, एं, नं आणि वं'. प्रणवाचे कुंडलिनी जागृतीत उत्थापन होत असताना तो कोणताही नाद करीत नाही. पण ऐकू येणारा नाद फक्त नाभी चक्रावर प्रकट करतो. बुधवार हा या चक्राच्या पूजेचा दिवस आहे. कारण सृष्टीच्या निर्मितीच्या सात दिवसांपैकी बुधवारी हे केंद्र निर्माण केले गेले. सृजनशीलतेशी संबंधित कोणत्याही कार्याची बुधवारी सुरुवात करणे फार शुभ असते.

पृथ्वी तत्त्वाने स्वाधिष्ठान चक्र निर्माण करून त्याला त्याचा पिवळा रंग दिला. ध्यानावस्थेत हे दृश्यमान झाल्यावर, बहुतेक लोकात हे सहा पिवळ्या रंगाच्या धाग्यांप्रमाणे दिसते. हा रंग फिकट पिवळा ते मोहरीच्या रंगाचा, प्रत्येक व्यक्तीमध्ये दिसतो. हा रंग त्या व्यक्तीच्या सृजनशीलतेशी संबंधित मानसिक अवस्थेवर अवलंबून असतो. साक्षात्कारी जीवात हा रंग सोन्यासारखा असतो, तर अवतरणात हा तेजस्वी सूर्यासारखा दिसतो. याच्या केंद्रस्थानी गोलाकार खोल निळसर पिवळ्या रंगात पोकळी आहे. चुकीच्या प्रकारच्या साधकात (असहज) हे केंद्रस्थान गडद निळ्या-काळ्या रंगाचे दिसते. पण जो योगी या पोकळीत पाहू शकतो त्याला फिकट पिवळ्या

रंगाचे श्री ब्रह्मदेव स्पष्ट दिसू शकतात.

श्रीब्रह्मदेव परमेश्वराच्या त्या अंगाचे प्रतिनिधित्व करतात, जे भौतिक सृष्टीच्या सूक्ष्म (सौंदर्यशीलता) आणि जड या दोन्ही बाजूंचे सृजन करतात. श्री ब्रह्मदेव तपस्याप्रमाणे, संतांचे व्यक्तिमत्व असलेले दिसतात. त्यांना दाढी मिशा, चार मस्तके आणि सर्व केसांची डोक्यांवर गाठ मारलेली दिसतात. त्यांचे शरीर कृश असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एकदम नजरेत भरणारा भाग म्हणजे त्यांचे मोठे, फुगलेले बाहेर येणारे डोळे. श्रीब्रह्मदेव क्वचित अवतार घेतात, पण त्यांनी एकदा फातिमा यांचे पती आणि मोहम्मद साहेबांचे जावई श्री हसरत अली म्हणून अवतार घेतला होता. काही प्राचीन ऋषींनी त्यांच्या चार मस्तकांचा अर्थ, सांगण्याचा प्रयत्न केला, की ती चार वेदातील सृष्टीच्या अभिव्यक्तीची स्वरूपे आहेत. जरी ब्रह्मदेव हे परब्रह्माच्या, परमेश्वराच्या सृजन शक्तीचे प्रतीक आहेत, पण त्यांच्या चार मस्तकांचा अर्थ फार खोल व विस्तृत आहे. ही सृजनशक्ती या विश्वात जड सृष्टीच्या स्तरावर अभिव्यक्त होते. सर्व भौतिक वस्तूंना तीन आयाम (डायमेंशन) असतात. पण एक चौथा आयामसुद्धा आहे. तो फक्त माणसांनाच दिसू शकतो आणि जाणवू शकतो. हे चौथे डायमेंशन आहे सौंदर्यशीलतेचे. ते संतुलित संगीत, तसेच विविध पोत (Texture), आकार आणि रेषा यांच्या एकात्मतेमधून तयार होते. प्राण्यांना सौंदर्याची जाणीव नसते. फक्त माणसालाच वेगवेगळ्या रंगांची रंगसंगती, रेषांच्या हालचाली आणि आकारांचे रंग फिके होत जाऊन विरघळणे, यांच्यातील सौंदर्यशीलता जाणवू शकते. या सौंदर्याच्या जाणिवेतून मिळालेल्या आनंदाच्या भावना, रसनिष्पत्ती करतात. (रस म्हणजे भावनांचे सत्व). हा रस भावनांना चेतना देतो. ती चेतना आंतरिक जाणिवेत सौंदर्याच्या रसास्वादातून आनंदाच्या लाटा (उर्मी) उठवते. या आनंदाची वेगवेगळी आवर्तने (फ्रिक्वेन्सीज) आणि चैतन्य लहरी (व्हायब्रेशन्स) असतात. त्याचे विच्छेदन करण्याची गरज नाही. पण या

चक्रांच्या वेगवेगळ्या पाकळ्यांचा परामर्ष घेताना मी सृजनशीलतेच्या क्षेत्रात असलेले वेगवेगळे आनंद विशद करण्याचा प्रयत्न करेन. ही सृजनशीलता परमेश्वरी प्रकाशाने प्रकाशित झाल्यावर अभिव्यक्त होते.

श्रीब्रह्मदेवांची सृजन शक्ती त्यांची पत्नी, सरस्वती म्हणून अवतार घेते. त्या ज्ञान व शिक्षण यांच्या देवता आहेत. काही वेळेस त्या एकट्याच या चक्रावर दिसतात. माणसाला सर्व ज्ञानाचा वास्तविक अर्थ सांगण्यासाठी त्यांची प्रतिमा (इमेज) दिसते. एका हातात त्या नेहमी वीणा धारण करतात. ते याचे प्रतीक आहे, की ज्ञानी माणसाला परमेश्वराच्या संगीताचे ज्ञान असावे. भारतीय शास्त्रीय संगीत मूळ आदिनादावर (ब्रह्मनाद) आधारित आहे. 'सृष्टीची निर्मिती (सृजन)' या प्रकरणात मी ब्रह्मनादाचे वर्णन केले आहे. म्हणून या चक्रावर देवी (सरस्वती) वीणेसहित दर्शन देतात, ते हे सुचविण्यासाठी की तुम्ही विद्वान असाल, तर तुम्हाला संगीताचेही ज्ञान हवे. शिवाय, विद्वान कोरड्या व्यक्तित्वाचा असू नये, तर असा पाहिजे, की जो सृजनशीलतेच्या सौंदर्याचा (माधुर्य) आनंद घेऊ शकतो.

दुसऱ्या हातात त्या जपमाळ घेऊन हे सुचवितात की ज्ञानाची साधना करणारा परमेश्वराचा भक्त असावा आणि त्याला परमेश्वराच्या चिरंतन प्रेमाची जाणीव असावी. म्हणून साधकाला शिक्षणाच्या, भक्तीच्या अंगाची चांगली माहिती असावी. चिरंतन सत्याचा शोध घेणे हा त्याच्या अभ्यासाचा हेतू असावा. हे भक्ताचे लक्षण आहे, तो भक्त ज्याला वरवरचे ज्ञान नको आहे, तर सूज्ञता (wisdom) हवी आहे. तिसऱ्या हातात ज्ञानाचे पुस्तक घेऊन देवी सरस्वती हे सुचवतात, की ज्ञान मिळविण्याच्या प्रयत्नात ज्या चिरंतन सत्याचा शोध विद्वानाला लागेल त्याच्यावर त्याने पुस्तक निर्माण करावे.

देवी सरस्वती यांनी लाल किनारीची, सोन्याचे विणकाम असलेल्या काठाची पांढरी साडी परिधान केली आहे.त्यांचे वाहन मोर आहे. मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी आहे. हा पक्षी अतिशय देखणा असून त्याला भव्य व

डौलदार पिसारा आहे. मोराची निवड हे सुचवते की विद्वान माणसाला सौंदर्यशीलतेची पूर्ण जाणीव असावी. या पक्ष्याची एक विशेष सवय दिसते, की आकाशात ढग जमा झाल्याव तो नृत्य सुरू करतो. या सवयीतून, ढग पाहिल्यावर आनंदाने गाणारा कवी किंवा नृत्य करणारा नर्तक दिसून येतो. याचा भविष्यात मिळणारे आशीर्वाद, असाही अर्थ होतो. जसे येऊ घातलेल्या पावसाला पाहून शेतकऱ्याला आनंद होतो. निसर्ग हे जे दृश्यमान करतो त्याच्या आनंदात मोर आणि शेतकरी सामूहिक चेतनेत एकत्र येतात. मोर हा अशा विद्वान माणसासारखा आहे. ज्याला आकाशातील आनंदाच्या ढगात परमेश्वरी कृपा दिसते आणि ते पाहण्याची आणि अनुभवण्याची त्याची तीव्र इच्छा आहे. ते आकाशात दृश्यमान झाल्यावर, तो आनंदाने नाचतो. मोराचे प्रतीक हे पण सुचवते की मोराप्रमाणे विद्वान माणूस स्वप्नदर्शी (व्हिजनरी) असावा. लांडोरी नाचते. मोर नाचत नाही. दोन मोर लढतात ते पाहून लांडोरीला वीट येतो आणि त्या दोघातल्या विजयी मोराची तिला निवड करावी लागते. हे असे दर्शवते की ज्ञानी माणसांनी तत्त्वाच्या किंवा मतांच्या भिन्नतेवरून भांडणे करू नये. हे अशिक्षित लोकांचे काम आहे.

माणसातील सृजनशीलतेस स्वाधिष्ठान चक्र जबाबदार आहे. ते भौतिक स्तरावर कार्य करते आणि माणसाला त्याच्या कलाकारीचा आनंद घेण्यासाठी जडाचे आकार बदलण्यास मदत करते. बौद्धिक स्तरावर हे चक्र माणसाला योजना बनविणे, चित्रे आणि प्रतिमा तयार करणे यांच्यासाठी सृजनशीलतेच्या नवीन कल्पना देते. शिवाय मानवी मनाला निराकार किंवा अप्रत्यक्ष (ॲबस्ट्रॅक्ट) कल्पनांना उघडे (एक्सपोज) पाडते. त्या कल्पना माणसाच्या चेतनेत प्रकाशाच्या कवडशाप्रमाणे स्वाधिष्ठान चक्र सोडते. वैज्ञानिकांचा मेंदू जड वस्तूत सुधारणा करण्याच्या आणि नवीन वस्तूंचा शोध लावण्याच्या, तसेच त्यांची निर्मिती करण्याच्या, रासायनिक व भौतिक प्रक्रिया यांच्या स्वाधिष्ठान चक्राकडून येणाऱ्या प्रेरणा पकडतो.

विराटामध्ये हे चक्र संपूर्ण भौतिक निर्मितीसाठी जबाबदार आहे. हे संपूर्ण विश्वाच्या अंतिम घडणीचे व स्वरूपाचे अति लहान स्वरूप किंवा साचा (टेम्पलेट) आहे. याच्यात विश्वाचे संपूर्ण प्रसरण करण्याचा प्रोग्रॅम बांधला आहे. त्याचप्रमाणे त्याचे संपूर्ण बारकावेही समाविष्ट आहेत. या चक्रावरील दैवतांच्या प्रकाशित होण्यातून सृष्टीतील सर्व आनंददायक गुण जाणवतात. ब्रह्मदेवांनी जे काही निर्माण केले आहे त्या सर्वांचे पुनर्निर्माण माणूस करू शकतो, पण सृष्टीच्या निर्मिती मधल्या मूळ भौतिक पदार्थाची निर्मिती माणूस कर्तृत्वाने करू शकत नाही. आत्मसाक्षात्कारानंतर या चक्रावर एकाग्रता करणारी व्यक्ती अचानक कवी किंवा महान कलाकार होऊ शकते. श्रीब्रह्मदेव आणि सरस्वतीच्या कृपेने विशिष्ट आकाराच्या अथवा निराकार स्वरूपाच्या कलाकृतींची निर्मिती झाली आणि सर्व काळात जगभरातील लोकांनी त्याचा आनंद घेतला. श्रीब्रह्मदेवांची कृपा त्यांच्या पत्नीची (सरस्वतीची) सेवा करण्याचे फलित या स्वरूपात संबंधित लोकांवर होते. मग ती सेवा मागच्या जन्मात केलेली असो की या जन्मात. अक्षरशः एका रात्रीत अचानक अशा लोकांना जड भौतिकातील कलात्मकता व सौंदर्य दिसू लागते.

म्रिका (Mrica) येथील माझ्या माहितीच्या एका गृहस्थांकडे पन्नाचा (Jade) एक मोठा तुकडा होता. आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर त्यांना जाणवले, की तो तुकडा चैतन्य लहरी सोडत होता. त्यांना जाणवले की त्या दगडाच्या वर्तुळाकार स्तरावर हिरवा, गुलाबी आणि पांढरा असे तीन रंग होते. त्यापासून त्यांनी एक विशेष सुंदर अशी फूलदाणी (फ्लॉवरपॉट) बनवली. तो पांढऱ्या रंगाचा असून त्याच्यावर हिरव्या रंगाची पाने व गुलाबी रंगची फुले होती. अगदी साध्या दगडाचे, सौंदर्यशीलतेच्या संवेदनातून अशा अमूल्य कलाकृतीमध्ये परिवर्तन होऊ शकते. हे श्रीसरस्वतीच्या कृपेतून होते.

श्रीब्रह्मदेवांची कोठेही मंदिरे नाहीत, कारण ते कोणत्याही पूजेला येत

नाहीत. ते त्यांना व त्यांच्या साक्षीभावाच्या प्रतिनिधित्व (represents) करणाऱ्या सृष्टीची काळजी घेण्यात व्यस्त (बीझी) आहेत. पण या दैवताचे मुख्य कार्य आहे परम सौंदर्याची निर्मिती करणे, ते सौंदर्य जे जड सृष्टीतील विविध पोत (Texture), रंग, रेषा आणि आकार यांच्यामधून प्रकट होते. वैविध्य हे सौंदर्याचे सत्त्व असते आणि या वैविध्यातील समरसता (harmony) आत्मानंदाची निर्मिती करतो, जो जागृत मनाला जाणवतो. त्याची अनुभूती आनंदाच्या रूपाने मिळते. सृष्टीतले सौंदर्य पाहतांना कलाकाराला जाणवलेला आनंद तो आपल्या कलाकृतीतून व्यक्त करतो. अनेक कलाकार, जे महान जीव आहेत, आणि श्रीसरस्वतीचे पूजक आहेत, त्यांनी श्री ब्रह्मदेवांच्या भौतिक निर्मितीत भर घालून कलाकार नामक सूक्ष्म माणसांचा एक नवीन समाज स्थापन केला आहे. श्रीआदिशक्ती निसर्गात जो आनंदाचा वर्षाव करतात, त्याचा कलाकार आनंद घेतात आणि तो आनंद ते कलाकार स्वत: उपयोग केलेल्या रंग, रेषा आणि आकार यांच्या वैश्विक भाषेतून प्रकट करतात. संगीत, कला, नृत्य आणि इतर उत्कृष्ट कलाकृतींच्या रूपाने ते मानवी जीवन समृद्ध करतात. हा सर्व देवी सरस्वतींचा आशीर्वाद आहे. त्या पिंगला नाडीचे दैवत श्रीमहासरस्वती यांच्या प्रतिमा आहेत. मानवी प्रयत्नातून होणाऱ्या सृजनाला प्रणवाचा पुरवठा करण्याची जबाबदारी पिंगला नाडीची आहे.

आपण अशा निष्कर्षाप्रत आलो आहोत, की सर्व सृजनात्मक मानवी कार्य उच्च अवस्थेत परिणत हवे, की जिथे आपण त्याचे कौतुक करावे आणि आनंद घ्यावा यासाठी सूक्ष्म सौंदर्याची निर्मिती व्हावी. साधकाला सृजनशक्ती प्रदान करणाऱ्या देवी सरस्वतींचे पूजन करण्यापूर्वी प्रथम श्रीगणेशांचे पूजन करावे. ते साधकाला निरागसता देऊन आशीर्वाद देतात आणि देवीच्या मानसन्मानाचे (प्रोटोकॉल्स) आचरण करण्यासाठी मार्गदर्शन करतात. अशाप्रकारे सूज्ञतेचा आशीर्वाद मिळालेल्या साधकाच्या मार्गातील सर्व अडथळे श्रीगणेश दूर करतात. तसेच त्यांचे आशीर्वाद

कलाकाराच्या चुका सुधारणाऱ्या शक्तीचे कार्य करतात.

निरागसता, अबोधिता ही एकमेव स्वच्छ (शुद्ध) करणारी शक्ती आहे, जी लैंगिकतेच्या बंधनातून मुक्त करू शकते. अनैतिक लैंगिकतेत अडकलेला कलाकार, त्याच्या वागण्याचे समर्थन करण्यासाठी, त्याच्या वागण्याशी जुळणारी कलाकृती निर्माण करेल. लैंगिक विकृतीत खोल गेलेला कलाकार गुरु म्हणून ओळखला जात असला तरी त्याचे स्वत:च्या कलेवर प्रभुत्व नसते. हळू हळू कमी होणाऱ्या एकाग्रतेमुळे कलेवरचे त्याचे प्रभुत्वही जाते. शिवाय ज्या व्यक्तीने आपले मन लैंगिकतेकडे लावून मर्यादित केले आहे, त्याला आपली सृजनशीलता पूर्ण प्रकट करण्याचा आनंद मिळू शकत नाही. ही सृजनशीलता, श्री सरस्वतीच्या वैश्विक सत्य स्वरूपाची अनेक तेजांनी होणारी अभिव्यक्ती आहे. ज्याचे मन लैंगिकतेकडे लागले आहे असा माणूस जर संगीताच्या कार्यक्रमास गेला तर संगीतकाराच्या चेहऱ्यावरून किंवा शरीरावरून निम्नस्तरीय उत्तेजना मिळवायच्या मागे लागेल आणि त्याला जाणीवपूर्वक संगीताचा आनंद घेणे अजिबात शक्य होणार नाही. संगीतकार त्याच्या सादरीकरणामधून (परफॉर्मन्स) त्या माणसाचे समाधान करू शकणार नाही, की आनंद देऊ शकणार नाही. त्या माणसाचे डोळे हीन प्रकारच्या गरजा चाळवण्यासाठी चेहरे व शरीराकडे बघत फिरत राहतील.

पावित्र्य असल्याशिवाय जे सृजनात्मक निर्मिती करण्याचा प्रयत्न करतात, ते त्यांच्या कलाकृतीमधून नकारात्मक किंवा उत्क्रांतीच्या विरोधातील चैतन्य लहरी निर्माण करतात. त्याच्यातून पुढे, कलाकृतीमध्ये जे काही सुंदर आहे ते सर्व विच्छिन्न (disintegration) होऊ शकते. खरी कला त्या कलाकृतीत असते जी दिव्य आत्म्याची (Divine Spirit) अभिव्यक्ती करते आणि जिच्यामुळे कलाकार आणि कलेच्या आस्वाद घेणारे प्रेक्षक, दोघांतही, आत्मिक आनंद, मानसिक व आंतरिक शांती आणि आनंद निर्माण होतो. अनेक कलाकृतीत लैंगिक भावनेचा अंश

असतो. तो नसता तर त्या कलाकृती अपवादात्मक आणि अद्‌भुतरम्य झाल्या असत्या. श्रीगणेश निरहंकारीपणा आणतात असे नाही, पण ते प्रतिअहंकाराच्या संस्कारातून किंवा सवयीतून मुक्त करतात.

एखादा लेखक किंवा चित्रकार त्याच्या कामामधून स्वत:चे नैराश्य किंवा कडवटपणा व्यक्त करीत असल्यास आत्मसाक्षात्कारानंतर श्रीगणेश आत्मिक, आनंदरूपी आशेच्या किरणांनी असे जीवन अंधारापासून मुक्त करू शकतात. अन्यथा असे नैराश्याचा अंधार व्यक्त करणारे लेखन किंवा चित्र, खरे स्वातंत्र्य आणि उत्क्रांती यांच्या विरोधातील लहरी सोडतात. त्यांच्यामुळे सैतानी प्रतिसाद (प्रतिध्वनी) उठेल, जो कुटुंबे, समाज किंवा राष्ट्रेसुद्धा नष्ट करू शकेल. वास्तविक सर्व माणसांचा विकास, समृद्धी आणि अंतिम उत्क्रांती हा कलाकृतीच्या निर्मितीचा आधार असावा, पण हाच आधार सैतानी प्रतिसाद नष्ट करतो. अशी निर्मिती परमेश्वरी गौरव वृद्धिंगत होऊ देत नसल्याने उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर फेकली जाते. अशाप्रकारे ती गलिच्छपणा निर्माण करून दीर्घ कालावधीत, निर्मितीच्या एकसंध एकात्मतेचे तुकडे होण्यास कारणीभूत होते. अशा कलाकृती वरवर एकसंध, एकात्म दिसल्या तर त्या जास्तच अधार्मिक असतात.

जेव्हा अशी एकात्मता साध्य होते तेव्हाच मानव निर्मित कलाकृती सुंदर व चिरंतन अवस्थेची परम स्थिती (state of absoluteness) प्राप्त करू शकते. ही स्थिती तेव्हाच हाताशी येते जेव्हा कलाकार आत्मसाक्षात्कारानंतर जाणिवेच्या चौथ्या क्षेत्रात असतो. मूलाधार चक्र पावित्र्य आणि निरागसता देते, तर स्वाधिष्ठान चक्र सौंदर्याची सृजनशीलता व्यक्त करते.

# प्रकरण १४

# श्री आदिशक्तीच्या शक्ती आणि तीन गुण

श्रीआदिशक्ती परब्रह्माच्या शक्ती असून त्या एकमेव आणि एकात्म (integrated) शक्ती आहेत. त्या संपूर्ण व सर्वव्यापी शक्ती म्हणून अस्तित्वात असल्या तरी त्या तीन शक्तींच्या माध्यमातून प्रकट होतात. परंतु श्री आदिशक्तींच्या या तीन शक्तींना एकमेकींपासून पूर्णपणे वेगळे करता येणार नाही, कारण त्या एकाच व्यक्तिमत्त्वाच्या शक्ती आहेत आणि त्या व्यक्तिमत्त्वाच्या तीन गुणांची (मुड्स) अभिव्यक्ती आहेत.

यापेक्षा अधिक म्हणजे, श्रीआदिशक्तींच्या शक्तींचे प्रकट होण्याबद्दल जास्त स्पष्टीकरण देणे शक्य नाही, कारण ते माणसाच्या आकलनाच्या फार फार पलीकडे आहे. त्यांना समजण्यासाठी माणसाकडे जाणिवेचे (Perception) मर्यादित आयुध आहे. बासरीची उपमा देऊन त्यांच्याबद्दलचे स्पष्टीकरण देता येईल. बासरीतून वाहणारा हवेचा एकच प्रवाह असतो, पण तो सात सूर तयार करू शकतो. तशाच पद्धतीने श्रीआदिशक्तींची एक शक्ती तीन स्वरूपात प्रकट झाली आणि त्यांचे चौथे एकात्म स्वरूप हे या तीन शक्तींचे उगमस्थान आहे. श्रीआदिशक्तींच्या शक्तीचे संपूर्ण एकात्म स्वरूप प्रणव (रूह, अनहल्क, रुख, ओंकार किंवा पवित्र आत्मा) आहे. यावरून ओम् (प्रणव) तीन वेगळ्या स्वरूपांचे, अ, ऊ आणि म यांचे संघटन कसे आहे हे समजू शकते.

या शक्ती आहेत :

* भौतिक (किंवा जड) शक्ती
* अस्तित्व शक्ती
* धर्मशक्ती

## भौतिक शक्ती

ही शक्ती श्रीआदिशक्तींच्या कार्यप्रवणतेच्या गुणाची, त्यांच्या महासरस्वती अंगाची, रजोगुणाची अभिव्यक्ती आहे. त्या आदिपिंगला नाडीतून काम करतात. त्या नाडीचे प्रमुख दैवत श्रीब्रह्मदेव आहेत. ही नाडी आदि पुरूषाच्या (विराट शरीराच्या) मेंदूच्या डाव्या बाजूस आरंभ होऊन आदि आज्ञा चक्रातून विराट शरीराच्या उजव्या बाजूकडे येते. विराटाच्या आदि मेंदूत ती वैश्विक मन तयार करते, जो सृष्टीच्या भौतिक बाजूचा विचार, संघटन आणि निर्मितीचे कार्य करतो. श्रीहनुमान या नाडीवर हालचाल करतात. ते विराटाच्या पूर्व चेतित मनाचे प्रतिनिधित्व करतात.

उजव्या बाजूची महासरस्वतीची नाडी विश्वांची, आकाशगंगांची (गॅलॅक्सीज) आणि तारे, सूर्य-चंद्रासहित, अशा जड भौतिकाची निर्मिती करण्यास जबाबदार आहे. आदिपुरुषाच्या या नाडीवरील निर्मितीच्या कार्याने निरुपयोगी पदार्थांच्या वाफा तयार होतात. त्या आदि सामूहिक चेतना बाह्य मनात, विराटाच्या मेंदूच्या डाव्या बाजूला ज्याला आदि अहंकार म्हणतात, तिथे साठतात. एका रूपकाने हे चांगले समजू शकेल. एखाद्या कारखान्यात उर्जेचा पुरवठा करण्यासाठी ज्वलन होत असते आणि त्याच्यामुळे मोठ्या प्रमाणावर निरूपयोगी वाफा तयार होतात. त्या बाहेर गेल्या नाहीत तर कारखान्यातच साठतात. तसेच आदि पुरूषाचे आहे. तिथे या वाफा आदि पिंगला नाडीच्या वरच्या बाजूला आदि मेंदूच्या डाव्या बाजूला आदि अहंकारात नेल्या जातात. त्या वाफा साठविण्यासाठीच आदि अहंकाराची निर्मिती झाली आहे. त्याच पद्धतीने डाव्या बाजूच्या इडा नाडीच्या कार्यामुळे तयार झालेल्या वाफा आदि मेंदूच्या उजव्या बाजूच्या आदि प्रतिअहंकार नाडीच्या बाहेर वाहून नेल्या जातात.

## महासरस्वती शक्ती

या शक्तीद्वारा प्रणवाचे भौतिक शक्तीत परिवर्तन केले जाते.

आकाशगंगा (गॅलक्सी) आणि सूर्यमालिका निर्माण करण्यास श्रीआदिशक्ती लंबगोल आकारात फिरून मार्ग तयार करतात. (आकृती १ पाहा)

आकृती १ मध्ये दाखविल्याप्रमाणे श्री आदिशक्ती लंबगोलाकार मार्गावर फिरून पुन्हा पुन्हा त्याच स्थानावर परत येतात. काही वेळेस त्या वर्तुळाच्या (वलयाच्या) आकारात, स्वत:भोवती अनेक वेळा गोल गोल फिरतात. ते वर्तुळ प्रणवाने भरून घट्ट होईपर्यंत ही क्रिया होत राहते. ही घट्ट होण्याची क्रिया प्रणवाच्या संपृक्त अवस्थेपर्यंत होतच राहते आणि वर्तुळास तो धरून ठेवणे अशक्य झाल्यावर त्याचा स्फोट होतो आणि एका घन (सॉलिड) गोळ्याचे अनियमित कोन असलेले अनेक तुकडे होतात. या तेजस्वी व चक्राकार फिरणाऱ्या शक्तीचा वेग तुकड्यांना पण मिळतो आणि ते सुद्धा शक्तीच्याच वेगात स्वत:भोवती चक्राकार फिरतात. त्यामुळे त्याचे कोन लहान तुकड्यात तुटून वेगळे होतात. चक्राकार फिरण्याने आणि घर्षणाने तुकडे गोलाकार व गुळगुळीत होतात. मूळचे लंबगोल आकारात फिरणे आणि गोल आकार देणारी चक्राकार गती, दोन्ही मिसळून त्यांचे संयोग (काँबिनेशन) तयार होतो. अशा प्रकारे गोल आकार मिळालेले पदार्थ (बॉडीज) स्वत:भोवती फिरत केंद्रस्थानी असलेल्या सूर्याच्या भोवताली लंबवर्तुळ आकाराच्या परिघावर फिरतात.

सूर्य गोल फिरतो, पण तो आदि पिंगला नाडीवर स्थिर (फिक्स्ड) आहे. आपली आकाशगंगा प्रणवाच्या खालून वर वर्तुळाकार फिरण्याने (spiral movement) तयार झाली आहे. अशा प्रकारे विविध स्तरावर आणि विविध काळात अनेक वेळा विश्वाची रचना केली गेली आणि विनाश केला गेला.

आपल्या सूर्यमालिकेत माणसाला निर्माण करण्यास मंच म्हणून पृथ्वीची निवड केली गेली. ज्या पद्धतीने पृथ्वीची निवड केली गेली, ज्या पद्धतीने पृथ्वीला बनवून सूर्यमालिकेत बसवले गेले ती फार मानवी

स्वरूपाची होती. आरंभी आता जी पृथ्वी आहे, तिला सूर्यापासून तोडून दूर नेऊन चंद्राच्या जवळ घेऊन गेले. चंद्र आदि इडा नाडीवर बसवलेला होता.

या स्थानावर पृथ्वी फार जलद थंड होऊन पूर्णपणे गोठली होती. श्री महासरस्वतीच्या कृपेने तिला पाण्यात भिजवले किंवा आपल्याला म्हणता येईल त्यांनी प्रेमाच्या अश्रूंनी तिला भिजवले. नंतर तिला सूर्याच्या अगदी जवळच्या स्थानावर आणले ज्याच्यामुळे सूर्याच्या किरणांनी तिची गोठलेली स्थिती कमी केली. गोठलेल्या स्थितीत पृथ्वीचा आकार घटला आणि ती पूर्णपणे बर्फाने झाकली गेली. सूर्याच्या फार जवळ आणल्यामुळे बर्फ वितळवून सगळा पृष्ठभाग पाण्याने व्यापला. पाण्याच्या खाली पृथ्वीच्या गाभ्यातल्या गरम लाव्हाने कासवाच्या कवचाप्रमाणे अर्धवर्तुळाकार (curved) पृष्ठभाग तयार होऊन तो वर ढकलला जाऊन पाण्याच्या बाहेर आला. लाव्हा आणि गरम वायू पाण्याच्या संपर्कात आल्यावर ते थंड होऊन कठीण झाले. जेव्हा लाव्हाने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला आणि फटी तयार झाल्या तेव्हा पृथ्वीचा सर्वात वरचा पृष्ठभाग (crust) तयार झाला.

या फटींतून लाव्हा बाहेर आला आणि त्यामुळे पर्वत बनले. सूर्याच्या उष्णतेने पृथ्वी भाजली आणि कठीण झाली. लाव्ह्याने नव्याने दबाव टाकला आणि विषुववृत्तावर आणि दक्षिण गोलार्धावर तडे पडले. पृथ्वीला पुन्हा चंद्राजवळ नेण्यात आले आणि मोठे नवीन तडे बर्फाने झाकले गेले. थंड व गरम करण्याची ही प्रक्रिया अनेक वेळा पूर्ण केली गेली. अशा प्रकारे महासागर तयार केले.

यानंतर सूर्य आणि चंद्र यांच्यामध्ये असलेल्या आणि जिथे जीवसृष्टी निर्माण होईल आणि टिकेल, अशा योग्य जागी सुव्यवस्थित (ॲडजस्ट) करून पृथ्वीला आणले गेले. बराच काळ लोटल्यानंतर पृथ्वीला गोठवण्याच्या आणि थंड करण्याच्या त्याच प्रक्रियेने ॲमिनो ॲसीड्स, जी जीव सृष्टीची बीज होती, समुद्राच्या पाण्यात आणली गेली. विद्युत चुंबकीय

लहरींचा (इलेक्ट्रोमॅग्नेटिक व्हायब्रेशन्स) सूर्याकडून येणाऱ्या ऑक्सिजनशी संयोग होऊन जीवसृष्टीचे अस्तित्व तयार झाले. विद्युत चुंबकीय लहरी व सूर्यकिरणांमुळे प्राणाचे स्पंदन झाले. पहिल्या प्रथम श्रीआदिशक्तीच्या दोन शक्तींनी भौतिकतेची शक्ती व अस्तित्वाची शक्ती यांनी एकात्म पद्धतीने एकत्र काम केले.

ही जीवनाची (प्राण) सुरूवात होती. प्रत्यक्ष जीवसृष्टी निर्माण झाल्यावरसुद्धा पृथ्वीला सुव्यवस्थित (अॅडजेस्ट) करून सूर्याच्या जवळ अशा योग्य स्थानी आणले की ते स्थान जीवसृष्टीच्या अस्तित्वास आणि प्रगती करण्यास अगदी योग्य होते. श्रीआदिशक्ती, आदिमाता यांनी हे सुंदर व नाजुक व्यवस्थापन काळजीपूर्वक व ईश्वरी प्रेमाने केले.

आदिनाभी चक्राच्या बाहेरून येऊन वाढलेले आदि स्वाधिष्ठान चक्र आदिमातेने कसे तयार केले. ते स्पष्टपणे स्वाधिष्ठान चक्रावर विशद केले आहे. श्रीआदिविष्णूंच्या नाभीमधून एक कमळ उगवले आणि त्या कमळाच्या वरच्या भागात श्रीब्रह्मदेवांचा जन्म झाला. ते आदि स्वाधिष्ठान चक्राचे प्रमुख दैवत असून निर्मिती करण्याची त्यांची भूमिका पार पाडण्यास परमेश्वरी शक्तीचा उपयोग करतात. हे चक्र भवसागरात वर्तुळाकार, घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरते. श्रीआदि ब्रह्मदेवांवर जीवनाची भौतिक बाजू सांभाळण्याची जबाबदारी आहे आणि ते श्रीआदिशक्तीच्या शक्तीमधून जड भौतिकाची निर्मिती करतात.

स्वाधिष्ठान चक्रावरील प्रकरणात श्रीब्रह्मदेवांचे सविस्तर वर्णन केले आहे. श्रीब्रह्मदेव भौतिक ज्ञान (सायन्स) आणि सौंदर्यशीलता (कला), जे जड भौतिक आणि त्यातून तयार झालेली सृष्टी यांचा आधार आहे, त्यांना मानवामध्ये उघड करतात. सृष्टीमधील वैविध्य आणि समरसता (हार्मनी) यांच्या माध्यमातून ते श्रीआदिशक्तीची सौंदर्यशीलता अभिव्यक्त करतात. निसर्गाचे सर्व सौंदर्य त्यांच्यातून निर्मिले जाते. श्रीआदि सरस्वती त्यांची

पत्नी आणि शक्ती आहेत. त्या शिक्षणाची आणि ज्ञानाची तसेच कला आणि संगीताची देवता असून श्रीआदिशक्तींचे एक अंग आहेत. परम परिपूर्ण सौंदर्यशीलता (absolute aesthetics) आत्म्याच्या आनंदाच्या लाटा निर्माण करते, तसेच नाजुक कलाकृतींची निर्मिती करते आणि श्रीआदि सरस्वती मूर्तिमंत परम सौंदर्यशीलता आहेत. त्या मनुष्याला पण ज्ञान प्रदान करतात आणि अशाप्रकारे त्यांना आपल्या सृजनातील सौंदर्याच्या मूल्यांचे आकलन करण्याची अनुज्ञा देतात.

हे लोंबकळणारे आदि स्वाधिष्ठान चक्र, नाभी या केंद्रस्थानाच्या भोवताली विविध स्तरांवर वर्तुळाकार फिरते. अशाप्रकारे तयार होणाऱ्या वर्तुळाला आदिभवसागर म्हणतात. पृथ्वी व बाकी सूर्यमालासहित सर्व जड विश्व या आदिभवसागरात सामावलेले आहे. हे वर्तुळ आदिनाड्यांना दोन ठिकाणी छेदते. जिथे ते प्रथम आदि पिंगला नाडीला छेदते त्या स्थानावर सूर्याची स्थापना झाली आहे, तर जिथे ते प्रथम आदि इडा नाडीला छेदते त्या स्थानावर चंद्राची स्थापना झाली आहे. या कारणामुळे आदिपिंगला नाडीला सूर्य नाडी म्हणतात, तर आदि इडा नाडीला चंद्र नाडी म्हणतात. क्षीरसागराच्या टप्प्यावर (अवस्थेत) त्या नाड्या उभ्या रेषेत हलतात, तर भवसागराच्या टप्प्यावर (अवस्थेत) त्यांच्या हालचाली केंद्राला धरून होतात. 'ह' म्हणजे सूर्य आणि 'ठ' म्हणजे चंद्र. तेव्हा हठयोग याचा अर्थ या दोन नाड्यांचे एकत्र येणे. तीन नाड्यांवरच्या या स्थानांवर सूर्य, चंद्र आणि पृथ्वी यांच्या सूक्ष्मकेंद्रांना बसवले आहे :

- जिथे नाभी केन्द्र (आदि नाभी चक्र) आदि पिंगला नाडीला स्पर्श करते तिथे सूर्याला स्थापन केले आहे.
- चंद्राला डाव्या हृदय केंद्रावर (आदि अनाहत चक्र) आदि इडा नाडीवर स्थापन केले आहे.
- पृथ्वीला कुंडलिनीच्या निवासाच्या (मूलाधार) मागे स्थापन केले

आहे.

आदि-मेंदूची (Primordial Brain) डावी बाजू आदि अहंकाराचे प्रतिनिधित्व करते. विराटाच्या उजव्या बाजूला आदि पिंगला नाडी असून ती नाडी चेतना बाह्य मन तयार करते. चेतना बाह्य स्तरावर अहंकारातून काम करणाऱ्या सर्व लोकांना मृत्यूनंतर ठेवले जाते. विचार करणाऱ्या, योजना बनवविणाऱ्या आणि अहंकाराचे अतिरेकी प्रदर्शन करणाऱ्या अशा सर्वांना मृत्यूनंतर चेतना बाह्य क्षेत्रात ठेवले जाते. इंद्रिय निग्रह आणि शिस्त यांच्यात रमलेले लोक चेतना बाह्यतेत जाण्याची शक्ती विकसित करतात. मृत्यूनंतर ते या भागात फार अहंकारी मृतात्मे म्हणून वास्तव्य करतात. बाहेरून तो फार नम्र वाटेल, पण त्यांच्या अंतरंगात प्रचंड मोठ्या प्रमाणावर अहंकार फोफावतो. पुढे ते दुसऱ्यांना दु:खी करून आनंदी होणारी माणसे म्हणून जन्म घेतात. जन्मले नाहीत, तर मृतात्मा या रूपात, अहंकार वाढलेल्या जिवंत माणसातून प्रकट होतात आणि त्यांना शक्ती देतात. वैश्विक चेतना बाह्य मनात (Cosmic supra conscious mind) सात आडवे स्तर आहेत आणि उजव्या बाजूस पिंगला नाडीच्या पलीकडे व तिला समांतर सात उभ्या नाड्या (गायत्री, सावित्री वगैरे) आहेत. जेव्हा साधक योग करून शोध घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो चेतना बाह्य मनात जातो. असा साधक कृत्रिम संस्कृतीपासून दूर जंगलात राहून गुरूचे मार्गदर्शनात साधना करेल, तरच त्याला अनेक उच्च अवस्था मिळवता येतील. हा मार्ग अनेक अडथळे आणि मोहांनी भरलेला आहे. या धोक्याच्या मार्गाने ध्येय प्राप्तीसाठी हठयोग, राजयोग या पद्धती आहेत. त्यांचे वर्णन या पुस्तकात यापूर्वी केले आहे.

जे अहंकारी मृतात्मे जन्म घेत नाहीत ते अर्धवट हठयोगी (pseudo hathayogis) आणि खोटे राजयोगी यांच्या मनात घुसून त्यांना ताब्यात घेतात (possess). त्यांना सिद्धीनामक शक्ती देतात आणि मृतात्म्यांच्या मदतीने नसलेल्या वस्तू काढून दाखवण्याचे खेळ (ट्रिक्स) करतात.

ज्याच्यात भौतिक सोने किंवा राख यांच्यासारख्या जड गोष्टी तयार करतात किंवा परिवर्तित करतात, अशा सिद्धींचे प्रदर्शन करणारे लोक आत्मसाक्षात्कारी नसतात आणि त्यांना आत्मसाक्षात्कार देणे फार अवघड असते. बहुतांशी त्यांचे गुरु उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर फेकलेले सैतान असतात. खरे महान साक्षात्कारी जीव (सिद्ध) फार थोडे असतात.

परमेश्वरी साक्षात्काराच्या स्थितीपर्यंत पोहोचलेले जीव, ज्यांना श्रीब्रह्मदेव आपल्या शक्ती प्रदान करतात, असे लोक फार दुर्मिळ असतात आणि आपल्या सिद्धीचे ते केव्हाच प्रदर्शन करीत नाहीत. कारण त्या शक्ती त्यांना अजिबात महत्त्वाच्या वाटत नाहीत. यांच्यापैकी दैवते आणि श्रीहनुमान आणि श्रीयेशू ख्रिस्तांसारखे अवतार असतात. या शक्ती त्यांच्या स्वभावाचा भाग म्हणून त्यांना मिळतात आणि त्या शक्तीमधून श्रीब्रह्मदेवांच्या कृपेने, सूर्य, पाऊस व इतर महाभूतांना नियंत्रणात ठेवू शकतात.

आकाशात उडणे, पाण्यावर तरंगणे, जमिनीखाली पुरून घेणे, सूर्योदय थांबवणे, समुद्र पिणे, अशा प्रकारच्या शक्ती, शरीराच्या बाहेर टाकलेल्या मृतात्म्यांच्या मदतीने करता येतात. तोतया लोकांना खऱ्या सिद्धांपासून सहज वेगळे काढता येते. सिद्ध लोक स्वतःच्या प्रगतीसाठी, कीर्ती मिळवायला किंवा भौतिक समृद्धी मिळविण्यासाठी शक्तींचा उपयोग करीत नाहीत.

असाक्षात्कारी लोक तोतये असून करामती (ट्रिक्स) करण्यासाठी, शरीराच्या बाहेर टाकलेल्या मृतात्म्यांच्या सिद्धी वापरतात. काही शक्तिशाली आणि समर्पित पतिव्रता स्त्रिया त्यांच्या पतीवरच्या हटवादी व स्वार्थी प्रेमाने, भौतिक गोष्ट प्रकट करण्याच्या सिद्धींवर प्रभुत्व मिळवितात. थोड्या साक्षात्कारी जीवांचा अपवाद सोडल्यास, बाकी सर्वजण ध्येयसिद्धीसाठी चेतना बाह्य स्तरातील भूतांची मदत घेतात. पिंगला नाडीवर काम करून अहंकार वाढविण्यासाठी शक्तीचा उपयोग करतात. हळूहळू त्यांच्या

स्वभावातील भावनेची बाजू संपते आणि ते स्वभावाने इतके कोरडे होतात की शाप देऊन दुसऱ्याला भस्मसात् करू शकतात. त्यांच्यात परमेश्वरी प्रेम समजण्याची कुवत नसते. अशा एकांगी अमानवी प्रवृत्तीने आत्मसाक्षात्कार मिळविणे अतिशय अवघड असते. बहुतेक सर्व सैतानी स्वभावाचे होतात. हटवादीपणाने ब्रह्मचर्याचे आचरण करणाऱ्यांपैकी फार थोड्यांना मुक्ती मिळते. जे ब्रह्मचर्याला प्रेमाने संतुलित ठेवतात, अशांनाच वाचवता येते. अशा फारच थोड्या केसेस असतात. ते खरे योगी असतात. कारण जंगलात राहून ते शक्ती संचय करतात. ते निसर्ग मातेच्या सान्निध्यात राहतात आणि गुरूंच्या मार्गदर्शनात हठयोगाच्या सहा नियमांचे आचरण करतात.

हठयोग आणि राजयोग करण्यास विवाहितांना मज्जाव आहे. कारण या कठीण मार्गावर जाण्यास शिष्यांना सर्व शक्ती पवित्र करावी लागते. त्यांना अशा गुरूकडून शिक्षण घ्यावे लागते, जो साक्षात्कारी जीव आहे आणि ज्याचे जीवन भक्तिपूर्ण, प्रेममय असून तो शिष्यांकडून कोणतेही पैसे घेत नाही. खरे योगी श्रीआदिशक्तींची विविध रूपात उपासना करतात. त्यांच्या भावनिक बाजूचा त्यांचे गुरु सांभाळ करून पोषण करतात. गुरु स्वतः उत्क्रांत जीव असून त्यांच्या शिष्यांना प्रेमाने आणि काळजीपूर्वक वागवतात. या मार्गावरील साधकांना, सर्व समर्पण असूनही हजारो वर्षे अभ्यास व कष्ट करावे लागतात. शेवटी, जेव्हा ते थकतात, तेव्हा ते स्वयंस्फूर्तीने सहजयोगाला शरण जातात. सहजयोग त्यांच्यात सर्वव्यापी प्रणवाच्या माध्यमातून आदिशक्तीची कृपा भरतो. ज्यांनी या मार्गाने पूर्ण शुद्ध होऊन आत्मसाक्षात्कार मिळविला आहे असे योगी फार दुर्मिळ असतात पण ते उच्च गुणवत्ता असलेले असतात.

हठयोगात साधक कठीण इंद्रिय निग्रह करून आपले शरीर व मन शुद्ध करतो. तर सहजयोगात साधकाला स्वच्छ आणि लवकर शुद्ध करणारे चैतन्य लहरींचे आशीर्वाद मिळतात. आपल्या इच्छित स्थळी चालत जाणे आणि

त्याऐवजी मोटारीने जाऊन तो प्रवास फारच थोड्यावेळेत पूर्ण करणे, यातला जो फरक आहे, तोच फरक हठयोग आणि सहजयोगात आहे.

चेतनाबाह्य आत्मे विराटाच्या शरीरात उजव्या बाजूकडे मिळतात. असे जीव मृत्यूनंतर तिथे जातात आणि पृथ्वीवर पुन्हा पुन्हा जन्म घेतात. त्यांच्या पैकी काही दुसऱ्या टोकावर जाऊन डाव्या मार्गावरचे जीवन आचरू लागतात. चेतनाबाह्य लोक जे याच नाडीवर कार्य करणे चालू ठेवतात, पुढे सिद्धी मिळवितात आणि भौतिक समृद्धीसाठी त्यांचा उपयोग करतात. असे सर्व अतिरेकी वागणारे लोक (केसेस) उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या बाहेर आणि नरकात पडतात. त्यांना धर्म नसल्याने किंवा त्यांच्या चक्रावर नियंत्रण ठेवणारी दैवते नसल्याने ते राक्षस म्हणून पुन्हा जन्म घेतात. परमेश्वराच्या योजनेच्या बाहेर एकटेच कार्यान्वित असल्याने ते कॅन्सरपेशींप्रमाणे स्वतंत्र (malignant) होतात आणि उद्धट होऊन परमेश्वराचे दूत असल्याचा बहाणा करतात. ते खोटी आश्वासने (promise) देतात व कोणत्याही जबाबदाऱ्या घेत नाहीत.

## अस्तित्व शक्ती

ही शक्ती श्रीआदिशक्तीच्या महाकाली अंगातील इच्छेच्या गुणास (मूड), तमोगुणास अभिव्यक्त करते. या शक्तीने प्रणवाचे, अस्तित्वाच्या शक्तीत परिवर्तन होते. अस्तित्वाची शक्ती, श्रीआदिशक्तीच्या निर्मिती करण्याच्या इच्छेस अभिव्यक्त करते. इच्छा याचा अर्थ श्रीआदिशक्तीच्या हृदयात कोणत्याही निश्चित रंग-रूपाविना जन्मलेली. असेही म्हणता येईल, की ती अद्याप अभिव्यक्तीच्या प्रकाशात आलेली नाही आणि त्यामुळे तिला अंधाराचा तमोगुण (मूड) म्हणतात. इच्छा ही श्री आदिशक्तींच्या परमेश्वरी प्रेमाची भावना आहे. म्हणून ती श्रीआदिशक्तींच्या भावनेची अभिव्यक्ती आहे आणि तिला महाकाली शक्ती म्हणतात. कालानुसार, कार्यरत होणारा हा त्यांचा पहिला गुण (मूड) आहे.

महाकालीची नाडी (आदि इडा नाडी) आदि मेंदूच्या उजव्या बाजूकडे

उद्‌भवते आणि आज्ञा चक्र ओलांडून आदि हृदयाच्या जवळून आदि मूलाधार चक्रात जाते. माणसात हे चक्र पेल्व्हिक प्लेक्सेसचे नियंत्रण करते. त्याच्या सब-प्लेक्सेसपैकी एक माणसात लैंगिकतेवर नियंत्रण करते. ही नाडी विराटाच्या आदि सुप्त चेतीत मनाचे प्रतिनिधित्व करते. तिचे प्रमुख दैवत श्रीशिव असून त्यांचे स्थान आदि अनाहत चक्राचा डावीकडचा भाग हे आहे. ते आदि इडा नाडीचे (अस्तित्व नाडी) नियंत्रण करतात. हे अनाहत चक्र माणसात कार्डियाक प्लेक्सेसचे नियंत्रण करते. या नाडीच्या कार्यातून उद्‌भवणाऱ्या वाफा विराटाच्या मेंदूत साठतात आणि आदि प्रति अहंकार तयार होतो. या पृथ्वीवर जे काही मृत्यू पावते ते सर्व आदि प्रति अहंकारातून, आदि सामूहिक सुप्त चेतित मनात एकत्र केले जाते. ही नाडी विराटाच्या डाव्या बाजूस असते. मृत्यू पश्चात सर्व माणसे, प्राणी आणि अनुभव या प्रदेशात जातात.

श्रीशिव हृदयाच्या अवयवाचे नियंत्रण करतात. ते परमेश्वराच्या श्रीसदाशिव या साक्षी स्वरूपाशी संलग्न असतात. परमेश्वराच्या हेतूंची त्यांना पूर्ण जाणीव असते. विराटाच्या शरीरात आदि पुरुषाचे हृदय जीवित लंबगोल असून ते साडेतीन वलयात ईश्वरी शक्तीच्या साक्षीभावाच्या लहरी प्रसारित करते. जोपर्यंत आदि पुरुषाचे हृदय परमेश्वराच्या वास्तव्याने स्पंदित होत असते, तो पर्यंत सृष्टी अस्तित्वात असते. परमेश्वराला सृष्टीचे लीला नाटक थांबवायचे असते तेव्हा आदि हृदयाचे स्पंदन थांबवून सृष्टीचा संहार करण्याचे काम (भूमिका) श्री शिवांची असते. शिवाय श्री शिव तांडवाने (संतापून नृत्य करीत) सर्व सृष्टी नष्ट करू शकतात. तांडव नृत्य श्री शिवांचा क्रोध अभिव्यक्त करते. त्यांच्या क्रोधाने घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेला लहरी सोडतात. हे जेव्हा होते तेव्हा विराटाचे शरीर विरघळते.

### महाकाली शक्ती

भगवान शिव हृदयाच्या अवयवावर राज्य करतात आणि जीवित

जगाचे शरीर नसलेल्या आत्म्यांच्या आक्रमणापासून रक्षण करतात. काही वेळेस त्यांची शक्ती व पत्नी श्रीपार्वती आदि अनाहत चक्राच्या मधल्या भागात प्रवेश करतात. त्यांनी भवसागराच्या पोकळीत संतांना त्रास देण्याचा प्रयत्न करणाऱ्या राक्षसांचा संहार करण्यास अनेक वेळा अवतार घेतले आहेत. आदि सुप्त चेतित मन, अनेक आडव्या जाणाऱ्या स्तरांनी (चॅनल्स) घडलेले आहे. प्रेतलोकाचे सात स्तर त्यांच्यामुळे तयार झाले आहेत. त्यामध्ये मृतात्मे पुन्हा जन्म घेईपर्यंत निवास करतात. त्यांच्या कर्मांप्रमाणे त्यांना या स्तरांवर ठेवले जाते. याशिवाय डाव्या नाडीत अनेक समांतर जाणाऱ्या उपनाड्या आहेत. त्यांची हस्तिनी, डाकिणी, राकिनी, शकिनी वगैरे अशी नावे आहेत. म्हणून त्यांच्यामध्ये गत जन्म आणि त्यातले अनुभव असे विस्तृत जाळे (नेटवर्क) आहे.

संहारक श्री शिव या स्वरूपातील आदिपुरुषाच्या या नाडीवरील कार्याने वाफा तयार होतात. त्या आदि मेंदूच्या उजव्या बाजूकडे असलेल्या आदिप्रतिअहंकारात एकत्र होतात. विराटाच्या शरीरात डाव्या बाजूस असलेल्या आदि सामूहिक सुप्त चेतित मनाशी जोडलेला असतो. अशा प्रकारे आदि मेंदूची डावी बाजू विराटाचा आदि अहंकार दर्शवणाऱ्या आदि चेतना बाह्य मनाने झाकलेली असते तर उजवी बाजू विराटाचा आदि प्रति अहंकार दर्शविणाऱ्या आदि सुप्त चेतित मनाने झाकलेली असते.

सर्व शरीर नसलेले मृतात्मे, जे पृथ्वीवर मृत होतात आणि अत्यंत आळशी व निष्क्रिय असतात, ते आदि सामूहिक सुप्त चेतित मनात असतात. जे लैंगिक विकृतीच्या उपभोगात तसेच मद्यपान, आणि ड्रग्ज यांच्यात अडकलेले असतात, त्यांना मृत्यूचे वेळी सेंट मायकेल (श्रीभैरव) आदि इडा नाडीच्या टोकाकडे फेकून देतात. श्रीभैरव, श्रीशिवांचे सहाय्यक असून चंद्र नाडींची जबाबदारी त्यांची असते. हे भटकणारे लोक पुन्हा पुन्हा जन्म घेतात. त्यांना स्वत:ला सुधारून विषयोपभोगाची गुलामगिरी

थांबवण्याची संधी मागून संधी दिली जाते.

परंतु असे जीव जे त्यांची ईश्वर विरोधी कृत्ये करीतच राहतात, ते चिखलात अधिक खोलवर रुतत जातात. शेवटी त्यांना नरकात फेकले जाते आणि ते स्वतंत्र (Malignant दूषित कॅन्सर पेशींप्रमाणे) होतात. परमेश्वराच्या योजनेपासून वैश्विक पुरूषाबरोबरच्या संलग्नतेपासून स्वतंत्र होऊन आपली कृत्ये करत राहतात. शेवटी सैतानी आणि भ्रष्ट व्यक्तित्वे म्हणून जन्म घेतात. त्यांची कुंडलिनी त्यांना सोडून जाते आणि त्यांच्यात आत्म्याचा (परमेश्वराचे प्रतिबिंब) निवास नसतो. मुळात अहंकारी असल्यास ते उद्धट स्वभावाचे व बढाया मारणारे असतात, पण वैश्विक सुप्त चेतना क्षेत्रातून आल्यास, ते लबाड आणि कावेबाज असतात. ते दुसऱ्यांच्या मनात घुसतात. त्यांच्याच प्रकारच्या विषयोपभोगात रमलेल्या लोकांना ते ताब्यात घेतात. जादूटोणा वगैरे काळ्या कलात ते तरबेज असतात आणि गूढ विज्ञानाचे आचरण करतात.

कलियुगात अनेक भ्रष्ट व राक्षसी भुतांनी जन्म घेतला आहे. माणसांना प्रभावित करण्यास आणि आपल्या कंपूत आकर्षित करण्यास ते भौतिक चमत्कारांचे प्रदर्शन करतात. संत आणि परमेश्वरी दूत असल्याचे भासवतात, पण स्त्रिया आणि पैसा यांच्यात मग्न असतात. उघडपणे मद्यपान करतात आणि लैंगिक स्वैराचाराचे शिष्यांमध्ये गुणगान करतात. ते सैतानी राज्य स्थापण्यास पृथ्वीवर येतात. त्यांच्या कह्यातल्या लोकांच्या अहंकार आणि प्रतिअहंकारात राहतात. खाली दिलेल्या पैकी एका पद्धतीने ते प्रवेश करतात :

१. लैंगिकतेमधून मूलाधार चक्रात

२. अन्न-पाणी यांच्यातून नाभी चक्रात

३. डोळ्याद्वारे प्रेमाचे खेळ (फ्लर्ट) करून आज्ञा चक्रात

कोणत्याही एका केंद्रात स्थिर राहून ते शारीरिक, बौद्धिक, मानसिक

नुकसान करतात. प्रभावित व्यक्ती काही बाबातीत अतिरेकी स्वभावाची होते. आजच्या आधुनिक काळात, ढासळणाऱ्या समाज व्यवस्थेत आणि मानवी मूल्ये वाऱ्यावर सोडण्यात त्यांचा प्रभाव स्पष्ट दिसू शकतो.

अशा लोकांसाठी श्रीदत्तात्रेयांनी नरक बनवला आहे. दत्तात्रेय म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेश (शिव) ह्यांची त्रिमूर्ती. या भागाचे स्थान, विराटाच्या शरीराच्या बाहेर आणि श्रीगणेशांच्या सोंडेच्या खालच्या भागात ठेवले आहे. अनेक धर्मांच्या ग्रंथात त्याचे सविस्तर वर्णन आहे. तिथे राहणाऱ्या काही राक्षसांनी श्रीशिवांना किंवा श्रीब्रह्मदेवांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना काही वरदाने दिली गेली. त्या वरदानामुळे त्यांना विशेष शक्ती (पॉवर्स) मिळाल्या. परलोकाचे स्थान आदि इडा नाडीच्या पलीकडे आहे, पण नरक लोक आदि मूलाधार चक्राच्या लगेचच खालच्या केंद्रात आहे. जिथे नरक धारण केला जातो. त्या जागा वैश्विक सामूहिक सुप्त चेतित मनाच्या (प्रेतलोक) आणि वैश्विक सामूहिक पूर्वचेतित मनाच्या (परलोक) समोरच आहेत. श्रीगणेश सोंडेतून फुंकर मारून सर्व अहंकारी व कावेबाज राक्षसांना नरकात ढकलतात. कोणत्या नरकात ते राहणार हे श्री गणेश किती जोरात फुंकतात त्याच्यावर ठरते.

## धर्मशक्ती

धर्माची शक्ती ही श्रीआदिशक्तींच्या प्रकट करण्याच्या (revelatory) गुणाची (मूड्स), सत्त्वगुणांची, त्यांच्या महालक्ष्मी अंगाची अभिव्यक्ती आहे. त्यांच्या प्रेमळ संगोपनाने त्या जड भौतिकाला रंगरूप आणि गुणधर्म देतात. जणू काही त्यांचे आश्वासक प्रेम जडाला, त्यांच्या धर्माद्वारे (किंवा पोषणाद्वारे) सर्व पैलू एकत्र धारण करण्याची आज्ञा देतात. उदा. सोन्याच्या गोळीला (नगेट) त्याचा स्वत:चा विशिष्ट असा, चमकणारा व पिवळ्या रंगाचा गुणधर्म आहे. सर्व पिवळे व चमकणारे पदार्थ सोने असतील असे जरूरीचे नाही, पण खरे सोने, सोनेच असते कारण ते पिवळ्या रंगाचे,

चमकणारे असते आणि कलंकित होत नाही. कलंकित न होण्याचा गुण हा सोन्याचा धर्म (sustenance).


## श्रीमहालक्ष्मी शक्ती

जिथे श्रीआदिशक्तींचा प्रकट करण्याचा सत्त्व गुण (मूड) अभिव्यक्त होतो, ते स्थान आहे श्रीमहालक्ष्मीचा मध्यमार्ग (आदि-सुषुम्ना नाडी). जड भौतिकाच्या गुरुत्व मध्यातून तो कार्य करतो, तर सर्व एकात्म करणारी प्रणवाची शक्ती सर्व जड पदार्थांच्या अक्षातून (Axis) कार्य करते. जीवित शरीरात मध्यात असलेल्या अक्षातून (Axis) धर्म कार्य करतो. विराटाच्या शरीरात नाभी केंद्रातून (आदिनाभी चक्रातून) तो कार्य करतो.

पदार्थमात्राचे (मॅटर) भौतिक अंग हा त्याचा जड भाग आहे. परमेश्वरी शक्ती प्रणव ही श्रीआदिशक्तीची एकमेव आणि एकात्म शक्ती आहे. त्यांच्या तिन्ही शक्ती जड आणि जीवित शरीरात असतात. पण धर्माची समग्र करणारी शक्ती लपलेली असते. प्रणव त्याची कार्यान्वित करण्याची क्षमता प्रकट करतो आणि पदार्थमात्रात भौतिक शक्ती (मटेरियल पॉवर) या स्वरूपात व्यक्त होतो, पण त्याची अजून दोन अंगे, अस्तित्व (existence) आणि धर्म (sustenance) पदार्थ मात्राच्या प्रत्येक कणात सुप्त अवस्थेत निवास करतात. जडात विद्युत-चुंबकीय शक्तीच्या रूपाने अस्तित्व जाणवते तर जीवित शरीरात प्राण (जिवंतपणा) म्हणून व्यक्त होते. धर्म (sustnece) अभिव्यक्त होतो प्रत्येक पदार्थाच्या तत्त्वाला (element) त्याचे वैयक्तिक गुणधर्म देण्यात. एकात्म शक्ती प्रणवाचे अस्तित्व पदार्थमात्राच्या प्रत्येक कणात, गुरुत्व मध्यावर किंवा गुरुत्वाच्या रेषेवर स्थापित केलेले असते. पदार्थमात्राच्या सूक्ष्म भाग ही शक्ती असते. ती पदार्थमात्राच्या अगदी केंद्रस्थानी असते आणि पदार्थमात्रातील आत्म्याला साक्षी म्हणून असते. उत्क्रांतीमधून सूक्ष्म हळू हळू जाणवू (evident) लागते व कार्यरत होते. फक्त मानवामध्येच 'सूक्ष्म' आत्मा या स्वरूपात पूर्ण अभिव्यक्त होतो. त्याचे

स्थान हृदयात असले, तरी साधकाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यावरच त्याची अनुभूती येते.

परमेश्वराची अशी तीन अंगे (aspect) असून ती आदिपुरुषात कार्यान्वित असतात. चौथे अंग परमेश्वराची एकात्म शक्ती असून तिला महान आदिपुरूषाच्या (विराट) मस्तकावर स्थापन केले आहे. आदि पुरूष हे परमेश्वराचे प्रक्षेपण आहे. ते कधी अवतार घेत नाहीत, पण सर्वव्यापी, निरंतर, सर्वशक्तीमान स्वरूपात असतात. त्यांच्या शक्तीच्या (श्रीआदिशक्तीच्या) लीला नाटकाचे प्रेक्षक असून ते वैकुंठ स्तरावर (अवस्थेत) असतात.


The creation of elements (on other page)
The matter is created out of elements which
are created out of their causal essenses. The
causal essences are the expression of the
organs of perception of the Adishakti.
The fragrance of her body creates the earth
Her taste creates the water. Her sight or vision
created the light. Her breathing created the air
Her voice created the sky the firmament. The
her fragrance, her taste her sight- her breathing
her voice are the five causal essenses (Tanmatras)
(Tamoguna)
Thus the material power is expressed as elements.
These elements are acted upon later on by activating
mood (Rajoguna) and by sustenence mood (Satwa guna) through
through human elements which is also created by
Adishakti. The human elements ~~thus~~ brings forth
the synthesis of all these three moods as
shown below. One can thus understand the
great importance of human life in the play of
Adishakti. (Now type on page (7) front side

*प.पू.श्रीमाताजींचे हस्तलिखित*

## पंचमहाभूतांची निर्मिती

पदार्थमात्राची (Matter) पंचमहाभूतांमधून जडणघडण झालेली असते आणि पंचमहाभूते त्यांच्या कारणात्मक सत्त्वांमधून तयार होतात. कारणात्मक सत्त्वे (तन्मात्रा) श्रीआदिशक्तींच्या ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांची अभिव्यक्ती असतात :

* त्यांच्या शरीराच्या सुगंधाने पृथ्वीतत्त्व बनले.
* त्यांच्या रसनेने जलतत्त्व बनले.
* त्यांच्या डोळ्यांच्या दृष्टीमुळे प्रकाश किंवा अग्नितत्त्व बनले.
* त्यांच्या श्वासोच्छवासाने वायूतत्त्व बनले.
* त्यांच्या आवाजाने आकाशतत्त्व बनले.

त्यांचा सुगंध, रसना (चव), दृष्टी, श्वासोच्छ्वास आणि आवाज ही पाच कारणात्मक सत्त्वे (तन्मात्रा) पंचमहाभूते निर्माण करतात. ज्यांच्यातून भौतिक शक्ती (Material Power) अभिव्यक्त होते. या पंचमहाभूतांवर तीन गुण (सत्त्व, रज, तम), मानवी तत्त्वांच्या माध्यमातून कार्य करतात. मानवी तत्त्वांनासुद्धा श्रीआदिशक्ती बनवतात. मानवी तत्त्वे तीन गुणांना एकत्र करतात. त्याचे सविस्तर वर्णन खाली दिले आहे व त्याच्यावरून श्रीआदिशक्तींच्या लीला नाटकात मानवी जीवनाचे महत्त्व स्पष्ट होईल.

## पृथ्वी तत्त्व

पृथ्वी तत्त्व सुगंध तन्मात्रेतून तयार झाले. पृथ्वीचे शरीर हे भौतिक शक्तीचे प्रकटीकरण आहे. पृथ्वीचे स्वत:भोवती फिरणे, परिघातून जाणे आणि गुरुत्वाकर्षणाची शक्ती यांच्यावर रजोगुणाचा (कार्यान्वित करण्याचा मूड) प्रभाव कारणीभूत आहे. धर्माची शक्ती (सत्त्वगुण) पृथ्वीच्या, तिच्यावर राहणाऱ्या सर्वांना धारण करण्यातून व्यक्त होते. ही धारणा शक्ती पृथ्वीच्या चुंबकीय अक्षातून (magnetic axis) प्रकट होते. म्हणून संस्कृतात

पृथ्वीला धरा म्हणतात. चुंबकीय शक्ती इतक्या सूक्ष्म पद्धतीने व्यक्त होते की तिचे फक्त कवीच वर्णन करू शकतात. सर्व एकात्म करणारी शक्ती प्रणव, पृथ्वीचा सुगंध म्हणून व्यक्त होते. पृथ्वी सर्वप्रकारच्या वनस्पतींमधून स्वत:ला व्यक्त करते तर प्रणव सर्व फुलांचा सुगंध म्हणून व्यक्त होतो. अंतिमत: सुगंध तन्मात्रा पृथ्वी तत्त्वातून व्यक्त होते. विशेषत: मधमाशांना आकर्षित करणाऱ्या फुलातून व्यक्त होते. मधुकराचे फुलांवर प्रेम असते आणि अतिशय काळजीपूर्वक व नाजुकतेने ते परागकण गोळा करतात.

सुगंध सर्वांत महत्त्वाचे तत्त्व (तन्मात्रा) असून ते माणसांना एकमेकांकडे आकर्षित करते आणि प्रेम व्यक्त करण्यास आणि आकर्षित करण्यास त्याचा उपयोग होतो. यासाठी माणसे नेहमी अत्तर, कोलन किंवा फुलांचा गुच्छ अशा कृत्रिम गोष्टींचा उपयोग करतात. पण जी व्यक्ती साक्षात्कारी जीव आहे आणि परमेश्वरी प्रेम प्रसारित करते आहे, त्याला याची गरज नसते. श्रीआदिशक्ती त्यांच्या चुंबकीय शक्तीने विविध तत्त्वांचे अणू (atoms) व्यवस्थित रचतात (arrange) माणसे पदार्थमात्रास भौतिक शक्तीमध्ये, उदा.चुंबकीय शक्ती, प्रकाश आणि वीज, बदलू शकतात, पण कुंडलिनी जागृत झाल्यावर सहजयोग तसे एकत्रीकरण (synthesis) करू शकतो. ही घटना घडते तेव्हा साधकाच्या शरीरातून फुलांचा व धूपाचा सुगंध जाणवतो. हे एकत्रीकरण (synthesis) सुगंध तन्मात्रा, जे पृथ्वीतत्त्वाचे कारणात्मक सत्त्व (casual essence) आहे, ते प्रकट करते. सुगंध तन्मात्रा सर्व मानवात असते आणि त्याचेच मूलाधार चक्र बनले आहे.

**जल तत्त्व**

जल हे दुसरे तत्त्व आदिशक्तींच्या स्वाद या कारणात्मक सत्त्वापासून, ज्याला रस तन्मात्रा म्हणतात, त्याच्यापासून तयार झाले आहे. इतर तत्त्वांप्रमाणे हे तत्त्वसुद्धा इतर सर्व तत्त्वांवर काम करते. उदा. प्रकाशाने याच्यावर (जलावर) काम केल्याने त्याला चमकण्याचा गुणधर्म मिळतो.

इच्छेचा गुण, तमोगुण, त्याच्या कार्याने समुद्र, नद्या, विहिरी इत्यादींमधले साधे पाणी या रूपात हे तत्त्व प्रकट होते. पण जेव्हा कार्यान्वित करण्याचा गुण, रजोगुण, कार्य करतो तेव्हा याचे विविध रूपात परिवर्तन होते. जसे बाष्पीभवनाने पाऊस, बर्फ इ. तसेच दुसऱ्या कार्याशी एक झाल्याने उदा.गरम होणे, किंवा गोठणे, पाण्याची वाफ किंवा बर्फ बनते. सत्त्वगुणाची धर्माची शक्ती जलावर कार्यान्वित झाल्यावर त्याला जिवंतपणा येतो. उदा.जिभेवरचा स्वाद, पचनसंस्थेतील पाचक रस, रक्ताचा खारटपणा, वीर्याचा गुण, शरीराला घाम येण्याने शरीर थंड, नरम, लवचिक, घाटदार व सुंदर राहणे. पाण्यातले धर्माचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याचा स्वच्छ करण्याचा गुण. प्रणवाच्या कार्याने साध्या पाण्याला एक नवीन आयाम (डायमेंशन) दिले जाते. पाण्याला परमेश्वरी चैतन्य लहरींच्या अस्तित्वातून आशीर्वादित केले जाते, तेव्हा ते माणसाला पावित्र्य देते. ईश्वरी पाणी प्रवाहित करणाऱ्या व राधा-कृष्णांचे प्रेम व्यक्त करणाऱ्या गंगा नदीला अशा चैतन्य लहरी आहेत. तुम्ही गंगेचे पाणी बाटलीत भरून महिनो न महिने ठेवले, तरी तुम्हाला आश्चर्य वाटेल, त्याच्यात इतर पाण्यात होतात तसे कोणतेही जीव-जंतु बनत नाहीत. पाणी कायम स्वच्छ राहते.

साक्षात्कारी जीवाने चैतन्य लहरी दिल्यावर पाण्याला व्याधीमुक्त करण्याचा गुणधर्म येतो. ते पाणी, सोलर प्लेक्सेसचे नियंत्रण करणाऱ्या नाभी चक्राच्या जास्त कार्य करण्याने झालेले आजार बरे करते. नाभीचक्र मुळातच जलतत्त्वापासून बनवले असल्याने पोटाचे सर्व आजार, चैतन्य-लहरीमिश्रित पाण्याने बरे होतात. जॉन द बाप्टिस्ट (John The Baptist) यांनी बाप्तीस्मा देण्यास पाण्याचा उपयोग केला. स्वत: महान साक्षात्कारी जीव असल्याने त्यांच्या पदस्पर्शाने जॉर्डन नदी चैतन्यित झाली. त्यांनी त्या चैतन्यित पाण्याच्या उपयोगाने त्यांच्याकडे बाप्तीस्मासाठी येणाऱ्यांची कुंडलिनी जागृत केली.

धबधब्यातील पाण्यातून विद्युत भार (इलेक्ट्रिकल चार्जेस) काढता येतात. त्यासाठी पाण्याच्या (H2O) अणूचे (मॉलेक्यूलचे) दोन परमाणू (atoms) हायड्रोजन आणि ऑक्सिजन वायूमध्ये वेगळे केले जातात. वास्तवात, हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्या अॅटम्सना एकत्र बांधून ठेवणारा विद्युत भार विद्युत शक्ती म्हणून प्रकट होतो. पाणी वीज निर्माण करते आणि वीज हायड्रोजन व ऑक्सिजन यांचे पाण्यात परिवर्तन करते. पण विजेचे, विचार व प्रेम करणाऱ्या प्रणवात परिवर्तन करता येत नाही, पण साक्षात्कारी जीवाने, परमेश्वरी चैतन्य लहरी देऊन चैतन्यित केलेले पाणी विचार आणि प्रेम करू शकते. सैतानी व्यक्ती असे पाणी प्यायला तर तो उलटी करून बाहेर काढेल. तेच पाणी एखादा संत प्यायला तर त्याला पोटाचा आजार असल्यास तो बरा होईल.कुंडलिनी जागृत होत असताना, साधकाचे चित्त अधिक अधिक सूक्ष्म होत जात एकत्रीकरणाच्या प्रक्रियेत जाते व ती सूक्ष्म शक्ती बनते, जी प्रकाश, वीज, नाद, चुंबकत्व अथवा जलविद्युत यांच्या रूपाने अभिव्यक्त होते.

**प्रकाश / अग्नी तत्त्व**

प्रकाश किंवा अग्नी या तत्त्वाची निर्मिती आदिमातेच्या दृष्टी या कारणत्मक सत्त्वातून (तन्मात्रा) झाली. म्हणून श्रीआदिशक्तींची दृष्टी ही अग्नीची तन्मात्रा आहे. तमोगुणाच्या, इच्छेच्या गुणाच्या (मूडच्या) प्रभावाने अग्नी प्रज्वलन शक्ती बनतो. जिच्यामुळे लाकूड किंवा कोळसा जळून राख होतात. पृथ्वीच्या शरीरातील अग्नीसुद्धा, तमोगुणाच्या प्रभावाने भूकंपास कारणीभूत होतो. कार्यान्वित करण्याच्या रजोगुणाच्या गुणामध्ये (मुड), अग्नीचा स्वयंपाक करणे किंवा भट्टीतील अग्नी अशा मानवी कार्यास उपयोग होतो. सत्त्वगुणाच्या प्रकट करण्याच्या गुणामध्ये (मूड) अग्नी, जिवंत प्राण्यांच्या शरीरातील ऊर्जेच्या रूपाने अभिव्यक्त होतो. उदा.तापमान किंवा ज्वर. प्रणवाने आशीर्वाद दिल्यावर अग्नितत्त्व, पवित्र अग्नीचे रूप घेतो. अशा

अग्नीमध्ये प्रचंड चैतन्य लहरी असतात. उदा.चर्चमधल्या मेणबत्त्यांमधील अग्नी, मशिदीत जळणारा धूप, पारसी लोकांच्या अग्नीमंदिरात पूजलेला अग्नी, साक्षात्कारी जीव एकत्र येऊन जिथे ध्यान करतात, त्या मंदिरातला प्रकाश किंवा अग्नी असे प्रकाश किंवा अग्नी परमेश्वरी चैतन्य लहरी प्रसारित करतात. प्राचीन काळात, विविध शस्त्रांनी (अग्निबाण) परमेश्वरी अग्नी प्रक्षेपित करण्याच्या उपयोगाने राक्षसांचा संहार केला जायचा. साक्षात्कारी जीवांच्या (आत्मज) घरातील ध्यान करण्याच्या जागेवर किंवा स्वयंपाकघरामध्ये जळणारे अग्नीसुद्धा पवित्र अग्नी असतात. कारण अशा अग्नीमध्ये राक्षसी शक्तींचा संहार करण्याची क्षमता असते आणि ते योग्यांच्या नकारात्मक चैतन्य लहरी ओढून घेतात. हिंदूंच्या यज्ञ समारंभातील अग्नी साक्षात्कारी जीवांच्या (योगी) चैतन्य लहरी ओढून घेतात आणि यज्ञ समारंभात केलेल्या प्रार्थनाच्या अनुसार त्यांना आशीर्वाद देतात. पण त्यासाठी यज्ञ करण्यास योग्य ब्राह्मण (ब्रह्माला जाणणारे) असणे आवश्यक असते. ते द्विज (दोन वेळा जन्मलेले), म्हणजे साक्षात्कारी जीव किंवा योगी असायला पाहिजेत. आत्मसाक्षात्कारी जीवच खरे ब्राह्मण होत, ख्रिश्चन, पारसी, शीख किंवा मुस्लिम. बाकी सर्वांना कोणत्याही धर्माविषयी बोलण्याचा अधिकार नाही. कारण ते अद्याप परमेश्वराच्या जिवंत शक्तीशी जोडलेले नसतात. म्हणून जे साक्षात्कारी नाहीत अशा जीवांनी धर्माच्या नावाखाली केलेले विधी कृत्रिम व निरर्थक असतात. ते करण्याचा अधिकार असावा लागतो आणि असा अधिकार परमेश्वर फक्त साक्षात्कारी जीवांनाच देतात.

जेव्हा साधकाला आत्मसाक्षात्कार मिळतो, तेव्हा प्रणव पंचमहाभूतांचे अस्तित्व प्रकट करतो. सहजयोग्याला विजेसारखी शक्ती (चैतन्य लहरी) त्याच्या टोकांमधून बाहेर पडत असल्याचे जाणवते. त्या प्रणवाचे परमेश्वरी चैतन्य लहरी (व्हायब्रेशन्स) आहेत, पण त्या त्याच्या स्वभावातला विजेचा

भाग दर्शवितात. त्या चैतन्य लहरी चुंबकीय असून प्रकाश किंवा तेज प्रसारित करतात. हे घडते तेव्हा हृदयाच्या ठोक्यांचा आवाज ऐकू येतो आणि प्रकाशाचे विविध आकार व रंग दिसू शकतात.

साधनेचे दोन चरम (Extreme) मार्ग आहेत. पहिल्या मार्गात साधक कोणत्याही प्रेमाशिवाय हट्टाने इंद्रिय निग्रह करून स्वत:ला कठीण शिस्त लावतो. दुसऱ्या मार्गात साधक विषयोपभोगाच्या वासनेत लिप्त राहून स्वत:च्या इच्छा पूर्ण करतो. पहिल्या मार्गाने तो लैंगिक आणि इच्छा त्यांच्यापासून दूर धावतो. या दोन्ही पैकी कोणत्याही मार्गाने साधकाला परमेश्वरी साम्राज्य मिळणार नाही. मध्यमार्गापासून उजव्या बाजूला (इंद्रिय निग्रह व शिस्त) आणि डाव्या बाजूस (विषय लोलुपता) टोकाला जाण्याने साधक धर्माच्या पोषक मार्गापासून विचलित होतो. यामुळे अधार्मिक व्यक्तित्त्व विकसित होते. पदार्थमात्र धर्मविहीन झाल्यावर तो अपदार्थमात्र (non-matter) होतो, त्याचप्रमाणे धर्मविहीन झाल्यावर मनुष्य अमानुष (किंवा अमानवी) होतो. हायड्रोजन अणुमधून (मॉलेक्यूल) धर्म वेगळा करून माणसाने हायड्रोजन बाँब तयार केला. तसेच माणसांमधला धर्म वेगळा केल्यावर माणूस कॅन्सरच्या पेशीप्रमाणे स्वतंत्र होऊन इतरांचा विचार करत नाही व हवे तसे वागतो. असा मनुष्य, ज्याच्यामुळे एकात्मता येते, तो समग्रतेच्या स्रोतापासून (source of integration) पूर्णपणे वेगळा होतो. पुन्हा पुन्हा जन्म घेऊन सत्यापासून तसेच जे सामूहिक आहे त्याच्यापासून अधिक दूर जातो. परमेश्वरी प्रेमाच्या शक्तीपासूनसुद्धा वेगळा होतो. एकदा सैतानी शक्तींसाठी रस्ता तयार झाला, म्हणजे मोठ्या संख्येने निरागस लोकांना मोहित व भ्रमित करण्यास फक्त एक राक्षसी व्यक्तित्त्व पुरेसे असते. हिटलर आणि त्याच्या दुष्कृत्यातल्या साथीदारांचे सैतानी वागण्याचे कारण आपल्याला समजते. हिटलर एक असे राक्षसी व्यक्तित्व होता, की जो अगणित शरीर विरहित भूतांना पृथ्वीवर ओतण्यास व निष्पाप लोकांना बाधित करण्याचे माध्यम झाला.

## वायु तत्त्व

श्रीआदिशक्तींच्या श्वासोच्छ्वासाचा परिणाम स्वरूप वायू तयार झाला आणि तो श्रीआदिशक्तींच्या स्पर्श संवेदनाचे कारणात्मक सत्त्व (तन्मात्रा) आहे. वायु हे ऑक्सिजन, हाइड्रोजन, नायट्रोजन आणि कार्बन डाय ऑक्साईड व इतर वायूंचे एकत्रीकरण असून तमोगुणाच्या प्रभावाचा परिणाम आहे. मानवी कार्यासाठी व जीवनासाठी वापरला जाणारा वायू, रजोगुणाच्या प्रभावात असतो. माणूस जी हवा बाहेर सोडतो तिला प्राण (जीवन शक्ती) म्हणतात आणि त्याच्यावर सत्त्वगुणाचा प्रभाव असतो. अशा वायूची तीन रूपे असतात. अपान, समान आणि उदान. अपान वायु पोटाच्या खालच्या भागात वायु (गॅसेस) या रूपात असतो. साक्षात्कारी जीवाच्या भोवतालची हवा, त्याने श्वास घेतल्यावर पवित्र असते कारण ती हवा त्याच्या देहातील चैतन्य लहरी ओढल्यामुळे पवित्र होते. महान अवतारांच्या जन्मभूमीची (अवतार भूमी) हवा प्रचंड चैतन्यित असते. अशा देशातील लोकांचे समाधानी जीवन असते. त्यांच्याजवळ भौतिक समृद्धी नसेल, पण ते कधी तक्रार करीत नाहीत. त्यांच्या नैराश्याच्या परिणामातून क्रांती होत नाही आणि ते अधीरतेने प्रतिक्रियात्मक पद्धतींचा अवलंब करीत नाहीत.

वायु, शरीराला जिवंतपणा व हलकेपणा देतो. माणसात कुंडलिनी शक्तीचे उत्थापन होतेवेळी त्याला शरीरात खालच्या बाजूने वर जाणारी हवेची हालचाल जाणवते. कुंडलिनी ही अस्तित्वाची शक्ती आहे (श्रीगौरी ही श्रीमहाकाली शक्ती असल्याने) आणि तिच्यात प्राण (जीवनाचा श्वास) आहे. कुंडलिनीतील प्राण, हा प्राणासहित शेष मानवी चित्त किंवा चेतित मन असतो. शिवाय आत्मसाक्षात्कारानंतर साधकाला त्याच्या शरीरात हलकेपणा जाणवतो. मस्तकाचा सगळ्यात वरचा भाग उघडून प्राण मानवी चित्ताशी एकात्म होतो आणि सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीशी जोडला जातो.

पुढे व्यक्तीचे चित्त ईश्वरी शक्तीमध्ये मिसळते आणि शरीरात सामूहिक चेतना येते. असा माणूस आपली जाणीव इतरांमध्ये पाठवू शकतो आणि त्यांची जाणीव स्वत:च्या मध्यवर्ती मज्जासंस्थेवर समजू शकतो. ही वायुतत्त्वातून होणारी परमेश्वरी शक्तीची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे. प्रणवातील प्राणाचा भाग अशा अवस्थेत जातो, की जिथे तो हवेप्रमाणे संपूर्ण मानवी जाणिवेत विस्तारित होतो. पुढे तोच प्रणव मानवी चित्ताबरोबर सर्व जड व जीवित पदार्थात मिसळतो.

**आकाश तत्त्व**

आकाश तत्त्व श्रीआदिशक्तींच्या आवाजाच्या कारणात्मक सत्त्वांतून तयार झाले. या जगातील सर्व नाद दोन वस्तू एकमेकांवर आपटण्याने निर्माण होतो. जलप्रपातांचे, नद्यांच्या खळखळाटाचे आवाज, पर्वतांचे श्वासोच्छ्वासाचे आवाज या सर्वांवर तमोगुणाच्या इच्छेच्या गुणाचा (मूडचा) प्रभाव असतो. आदि कुंडलिनीमधून होणाऱ्या प्रणवाच्या हालचालींनी दोन प्रकारचे आवाज निर्माण होतात. पहिला चक्रांमधून वर जातो व दुसरा आवाज करीत चक्रांच्या पाकळ्यांमधून बाहेर पडतो. पहिला उत्थापित होणारा एकत्रित (synthesised) झालेल्या प्रणवाचा आवाज असतो, तर दुसरा विश्लेषण (analysed) झालेल्या प्रणवाचा असतो. माणसे ज्याचा उपयोग करतात असा आवाज संगीताच्या वाद्यांचा आवाज आणि संगीतासाठी काढलेला माणसाचा आवाज, रजोगुणाच्या प्रभावाखाली असतात.

नादाची भौतिक शक्ती साक्षात्कारी जीवाने ताल किंवा तंतूवाद्याने किंवा गळ्यातील आवाजाने निर्माण केल्यावर पूर्णपणे ईश्वरीय होते. उदा.असाक्षात्कारी जीवांनी मंत्रपठण केल्यास किंवा दैवतांशी संवाद साधल्यास त्याच्यामुळे देवतांशी संपर्कात अडथळा तयार होतो. उलट दैवते अशा अनधिकृत पद्धतींवर फार रागवतात. माणसांनी हे समजायला हवे की

दैवतांकडे जाण्यास त्यांचे मानसन्मान पाळावे लागतात. त्यांच्या अज्ञानास क्षमा नाही. उदा.असाक्षात्कारी जीव, श्रीकृष्णांचे नाव घेत बसल्यास त्याला घशाचा त्रास व शेवटी घशाचा कॅन्सर होऊ शकतो. साक्षात्कारी जीवांनी किंवा योग्यांनी मंदिरात दैवतांचे आवाहन करण्यास किंवा परमेश्वराच्या पूजनासाठी केलेल्या आवाजात चैतन्य लहरी असताता किंवा त्यांच्या आवाजातून चैतन्य लहरी मिळतात. मंत्र परमेश्वरी आवाज असतात आणि धर्मग्रंथातील कवितेची भाषा, नादतत्त्वाच्या संपूर्ण ईश्वर अभिव्यक्तीवर आधारित असते. पवित्र बायबलमधील लॉर्ड्स प्रेयर (देवाची प्रार्थना) आणि नाम (सहस्रनाम किंवा १०८ नावे) शुद्ध मंत्र असतात. पारसी लोकांचा अवस्था ग्रंथ आणि हिंदूंचे मंत्र हे ईश्वरी शब्द असून ते परमेश्वरी चैतन्य लहरींनी युक्त असतात. या शब्दांचे असाक्षात्कारी लोकांनी उच्चारण केल्यास त्यांचा कोणत्याही अर्थ नसतो आणि ते परमेश्वराशी कनेक्शन जोडून देत नाहीत. अपवित्र लोकांनी ते उच्चारल्यास ते दैवतांच्या क्रोधाचे बळी होऊ शकतात. अशी माणसे सुप्त चेतनेच्या प्रदेशात किंवा चेतना बाह्यतेच्या प्रदेशात जाऊन पडतील. परमेश्वरी शक्ती, एकात्म शक्ती शब्द रूपात व्यक्त होते. त्या शब्दाला ओम् किंवा लोगोस किंवा अनहल्क म्हणतात.

एक वैज्ञानिक जो भौतिक शक्तीवर काम करतो त्याला परमेश्वरी शक्ती समजणे फार अवघड असते. त्याने हे लक्षात घ्यावे, की निर्मितीचे नाटक हे केवळ भौतिक शक्तीशी संबंधित नाही, तर त्याच्यात समाविष्ट आहेत, परमेश्वरी शक्ती व अवतार शक्ती. शिवाय त्याच्यात प्रेमाचे अंग आहे, वैचारिक अंग आहे, निर्मितीचे अंग आहे आणि शेवटी भौतिक अंग आहे. सृष्टीच्या सृजनामध्ये एखाद्या महान माणसाची प्रेमाची गुणदशा (मूड्स) असते. श्रीआदिशक्तींनी स्वत:च्या स्वामींवरच्या परम परमेश्वरावरच्या प्रेमाची रोमांचक (romantic) अभिव्यक्ती त्याचप्रमाणे त्यांच्या मुलांवरच्या

प्रेमाची तसेच सृष्टीवरच्या प्रेमाची अभिव्यक्ती या स्वरूपात निसर्गाला (प्रकृतीला) निर्माण केले. सृष्टी ही फक्त शुष्क, बेचव, असंवेदनशील, जड, मृत पदार्थाचे किंवा विजेप्रमाणे भौतिक शक्तीने घडवलेली नाही.

इतिहासातील विविध काळात व अवस्थेत श्रीआदिशक्तींच्या सर्व अवतारांबरोबर संबंधित दैवतेही होती. त्या दैवतांनीसुद्धा स्वत:ला मानवी अवतारात अभिव्यक्त केले होते. वेगवेगळी दैवते आणि विविध अवतारांच्या उपयोगाने श्री आदिशक्तींनी त्यांच्या सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीचे विविध गुणामध्ये परिवर्तन केले आहे. उदा.जीवनवृक्षात प्रवाहित असणारा जीवन रस, यामुळे फांद्या, फुले, बीजे आणि काटे यांना तयार करतो. या परमेश्वरी शक्तीचे वेगवेगळ्या कार्यांच्या मूड्स मध्ये परिवर्तन करण्याची वेगवेगळ्या दैवतांची जबाबदारी असते.

*‘सृजन’ या विषयावर दिनांक २०/०२/१९७७ रोजी दिल्लीमध्ये श्रीमाताजी द्वारा देण्यात आलेले प्रवचन....*

आज आपण ‘सृजन’ बद्दल बोलण्याचे ठरविले आहे. पण आपल्या आयोजकांना आपल्याला खडू व फळा देणे जमले नाही. मला माहीत नाही, चित्र काढल्याशिवाय ते समजावण्याचा मी प्रयत्न करते.

हा फार अवघड विषय आहे, पण तुम्हाला समजेल असा तो करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. पण सृष्टीची निर्मिती (सृजन) अशा अवघड विषयाकडे पूर्ण लक्ष द्यावे अशी मी तुम्हाला विनंती करते.

तुमच्यापैकी पुष्कळांना चैतन्य लहरी समजतात हा आजचा फार मोठा आशीर्वाद आहे आणि एवढेच नाही, तर तुम्हाला याचे ज्ञान व समज (अनुभव) आहे, की चैतन्य लहरी विचार करू शकतात व प्रेम करू शकतात. हा फार मोठा आशीर्वाद आहे. अर्थात् तुमच्या पैकी काहींना ते मिळाले नाही. पण ज्यांना मिळालंय त्यांना हे ज्ञान आहे, की चैतन्य लहरी (व्हायब्रेशन्स) संघटित करू शकतात, कारण ते कुंडलिनी चढवतात. जिथे कमतरता तिथे दयेने जातात, त्या भागात जातात जिथे कमतरता (व्हायब्रेशन्सची) आहे. त्यांना समजते, त्यांचे वैश्विक स्वरूप, त्यांचा वैश्विक स्वभाव, ती संघटित करतात आणि ती प्रेम करतात. ती तुमच्या प्रश्नांना उत्तरे देतात, तुम्ही प्रश्न विचारता तेव्हा त्यांच्याकडून उत्तरे मिळतात. ती जिवंत व्हायब्रेशन्स आहेत. ती व्हायब्रेशन्स ‘परमेश्वरी (डिव्हाईन)’ कडून येतात. या परमेश्वराला ब्रह्म, ब्रह्म तत्त्व – ब्रह्माचे तत्त्व असे म्हणतात.

आपल्याला असे म्हणता येईल, की सृष्टीचे सृजन ही चिरंतन प्रक्रिया आहे, म्हणजे बीजाचा वृक्ष होतो आणि तो वृक्ष पुन्हा बीज होतो व ते बीज वृक्ष होते. हे होतच असते. हे चिरंतन आहे. याला सुरूवात नाही आणि याचा शेवटही होऊ शकत नाही. हे होतच राहते. म्हणून याच्या अस्तित्वाच्या विविध अवस्था असू शकतात. तुम्ही असे म्हणू शकता, की ‘असण्याची’ अवस्था. तेव्हा प्रथम केवळ ‘असणे’ आहे. ते ब्रह्म आहे. तेव्हा काहीच अस्तित्वात नसते. काहीच नाही असे आपण म्हणतो. जेव्हा काहीच नाही असे आपण म्हणतो तेव्हा तो सापेक्ष शब्द असतो, कारण आपण अस्तित्वात नसतो. म्हणून आपण म्हणतो, की काहीच अस्तित्वात नाही. हा सापेक्ष शब्द आहे. जेव्हा आपण अस्तित्वात नसतो तेव्हा आपल्यासाठी प्रत्येक गोष्ट नसतेच. काहीतरी असते, पण ते आपण स्वत: नसतो. म्हणून त्याचा संदर्भ घेऊन (त्याच्या सापेक्षतेने) आपण म्हणतो, ‘ते काही नाही.’

म्हणून फक्त शब्द आहे ‘ब्रह्म’. तुम्ही म्हणू शकता किंवा कल्पना करा, की शक्ती

आहे. हवे असेल तर म्हणू शकता, की ऊर्जेचे (शक्तीचे) एक रूप अस्तित्वात आहे. पण ती शक्ती एका ठिकाणी (एका बिंदूत) एकत्र येते व न्यूक्लियस (केन्द्रबिंदु) तयार करते. ती शक्ती जी विचार करते, जी विभागली जाते, जी एका बिंदूत एकत्र येते – बिंदूवर एकाग्र होते असेही म्हणता येईल. ज्या बिंदूला आपण सदाशिव म्हणतो, तो हा बिंदू आहे. हे घडते, कारण ती शक्ती इच्छा करते, विचार करते, संघटित करते, प्रेम करते. जेव्हा निर्मिती करायची असते, जेव्हा त्या शक्तीमध्ये निर्मिती करण्याची इच्छा झाल्याचे जाणवते त्या वेळी न्यूक्लियस निर्मिला जातो. या न्यूक्लियसला आपण सदाशिव म्हणतो. हा न्यूक्लियस नाहीसा होत नाही. तुम्ही चमकणारा ढग, चमकणाऱ्या ताऱ्यांचा समूह अशाही कल्पना करू शकता. मला म्हणायचंय की कशाचा तरी संदर्भ घेऊन तुम्ही कल्पना करू शकता. जे परम परिपूर्ण, ॲबसोल्यूट स्वरूप आहे, त्याची कल्पना करू शकत नाही. पण तुम्ही अशा एका अवस्थेची कल्पना करू शकता जिथे फक्त शक्ती आहे आणि निर्मिती नाही. पण ती शक्ती वीज नाही, चुंबकत्व नाही, की तसे काही नाही. तर ती शक्ती सगळ्यांचा संयोग (कॉम्बिनेशन) आहे, सिंथेसिस आहे. ज्याचा लय होतो, जे लयाला जाते, ते सर्व ती शक्ती होते, त्या शक्तीमध्ये त्याचा संयोग होतो. त्या बिंदूत ज्याला आपण न्यूक्लियस म्हणतो, त्याच्यात सगळ्याचा विलय होतो. या बिंदूला आपण सदाशिव म्हणतो. हे सदाशिव ईश्वर सर्वशक्तिमान देव आहेत.

आता आपण याला परमेश्वर म्हणू कारण आता याला मर्यादा आहे, अशा अर्थाने की आपण काही नाव देऊ शकतो. फक्त शक्ती असेल तर आपल्याला ब्रह्म म्हणावे लागेल. आपल्याला असे म्हणता येईल, पाण्याचे बर्फ झाल्यावर आपण पाणी आणि बर्फ यांच्यात फरक करू शकतो. पण तरीसुद्धा हे सापेक्ष आहे, तुलनात्मक समजणे आहे. या अवस्थेत सर्वशक्तिमान देव, परमेश्वर स्वरूप धारण करतात आणि त्यांना जाणीव (आयडेंटीटी) असते, अस्तित्व असते. म्हणून आपण म्हणू शकतो, की हे ब्रह्म नाही तर अस्तित्व आहे. अस्तित्वाला त्याचे तेजोवलय (ऑरा) असते असे म्हणता येईल, प्रकाश असतो. हा प्रकाश परमेश्वरी प्रेम आहे. हा वेगवेगळे आकार धारण करतो, परंतु सदाशिव मात्र जसे आहेत तसेच राहतात.

आता निर्मितीची इच्छा तेजोवलयात (ऑरा) पाठवली जाते. ऑरा ही परमेश्वरी शक्ती असते. ईश्वराच्या पलीकडे काही गोष्टी असतात व काही त्याच्यासमोर असतात. परमेश्वराच्या पलीकडे काही गोष्टी असतात, ज्यांच्यावर त्यांचे नियंत्रण नसते. एक म्हणजे त्यांच्या चिरंतन स्वभावावर त्यांचे नियंत्रण नसते. चिरंतन असणे हे त्यांचा स्वभाव आहे. ते थांबवू शकत नाहीत. ते स्वरूप बदलत राहतील हा त्यांचा स्वभाव आहे. त्यांचा चिरंतन स्वभाव ते बदलू शकत नाहीत. ते चिरंतन असणार आहेत, चिरंतन असणे, चिरंतनत्व हा

त्यांचा स्वभाव आहे. त्याच्यावर ते मात करू शकत नाहीत.

उदाहरणार्थ परमेश्वर तुमचे सत्याची निवड करण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकत नाहीत. त्यांना ते करणे शक्य नाही. एकदा दिल्यावर ते काढून घेणार नाहीत. तुमच्या सर्व स्वतंत्रतेत तुम्ही ते निवडायला हवे. परमेश्वर तुमच्यावर सत्याची निवड करण्याची सक्ती करणार नाहीत. अनेकांना तशी आशा आहे, पण ते चुकतात. या स्थितीत, पूर्ण विनाश किंवा पूर्ण पुनरुत्थान एवढाच फक्त प्रश्न आहे. आता सत्याचा स्वीकार करायची इच्छा आहे, की असत्याच्या मागे जाण्याची, हा निर्णय माणसाच्या हातात दिला आहे.

तेव्हा तुम्हाला निवड करण्याचे सर्व स्वातंत्र्य दिले आहे. परमेश्वराच्या बाबतीत मी सविस्तर बोलणार नाही, कारण तो फार सूक्ष्म विषय असून त्याच्यासाठी फार लक्ष देण्याची गरज आहे. याबद्दल अनेक लोकांशी मी पूर्वी बोलले आहे. त्यांचा सर्व स्वभाव वगैरे, ते सर्व त्यांना माहिती आहे. पण ते साक्षी आहेत साक्षीच्या स्वरूपात आहेत, पण ते कशाचे साक्षी आहेत? ते सृष्टीचे साक्षी आहेत आणि या सृष्टीची निर्मिती करणारी जी शक्ती आहे ती त्यांची शक्ती आहे, त्यांची पत्नी आहे. आता आपण माणसांना हे समजत नाही, की पती–पत्नी इतके एक कसे असू शकतात. उदा.तुम्हाला हे समजेल, की सूर्य आणि सूर्यप्रकाश, चंद्र आणि चंद्रप्रकाश या दोन गोष्टी एकच आहेत किंवा शब्द आणि त्याचा अर्थ. त्याचप्रमाणे शिव व शक्ती एक व एकत्र आहेत. उदा.तुम्ही वडील असता, भाऊ असता, मुलगा असता. त्याचप्रमाणे तुम्ही स्वत: असू शकता व तुमची शक्ती ही असू शकता. तुम्ही, तुमचा आत्मा व तुमची शक्ती वेगळे आहात, पण तुम्ही एकच आहात. तुम्हाला लिहिण्याची शक्ती आहे, पण तुम्ही तुमची शक्ती नाही. तसेच तुमची शक्ती पण तुमचा आत्मा नाही. तसेच शिव आणि शक्ती यांची दोन व्यक्ती म्हणून ओळख आहे, पण ते एकाच विशेष स्वरूपाचे अविभाज्य घटक आहेत. त्यांना ब्रह्म म्हणतात.

पण या भयंकर तांत्रिकांनी पुन्हा ते इथे आले – शिव आणि शक्ति यांच्यातील संबंध बिघडवले ते यासाठी नाही की ते मानव होते म्हणून तांत्रिकांनी या सर्व विचित्र कल्पना रूढ केल्या व निरर्थक गोष्टींबद्दल बोलत होते, तर ते यासाठी की ते लोक लैंगिक–बिंदूशिवाय काहीही नव्हते. त्या त्याच्यावर बिलकुल पण नाहीत. ते अत्यंत बिघडलेले, रोगी आणि पापी लोक होते. ते इतके भयानक प्रकारे रोगग्रस्त होते की कोणाच्यातही त्यांना याव्यतिरिक्त काही दिसत नव्हते. अश्वमेध यज्ञाचेही वासनामयशी संबंधित वर्णन केले आहे. ज्या पण गोष्टी ते बघतील त्यात त्यांना वासनाच दिसते. हे अशा प्रकारच्या व्यक्तीसारखे आहे की जो वासनामय चश्म्याच्या प्रकाशाने बघत असतो. त्याच्यासाठी काहीही वासनामय बनते. ते इतके बिघडलेले आणि इतके पापी लोक आहेत की परमेश्वरालादेखील ते यौन–बिंदूच्या स्थितीत घेऊन येतात. जोपर्यंत ते या थरापर्यंत घेऊन येत नाही तोपर्यंत ते जिवंत राहू

शकत नाही. जसे ते आहेत, कशा प्रकारे ते स्वत:ला न्यायपूर्ण ठरवतील? शिव आणि शक्तीचा वासनेशी काहीही संबंध नाही. सूर्य आणि त्याचा प्रकाश काय आहे? त्याच्यात काही कामुकपणा लपलेला आहे का? या पापी तांत्रिकांजवळ कामवासनेव्यतिरिक्त इतर काही आहे का? वासनेशिवाय काही इतर संबंध असू शकत नाही का?

तेव्हा शिव हे परमेश्वर आहेत. आपण त्यांना सदाशिव म्हणू.

मी थोडे चित्र काढते, बघू त्याचा कसा उपयोग होतो.

अशाप्रकारे केंद्रबिंदू घटित होतो.

आता हा केंद्रबिंदूचा शेष भाग, त्याची शक्ती, वलय बनवते. ते कसे घटित होते? ते फिरू लागतात, मागच्या बाजूला येतात. तेव्हा काय होते, की ते मागच्या बाजूकडे येतात... (अस्पष्ट)

हे सगळे असे इथे राहते आणि सर्व पदार्थ त्याच्याभोवती कवच बनतात आणि सर्व लहरी (लाटा) क्रॉस करून कवचावर स्थिरावतात. तेव्हा अशी परिस्थिती असते, की जेव्हा आतल्या भागातील सर्व एकाग्र होऊन आणखी एक न्यूक्लियस तयार करते. ही शक्ती आहे आणि हे सदाशिव आहेत ही महाशक्ती, आदिशक्ती आहे आणि हे सदाशिव आहेत.

आता इथे शिव आहेत. एकदा शक्तीने तिचे व्यक्तिमत्त्व घडवले किंवा आपण म्हणू तिचा अहंकार स्थापित झाला, की शक्तीची शिवांपासून वेगळी जाणीव (ओळख) निर्माण होते. कारण सर्व प्रक्रिया साक्षीने पहावे म्हणून लीला नाटक तयार करण्याची आहे. सदाशिवच एक आहेत, जे या लीला नाटकाचे प्रेक्षक आहेत आणि शक्ती ज्या आहेत त्या सृजन करणार आहेत. म्हणून त्या, त्यांचा अहंकार बिंदूवर या ठिकाणी साठवतात आणि शक्ती होतात. तिथे त्यांचे स्थान ग्रहण करतात आणि शक्ती या रूपात त्या पहिली गोष्ट ही करतात, की लंबगोलाकारात त्यांच्या स्वामींच्या भोवती फिरतात. हा मुद्दा लक्षात येणे आवश्यक आहे. त्या शक्ती आहेत, परमेश्वराच्या शक्ती आहेत. परमेश्वराला दिसावे एवढ्यासाठीच सर्व सृजन करायचे आहे. शक्तीच्या लीला नाटकाचे फक्त तेच प्रेक्षक आहेत आणि त्यांना नाटक आवडले नाही, उदा.जसे ते नाटक होत आहे, निर्माण जालेली माणसे जशी वागत आहेत, ते जर त्यांना आवडले नाही, तर लगेच आपले डोळे बंद करून ते खेळ थांबवू शकतात, खेळ नाकारून किंवा त्यांचा राग व्यक्त करून, थांबवतील किंवा नुसतेच थांबवतील. म्हणून त्यांना विनाशक असेही म्हणतात. पण हे सर्व त्यांच्या करमणुकीसाठी असल्याने आणि या नाटकाने त्यांना आनंद दिला नाही, तर ते थांबवू शकतात. म्हणून सर्वात प्रथम जर कोणाला प्रसन्न करायचे असेल, तर जे प्रेक्षक आहेत त्यांना. या कारणासाठी आदिशक्ती शिवांना हार घालतात, तो परावलय (पॅराबोला) आहे. म्हणून परावलय (पॅराबोला) हे आदिशक्तीचे चिन्ह आहे. हे एक प्रकारे त्यांना सर्टिफिकेट आहे, एक

प्रकारे वरदान देणे आहे, ज्याला संस्कृतमध्ये म्हणतात, की ‘तुमच्या कार्याचा आरंभ करा’ असे वरदान देणे आहे. त्यांनी ही मंजूरी दिलेली आहे. त्या हा पॅराबोला पूर्ण करतात तेव्हा मंजूरी मिळालेली असते आणि म्हणून त्या पॅराबोला आहेत. याठिकाणी पुरूषांनी स्त्रियांवर प्रभाव टाकायचा की स्त्रियांनी पुरूषांवर, असा प्रश्न उद्‌भवत नाही, कारण तो आपल्या डोक्यांमध्येच पूर्वीपासून प्रभावी असतो.

आपण याचा विचार करतो तेव्हा स्त्रिया व पुरूष असा आपण विचार करतो. पण असं काही नाही. पूर्ण एकरूपता आहे. जे अगदी पूर्णपणे एक आहेत अशा एक तरी पती–पत्नींच्या जोडप्याची आपण कल्पना करू शकतो का? करू शकत नाही. कारण आपण अपूर्ण लोक आहोत. आपल्या कल्पनाशक्तीला इथपर्यंत ताण दिला, की जिथे दोन्ही फक्त एकदुसऱ्यासाठीच आहेत आणि त्या कार्यप्रवण आहेत, त्या आदिशक्तीच आहेत आणि त्यांचे प्रेक्षक असलेल्या परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठीच कार्य करीत आहेत आणि परमेश्वरालाच सर्वात प्रथम प्रसन्न करायचे आहे. म्हणून त्या स्वत: परमेश्वराला शरण जातात व पॅराबोलातून त्यांची मंजुरी घेतात.

म्हणून पॅराबोला फार महत्त्वाची गोष्ट आहे. तुम्हाला माहिती आहे, की प्रत्येक गोष्ट पॅराबोलातून प्रवास करते, सरळ रेषेत कधीच नाही. उदा.तुम्ही कोणावर प्रेम करीत असाल, तर तुमचे प्रेम त्या व्यक्तीच्या भोवती जाऊन प्रेम म्हणून तुमच्याकडे परत येईल. तुम्ही त्याचा द्वेष कराल तर त्याच्याभोवती जाऊन प्रचंड द्वेष म्हणून तुमच्याकडे परत येईल. म्हणून पॅराबोला घेतला. तुम्ही म्हणाल की पॅराबोलाच का? वर्तुळ का नाही? कारण असे, की दुसऱ्या वस्तुच्या किंवा स्थानाच्या भोवती जाण्यास पॅराबोलाने कमीत कमी अंतर लागते म्हणून पॅराबोला आहे.

रोजच्या जीवनातसुद्धा आपल्याला हे घडतांना दिसेल. तुम्ही जे दुसऱ्याला कराल ते सशक्त रूपात तुमच्याकडे परत येते, मग तुम्ही चांगले करा किंवा वाईट. यामुळेच आपल्या कर्मसिद्धांताच्या व पुण्य करण्याच्या कल्पना आहेत. कारण आपल्यातून आपण बाहेर सोडू ते आपल्याकडे परत येणार. त्याचप्रमाणे तुम्ही सगळ्या जगाला आशीर्वाद द्या, सगळ्या जगाचे आशीर्वाद तुमच्याकडे येतील.

मी सांगितल्याप्रमाणे ही प्रक्रिया चित्र काढून दाखविण्याइतकी सोपी नाही. कारण ही मोठ्या प्रमाणावरची (क्षेत्रातली) जिवंत प्रक्रिया आहे. पण तुम्हाला समजावी म्हणून मी सोपी करण्याच्या प्रयत्नात आहे.

आता हा पॅराबोला, आता शक्ती इथे आहेत. जेव्हा त्या पॅराबोलाच्या गतीमध्ये जातात आणि श्री शिव त्यांना मंजुरी देतात, ती जिवंत क्रिया असते, जितकी आपण जिवंत माणसे आहोत, तितकी ती जिवंत क्रिया असते. दोन्ही शिव आणि शक्ति मानवी असतात, जितके

आपण आहोत तितकेच आपल्याला म्हणता येईल हजारपट जास्त मानव असतात.

तेव्हा इथे पत्नी जी कायम एकत्रच असते, ती म्हणते, ‘मी अशीच सुखात आहे, याच्यापेक्षा अधिक पुढे मला जायचे नाही.’ कारण तिच्यासाठी निर्मिती करणे ही सोपी गोष्ट नाही. तिला तिच्या पतीपासून वेगळे व्हायचे नाही. सृष्टी हे बाळ आहे आणि ती म्हणते, ‘मग आता मुले होणे आवडत नाही, कारण मला तुम्हाला सोडावे लागेल.’ असे म्हणून ती पतीकडे झेपावते व पती तिला मागे ढकलून अंतर्धान होतो. पॅराबोलास या ठिकाणी भेदून तो बाहेर जातो.

आता ती या स्वरूपात असते. आता ओम् होण्याची सुरूवात होते. प्रथम पॅराबोला ओम् मध्ये बदलतो. आता ती स्वत:ला खाली ढकलते (खाली बसते) व थोडा वेळ, स्थिरावून ध्यान करून सर्व कसे कार्यान्वित करायचे हे पाहते.

आता त्यांची इच्छा जागृत व्हायला पाहिजे. त्यांची इच्छा जागृत झाली नाही, तर त्या सृष्टीची धारणा करणार नाहीत. अशात एक कल्प निघून जातो. त्यांच्या स्वत:च्या विचार करण्यात, की कोणत्या पद्धतीने हे सर्व करावे, पुष्कळ काळ निघून जातो. त्यांनी अनेक विश्वे तयार केली आहेत. एकच विश्व नाही बनवले. त्यांनी विश्वामागून विश्वे निर्माण केली आहेत. त्यांनी इतकी विश्वे कशी बनवली ते मी तुम्हाला दाखवीन. त्यांच्यापैकी काही अद्यापही अस्तित्वात आहेत, तर काही नष्ट झाली आहेत. पण आज आपल्यासमोर हे विश्व आहे, पृथ्वी आहे आणि या पृथ्वीवर भारत आहे. भारतात दिल्ली आहे आणि दिल्लीमध्ये तुम्ही इथे बसून माझे बोलणे ऐकत आहात. ते असे आहे. तेव्हा या क्षणी जे काही होत आहे ते भूतकाळ नाही, भविष्यकाळ ही नाही, पण मी तुम्हाला या क्षणाबद्दल सांगते. आपण इथे आहोत. पण आदिशक्तींनी अनेक विश्वे आपल्या पूर्वीसुद्धा तयार केली आहेत, अनेक गोष्टी करून बघितल्या व शेवटी हे करून पाहिले आहे. त्यांनी पृथ्वी बनवली आणि मग आपल्याला बनवले. त्यांनी कसे ते सगळे केले हे आपण नंतर पाहू. आता आपण हे पाहू, की त्या त्यांच्या तीन शक्त्या कशा धारण करतात. त्या सृष्टीची रचना करण्याचे ठरवतात तेव्हा त्यांना तीन शक्त्या प्रदान केल्या जातात. परमेश्वराच्या तीन शक्त्या त्यांना मिळतात. त्यांना प्रदान केलेल्या असतात. पहिल्या शक्तीने सर्वात प्रथम अस्तित्व असते. अस्तित्वाची इच्छा, परमेश्वराकडे अस्तित्वात येण्याची इच्छा करतात. दुसरी शक्ती निर्माण करण्याची आणि तिसरी ते धारण करून टिकविण्याची. पहिली शक्ती अस्तित्व आहे, दुसरी सृजन आहे व तिसरी उत्क्रांत करणारी, धारणा करणारी शक्ती आहे जिच्यामुळे हळूहळू तुम्ही काही तरी धारण करता, टिकवता आणि काही तरी होता. या तीन शक्ती आदिशक्ती धारण करतात. थोडक्यात आपल्याला म्हणता येईल, की या तीन शक्ती महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी त्या घडवतात व या तीन शक्ती त्या स्वत:मध्ये धारण करतात.

आता त्या पुन्हा त्यांची पॅराबोलाची प्रणाली वापरतात. समजा, मी या रस्त्याने या घरात आले. मला हा रस्ता समजला. नंतर त्या रस्त्याने आले. मला तो रस्ता माहीत झाला. मग मला प्रत्येक रस्ता, प्रत्येक गोष्ट समजली. त्या ज्ञानाने मी दुसरे काही पण करू शकते. म्हणून त्या पुन्हा त्यांच्या पॅराबोलात फिरण्याचा उपयोग करतात. वास्तविक त्यांच्या तीन महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वतीच्या हालचाली (Movements) सतत, सर्वकाळ, आदिशक्तींशी एकरूप असतात. त्यांना वेगळे करून आदिशक्ती तीन नाड्यांमध्ये घालू शकतात. तसेच त्यांना एकत्र करून, एकात्म करून पॅराबोला म्हणूनही वापरू शकतात. म्हणून आपण बंधन घालतो, तेव्हा आपण म्हणतो पॅराबोला घाला. हा पॅराबोला असतो कारण त्याच्यात सर्व चैतन्य लहरी असतात, तिन्ही शक्ती त्याच्यात वाहतात.

तेव्हा आपल्याला तुम्ही जाणताच, तीन शक्ती आहेत. महाकाली शक्ती आहे. महाकाली शक्तीने आदिशक्ती इच्छा करतात. मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे ती परमेश्वराची भावनिक बाजू आहे. ती परमेश्वराच्या भावनिक बाजूचे प्रतिनिधित्व करते. त्या इच्छा करतात. ती परमेश्वराची जे साक्षी आहेत, त्यांची इच्छा असते आणि आदिशक्ती त्या साक्षींना तुमच्या हृदयात बसवतात. त्यांना तुमच्या हृदयात प्रतिबिंबित करतात आणि तुम्ही काय करता, तुमची निर्मिती झाल्यावर तुमचे खेळ चालतात, ते पाहण्यास प्रतिबिंब कायम, सर्वकाळ, प्रतिबिंबित ठेवले जाते.

आता त्यांची महासरस्वती शक्ती पॅराबोलामध्ये फिरते. ती कोणत्याही कोनातून फिरते, ३६० अंशातून फिरते. एका बिंदूपासून जाते. काही वेळेस ती एका बिंदूवरच गोल गोल फिरते. जेव्हा महासरस्वती शक्ती एकाच बिंदूवर गोल गोल फिरते तेव्हा ती घट्ट होत जाते. घन होत जाते. इतनी घन होते की तिचे तुकडे होतात.

हे सर्व तुकडे महाकाली शक्तीच्या महासरस्वती शक्तीच्या फिरण्याच्या गतीमध्ये जातात कारण ती गोल गोल फिरत असते. म्हणून ते तुकडेसुद्धा त्या फिरण्याच्या गतीमध्ये जातात. ते सुद्धा फिरू लागतात. उदा.हा तुकडा फिरू लागतो, तो तुकडा फिरू लागतो वगैरे. फिरू लागल्यावर ते गोल होतात. त्यांचे कंगोरे जाऊन ते गोल होतात. मी तुम्हाला फार थोडक्यात सांगत आहे. हे गोल तुकडे पुन्हा एक दुसऱ्याच्या घर्षणात घातले जातात. अशाप्रकारे आपण म्हणू, दुसऱ्या विश्वांचे सोडून द्या, त्यांच्यासाठी दुसऱ्या पद्धती तयार केल्या होत्या – अशा पद्धतीने हे विश्व तयार केले गेले.

आता तुम्ही सतत लक्षात ठेवा, की ही शक्ती विचार करते, समजते, संघटित करते, प्रेम करते आणि तिला जाणीव असते, ओळख असते.

तेव्हा, ती पृथ्वीचे सृजन करते. पृथ्वी इतक्या सहज रीत्या बनवली गेली नाही. सूर्याचा एक तुकडा असा हाताने तुम्ही म्हणू शकता, काढला. आता आपण समजले पाहिजे,

की सूर्य इतका थंड कसा झाला. सूर्याचा तुकडा त्याच्यापासून फार दूरवर नेला गेला. त्यामुळे तो पूर्णपणे गोठला. मग पुन्हा सूर्याच्या जवळ आणला गेला. लंबकाप्रमाणे थंड बाजूकडे व गरम बाजूकडे हलवत ठेवला. मग मध्यवर्ती ठिकाणी आणला गेला जिथे पृथ्वी तयार झाली. मी पुहा सांगते ही निसर्गातली सहज झालेली घटना नाही. माणसांना राहता यावे म्हणून मुद्दाम घडवून आणलेली आहे. तापमान कमी केले गेले. हे आदिशक्तींनी, आदिमातेने मुद्दाम केले आहे. अशा आईची कल्पना करणे सोपे नाही. पण तिने ते केले आहे आणि तिने पृथ्वीला अशा ठिकाणी आणले जिथे जीवनास आरंभ होऊ शकतो. तेव्हा चंद्र व सूर्य यांच्या एकत्रीकरणाने चंद्रापासून हायड्रोजन येतो व सूर्यापासून ऑक्सिजन येतो, पाणी मिळते. गोठवणे व गरम करणे, पाणी मिळते. पाण्यात, पृथ्वीला वर्तुळात फिरवित वरच्या बाजूस हलवल्याने गरम होणे व थंड होणे सुरू होते. गरम व थंड करण्याने अमायनो ॲसिडच्या रूपात जीवन येते.

हे सहेतुकपणे केले जाते. मला सांगायचे आहे, की हे असेच काहीतरी संयोगाने घडले नाही. याच्या वरसुद्धा विचार करायला हवा की हा कसा काय संयोग नाही? तुम्ही डार्विन वाचा. तो फार मोठा जीवशास्त्रत्र होता. मला वाटते तो सर्वात मोठ्या जीवशास्त्रज्ञांपैकी (बायलॉजिस्ट) एक होता. ज्यांनी याचे गणित मांडले, की पदार्थ मात्रापासून (मॅटर) एक साधा अमीबा तयार करण्यास किती काळ लागला असावा. त्याने गणिताने असे ठरवले की आतापर्यंत जेवढा काळ आपल्याला मिळाला आहे, त्याच्यापेक्षा पुष्कळ जास्त कालावधी लागावा. लाखो करोडो वर्षे लागतात, एक संयोग मिळायला. 'लॉ ऑफ चान्स' आहे. मला माहिती नाही, की तो तुम्हाला सविस्तरपणे सांगावे की नाही. पण लॉ ऑफ चान्स असा आहे, की तुम्ही एका ट्यूबमध्ये ५० लाल गोट्या व ५० पांढऱ्या गोट्या मिसळून त्यांचा क्रम पूर्ण नाहीसा केला तर त्यांना पुन्हा पहिल्या क्रमात हव्या त्या क्रमात आणावयास ती ट्यूब इतक्या वेळा हलवावी लागते. तेव्हा एक व्यवस्थित जगणारे प्रोटोप्लाझम, पेशी बनवायला आतापर्यंत जेवढा काळ गेला त्याच्यापेक्षा जास्त वेळ लागला असता. फारच जास्त काळ. लक्षावधी वर्षे. पृथ्वीला सूर्यापासून वेगळे होण्यास ५० लाख वर्षे लागली व फक्त वीस लाख वर्षे थंड होण्यास. तेव्हा तो शास्त्रज्ञ म्हणतो, की हे समजण्याच्या पलीकडे आहे, एवढेच स्पष्टीकरण देता येईल. आपण म्हणू शकतो की त्याच्यामागे एखादा जादूगार असावा आणि एक जादुगार आहे, ज्याच्याबद्दल आपले महान ऋषी मुनी म्हणतात तो जादूगार दुसरा कोणी नसून आदिशक्ती, आदिमाता आहे. आदिपिता सदाशिव आहेत व आदिमाता आदिशक्ती आहेत. आपण त्याच्या लैंगिक संबंधाविषयी बोलू शकतो का? मांत्रिकांबरोबरच आपणही असे करू का? आपल्या आई–वडिलांना आदरांजली देण्याची हीच पद्धत आहे का?

आपल्याला हे समजायला हवे, की आपण फार फार उदात्त विषयाची चर्चा करीत

आहोत. या ठिकाणी आपण आदिमाता–पिता यांच्या प्रेमाच्या मंदिरातल्या गाभाऱ्याची चर्चा करीत आहोत. ही फार फार पवित्र गोष्ट आहे. आपण पवित्र लोक नाही. आपण अजून हव्यास व वासना यांनी भरलेलो आहोत आणि ते प्रत्येक गोष्टीच्या पलीकडे आहेत. म्हणून त्यांची चर्चा करतांना ती मोठ्या श्रद्धेने आपली मस्तके त्यांच्यासमोर झुकवून करायला हवी. आपले हे सद्‌भाग्य आहे की आपण या आदिमाता–पित्यांच्या बद्दल ज्यांनी ही सृष्टी, त्यांचे अपत्य जन्माला घातले, त्यांच्याबद्दल काही तरी शिकू शकतो.

तेव्हा या गोल तुकड्यांपैकी एक पुन्हा तुटतो आणि सूर्यमंडल होते आणि सूर्य मंडलात जसे तुम्हाला माहिती आहे, पृथ्वी, चंद्र व इतर आहेत. पृथ्वी कशी निर्माण होते ते मी तुम्हाला सांगितले आहे. पृथ्वीच्या निर्मितीनंतर प्रथम अमायनो ॲसिड्स तयार झाले, मग वनस्पतीची सुरूवात झाली आणि नंतर माणसांची सुरूवात झाली.

आता पदार्थमात्र (मॅटर) सुद्धा फार पद्धतीशीर आहेत. पदार्थमात्र विस्कळित नाहीत, व्यवस्थित आहेत, पण संघटित नाहीत. या दोन्ही मध्ये फरक आहे. पद्धतशीर गोष्टी मृत असू शकतात. तुम्ही इथे पाच दगड पद्धतशीरपणे ठेवू शकता, पण ते संघटित नसतात. कारण ते जीवित वस्तू नाहीत. या दोन्हीमधेही फरक आहे. प्रथम पद्धतशीर वस्तू बसवल्या गेल्या. तुम्हाला माहिती असेल, आठ वेगळ्या प्रकारचे मूळ पदार्थ निर्माण केले. निर्मितीनंतर श्रीगणेशांकरवी त्यांच्या योग्य जागी ठेवले गेले. तुम्हाला माहिती आहे, की पिरियॉडिकल एलिमेंट्स (पुनरावर्तित मूळ पदार्थ) जे दिसतात त्यांच्या केंद्रस्थानी कार्बन आहे. याचा अर्थ एक, दोन, तीन, चार व्हॅलन्सीज (३+१) असलेला मूळ पदार्थ. शिवाय चार व्हॅलन्सीज असलेला कार्बन मायनस (वजा) एक, मायनस २, मायनस ३ व मायनस ४ अशाप्रकारे पूर्ण आठ आहे.

अशा पद्धतीने सर्व पदार्थमात्र (मॅटर) संघटित केलेला आहे. पदार्थमात्र (मॅटर) संघटित करण्यासाठी एक दैवत निर्माण करायचे होते आणि पहिले दैवत जे बनवले ते श्रीगणेश होते. आता ते कसे केले ते आपण पाहू.

तुम्ही पाहिले आहे, की आदिशक्तींचा एक भाग–महासरस्वती शक्तीने पदार्थमात्राची (मॅटर) निर्मिती केली आहे. आता महाकाली शक्तीने त्याला अस्तित्व प्रदान करायचे आहे. आता तुम्हाला अस्तित्व कशाप्रकारे मिळते? तर ते तुमच्या धारणेतून (टिकून राहण्यातून), तुमच्या गुणधर्मातून. तेव्हा महाकाली भौतिक पदार्थांना अस्तित्व देते, माणसांना नाही, किंवा जीवित वस्तूंना नाही, तर पदार्थमात्राला (मॅटर) देते, एका दैवतामार्फत, महाकाली ते देते. ते दैवत आहेत श्रीगणेश.

विराटाच्या हृदयात, तुम्हाला दिसेल, इथे विराट येतात – कारण ते मी तुम्हाला पुढे सांगणार आहे–विराट म्हणजे आदि शरीर, पूर्ण आदिपुरूष, त्यांच्या हृदयात महाकाली

स्थिरावतात. ती काय करते, हृदयातून ती साडेतीन वेळा खाली जाते. एक वर, एक खाली अशाप्रकारे साडेतीन वेळा आणि खाली उतरत साडेतीनच्या टोकाशी येते. हे साडेतीन झाले आणि आता ती याच्या टोकाशी आली. अशाप्रकारे साडेतीन करून त्याला सरळ छेदले तर तुम्हाला सात छेद मिळतात.

(इथे कोणी अशी व्यक्ती आहे का जी चांगल्याप्रकरे रेखाचित्र बनवू शकेल? तुम्ही ते अशाप्रकारे बनवू शकता.)

ती खाली, इथे येते, ती इथे खाली आली आणि इथून ती आत जाते. इथे ती सात बिंदूंचा छेद करते. या ठिकाणी ती पहिले दैवत श्रीगणेश बनवते. मला सांगायचंय, हे एका दिवसात होत नाही, एका वर्षात नाही, एका युगात नाही, अनेक कल्पात होते. श्रीगणेशांची निर्मिती ही पहिली पायरी, हे महाकालीचे घर आणि श्रीगणेशांना त्यांनी इथे स्थापित केले आहे. आता श्रीगणेश या सगळ्यांतून त्यांच्या चैतन्य लहरी सोडतात. जे महाकालीने निर्माण केले आहे त्या सगळ्यामधून ते जातात. या चित्रावर, तुम्हाला म्हणता येईल, महासरस्वतीचे कार्य स्थिरावले आहे. तिच्या सर्व कार्यक्रमासहित (प्रोग्रॅम) ती खाली येते आणि इथे पुन्हा मिळते. म्हणून श्रीगणेश तिच्यातून चैतन्य लहरी सोडतात.

सर्वप्रथम श्रीमहाकाली, श्रीगणेशांची निर्मिती करतात, तेव्हा श्रीमहासरस्वती खाली येतात. हे सर्व तयार करून त्या श्रीगणेशांशी जोडल्या जातात. म्हणून श्रीमहासरस्वतीने जे निर्माण केले आहे त्या सगळ्यामधून श्रीगणेशांच्या चैतन्य लहरी (व्हायब्रेशन्स) वाहू लागतात.

हे सर्व निर्माण करण्यापूर्वी, भविष्यात काय घडणार आहे, याचा पूर्ण विचार श्रीआदिशक्तींच्या दृष्टीसमोर स्पष्टपणे येतो आणि त्यांच्या सर्व योजनेप्रमाणे त्या कार्यान्वित होतात. सर्वात प्रथम श्री महाकाली खाली येऊन श्रीगणेशांना निर्माण करतात. आता तुम्हाला समजेल, की पवित्र व्यक्ती होणे किती महत्त्वाचे आहे. प्रथम त्यांनी या पृथ्वीवर पावित्र्य निर्माण केले. सर्वात प्रथम त्यांचे मुलांबरोबरचे नातेसंबंध प्रस्थापित झाले. कारण बालकाच्या स्वरूपात सृष्टीची निर्मिती करायची होती.

म्हणून सर्वप्रथम श्रीगणेशांची निर्मिती झाली आणि नंतर इथून श्रीआदिशक्तींची दुसरी शक्ती महासरस्वती खाली येते आणि श्रीगणेशांशी जोडली जाते आणि तशा पद्धतीने श्रीगणेश संबंध प्रस्थापित करतात आणि या सगळ्यातून आपल्या चैतन्य लहरी सोडतात. त्यांच्या चैतन्य लहरींमुळे, जी त्यांनी निर्मिलेल्या पदार्थमात्रातून जातात. उदा.आपली भूमी माता, तिच्यातून अक्ष (ॲक्सिस – पृथ्वीच्या केंद्रातून जाणारी सरळ रेषा) जातो. अक्ष कोणी पाहिला नाही, पण ज्या पद्धतीने पृथ्वी फिरते, तिच्यावरून असे म्हणतात की अक्ष आहे. एक प्रकारचा अक्ष आहे.

आता, ही महाकालीची शक्ती, आपण म्हणू शकतो, श्रीगणेशांची शक्ती – भूमी मातेच्या अक्षामधून जाते, तिच्यात चुंबकीय शक्ती आहे आणि त्या प्रकारे, त्याच्यामधून पृथ्वीची गती, तिचे फिरणे नियंत्रित होते आणि ती आपली (माणसांची) काळजी घेते. आपण एक लहान बीज मातीत रोवले तर ते आपोआप अंकुरते, याचा आपण का विचार करीत नाही?

तुम्ही पाहिले आहे, की तुमच्यापैकी पुष्कळांना काही त्रास होतो, आजार होतो ते भूमी मातेने आत ओढून घेतले, तिने ते शोषून घेतले. हे वास्तव आहे. सहजयोगात, तुम्हाला दिसेल, तुम्हाला काही त्रास असेल, तर डोके जड आहे आणि तुम्ही साक्षात्कारी जीव आहात (अन्यथा ती ऐकणार नाही), तुम्हाला कार्यप्रवण करायचे आहे किंवा श्रीआदिशक्तीने तुम्ही साक्षात्कारी व्यक्ती आहात असे सर्टिफिकेट द्यावे यासाठी. नाही तर ती तुम्हाला का स्वीकारेल? तर तुमचे डोके जमिनीला लावाल, दोन्ही हात जमिनीवर भूमी मातेवर ठेवाल, तर तुम्हाला समजेल, सर्व त्रास कपाळातून शोषला जाईल. अनेकांचे असे झाले आहे पायातून सुद्धा खाली शोषले जाऊ शकते.

भूमी माता, वास्तविक, श्रीआदिशक्तीची आई आहे, तुम्ही म्हणू शकता. ती आई असे म्हणतात कारण तिला असे घडवले आहे, की जगाचा सर्व भार स्वत:मध्ये घेते. ती जगाची सर्व वजने नियंत्रित करते आणि ती तुमचे सर्व वजन शोषून (consume) घेऊ शकते.

आता वजन म्हणजे तुमचे वजन 'इतके' आहे (शारीरिक वजन) ते नाही. वजन म्हणजे तुमची पापे, तुमचे पुण्य, म्हणजे प्रत्येक गोष्ट. तुमच्यात फारच पापे असल्यास पृथ्वी मातेला त्रास होतो. जिथे फारच पाप असते, तिथे भूमी माता मदत मागते. तेव्हा कोणत्या तरी दैवताला, उदा.स्वत: श्रीविष्णूंना येऊन पृथ्वीला असह्य झालेल्या पापाच्या वजनापासून वाचवावे लागते. हे वास्तव आहे. मी कल्पनेतील सांगत नाही. चैतन्य लहरी मिळाल्यावर तुम्ही याचा पडताळा घ्यावा. चैतन्य लहरी मिळण्यापूर्वी पृथ्वीकडून तुम्हाला हे समजणार नाही. काही वेळेनंतर – तुम्ही साक्षात्कारी असल्यास भूमी मातेवर उभे राहून तिला विचारा, 'हे भूमी माते, मी साक्षात्कारी आहे, तुम्ही माझी कर्मे काढून घ्याल का?' लगेच ती काढून घेणे सुरू करते. तुम्हाला आश्चर्य वाटेल. तुम्हाला इतके हलके वाटेल! तुम्ही त्यांचा उपयोग करावा. तसेच भूमी मातेला तयार केले आहे.

पण आदिशक्तींनी त्यांच्या महासरस्वती शक्तीतून पंचमहाभूतांची निर्मिती केली आहे. सर्वात आधी, ज्याला तन्मात्रा म्हणतात, ते बनवले आहे. मी फार विश्लेषणात गेले तर तुम्हाला जास्त होईल. पण सर्वात आधी त्यांनी कारणात्मक सत्वे तयार केली. पण मी असे म्हटले तर त्यात काही खोटे असणार नाही, की केवळ पाहून त्यांच्या दृष्टीतून श्रीआदिशक्तींनी प्रकाश तयार केला. त्यांच्या श्वासोच्छवासातून वायू निर्माण केला कारण

त्यांची इच्छा अंतिम असते (त्यांच्या इच्छेच्या पुढे कोणी जात नाही). त्यांनी इच्छा केली, की वायू असावा आणि वायू निर्माण केला. तसेच त्यांच्या वास घेण्यातून त्यांनी गंध तन्मात्रा तयार केली व त्याच्यातून पृथ्वी माता तयार झाली आणि हे सर्व फक्त त्यांच्यापासूनच, त्यांच्या इच्छेतूनच, केवळ त्यांच्या इच्छा करण्याने, त्यांच्यासाठी केले गेले आणि अशाच प्रकारे संपूर्ण विश्वात निर्माण केले गेले आणि पुढे तेच पृथ्वी, सूर्य, चंद्र या सर्व गोष्टी निर्माण झाल्या. वास्तविक त्यांची इच्छा मात्र होती जिने या सर्व गोष्टी प्रत्यक्षात आणल्या.

जे कोणी केवळ इच्छेने सृजन करू शकते, त्याला समजणे आपल्याला अशक्य आहे, पण आपण असा विचार का करू शकत नाही, की कोणी तरी जगातील सर्व सत्तांच्या वर आहे, ज्या सर्वोच्च आहेत हे आपण जाणतो, ज्यांना हवे असेल ते त्या करू शकतात? असे कोणी तरी असेल अशी आपण कल्पना करू शकत नाही. आपण परमेश्वरांची कल्पना करतो त्यांना सर्वशक्तिमान समजतो, पण त्यांच्या शक्तीबद्दल बोलतो (ताकदीबद्दल बोलतो) तेव्हा हसू लागतो. हे कसे असू शकते?

पण त्यांना हवे ते त्या करू शकतात. त्यांच्या केवळ इच्छेने ही सर्व सृष्टी, प्रत्यक्षात आणली आहे आणि जगात या सर्व गोष्टी ज्या तुम्हाला दिसत आहेत, त्या केवळ त्यांच्या इच्छेने तयार झाल्या आहेत. त्यांनी आकाश तत्त्व निर्माण केले. पंचमहाभूते निर्माण केली आहेत, जी तुम्हाला माहिती आहेत. आणि नंतर त्यांनी आपल्या दुसऱ्या रूपातले, ज्याला आपण महालक्ष्मी म्हणतो त्या रूपातले कार्य सुरू केले.

त्यापूर्वी मला वाटते, पदार्थमात्रातील श्रीगणेशांच्या अस्तित्वाबद्दल मी तुम्हाला सांगावे. ते पदार्थमात्रात चैतन्य लहरी, महासरस्वतीच्या चैतन्य लहरी या रूपात कार्य करतात.

त्या विद्युत चुंबकीय चैतन्य लहरी आहेत, महासरस्वतीच्या चैतन्य लहरी विद्युत चुंबकीय आहेत. त्याबरोबरच नाद आणि ही पंचमहाभूते त्यात अभिव्यक्त होतात. तुम्ही त्यांना रेकॉर्ड करू शकता. कारण उदा.तुम्ही सल्फर डाय ऑक्साईड घेतला, सल्फर डाय ऑक्साईड – दोन ऑक्सिजन आणि एक सल्फर आणि तुम्ही त्याला शक्तिशाली सूक्ष्मदर्शकाखाली त्याचे निरीक्षण करा – तुम्ही प्रयत्न करा, लोकांनी केले की नाही, ते मला माहीत नाही, पण तुम्ही प्रयत्न करून शोधून काढा आणि तयार करून त्याला फार मोठ्या सूक्ष्मदर्शकाखाली ठेवा. तुम्हाला पाहता येईल, की सल्फर स्थिर आहे, पण या दोन ऑक्सिजनमधून चैतन्यित करीत आहेत. त्याच्यात चैतन्य लहरी आहेत. ते चैतन्यित करीत आहेत. या दोन चेंडूंच्यामध्ये चैतन्य लहरी आहेत. ते असिमेट्रिक, सिमेट्रिक, इव्हन व अनइव्हन ही असू शकतात आणि विस्तारित होणारी ही असू शकतात. तेव्हा आपल्याला तीन प्रकारची व्हायब्रेशन्स आढळतात. चौथी बाजू (साइड) दुसरे काही नाही तर नियंत्रण

करणारे स्वत: श्रीगणेश आहेत.

हे आपल्याला पहायचे असल्यास साध्या डोळ्यांनी दिसू शकते. तुम्ही साक्षात्कारी असा किंवा नसा. या सर्वात लहान, न्यूनतम परमाणूत (मोलेक्यूलमध्ये) काढून चैतन्य लहरी आल्या आणि कशा आल्यात? कोणी सांगू शकेल? इतके ते सूक्ष्म – परासूक्ष्म आहे.

श्रीगणेशांच्या शक्ती फार फार सूक्ष्म आहेत आणि त्या पदार्थमात्रात शिरून अशा चैतन्य लहरी या विद्युत चुंबकीय चैतन्यलहरी एका लहान मोलेक्यूलमध्येसुद्धा निर्माण करतात, जे तुम्ही पाहू शकता व रेकॉर्डही करू शकता.

जसे मूळ पदार्थांचे (इलिमेंट्स) Periodic Laws आहेत. तुम्हाला समजेल, की सर्व मूळ पदार्थांचे आठ प्रकारात वर्गीकरण केले आहे. आता आपण हे पाहू हे एलिमेंट्स आठ प्रकारात कसे वर्गीकृत झाले, ते करायला कोणी नव्हते, तरी ते झाले. या एलिमेंट्सचा व्यवस्थित चार्ट बनवल्याशिवाय काही करणे शक्य आहे का? विचार करा! तुम्ही परमेश्वराला आव्हान देता तेव्हा हे पाहायला हवे, की या जगात प्रत्येक पदार्थ इतका व्यवस्थित बसवलेला आहे आणि एलिमेंट्सचे आठ वर्ग इतके व्यवस्थित बसवलेले आहेत. प्रत्येकाचे विशिष्ट वागणे आहे, प्रत्येकाच्या प्रोटॉन्सची वेगळी संख्या आहे आणि ही संख्या इतकी व्यवस्थित आणि अशा पद्धतीने मोजली (कॅलक्यूलेट) गेलेली आहे की शेवटी सर्व प्रोटॉन्सचे शेवटचे वर्तुळ आठ असावे. आठ नसल्यास, आठपेक्षा कमी असल्यास व्हॅलन्सीची समस्या निर्माण होते. इतके सर्व व्यवस्थित बसवलेले आहे, की तुम्ही अभ्यास केला, थोडे रसायनशास्त्र येत असेल तरी किती आश्चर्य वाटेल! आपण सर्व गृहीत धरतो. हे सर्व व्यवस्थित बसवायला हवे. हा आपण आपला हक्क समजतो. परंतु बाहेरच्या वर्तुळात आठ प्रोटॉन्सना जसे व्यवस्थित बसवले आहे, त्याच्यावर व्हॅलन्सीज अवलंबून असतात.

हे सारे कार्य महासरस्वती शक्तीमधून केले जाते. परंतु चैतन्य कार्यान्वित करणारी प्रेरणा (व्हायब्रेटिंग फोर्स) ......, एक व्हायब्रेटिंग फोर्स आहे. हे सर्व महासरस्वती शक्तीतून, मी सांगितल्याप्रमाणे होते. आता चैतन्य लहरी कार्यान्वित करणारी प्रेरणा आहे. ती अस्तित्वात आहे. पदार्थमात्रही अस्तित्वात आहे. ते अस्तित्वात असायलाच हवे. ते अस्तित्वात नसतील तर काहीच अस्तित्वात असू शकत नाही. म्हणून अस्तित्वाची प्रेरणा ही महालक्ष्मी प्रेरणा, महाकाली प्रेरणेतून दिली जाते. ती प्रेरणा, न्यूक्लियसमध्ये बसलेल्या श्रीगणेशांच्या मधून काम करते. ते प्रत्येक मॉलेक्यूलच्या, प्रत्येक अणूच्या केंद्रकस्थानी (न्यूक्लिअस) बसलेले असतात. तुम्हाला कल्पना तरी करता येईल का की ते किती असतात!

आता तुम्ही एक एलिमेंट घ्या. समजा सोने. त्याच्यात किती परमाणू (मॉलेक्यूल) असतात. तुम्ही मोजू शकता का? त्याच्यात किती अणू आहेत, तुम्हाला मोजणे शक्यच

नाही. तर श्रीगणेशांच्या किती प्रतिमा असतील! अशा पद्धतीने ते साध्य केले आहे.

आणखी एक गोष्ट जाता जाता मी तुम्हाला सांगते, किती अमर्याद प्रतिबिंबे पकडली असतील? आता श्रीशिव आणि श्रीआदिशक्ती दोन वेगळे का आहेत? याचे कारण असे की त्यांना अमर्याद प्रतिबिंबे निर्माण करायची आहेत. आता तुम्ही अमर्याद प्रतिबिंबे कशी कराल? तुम्हाला माहीत आहे? कोणाला भौतिकशास्त्र माहीत आहे?

दोन आरसे समोरासमोर ठेवून त्याच्या मधोमध एखादी वस्तू ठेवली तर अमर्याद प्रतिबिंबे मिळतात. पहिला आरसा आदिशक्ती आहेत व दुसरा आरसा सृष्टी आहे. अशा प्रकारे पृथ्वीवर अमर्याद प्रतिबिंबे मिळू शकतात. तुम्हाला अमर्याद प्रतिबिंबे मिळू शकतात, त्याचे हे कारण आहे. याच्यासाठी प्रतिबिंबित करणारा दुसरा आरसा निर्माण करावा लागला आणि म्हणून तीन जाणिवा, अस्तित्वे हवी होती, सर्वशक्तिमान परमेश्वर नंतर आदिशक्ती व नंतर संपूर्ण विश्व.

ते तसेच आवश्यक होते. त्याशिवाय तुम्हाला अमर्याद प्रतिबिंबे मिळू शकत नाहीत. ज्याने हे सर्व घडवले तो फार फार बुद्धिमान माणूस असला पाहिजे, यात शंका नाही. जेव्हा माणसांना वाटते, की बुद्धीतून ते देवाला समजू शकतात, तेव्हा त्यांनी हे शिकावे की ही बुद्धी जी परम आहे, तिथे कसे जायचे?

आपल्या निर्मितीसाठी त्यांनी किती कष्ट घेतले आहेत! पदार्थमात्राला तयार केल्यावर ते किंवा मी म्हणेन त्यांची शक्ती महालक्ष्मी स्वरूपात, पृथ्वीवर उतरते. महालक्ष्मी धारणेस (सस्टेनन्स) मदत करते. सस्टेनन्स याचा अर्थ हे जे मूळ पदार्थ, एलिमेंट्स आहेत त्यांचे स्कॅनिंग, परीक्षण करणे.

जेव्हा पदार्थमात्राची निर्मिती झाली तेव्हा तो विविध प्रकारे तयार केला गेला, वेगवेगळ्या हेतूसाठी बनवला गेला. पण शेवटी काय?

सृष्टीच्या निर्मितीचे अंतिम ध्येय मनुष्याची निर्मिती करणे हे आहे – हे सृष्टीचे सृजन! कल्पना करा!

तुम्ही लोक इतके महान आहात, की तुमच्यासाठी हा सर्व त्रास घेतला आहे. मानव हा इतका महत्त्वाचा आहे, की त्याच्यासाठी हा सर्व त्रास घेतला, तुम्हाला निर्माण करताना पदार्थमात्र व जे काही तयार केलेले आहे, त्याचा उपयोग केला जातो. हे अंतिम ध्येय आहे. हा सर्व मंच (स्टेज) मांडावा लागतो. आणि तुम्ही सहजयोग्यांनी मंचावर देखाव्यात यावे.

माणसाचे उपकरण (इन्स्ट्रुमेंट) तयार करायचे आहे. आता परमेश्वराने माणसाचे इनस्ट्रुमेंट का बनवले? कारण त्यांना असे इनस्ट्रुमेंट का बनवले? कारण त्यांना असे इनस्ट्रुमेंट बनवायचे होते, जे त्यांना समजेल, प्रसारित करेल, जशी श्रीकृष्णांनी त्यांची

मुरली बनवली.

त्यांना आपल्या इनस्ट्रुमेंट्स मधून त्यांच्या शक्तीचे संगीत वाजवायचे होते. पण त्यांना असे मृत इनस्ट्रुमेंट्स तयार करायचे नव्हते तर जिवंत इनस्ट्रुमेंट्स मधून करायचे होते. समजा हे (मायक्रोफोन) हे समजते आहे, प्रेम करू शकत आहे, त्याला मानवी मन आहे आणि पोकळ व्यक्तित्वाप्रमाणे माझा आवाज त्याच्यातून जात आहे, तर हे साक्षात्कारी व्यक्तित्व आहे, पण हे जिवंत शरीर नाही. तुम्ही जिवंत शरीरे आहात. हा सर्व त्रास घेऊन अडचणी पार विशेषकरून माझ्यासाठी इतके काळजीपूर्वक, नाजूकपणे, एकामागून एक बनवले आहे.

आता आपल्याला उत्क्रांतीच्या भागात जायचे आहे. हे फार दीर्घ आहे. तेव्हा आता आपल्याला सर्वात महत्त्वाच्या भागात, उत्क्रांतीच्या भागात यायचे आहे. तुम्ही हे समजून घ्या कारण आपल्याला विमानातून उत्क्रांती माहिती आहे.

जेव्हा या तीन प्रेरणा अस्तित्वात येतात, तेव्हा पृथ्वी किंवा हे विश्व किंवा काहीही निर्माण होण्यापूर्वी प्रथम त्यांना त्यांच्याबद्दल योग्य चित्र तयार करावे लागले आणि व्यवस्थित समजून घ्यावे लागले. ज्याप्रमाणे काही करण्यापूर्वी आपल्याला सर्व योजना बनवाव्या लागतात, आपल्याकडे योजना आयोग असतो त्याच्यात बसून प्रथम सर्व योजना बनवली जाते. त्याच पद्धतीने प्रथम त्यांना एक टप्पा (स्टेज) किंवा मंच रचावा लागला, जिथे त्यांना योजना बनवता आली. या स्टेजला आपल्याला वैकुंठ अवस्था म्हणता येईल ही सर्वात पहिली अवस्था नाही. ती नंतर निर्माण केली गेली. पहिल्या योजना बनवण्याच्या स्थितीला वैकुंठ स्थिती असे म्हणतात.

या स्तरावर त्यांनी अवतार निर्माण केले. पृथ्वीच्या निर्मितीनंतर अवतार निर्माण केले नाहीत. ही चुकीची कल्पना आहे. त्यांनी सर्व अवतार वैकुंठ अवस्थेत निर्माण केले. त्या काळात तुमचा डोळा नव्हता, पृथ्वी नव्हती किंवा तुम्हाला साध्या डोळ्यांनी दिसणारे काहीही अस्तित्वात नव्हते, पण अस्तित्वाची एक स्थिती, सर्वात पहिली, वैकुंठ स्थिती म्हणून ज्ञात असलेली अस्तित्वात होती. त्या वैकुंठ अवस्थेत संपूर्ण विश्वाची आणि संपूर्ण कॉसमॉसची अनेक विश्वे योजना निश्चित करण्यात आली.

तेव्हा प्रथम आलेले व्यक्तिमत्त्व होते श्रीशिव. कारण त्यांच्याशिवाय काहीच अस्तित्वात येऊ शकत नाही. पण त्यांना कुठे स्थापन करायचे, कारण त्यांना कोणावर तरी प्रतिबिंबित करायचे होते.

जर श्रीशिवांना प्रतिबिंबित करायचे असल्यास प्रतिबिंबित करणारे, रिफ्लेक्टर निर्माण करावे लागणार होते. तेव्हा प्रथम त्यांना एका आदिव्यक्तित्त्वाचा विचार करावा लागला. त्यांना एक विशाल व्यक्तित्व असे तुम्ही म्हणू शकता, त्यांना विराट असे म्हणतात.

त्यांनी विराटाची निर्मिती केली. की हे विराट असतील. हे विराटांचे, आदि व्यक्तित्त्वाचे किंवा आदिपुरूषाचे पूर्ण रूप असेल. ज्याच्याबद्दल मी सांगितले तो हा रिफ्लेक्टर आहे. प्रथम सर्वशक्तिमान परमेश्वरांना प्रतिबिंबित करायचे होते म्हणून सर्वात प्रथम आदिपुरूषाला निर्माण करूया, विराटाला निर्माण करूया.

विराटामध्ये त्यांनी विविध अवतारांचे सृजन केले. अवतार माणसांमधून निर्माण केले नाहीत. लोकांना असे का वाटते मला माहिती नाही! माणसे अवतार निर्माण करू शकत नाहीत. पण प्रथम अवतारांना निर्माण केले. अमीबा ते मानव अशी उत्क्रांती ठीक आहे, पण अवतारांना उत्क्रांती नसते. आरंभापासून त्यांना तसेच बनवले जाते.

मी तुम्हाला विराटाचे चित्र दाखवले आहे. तुम्ही पहिल्याप्रमाणे, विराटामध्ये महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली शक्ती आज्ञा चक्रात मिळतात. तिथे प्रत्येकीने दोन अपत्यांना जन्म दिला – ही गोष्ट नाही, वास्तव आहे – ते बहिण–भाऊ होते. हे बहिण–भाऊ म्हणजे हे अस्थायी स्वरूपाचे पण फार सूक्ष्म स्वभावाचे नाते होते आणि मग त्यांचे विवाह झाले. त्यांचे परस्परांतील संपर्क तयार झाले. महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली यांनी एकंदर सहा अपत्ये तयार केली. त्यांची लग्ने झाली. आपापसात लग्ने झाली. त्या लग्नामुळे त्यांना कार्यान्वित ऊर्जा (कायनेटिक एनर्जी) असलेले एक आणि सुप्तावस्थेतील ऊर्जा (पोटेन्शियल एनर्जी) असलेले एक अशी व्यक्तिमत्त्वे असलेली जोडपी, अशी कॉम्बिनेशन्स मिळाली. त्या अवतारांची चक्रावर स्थापना करण्यात आली. त्यांना वरून खालच्या बाजूस म्हणजे आज्ञा चक्रापासून खाली आणून चक्रांवर बसवण्यात आले. तुम्हाला माहिती आहे, की या अवतारांना विराटाच्या वेगवेगळ्या चक्रांवर स्थापित केले गेले.

पुष्कळ लोकांना हे समजणार नाही आणि हे ऐकायला आवडणार नाही, कारण माणूस इतका अहंकारी आहे, की त्याला परमेश्वर सर्वशक्तिमान आहेत व ते प्रत्येक गोष्ट करणार आहेत त्यांच्या करण्याच्या पद्धती आहेत हे समजत नाही. आता मी तुम्हाला सत्य सांगत आहे की नाही ते तुम्ही चैतन्य लहरींवर तपासून पाहू शकता, हे अवतार कसे निर्माण केले ते स्वत: समजू शकता आणि हे सर्व अवतार विराटांच्या अवस्थेत इथे, दुसऱ्या बाजूत प्रतिबिंबे निर्माण करण्यासाठी, बसवण्यात आले. श्रीशिवांना शक्तीपासून आरंभी केले होते तसे वेगळे करण्यात आले आणि विराटांच्या मस्तकावर सदाशिवांचे पीठ म्हणून बसवण्यात आले. त्याचप्रमाणे आपल्या मस्तकावरसुद्धा सदाशिवांचे पीठ आहे. तुम्ही हे पहा, की आपण प्रतिबिंबकाचे प्रतिबिंब (Reflection of the reflector ) आहोत. म्हणून आपली ही तशीच पद्धत आहे. आपल्याही मस्तकावर सदाशिवांचे पीठ आहे. त्यांचीही इथेच स्थापना करण्यात आली आहे.

पण जेव्हा कुंडलिनी शरीरात प्रवेश करते, जेव्हा स्त्री गर्भावस्थेत असते, त्यावेळी

सदाशिवांचे पीठ किंवा आपण म्हणू शकतो, या पीठातून सदाशिव खाली हृदयात उतरतात. आणि त्यामुळे तुम्हाला हृदयात पहिला ठोका ऐकू येतो. विराटात घडले तसेच इथेही होते. पण वैकुण्ठ अवस्थेत हे निर्माण केलेले नव्हते. दुसरा प्रतिबिंबक निर्माण केलेला नव्हता, फक्त पहिलाच केलेला होता. म्हणून फक्त विराटांनाच बनवले होते आणि त्यांच्या शरीरात, योजना बनवण्याच्या टप्प्यावर सर्वात आधी, हे अधिकारी, चक्रांचे प्रमुख, आदिशक्तींनी निर्माण केले.

परमेश्वर साक्षी आहेत, श्री आदिशक्ती लीला–नाटक करीत आहेत आणि त्या ही चक्रे निर्माण करीत आहेत. त्या चक्रांवर नियंत्रणासाठी या दैवतांची स्थापना करीत आहेत.

आता अस्तित्व आहे, सृष्टी आहे, सृजनात्मक प्रेरणा (फोर्स) आहे आणि उत्क्रांतीची प्रेरणा आहे आणि हे सर्व विराटाच्या अवस्थेत आहे.

आता हे वैकुंठ अवस्थेत आहे असे आपण म्हणतो, कारण ही अवस्था पहिल्या प्रतिबिंबावर आहे. ही आपल्यात नाही अथवा आपण वैकुंठ स्थिती जाणू शकत नाही कारण ती पहिल्या प्रतिबिंबात आहे. त्याच्यानंतर दुसरी अवस्था मग तिसरी आणि नंतर चौथी अवस्था जी भवसागरांची अवस्था, ज्यावेळी आपले जन्म झाले – अशी निर्मिती झाली.

सर्वप्रथम, चौथ्या अवस्थेत, आता चार पातळ्या, स्तर असलेली व्यक्ती आरशासमोर आहे अशी कल्पना तरी करू शकता का? आता पहिली दाखवली जाईल ती कोणती? सर्वात वरची. म्हणून सर्वात वरची भवसागराची अवस्था दाखवली जाईल, पण तुम्ही तुमच्या स्थितीच्या गहनतेत उतराल, तर तुम्हाला इतर तीन अवस्था ही जाणवतील. परंतु पहिली अवस्था, जी तुम्ही पाहू शकता व जाणवू शकता ती भवसागराची अवस्था आहे. या स्तरावर तुम्ही भवसागराच्या स्थितीत आहात. या भवसागराच्या अवस्थेत तुम्हाला निर्माण केले आहे व तुम्हाला उत्क्रांत व्हायचे आहे.

यावेळी तुमच्या उत्क्रांतीसाठी महालक्ष्मी शक्ती कार्य करते. उत्क्रांती कशी घटित झाली ते तुम्हाला आधीच माहिती आहे. आमच्या पुराणांत सांगितल्याप्रमाणे उत्क्रांती कशी झाली – जे वास्तव आहे – ते मी तुम्हाला सांगते.

मनुष्याच्या उत्क्रांतीची सुरूवात अमीबापासून झाली, तुम्हाला म्हणता येईल, कारण प्रथम पाण्यात जीवन अस्तित्वात आले. मी सांगितले आहे की प्रथम पाणी निर्माण झाले. पाण्यात अमायनो ॲसिड्स बनले, मग अमीबा बनले आणि मासे बनले. मासे बनले तेव्हा समजले, की लहान माशांना जगणे अवघड झाले कारण मोठे मासे त्यांना खाण्याचे प्रयत्न करीत होते. त्याची प्रतिक्रिया होते. लहान मासे या विनाशाला कंटाळले होते. या वेळी श्रीविष्णू जे उत्क्रांतीची शक्ती आहेत, स्वत: मत्स्यावतारात पृथ्वीवर अवतरले. त्यांनी काही माशांना किनाऱ्यावर येण्यास मदत केली. जसे ते लीडर होते त्यांच्यात पार करण्याचे साहस

होते. ही उत्क्रांतीची पहिली पायरी आहे.

हे मासे पुढे जाऊन उत्क्रांतीच्या अवस्थेत सरपटणारे प्राणी झाले. पण ते सरपटणारे प्राणी कसे झाले? त्यांना कोणीतरी नेतृत्व देणारे आवश्यक होते. परत हे कार्य श्रीविष्णूंनी केले. ज्यांनी कूर्म अवतारात पृथ्वीवर येऊन त्यांना नेतृत्व दिले. या वेळी वैकुंठ अवस्थेत अनेक गोष्टी केल्या गेल्या. त्या श्रीविष्णू कूर्मावतारात पृथ्वीवर येण्यापूर्वी झाल्या. त्यांनी ही पृथ्वी निर्माण केली तेव्हा संपूर्ण विराटाची योजना तयार केली. त्यांना प्रतिबिंबकाच्या या बाजूस जे करायचे होते त्याची संपूर्ण योजना आणि संपूर्ण विचार त्यांनी केला. त्या प्रक्रियेत काही निरूपयोगी गोष्टी निर्माण झाल्या व पुढे आल्या.

हे निरूपयोगी पदार्थ दूषित झाले किंवा आपण म्हणू एका बाजूला साठून राहिले. काही तरी कारणाने त्याच्याकडे दुर्लक्ष झाले आणि त्याच्यामधून सैतानी ताकद बाहेर पडायला सुरूवात झाली. सैतानी ताकद व चांगल्या शक्ती यांच्यात मोठे युद्ध झाले. हे तिसऱ्या अवस्थेत, वैकुंठ अवस्थेत नाही, तर तिसऱ्या अवस्थेत झाले. कारण जेव्हा योजना बनायला आणि ती कार्यान्वित करण्यास आरंभ झाला तेव्हा सैतानी शक्ती सुरू झाल्या.

आता लोक म्हणतील, की परमेश्वराने सैतान का निर्माण केले? त्यांनी नाही केले. पण शेवटी तसे ते झाले. कारण दुसऱ्या अवस्थेत जेव्हा देवांपैकी काहींनी त्यांना निर्माण केले, ते उत्क्रांत झालेले लोक नव्हते, पण ते सर्व पंचमहाभूतांचे आणि तत्त्वांचे आणि या सर्व कार्याचे प्रमुख होते असे अधिकारी व बाहेर जाऊन कार्य करणारे लोक निर्माण करावे लागतात. या देव–देवतांच्या कार्यातून काय झाले? त्यांच्यापैकी काही भरकटले व सैतानी शक्ती झाले. एक प्रकारचा निरूपयोगी पदार्थ उद्‌भवला. त्या निरूपयोगी पदार्थाबरोबर सैतानी शक्ती सुरू झाल्या आणि ते अशा प्रकारे वागले, की कूर्मावताराच्या काळात राक्षसांच्या, असुरांच्या बरोबर युद्ध झाले. म्हणून चांगले लोक जे एलिमेंट्‌सचे प्रमुख होते. परमेश्वराच्या कार्यालयात काम करीत होते. त्यांनी सैतानी ताकदींशी युद्ध सुरू केले. या काळात त्यांनी स्वत: हे कार्यान्वित केले आणि तुम्हाला माहिती आहे की अमृत मंथन झाले तेव्हा काय झाले. लोकांना हे समजत नाही, की अमृत मंथन भवसागरात कसे झाले. ते झाले नाही. ते भवसागराच्या अवस्थेत झाले नाही.

आता आपण भवसागर अवस्थेत आहोत. या भवसागराच्या अवस्थेत तेच कूर्म (श्रीविष्णूंचा अवतार) पृथ्वीवर जन्माला आले आणि आपल्याला योग्य सरपटणारे प्राणी कसे व्हायचे याची समज दिली. सर्व सांगण्यात बराच वेळ जाईल. मी त्याच्यात जाणार नाही, पण अंतिमत: माणसाला निर्माण केले. हे सर्व महालक्ष्मी शक्तीने केले. त्यांनी श्रीविष्णूच्या माध्यमातून कार्य केले. तेच मी तुम्हाला सांगितले की उत्क्रांती कशी झाली व तुम्हाला कसे तयार केले.

आता काय होणार आहे? तुम्ही या बिंदूपर्यंत (पॉइंट) येता, या बिंदूवर जिथे येशू ख्रिस्त आले, ख्रिस्त सुद्धा अवतार होते आणि त्यांची आई दुसरे कोणी नाही, तर राधाजी, महालक्ष्मी स्वत: होत्या. ते मानवाला या अवस्थेपर्यंत पुढे घेऊन आले.

याच्या पुढे आता मनुष्याला काय व्हायचे आहे? त्या अवस्थेत जायचे आहे. जिथे तो निर्विचार होईल याचा अर्थ भवसागरापुरतीच चेतना राहिली नाही तर तुम्ही थोडे त्याच्या पुढे जाता. याच्यापुढे तुम्ही वैश्विक अचेतनेच्या अवस्थेत गहनतेत जाता. त्याला अचेतन म्हणतात. ते दुसरे काही नाही, तर तीच शक्ती जी इथे अस्तित्वात आहे, जी तिन्ही शक्तींचे एकत्रीकरण आहे. हे तीनही शक्तींचे एकात्म होणे आहे. ती आदिशक्तींची शक्ती आहे. आदिशक्तींची शक्ती सर्वव्यापी आहे, ती प्रत्येक ठिकाणी अस्तित्वात असते. पण आपल्याला इतर स्थितीत ती जाणवत नाही. का? याचे कारण आपण फार स्थूलात असतो. समजा एक ट्यूब आहे, तिच्यात चार स्तर आहेत, त्याच्यापैकी फक्त बाहेरची ट्यूबच वापरली जाते कारण आतल्या ट्यूब्ज सर्व बंद आहेत. पण सर्वात आतली ट्यूब उघडेल तेव्हा तुम्ही परम परिपूर्ण आत्मसाक्षात्कारी व्हाल, पण दुसरी ट्यूब उघडली तरी तुम्हाला परमेश्वराच्या सर्वव्यापी शक्तीची जाणीव होईल. जिला आपण सर्वव्यापी अचेतन म्हणतो. पण आता ती तुमच्यासाठी अचेतन नाही कारण तुम्हाला त्याची जाणीव, त्याची चेतना आहे.

अशा प्रकारे तुम्ही परमेश्वराशी संभाषण सुरू करता. काय होते की इथे प्रतिबिंब आहे, इथे प्रतिबिंबक (रिफ्लेक्टर) आणि प्रतिबिंबित होणे आहे. इथून तुमचे उत्थान या भागात होते. तुमचे या भागात उत्थान होते. तुम्ही हे होत नाही, तर तुम्ही या भागात उन्नत होता. या इथून तुम्ही या क्षेत्रात उन्नत होता. आणि हे क्षेत्र श्रीआदिशक्तींच्या सर्वव्यापी शक्तीने भरले आहे.

तुम्हाला अवताराच्या या स्तरापर्यंत जायला हवे. हे अर्थातच मोठे अंतर आहे. मी म्हणू शकते की बुद्ध आणि महावीर दोन्ही या उंचीवर उन्नत झाले होते. पण त्यांचा निरिच्छपणा पहा! उदा.बुद्धांचा निरिच्छपणा पहा.

पण लोकांनी काही ज्ञान नसतानाही जसे पुतळे बनवले आहेत, त्यांनी दाखवले आहे, की देवी श्री शिवांवर उभी आहे, पार्वती आहे, ती श्रीगणेशांना मारते आहे! हा सर्व मूर्खपणा आहे. त्यांनी त्या शक्तीची प्रतिमा, जी एकात्म शक्ती आहे, जी सर्व काही घडवून आणते आहे, एकच कल्पना आहे, एकच मन अहे, ती प्रतिमा नष्ट केली आहे. जे लोक एकात्म होऊ शकले नाहीत, ते राक्षस झाले, सैतानी शक्ती झाले.

मी सांगितल्याप्रमाणे हा फार फार अवघड विषय आहे, मी समजावण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्रजीत तर जास्तच अवघड आहे. माझ्याकडून सर्व प्रयत्न केला आहे. तुम्हाला प्रश्न असल्यास मला विचारू शकता, मला पत्र लिहू शकता.

उद्या........ मला तुम्हाला हेच सांगायचे आहे, की तुम्हाला जाणिवेतली निर्विचारिता आली आहे यात शंका नाही. तुमच्यापैकी बहुतेकांना जाणिवेतली निर्विचारिता आली आहे, तुम्हाला चैतन्य लहरी मिळाल्या आहेत. पण तुम्हाला निर्विकल्पात जायला हवे. निर्विकल्पात आणि ते गहन ध्यानातून, आंतरिक गहनता खुली करून. अन्यथा, निर्विचारितेच्या या लहान अवस्थेचा काही उपयोग नाही. तुम्हाला निर्विकल्पात जायलाच हवे.

पण पुष्कळ जण अजून वर–खाली जातात. या अवस्थेला झेन धर्मात सतोरी (Satori) असे म्हणतात – यात माणूस वर–खाली जातो, म्हणजे त्याला पकड येते, तो हे करतो, ते करतो वगैरे. या स्थितीवर मात करायला हवी. मग तुम्ही निर्विकल्प अवस्थेत जाता. निर्विकल्प अवस्थेच्या शेवटी तुम्हाला विशेष पकड येत नाही. तुम्हाला पर्वा नसते. अजून मला तसा माणूस भेटला नाही. मी मोठे संत पाहिले आहेत, साक्षात्कारी लोक पाहिले आहेत, ते निश्चित आत्मसाक्षात्कारी आहेत हे मी सांगू शकते, निसर्गावर नियंत्रण करतात, पण तरी सुद्धा त्यांची चक्रे पकडतात. हे आश्चर्यकारक आहे.

पण माणसे तशी असतात. ते तिसऱ्या आत्मसाक्षात्काराच्या अवस्थेत पूर्ण गेलेली असतात, पण ते पुन्हा सतोरी (Satori) अवस्थेत येतात, पुन्हा वर जातात, असे होते. पण अजून मला एकही माणूस भेटला नाही, जो मी म्हणेन पूर्ण आत्मसाक्षात्कारी आहे, ज्याची चक्रे पकडत नाहीत.

माझा अपवाद सोडल्यास मला प्रत्येक स्त्री चक्रे पकडतांना दिसतात. चक्रे पकडली जात नाहीत, ही अवस्था मिळवणे अवघडआहे. पण ती कशी मिळवायची? तर चक्रांच्या पकडण्याकडे तुम्ही अशा दृष्टीने पहा, समजा तुमचे आज्ञा चक्र पकडले आहे. समजा तुमची आज्ञा पकडली आहे, तर आपली आज्ञा पकडली आहे हे तुम्हाला समजायला हवे. तेव्हा तुम्ही असा विचार करू नका, की तुमचे आज्ञा चक्र पकडले आहे, तर असा करा, की दुसऱ्या माणसाशी लढण्यासाठी तुम्ही शक्ती (फोर्स) एकत्र करीत आहात. तुम्हाला तसे करता आले, समजा तुमचे विशुद्धी चक्र पकडले आहे. तेव्हा आपले विशुद्धी चक्र पकडले आहे असे म्हणून त्याच्याबद्दल नाराज होण्यापेक्षा तुम्ही असा विचार करा, की त्या व्यक्तीच्या विशुद्धी चक्राला समोरच्या बाजूने तुमच्या बाजूने संतुलनात आणण्यासाठी तुम्ही ही शक्ती (फोर्स) एकत्र करीत आहात. याचा, मला वाटते, फायदा होईल. म्हणून मी नेहमी सांगते, की तुमचा हात पुढे करा आणि स्वत: अनुभव घ्या. याचा पुष्कळांना उपयोग झाला आहे. कारण त्यांची आज्ञा पकडत असेल आणि ज्याची आज्ञा पकडली आहे अशा माणसाला त्यांनी व्हायब्रेशन्स दिल्यास ते मोकळे होतात. हे फार थोड्यांना होते, पण होते.

तेव्हा तुम्ही हे करून बघा. तुमचे चक्र पकडले आहे असा विचार करू नका तर असा

विचार करा, की दुसऱ्या माणसाच्या आज्ञा चक्रावरची पकड काढण्यासाठी ही शक्ती एकत्र झाली आहे. आरंभी, अर्थात, ही हळूहळू होणारी क्रिया आहे, पण हळूहळू तुम्हाला जमेल. फक्त लोकांनी दुसऱ्यास द्यायला सुरू करायला पाहिजे. हा सामूहिक विचार आहे, सामूहिक विचार आहे. आता तुम्ही असे म्हणू शकता, समजा माझ्यावर मलेरियाचा अटॅक आहे, तेव्हा माझ्या स्वत:च्या रक्तातील पेशी त्याच्याशी लढत आहेत आणि त्या लढत आहेत. मी सोडून दिले, शरण गेले तर मला मलेरिया होईल, पण मी शरण गेले नाही, तर मी जिंकेन.

चैतन्य लहरी देतांना तुम्ही असा विचार कराल की तुमचे चक्र पकडल्यास तुमच्यात ही शक्ती गोळा होत आहे, तर सर्व ऋषी–मुनी एकत्र येऊन होईल, त्याच्यापेक्षाही तुम्ही जलद व्हाल. पण माणसांना असा विचार करणे जरा अवघड असते कारण एकदा त्यांचे चक्र पकडले तर त्यांना काळजी वाटते आणि स्वत:च पकड काढण्याची सुरूवात करतात, पण तुम्ही स्वत:च स्वत:ची पकड न काढता, दुसऱ्याला चैतन्य लहरी देण्याचा सर्व प्रयत्न करा, तर ते चांगल्या प्रकारे कार्यरत होईल. मी एक दोन लोकांवर याचा प्रयोग केला आहे आणि मी सांगते आणि त्याने काम झाले. प्रत्येकात ही क्षमता नसते. हळूहळू तुम्ही उभे राहता. कारण अजून तुम्ही नवजात शिशू आहात. अजून तुमची वाढ व्हायची आहे. तुम्ही शिकत असाल, तुम्हाला पुष्कळ ज्ञान असेल पण तुमच्या आध्यात्मिक स्थिती संबंधात, तुम्ही नुकतेच सतोरी अवस्थेतून बाहेर आला आहात – काही जण, तर काही जण अजून ही सतोरी अवस्थेत असतील. तेव्हा काळजी घ्या. मला तुम्हाला भेटायचे अहे, कदाचित दोन वर्षांनी, मला माहीत नाही केव्हा?

उद्या आपण इथे ध्यान घेणार आहोत. तिथे मी जास्त बोलत नाही. इथे ध्यान केंद्र आहे. तिथे तुम्ही जा, भेटा. तुम्ही ग्रुपमध्ये एकत्र येता तेव्हा ते सामूहिक कार्य होते, तिथे मी असेन. तुम्हाला आश्चर्य वाटेल, माझ्या चैतन्य लहरी जेवढ्या ग्रुपमध्ये जाणवतात, तेवढ्या दुसरीकडे जाणवत नाहीत आणि मला हे ज्ञात असते, की हा ग्रुप इथे काम करीत आहे.

दिल्लीमध्ये तीन गट कार्यरत आहेत आणि ते जवळच आहेत. तुम्हाला माहिती असेलच, की इतर लोक गेले, तसे तुम्हाला हिमालयात जाण्याची आवश्यकता नाही. हे सगळे करण्याची गरज नाही. आपल्याला फक्त आपल्याजवळ असलेल्या ठिकाणी जायचे आहे. सगळे आपल्या दरवाजात आणले आहे, ज्ञान, चैतन्य लहरी, आत्मसाक्षात्कार आणि प्रत्येक गोष्ट एवढी सोपी केलेली आहे. पण याचा अर्थ असा नाही, की तुम्ही हे होणारच असे गृहीत धरावे. मी म्हणेन, की हे सर्व माझ्या मोठ्या तपस्येतून सोपे झाले आहे.

मी अनेक युगात, हजारो वर्षे राहिले आहे, अनेक माणसांवर अनेक गोष्टींवर हे घडवले आहे आणि शेवटी मला बहुतेक सर्व माणसांचे विविध गट एकत्र करणे, त्यांना विविध पद्धतींनी योग्य प्रकारे एकत्र करणे शक्य झाले आहे. मी त्या पद्धतीने केले नसते, तर जमले

नसते.

अशा प्रकारे ते घटित झाले आहे, बहुतेक सर्व लोकांवर झाले आहे. फक्त एकाच प्रकारच्या लोकांचा अपवाद आहे, जे राक्षसांशी बांधले गेले आहेत त्यांच्यासाठी फार फार अवघड आहे. जे राक्षस म्हणून जन्माला आले आहेत त्यांच्या पायाला तुमचे डोके लागले असेल, तर ते फार अवघड आहे. तेव्हा तुम्हाला मी इशारा देते की कोणाच्याही पायाला स्पर्श करण्यापूर्वी काळजी घ्या. ईश्वराचे तुम्हाला  आशीर्वाद!

तुम्हाला सगळ्यांना आधीच उशीर झाला आहे एवढा अवघड विषय इतक्या थोड्यावेळात मांडणे फार अवघड आहे. सहजयोगावर मी एक पुस्तक लिहिणार आहे. ते होईल अशी आशा आहे, मी आशा आहे असे म्हणते कारण मी अजून एक ही पुस्तक लिहिले नाही. मी लिहायचा प्रयत्न करीत आहे. पण त्यापूर्वी दुसरे काही लोक लिहीत आहेत. मी पण लिहीन अशी आशा आहे. पण काहीही असले तरी, तुमच्या स्वत:च्या साक्षात्कारापेक्षा आणि तुमच्या उत्थानापेक्षा याला जास्त महत्त्व नाही.

संपूर्ण ज्ञान तुम्हाला मिळेल, प्रकाशमान होईल. तुम्हाला काही करायला नको. प्रत्येक शब्द जो तुम्ही वाचाल, त्याचा अर्थ लागेल व ते तुम्हाला समजेल.


पहिली गोष्ट ही की तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळायलाच हवा. दुसरी ही, की तुमचे उत्थान व्हायलाच हवे. अधिक अधिक उत्थान व्हायला हवे. आणि याच्यासाठी वेळ द्यायला हवा. हे होणारच असे गृहीत धरू नका. ही फार महत्त्वाची गोष्ट तुम्ही करायला पाहिजे. इतर गोष्टी पण आहेत त्याही महत्त्वाच्या आहेत आणि हे करायलाच पाहिजे.

परमेश्वराच्या कृपेने हे घटित झाले तर मला आनंद होईल. तशीच मी फार आनंदात कारण माझ्या कोणत्याच जन्मात इतक्या लोकांना आत्मसाक्षात्कार देणे मला शक्य झाले नव्हते. म्हणून आहे तशीच मी फार समाधानी आहे, पण अधिक, आणखी अधिक मागा आणि ते दिले जाईल. कारण तुम्ही लोक मंचावर आहात. तुम्हाला या हेतूनेच बनवले आहे. हे करायलाच पाहिजे. परमेश्वरांना हे करायलाच पाहिजे. त्यांनी हे केले नाही, तर त्यांच्या स्वत:च्या इच्छा ते पूर्ण करू शकणार नाहीत आणि त्यांनी स्वत: निर्माण केलेली सृष्टी ते नष्ट करणार नाहीत.

परमेश्वराचे तुम्हाला आशीर्वाद!

## परिशिष्ट (Appendix)

# श्रीमाताजींनी काढलेल्या अतिरिक्त आकृत्या





*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १४ - आज्ञा चक्राचे चित्र**

श्रीमाताजींनी सविस्तर सांगितले, की परमेश्वराचे साम्राज्य आपल्यासाठी वर्तमान क्षणी उघडते जेव्हा ऊर्ध्वगामी कुंडलिनी अहंकार आणि प्रति अहंकाराच्या खांबांना मागील बाजूस ढकलते आणि आज्ञा चक्रातील चित्त मोकळे होते.

(हर्स्ट ग्रीन, यू.के, १९७५)





*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १६ - ॐ चे चित्र**

श्रीआदिशक्तींना परब्रह्मापासून वेगळे होऊन सृष्टीच्या निर्मितीचे लीला नाटक आरंभ करण्यास आमंत्रित केले तेव्हा त्यांच्या लंबगोलाकार फिरण्याने ॐ कसा तयार झाला हे श्रीमाताजींनी समजावले.

(हर्स्ट ग्रीन, यू.के, १९७५)





*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

## आकृती १७ - चित्ताच्या डाव्या व उजव्या बाजूकडे जाण्याचे चित्र

चित्ताची व्याख्या करतांना श्रीमाताजींनी प्रकट केले, की आपले चित्त धर्माचा मध्यमार्ग ओलांडून उजव्या बाजूस (रजोगुण) दूरवर जाते तेव्हा उत्थान होण्यासाठी त्याला पुन्हा मध्यमार्गात ओढण्यास दुप्पट शक्तीची गरज असते.

(हर्स्ट ग्रीन, यू.के, १९७५)





*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १८ - सूक्ष्म नाडी संस्थेचे चित्र**

या चित्रात श्रीमाताजींनी समजावले की माणसाची (मायक्रोकॉझम, लहान जीव) विराटाच्या (मॅक्रोकॉझम सर्वात मोठा जीव) धर्तीवर (पॅटर्न) रचना केली असून त्याच्या दोन्ही बाजूस सुप्त चेतना व चेतना बाह्यता हे दोन प्रांत आहेत. कुंडलिनी अनेक युगांचे मानवी चेतनेचे कोड व रेकॉर्ड धारण करून त्याच्यामधून जाते.

(हर्स्ट ग्रीन, यू.के, १९७५)




*प.पू.श्रीमाताजी द्वारा बनवलेले मूळ चित्र*

**आकृती १९ - अहंकार आणि प्रति अहंकाराची सुरूवात दाखवणाऱ्या सूक्ष्म नाडी संस्थेच्या चित्राचा मागील भाग**

श्रीमाताजींनी समजावले की कुंडलिनी उठण्याच्या घटनेमुळे चित्त कशाप्रकारे सुषुम्नेच्या अंतर्गत ब्रह्मनाडीमध्ये खेचले जाते, जेणेकरून आता आपण आपल्या अस्तित्वाच्या किनाऱ्यावरच तरंगत राहणार नाही.

(हर्स्ट ग्रीन, यू.के, १९७५)

**सर्वाधिकार सुरक्षित**

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाची दुसरी आवृत्ती किंवा कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा विविध माध्यमांमध्ये रूपांतर जसे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, झेरॉक्स, पुनर्मुद्रण हे पूर्व परवानगीशिवाय करू नये.

*''मला आशा आहे, की मी सहजयोगावर एखादे पुस्तक लिहीन...
संपूर्ण ज्ञान तुमच्यावर प्रकाशमान होईल.
तुम्हाला काही करण्याची आवश्यकता नाही. आता प्रत्येक शब्द
जो तुम्ही वाचाल, त्याबद्दलचा अर्थ तुमच्या जवळ असेल
आणि तुम्ही तो समजू शकाल.''*

*परम पूज्य माताजी श्रीनिर्मला देवी*

सहजयोगाविषयी अधिक माहितीसाठी भेट द्या www.sahajayoga.org